# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_196081
UNIVERSAL LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No [illegible] Accession No [illegible]

Author [illegible]

Title [illegible]

This book should be returned on or before the date last marked below

कृष्णदयार्णवकृत

# हरिवरदा

[ श्रीमद्भागवत-दशमस्कंधावरील टीका ]

## खंड ७ वा

( अध्याय ५६ ते ६५ )

तें हें हरिवरदाव्याख्यान । स्वानंदसुधारसभोजन ।
श्रवण करितां श्रोतेजन । परीक्षितीसमान तृप्त होती ।।
—हरिवरदा ६४. ३५६

संपादक
रामचंद्र चिंतामण ढेरे

एकनाथषष्ठी : शके १८८२

मूल्य ७ रुपये (कागदी) : ८ रुपये (कापडी)

प्रकाशक :
**दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर**
१२५७ सदाशिव पेठ,
पुणें २

**खंड १ ते ४ चें मूल्य :**
**प्रत्येकीं ६ रुपये**
**खंड पांचवा : ८ रुपये**
**खंड सहावा : ७ रुपये**

मुद्रक :
मा. ह. पटवर्धन,
**संगम प्रेस प्रा. लि.,**
३८३ नारायण पेठ, पुणें २

# प्र स्ता व ना

**तें हें हरिवरदाव्याख्यान । स्वानंदसुधारसभोजन ।**
**श्रवण करितां श्रोतेजन । परीक्षितीसमान तृप्त होती ।।** —हरिवरदा, ६४·३५६

## हरिवरदेचा कीर्तिसुगंध

हरिवरदेच्या आंगिक आणि आत्मिक सौंदर्याने सर्व सुजाण मराठी रसिकांना आकर्षून घेतले आहे. अनेक सुबुद्ध रसिक आणि अभ्यासक हरिवरदेच्या गंभीर अध्ययनांत रंगू लागले आहेत. या ग्रंथाच्या काही भागाचा विद्यापीठीय अभ्यासक्रमांत समावेश झाल्यामुळे त्याच्या अनेक गुणविशेषांचा सूक्ष्म अभ्यास होऊं लागला आहे. कृष्णदयार्णवाच्या शृंगारविवेकाची स्तुति करतांना नागपूरचे प्रा. भा. श्री. परांजपे यांनी म्हटले आहे—"ज्ञानेश्वरापासून रामदासापर्यंतच्या संतकवींनी शृंगाराविषयी चर्चा केली आहे, तींत कृष्णदयार्णवाच्याइतकी विस्तृत उद्‌बोधक आणि भिन्न भिन्न पैलू लक्षांत घेणारी चर्चा कुणी केल्याचे दिसत नाही. कृष्णदयार्णवाच्या चर्चेत पारमार्थिकाइतकी लौकिकाची, नीच शृंगाराइतकी सभ्य शृंगाराची, फार काय उत्तम लक्षणाइतकीच उत्तमोत्तम काय असते त्याची चर्चा केलेली आढळते. पारमार्थिक क्षेत्रांत शृंगारविषयक जे महत्त्वाचे प्रश्न होते, त्यांचा विचार जसा त्यांनी केला, तसाच—मुळाला क्वचित् विरोध करून—स्वतःचा वेगळा निर्भय दृष्टिकोनहि त्यांनी मांडला. प्रस्तुत-अप्रस्तुत, श्लील-अश्लील, युक्त-अयुक्त यांचाहि विवेक त्यांनी केला आणि शृंगारवर्णनाच्या मर्यादाहि स्पष्ट केल्या. एकंदरीत रसिकतेच्या बरोबरीने नैतिकता, भाविकतेइतकीच चिकित्सकता आणि मुळांतील पदापदाचे व्याख्यान करणाऱ्या पांडित्याइतकीच स्वतंत्र विचारशक्ति हे कृष्णदयार्णवाच्या लेखणीचे गुण जसे त्यांच्या निरूपणांत तसेच त्यांच्या शृंगारविवेकांत दिसतात." ('तरुण भारत': दिवाळी १९६०) हरिवरदेच्या अंतरंगाशी परिचय झाल्यावर कोणीहि सुजाण रसिक असेच गौरवोद्‌गार काढील. मराठी वाङमयाभिरुचीचे विहंगमावलोकन करतांना प्रा. जोग यांनी पंडितकविमंडळांत दयार्णवाचे स्थान वरचें मानले आहे. ते लिहितात : "कृष्णदयार्णवाची वृत्ति तात्त्विकापेक्षां भक्तीची असल्यानें त्यांनी...मूळ भागवतांतील शृंगाराचा विस्तार केलेला दिसतो. मात्र हे सारें प्रौढ संस्कृतप्रचुर अशा भाषेमध्ये केले आहे. त्यामुळें त्याला ग्राम्यत्वाचा वास येत नाही...कृष्णदयार्णवाचें लेखन रसाळ आहे. त्यांत भाषाविलास पुष्कळ आहे, पांडित्यहि आहे; भक्ति हा त्याच्या लेखनाचा मूलाधार आहे. एकनाथांच्यापेक्षां हें लेखन सरस आहे...पंडित म्हणविणाऱ्या इतर बऱ्याच कवींनी कृष्णदयार्णवाचें भाषाप्रभुत्व आत्मसात् केले असते, तर त्यांचें लेखन पुष्कळच देखणें झाले असतें, असें म्हटल्यावांचून राहवत नाही." ('मराठी वाङमयाभिरुचीचे विहंगमावलोकन' पृ. ९५, ९७) रसिकता, प्रगल्भता आणि भक्तिमयता यांची एकात्मता साधणाऱ्या हरिवरदेचा कीर्तिसुगंध उत्तरोत्तर असाच दरवळत राहणार आहे.

## सप्तम खंडाचें स्थूल स्वरूप

सहाव्या खंडाच्या प्रसिद्धीनें हरिवरदेची पंचम एकादशिनी पूर्ण झाली आणि एकूण ५५ अध्याय वाचकांच्या हातीं पडले. या सातव्या खंडांत ५६ ते ६५ या दहा अध्यायांचा समावेश आहे. या खंडाची ओवीसंख्या ४५४१ असून श्लोकसंख्या ४५६ आहे. म्हणजे सरासरी प्रत्येक श्लोकावर १० ओव्यांचे व्याख्यान आहे. ही साडेचार हजार ओव्यांची रचना सुमारें दीड वर्षांत झालेली आहे. अध्यय ५६ : कार्तिक कृ. ७ श. १६५७-मयूरग्राम; अध्याय ५९ : मार्गशीर्ष शु ५ श. १६५८-मुंगी; अध्याय ६० : मार्गशीर्ष कृ. ८ श. १६५८-मुंगी; अध्याय ६२ : पौष कृ. १ श. १६५८-मुंगी; अध्याय ६३ : माघ शु. १ श. १६५८-मुंगी; अध्याय ६४ : चैत्र कृ. १३ श. १६५९-मुंगी—अशी या खंडातील काही अध्यायांच्या स्थलकालाची माहिती उपलब्ध आहे. सहासष्टाव्या अध्यायाची रचना वैशाख कृ. १० श. १६५९ रोजी मुंगी येथें पूर्ण झालेली आहे. त्या अर्थी पासष्टावा अध्याय श. १६५९ च्या चैत्रअखेरीसच पूर्ण झाला असावा. म्हणजे स्थूल मानाने दीड वर्षाच्या अवधींत हे दहा अध्याय रचले गेले. या काळांत दयार्णवाचा निवास प्राधान्याने मुंगीच्या स्वमठांत असावा, असे दिसते.

या खंडांत अ. ५६–५७ मध्यें स्यमंतकाख्यान; अ. ५८-मध्यें श्रीकृष्णाची पंचपाणिग्रहणें; अ. ५९ मध्यें भौमासुरवध, पारिजातहरण व सोळा सहस्र वधूंशी श्रीकृष्णाचे विवाह; अ. ६० मध्यें कृष्ण-रुक्मिणी यांचा प्रेमकलह; अ. ६१ मध्यें कृष्णसंतति-वर्णन, रोचना-अनिरुद्ध-विवाह व अन्य कृष्ण-

संततीचे विवाह; अ. ६२-६३ मध्यें उषाहरणाख्यान; अ. ६४ मध्यें नृगाख्यान, आणि अ. ६५ मध्यें बलरामाचे गोकुळ-गमन, गोपीसुरत आणि यमुनाकर्षण असे विषय आले आहेत. या विविध प्रसंगांच्या निमित्तानें दयार्णवांच्या वाणीचे जे अभिनव विलास व्यक्त झाले आहेत, ते नितात प्रेक्षणीय आहेत.

## पंडितकवि कृष्णदयार्णव

संतकवि आणि पंतकवि हे प्राचीन मराठी कवीचे दोन प्रमुख प्रकार होत. अर्थात् ही विभागणी कविशः करणे योग्य होणार नाहीं. आत्मसाक्षात्काराच्या प्रेरणेने उदय पावलेले अभंगासारखें आत्मलक्षी भक्तिरजित काव्य हेच खरे संत-वाङ्मय होय. परमार्थाच्या प्रसारासाठी सतानी रचलेली आख्यानककाव्यें ही केवळ 'सतांची रचना' म्हणून संतकाव्य ठरणार नाही. तसे पाहिले तर सपूर्ण प्राचीन मराठी कविताच परमार्थप्रवण आहे. म्हणूनच एकनाथासारख्याचें अभग-वाङमय संतकाव्यांत मोडेल तर त्यांच्याच 'भावार्थ रामायण' व 'रुक्मिणीस्वयंवर' या कृतीची पंत-काव्यांत गणना करावी लागेल. कांही संतकवीनी आख्यानककाव्यें लिहिली आहेत, तर अनेक पंतकवीनी आत्मलक्षी स्फुट कविता लिहिली आहे. या वर्गीकरणाच्या दृष्टीनें कृष्णदयार्णवाचा हा ग्रथ पंत-काव्याच्या—आख्यानककवितेच्या क्षेत्रांत मोडणारा आहे.

मराठी आख्यानक-कवितेच्या क्षेत्रांतहि अनेक प्रवाह आहेत. मराठी साहित्याच्या आदिकालांत नरेंद्र व भास्कर यासारख्या महानुभाव कवीनी रचलेली काव्यें ही भक्तिप्रेरित असूनहि सर्वथा विदग्ध कवितेच्या श्रेणीत बसणारी आहेत. नरेंद्राचे 'रुक्मिणीस्वयंवर' मराठी माध्यमाचा भेद वगळला तर, विदग्ध सस्कृत वाङमयाच्या पक्तीतहि शोभून दिसेल असे आहे. परतु पुढें वारकरी सप्रदायाच्या प्रभाव-कालात हा विदग्धतेचा वारसा सुटला आणि मराठी आख्यानककवितेने निराळें वळण घेतलें. बहिरा जातवेदाची दशम-टीका, कृष्ण-दास मुद्गलाचें युद्धकाड-रामायण, नाथांचें भावार्थ रामायण व रुक्मिणीस्वयंवर ही कथाश्रित काव्यें आर्ष श्रेणीत मोडणारी आहेत. मुक्तेश्वराच्या प्रतिभेचा पिडच आर्ष होता रघुनाथ पंडित, विठ्ठल, नागेश, मोरोपंत इत्यादि मराठेशाहीतील पंतकवि विदग्ध वळणाचे असूनहि त्यांची जात नरेंद्र-भास्करां-हून निराळी मानावी लागेल. पंतकवींच्या या मंडलांत कृष्ण-दयार्णवांनी मात्र विदग्धता व आर्षता यांचा मधुर संगम साधला आहे. प्रकांड पांडित्य, असामान्य भाषाप्रभुत्व, ललित रसिकता व साहित्यिक व्युत्पन्नता या गुणांमुळें त्यांच्या कवितेंत विदग्धतेचा परिपोष झाला आहे, तर काव्यविषयाची संकीर्णता व भव्यता पेलण्याइतकी व्यापक जीवनानुभूति व चिंतनशीलता अंगीं असल्यामुळें ती विदग्धता एका भव्य आर्षतेंत विलीन झाली आहे. त्यांच्या प्रतिभेच्या या आगळ्या वैशिष्टयामुळेंच त्यानीं कृष्णचरित्राच्या निमित्तानें परमार्थ-रंजित प्रपंचाचे व्यापक जीवन-दर्शन घडविलें आहे. परमार्थाचें व्याकरण माडण्यासाठी ज्ञानेश्वरांनी व नाथांनीं तात्त्विक ग्रथरचना केली, तर कृष्णदयार्णवांनी त्याच हेतूनें कृष्णकथेचा आश्रय घेऊन यश मिळविले. हेतूची एकात्मता असूनहि नाथांचे 'रुक्मिणीस्वयंवर' आणि दयार्णवांची दशम-टीका यांत किती भिन्नता आली आहे, हें जाणत्यांच्या लगेच ध्यानी येईल. परमार्थप्रतिपादनासाठी नाथानी कथावस्तूचा आत्माच गुदमरवून टाकला आहे, तर दयार्णवांनी प्रसगांच्या गाभ्यातून तत्वचितन लीलया फुलविले आहे.

कृष्णचरित्रांत नवरसाचे प्रवाह खळाळून वाहत आहेत. जीवनातील सर्व सकीर्णता, विविधता, व्यापकता आणि भव्यता कृष्णचरित्रात प्रकटली आहे. अर्थात् त्यात अवतार-हेतूचे एक दृढ सूत्र सर्वत्र अनुस्यूत आहे. दयार्णवानी हे सूत्र कटाक्षाने साभाळले आहे वर्ण्यविषयाने कितीहि आणि कशीहि वळणे घेतली, तरी दयार्णवाची त्या सूत्रावरील दृष्टि अचल असते. ही दृष्टि अभ्यासजन्य नसून प्रतीतिजन्य आहे. त्यानी ईश्वराच्या मनोगताशी तादात्म्य साधले असल्यामुळेच, बेचाळीस हजार ओव्याच्या या प्रचड काव्यात त्याचे जीवन-विषयक चितन एकात्म सघनतेने प्रकटले आहे.

प्रस्तुत खडात आख्यानककाव्याच्या दृष्टीने हरिवरदेचे सौदर्य जागोजाग दिसून येते. त्यातील कांही सौदर्यस्थळाचे दर्शन घेताच आख्यानककाव्याच्या क्षेत्रातील हरिवरदेचे स्थान स्पष्ट होईल.

## श्रीकृष्ण-जांबवत-युद्ध

द्वंद्वयुद्धाचे चित्र चितारण्याच्या बाबतीत मुक्तेश्वराचे नाव वारवार उच्चारले जाते. दयार्णवाची द्वंद्ववर्णनेहि तितकीच समर्थ आणि प्रत्ययकारी असतात. स्यमतकाख्यानात श्रीकृष्ण आणि जांबवत याचें जें द्वंद्वयुद्ध (अ. ५६) झालें, त्याचे असेच प्रत्ययकारी चित्र दयार्णवानी रेखाटले आहे.

जैसे विस्तीर्ण पाताळ । तैसें जांबवताचें बिळ ।
वृक्षवल्ली जळ पुष्कळ । अति सोज्वळ श्रीमंत ॥
ऐसिये स्थळी प्रचड बळी । दोघे युद्ध करिती सळी ।
निघे उमटती पाताळी । वर्षाकाळी घन जैसे ॥
जाबवतें अकस्मात । कृष्णहृदयी मुष्टिघात ।
वोपूनि पाडिला व्यस्तखस्त । मूर्छागत करूनिया ॥

जाबवताने कृष्णाला मूर्छित केल्याचें वाचतांच वाचक अस्वस्थ होतात. आश्चर्य आणि भीति याच्या क्षणउद्रेकाबरोबरच——

जैसा द्यूतकाराचा भाव । प्रथम आपण हारवी डाव ।
तैसा मूर्छित पडिला देव । आस्वली हाव दुणावली ।।

हे स्पष्टीकरण मिळताच वाचकाच्या औत्सुक्यालाहि निराळें वळण मिळते.

हावे चढोन जाबवत । पुन्हा ओपिता मुष्टिघात ।
कृष्ण लाघवे धरूनि हात । आसडूनिया पाडिला ।।
झोंकासरिसा तोंडघसी । सवेग आदळला पृथ्वीमी ।
जानू ललाट घ्राणमुखासी । रक्तप्रवाह लागले ।।
तेणे थरारिला ऋक्ष । म्हणे, " हा बलिष्ठ योद्धा दक्ष " ।।
उठोनि घेतला प्रचड वृक्ष । तेणे कजाक्ष ताडिला ।।

यानतर जाबवतानें आवेगाने वृक्षाचा मारा चालविला, परतु कृष्णाने वरच्या वर ते वृक्षप्रहार उडवून लावले. त्यानतर——

वृक्षें वृक्षा वारी हरि । देखोनि ऋक्ष कोपला भारी ।
राम स्मरोनि अभ्यतरी । मग पाथरी अभिवर्षे ।।
म्हणे, " माझिया प्रतापापुढें । न थरे कुभकर्ण बापुडे ।
म्या लकेचे पाडिले हुडे । केले वेडे मज येणे " ।।

अशा आश्चर्याने भारलेल्या जाबवताने शिळाचा मारा केला. परतु——

शिळायुद्धी नावरे हरि । जाबवत क्षोभला भारी ।
मुष्टिघाते हृदयावरी । ताडिला हरि वज्रवत् ।।

या मुष्टियुद्धाचे वर्णन करताना दयार्णव लिहितात——

कृष्णे साहोनि मुष्टिघात । लघुलाघवे मारिली लात ।
उलथोनि पाडिला जाबवत । विचकोनि दात पद खोडी ।।
आपुला भक्त हे जाणोनि हरि । मदगर्वाते मात्र परिहरी ।
वाचूनि जीवें सहसा न मरी । दैत्यापरी क्षोभोनी ।।
ऋक्ष मूर्च्छना सावरोनी । झेपावला कव घालूनी ।
मुष्टि मारिली कृष्णमूर्ध्नी । येरे वदनी ताडिला ।।
मग परस्परें मुष्टिप्रहार । करिते झाले निरतर ।
मुसळी पृथुकककडनपर । जेवी सत्वर वधूयुग्म ।।
मुखी मस्तकी उरी शिरी । पृष्ठग्रीवाकटिकूर्परी ।
नितंबदेशी जानुजठरी । मुष्टिप्रहारी ताडिती ते ।।

——या सर्व वर्णनातून उभय पक्षांचा आवेश, त्याच्या क्षणाक्षणाला उसळणाऱ्या क्रोधोर्मि, त्याचा स्वसामर्थ्याविषयीचा दृढ विश्वास आणि त्यांचे वेगवान् आघात-प्रत्याघात यांची स्पष्ट कल्पना वाचकाना येते.

### श्रीकृष्णकृत वृषभ-दमन

कोशलपतीची कन्या नाग्नजिती हिच्या स्वयवराच्या वेळी (अ. ५८) श्रीकृष्णानें सात मत्त वृषभांचें दमन करण्याचा जो पण जिकला, त्याचे चित्तथरारक चित्राकन दयार्णवांनी समर्थपणे केले आहे. प्रतिज्ञा-पूर्तीसाठी सिद्ध झालेला हा श्रीकृष्ण पहा——

ऐसा प्रतिज्ञासमयनियम । श्रवण होताचि पुरुषोत्तम ।
कचुकपल्लवी परिकरोत्तम । बाधोनि सन्नद्ध जाहला ।।
कास कासिली मालगाठी । मस्तकी बाधली वीरगुठी ।
माळा खोवूनिया परवटी । स्वयें जगजेठी उठावला ।।

कृष्णकौतुक पाहण्यासाठी सभाजन, नागरजन आणि नोवरीसहित अत पुरजन याची दाटी झाली. राजसेवकानी राजाज्ञेने वृषभशाळेचे द्वार खुले केले आणि त्या सात उन्मत्त वृषभाना चेतवून बाहेर काढलें. वाद्यें वाजवून व गर्जना करून त्याना भडकविण्यात आले मग——

मही उकरती पुढिला चरणी । उलथू पाहती तीक्ष्ण विषाणी ।
व्याघ्रचर्मांची पडता घाणी । बळें क्षोभोनि फुपाती ।।
क्षणक्षणा मूत्र पुरीषा । करिती दुर्दान्त सप्त वृषा ।
तद्दमनार्थ महदावेशा । धरूनि परेश उठावला ।।

त्या उन्मत्त वृषभाचा तो भीषण आवेश पाहून राजकन्या अस्वस्थ झाली. कृष्णावर तिचे मन जडले होतें; परतु प्रतिज्ञापूर्तीशिवाय ती कृष्णाला प्राप्त करू शकत नव्हती. तिच्या या अस्वस्थतेचे वर्णन दयार्णव पुढील शब्दात करतात—

नोवरी मानसी नवस करी । " शिवभवानी कुळेश्वरी ।
मज पावो ये अवसरी । विजयी हरि हो वृषदमनी ।।
अगा सवितया भास्करा । विश्वचक्षु विश्वभरा ।
धावे पावे इदिरावरा । कृष्ण नोवरा मज योजी ।।
अनेक जन्मातरीचे पुण्य । व्रततपदाने अनुष्ठान ।
सफळ हो का मज लागून । यदुनदनवरलाभें " ।।

नोवरीचे हे सकल्प हृदयस्थ श्रीकृष्णाने जाणले आणि त्याने वृषभनिग्रहासाठी उडी घेतली.

मस्तकी हाणूनिया थापा । सप्त वृषभा आणी कोपा ।
सवेचि धरूनि सातही शेंपा । वोढी वत्सपासम वत्सा ।।
गगना विधितां तीक्ष्ण बाण । वृथा जाय जेंवि सधान ।
तेवि वृषाची शृगें तीक्ष्ण । हाणिता कृष्ण गवसेना ।।
वृषभा हाणिता टिरीवरी । तो परतोनि शृगें मारी ।
तव पुढें ठाकोनिया मुरारि । प्रतापें धरी शृगाग्रां ।।
शृगी धरूनि शत धनुष्यें । मागें लोटिले पुराणपुरुषें ।
सवेंचि सप्ताची धरूनि पुसे । वोढी आवेशें फरफरा ।।

वृषभाचा उसळणारा मद, कृष्णाची निर्भयता, प्रेक्षकांची सभय उत्सुकता, राजकन्येच्या हृदयाची भयाकुल आंदोलनें,

आक्रमक वृषभांच्या दमनासाठीं कृष्णानें घेतलेली रोमांचकारी झुंज यांचें चित्रांकन करतांना दयार्णवांनीं किती कौशल्य दाखविलें आहे ! मोजक्याच शब्दांत त्या सात वृषभांचें मदमत्त चित्र रेखाटणाऱ्या दयार्णवाच्या साक्षेपी निरीक्षणाचा वाचकांना तत्काल प्रत्यय येतो.

## युद्धचित्रांचे दोन नमुने

युद्धवर्णनांचे आणखीहि कांही प्रसंग या खंडांत आहेत. ५९ व्या अध्यायांतील कृष्ण-भौमासुर-युद्ध आणि उषाहरणाख्यानांतील कृष्ण-बाणासुर-युद्ध नमुन्यादाखल पाहण्यासारखें आहे. कृष्णप्रतिकारासाठी सज्ज झालेल्या भौमसेनेचे वर्णन करतांना दयार्णव लिहितात ––

ऐसी चतुररंगसेना । गर्जत पातली समरागणा ।
पाचारूनि जनार्दना । आयुधें नाना प्रेरिती ।।
सिंहनाद आस्फोटनें । अश्वहेषितें गजगर्जने ।
गमे वांकुडी घातली घने । तैसी संधाने बाणांची ।।
शरी झांकोळलें गगन । विद्युत्प्राय तीक्ष्ण बाण ।
विंधिती लक्षूनि जनार्दन । दाविती आंगवण समरंगी ।।
खड्ग परजूनि तळपती एक । म्हणती छेदू हरिमस्तक ।
गदा टाकिती एक सम्मुख । शस्त्रें अनेक पृथक्त्वे ।।

––या वर्णनाचा प्रवाह असाच अनेक वळसे-वळणें घेत धावत आहे. त्यांत उभय पक्षांतील वीराच्या गर्जना, त्यांचे शस्त्रास्त्रांचे आघात-प्रत्याघात आणि यशापयशाच्या चढउतारांनीं मनाची होणारी आंदोलने दयार्णव वेचक शब्दानी निबद्ध करतात.

कृष्णाशी युद्ध करायला सज्ज झालेल्या बाणासुराचें हे चित्र पहा––

महाआवेश चढला आगी । नेत्रद्वारां उसळे आगी ।
धनुष्यें पांच शतें समरंगीं । सहस्रा हस्ती सज्जियली ।।
एकैक चापी दोन दोन शर । एक संधानीं शर सहस्र ।
लघुलाघवें चमत्कार । दावूनि असुर गर्जिन्नला ।।
आंगीं चढला रणदुर्मद । म्हणे कृष्णाते, " सावध ।
मजसी करीं निर्वाणयुद्ध । दावीं प्रसिद्ध आंगवण ।।
मानवांमाजी प्रताप तुझा । जंव न भेदे झुजार दुजा ।
स्फुरणें दाटल्या माझिया भुजा । भिडें पैजां तू मजसी ।।
सैन्यें मारिसी फलकटें । तेणें शौर्यें न मासी कोठें ।
दावीं परतूनियां मुखवटें । वेठें उद्‌भटें पुरुषार्थें " ।।

सहस्रबाहु बाणासुराचें अचाट सामर्थ्य आणि त्या सामर्थ्याला शोभणारा त्याचा अहंकार दयार्णवांनीं मोजक्या शब्दांत नेमका पकडला आहे.

## सत्यभामा - रोष

द्वंद्वांचीं वा युद्धप्रसंगांची चित्तथरारक चित्रें रेखाटण्यांत दयार्णव जसे सिद्धहस्त आहेत, त्याचप्रमाणें नाजूक भावनांची सूक्ष्मतरल आंदोलनें शब्दबद्ध करण्यांतहि ते कुशल आहेत. ५९ व्या अध्यायाच्या आरंभी 'सभार्यो गरुडारूढः प्राग्ज्योतिषपुरं ययौ ।' या चरणांतील 'सभार्यो' या पदावर भाष्य करतांना अग्निपुराणाच्या आधारें त्यांनीं सत्यभामेच्या रोषाची कथा स्वतंत्रपणें विस्तारानें वर्णिली आहे. हें सत्यभामेच्या रोषाचें भावचित्र इतकें हृदयंगम आहे की, त्यांत सत्यभामेच्या व्यक्तित्वाची छटान् छटा उमलून आली आहे.

नारदानें दिलेलें पारिजातपुष्प श्रीकृष्णानें रुक्मिणीस दिल्याची वार्ता रुक्मिणीच्या दासीकडून सत्यभामेच्या दासीना कळतांच त्यांनीं आपल्या स्वामिनीला ती खेदपूर्वक सांगितली–

नमस्कारूनि गोसाविणी । म्हणती, "वृथा आमुची जिणी ।
बाह्य विचरतां लाजिरवाणी । धन्य रुक्मिणी सेविती त्या ।।
रुक्मिणी आवडे पुरुषोत्तमा । उभयतांचा उत्कृष्ट प्रेमा ।
इतर नायिका हरिसगमा । हृदयपद्‌मामाजी झुरती " ।।

सत्यभामेला आश्चर्याचा धक्काच बसला. कृष्णाला केवळ आपणच प्रियतम आहोंत, असा तिला अभिमान होता. त्या अभिमानाला तडा जाणारी वार्ता ऐकतांच त्या मानिनीचे हृदय भंगून गेलें.

ऐसें ऐकोनि किंकरीवचन । क्षोभलें सत्यभामेचे मन
पिटूनि हृदय ललाट वदन । दीर्घ रुदन आदरिले ।।
गडबडां लोळे धरणीवरी । भंवत्या सावरिती किंकरी ।
म्हणती," स्वामिनी, शोक न करी । झणे श्रीहरि परिसेल "।।
तंव ते म्हणे, " परत्या सरा । रुक्मिणी पढियती श्रीधरा ।
माझिया स्नेहा पडला चिरा । आता शरीरा मी न रखें "।।
केश तोडितां करतळी । सुटली वीरगुंठी मोकळी ।
तुटली मुक्ताफळाची जाळी । मुक्ते भूतळी विखुरली ।।
तडतडा तोडिले कंठीचे हार । फाडिली कचुकी दिव्याबर ।
कर्ण घ्राण करपद शिर । रत्नालकार विसर्चिले ।।
दांत खाऊनि ओष्ठ रगडी । दीर्घाक्रोशें बोटें मोडी ।
म्हणे, "सवतीनें तडाजोडी । प्रेमविघडी पैं केली " ।।

संशय आणि तज्जन्य मानभंगानें सत्यभामेचा उसळलेला संताप आणि त्या संतापांतून तिनें आरंभिलेला आक्रस्ताळेपणा यांचें यथातथ्य वर्णन दयार्णवांनी केलें आहे. सत्यभामेचा संतापानें तोल सुटला. तिच्या प्रीतीचा पिंड समर्पणाचा नसून स्वामित्वाचा होता. त्याचमुळें, कृष्ण रुक्मिणीवर अधिक प्रेम करतो, या कल्पनेचा तिच्यावर असा परिणाम झाला की, तिला कृष्णाचा सर्वस्वी वीट आला. ती उद्‌गारते––

बोल कायसा सवतीप्रती । कुटिल कपटी हा श्रीपति ।
कार्यापुरती लावूनि प्रीती । वर्ते निश्चिती बहिरंग ।।
भोळी नेणें मी कपट याचें । वालभ मानीं बहिरंगाचें ।
साजणें खंडलें येथूनि साचे । कोण जिणियाचें सुख आतां ।।

या विचारानें ती आत्मनाशाला प्रवृत्त होते. शस्त्रानें स्वत.वर आघात करूं पाहते, शिर पाषाणावर •आपटू पाहते; परंतु सख्या तिला सावरतात. आपणाला माहेरचें कोणी नाही, याचे तिला दुःख होते. जर आपणास 'सधर माहेर' असतें, तर या कपटचाचे 'साजणें' झुगारून दिले असते, अशी खंत तिच्या मनाला बोचते. आणि या निराशेपोटीच तिला आत्मनाशाशिवाय दुसरा उपाय दिसत नाही. ती सख्यांना अखेरचा निरोप म्हणून सागते–

माझिया सखिया सागातिणी । तुम्ही जिवलगा मायबहिणी ।
वोज करा माझिये मरणीं । न लवा पाणि कपटियाच्या ।।
येथें आलिया गिरिधर । त्यासी न वदावें उत्तर ।
माझें झांकूनि शरीर । त्यास बाहीर दवडा गे ।।
आता कायसी भीड त्याची । प्रकट गोष्टी वदा साची ।
जे अधिकारी दिव्य पुष्पाची । वाढवी तयेची वल्लभता ।।

आपल्या मरणानतर मृत देहालाहि कृष्णाचा स्पर्श होऊ नये, अशी इच्छा ती व्यक्त करते. वरील शेवटच्या ओवीच्या उत्तरार्धातील भावच्छटा किती स्त्रीसुलभ आहे, हें स्पष्ट करण्याची आवश्यकता नाही.

पुढें सत्यभामेच्या मदिरात कृष्ण येतो आणि मूर्च्छाग्रस्त सत्यभामेला सावध करतो. कृष्णाला पाहिल्यावर तिचा सताप अनावर होतो, परतु कृष्णस्पर्शाने तिचा विरोध हळूहळू शमू लागतो. कृष्णाने समजूत घातल्यावर तिचा राग नाहीसा होतो. परतु –

ऐसे बोधिता कैटभारि । भामा प्रमुदित अभ्यतरी ।
तथापि विपाद जो बाहेरी । तो झडकरी न साडवे ।।
मेघ उघडल्या सलिल वाहे । अग्निगोपनी धूम्र राहे ।
तेवी ईर्ष्या दाविती होय । आनदमय जाल्याही ।।
श्वास सांडूनि श्रमितापरी । झिडकूनि बैसे पाठिमोरी ।
म्हणे, "ऐसिया मधुरोत्तरी । कितव ! प्रतारी मुग्धातें ।।
जेथें रुचले असेल मन । तेथें सुखें करावे गमन ।
भूत भविष्य वर्तमान । आमुचें येथून अदृष्टें" ।।

सत्यभामेच्या सर्व हालचालीतून व उद्गारातून तिच्या व्यक्तित्वाची कळान् कळा व्यक्त करण्याचे जें कौशल्य दयार्णवांनी दाखविले आहे, ते प्राचीन मराठी वाङ्मयांतील चिरंतन सौदर्यस्थळांत निश्चित स्थान मिळविणारें आहे. सत्यभामेच्या स्वभावचित्रांकनासाठी दयार्णवानी केलेला हा शें-दीडशें ओव्यांचा विस्तार (५९.३४–१७२) पुनः पुनः वाचण्यासारखा आहे.

## कृष्ण-रुक्मिणी-प्रीतिकलह

साठाव्या अध्यायांतील कृष्णरुक्मिणीचा प्रीतिकलह असाच नाजूक भावच्छटांनी रंगलेला आहे प्रेमाची गोडी वाढविण्यासाठी श्रीकृष्णानें आत्मनिदा करून रुक्मिणीला संत्रस्त केलें. परतु कृष्णाच्या आत्मनिंदेने रुक्मिणीला क्रोध न येतां दुःख झाले. आपला त्याग करण्यासाठी तर कृष्णाने ही प्रस्तावना केली नाही ना, या शकेने ती व्यथित होते आणि दुःखातिशयाने मूर्च्छित पडते. सत्यभामेच्या क्रोधाच्या पार्श्वभूमीवर रुक्मिणीची कृष्णशरणता पाहण्यासारखी आहे. आपल्या थट्टेचा भलताच परिणाम होत आहे, हें पाहून कृष्णानें रुक्मिणीला सांवरले. 'पर्यङ्कादवरुह्याशु तामुत्थाप्य चतुर्भुजः।' या चरणातील 'चतुर्भुजः' या कृष्णविशेषणाच्या आधारें दयार्णव जें चित्र चितारतात, ते किती मनोहर आहे पहा –

द्विभुज सर्वत्र मुरारि । वर्तत असता यादवभारी ।
रुक्मिणीवैकल्य देखूनि नेत्री । बाहु चाऱ्ही प्रकटिले ।।
चहूं भुजी केलें काय । तो परियेसी अभिप्राय ।
एक्या हस्ते रुक्मिणीकाय । सावरूनिया बैसविला ।।
दुजिया हस्तें पुसिले वदन । तिजेने केशकलापरचन ।।
चतुर्थ हस्ते आलिगन । देऊनि वदन चुबिले ।।

प्रीतिरहस्याचे एवढें वेधक चित्र चितारून दयार्णव श्रीकृष्णाच्या मुखांतून कृष्णरुक्मिणीप्रेमाचा जो गौरव गातात, तो त्याच्या भक्तिप्रवणतेचा एक उत्कट आविष्कार आहे –

जी बोलिलों विषम वचनें । उपहासप्रौढीपरी ती जाणें ।
सत्य न मनी अंत.करणें । चतुरे सुजाणे ममांगने ।।
तत्त्वता ऐसीच जरी ती असती । तै कें घडती सप्रेमरति ।
अनन्य प्रियतमा तुजपरौती । कोण तें चित्ती विवरी पां ।।
तुज न विसबें मी क्षणभरी । तुजवेगळा न वचें दुरी ।
तुजवीण द्वैताची अवसरी । मज संसारी सर्वस्वें ।
मत्प्रेमसुखाचे दर्पण । तें एक तुझेंचि अंतःकरण ।
एऱ्हवी अवघा मी परिपूर्ण । द्वैतविहीन एकात्मा ।
तुज पहावया मी डोळस । तव प्रेमास्तव रूपस ।
तव जाणावया मानस । एऱ्हवी नि.शेष हृच्छून्य ।।
तव गुणश्रवणी मी सश्रवण । तव रसार्थ रसनावान ।
तव सौरभ्या मी सघ्राण । तवालिंगना त्वग्वत ।।
तू मज अनन्य सर्वांपरी । मी तुज तैसाचि बाह्यांतरी ।
हें विसरोनि नर्मोत्तरी । मूर्च्छा शरीरी अनुभविली ।।

या उतार्‍यांत भक्त-भगवंत-प्रीतीचें जें दिव्य चित्र दयार्णवानी उभें केलें आहे, तें ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेचें स्मरण करून देणारें आहे. भक्ताच्या प्रीतीस्तव देव सगुणरूप धारण करतो, या तत्त्वाचें इतकें हृदयंगम वर्णन अन्यत्र सांपडणें कठिणच आहे.

### उषेचें प्रणयस्वप्न

अध्याय ६२–६३ मध्यें उषाहरणाची कथा आहे. या कथेची मांडणी करतांना दयार्णवांनी जरूर तेथें अन्य पुराणांचाहि उपयोग करून घेतला आहे. हे दयार्णव-विरचित 'उषाहरण' स्वतंत्रपणें आस्वादण्यासारखें आहे. मराठी आख्यानककवितेत तें आपल्या आत्मिक व आंगिक गुणानी मानाचें स्थान सहज पटकावू शकेल. शोणितपुराची अभेद्यता, बाणाची शिवभक्ति, त्याचे सामर्थ्य, उषेचें यौवनलावण्य, तिची प्रणयासक्ति, चित्रलेखेचें लाघव, उषा-अनिरुद्ध-प्रणय, अनिरुद्धाचा पराक्रम आणि अखेरचें कृष्ण-बाणासुर-युद्ध – या सर्वांच्या वर्णनांत दयार्णवाच्या कथनशक्तीचे विविध पैलू प्रकट झाले आहेत. हें उषास्वप्नाचें वर्णन पहा —

उषा पहुडता शेजेवरी । निद्रा लागली घटिका चारी ।
स्वप्न देखिलें तियेमाझारी । परमेश्वरीवरदाने ॥
श्याम सुदर पकजाक्ष । लावण्य तरुण सगुण दक्ष ।
दिव्याभरणीं नर प्रत्यक्ष । देखिला वक्ष:सलग्न ॥
वामकरतळें धरूनि वेणी । वदन चुबी अधरपानी ।
कंचुकीग्रंथि विसर्जूनी । कुचमर्दनी प्रवर्ते ॥
स्मरमदगजाचे कुंभस्थळीं । कामाङ्कुशाची क्षते केली ।
गाढालिगने हृदयी कवळी । नीवीमोक्षण करूनिया ॥
प्रथम संगमी साशंकित । सकप अवयव आकुचित ।
नरकरस्पर्शा निराकरित । चिन्हें लक्षित चित्रलेखा ।
आलिंगनाच्या आवेशें । तरळ बाहुयुगुल दिसे ।
मन्मथसदनाच्या विकाशें । उत्तानवर्ष्मी चचळता ।
ओष्ठ चावूनि कुसकुसी मुखे । स्पदित अष्टाग मन्मथसुखें ।
जननी स्मरूनि अव्यक्त वाक्यें । अग मोडूनि वदतसे ॥
करणी उदेला रजोद्गम । लोहिवलाछित दुकूलोत्तम ।
स्वेदें पुलकित वदनपद्म । भासे विराम स्मरचिन्हा ॥
इतुका देखे चमत्कार । तव झळकला प्रजागर ।
म्हणे, "केउता गेला चोर । स्मरमदिर उघडूनी ?" ॥

स्वप्नपुरुषाच्या संगमानें उषेच्या गात्रागात्रांत उसळलेला काम दयार्णवांनी शब्दाच्या माध्यमातून संवेदनविषय बनविला आहे.

### कांहीं अभ्यसनीय : कांहीं उल्लेखनीय

वर काही प्रमुख प्रसंगचित्रांचेंच रसग्रहण केले आहे. याशिवाय किती तरी सौंदर्यस्थळें विखुरलेली आहेत. उचित सुभाषिताची पखरण आणि समर्पक दृष्टान्ताची योजना जागोजाग आढळते. •दयार्णवाच्या व्यासंगाच्या खुणा तर सर्वत्र दृग्गोचर होतात. विष्णुपुराण ( ५६. ४१; ६१. ११४, ११६; ६२. ७७–७८; ६३.४५), वराह पुराण(५९. ३१), अग्निपुराण (५९. ३४), गीता (५६. २७५), श्रीधरी टीका (६१. १०८), कामशास्त्र (५९. ६६९; अ. ६०. ६२) इत्यादि ग्रांथिक सदर्भ दयार्णवानी स्पष्टच नोंदविलेले आहेत. ईश्वरस्वरूपवर्णन (५९. ३५९–४१७, ६०. ५२–५७, ६०. ३२३–३४३), विवाह-विधि-वृद्धाचार-वर्णन ( ५६–३०६, ३१८. ५८. ४१९–४३७), स्त्रैणवर्णन, (६०. ३४६–६०), वाघ्ये, बाळसंतोष, इत्यादि भिक्षेकरी (५८. ४९८–५०४), वजनाची परिमाणें (५६. ८५–८७), काष्ठपुतळी (५६. १२. ५९. ७३०), वृक्ष-सभार (५६. १५२–१५६), दळण-काडण (५६. २१६, ५६. २६४), चदलापरमेश्वरी देवी (५६. ३६८), भौगोलिक निर्देश (५७ १५६–१५७), मुलाची लाकडी खेळणी (५८.३८७), ज्योतिष (५८.४१८), भ्रष्ट जन (५९. ६४५–६५३), इत्यादि अनेक अभ्यसनीय स्थाने आहेत. व्यासगी जनाची सर्व व्यासगासक्ति आकर्षून घेण्याची शक्ति हरिवरदेच्या ठायी आहे, असे कोणाच्याहि अनुभवास येईल.

### ऋणभार

हरिवरदेच्या प्रकाशनाच्या प्रारभी पुणे विद्यापीठाने दिलेले ५०० रुपयांचें अनुदान आणि साहित्य अकादमीने गतवर्षी-पासून भागशः देऊ केलेले ३००० रुपयाचें अनुदान प्रकाशन-कार्यांत विशेष सहाय्यक ठरलें आहे. याशिवाय अनेक मित्रानी, हितचितकानी व आस्थेवाईक ग्राहक-श्रोत्यानी दिलेलें सक्रिय सहाय्य प्रकाशकांच्या पाठीशी नसते, तर ग्रथप्रकाशनाची एवढी वाटचाल अशक्य झाली असती. त्या सर्वांचे आम्ही आभारी आहो. तसेंच या खडाचे मुद्रक संगम प्रेसचे श्री. पटवर्धन बधु आणि हरिवरदेचे एक परमभक्त श्री. देवधर याचे आम्ही मन:पूर्वक आभार मानतों.

एकनाथषष्ठी : शके १८८२

रामचंद्र चिंतामण ढेरे

कृष्णदयार्णवकृत 'हरिवरदा' ( खंड ७ वा )

# अनुक्रमणिका


| अध्याय | विषय | संस्कृत श्लोक | ओव्या | पृष्ठे |
|---|---|---|---|---|
| ५६ | जांबवंती व मत्यभामा यांचा श्रीकृष्णाशी विवाह | ४५ | ४८३ | १३११-१३३३ |
| ५७ | म्यमंतकाख्यानाची समाप्ति | ४२ | ३२९ | १३३४-१३५० |
| ५८ | श्रीकृष्णाची पचपाणिग्रहणें | ५८ | ५७२ | १३५१-१३७७ |
| ५९ | भौमासुरवध, पारिजातहरण पोडशसहस्रनृपकन्यापाणिग्रहण | ४६ | ७४१ | १३७८-१४१० |
| ६० | कृष्ण-रुक्मिणी-प्रेमकलह | ५९ | ५१५ | १४११-१४३६ |
| ६१ | श्रीकृष्ण-सतति, पुत्रपौत्रादि विवाह-कथन | ४० | ३९३ | १४३७-१४५६ |
| ६२ | अनिरुद्ध-बधन | ३५ | ४०८ | १४५७-१४७५ |
| ६३ | श्रीकृष्ण-शिव-युद्ध, बाणबाहुखडन, उषानिरुद्ध-विवाह | ५३ | ४९९ | १४७६-१४९९ |
| ६४ | नृगाख्यान | ४४ | ३५६ | १५००-१५१८ |
| ६५ | बलदेवविजय, यमुनाकर्षण | ३२ | २४५ | १५१९-१५३१ |


| | | | | |
|---|---|---|---|---|
| **प्रथम खंड** | ( अध्याय १ ते ५ ) | ओव्या | ३५३३ | पृ. १- १७४ |
| **द्वितीय खंड** | ( अध्याय ६ ते १५ ) | ओव्या | ५४६९ | पृ. १७५- ४२४ |
| **तृतीय खंड** | ( अध्याय १६ ते २८ ) | ओव्या | ५१५४ | पृ. ४२५- ६६६ |
| **चतुर्थ खंड** | ( अध्याय २९ ते ३७ ) | ओव्या | ३२१७ | पृ. ६६७- ८४४ |
| **पंचम खंड** | ( अध्याय ३८ ते ४९ ) | ओव्या | ५४१० | पृ. ८४५-११२० |
| **षष्ठ खंड** | ( अध्याय ५० ते ५५ ) | ओव्या | ३६९० | पृ. ११२१-१३१० |
| **सप्तम खंड** | ( अध्याय ५६ ते ६५ ) | ओव्या | ४५४१ | पृ. १३११-१५३१ |

**सात खंडांची ओवी-संख्या ३१०१४**

कृष्णदयार्णवकृत

# ह रि व र दा

## अध्याय ५६ वा

श्रीगणेशाय नमः। विमलमंगलप्रकाशका। निखिलकलिमलविध्वंसका। समूळमायाभ्रमनाशका। सच्चित्सुखा गोविन्दा ॥ १ ॥ उदार आज्ञा स्वीकरूनी। विवरिली पंचम एकादशिनी। आतां षष्ठीच्या व्याख्यानीं। शंका मनीं झळंबतसे ॥ २ ॥ अष्टमहिषीस्वयंवरें। षोडशसहस्रशतोत्तरें। तत्संतति कुमरीकुमरें। पृथगाकारें उद्वाह ॥ ३ ॥ रुक्मिणीचा प्रीतिकलह। उषाहरण रोचनोद्वाह। नृगमोक्षण भौमक्षय। निर्जरजय द्रुमहरण ॥ ४ ॥ इत्यादि अगाधप्रमेयसिन्धु। अल्प मृकुट कें मतिमंदु। लघुचंचूनें एकैक बिंदु। केंवि उमाणूं प्रवर्ते ॥ ५ ॥ हा ऐकोनि अभिप्राय। श्रीगुरु केवळ सत्समुदाय। म्हणती किंकरामस्तकीं राय। असतां निर्भय तूं तैसा ॥ ६ ॥ राव असतां किंकरशिरीं। तो प्रजांतें शासन करी। सूक्तासूक्त नृपवैखरी। तो अधिकारी आज्ञेचा ॥ ७ ॥ जैसें आज्ञापी भूपति। तैसें शासन प्रजांप्रति। करी ते त्याचे आंगींची शक्ति। किंवा नृपतिऐश्वर्य ॥ ८ ॥ सेवकें इतुकेंचि करावें। स्वामिकार्यार्थी अवंचकभावें। सादर होऊनि ओळगावें। येर आघवें नृप जाणे ॥ ९ ॥ तेंवि तूं आज्ञा वंदूनि माथा। आरब्धग्रंथ वाखाणितां। शंका झळंबों नेदीं चित्ता। निर्वाह करिता गुरुवर्य ॥ १० ॥ तो हृदयस्थ तव हृत्कमळीं। स्वसत्ता प्रकाश प्रज्ञा उजळी। त्या उजिवडें टीका मोकळी। निरूपी सरळी हरिवरें ॥ ११ ॥ पढविलें तें पक्षी पढे। वावडी चढविली गगना चढे। सायखेडयाचें बाउलें भिडे। तें काय निवाडें बळ त्याचें ॥ १२ ॥ तेंवि तुज व्याख्यानीं स्वसत्ता। देशिकेंद्रें अधिष्ठितां। तूं कां शंका वाहसी वृथा। निर्वाहकर्ता सर्वज्ञ ॥ १३ ॥ हें ऐकोनि आश्वासन। शंकारहित स्वस्थ मन। करूनि आदरिलें व्याख्यान। तें सज्जन परिसोत ॥ १४ ॥ आतां एकादशिनी षष्ठ। तदनुक्रमणी ऐका स्पष्ट। छप्पन्नाव्या

अध्यायीं कष्ट । मिथ्याभिशाप हरि निरसी ॥ १५ ॥ तत्प्रसंगें जाम्बवती । सत्यभामा सात्राजिती । वरिलियामाजि अध्यात्मरीति । अर्थानर्थता निरूपिली ॥ १६ ॥ सत्तावन्नाध्यायीं कथा । मणिनिमित्त गोत्रजहत्या । त्या दुर्यशाच्या परिहारार्था । अक्रूरापासूनि मणिग्रहण ॥ १७ ॥ दावूनि समस्तां यादवांसी । स्वमाथांचें दुर्यश निरसी । पुढती ठेवी अक्रूरापाशीं । बलभद्रासी बुझावुनियां ॥ १८ ॥ अट्ठावन्नावे अध्यायीं कृष्णें । केलीं पंच पाणिग्रहणें । कालिंदीच्या तपआचरणें । प्राप्त झाला हरि भर्ता ॥ १९ ॥ एकोणषष्टितमे अध्यायीं । भौमा वधूनि शेषशायी । विजयी झाला अमरालयीं । पार्यातार्थ सुरसमरीं ॥ २० ॥ भौमासुरातें वधूनि हेळा । वधू शताधिक सहस्र सोळा । आणिल्या तिहीं श्रीगोपाळा । वरिलें सोहळा तो कथिला ॥ २१ ॥ षष्टितमाध्यायीं कथा । रुक्मिणी आणि कृष्णनाथा । प्रेमकलहचातुर्यता । त्या वृत्तान्ता निरूपिलें ॥ २२ ॥ एकषष्टितमाध्यायीं । संतति सर्व वधूंच्या ठायीं । अनिरुद्धाचिये विवाहीं । रुक्मिमरण हलिहस्तें ॥ २३ ॥ अष्टमहिषी रुक्मिणीप्रमुखा । सशत षोडश सहस्र आणिका । तत्संततिविवाह देखा । संक्षेपार्थें निरूपिले ॥ २४ ॥ यावरी द्विषष्टितमामाजि । अनिरुद्धउषाविवाहकाजीं । बाणासुराची भुजवनराजि । शंकर जिणोनि छेदिली ॥ २५ ॥ त्रिषष्टितमे अध्यायीं । बाणयादवसमरमही । ज्वर शंकरें स्तविला पाहीं । बाणबाहु हरि हरितां ॥ २६ ॥ चतुःषष्टितमे अध्यायीं । नृग उद्धरिला सरटदेही । ब्रह्मस्वा हारी दोष पाहीं । राजे सर्वही शिक्षियले ॥ २७ ॥ पांसष्टाव्या अध्यायांत । नंदगोकुळवक्षणार्थ । राम जाऊनि गोपीसुरत । करितां कर्षित यमुनेतें ॥ २८ ॥ षट्षष्टितमीं कृष्ण । पौण्ड्रकें दूत पाठवून । आक्षेपिला तो त्याचें हनन । करी स्वचिह्नपरिहरणा ॥ २९ ॥ इत्यादिनिरूपणीं वरिष्ठ । एकादशिनी षष्ठी स्पष्ट । वाखाणिजेल तें श्रवणनिष्ठ । होऊनि श्रेष्ठ परिसोत ॥ ३० ॥ प्रद्युम्नजनन शंबरहनन । स्नुषा संप्राप्त ललनारत्न । हें पूर्वाध्यायीं केलें कथन । पुढें व्याख्यान अवधारा ॥ ३१ ॥ व्यासऔरस योगाग्रणी । वक्ता सर्वज्ञ निरूपणीं । तो नृपातें बादरायणी । सांगे करणी कृष्णाची ॥ ३२ ॥ कुरुधरित्रीमंगलसूत्रा । श्रवणसद्भक्तिसुबीजक्षेत्रा । वैष्णवोत्तमा परमपवित्रा । हरिगुणपात्रा परीक्षिति ॥ ३३ ॥ प्राकृत जनांचिये परी । पुत्रलाभाची आनंदलहरी । अनुभवूनि तच्छोकगिरि । स्वयें श्रीहरि वळघले ॥ ३४ ॥ नष्टपुत्राचा प्राप्तिलाभ । पुढती अनुभवूनि पद्मनाभ । म्हणे हा चंचल भवसुखकोंभ । नोहे स्वयंभ चित्सुख हें ॥ ३५ ॥ इतुकें संपलें पूर्वाध्यायीं । अर्थानर्थरूपें पाहीं । स्यमंतकाख्यानाच्या ठायीं । प्रसंगें तेंही अवधारा ॥ ३६ ॥ रुक्मिणी पट्टमहिषी प्रथमा । मग जाम्बवती सत्यभामा । वरित्या झाल्या पुरुषोत्तमा । त्या संभ्रमा वदावया ॥ ३७ ॥ स्यमंतकमणीचें आख्यान । आरंभूनियां मुनि सर्वज्ञ । तत्प्रसंगें पाणिग्रहण । उभय पत्न्यांचें निरूपी ॥ ३८ ॥

श्रीशुक उवाच–सत्राजितः स्वतनयां कृष्णाय कृतकिल्बिषः । स्यमंतकेन मणिना स्वयमुद्यम्य दत्तवान् ॥ १ ॥

सत्राजित या नामें राजा । कृतापराधें पावोनि लज्जा । तत्परिहरणीं निजात्मजा । गरुडध्वजा दे मणिसहित ॥ ३९ ॥ सत्राजित म्हणसी कोण । तरी वृष्णिपुत्र सुमित्र जाण । अनमित्र सुमित्राचा नंदन । त्याचा निघ्न आत्मज पैं ॥ ४० ॥ दोघे निघ्नाचे नंदन । सत्राजित आणि प्रसेन । विष्णुपुराणींचें

हें कथन । संशयापन्नीं तें पहावें ॥ ४१ ॥ एवं सत्राजित प्रसेन । हे महाभोजकुळींचे यादव जाण । द्वारकेमाजीच वसतिस्थान । सूर्याराधन दृढ नेम ॥ ४२ ॥ हें ऐकोनि कुरुमराळ । विवेकचंचूनें दुग्धजळ । श्रवणपात्रीं जो प्राञ्जळ । निवडी केवळ पयग्रहणा ॥ ४३ ॥ तेणें ऐकोनि मुकुळित कथा । सविस्तर श्रवणीं धरूनि आस्था । बादरायणीतें झाला पुसता । एकाग्रता तें ऐका ॥ ४४ ॥

राजोवाच–सत्राजितः किमकरोद्ब्रह्मन्कृष्णस्य किल्बिषम्। स्यमंतकः कुतस्तस्य कस्माद्दत्ता सुता हरेः॥ २॥

राजा सर्वज्ञ विचक्षण । बादरायणीतें संबोधून । ब्रह्मनिष्ठत्वें म्हणे ब्रह्मन् । करीं व्याख्यान प्रश्नांचें ॥ ४५ ॥ श्रीकृष्णासीं दुष्टाचरित । काय आचरला सत्राजित । त्यासि स्यमंतक कोठोनि प्राप्त । कृष्णा किमर्थ तनया दे ॥ ४६ ॥ इत्यादि प्रश्नांचें व्याख्यान । करावया शुक सर्वज्ञ । प्रवर्तला तें सावधान । श्रोतीं होऊनि परिसावें ॥ ४७ ॥

श्रीशुक उवाच–आसीत्सत्राजितः सूर्यो भक्तस्य परमः सखा। प्रीतस्तस्मै मणिं प्रादात्सूर्यस्तुष्टः स्यमंतकम्॥ ३॥

असो स्वभक्ता सत्राजिताचा । जिवलग सूर्य सखा साचा । त्याकारणें स्यमंतकाचा । प्रसाद सूर्यें समर्पिला ॥ ४८ ॥ सूर्यभक्त सत्राजित । असता झाला जगीं विख्यात । त्याकारणें संतोषभरित । मणि आदित्य समर्पी ॥ ४९ ॥ द्वारकेबाहेरी सिंधुस्नान । करूनि स्तविला सहस्रकिरण । प्रसन्न होतां प्रकाशमान । आपणासमान । करीं म्हणे ॥ ५० ॥ प्रियतम स्नेहाळ भक्तावरी । होवोनि स्यमंतक दिधला करीं । त्या मणीची प्रकाशथोरी । भास्करापरी भ्राजिष्ठ ॥ ५१ ॥

स त बिभ्रन्मणिं कंठे भ्राजमानो यथा रविः। प्रविष्टो द्वारकां राजंस्तेजसा नोपलक्षितः॥ ४॥

स्यमंतकमणीच्या प्रसादलाभें । सत्राजित ऐश्वर्यक्षोभें । दाटला मानी दिवि दिव्यशोभे । देवेंद्र न लभे निज तुळणा ॥ ५२ ॥ तदाढ्यत्वें न माय कोठें । निज गौरवाचिये हुटहुटे । द्वारावतीमाजी तो पेठे । दैवें बाळिष्ठें नियोजिला ॥ ५३ ॥ मणिभूषण तें धरूनि कंठीं । द्वारकेमाजी स्वधामवाटीं । प्रविष्ट होतां जनांच्या दृष्टी । किरणकोटि रवि गमला ॥ ५४ ॥ कोणा न कळे मानव ऐसा । दृष्टि जडल्या मणिप्रकाशा । सत्राजिताचा आकृतिठसा । जनमानसा तर्केना ॥ ५५ ॥

तं विलोक्य जना दूरात्तेजसा मुष्टदृष्टयः॥ दीव्यतेऽक्षैर्भगवते शशंसुः सूर्यशंकिताः॥ ५॥

द्वारकाजनीं लक्षिला दुरून । तंव तेजें वंचिले त्याचे नयन । द्यूत क्रीडतां श्रीभगवान । कथिती येऊन त्यापाशीं ॥ ५६ ॥ जनीं भाविला सहस्रकिरण । तैसेंचि सभास्थानीं येऊन । करिते झाले निवेदन । तें सज्जन परिसोत ॥ ५७ ॥

जना ऊचुः – नारायण नमस्तेऽस्तु शंखचक्रगदाधर । दामोदरारविंदाक्ष गोविन्द यदुनंदन ॥ ६ ॥

नरायतना नारायणा । तुज नमो गा जगज्जीवना । शंखचक्रगदाब्जधारणा । जलजेक्षणा गोविन्दा ॥ ५८ ॥ यदुकुलगगनोद्भवनवघना । यादवदवयवाननलशमना । यदुवनजीवना आप्यायना । यदुनंदना यदुवर्या ॥ ५९ ॥ इंद्र दमिला गोवर्धनीं । हे कीर्ति ऐकिली होती जनीं । वरुण भजला नंदानयनीं । हेही करणी जन जाणे ॥ ६० ॥ गुरुसुत अर्पूनि भजला यम । प्राशूनि पावक केला शम । कुबेराचा पुरविला काम । तनययुग्म उद्धरूनी ॥ ६१ ॥ एवं देवाधिदेव कृष्ण । जाणोनि दर्शना सहस्रकिरण । आला ऐसें कथिती जन । संबोधून बहुनामीं ॥ ६२ ॥ नमस्कारूनि वदती वाणी । तें तूं ऐकें कोदंडपाणि । कौरवान्वयभूषणमणि । बादरायणि संबोधी ॥ ६३ ॥

एष आयाति सविता त्वां दिदृक्षुर्जगत्पते । मुष्णन्गभस्तिचक्रेण नृणां चक्षूंषि तिग्मगुः ॥ ७ ॥

जनपद म्हणती भो श्रीकृष्णा । प्रत्यक्ष सविता सभास्थाना । देखावया तुझिया चरणां । स्वयें येताहे पैल तो ॥ ६४ ॥ त्रिजगद्गोगोप्ताविंद ऐसें । तूतें जाणोनि निज मानसें । तव पददर्शनाचिये आशे । तिग्मप्रकाशें रवि आला ॥ ६५ ॥ तीक्ष्णगभस्तिचक्रेंकरून । झांकोळले जनांचे नयन । पाहों इच्छितों तुझे चरण । काय म्हणोन तें ऐका ॥ ६६ ॥

नन्वन्विच्छंति ते मार्गं त्रिलोक्यां विबुधर्षभाः । ज्ञात्वाऽद्य गूढं यदुषु द्रष्टुं त्वां यात्यजः प्रभो ॥ ८ ॥

भो भो स्वामी पंकजनाभा । तव सान्निध्यसुखवालभा । त्रिजगीं सुरवर दर्शनलाभा । बहुतेक तव भा गिंवसिती ॥ ६७ ॥ मार्गमाणा श्रुति स्मृति । तो तूं यदुकुळीं गूढस्थिति । नटला आहेसी मनुष्याकृति । जाणोनि गभस्ति येत असे ॥ ६८ ॥ तूतें पहावयाकारणें । गभस्तीचें येथें येणें । ऐसें भाविजे आम्हुच्या मनें । जाणिजे सर्वज्ञें प्रभुत्वें ॥ ६९ ॥

श्रीशुक उवाच–निशम्य बालवचनं प्रहस्यांबुजलोचनः । प्राह नासौ रविर्देवः सत्राजिन्मणिना ज्वलन् ॥९॥

सत्राजित हा नामसंकेत । प्रथमश्लोकीं अकारान्त । इये श्लोकीं तो हलंत । शब्द वर्तत द्विविध हा ॥ ७० ॥ अष्टौ व्याकरणसंपत्ति । छपन्न कोश संज्ञास्मृति । सर्वज्ञ पूर्ण आम्नायार्थी । शुक व्यासोक्ती निवडला ॥ ७१ ॥ तो हें श्रीमद्भागवत । शुक वाखाणी निगमोदित । श्रोते सर्वज्ञ तेथींचा अर्थ । पदपदार्थं अनुभविती ॥ ७२ ॥ शुक म्हणे गा कौरवपाळा । अज्ञान जनही समान बाळा । बालिशांच्या ऐकोनि बोला । हरि हांसिला आश्चर्यें ॥ ७३ ॥ अखिलद्रष्टा अंबुजनयन । सर्वसाक्षी सर्वाभिज्ञ । बोलता झाला हास्य करून । काय वचन तयांसी ॥ ७४ ॥ अहो हा सूर्य नोहे सहसा । तुम्ही लक्षूनि तत्प्रकाशा । भाविला चंडकिरण ऐसा । कोण कैसा नुमजोनी ॥ ७५ ॥ मणिभूषणें द्योतमान । तुम्हीं भाविला देव म्हणोन । परी हा सत्राजित आपण । द्वारकाभुवन प्रवेशला ॥ ७६ ॥ कंठाभरणीं स्यमंतक ।

ज्वलत्किरणीं गमे अर्क । जाऊनि पहा पां सम्यक । मनीं निःशंक होवोनी ॥ ७७ ॥ ऐसें कथी जंव चक्रपाणि । तंव तो प्रवेशे आत्मसदनीं । पुढें वर्तली जैसी करणी । तेही श्रवणीं अवधारा ॥ ७८ ॥

सत्राजित्स्वगृहं श्रीमत्कृतकौतुकमंगलम् । प्रविश्य देवसदने मणिं विप्रैर्न्यवेशयत् ॥ १० ॥

सत्राजित निजमंदिरीं । प्रवेशला आनंदगजरीं । तया गृहाची ऐश्वर्यथोरी । शुकवैखरी अनुवादी ॥ ७९ ॥ आधींच सदन श्रीमंडित । विशेष कौतुकें उत्साहभरित । मंगळें केलीं जेथ समस्त । वेदपारंगतद्विजवचनीं ॥ ८० ॥ ऐशिये सदनीं प्रवेशोनी । देवतायतनीं स्यमंतकमणि । स्थापिला द्विजांच्या हस्तें करूनी । त्याची करणी अवधारा ॥ ८१ ॥

दिने दिने स्वर्णभारानष्टौ स सृजति प्रभो । दुर्भिक्षमार्यरिष्टानि सर्पाधिव्याधयोऽशुभाः ॥ ११ ॥

स्वर्चित स्यमंतक जिये स्थानीं । तिये राष्ट्रीं कल्याणश्रेणी । नाहीं विघ्नांची काचणी । प्रसवे अनुदिनीं अष्टभार ॥ ८२ ॥ अष्टौ भार गाङ्गेय शुद्ध । जें कां बोलिजे जाम्बूनद । स्वर्चित स्यमंतकमणि विशद । प्रसवे प्रसिद्ध दिनीं दिनीं ॥८३॥ ऐकें प्रभो परीक्षिति । भारसंख्येची व्युत्पत्ति । बोलिली असे निबंधीं गणितीं । ते तुजप्रति निरूपितों ॥८४॥

श्लोक निबंधींचे – चतुर्भिर्व्रीहिभिर्गुंजं गुंजान्पंच पणं पणान् ॥
अष्टौधरणमष्टौ च कर्षतांश्चतुरं पलम् ।
तुलां पलशतं प्राहुर्भारः स्याद्विंशतिस्तुलाः ॥

चौ व्रीहींची एक गुंज । पंच गुंजांचा पण हें बुझ । आठां पणांचा धरण सहज । कर्ष तूं उमज धरणाष्टकें ॥ ८५ ॥ चारी कर्ष एक्या पळा । शतपळांची बोलिजे तुळा । विंशति तुळांचा मोकळा । भार बोलिला शास्त्रज्ञीं ॥ ८६ ॥ ऐसे सुवर्णभार अष्ट । अहरह प्रसवे स्यमंतक श्रेष्ठ । तेणें लाभें अतिसंतुष्ट । जो रविनिष्ठ सत्राजित ॥ ८७ ॥ आणिक स्यमंतकमणीचे गुण । राष्ट्रीं दुर्भिक्षें न पीडे जन । कदापि न पडे अवर्षण । वर्षे पर्जन्य जनइच्छा ॥ ८८ ॥ जरी मरी शारें वारें । भूतें प्रेतें भयंकरें । नाना अरिष्टें विघ्नें क्रूरें । महाविखारें न बाधती ॥ ८९ ॥ चौऱ्यांशीं लक्ष दुर्घट रोग । तियें राष्ट्रीं न करिती लाग । सर्प वृश्चिक तक्षक नाग । तद्भयप्रसंग तेथ नसे ॥ ९० ॥ काम क्रोध लोभ मोह । चिंता हृद्रोग शोक भय । मद मत्सर दंभ व्यय । हानि क्षय मनोग्लानि ॥ ९१ ॥ ऐसिया अनेक आधि व्याधि । अशुभें दुश्चिह्नें दुष्कृतावधि । व्याघ्रादि हिंस्रश्वापदमांदी । कोणा न बाधी ते राष्ट्रीं ॥ ९२ ॥

न संति मायिनस्तत्र यत्राऽऽस्तेऽभ्यर्चितो मणिः । स याचितो मणिं क्वापि यदुराजाय शौरिणा ॥१२॥

टाणे टोणे साबरी कुटिळ । भुररीं चेटकी मायिक खळ । कपटी कुजान्तरी दुःशीळ । तें तें स्थळ उपेक्षिती ॥९३॥ जारण मारण उच्चाटन । स्तंभन मोहन विद्वेषण । विस्फोटादि वशीकरण । कर्ते

दुर्जन ते नसती ॥९४॥ इत्यादि मणीच्या सन्निधानें । जन नेणती अकल्याणें । अनेक दुःखदें कारणें । राष्ट्रींच्या जनें नेणिजती ॥९५॥ ऐसे ज्याचे अपार गुण । तो देवतासदनीं प्रतिष्ठून । सत्राजित सभास्थान । सहज आपण प्रवेशला ॥९६॥ तेथ मणीची चर्चा करितां । सहज श्रीकृष्ण झाला वदता । उग्रसेना हा मणि अर्पितां । शुभ सर्वथा सर्वांसी ॥९७॥ ऐसी ऐकूनियां मात । नायकिल्यापरि त्वरित । उठोनि गेला साशंकित । परम सचिन्त होवोनी ॥ ९८ ॥ क अपि या द्वय अध्यर्यीं । अर्थ सूचिला असे काई । तो परिसिजे सर्वज्ञांहीं । कथिजेल कांहीं स्वल्पसा ॥ ९९ ॥ न देतां समर्थालागूनी । स्वचित असो कां कोणे स्थानीं । मणि सद्गुणी तोचि दुर्गुणी । होय म्हणोनि सुचविलें ॥ १०० ॥ ज्याचोनि सर्व अरिष्टें हरती । तो नार्पितां ईश्वराप्रति । प्रसवे अनिष्टांची संतति । वदला श्रीपति गूढत्वें ॥ १ ॥ नार्पितां भगवन्ताच्या ठायीं । आपणचि आधीं भक्षी गृहीं । तें अमृतरूपाचि अन्न पाहीं । नरकदायी कृमितुल्य ॥ २ ॥ ऐसा कृष्णाचा गूढार्थ । नेणोनियां सत्राजित । गेला परंतु फळही प्राप्त । झालें त्वरित तें ऐका ॥ ३ ॥

नैवार्थकामुकः प्रादाद्याञ्चाभंगमतर्कयन् । तमेकदा मणिं कंठे प्रतिमुच्य महाप्रभम् ।
प्रसेनो हयमारुह्य मृगया व्यचरद्वने ॥ १३ ॥

अर्थकामुक सत्राजित । त्यासी याचितां उग्रसेनार्थ । मणि नेदूनि निघाला त्वरित । अवज्ञा तर्कित होत्साता ॥ ४ ॥ म्यां भंगिली भगवद्याज्ञा । लोभ धरिला स्यमंतकाचा । भिडे घालिती तें सर्वांचा । मी विरोधी होईन ॥ १०५ ॥ विरोध पडतां समर्थांसीं । मग वसावें कवणे देशीं । यालागीं मणि हा प्रसेनासी । देऊनि निमित्त वारिलें ॥ ६ ॥ स्वचित मणि जिये स्थानीं । तेथ सर्वेही कल्याणखाणी । विपरीत फळाची जे करणी । तेही श्रवणीं अवधारा ॥ ७ ॥ कोणे एके दुर्दैवदिवसीं । कंठीं बांधोनि स्यमंतकासी । प्रसेन निघाला पारधीसी । अनुगवर्गेंसीं विराजित ॥ ८ ॥ दिव्यवस्त्राभरणीं युक्त । मुकुटकुंडलमणिमंडित । शस्त्रास्त्रसामग्रीसमवेत । उत्साहभरित हयवहनीं ॥ ९ ॥ भंवते चालती असिवार । पुढें खोलती पायभार । करूनि दुंदुभिवाद्यगजर । वनगह्वर प्रवेशला ॥ ११० ॥ श्वानें सोडिलीं मृगापाठीं । वृक्षीं पक्षियां निर्यासयष्टि । व्याघ्रसूकरां देखोनि दृष्टी । सुभट हठी उठावले ॥ ११ ॥ अघटित दैवरेखेची घटी । प्रसेनें कुरंग देखिला निकटीं । अश्व लोटिला तयापाठीं । दाटोदाटीं गिरिकुक्षीं ॥ १२ ॥ पळे प्राणभयें कुरंग । पवनवेगें दिव्य तुरंग । धांवतां लंघिला बहु भूभाग । अनुगवर्ग अंतरला ॥ १३ ॥ अटव्यें वनें गहनें घोर । लंघितां अंतर पडलें फार । जाम्बवताचें वन दुस्तर । महाभयंकर प्रवेशला ॥ १४ ॥ प्रसेनकंठीं भास्वर मणि । कंठीरवें लक्षूनि गहनीं । अकस्मात कव घालूनी । झडपी गवसूनि तें परिसा ॥ ११५ ॥

प्रसेनं सहयं हत्वा मणिमाच्छिद्य केसरी । गिरिं विशञ्जाम्बवता निहतो मणिमिच्छता ॥ १४ ॥

अश्वें सहित प्रसेन वनीं । मृगेंद्रें मारिला पैं झडपोनी । प्रेतें सांडिलीं विदारोनी । आकर्षूनि मणि हरिला ॥ १६ ॥ भास्करभासुर मणि घेऊनी । केसरी भरतां गिरिकाननीं । जाम्बवतें लक्षूनि

नयनीं । कव घालूनि घोळसिला ॥ १७ ॥ जाम्बवान प्रतापजेठी । मणीची इच्छा धरूनि पोटीं । सिंह मारूनि उठाउठीं । स्वबिळापोटीं प्रवेशला ॥ १८ ॥

सोऽपि चक्रे कुमारस्य मणिं क्रीडनकं बिले । अपश्यन्भ्रातरं भ्राता सत्राजित्पर्यतप्यत ॥ १५ ॥

बिळीं प्रवेशोनि आह्लादें । स्वपुत्राचिये पाळणामोदें । खेळणें करूनि मणि तो बांधे । परमानंदें उज्ज्वलित ॥ १९ ॥ स्यमंतकमणीचिया प्रकाशें । विवरामाजील ध्वान्त नासे । समृद्धिमंत स्वर्गा ऐसें । विवर विलसे देदीप्य ॥ १२० ॥ असो जाम्बवताची कथा । प्रसेन न दिसे मागुता येतां । वनोपवनीं न लभे वार्ता । अनुगीं हुडकितां सर्वत्र ॥ २१ ॥ एक वेंघोनि गिरिशिखरें । हांका मारिती दीर्घ स्वरें । मार्गस्थ देखोनि किंकर त्वरें । धांवोनि घाबरे त्यां पुसती ॥ २२ ॥ एकीं सत्राजिताच्या सदनीं । हांक नेली द्वारकाभुवनीं । सर्वेच अनुयायी मागूनी । आले धांवूनि आक्रंदत ॥ २३ ॥ शोक करिती स्त्रिया बाळें । म्हणती प्रसेन ग्रासिला काळें । सिंहें सर्पे कीं शार्दूळें । किंवा भक्षिला निशाचरीं ॥ २४ ॥ अश्वेंसहित पर्वतपतन । कीं लवणार्णवीं गेले प्राण । किंवा तृषार्त जलेंवीण । पावला मरण रवितापें ॥ १२५ ॥ रविदत्त कंठीं असतां मणि । क्षुधेतृषेची न बाधी ग्लानि । तंव सत्राजितें आक्रंदोनी । तर्किलें मनीं तें ऐका ॥ २६ ॥

प्रायः कृष्णेन निहतो मणिग्रीवो वनं गतः । भ्राता ममेति तच्छ्रुत्वा कर्णे कर्णेऽजपञ्जनाः ॥ १६ ॥

बहुतेक मणि याचिला कृष्णें । म्या भंगिलें त्याचिया तृष्णे । मानसीं गुल्म धरूनि तेणें । प्रसेन-प्राण घेतला ॥ २७ ॥ परम प्रियतम माझा भ्राता । ग्रीवामंडित स्यमंतक असतां । मृगयार्थ वना गेला होता । कृष्णें तत्त्वता तो वधिला ॥ २८ ॥ ऐसी शोकोर्मीमाझारीं । वदली सत्राजिताची वैखरी । हें वाक्य पडतां जनांच्या श्रोत्रीं । परस्परीं तें श्रुत करिती ॥ २९ ॥ कर्णोपकर्णीं हें वाक्य कथन । उपांशु जपवत् वदती जन । द्वारकेमाजी थोर लहान । वदतां श्रवण सर्वत्रां ॥१३०॥ मुखाबाहेर गेलिया शब्द । सांवरूं न शके जरी प्रबुद्ध । यालागीं विवरूनि एकान्तवाद । करिती कोविद नयनिपुण ॥ ३१ ॥ प्रमाद म्हणिजे असावधता । शोकवैकल्यें वदों जातां । विघ्नें कवळिलें सत्राजिता । तें कुरुनाथा अवधारीं ॥ ३२ ॥

भगवांस्तदुपश्रुत्य दुर्यशो लिप्तमात्मनि । मार्ष्टुं प्रसेनपदवीमन्वपद्यत नागरैः ॥ १७ ॥

सर्वज्ञ श्रीकृष्ण अंतरवेत्ता । तथापि ऐकोन कुटीची वार्ता । मिथ्या अभिशाप आला माथां । तत्क्षालनार्थ प्रवर्तला ॥ ३३ ॥ उग्रसेनादि सभास्थानीं । बैसल्या समस्त यादवश्रेणी । तेथ स्वमुखें चक्रपाणि । दुर्यशोग्लानि प्रकट वदे ॥ ३४ ॥ भोज अंधक माधव कुकुर । वृष्णि सात्वत दाशार्हप्रवर । समस्त यादव बैसलां गोत्र । तरी ऐका विचित्र दैवबळ ॥ १३५ ॥ सर्वां देखतां सभास्थानीं । प्रसंगोचित मी बोलिलों वाणी । नृपायोग्य हा स्यमंतकमणि । हें ऐकिलें श्रवणीं सत्राजितें ॥ ३६ ॥ इतुकियावरूनि

माजिया माथां। दुर्यशारोप केला वृथा। तुम्हीं गोत्रजीं ममहितार्था। क्षालनार्थी प्रवर्तिजे ॥ ३७ ॥ हें ऐकोनि म्हणती गोत्रज। कर्णोपकर्णीं हे गुजगुज। ऐकत होतों तेचि सहज। गरुडध्वजें प्रकाटिली ॥ ३८ ॥ एक म्हणती शोकार्तवाणी। सहसा न धरिजे अंतःकरणीं। एक म्हणती स्यमंतकाहूनी। मणींच्या श्रेणी हरिसदनीं ॥ ३९ ॥ ब्रह्मादि देव आज्ञाधर। तेथ मणीचा कोण विचार। संकल्पमात्रें द्वारकापुर। करवी श्रीधरं स्वसत्ता ॥ १४० ॥ एक म्हणती सुधर्मा सभा। कृष्णें आणिली ऐश्वर्यलाभा। तेथ मणीची कायसी शोभा। किमर्थ क्षोभा वश होणें ॥ ४१ ॥ एक म्हणती ऐसें नोहे। ऐश्वर्यक्षोभें जाऊं नये। सत्य मिथ्या मराळप्राय। निवडिजे न्यायें पय पाणी ॥ ४२ ॥ हें ऐकोनि कमलापति। पहावया प्रसेनपद्धति। तुम्हीं चालावें म्हणे समस्तीं। दुर्यशोनिवृत्ति करावया ॥ ४३ ॥ उग्रसेन वसुदेवप्रमुख। द्वारके ठेवूनि वृद्ध अशेख। सवें घेऊनि यादवकटक। यदुनायक निघाला ॥ ४४ ॥ द्वारकानगरींचे नागरजन। अवघियांसहित श्रीभगवान। प्रसेनपदवी अनुलक्षून। चालिला सर्वज्ञ मनुजवत् ॥ १४५ ॥

हतं प्रसेनमश्वं च वीक्ष्य केसरिणा वने। तं चाद्रिपृष्ठे निहतमृक्षेण ददृशुर्जनाः ॥१८॥

पुढें काढिती कुरंगमार्ग। मागें प्रसेनहयशफलाग। चालिले शोधीत दुर्गम दांग। बहु भूभाग आक्रमिला ॥ ४६ ॥ हुडकित भरले वनीं दुर्घटा। तंव देखिला प्रसेनअश्वसाटा। अवयव पडिले बारा वाटा। वसना मुकुटा ओळखती ॥ ४७ ॥ चाप तुणीर खेटक खड्ग। माळा मुद्रिका भूषणें चांग। सेवकीं घेवोनि पुढें लाग। सिंहपदवीचा हरि गिंवसी ॥ ४८ ॥ सिंहपदाविन्यासा मान। करूनि चालिले शोधीत रान। सामान्य पर्वत उल्लंघोन। केलें आरोहण गिरिपृष्ठीं ॥ ४९ ॥ तेथ देखिलें परमाश्चर्य। आस्वलाचे उमटले पाय। सिंहप्रेत पडिलें आहे। मणीची सोय न लभेचि ॥ १५० ॥ पुढें काढिला आस्वलमाग। करित चालिले मणीचा लाग। अवघड पर्वत दुर्गम मार्ग। भयंकर दांग प्रवेशले ॥ ५१ ॥ वृक्ष लागले महाविशाळ। करंज कदंब नीप सरळ। खादिर धामोडे अर्जुन बहळ। व्याहळे बाहळे आरग्वध ॥ ५२ ॥ रिठे ब्याहडे हिरडे कुडे। साय सातवनें दोसाडे। दिव्य वृक्षांचे मांदोडे। आम्रचंदनपनसादि ॥ ५३ ॥ राताञ्जन राजादन। ताल तमाल शाल गहन। मंदार पार्यातक संतान। मृत्युलोकींचे गिरिभव जे ॥ ५४ ॥ जंबु कपित्थ तिंतिणिका। वैकंकत कर्वंदिका। शाल शाल्मली श्लेष्मातका। भल्लातका सहकोळी ॥ १५५ ॥ प्लक्ष पालाश पिंपळ वट। उंबर अंजिर तिंदुक तरट। निंब निंबारे सरळ नीट। जाळी अफाट वंशांच्या ॥ ५६ ॥ ऐसे अपार वृक्ष वनीं। उंच विशाळ लागले गगनीं। वल्लीलतालिंगिता पर्णी। सुमनीं वितानीं सफलिता ॥ ५७॥ भुभुकार देती वानरभार। फूत्कार करिती महाविखार। कोकिळांचे पंचम स्वर। मत्त मयूर नाचती ॥ ५८ ॥ ढोलीं घुघाती दिवाभीत। वटवाघुळा कळकाळित। स्वेच्छा पिंगळे किलबिलित। किलकिलत कळविंक ॥५९॥ राक्षस गर्जती भयंकर। सिंहनाद करिती घोर। भूत प्रेत यक्षिणी क्रूर। पिंग झोटिंग वेताळ ॥ १६० ॥ भूतें नाचती नग्नोन्मत्त। विशाळ विकराळ महाप्रेत। शाकिनी डाकिनी खांकात। भीम गर्जत वनचंडी ॥ ६१ ॥ सिंह ऋक्षव्याघ्र

वृक । वाराह गज गवाक्ष भल्लूक । तरस चमरी खड्ग जंबुक । महाभयानक श्वापदें ॥ ६२ ॥ ऐसिये दुर्गम वनोदरीं । ऋक्षपदवी लक्षित हरि । रिघाला जाम्बवताचे विवरीं । तेंहि चतुरीं परिसावें ॥ ६३ ॥

ऋक्षराजबिलं भीममंधेन तमसाऽवृतम् । एको विवेश भगवानवस्थाप्य बहिः प्रजाः ॥१९॥

बिळामाजी आस्वलमार्ग । देखोनि थोकला नागरवर्ग । म्हणती मणीचा प्रसंग । येथोनि लाग राहिला ॥ ६४ ॥ हें ऐकोनि पंकजपाणि । नागरजनासि बोले वाणी । जंववरी प्राप्त नोहे मणि । द्वारकाभुवनीं तंव न वचें ॥ १६५ ॥ तें परिसोनि समस्त जन । म्हणती काय हा आग्रह कोण । विवरीं रिघोनि द्यावा प्राण । येवढें निर्वाण किमर्थ ॥ ६६ ॥ एक म्हणाति सत्राजिता । सांगोनि प्रसेन मरणवार्ता । शस्त्रें वस्त्रें भूषणें देतां । दुर्यश माथां मग कैंचें ॥ ६७ ॥ ऐकोनि म्हणे पद्मनाभ । जंववरी मणीचा नोहे लाभ । तंव दुर्यशकाळिमाराहुबिंब । जडलें स्वयंभ वदनाब्जा ॥ ६८ ॥ यालागीं प्रवेशेन मी विवरीं । समस्तीं रहावें बाहेरीं । ऐसें म्हणोनियां श्रीहरी । बिळामाझारीं प्रवेशला ॥ ६९ ॥ ऋक्षराजाचें भयंकर बिळ । अंधकारें दाटलें बहळ । माजी प्रवेशला घननीळ । साक्षी केवळ प्राज्ञत्वें ॥ १७० ॥ असतां मणीचा प्रकाश बिळीं । तरी अंधकार कां तिये स्थळीं । म्हणाल तरी ते गर्ता सरळी । द्वारपर्यंत नसे कीं ॥ ७१ ॥ विवरीं प्रवेशोनि घननीळ । स्वप्रकाशें धवळी बिळ । ठाकिलें ऋक्षराजाचें स्थळ । पुढें प्राञ्जळ अवधारा ॥ ७२ ॥

तत्र दृष्ट्वा मणिं श्रेष्ठं बालक्रीडनकं कृतम् । हर्तुं कृतमतिस्तस्मिन्नवतस्थेऽर्भकांतिके ॥ २० ॥

वक्र कुटिळ अतिलंबाळ । मार्ग क्रमूनि ठाकिलें बिळ । तेथ मणिप्रभाबंबाळ । देखे केवळ बिळगर्भ ॥ ७३ ॥ सुषुप्तिगर्भीं जैसें स्वप्न । तैसें ठाकिलें ऋक्षसदन । तेथ स्यमंतक देदीप्यमान । देखिला दुरून मणिश्रेष्ठ ॥ ७४ ॥ तपश्चर्येअंतीं फळ । तेंवि श्रमतां श्रीघननीळ । मणि देखोनि सुतेजाळ । तोषे केवळ हृदयकमळीं ॥ १७५ ॥ बालकाचिया पाळण्यावरी । मणि बांधिला खेळण्यापरी । निकट उभी असे धात्री । तेथ श्रीहरि पातला ॥ ७६ ॥ तेथ मणिहरणाची धरूनि मति । उभा अर्भकानिकटवर्ती । धात्री देखोनियां श्रीपति । पडली आवर्तीं भयार्णवीं ॥ ७७ ॥ धात्री म्हणिजे ते उपमाता । तिणें देखोनि श्रीकृष्णनाथा । महाभयाची ऊर्मी चित्ता । करित आक्रान्ता तें ऐका ॥ ७८ ॥

तमपूर्वं नरं दृष्ट्वा धात्री चुक्रोश भीतवत् । तच्छ्रुत्वाऽभ्यद्रवत्क्रुद्धो जाम्बवान्बलिनां वरः ॥ २१ ॥

परम विकराळ महाद्भुत । देखतां बाळक अकस्मात । आक्रंदोनि मूर्च्छागत । सळोनि पडत ज्यापरी ॥ ७९ ॥ तैसीं आस्वलें श्वापदजाती । पर्वतीं विवरीं ज्यांची वसती । अपूर्व देखोनि नराकृति । धात्री अवचिती आक्रंदे ॥ १८० ॥ ऐकोनि धात्रीचा आक्रोशगजर । सक्रोध धांविला ऋक्षेश्वर । बळिष्ठांमाजि बळिया वीर । जो अवतार ब्रह्मयाचा ॥ ८१ ॥ कळिकाळाचा प्रसूतिपवन । लागतां विपरीत

क्रियाचरण । तेंचि प्रत्यक्ष प्रवर्तमान । ऐका दुश्चिह्न उदेलें ॥ ८२ ॥ पिता विष्णु तो वासुदेव । पुत्र ब्रह्मा जो ऋक्षराव । पित्यापुत्रांमाजि माव । युद्ध अपूर्व मांडलें ॥ ८३ ॥ पुत्र उन्मत्त नोळखे पिता । आंगीं बळाची उद्धतता । जाणोनि पुत्राची योग्यता । तदनुरूपता येरू नटे ॥ ८४ ॥ वृद्ध पिता बळिष्ठासी । आणोनि दंडी स्वपुत्रासी । तेंवि पुराणपुरुष नववपूसीं । जाम्बवतासीं युद्ध करी ॥ १८५ ॥

स वै भगवता तेन युयुधे स्वामिनात्मनः । पुरुषं प्राकृतं मत्वा कुपितो नानुभाववित् ॥ २२ ॥

आपुला स्वामी श्रीभगवंत । तेणेंसीं तो जाम्बवत । प्रतापक्षोभें युद्ध करीत । पुरुष प्राकृत मानूनी ॥ ८६ ॥ क्रोधाचिये भरला भरीं । ऐश्वर्याची तेणें थोरी । जाणोनि प्राकृत पुरुषापरी । समकेसरी संघटला ॥ ८७ ॥ आस्वलयुद्धाची परिभाषा । वश्य होवोनि क्रोधावेशा । सर्वकौशल्यें जगदधीशा । तो त्यासरिसा युद्ध करी ॥ ८८ ॥

द्वंद्वयुद्धं सुतुमुलमुभयोर्विजिगीषतोः । आयुधाश्मद्रुमैर्दोर्भिः क्रव्यार्थे श्येनयोरिव ॥ २३ ॥

द्वंद्वयुद्धा पेटले दोन्ही । साह्य नाहींच कोणा कोणी । दोघां विजयाची शिराणी । निकरेंकरूनि संघटती ॥ ८९ ॥ परम तुमुल निर्वाण युद्ध । दोघे वीर महाप्रसिद्ध । करिते झाले तो प्रबंध । कोण प्रबुद्ध वदों शके ॥ १९० ॥ क्रव्य म्हणिजे आमिष जाण । तदर्थ भांडती जैसे श्येन । परस्परें घेऊं पाहती प्राण । तैसे दारुण भिडताती ॥ ९१ ॥ जैसें विस्तीर्ण पाताळ । तैसें जाम्बवताचें बिळ । वृक्ष वल्ली जळ पुष्कळ । अतिसोज्वळ श्रीमंत ॥ ९२ ॥ ऐसिये स्थळीं प्रचंड बळी । दोघे युद्ध करिती सळीं । निघे उमटती पाताळीं । वर्षाकाळीं घन जैसे ॥ ९३ ॥ जाम्बवतें अकस्मात । कृष्णहृदयीं मुष्टिघात । वोपूनि पाडिला व्यस्तखस्त । मूर्च्छागत करूनियां ॥ ९४ ॥ जैसा द्यूतकाराचा भाव । प्रथम आपण हारवी डाव । तैसा मूर्च्छित पडला देव । आस्वला हांव दुणावली ॥ १९५ ॥ हांवे चढोन जाम्बवत । पुन्हा ओपितां मुष्टिघात । कृष्ण लाघवें धरूनि हात । आंसडूनियां पाडिला ॥ ९६ ॥ झोंकासरसा तोंडघसी । सवेग आदळला पृथ्वीसी । जानू ललाट घ्राणमुखासी । रक्तप्रवाह लागले ॥ ९७ ॥ तेणें थरारिला ऋक्ष । म्हणे हा बलिष्ठ योद्धा दक्ष । उठोनि घेतला प्रचंड वृक्ष । तेणें कंजाक्ष ताडिला ॥ ९८ ॥ वृक्षप्रहार पडतां शिरीं । कृष्णें धरिला वरचेवरी । हिरोनि घेतला बलात्कारीं । आस्वलाशिरीं ताडावया ॥ ९९ ॥ तेणें उसळोनि सवेगें । ऋक्षें वांचविलीं निजाङ्गें । शतधनुष्यें सरोनि मागें । बळें अभंगें आवेशला ॥ २०० ॥ उपडूनि घेतला प्रचंड ताल । सक्रोधें जैसा प्रळयकाळ । हृदयीं ताडूनियां गोपाळ । केली विशाळ गर्जना ॥ १ ॥ कृष्णें चुकवूनि तालघात । वृक्षें ताडिला जाम्बवत । मूर्च्छित पाडिला एक मुहूर्त । पुन्हा नधरत क्षोभला ॥ २ ॥ मग राहोनि दूरच्या दुरी । वृक्ष टाकिले सहस्रवरी । कृष्णें वारिले वरिच्या वरी । घाव शरीरीं नादळतां ॥ ३ ॥ वृक्षें वृक्षां वारी हरी । देखोनि ऋक्ष कोपला भारी । राम स्मरोनि अभ्यंतरीं । मग पाथरी अभिवर्षे ॥ ४ ॥ म्हणे माझिया प्रतापापुढें । न थरे कुंभकर्ण बापुडें । ज्यां लंकेचे पाडिले हुडे । केलें वेडें मज येणें ॥ २०५ ॥ म्हणोनि टाकी शिळा धोंडी । गगनीं उफाळे दुपांडीं । घोष

गाजवी ब्रह्मांडीं । दे मुरकुंडी धरावया ॥ ६ ॥ येरू वृक्षहस्तें करोनी । धोंडी झोडूनि पाडी धरणी । आस्वल आंगीं जडतां दुरूनी । वृक्षें लक्षूनि झोडिला ॥ ७ ॥ तो साहोनि वृक्षघात । सवेग उसळला गगनांत । विशाळ शिळा घेऊनि त्वरित । निक्षेपित हरिमाथां ॥ ८ ॥ कृष्णें मस्तकीं पडतां शिळा । वृक्ष हातींचा विसर्जिला । वरच्या वरी धरिली हेळा । तेणें ठोकिला ऋक्षपति ॥ ९ ॥ ऋक्षप मारी जे जे पाषाण । वरच्या वरी ते धरी श्रीकृष्ण । तेणें आस्वला करी ताडन । निर्भय पूर्ण स्वस्थानीं ॥ २१० ॥ प्रथम त्रिरात्र लटापटी । दहा दिवस वृक्षकाठी । सप्तरात्र शिळावृष्टि । अंगसंघट्टी याउपरी ॥ ११ ॥ शिळायुद्धीं नावरे हरि । जाम्बवत क्षोभला भारी । मुष्टिघातें हृदयावरी । ताडिला हरि वज्रवत् ॥ १२ ॥ कृष्णें साहोनि मुष्टिघात । लघुलाघवें मारिली लात । उलथोन पाडिला जाम्बवत । विचकोनि दांत पद खोडी ॥ १३ ॥ आपुला भक्त हें जाणोनि हरि । मदगर्वातें मात्र परिहरी । वांचूनि जीवें सहसा न मरी । दैत्यापरी क्षोभोनी ॥ १४ ॥ ऋक्ष मूर्च्छना सांवरोनि । झेपावला कव घालूनी । मुष्टि मारिली कृष्णमूर्ध्नी । येरें वदनीं ताडिला ॥ २१५ ॥ मग परस्परें मुष्टिप्रहार । करिते झाले निरंतर । मुसळीं पृथुक-कंडनपर । जेंवि सत्वर वधूयुग्म ॥ १६ ॥ मुखीं मस्तकीं उरीं शिरीं । पृष्ठग्रीवाकटिकर्पूरीं । नितंबदेशीं जानुजठरीं । मुष्टिप्रहारीं ताडिती ते ॥ १७ ॥ कक्षाकुक्षीवक्षस्थळीं । नासाचिबुकीं कर्णीं कपोळीं । स्कंधीं दंतीं नेत्रयुगळीं । मर्मस्थळीं वज्रमुष्टि ॥ १८ ॥ प्रजनीं वृषणीं पायुरंध्रीं । जंघागुल्फीं पदपदाग्रीं । सक्थि-बस्तिनाभीवरी । करपदप्रहारीं हाणिताती ॥ १९ ॥ पृष्ठवंश अंस ऊरु । मणिबंधादि देश अपर । लक्षूनि निकरें मुष्टिप्रहार । ताडिती वज्रपडिपाडें ॥ २२० ॥ अष्टौ रात्र महाघोर । अंगसंघट्टनद्वंद्वसमर । परस्परें मुष्टिप्रहार । महाक्रूर संग्राम ॥ २१ ॥

आसीत्तदष्टाविंशाहमितरेतरमुष्टिभिः । वज्रनिष्पेषपरुषैरविश्रममहर्निशम् ॥ २४ ॥

एवं अट्ठावीस अहोरात्र । युद्ध केलें घोर विचित्र । विद्युत्पातासम कठोर । मुष्टिप्रहार परस्परें ॥ २२ ॥ जैसीं विंध्याद्रीचीं शिखरें । इंद्र भंगी वज्रप्रहारें । तैसीं उभयतांचीं गात्रें । भंगतीं निकरें मुष्टितळीं ॥ २३ ॥ अट्ठावीस अहोराती । न लावितां नेत्रपातीं । युद्ध केलें ऐसिये स्थिती । अविश्रमगती परस्परें ॥ २४ ॥ तया युद्धाचा फलितार्थ । जय पराजय कोणा प्राप्त । तोहि ऐका देऊनि चित्त । मूळश्लोकोक्त संक्षेपें ॥ २२५ ॥

कृष्णमुष्टिविनिष्पातनिष्पिष्टांगोरुबंधनः । क्षीणसत्त्वः स्विन्नगात्रस्तमाहातीव विस्मितः ॥ २५ ॥

कृष्णमुष्टीचे निष्ठुर प्रहार । वज्राहूनि अतिकठोर । लागतां ऋक्षाचें सर्व शरीर । झालें चकचूर निष्पिष्ट ॥ २६ ॥ ऊरुबंधनें प्रौढसंधि । बाहू कूर्परादि मणिबंधीं । कळा लागल्या बंधोबंधीं । जानु-जघनीं गुल्फादिकीं ॥ २७ ॥ ढिले झाले सर्व सांदे । उतरोनि गेलें आढ्यत्वमांदें । सर्वाङ्ग व्यापिलें प्रबळ तोंदें । आस्वल मोदें सांडवलें ॥ २८ ॥ दुःखें धैर्या झाला भंग । स्वेदें डबडबिलें सर्वाङ्ग ।

सुटला मदगर्वाचा संग । मग श्रीरंग ओळखिला ॥ २९ ॥ जाम्बवताचे मुष्टिप्रहार । कृष्णाआंगीं लागतां क्रूर । त्याणें त्याचेच भंगले कर । अभंग श्रीधर सर्वात्मा ॥ २३० ॥ जितुकें जळ वर्षे सागरीं । तो तें आत्मत्वें स्वीकरी । कीं घट मठ पर्वत पृथ्वीवरी । अभेदें धरित्री जड न मनी ॥ ३१ ॥ इन्धनीं आच्छादितां वैश्वानर । इन्धनेंचि होय प्रचुरतर । तेंवि श्रीधर जगदाधार । शक्ति समग्र चेतविता ॥ ३२ ॥ जाम्बवताचें जितुकें बळ । कृष्णाआंगींचेंचि तें केवळ । तेणें कृष्ण होय विकळ । हें बोलणें वोफळ मूर्खाचें ॥ ३३ ॥ घटाकाशें गिळिजे मठ । कीं मठाकाशा ब्रह्माण्डघोंट । न करवे तेंवि वैकुंठपीठ । न पवे कष्ट ऋक्षबळें ॥ ३४ ॥ श्रीकृष्णाच्या मुष्टिप्रहारीं । परम वैकल्य ऋक्षशरीरीं । विस्मय पावोनि अंतरीं । विचार विवरी हृदयांत ॥ २३५ ॥ मजसारिखा वीर वरिष्ठ । उचलूं शके ब्रह्माण्डघट । मुष्टिप्रहारें मेरु पीठ । करीन घोंट सिंधूचा ॥ ३६ ॥ कीं शेष काढूनि पाताळीं । सोडूनि देईन गगनबिळीं । भूगोल सांवरीन करतळीं । अतुळबळी मज ऐसा ॥ ३७ ॥ ऐसा गर्व माझ्या आंगीं । त्या मज भंगिलें समररंगीं । मजहूनि बळिष्ठ या भूभागीं । कोण हा जगीं मज मीनला ॥ ३८ ॥ मजहूनि याचें प्रचंड बळ । सामान्य नर नोहे केवळ । विस्मित होत्साता प्राञ्जळ । त्रैलोक्यपाळ हाचि गमे ॥ ३९ ॥ एवं विवरूनि अंतःकरणीं । म्हणे हा प्रत्यक्ष कोदंडपाणि । बोलता झाला नम्रवाणी । बद्धपाणि नतमूर्धा ॥ २४० ॥ पूर्ण परिचय भगवंतातें । दावूनि म्हणे तुज म्यां निरुतें । जाणितलें त्या संकेतातें । श्रीअनंतें परिसावें ॥ ४१ ॥

जाने त्वां सर्वभूतानां प्राण ओजः सहो बलम् । विष्णुं पुराणपुरुषं प्रभविष्णुमधीश्वरम् ॥ २६ ॥

दो श्लोकीं तें पूर्णकथन । द्वितीय श्लोकें ऐश्वर्य सगुण । उभयप्रकारें परिज्ञान । करूनि शरण स्वयें जाला ॥ ४२ ॥ तूतें जाणितलें म्यां स्वामी । सर्वभूतांचा अंतर्यामी । प्राणओजसहोबळनामीं । भूतग्रामीं वर्तसी तूं ॥ ४३ ॥ अहोरात्र धमनस्थिति । क्षुत्तृट्प्रवृत्ति निवृत्ति । मनादि सकळ करणांप्रति । आप्यायकता तद्द्वारा ॥ ४४ ॥ तिये शक्ती नाम प्राण । आणि ज्ञानकरणीं विषयाभिज्ञ । तिये शक्ती ओजाभिधान । जें हर्षवी मन ते सहशक्ति ॥ २४५ ॥ कर्मेन्द्रियांचें पाटव । जेणें टवटविती स्थूळावयव । शारीर पुष्टता जे कां सर्व । बळ हें नाम तियेलागीं ॥ ४६ ॥ एवं प्राण ओज सहोबळ । इत्यादि सर्व शक्तीचें जें मूळ । तो तूं परमात्माचि केवळ । म्यां हें अविकळ जाणितलें ॥ ४७ ॥ कैसें म्हणसी तरी तूं ऐक । विष्णु अखिलात्मा व्यापक । येर व्याप्य समस्त लोक । ब्रह्माण्डात्मक अभेदें ॥ ४८ ॥ ब्रह्माण्डाचें होणें जाणें । म्हणसी लाविलें मज कारणें । तरी तूं पुराण स्थूलें नवीनें । मिथ्यापणें पारुषलीं ॥ ४९ ॥ म्हणसी पुराणचि मी तत्त्वता । तैं मज कैंची कें व्यापकता । तरी तूं प्रकृतीहूनि परता । प्रकृतिनियंता पुरुषोत्तम ॥ २५० ॥ म्हणसी उत्तम पुरुषाप्रति । कैंवि गौण हे सृजनशक्ति । तरी प्रभविष्णु या पदव्युत्पत्ति । तूं सर्वशक्ति प्रभविता ॥ ५१ ॥ शक्तिचक्रातें अधिकरून । स्वसत्ताऐश्वर्यविराजमान । यालागीं अधीश्वर अभिधान । तुजलागून श्रुतिप्रणीत ॥ ५२ ॥ आतां पुराणत्वप्रतिपादना । हें तूं ऐकें जगज्जीवना । यथामति मम वल्गना । भो सर्वज्ञा प्रिय कीजे ॥ ५३ ॥

त्वं हि विश्वसृजां स्रष्टा सृज्यानामपि यच्च सत् । कालः कलयतामीशः पर आत्मा तथाऽऽत्मनाम् ।।२७।।

पुराण कैसा जरी तूं म्हणसी । तरी गुणक्षोभिणी प्रसवे गुणांसि । तेथूनि प्रवृत्ति गुणसर्गासी । तें आलें गुणांसी सृष्टत्व ।। ५४ ।। गुणांपासूनि गौण सृष्टि । ते गुण जन्मले प्रकृतीपोटीं । प्रकृति तव सत्ता अधिष्ठी । तें सृष्टत्व कोटि तव प्रसवीं ।। २५५ ।। एवं स्रष्ट्यांचा तूं आदिस्रष्टा । यालागीं पुराण तूं गा श्रीवैकुंठा । कर्तृकारणत्व ऐसिया निष्ठा । तुज हें श्रेष्ठा मान्य असे ।। ५६ ।। कर्तृकारणत्व तूतें हरि । प्रतिपादिलें ऐशिये परी । मा उपादान तुजबाहेरी । कें कोठवरी कोठूनी ।। ५७ ।। सृज्यांचेंही जें कां सत । तेंचि उपादान तूंचि निश्चित । जेंवि घटमठादि मृत्तिका हेत । समवायी तूं तन्न्यायें ।। ५८ ।। हेममृत्स्नादि दृष्टान्त । एकदेशी प्रबोधार्थ । वांचूनि तुझी अगोचर मात । ऐसा सिद्धान्त श्रुतींचा ।। ५९ ।। म्हणसी अनादि मी पुराण । तरी प्रभविष्णुत्व मज कैं गौण । यदर्थीं ऐकें निरूपण । प्रभो सर्वज्ञशिरोमणि ।। २६० ।। कालात्मका तूं आपण । कालक्षोभें प्रकटिसी गुण । यालागीं प्रभविष्णु अभिधान । तुजलागून निगमोक्त ।। ६१ ।। जेवीं प्रावृडागमनसमयीं । नभ वर्षतां प्रसवे मही । तेंवि तव सत्ता सर्वही । प्रभविष्णुत्वें प्रतिपाद्य ।। ६२ ।। कार्यकारणोपसंहारें । परब्रह्म जें पुराण उरे । कालात्मकत्वें पुढती स्फुरे । तें निडारे प्रभवनही ।। ६३ ।। म्हणसी धान्याचें वैरण । पेषणीभ्रमणें होय चूर्ण । तया कालचक्राचि समान । मजलागून अवगमिसी ।। ६४ ।। ऐसें न म्हणावें अनंता । तूं कालात्मा कलयता । कालशक्तीचा नियंता । ईश्वर तत्वता परात्पर जो ।। २६५ ।। ब्रह्म निराकार निर्गुण । म्हणसी आकाशापरी शून्य । तेथ कैंचें सत्तास्फुरण । तटस्थ जाण तेंवि नव्हे ।। ६६ ।। तूं तो परेश परात्पर । प्रकृतिनियंता ईश्वर । स्वसंकल्पें शक्तिचक्र- । चालक अगोचर गोगोप्ता ।। ६७ ।। न मोडतां अविकार पूर्णपण । सत्तायोगें आत्मसृजन । व्यष्टिसमष्टिरूपें भिन्न । वस्तुता अभिन्न परमात्मा ।। ६८ ।। आपणामाजी आत्मसृजन । चिच्छक्तीतें अधिष्ठून । चिद्विलास प्रकाशून । क्रीडसी पूर्ण आत्मत्वें ।। ६९ ।। मूळ प्रकृति अव्याकृत । हिरण्यगर्भ विराटांत । समष्टिकारण आत्मत्वांत । असंख्यात कार्यात्मे ।। २७० ।। कारण समष्टि प्रपंचापोटीं । कार्यप्रपंच असंख्य व्यष्टि । अनुप्रविष्ट तूं अभेददृष्टी । न होतां तुटी पूर्णत्वा ।।७१ ।। यालागीं आत्मयाहूनि पर । परमात्मा तूं अगोचर । म्यां जाणितलासि साकार । करुणाकर निज दासां ।। ७२ ।। यास्तव पूर्वोक्त एवंभूत । अगाधैश्वर्यपूर्णभरित । तो तूं माझें अभीष्ट दैवत । श्रीरघुनाथ हें जाणितलें ।। ७३ ।। तो तूं आत्मा ऐसी श्रुति । आत्मैक्यातें प्रतिपादिती । तैसीच जाम्बवताची मति । एकात्मभक्ती अनुसरली ।। ७४ ।। बलं बलवतां चाहं । ऐसा स्मृतिवाक्यांचा समूह । बळ प्राण ओज सह । जाणोनि रोह पूर्णत्वीं ।। २७५ ।। पूर्णचैतन्य परब्रह्म । तोचि तूं माझा आत्माराम । तयावेगळा पराक्रम । नाहीं मजसम ब्रह्माण्डीं ।। ७६ ।। तोचि हा दाशरथि रघुनाथ । हृदयीं स्मरोनि जाम्बवत । तत्कृत प्रताप परमाद्भुत । वर्णी परिचित तो ऐका ।। ७७ ।।

यस्येषदुत्कलितरोषकटाक्षमोक्षैर्वर्त्मादिशत्क्षुभितनक्रतिमिंगिलोऽब्धिः ।
सेतुः कृतः स्वयश उज्ज्वलिता च लंका रक्षःशिरांसि भुवि पेतुरिषुक्षतानि ।। २८ ।।

जानकीनिमित्तें सुरकैवारा । जात असतां लंकापुरा । मार्ग मागितला सागरा । न करी आदरा तो तेव्हां ।। ७८ ।। ईषन्मात्र क्रोधोर्मी । अवलंबितां हृदयपद्मीं । तद्युक्तकटाक्षसायकीं तिग्मीं । दाटला व्योमीं प्रलयाग्नि ।। ७९ ।। सक्रोधकटाक्षशरमोक्षणीं । सागर संक्षुब्ध केला क्षणीं । तप्ततैलासम जीवनीं । उसळे अग्नि खळखळा ।। २८० ।। तेणें पोळले नक्रादिग्राह । तिमिंगिलादि मत्स्यसमूह । उल्हाळतां प्रलयदाह । जलौकसांसी मांडला ।। ८१ ।। तेव्हां खळबळिला अर्णव । मग विप्रवेषें करूनि स्तव । प्रसन्न केला श्रीराघव । उपाय सर्व कथूनियां ।। ८२ ।। सक्रोधभ्रुकुटिकटाक्षपातें । मार्ग दिधला सरितानाथें । तथापि स्वयश प्रकट तेथें । भवाब्धिसेतु स्थापिला ।। ८३ ।। सेतु बांधोनि वानरकटकें । प्रतापें तारिलीं श्रीरघुनायकें । अद्यापि भवाब्धि सद्भाविकें । तद्दर्शनें तरताती ।। ८४ ।। ऐसें विस्तारूनियां यश । सुवेळे गेला अयोध्याधीश । लंका जाळूनि केली कपिश । अमरावतीस लाजविती ।। २८५ ।। ज्याचिया बाणांच्या तीव्रघायीं । दशग्रीवाचीं मस्तकें भोयीं । छेदोनि पाडिलीं लोळती पायीं । काकजंबुकगृध्रांच्या ।। ८६ ।। तोचि तूं येथें मजकारणें । प्रकट झालासि हें मी जाणें । जाकळोनियां स्वदासकरुणे । केलें येणें ये ठायीं ।। ८७ ।। नामनौकाआरोहणें । अद्यापि पामरीं भवाब्धि तरणें । हे कीर्ति वर्णिती श्रुतिपुराणें । त्या तुजकारणें वोळखिलें ।। ८८ ।। एवं पूर्वपरिज्ञान । झालें जाम्बवतालागून । तयाप्रति श्रीभगवान । बोले वचन तें ऐका ।। ८९ ।।

इति विज्ञातविज्ञानमृक्षराजानमच्युतः । व्याजहार महाराज भगवान्देवकीसुतः ।। २९ ।।

शुक म्हणे गा महाराजा । परीक्षिति पार्थ औरसात्मजा । ऋक्षें ओळखिलें गरुडध्वजा । कवणिये ओजा तें ऐक ।। २९० ।। एवं विज्ञातविज्ञान । या वाक्याचा अर्थ जाण । केवळ परब्रह्म जें निर्गुण । कर्मसाधनवाच्यत्वें ।। ९१ ।। अथवा कारणसाधनवाच्यशब्द । अन्वयें करणगोचर प्रसिद्ध । तस्माद्व्यतिरेकान्वयें सिद्ध । विश्व अभेद तूं विश्वात्मा ।। ९२ ।। कर्मसाधनवाचक शब्द । श्लोकद्वयें तत्प्रतिपाद्य । तृतीयश्लोकें सगुणशुद्ध । उपास्य अभेद इष्टद तूं ।। ९३ ।। एवं यथातथ्य विज्ञान । झालें तयाचें केलें कथन । ऐसियाप्रति श्रीभगवान । बोले वचन कारुण्यें ।। ९४ ।। भगवान् शब्दें कोण म्हणसी । जो वसुदेवदेवकीकुसीं । देवकीतनय म्हणती ज्यासी । स्वयें हृषीकेशी अयोनिज ।। २९५ ।। कारुण्याचें रूप काय । स्वभक्तकृपेनें द्रवलें हृदय । प्रकट केला पूर्ण स्नेह । तो अभिप्राय अवधारा ।। ९६ ।।

अभिमृश्यारविंदाक्षः पाणिना शंकरेण तम् । कृपया परया भक्तं प्रेमगंभीरया गिरा ।।३०।।

पंकजनयनें कृपादृष्टि । करूनि तयावरी अमृतवृष्टि । शंतमहस्तें तदंगयष्टि । पुष्टि संतुष्टि पावविली ।। ९७ ।। तेणें पटुपर झालीं गात्रें । भगवत्कृपाकटाक्षमात्रें । विशेष स्पर्शोनि सुखतमकरें । अभ्यंतरें तोषविला ।। ९८ ।। उत्कट कृपेनें उचंबळोनी । सप्रेम गंभीर सरळ वाणी । स्वभक्तातें चक्रपाणि बोले श्रवणीं तें ऐका ।। ९९ ।।

मणिहेतोरिह प्राप्ता वयमृक्षपते बिलम् । मिथ्याऽभिशापं प्रमृजन्नात्मनो मणिनाऽमुना ।।३१।।

श्रीकृष्ण म्हणे गा ऋक्षपाळा । आम्ही पातलों या तव बिळा । द्वारीं टाकूनि जनपदमेळा । माजी एकला मी आलों ।। ३०० ।। किमर्थ आलों म्हणसी जरी । तरी या मणीची माझिया शिरीं । सत्राजितें घातली चोरी । लोकोत्तरीं हा अभिशाप ।। १ ।। मिथ्याभिशापप्रक्षालना । करितां मणीची गवेषणा । प्राप्त झालों तुझिया स्थाना । मणिग्रहणा प्रवर्तलों ।। २ ।। आतां याचि मणीकरून । मिथ्याभिशापप्रक्षालन । करावयाचें मज कारण । इतुकें श्रीकृष्ण त्या वदला ।। ३ ।। ऐकोनि प्रभूचा अभिप्राय । ऋक्षपतीचें सप्रेम हृदय । अवज्ञेचा परमान्याय । क्षालनोपाय आदरिला ।। ४ ।। प्रभूची अवज्ञा घडली मज । अनन्यभक्तांमाजि हे लाज । तन्निरसनीं योजिलें काज । तेंचि सहज अवधारा ।।३०५।।

इत्युक्तः स्वां दुहितरं कन्यां जाम्बवतीं मुदा ।। अर्हणार्थं समणिना कृष्णायोपजहार ह ।। ३२ ।।

कृष्ण बोलिला इतुकें वाक्य । विवरूनि तयाचा सद्विवेक । केलें जाम्बवतें कौतुक । जगन्नायक-तोषार्थ ।। ६ ।। जाम्बवती स्वदुहितारत्न । कन्या अष्टवार्षिकी जाणोन । मणि देऊनियां आंदण । कृष्णार्पण ते केली ।। ७ ।। जो कां विधीचा अवतार । जाम्बवत ऋक्षेश्वर । तेणें शृंगारिलें मंदिर । सुहृद अपार मेळविले ।। ८ ।। म्हणाल श्वापदें वनौकसें । तयांसी उत्साह हें कायसें । तरी ते अवतारीं सुकृतवशें । देवांचि ऐसे किंपुरुष ।। ९ ।। जाम्बवती लावण्यखाणी । कृष्णकृपेच्या अवलोकनीं । कमनीय जाली कमळेहूनी । तेणें तरणी लाजविला ।।३१०।। किंपुरुषाच्या विधानसूत्रें । पाणिग्रहण कमळामित्रें । करूनि तोषविला सर्वत्रें । अद्भुत चरित्रें तीं ऐसीं ।। ११ ।। एकी करिती अक्षवाणें । एकी आस्वली हरिद्राउटणें । एकी लेवविती आभरणें । एकी वसनें नेसविती ।। १२ ।। नृत्यवाद्यादि गायनें । सुहृदीं अर्पिलीं उपायनें । दिव्य रत्नें मणिभूषणें । वोहराकारणें लेवविलीं ।। १३ ।। अमृतोपहार नैवेद्यासी । फळें अर्पिलीं विविधा रसीं । ज्यांच्या सेवनें शरीरासी । अमरा ऐसी दिव्य कळा ।। १४ ।। आंगीं जरेचें न शिवे वारें । आधि व्याधि न संचरे । बळ प्रज्ञा प्रताप स्फुरे । चापल्य समीरें समसाम्य ।।३१५।। धवळमंगळीं ऋक्षाङ्गना । वोहरा करिती निंबलोणा । सप्तस्वरीं सामगायना । आशीर्वचना समर्पिती ।।१६।। एवं कृष्णार्हणाप्रति । अर्पिली सरत्न जाम्बवती । सप्रेमभावें ऋक्षपति । किंकरवृत्ति राहिला ।। १७ ।। कृष्णचरणीं ठेवोनि माथा । स्निग्धवात्सल्यें निरवी दुहिता । राहवूनियां सुहृदआप्तां । जाता झाला बोळवित ।। १८ ।। सुषुप्तिसमान सध्वान्तविवरीं । विवाहसंभ्रम स्वप्नापरी । सांडूनि जागृतिवत् बाहेरी । आला श्रीहरि विश्वात्मा ।। १९ ।। स्वप्नानुभावाची जे ज्ञप्ति । तेंवि घेऊनि जाम्बवती । जागृतिसमान पूर्वप्रतीति । पाहे श्रीपति विश्वात्मा ।। ३२० ।। विवराबाहेरी योजनें चारी । स्वकन्येसहित कैटभारि । बोळवोनियां चरणांवरी । कमळापरी शिर ठेवी ।। २१ ।। नम्र मस्तकें करूनि स्तुति । चरण क्षाळिले अश्रुपातीं । म्हणे नेणती जाम्बवती । कृपामूर्ति पाळावी ।। २२ ।। तूं सर्वज्ञ सर्वगत । सर्वान्तरींचें तुजला विदित । मी केवळ रंक अनाथ । झालों सनाथ पदलाभें ।। २३ ।। इत्यादि ऐकोनियां स्तवन ।

कृपेनें द्रवला श्रीभगवान । शंतमहस्तें पुसिले नयन । हृदयीं कवळूनि आळंगिला ॥ २४ ॥ मस्तकीं ठेवोनियां हात । राहवोनियां जाम्बवत । वनितारत्नेंसीं भगवंत । द्वारके त्वरित निघाला ॥ ३२५ ॥ मुळीं नाहीं हें पाल्हाळ । ऐसें अतज्ज्ञ म्हणती बाळ । जाणती सर्वज्ञ शास्त्रकुशळ । जे केवळ सर्वद्रष्टे ॥ २६ ॥ पंचामृतभोजन केलें । षड्रस सूचिले याचि बोलें । लवणरामठादि नाहीं कथिले । कीं ते न आले त्यांमाजी ॥ २७ ॥ असो कायसा परिहार । श्रोते सर्वज्ञ जाणती चतुर । केवळ बालिश दुराग्रहपर । तदर्थ विस्तार तो व्यर्थ ॥ २८ ॥ इतुकें जाम्बवताख्यान । येरीकडील अनुसंधान । यावरी तेंही सावधान । श्रोतीं श्रवण करावें ॥ २९ ॥ कृष्ण रिघाला ऋक्षविवरीं । जनपद यादव ठेविले द्वारीं । घोर दुर्गमीं कान्तारीं । न येतां हरि सचिन्त ते ॥ ३३० ॥

अदृष्ट्वा निर्गमं शौरेः प्रविष्टस्य बिलं जनाः । प्रतीक्ष्य द्वादशाहानि दुःखिताः स्वपुरं ययुः ॥३३॥

देखोनि कृष्णाचा अनिर्गम । सर्वां सबाह्य दुस्तर श्रम । निर्जळ अटव्य परम भीम । बाधी निःसीम क्षुधा तृषा ॥ ३१ ॥ भगवंताचें अनागमन । तेणें सर्वांचें मन उद्विग्न । जावों न शकती उपेक्षून । दाळ्यें करून राहिले ॥ ३२ ॥ दाही दिशा अवलोकिती । कांहीं उपाय न चले म्हणती । सत्राजिताची हे दुर्मति । आम्हांभोंवतीं भाविन्नली ॥ ३३ ॥ प्राण गेला ऋक्षविवरीं । जिवें प्रेतें विवर-द्वारीं । ऐसें विलपती नानापरी । करिती अवसरी कृष्णाची ॥ ३४ ॥ क्षुधेतृषेचे सोसूनि क्लेश । तेथ राहिले बारा दिवस । मग कृष्णाची सोडूनि आस । द्वारकापुरास ते गेले ॥ ३३५ ॥ द्वारकेमाजी घातली हाक । विवरीं निमाला यदुनायक । ऐकोनि जनपद करिती शोक । तोही नावेक अवधारा ॥ ३६ ॥

निशम्य देवकी देवी रुक्मिण्यानकदुंदुभिः । सुहृदो ज्ञातयोऽशोचन्बिलात्कृष्णमनिर्गतम् ॥३४॥

ऐकोनि देवकी पडली धरणी । हृदय पिटी आक्रन्दोनी । कोठें उदेला स्यमंतकमणि । अघ-टित करणी दैवाची ॥ ३७ ॥ सत्राजित हा काळरूपी । याचया मिथ्याभिलाषजल्पीं । कृष्ण निष्क-लंक प्रतापी । परिहारकल्पीं निमाला ॥ ३८ ॥ विवरामाजी महाव्याळ । तिहीं डंखिला गोपाळ । किंवा राक्षस सिंह शार्दूळ । ऋक्ष कराळ तिहीं वधिला ॥ ३९ ॥ कृष्ण माझा अतिसकुमार । कृष्ण माझा अतिसुन्दर । कृष्ण माझा परम चतुर । कां पां विवर प्रवेशला ॥ ३४० ॥ श्रीकृष्णाचे आठवी गुण । ठाणमाण रूपलावण्य । शौर्य प्रताप संभाषण । मुखें स्मरोन विलपतसे ॥ ४१ ॥ ललाट पिटोनि दीर्घ रडे । रोहिणीप्रमुखा चहूंकडे । हा हा करोनि ओरडे । बोधूनि तोंडें सांवरिती ॥ ४२ ॥ म्हणती सहसा शोक न करीं । गर्गवचनोक्ति अवधारीं । त्रैलोक्यविजयी श्रीमुरारि । न मरे विवरीं कल्पान्तीं ॥ ४३ ॥ ऐसी देवकी शोकाकुळा । ऐकोनि धांवली भीमकबाळा । करतळीं पिटोनियां कपाळा । भूमंडळावरी पडली ॥ ४४ ॥ म्हणे सौभाग्य झालें शून्य । कैसें चुडियां पडलें खाणे ।

हृदयमांदुसींचें रत्न । विवरीं पडोन हारपलें ॥ ३४५ ॥ माझिये मनःसंकल्पभुवनीं । आनंदद्रुमाची लावणी । तेथ दुरदृष्टाच्या पवनीं । सत्राजिताग्नि पेटला ॥ ४६ ॥ गडबडां लोळे धरणीवरी । धांवोनि रेवती तियेतें धरी । म्हणे वैदर्भिये शोक न करीं । अक्षत विवरीं तव भर्ता ॥ ४७ ॥ तुजला अंबेचें वरदान । शोक न करीं तें स्मरोन । त्रैलोक्यविजयी श्रीभगवान । तयालागून भय कैंचें ॥ ४८ ॥ वसुदेव हाणोनि हंबरडा । लोळे धरणीवरी गडबडा । म्हणे सत्राजित हा कुडा । घातला दरवडा मजवरी ॥ ४९ ॥ उघडोनि माझी हृदयपेटी । नेला इंद्रनीळजगजेठी । विलाप करूनि ललाट पिटी । पडे भूपृष्ठीं विसंज्ञ ॥ ३५० ॥ देवकप्रमुख उग्रसेन । वसुदेवा धरिती सांवरून । म्हणती अक्षत तव नंदन । पाहें विवरोन गगनोक्ति ॥ ५१ ॥ गरळा वमिती शतशः मुखें । परि त्या कालिय आकळूं न शके । बाळपणीं त्या गिळितां बकें । तें तो मुके निजप्राणा ॥ ५२ ॥ तया कृष्णासी विवरीं मरण । ऐसें बोलणें अबद्ध जाण । कृष्णाआधीं आमुचे प्राण । जाती निर्याण त्या होतां ॥ ५३ ॥ धैर्य देऊनि इत्यादि वचनीं । सावध वसुदेवा करूनी । म्हणती अक्षत चक्रपाणि । हा निश्चय मनीं असों दे ॥ ५४ ॥ वसुदेव म्हणे माझिये जन्मीं । आनकदुंदुभि वाजविल्या व्योमीं । कीं जें पूर्णब्रह्म तुझिये सद्मीं । निर्जरकामी प्रकटेल ॥ ३५५ ॥ तो सुरसंकल्प वृथा झाला । विवरीं श्रीकृष्ण निमाला । आतां संकर्षण एकला । जोडा विघडला बंधूंचा ॥ ५६ ॥ पृथ्वी उलथूं शके जो हळें । तो संकर्षण तिये वेळे । जाणोनि कृष्णाचे अगाध लीळे । कांहीं न बोले अज्ञवत् ॥ ५७ ॥ जनपद करिती अहाकटा । भीमकीपुत्रहानीच्या कष्टा । वसुदेवदेवकीचिया अदृष्टा । सुतशोकवांटा आलासे ॥ ५८ ॥ हातींचें हारविलें पुत्ररत्न । आतां यासी कैंचें मरण । पुत्रशोकाचें भाजन । होवोनि राहती चिरकाल ॥ ५९ ॥ सोयरे गोत्रज आप्त स्वजन । द्वारकावासी थोर लहान । देवकीवसुदेव रुक्मिणी दीन । यांतें वेष्टून विलपती ॥ ३६० ॥ विळापासूनियां मागुतें । न येतां जाणूनि श्रीकृष्णातें । शोक जाकळी समस्तांतें । सत्राजितातें शापिती ॥ ६१ ॥

सत्राजितं शपंतस्ते दुःखिता द्वारकौकसः । उपतस्थुर्महामायां दुर्गां कृष्णोपलब्धये ॥ ३५ ॥

लहानें थोरें द्वारकापुरीं । जाऊनि सत्राजिताचे घरीं । धिक्कारिती नानापरी । म्हणती मुरारि वधिला त्वां ॥ ६२ ॥ त्वां स्यमंतकमणीचा आळ । घालोनि नोकिला द्वारकापाळ । कलंक न साहे तो अमळ । क्षालना तत्काळ प्रवर्तला ॥ ६३ ॥ मणि हुडकितां परम गहनीं । विवरीं झाली प्राणहानि । एवढें अपयश तुझिये मूर्ध्नि । इत्यादि वचनीं धिक्कारिती ॥ ६४ ॥ तंव उद्धवाक्रूरप्रमुख । वृद्ध यादव श्वफल्कादिक । म्हणती करा हो दीर्घ विवेक । वृथा शोक कां करितां ॥ ३६५ ॥ कृष्णोपलब्धीकारणें । कांहीं करा अनुष्ठानें । इष्टदेवताआराधनें । आर्यवचनें विवरोनी ॥ ६६ ॥ ऐकोनि यदुवृद्धांचें वचन । बोलाविले श्रेष्ठ ब्राह्मण । त्यांसी पुसती विधिविधान । कृष्णागमनप्राप्त्यर्थ ॥ ६७ ॥ तिहीं चंदला परमेश्वरी । चंद्रभागा या नामोच्चारीं । दुर्गा दुर्गमसंकटहारी । उपदेशिलीं सविधानें ॥ ६८ ॥ देवकी वसुदेव रुक्मिणी । आदिकरूनि समस्त जनीं । अर्चनीं स्तवनीं अभिवंदनीं । दुर्गा भवानी तोषविली ॥ ६९ ॥

तेषां तु देव्युपस्थानात्प्रत्यादिष्टाऽऽशिषा स च । प्रादुर्बभूव सिद्धार्थः सदारो हर्षयन्हरिः ॥ ३६ ॥

दशांशहवनोत्तरतर्पणें । मार्जनें आणि संतर्पणें । अंबा तुष्टली प्रसन्न वदनें । दिल्हीं वरदानें हरिप्राप्ती ॥ ३७० ॥ अंबेचिया आशीर्वचनीं । कृष्णागमन तेचि दिनीं । धन्य म्हणती श्रीभवानी । आम्हां निर्वाणीं पावली ॥ ७१ ॥ जाम्बवतीतें देखोनी । म्हणती प्रत्यक्ष श्रीभवानी । आली कृष्णातें घेऊनी । आमुच्या स्तवनीं प्रकटली ॥ ७२ ॥ जिहीं प्रसन्न केली अंबा । तया समस्त जनकदंबा । आश्चर्य झालें पद्मनाभा । सहित वल्लभा देखोनी ॥ ७३ ॥ सलिलाब्धिभवललामललना । अपर इंदिरा इंदुवंदना । जाम्बवती ते दिव्याङ्गना । मधुसूदनासमवेत ॥ ७४ ॥ प्रकट झाली अकस्मात । देखोनि द्वारकाजन समस्त । प्रसन्नवदनें उदो म्हणत । सिद्धी मनोरथ पावले ॥ ३७५ ॥ दुर्गा तुष्टली आम्हावरी । दुर्गमीं रक्षूनि आणिला हरि । प्रसादा वोपिली दिव्य नारी । ते हे सुंदरी हरिरमणी ॥ ७६ ॥ सकळ स्वजनां प्रोत्साहित । निजागमनें आनंदावित । 'सिद्धी पाववोनि त्यांचे अर्थ । सदार भगवंत प्रकटला ॥ ७७ ॥ पद्ममुकुळें जेंवि समस्तें । सूर्योदयीं प्रफुल्लितें । तेंवि द्वारकाजनांचीं चित्तें । झालीं विकासितें हरिउदयीं ॥ ७८ ॥

उपलभ्य हृषीकेशं मृतं पुनरिवाऽऽगतम् । सह पत्न्या मणिग्रीवं सर्वे जातमहोत्सवा. ॥ ३७ ॥

मेलें परते स्वर्गींहून । तैसे कृष्णागमनें जन । परमानंदें झाले पूर्ण । दंपती देखोनि निवाले ॥७९॥ कंठदेशीं स्यमंतकमणि । जाम्बवती लावण्यखाणी । एवं देखोनि चक्रपाणि । द्वारकाभुवनीं उत्साह ॥ ३८० ॥ एक वांटिती शर्करा । एक हाकारिती द्विजवरां । कृष्णप्राप्तीउत्साहगजरा । माजी देकारा करिताती ॥ ८१ ॥ नवशिल्या वांटिती शेराणिया । उपोषणी ते पारणिया । एक जाऊनि हरिहरालया । महासपर्या करिताती ॥ ८२ ॥ कृष्णागमनोत्साहघोषें । द्वारकावासी जन संतोषे । वसुदेवदेवकीप्रमुख हर्षें । अभ्युदयिकें संपादिती ॥ ८३ ॥ गोभूतिलघृतहिरण्यदानें । लवण धान्यें वसनाभरणें । देती ब्राह्मणांकारणें । गृहशान्त्यर्थें गृहोचितें ॥ ८४ ॥ जाम्बवतीचा गृहप्रवेश । करूनि लक्ष्मीपूजनास । रेवती रुक्मिणी भाणवस । परमोल्हासें निरोविती ॥ ३८५ ॥ द्वारकाभुवनीं नारीनर । वोहरें पाहती अतिसादर । समारंभेंसीं अहेर । वाद्यगजरें समर्पिती ॥ ८६ ॥ सुहृदीं आप्तीं स्नेहाळ स्वजनीं । ओहरें नेवोनि आत्मसदनीं । मंगलस्नानदिव्यभोजनीं । वसनाभरणीं गौरविती ॥ ८७ ॥ ऐसा आनंद घरोघरीं । कृष्णागमनें द्वारकापुरीं । पौलोमी पर्णोनि पर्वतारि । जेंवि शोभे सुरवरीं त्रिविष्टपीं ॥ ८८ ॥ यानंतरें एके दिवसीं । उग्रसेनभूपतीपासीं । यादवें सहित हृषीकेशी । सुधर्मासदसीं उपविष्ट ॥ ८९ ॥ वृत्तान्त राजया करूनि विदित । मिथ्याभिशापक्षालनार्थ । पाचारिजे सत्राजित । म्हणतां दूत पाठविले ॥३९०॥

सत्राजितं समाहूय सभायां राजसन्निधौ । प्राप्तिं चाख्याय भगवान्मणिं तस्मै न्यवेदयत् ॥ ३८ ॥

नृपासन्निध सभास्थानीं । सत्राजितातें पाचारूनी । यादवांसहित चक्रपाणि । अभ्युत्थानीं सम्मानी ॥ ९१ ॥ सभे बैसला सत्राजित । प्रसंगें मणीची काढिली मात । जनपदवदनें पूर्वींच विदित ।

विवरापर्यंत गवेषणा ॥ ९२ ॥ विवरीं प्रवेशल्यानंतरें । वर्तले कथेचीं उत्तरें । स्वमुखें कथिलीं रुक्मिणीवरें । संपूर्ण नगरें परिसावया ॥ ९३ ॥ स्यमंतकमणीचें दर्शन । जाम्बवतासीं बाहुकदन । जाम्बवतीचें पाणिग्रहण । पुनरागमन मणिसहित ॥ ९४ ॥ आम्हीं प्रसेन वधिला नसतां । मिथ्यापवाद माझिया माथां । सर्वां विदित वर्तली कथा । निर्दोष आतां कीं नाहों ॥ ३९५ ॥ सत्राजिताकारणें मणि । देता झाला चक्रपाणि । कलंक निरसला येथोनी । झाला मूर्ध्नि उजळता ॥ ९६ ॥ सत्राजितें तियें वचनें । सभेमाजी ऐकतां श्रवणें । लज्जा पावला अंतःकरणें । तीं सर्वज्ञें परिसावीं ॥ ९७ ॥

स चातिव्रीडितो रत्न गृहीत्वाऽवाङ्मुखस्ततः । अनुतप्यमानो भवनमगमत्स्वेन पाप्मना ॥ ३९ ॥

आपुलें कृतापराधपाप । तेणें पावला अनुताप । महत्त्वाचा झाला लोप । सलज्ज सकंप सभास्थानीं ॥ ९८ ॥ सत्राजित जैं लाधला मणि । तैं तेजस्वी सूर्याहूनी । तोही लज्जित रत्नग्रहणीं । अधोवदनीं गृहा गेला ॥ ९९ ॥ मणि घेऊनि सत्राजित । अधोवदनें लज्जान्वित । कृतापराधें परमतप्त । उठिला त्वरित न बोलतां ॥ ४०० ॥ तेणें जाऊनि आपुले घरीं । काय विवरिलें अभ्यंतरीं । तें तूं कुरुवर्या अवधारीं । शुकवैखरी वाखाणी ॥ १ ॥

सोऽनुध्यायंस्तदेवाघं बलवद्विग्रहाकुलः । कथं मृजाम्यात्मरजः प्रसीदेद्वाऽच्युतः कथम् ॥ ४० ॥

तेणें जाऊनि निजमंदिरीं । एकान्तसदनीं विचार करी । प्रसेनवियोगदुःखलहरी । हृदयसागरीं हेलावे ॥ २ ॥ म्हणे प्रसेनाऐसा बन्धु । परमस्नेहाळ विवेकसिंधु । गेला आणि मज हा बाधु । लोकापवादु स्पर्शला ॥ ३ ॥ आतां कवणेंसीं विचार करूं । केंवि हा दोषाब्धि निस्तरूं । लोकापवाद झाला थोरू । पडलें वैर बळिष्ठेंसीं ॥ ४ ॥ कोणा उपायें याचें शमन । पुन्हा साधुत्वें वदती जन । निर्वैर होवोनि जनार्दन । निजकारुण्यें संगोपी ॥ ४०५ ॥ ऐसें अपराधजनित पाप । स्मरोनि विवरी बहु संकल्प । तत्परिहरणार्थ अनुताप । विचार अल्प उमजेना ॥ ६ ॥ क्षणक्षणा विकळ पडे । प्रसेन स्मरोनि दीर्घ रडे । एकान्तसदनाचीं कवाडें । लावूनि ओरडे एकाकी ॥ ७ ॥ तिये समयीं पतिव्रता । सुभगा साध्वी सुशील वनिता । अनन्यभावें अनुकूल कान्ता । ते एकांता प्रवर्तली ॥ ८ ॥ सत्राजितातें सावधान । करूनि म्हणे काय हें रुदन । प्रसेन पावला निर्वाण । तो परतोन केंवि भेटे ॥ ९ ॥ आतां स्वस्थ मानस कीजे । हृद्गत मजसीं अनुवादिजे । मजयोग्य असो नसो तें वदिजे । शंका न धरिजे यदर्थीं ॥ ४१० ॥ हें ऐकोनि सत्राजित । पतिव्रतेसी बोले मात । श्रोतां होवोनि दत्तचित्त । तो वृत्तान्त परिसावा ॥ ११ ॥

किं कृत्वा साधु मह्यं स्यान्न शपेद्वा जनो यथा ।। अदीर्घदर्शनं क्षुद्रं मूढं द्रविणलोलुपम् ।। ४१ ।।

म्हणे सुशीले शुभानने । हृद्गत जाणसी सर्वाभिज्ञे । मम माथांचीं दुर्लौच्छनें । उपायें कोणें निवारती ।। १२ ।। कोणतें कर्म केलें असतां । कृपा उपजेल कृष्णनाथा । जनपद दोष न ठेवी माथां । मज देखतां न नोकिती ।। १३ ।। माझें देखोनियां वदन । अदीर्घद्रष्टा न म्हणती जन । बुद्धिमंद विचारहीन । पामर कृपण मूर्ख ऐसें ।। १४ ।। इतुके दोष माझ्या ठायीं । जनीं प्रकटचि दिसती पाहीं । मणिसंग्रहें परमान्यायी । धनलोलुप जन म्हणती ।। ४१५ ।। इतुक्या दोषांच्या निरसना । एक विचार स्फुरला मना । जरी मी निस्तरें येणें व्यसना । तरी मज आज्ञा देईं पां ।। १६ ।। मग तो विचार कान्तेपासीं । निर्धारूनि निजमानसीं । सांगता झाला तें नृपासी । सांगे महर्षि शुक योगी ।। १७ ।।

दास्ये दुहितरं तस्मै स्त्रीरत्न रत्नमेव च ।। उपायोऽयं समीचीनस्तस्य शान्तिर्न चान्यथा ।। ४२ ।।

जेंवि जाम्बवतें आपण । कन्यादानीं मणि आंदण । देऊनि केलें समाधान । तैसेंचि लांछन निरसावें ।। १८ ।। आपुली कन्या सत्यभामा । उपवर सुन्दर सद्गुणसीमा । हे आर्पूनि मेघःश्यामा दोषकाळिमा क्षाळावी ।। १९ ।। सत्यभामेच्या पाणिग्रहणीं । आंदणा दीजे स्यमंतकमणि । धनलोभी हे सदोष वाणी । येथोनि कोणी न बोलती ।। ४२० ।। सत्राजितें या विवेकोत्तरीं । पुशिली असतां निज अंतुरी । बोलली तें परिसिजे चतुरीं । शुकवैखरी श्लोकार्थें ।। २१ ।। कामिनी म्हणे उत्तमोत्तम । समीचीन हा उपाय परम । तया दोषाचें लांछनतम । याविण शम हो न शके ।। २२ ।। यावीण आन उपायकोटि । करितां कृतागसत्वकुटी । न वचे बैसली जे ललाटीं । यावत् धरटी रवि-चंद्रां ।। २३ ।। यालागीं हाचि उपाय सार । सौभाग्यनाथा कीजे सधर । हे ऐकोनियां सुविचार । झाला तत्पर सत्राजित ।। २४ ।।

एवं व्यवसितो बुद्ध्या सत्राजित्स्वसुतां शुभाम् । मणिं च स्वयमुद्यम्य कृष्णायोपजहार ह ।। ४३ ।।

कोणासी मध्यस्थ करूनियां । वृत्तान्त कथिजे यादवराया । विवरितां ऐशिया उपाया । तव प्रसंगें समया अनुसरला ।। ४२५ ।। म्हणाल प्रसंग कैसा कवण । तरी शंबरासुरातें मारून । रतिसहित द्वारकाभुवन । जेव्हां प्रद्युम्न प्रवेशला ।। २६ ।। द्वारकावासी लहानथोर । प्रवेशले तैं हरिमंदिर । तयाचित्राजी कृतविचार । सत्राजितही स्वयें आला ।। २७ ।। प्रद्युम्नागमनोत्साहो । सर्वत्र द्वारकावासियां स्नेहो । तयाचि प्रसंगामाजि लाहो । सत्राजितेंही साधियला ।। २८ ।। नमूनि उग्रसेना राजया । वसुदेवप्रमुखां भगवत्प्रिया । देवकीजनका देवकराया- । पासीं वृत्तान्त निवेदिला ।। २९ ।। करीं धरूनि एकान्तासी । नेऊनि सांगे देवकापासीं । म्हणे माझिये निजमानसीं । गोष्टी ऐसी आवडतसे ।। ४३० ।। सत्यभामा हे माझी दुहिता । उपवर सुन्दर सद्गुणभरिता । दैव-

विधानें कृष्णनाथा । पाणिग्रहणीं अर्पावी ॥ ३१ ॥ विवरूनि नृपेंसीं हे मात । प्रार्थूनि वसुदेव कृष्णनाथ । हीन दीन मी अनाथ । कीजे सनाथ कृपेनें ॥ ३२ ॥ देवकें रायासी कथिली मात । तेणें वसुदेव कृष्णनाथ । पाचारूनि हा वृत्तान्त । सत्राजितोक्त त्यां कथिला ॥ ३३ ॥ कृतागसत्वें व्रीडावान । आपुला सुहृद् अनन्य शरण । त्यासी कृपेनें सनाथ करून । कन्यारत्न स्वीकीजे ॥ ३४ ॥ येऊनि स्वमुखें करुणा भाकी । याहूनि कोण ते कीर्ति लोकीं । स्नेहगौरवें विश्वासमुखीं । सुहृद कौतुकें रंजविजे ॥ ४३५ ॥ हेंचि श्रेष्ठत्वा भूषण । सुहृद आप्त हीन दीन । कृतागसही झालिया शरण । आपणासमान त्या कीजे ॥ ३६ ॥ ऐसें उग्रसेन भूपति । स्वमुखें बोधी धर्मनीति । सादर परिसोनि रुक्मिणीपति । ऐकिलें म्हणती जनकातें ॥ ३७ ॥ वसुदेव आणि संकर्षण । म्हणती नृपाज्ञा कीजे मान्य । सोयरा सत्राजित प्राचीन । दुहिता प्रार्थून अर्पित ॥ ३८ ॥ ऐसें विवरूनि नृपानिकटीं । सत्राजिताची मानिली गोठी । मग ब्राह्मविवाहपरिपाटीं । केली राहाटी लग्नाची ॥ ३९ ॥ ऐसा निश्चय स्वबुद्धीकरून । सत्राजितें दुहितारत्न । कृष्णाकारणें कन्यादान । विधिविधानें समर्पिलें ॥ ४४० ॥ विधिविधान सविस्तर । कथितां वाढेल ग्रंथ फार । यालागीं शुकोक्तश्लोकानुसार । चमत्कार हा कथिल ॥ ४१ ॥ सत्यभामेच्या पाणिग्रहणीं । आंदण दिधला स्यमंतकमणि । एवं सुभगा लावण्यखाणी । चक्रपाणिप्रिय झाली ॥ ४२ ॥ ऐसा सत्राजितें विवेक । रचूनि केली सोयरिक । लोकापवादाचा कलंक । क्षाळूनि शशाङ्कसम झाला ॥ ४३ ॥ स्वमुखें करूनियां प्रार्थन । सहितमणीसीं कन्यादान । देऊनि परिमार्जी लांछन । तथापि विघ्न उरलेंसे ॥ ४४ ॥ यालागीं ऐश्वर्यपदींचा अर्थ । तो इतरांसी महदनर्थ । तदर्थ प्राकृत धरिती स्वार्थ । त्यांतें व्यर्थ श्रम ऐसे ॥ ४४५ ॥ सर्वज्ञ पूर्वींच हें जाणती । म्हणोनि न होती विषयस्वार्थी । कन्यकास्यमंतकांची प्राप्ति । होतां श्रीपति अक्षुब्ध ॥४६॥ कन्यारत्न स्यमंतकरत्न । दोन्ही जोडतांही श्रीकृष्ण । तयांमाजी अंगीकरण । करी न करी तें ऐका ॥ ४७ ॥

तां सत्यभामां भगवानुपयेमे यथाविधि । बहुभिर्याचितां शीलरूपौदार्यगुणान्विताम् ॥ ४४ ॥

ललनाललाम सत्यभामा । लावण्यें ठेंगणी गणितां रमा । सुशीळ स्वभावाची सीमा । जे अपरप्रतिमा शैब्येची ॥ ४८ ॥ जामघवनिता शैब्या सती । जीची आज्ञा नुलंघी पति । तैसीच सत्यभामेची ख्याति । वक्ष्यमाण ग्रंथीं कथिजेल ॥ ४९ ॥ औदार्यादि समस्त गुणीं । मंडित जाणोनि बहुतां जनीं । करूं याचिली निजात्मरमणी । बहुतां प्रयत्नीं बहुतेकीं ॥४५०॥ कृतवर्मादि यादव थोर । भूभुज भूमंडळींचे अपार । सत्राजितातें याच्नापर । होवोनि सादर उपार्जिती ॥ ५१ ॥ बहुतांमाजी शतधन्व्यातें । कांहीं अनुसर सत्राजितें । भाविला होता आपुल्या चित्तें । तोही येथें उपेक्षिला ॥ ५२ ॥ क्षाळावया आपुला दोष । कन्या देऊनि जोडिलें यश । हें जाणोनि पुराणपुरुष । पाणिग्रहणास प्रवर्तला ॥ ५३ ॥ तिये सत्यभामेतें हरि । षड्गुणैश्वर्यें सर्वोपचारीं । वेदविधानें मंत्रोच्चारीं । गृहिणीं करीं करग्रहणीं ॥ ५४ ॥ परंतु स्यमंतकाचे विषयीं । काय बोलिला शेषशायी । तें परिसावें श्रोतयांही । विवेक हृदयीं वसावया ॥ ४५५ ॥

भगवानाह न मणिं प्रतीच्छामो वयं नृप। तवाऽऽस्तां देवभक्तस्य वयं तु फलभागिनः ॥ ४५ ॥

अर्थस्वार्थें महदनर्थ । हाचि मुख्यत्वें परमार्थ । षड्गुणैश्वर्यें समर्थ । बोले यथार्थ तें ऐका ॥५६॥ कुरुकंजाकरप्रबोधका । पयःपानीयप्रमेयविवेका । श्रवणचंचूकृतमराळतिलका । श्रोतृनायका परीक्षिति ॥ ५७ ॥ तये समयीं श्रीभगवान ॥ सत्राजिताप्रति बोले वचन । स्यमंतक हा मणि आंदण । आम्हां-लागून न पाहिजे ॥ ५८ ॥ कां पां न पाहिजे म्हणसी । तरी ऐकावें इयेविषीं । देवप्रसाद हा ज्याचा त्यासी । इतरा प्रयासीं न रक्षवे ॥ ५९ ॥ तुम्ही सूर्यभक्त अनन्य । जाणोनि रवि झाला प्रसन्न । तेणें प्रसादा स्यमंतकरत्न । दिधलें पूर्ण कृपेनें ॥ ४६० ॥ तें साफल्यें तुम्हांचि पासीं । सुप्रसन्न ऐश्वर्येंसीं । शोभायमान सद्गुणराशि । क्षोभें इतरांसी विघ्नकर ॥ ६१ ॥ पूर्वीं जमदग्नीच्या करीं । प्रसादा सुरसुरभि निर्जरीं । दिधली असतां बलात्कारीं । कार्तवीर्यें अपहरितां ॥ ६२ ॥ सुरभि गेली अमरसदना । कार्तवीर्य मुकला प्राणा । हैहयाच्या वंशवना । भार्गवानळें जाळियलें ॥ ६३ ॥ तयाचि वणवयामाझारीं । झाली निःक्षत्र धरित्री । देवताप्रसाद ऐशियापरी । न शोभे इतरीं अपहरितां ॥ ६४ ॥ ऐशिया अनेक उपपत्ति । पुराणान्तरीं बोलिल्या असती । तथापि प्राणी लंपट होती । ते वरपडती विघ्नातें ॥ ४६५ ॥ यालागीं तुमचा तुम्हांचि पासीं । देवताप्रसाद देवभक्तांसी । असो याचिया फळभोगासी । आम्ही अधिकारी सर्वस्वें ॥ ६६ ॥ जंववरी पक्कता पावे फळ । तंववरी राहिल्या निश्चळ । फळभोगाचा आलिया काळ । भोक्ते केवळ फळभागी ॥ ६७ ॥ सत्राजितासी ऐसिया वचनीं । वर्जिलें देतां स्यमंतकमणि । यामाजी गूढार्थ चक्रपाणि । वदला कोणी नुमजती तो ॥ ६८ ॥ फळभागी या वाक्यावरी । सत्राजितें अभ्यंतरीं । मानिलें स्यमंतक माझिये घरीं । सुवर्णभारीं वर्षेल ॥ ६९ ॥ तया सुवर्णभाग्यालागीं । दुहिता जामातृविभागीं । एवं उपचारप्रसंगीं । आम्ही फळभोगीं अधिकारी ॥ ४७० ॥ म्हणाल गूढार्थ तो काय । श्रीकृष्णाचा अभिप्राय । पुत्राभावीं कन्याचि होय । पितृवैभवा अधिकारी ॥ ७१ ॥ किमर्थ आंदण मणिच मात्र । सत्राजितासी नाहींच पुत्र । याचे निधनीं धन सर्वत्र । समणि दौहित्र लाहती ॥ ७२ ॥ ऐसा गूढार्थ बोलिला हरि । संतुष्ट सत्राजित अंतरीं । एवं अर्थानर्थकारी । तो या प्रकारीं निरूपिला ॥ ७३ ॥ पुढें स्यमंतकाचि कारणें । सत्राजित जाईल प्राणें । प्रसंगें तेंही श्रवण करणें । सत्तावन्नावे अध्यायीं ॥ ७४ ॥ इतुकी कथा कुरुभूषणा । श्रवणीं घालूनि योगिराणा । पुढील कथेच्या निरूपणा । म्हणे अवधाना दे राया ॥ ४७५ ॥ इति श्रीमद्भागवतीं । सूत निरूपी शौनकाप्रति । अठरा सहस्र संख्या गणती । पारमहंसी संहिता जे ॥ ७६ ॥ त्यामाजील दशमस्कंध । छप्पन्नावा अध्याय विशद । श्रीशुकपरीक्षितिसंवाद । मिथ्यापवादपरिहरण ॥ ७७ ॥ मृगयाव्याजें प्रसेनमरण । स्यमंतकाचें गवेषण । जाम्बवतीचें पाणिग्रहण । भामालग्न निरूपिलें ॥ ७८ ॥ पुढिले अध्यायामाझारीं । सत्राजिता शतधनु मारी । त्यातें मारूनियां श्रीहरि । दुःख परिहरी भामेचें ॥ ७९ ॥ तिये कथेचिया श्रवणीं । श्रोतयांलागीं आमंत्रणीं । श्रवणमात्रें दुर्यशोहानि । यशः श्री वरूनि हरि भजिजे ॥ ४८० ॥ प्रतिष्ठान-भद्रासनीं । श्रीएकनाथ साम्राज्यदानीं । चिदानंदें निर्जरश्रेणी । स्वानंदभुवनीं वोळंगती ॥ ८१ ॥

तेथ गोविन्द गोव्याख्याता । तेणें पद्मकर ठेवूनि माथां । भाषाव्याख्यानीं केला सरता । वरदकृपेनें दयार्णव ॥ ८२ ॥ तें हें हरिवरदव्याख्यान । सद्भावें जे करिती श्रवण । त्यांचे मनोरथ होती पूर्ण । कैवल्यसदन हरि ओपी ॥ ४८३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कन्धे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां स्यमंतकाख्याने जाम्बवती-सत्यभामाविवाहकथनं नाम षट्पंचाशत्तमोऽध्यायः ॥

॥ श्लोक ॥ ४५ ॥ ओवीसंख्या ॥ ४८३ ॥ एवं संख्या ॥ ५२८ ॥
(छप्पन्नावा अध्याय मिळून ओवीसंख्या २६९९७)

अध्याय छप्पन्नावा समाप्त

कृष्णदयार्णवकृत

# ह रि व र दा

## अध्याय ५७ वा

श्रीकृष्णपरमात्मने नमः । परमपावना पुराणपुरुषा । श्रीगोविंदा जगदधीशा । परिसावया कृतादेशा । श्रोतृमानसा वसवावें ॥ १ ॥ सत्यभामा परणिल्यावरी । सत्तावन्नाव्यामाझारी । काय करिता जाला हरि । हे नृपा अवसरी पुसावया ॥ २ ॥ तें जाणोनि नृपान्तर । वसिष्ठाचा प्रणप्तार । निरूपील तो इत्यर्थसार । श्रोते चतुर परिसोत ॥ ३ ॥ सत्यभामेचें पाणिग्रहण । जालें देखोनि शतधन्वान । सत्राजिताचा घेईल प्राण । मग त्या कृष्ण मारील ॥ ४ ॥ तेथ न लभतां स्यमंतकमणि । विकल्प मानील मुसलपाणि । अक्रूरें अर्पितां सभास्थानीं । बुझावणी तें होईल ॥ ५ ॥ ये अध्यायीं इतुकी कथा । परिसावयाची नृपातें आस्था । जाणोनि बादरायणि वक्ता । निरूपी तत्त्वता तें ऐका ॥ ६ ॥

श्रीशुक उवाच–विज्ञातार्थोऽपि गोविंदो दग्धानाकर्ण्य पांडवान् । कुंतीं च कुल्यकरणे सहरामो ययौ कुरून् ॥१॥

शकुनिमंत्रें दुर्योधन । लाक्षागारीं पाण्डवनिधन । करितां विवरीं प्रवेशोन । गेले म्हणोन हरि जाणे ॥ ७ ॥ ऐसा विज्ञातार्थही हरि । तथापि मनुष्यनाट्यानुकारी । प्रवर्तला वृद्धाचारीं । सर्वान्तरी सर्वग जो ॥ ८ ॥ कुन्तीसहित पाण्डवांतें । लाक्षागारीं जाळिलियांतें । परिसोनियां श्रीकृष्णनाथें । परम दुःखातें मानिलें ॥ ९ ॥ वसुदेवप्रमुख सभास्थानीं । परम शोकें रसरसूनी । वृद्धकुळाचाराचरणीं । रामकृष्ण पाठविले ॥ १० ॥ रत्नखचित रुक्मरथ । सुपर्णतालध्वजमंडित । सायुध सानुगपरिवेष्टित । कुरुविषयांतें पातले ॥ ११ ॥ यथाकुळोचित वृद्धाचारें । आप्त कौरव निजसोयरे । सांभाळावया स्नेहादरें । परम ओरसें ते गेले ॥ १२ ॥ जाऊनियां हस्तिनापुरा । वृत्तान्त जाणविला नृपवरा । कौरवीं

सन्मानें मंदिरा । नेऊनि परिवारा राहविलें ॥ १३ ॥ सभास्थानीं दुर्योधन । शकुनि कर्ण दुःशासन । अपर गान्धारीनंदन । पुढें येऊन भेटले ॥ १४ ॥ दावूनियां मृषा शोक । विलाप करिती अधोमुख । अंतरवेत्ता यदुनायक । यथालौकिक संबोखी ॥ १५ ॥ तेथूनि उठिलियानंतरें । ज्यांचीं निष्कपटें अंतरें । त्यांप्रति जाऊनियां स्नेहभरें । भेटिजे यदुवीरें तें ऐका ॥ १६ ॥

भीष्मं कृपं सविदुरं गांधारीं द्रोणमेव च । तुल्यदुःखौ च संगम्य हा कृष्णमिति होचतुः ॥ २ ॥

पाण्डवांचिया दुःखेंकरून । भीष्में वर्जिलें सभास्थान । कृपाचार्यही आत्मभुवन । न ये टाकून बाहीर ॥ १७ ॥ गान्धारीप्रति जाऊनि विदुर । करवी दुःखाचा परिहार । सान्त्वनोक्ति बोले सार । अन्य व्यवहार विसर्जिला ॥ १८ ॥ पाण्डवांचे ऐश्वर्य गुण । शौर्य प्रताप विद्याभ्यसन । स्मरोनि विलाप करी द्रोण । न संडी सदन अतिदुःखें ॥ १९ ॥ रामकृष्ण हें जाणोनि चित्तीं । स्वयें जावोनि भीष्माप्रति । तुल्यदुःखें विलाप करिती । गुण आठविती पार्थांचे ॥ २० ॥ भीष्म म्हणे भो जगदीशा । पाण्डवां-ऐसियां प्रतापी पुरुषां । दैवें वोपिली कोण दशा । जेंवि पाडसा दावाग्नि ॥ २१ ॥ कुंतीसारिखी साध्वी रत्न । धर्माऐसा सत्यप्रतिज्ञ । हनुमत्प्रतिमा भीमसेन । महाबलवान ओजस्वी ॥ २२ ॥ धनुर्विद्येचा अवतार । अपर भार्गव कीं रामचंद्र । अर्जुनाऐसा धनुर्धर । लाक्षागारीं जळाला ॥ २३ ॥ अनंग किंवा राकारंग । तैसे माद्रीतनय दोघ । सौंदर्यमन्दाकिनीचे वोघ । पावले भंग अंगारें ॥ २४ ॥ त्रैलोक्यमण्डित भरिते कीर्ति । समरीं अमरां लाविते ख्याति । स्वचातुर्यें बृहस्पति । युक्तिप्रयुक्ति डोलविते ॥ २५ ॥ समरीं पुरली नाहीं हांव । भोगिलें नाहीं नृपगौरव । कैसें विचित्र अघटित दैव । पडिले वाडवअवदानीं ॥ २६ ॥ यशोलक्ष्मीचे कीर्तिध्वज । कीं वीरश्रियेचे उद्दाम भुज । कीं ब्रह्माण्ड-धारक जे दिग्गज । ते हे आत्मज पाण्डूचे ॥ २७ ॥ समरीं कृतान्त खिळिती बाणीं । ते जळाले लाक्षासदनीं । कुरुवंशाची रेखा उणी । जाली धरणी निर्द्वंद्व ॥ २८ ॥ ऐसे विलाप बहुतां परी । पाण्डव-दुःखें गाङ्गेय करी । त्यातें कवळूनि राममुरारी । विलपती आणि सान्तविती ॥ २९ ॥ कुरुवरवृद्धा महाराजा । म्हणती सावध गंगात्मजा । कृतकर्माच्या फळभोगबीजा । अंकुर येती यथाकाळें ॥ ३० ॥ जो जो जैसें कर्म करी । तो तो तैसा फळभोग वरी । ईश्वरसत्तेची हे थोरी । चराचरीं नियामक ॥ ३१ ॥ भूत भावी या संकेतें । भीष्मा बुझाविलें परमार्थें । यामाजि गान्धार स्वकर्मातें । भोगिती ऐसें सूचविलें ॥ ३२ ॥ मग घेऊनि भीष्माज्ञा । पातले कृपाचार्यसदना । तेणें देखोनि रामकृष्णां । पाण्डुनंदनां आठविलें ॥ ३३ ॥ परस्परें पाण्डवगुण । स्मरोनि विलाप करिती जाण । रामकृष्णें पुसोनि नयन । केलें सान्त्वन पूर्वोक्त ॥ ३४ ॥ त्यानंतरें विदुरालया । जाऊनि सप्रेम भेटले तया । तन्मुखें वृत्तान्त परिसोनियां । केली स्नेहा अभिवृद्धि ॥ ३५ ॥ विदुरा घेऊनि सांगातें । गेले गान्धारीमंदिरातें स्नेहें भेटोनियां तयेतें । दुःखशोकांतें परिहरिती ॥ ३६ ॥ देखोनियां राममुरारि । पाण्डवांचें दुःख भारी । हंबरडा हाणोनि गान्धारी । जननियेसरी आक्रन्दे ॥ ३७ ॥ म्हणे पाण्डूचें लोपलें नांव । कुंतीमाद्रीशीं पाण्डव । एकसरें निमाले सर्व । गोमयें ठाव पूसिला ॥ ३८ ॥ पाडसेंसाहित कुंती हरिणी । जतुकागा-

राख्यदावाग्नी- । माजि निमाली तळमळूनी । आतां कोठूनि भेटेल ।। ३९ ।। ऐसी विलपतां गान्धारी । विदुरें सहित राममुरारि । संबोखिती नानापरी । मधुरोत्तरीं बोधोनी ।। ४० ।। तेथूनि आले द्रोण-सदना । द्रोणें देखोनि रामकृष्णां । अश्रुपात आणिले नयनां । पाण्डुनंदना आठवोनी ।। ४१ ।। पाण्डवांचे आठवी गुण । ठाणमाण रूप लावण्य । वीर्य शौर्य प्रताप गहन । धृति दाक्षिण्य औदार्य ।। ४२ ।। धनुर्विद्येचा अभ्यास । प्रजापालनीं परमोल्लास । प्रागल्भ्य पाटव तेजोविशेष । विनय नम्रता सौजन्य ।। ४३ ।। मर्यादेचे रत्नाकर । समरीं अचळ मेरु अपर । जवें जिंकिती पैं समीर । केवळ जळधर कृपेचे ।। ४४ ।। ऐसे स्मरोनि अगाध गुण । पाण्डवमोहें जाकळे द्रोण । म्हणे पार्थाऐसें छात्र-रत्न । आता नयन न देखती ।। ४५ ।। द्रुपद प्रतापी पाञ्चाळपति । अर्जुनें बांधोनि आणिला रथीं । गुरुदक्षिणे वोपूनि हातीं । दाविली ख्याति भूचक्रीं ।। ४६ ।। धनुर्विद्येचा सागर । ऐसा शिष्य कैंचा अपर । जैसा भार्गव परशुधर । न भूतो न भविष्यति ।। ४७ ।। तयातें म्हणती रामकृष्ण । हेंचि पाण्डवांचें कल्याण । पुरूंच्या वदनें ज्यांचे गुण । ऐकती श्रवण जनांचे ।। ४८ ।। हेंचि जन्माचें सार्थक । ज्यातें धन्य म्हणती लोक । शताब्द वांचोनि पासकपंक- । चर्चित मूर्ख भूभार ।। ४९ ।। ऐसिया अनेक मधुरोत्तरीं । द्रोणा संबोखूनियां हरि । मग पातलें सभागारीं । वृद्धाचारा अनु-सरले ।। ५० ।। इतर दुर्योधनप्रमुख । धार्तराष्ट्रही करिती शोक । बाह्य संपादिती लौकिक । परम संतोख हृत्कमळीं ।। ५१ ।। कर्णदुःशासनादि येर । सहित अवघेचि गान्धार । बाह्य विलाप करिती फार । परी तें अंतर हरि जाणे ।। ५२ ।। यालागिं तयांचें सान्त्वन । सहसा न करी जनार्दन । सभास्थानातें येऊन । वृद्धाचरण आदरिलें ।। ५३ ।। भीष्म द्रोण कृपाचार्य । सभास्थाना आणिले आर्य । यथा-कुलोचित सारूनि कार्य । कौरवधुर्य गौरविला ।। ५४ ।। सर्वां देऊनि भोजन मिष्ट । पंक्तिलाभें आर्चिले इष्ट । सर्वां करूनियां संतुष्ट । सशोक कष्ट परिहरिले ।। ५५ ।। इतुकी कथा हस्तिनापुरीं । वर्तली ते कथिली पुरी । तंव मागें द्वारकेमाझारी । ऐका अवसरी जाली ते ।। ५६ ।।

लब्ध्वैतदंतरं राजञ्शतधन्वानमूचतुः । अक्रूरकृतवर्माणौ मणिः कस्मान्न गृह्यते ।। ३ ।।

रामगोविन्द गजसाह्वया । गेले कौरवां सान्तवावया । तो संधि पाहूनि शतधन्वया । एकान्त-निलया नेऊनी ।। ५७ ।। कृतवर्मा आणि अक्रूर । साभिमानी स्वपक्षपर । होऊनि कथिती गूढ मंत्र । दैवानुसार भवितव्य ।। ५८ ।। म्हणती कां पां अद्यापिवरी । वीरश्री नुपजे तव अंतरीं । स्यमंतक सत्राजिताचे घरीं । नाद्यापिवरी अपहरिसी ।। ५९ ।। प्रसंगीं रामकृष्ण नसतां । सिंतरूनियां सत्राजिता । स्यमंतकहरणाचा तत्त्वता । संधि साधितां हा समय ।। ६० ।। सत्राजित हा परमान्यायी । कां पां न सले तुझ्या हृदयीं । ऐसिया घालितां महदपायीं । अल्पही नाहीं भय पाप ।। ६१ ।। सत्राजितें परमा-न्याय । जरी तूं म्हणसी केला काय । तो तुज कथितों ऐकता होय । क्षोभे हृदय तद्दुःखें ।। ६२ ।।

योऽस्मभ्यं संप्रति श्रुत्य कन्यारत्नं विगर्ह्य न. ।। कृष्णायादान्न सत्राजित्कस्माद्‌भ्रातरमन्वियात् ।। ४ ।।

सत्यभामा स्वकन्यारत्न । गुणलावण्यचातुर्यभुवन । आम्हांकारणें कृतवाग्दान । जो कृष्णार्पण पुन्हा करी ।। ६३ ।। आमुचा केला जें अव्हेर । जालों तेव्हांचि निन्द्यतर । धिक्कारिती लहान थोर । सर्वीं सर्वत्र निंद्यत्वें ।। ६४ ।। कांहीं दोष याचिये ठायीं । देखोनि कन्या दिधली नाहीं । ऐसें बोलती जन सर्वेही । परमान्यायी हा ऐसा ।। ६५ ।। म्हणसी सत्राजित जीत असतां । स्यमंतक कैंवि चढेल हाता । तरी जेथ त्याचा प्रसेन भ्राता । हा तत्पथा लावावा ।। ६६ ।। मणि न करूनि नृपार्पण । प्रसेनें केला कंठाभरण । मृगेन्द्रहस्तें पावला मरण । तैसेंचि जाण या कीजे ।। ६७ ।।

एव भिन्नमतिस्ताभ्यां सत्राजितमसत्तमः । शयानमवधील्लोभात्स पापः क्षीणजीवितः ।। ५ ।।

अक्रूरकृतवर्म्यांचिया युक्ती । शतधन्व्याची भेदली मति । उभयबोधें तो दुर्मति । अधम निघातीं प्रवर्तला ।। ६८ ।। सदामस्तार्कवत्रपय । मिश्र जालिया मारक होय । शतधन्वाही तेणेंचि न्यायें । अधमोपाय करूनियां ।। ६९ ।। सत्राजिताच्या रिघोनि सदनीं । निद्रित असतां शय्याभुवनीं । स्यमंतकाच्या लोभेंकरूनी । त्यातें वधूनि मणि हरिला ।। ७० ।। निद्रितवधाऐसें पाप । मनीं न धरूनि तद्भय अल्प । मणिलोभास्तव दस्युकल्प । केला साक्षेप दुष्टत्वें ।। ७१ ।। शतधन्व्यासि समीप मरण । म्हणोनि रुचलें हें आचरण । अक्रूरकृतवर्म्यांचें वचन । जालें कारण तत्कर्मा ।। ७२ ।। कैसा मारिला सत्राजित । राया ऐकें तेही मात । बलात्कारें दस्युवत । रात्रीं सदनांत रिघाला ।। ७३ ।।

स्त्रीणां विक्रोशमानाना क्रदंतीनामनाथवत् । हत्वा पशून्सौनिकवन्मणिमादाय जग्मिवान् ।। ६ ।।

निद्रित असतां शय्यागारीं । हिंसक जैसा पशूतें मारी । तैसाचि कंठ छेदितां करीं । भोंवत्या नारी आक्रन्दती ।। ७४ ।। बळें घालूनि दरवडा । निद्रितातें मारूनि होडां । भोंवता नारींचा हंबरडा मणि रोकडा हिरतिला ।। ७५ ।। अनाथापरी रडती नारी । येरें मणि बांधोनि पदरीं । निघोनि जाय दरोडेकरी । जाता जाला तो तैसा ।। ७६ ।। स्त्रिया बाळकें करिती रुदन । दासदासीकिंकरजन । सत्यभामा आक्रन्दोन । आली धांवोन जनकापें ।। ७७ ।।

सत्यभामा च पितर हतं वीक्ष्य शुचार्ऽपिता । व्यलपत्तात तातेति हा हतास्मीति मुह्यती ।। ७ ।।

देखोनि जनकाचिया मरणा । सत्यभामा करी रुदना । प्रेत कवळूनि विलाप नाना । करूनि वदना पिटीतसे ।। ७८ ।। भो भो ताता अनाथें आम्ही । तुजवीण पडिलों दुःखधामीं । कपाळ पिटूनि लोळे भूमी । नावरे ऊर्मी शोकाची ।। ७९ ।। हाहाकारें पिटी हृदय । म्हणे जालासि कां निर्दय । तुझ्या वियोगें अंतसमय । आम्हांलागूनि ये काळीं ।। ८० ।। निष्ठुर होऊनि जनकराया । तूं गेलासि

कवण्या ठायां । कां पां सोडिली आमुची माया । ताता सदया स्नेहाळुवा ॥ ८१ ॥ जनकप्रेत कवळूनि करीं । ऐसे अनेक विलाप करी । सांवरूनि धरिती नारी । म्हणती पुढारी गति चिंता ॥ ८२ ॥

तैलद्रोण्यां मृतं प्रास्य जगाम गजसाह्वयम् । कृष्णाय विदितार्थाय तप्ताऽऽचख्यौ पितुर्वधम् ॥ ८ ॥

स्त्रिया पुरोहित सुहृद आप्त । तैलद्रोणीमाजि प्रेत । घालूनि सत्यभामा त्वरित । क्रोधें दुःखित निघाली ॥ ८३ ॥ क्लेशें ठाकिलें हस्तिनापुर । देखोनि श्रीकृष्णहलधर । चरणांपासीं त्राहटी शिर । सांगे प्रकार जनकाचा ॥ ८४ ॥ तुम्ही असतां माझिये माथां । दुष्टें केलें जनकघाता । पशुहिंसकाचिये समता । प्राण तत्वता घेतले ॥ ८५ ॥ निद्रित असतां शय्यागारीं । तात वधिला पशूचे परी । मणि अपहरिला करूनि चोरी । दुःखें भूवरी पडे कथितां ॥ ८६ ॥ सर्व विदित ज्याकारणें । तया कृष्णासि हें गाऱ्हाणें । शोकसंतप्त अंतःकरणें । कथिलें वदनें वनितेनें ॥ ८७ ॥

तदाकर्ण्येश्वरौ राजन्ननुसृत्य नृलोकताम् । अहो नः परमं कष्टमित्यस्राक्षौ विलेपतुः ॥ ९ ॥

तें ऐकोनि राममुरारि । अवगणी मनुष्यलोकानुसारीं । दुःख न कीजे जिहीं ईश्वरीं । ते दुःखलहरी अनुभविती ॥ ८८ ॥ राया कुरुभूमंडलपाळा । रामकृष्णही तये वेळां । अश्रु आणूनि नेत्रकमळां । म्हणती जाला अन्याय ॥ ८९ ॥ अहो खेदें म्हणती आम्हां । परम कष्टा न करवे सीमा । विलाप करूनि म्हणती अधमा । मणीचा प्रेमा प्राणहर ॥ ९० ॥ आम्ही जीत असतां पृथ्वी । आमुच्या सुहृदा ऐसी पदवी । तेव्हां आमुची कीर्ति आघवी । वृथा मानावी कीं ना हो ॥ ९१ ॥ ऐसें म्हणूनि शोकाभिभूत । कौरवांतें पुसोनि त्वरित । अधिष्ठूनि द्वारकापंथ । जाते जाले तें ऐका ॥ ९२ ॥

आगत्य भगवांस्तस्मात्सभार्यः साग्रजः पुरम् । शतधन्वानमारेभे हन्तुं हर्तुं मणिं ततः ॥ १० ॥

क्लेशभरें न सरे वाट । सारथिघोडियां देऊनि साट । रथ चालतां घडघडाट । द्वारकाप्रविष्ट पैं जाले ॥ ९३ ॥ प्रवेशोनि आत्मसदनीं । सर्व वृत्तान्त ऐकिला श्रवणीं । शतधन्व्याची लघिष्ठकरणी । अंतःकरणीं जाणितली ॥ ९४ ॥ सत्यभामा संकर्षण । सहित सानुग पार्षदगण । द्वारका पावतां श्रीभगवान । भेटले स्वजन संतोषें ॥ ९५ ॥ हस्तिनापुराहूनि हरि । ऐसे येऊनि द्वारकापुरीं । स्वजन भेटतां परस्परीं । गोष्टी निर्धारीं कळूं आली ॥ ९६ ॥ सत्यभामेचे पुसोनि अश्रु । कृष्णें प्रतापें स्पर्शिले स्मश्रु । जेणें वाधिला निरागस श्वश्रु । तो निर्धारें मारीन ॥ ९७ ॥ सत्राजिताची जैसी दशा । शतधन्व्यासी वधीन तैसा । मणिहर तस्कर वधितां दोषा । पात्र सहसा मी नोहें ॥ ९८ ॥ निद्रितहंता आततायी । त्यातें वधितां दोष नाहीं । ऐसें बोलोनि शेषशायी । कान्ता स्वभावीं सान्तवी ॥ ९९ ॥ शतधन्व्याचें करूनि हनन । त्यापासूनि स्यमंतकरत्न । हरीन तेव्हां सत्यप्रतिज्ञ । जाणती जन मजलागीं ॥ १०० ॥ ऐसी भगवन्मुखींची वाणी । शतधन्व्याचे पडतां श्रवणीं । धडकी भरली अंतःकरणीं । तत्कृत करणी अवधारा ॥ १ ॥

सोऽपि कृष्णोद्यमं ज्ञात्वा भीतः प्राणपरीप्सया । साहाय्ये कृतवर्माणमयाचत स चाब्रवीत् ॥ ११ ॥

तोही जाणोनि कृष्णोद्यम । भयें संत्रस्त जाला परम । प्राण वांचवावयाचा काम । धरूनि क्षेम इच्छितसे ॥ २ ॥ शतधन्वा तैं आपुले प्राण । वांचवावयाचे इच्छेकरून । कृतवर्म्याप्रति जाऊन । साह्य हो म्हणोन याचितसे ॥ ३ ॥ कृष्ण प्रवर्तला माझिया घाता । कोण्ही रक्षक न दिसे आतां । तुम्ही करूनियां साह्यता । माझिया जीविता रक्षावें ॥ ४ ॥ कृतवर्मा हें ऐकोनि कानीं । शतधन्व्यासि बोले वाणी । ते तूं कौरवचूडामणि । ऐकें श्रवणीं संक्षेपें ॥ १०५ ॥

नाहमीश्वरयोः कुर्यां हेलनं रामकृष्णयोः । को नु क्षेमाय कल्पेत तयोर्वृजिनमाचरन् ॥ १२ ॥

ऐकोनि शतधन्व्याचा शब्द । हांसिला कृतवर्मा खदखद । म्हणे तूं कैसा बुद्धिमंद । पाडिलें द्वंद्व कृष्णेंसीं ॥ ६ ॥ अरे हे बलभद्र चक्रपाणि । प्रत्यक्ष ईश्वरावतार दोन्ही । ऐसें म्हणों न शके वाणी । जे ईश्वरालागूनि नियंते हे ॥ ७ ॥ सागरगर्भीं द्वारकापुर । निर्मू शके कोण पामर । सुधर्मा अर्पूनि अमरेश्वर । तिष्ठे किंकर होत्साता ॥ ८ ॥ शक्ती दंडी खड्गी पाशी । चापी गदी ईशानेंसीं । आज्ञा वंदूनिया शीर्षीं । नतमौळेंसीं जुहारिती ॥ ९ ॥ सुनंदपाणि चक्रपाणि । हे ईश्वराचे ईश्वर दोन्ही । यांची अवज्ञा माझेनी । कायवाङ्मनीं न कल्पवे ॥ ११० ॥ यांतें सामान्यता मानून । माझेनि न करवेंचि हेलन । अथवा हो कां आणिखी कोण । जो विरुद्धाचरण करी यांशीं ॥ ११ ॥ यांचा करूनियां अपराध । यांसि चालवूनियां विरोध । ऐसा त्रिजगीं कोण प्रबुद्ध । जें कल्याण प्रसिद्ध पावेल ॥ १२ ॥ तस्मात् यांचे जे अपराधी । तेचि केवळ अभद्रनिधि । दुःखदोषांची समृद्धि । तिहीं त्रिशुद्धि संग्रहिली ॥ १३ ॥ यालागिं माझेनि ईश्वरांसी । विरोध न करवेचि मानसीं । यांचे प्रताप तूं परियेसीं । देखोनि कैसी तुज भ्रांति ॥ १४ ॥

कंसः सहानुगोऽपीतो यद्द्वेषात्त्याजितः श्रिया । जरासंधः सप्तदशसंयुगान्विरथो गतः ॥ १३ ॥

अरे यांचिया द्वेषास्तव । सानुग कंसा पराभव । ज्यातें नमिती भूभुज सर्व । एवढें वैभव सांडवलें ॥ ११५ ॥ प्रत्यक्ष तुवां देखिला नयनीं । सतरा वेळ समराङ्गणीं । मागधाऐसा प्रतापतरणी । विरथ जीवदानीं सोडिला ॥ १६ ॥ मागधाऐसा प्रतापवंत । सतरा वेळ गेला विरथ । लज्जा पावला नृपचक्रांत । हें काय विदित तुज नाहीं ॥१७॥ ऐसियासि विरुद्धाचरण । सहसा माझेनि न करवें जाण । तूंही तयांसि होयीं शरण । कीं आश्रय आन विचारीं ॥ १८ ॥ कृतवर्म्याची निराश गोठी । ऐकोनि शतधन्व्याचे पोटीं । कल्पना उठती कोट्यनुकोटि । आश्रय सृष्टी नाळोचे ॥ १९ ॥ कृतवर्म्यानें निराकारिला । मग तो अक्रूरापासीं गेला । तेणें काय त्या विचार कथिला । कौरवपाळा तो परिसें ॥ १२० ॥

प्रत्याख्यातः स चाक्रूरं पार्ष्णिग्राहमयाचत । सोऽप्याह को विरुध्येत विद्वानीश्वरयोर्बलम् ॥ १४ ॥

शतधन्वा म्हणे अक्रूरातें । पाठीराखा तूं होय मातें । ऐसिये समयीं आश्रयातें । मी याचितों तुजलागीं ॥ २१ ॥ ऐसा याचिला अक्रूर । तोही तैसेंचि उत्तर । बोलिला होऊन विवेकपर । न्यायनिष्ठुर तेणेंसी ॥ २२ ॥ जाणोनि ईश्वराचिया बळातें । कोण जाणता विरोधातें । प्रवर्तेल हें विवरीं चित्तें । मग साह्यातें तूं याचीं ॥ २३ ॥ यांचा प्रताप देखोनि दृष्टी । अद्यापि विरोध धरिसी पोटीं । तथापि ऐकें समूळ गोठी । वास्तव कोटी पैं यांची ॥ २४ ॥

य इदं लीलया विश्वं सृजत्यवति हंति च । चेष्टां विश्वसृजो यस्य न विदुर्मोहिताऽजया ॥ १५ ॥

रामकृष्ण हे भासती भिन्न । परी हे ब्रह्मसनातन । ईश्वरामाजि ईश्वरपण । स्फुरे संपूर्ण यांचेनि ॥ १२५ ॥ जो हें विश्व लीलेंकरून । सृजी पाळी ग्रासी जाण । तो दो रूपें अवतरून । भूभार-हरण करूं आला ॥ २६ ॥ ऐसा जो कां विश्वस्रष्टा । लीलाविग्रह हे त्याची चेष्टा । सहसा नुमजे विवेकभ्रष्टां । महापापिष्ठा दुरात्मयां ॥ २७ ॥ काय म्हणोनि नुमजे म्हणसी । तरी अजा माया मोहराशि । पडिले तयेचिये ग्रासीं । अभिमानासी वश जाले ॥ २८ ॥ मायामोहें जाले भ्रमित । देह-तादात्म्यें विवेकरहित । नश्वर मानूनियां शाश्वत । ईश्वर समर्थ नोळखती ॥ २९ ॥ हातींच्या कंकणा किमर्थ मुकुर । रामकृष्ण हे जगदीश्वर । यांचा प्रतापप्रभाकर । कीं श्रवणगोचर तुज नाहीं ॥ १३० ॥

यः सप्तहायनः शैलमुत्पाट्यैकेन पाणिना । दधार लीलया बाल उच्छिलीध्रमिवार्भकः ॥१६॥

नरांमाजि श्रेष्ठ नरेंद्र । त्रिजगीं वरिष्ठ तो अमरेन्द्र । ज्यातें नमिती सुरासुर । नर किन्नर गंधर्व ॥ ३१ ॥ तया इंद्राचा अवमान । करूनि वर्जिला त्याचा यज्ञ । गोपांकरवीं गोवर्धन । कृष्णें बोधून पुजविला ॥ ३२ ॥ तेणें इंद्र चढला क्षोभा । प्रळयमेघीं व्यापिलें नभा । तेव्हां व्रजजन जीवित-लोभा । पद्मनाभा बोभाती ॥ ३३ ॥ ऐकोनि तयांचा आर्तस्वर । सातां वर्षांचा श्रीधर । उपडूनि एक्या करें गिरिवर । धरिता जाला तो तेव्हां ॥ ३४ ॥ जैसें बाळक लीलेंकरून । उच्छिलीन्ध्राचें उत्पाटन । करूनि उचली तेंवि कृष्ण । गोवर्धन धरी हस्तें ॥ १३५ ॥ प्रलयमेघ सप्तराती । करका-मारुतविद्युत्पातीं । इंद्रें पीडितां व्रजाप्रति । नोहे विपत्ति अणुमात्र ॥ ३६ ॥ ऐसा ज्याचा पराक्रम । जाणोनि त्याचा अतिक्रम । कोण करूं शकेल अधम । केवळ ब्रह्म श्रीकृष्ण ॥ ३७ ॥ ऐसा प्रताप वर्णूनि मुखें । अक्रूर तन्मय जाला सुखें । सकंप माथा तुकोनि हरिखें । नमिता जाला तें ऐका ॥ ३८ ॥

नमस्तस्मै भगवते कृष्णायाद्भुतकर्मणे । अनंतायादिभूताय कूटस्थायाऽऽत्मने नमः ॥ १७ ॥

अक्रूर म्हणे शतधन्व्यासी । विचार करिसी एकान्तयासी । तोही विदित श्रीकृष्णासी । कीं सर्वनिवासी सर्वग तो ॥ ३९ ॥ तया भगवंताकारणें । नमस्कारितों अनन्यपणें । संपन्न असतां जो षड्गुणें । मनुष्याचरणें वर्ततसे ॥ १४० ॥ कृष्ण म्हणतां गमे बाळ । अद्भुत कर्मे पाहतां काळ । तयाचे पदीं माझें मौळ । कमळीं अळिकुळवत् रंगो ॥ ४१ ॥ ज्यासि नाहीं आदि अंत । देशकालादिपरिच्छेद-रहित । संतत शाश्वत विकारातीत । तो अच्युत मी नमितों ॥ ४२ ॥ होण्याजाण्याहूनि पूर्वी । यालागिं आदिभूत या नांवीं । ज्यातें म्हणती महानुभावी । तत्पदीं ठेवीं मी माथा ॥ ४३ ॥ जो कूटस्थ सर्वाशयीं । असोनी सज्ज नोहे केंहीं । तया सर्वगा आत्मया पाहीं । वाङ्मनदेहीं मम नमन ॥ ४४ ॥ ऐसे शतशः नमस्कार । अक्रूरें करूनि वारंवार । वस्त्रें पुसूनि द्रवित नेत्र । स्मरोनि श्रीधर त्राहि म्हणे ॥ १४५ ॥ शतधन्व्यातें म्हणे बापा । मनुष्यदेही कृष्णकृपा । न संपादी तो पात्र पापा । आकल्प खेपा न चुकती ॥ ४६ ॥ ऐसा अक्रूरें निराकरितां । शतधन्व्यासि प्रबळ चिंता । वांचावयाची खुंटली आस्था । मग वर्तली कथा ते ऐका ॥ ४७ ॥

प्रत्याख्यातः स तेनापि शतधन्वा महामणिम् । तस्मिन्न्यस्याश्वमारुह्य शतयोजनगं ययौ ॥ १८ ॥

अक्रूरें निराकरिल्यावरी । मग शतधन्वा विचार करी । मणि देऊनि अक्रूराकरीं । अश्वीं स्वारी करूनि निघे ॥ ४८ अंतर्यामीं भगवत्सत्ता । तेणें प्रेरिलाचि होत्साता । ठेवूनि अक्रूरापें स्यमंता । जाला पळता प्राणभयें ॥ ४९ ॥ शतयोजनें जया गति । आरूढोनि त्या अश्वाप्रति । पळता जाला रातोरातीं । पूर्वदिक्प्रान्तीं म्रियमाण ॥ १५० ॥ इतुकी शतधन्व्याची कथा । द्वारका सांडूनि जाला पळता । प्रभाते श्रुत जालें अनंता । तो सर्ववेत्ता काय करी ॥ ५१ ॥

गरुडध्वजमारुह्य रथं रामजनार्दनौ । अन्वयातां महावेगैरश्वै राजन्गुरुद्रुहम् ॥ १९ ॥

प्रभाते उठूनि जनार्दन । सज्जूनि गरुडध्वज स्यंदन । आरूढोनि सहित संकर्षण । जाते जाले पाठिलागा ॥ ५२ ॥ कुरुधराधरगिरिंद्रचूडा । राया ऐकें श्रवणसुघडा । रथ जुंतिला जवीन घोडा । चालिला होड्डा जगत्पति ॥ ५३ ॥ जनकासमान श्वशुर मान्य । यालागिं गुरुत्व बोलती सुज्ञ । तद्वध-कर्ता जो निर्घृण । त्यातें लक्षूनि रथ धांवे ॥ ५४ ॥ शतधन्वा जो गुरुद्रोही । महापापिष्ठ आततायी । त्यातें वधितां दोष नाहीं । म्हणोनि लवलाहीं धांवती ॥ १५५ ॥ उल्लंघूनि उखामंडळ । सौराष्ट्र नेवाळ मरुवाळ । कुकुर अंधक माथुर सकळ । यमुनाजळ लंघिलें ॥ ५६ ॥ अंतर्वेदी कुरुधरित्री । शतधन्व्यानें लंघिली रात्रीं । प्रभाते परतोनि पाहतां नेत्रीं । गरुडकेतु विलोकिला ॥ ५७ ॥ तेणें पोटीं भरलें भय । शतयोजनें धांविला हय । पुढें न चलती त्याचे पाय । मृतप्राय तो पडिला ॥ ५८ ॥

मिथिलायामुपवने विसृज्य पतितं हयम् । पद्भ्यामधावत्संत्रस्तः कृष्णोऽप्यन्वद्रवद्रुषा ॥ २० ॥

मग मिथिलेच्या समीप वनीं । पतित अश्व विसर्जूनी । भयसंत्रस्त पळतां चरणीं । देखिला नयनीं श्रीकृष्णें ॥ ५९ ॥ पदातियापाठीं रथ । क्षात्रधर्मासि हें अनुचित । म्हणोनि पदाति कृष्णनाथ । होऊनि धांवत तया पृष्ठीं ॥ १६० ॥ निद्रित मारिला आपुला श्वशुर । यालागिं रोषे जगदीश्वर । कृष्ण सर्वगही साचार । धांवे सत्वर वधावया ॥ ६१ ॥ शतधन्व्याची भरली घडी । वळती पायांच्या वेंगडी । थुंका वाळोनि गेला तोंडीं । भरली हुडहुडी जीवभयें ॥ ६२ ॥ श्रोते शंका करिती येथ । समरविमुखा कृष्णनाथ । वधिता जाला हें अनुचित । यदर्थीं शास्त्रार्थ अवधारा ॥ ६३ ॥ यतीलागीं सुवर्ण देणें । व्रतस्था ताम्बूल समर्पणें । चोरा अभयें संरक्षणें । हीं नरककारणें दात्यातें ॥ ६४ ॥ आततायी देखिल्यावरी । तत्काळ वधावा धार्मिकीं वीरीं । यालागिं जाणोनि वधाधिकारी । वधी श्रीहरि तें ऐका ॥ १६५ ॥

पदातेर्भगवांस्तस्य पदातिस्तिग्मनेमिना । चक्रेण शिर उत्कृत्य वाससोर्व्यचिनोन्मणिम् ॥ २१ ॥

क्षात्रधर्म शास्त्रानुरूप । पदाति जाला यदुकुळदीप । चक्र काढूनियां देदीप्य । वधिला सपाप शतधन्वा ॥ ६६ ॥ निद्रितहंता स्यमंतकचोर । चक्रें त्याचें छेदूनि शिर । वस्त्रांमाजि वारंवार । मणि श्रीधर हुडकितसे ॥ ६७ ॥ मणि ठेविला अक्रूरापासीं । विदित असतांही सर्वज्ञासी । अग्रजाची समजाविसी । कारणें मणीसी धांडोळी ॥ ६८ ॥

अलब्धमणिरागत्य कृष्ण आहाग्रजांतिकम् । वृथाहतः शतधनुर्मणिरत्र न विद्यते ॥ २२ ॥

मणि न लभे त्या परवंटी । अथवा कोठें वसनगांठी । मग परतोनियां जगजेठी । करी गोठी ज्येष्ठापें ॥ ६९ ॥ वृथा शतधनु वधिला पाहीं । मणि सर्वथा यापें नाहीं । हें ऐकोनि बळराम कायी । बोले हृदयीं तर्कूनी ॥ १७० ॥

तत आह बलो नूनं स मणिः शतधन्वना । कस्मिंश्चित्पुरुषे न्यस्तस्तमन्वेष पुरं व्रज ॥ २३ ॥

बळराम तर्की अभ्यंतरीं । म्हणे हा सर्वज्ञही श्रीहरि । रहस्य चोरूनियां वरिवरी । प्राकृतापरी समजावी ॥ ७१ ॥ त्यानन्तरें कृष्णासि म्हणे । बहुतेक मणि शतधन्व्यानें । कोणा पुरुषापाशीं यत्नें । ठेविला भेणें पुरगर्भी । यास्तव जाऊनि द्वारकापुरीं । मणिअन्वेषण बरवें करीं । ऐसी बोलूनियां वैखरी । रामें मुरारि विसर्जिला ॥ ७२ ॥ आणिक कृष्णासी काय म्हणे । कुरुनृपा तें ऐकें श्रवणें । अभेदीं भेदाचें संभवणें । ऐसें करणें कळिकाळें ॥ ७३ ॥

अहं विदेहमिच्छामि द्रष्टुं प्रियतमं मम । इत्युक्त्वा मिथिलां राजन्विवेश यदुनंदनः ।। २४ ।।

एकचि ब्रह्म दोहीं रूपें । अवतरले हें कथिलें तुजपें । परंतु कळिकाजनितविकल्पें । बाचटिलें तें अवधारीं ।। ७४ ।। बलराम म्हणे सर्वज्ञ हरि । साक्षी सर्वांचे अंतरीं । शतधनुहेननें मणीची चोरी । किमर्थ परिहरी मजसीं हा ।। १७५ ।। ऐसा विकल्प धरूनि मनीं । कृष्णा आज्ञापिलें वचनीं । म्हणे जाऊनि द्वारकाभुवनीं । शोधिजे मणि सुविचारें ।। ७६ ।। माझा प्रियत्तम विदेहनृपति । तद्दर्शनीं मजला आर्ति । समीप मिथिलानगरप्रान्तीं । सहजस्थिती आलोंसों ।। ७७ ।। विदेह देखावयाकारणें । मिथिलेमाजि मजला जाणें । इतुकें बोलोनि संकर्षणें । केलीं प्रयाणें परस्परें ।। ७८ ।। यदुअन्वया आनंदन । यालागिं म्हणिजे यदुनंदन । मिथिलेमाजि संकर्षण । भेटला जाऊनि विदेहा ।। ७९ ।।

तं दृष्ट्वा सहसोत्थाय मैथिलः प्रीतमानसः । अर्हयामास विधिवदर्हणीयं समर्हणैः ।। २५ ।।

त्यातें देखोनि अकस्मात । पुढें धांविला मिथिलानाथ । मनोल्लासें प्रीतिवंत । आनंदभरित हृत्कमळीं ।।१८०।। क्षेमालिङ्गन स्नेहाभिवृद्धि । स्वागत पुसोनि यथाविधि । दिव्यासनीं ईश्वरबुद्धी । पूजिता जाला सप्रेमें ।। ८१ ।। करूनि पादावनेजन । तीर्थ सर्वत्र संप्रोक्षून । भावें हृदयीं धरिले चरण । मूर्ध्नि स्पर्शोनि स्थापिले ।। ८२ ।। अर्घ्यपाद्यादि मधुपर्क । आचमना अर्पूनि शुद्धोदक । परिधानार्थ नीलांशुक । पीतांशुक प्रावरणा ।। ८३ ।। मुकुटकुंडलें वीरकंकणें । अंगदें मुद्रिका कंठाभरणें । माळा मेखळा पदभूषणें । रत्नजडितें समर्पिलीं ।। ८४ ।। केशरामिश्रित चंदनतिलक । चर्चिला सर्वाङ्गीं सम्यक । कुंकुमाक्षतांची लखलख । माणिक्यप्रभा लाजविते ।। १८५ ।। मुक्तावतंस खोविलें शिरीं । सुगंधपुष्पांची झल्लरी । पुष्पमाळा हृदयावरी । दिव्य धूसर उधळिले ।। ८६ ।। सुगंधचूर्णाच्या शलाका । अग्नीं योजूनियां पावका । आसना-निकटीं स्थापिले देखा । ज्या धूम्रें सकळिकां तोषविती ।। ८७ ।। कर्पूरदीपें एकारती । षड्रस नैवेद्य प्रसाद पंक्ति । फळ ताम्बूल अर्पूनि निगुती । अनन्यभक्ति तिष्ठतसे ।। ८८ ।। दक्षिणे अर्पूनि तनुवाङ्मनें । कर्पूरज्योतिनीराजनें । रत्नाञ्जळि मंत्रसुमनें । स्तवनें नमनें प्रदक्षिणा ।। ८९ ।। ब्रह्माण्डगर्भीं पूज्यापूज्य । तो पूजिला तृणराड्ध्वज । पूजार्ह दिव्योपचारपुंज । अर्पूनि सहज यथाविधि ।। १९० ।। बद्धाञ्जलि विदेहनृपति । उभा ठाकोनि किङ्करवृत्ति । बळरामातें करी विनति । म्हणे विश्रान्ति मज दिधली ।। ९१ ।। आजि सुकृता आलें फळ । आजि पावन जालें कुळ । आजि उद्धरले पूर्वज सकळ । श्रीपदकमळ वंदिलिया ।। ९२ ।। इतुकें प्रार्थितां विनीत चित्तें । कृपा केली जरी समर्थें । कांहीं दिवस राहोनि येथें । वचनामृतें निववावें ।। ९३ ।। हें ऐकोनि संकर्षण । परमानंदें वोसंडून । म्हणे विदेहा जिवलगप्राण । तुजविण आन मज नाहीं ।। ९४ ।। ऐकोनि जनकाची प्रार्थना । परमाह्लाद संकर्षणा । कित्तेक काळ मिथिलाभुवना । माजि राहिला तें ऐका ।। १९५ ।।

उवास तस्यां कतिचिन्मिथिलायां समा विभुः । ततोऽशिक्षद्गदां काले धार्तराष्ट्रः सुयोधनः ।। २६ ।।

तिये मिथिलेच्या ठायीं बळ । राहिला होत्साता निश्चळ । जनकसंगें क्रमिला काळ । कित्येक वर्षेंपर्यंत ।। ९६ ।। षड्गुणैश्वर्यसंपन्न । विभु समर्थ संकर्षण । आला मिथिलेस हें ऐकोन । स्वयें दुर्योधन पातला ।। ९७ ।। बैसोनि जनकाचिये सदसीं । रामा गुरुत्वें उपासी । होऊनियां अंतेवासी । स्वयें अभ्यासी गदायुद्ध ।। ९८ ।। करूनि जनकाचा सहवास । रामापासीं गदाभ्यास । दुर्योधनें सावकाश । केला विशेष कौशल्यें ।। ९९ ।।

मानितः प्रीतियुक्तेन जनकेन महात्मना । केशवो द्वारकामेत्य निधनं शतधन्वनः ।। २७ ।।

जनकसहवासें गान्धार । राहिला असतां अभ्यासपर । जनकें सम्मान केला थोर । प्रीतिपुरस्सर नृपयोग्य ।। २०० ।। विवर्तरोधें आत्मावबोधें । विवेक वैराग्य जनकीं नांदे । म्हणोनि महात्मा या अनुवादें । सज्जनवृंदें संबोधिती ।। १ ।। तेणें गौरविला गान्धार । प्रेमें अर्पी राजोपचार । असो मिथिलेचा विस्तार । ऐका श्रीधर काय करी ।। २ ।। गरुडध्वज रथेंसहित । द्वारके येऊनि जगन्नाथ । शतधन्व्याचा वृत्तान्त । कथिला समस्त सत्यभामे ।। ३ ।।

अप्राप्तिं च मणेः प्राह प्रियायाः प्रियकृद्विभुः । ततः स कारयामास क्रिया बंधोर्हतस्य वै ।।
साकं सुहृद्भिर्भगवान्या याः सांपरायिकाः ।। २८ ।।

परम प्रियकर सत्यभामा । तिचिया संतोषजननकामा । विभु समर्थ जो परमात्मा । स्वकृतकर्मा निरूपी ।। ४ ।। शतधन्व्याचा केला वध । त्यापें मणीचा करितां शोध । परंतु स्यमंतक अलब्ध । ऐकोनि क्रुद्ध बळ जाला ।। २०५ ।। आम्हांसि पाठवूनियां नगरा । राम गेला मिथिलापुरा । इत्यादि वचनीं वंचूनि दारा । करवी सत्कारा श्वशुराच्या ।। ६ ।। सत्राजित रहितपुत्र । यालागिं तत्क्रिया कमळामित्र । करविता जाला हें चरित्र । बदलें वक्त्र शुकाचें ।। ७ ।। सहित सपिंड सुहृद आप्त । तनुसंबंधी गोत्रें सप्त । साम्परायिकाक्रियाव्याप्त । ते ते समस्त मिळोनियां ।। ८ ।। पारलौकिक ऐसियापरी । सत्राजिताचे करवी हरि । तैसीच शतधन्व्याच्या घरीं । करिती जाली अंत्येष्टि ।। ९ ।। इतुकी कथिली भगवच्चर्या । सत्राजिताची उत्तरक्रिया । यानंतरें वर्तलें राया । तें कुरुवर्या अवधारीं ।। २१० ।।

अक्रूरः कृतवर्मा च श्रुत्वा शतधनोर्वधम् । व्यूषतुर्भयसंत्रस्तौ द्वारकायाः प्रयोजकौ ।।२९।।

ऐकोनि शतधन्व्याचें मरण । अक्रूर कृतवर्मा मिळोन । कृष्णाभेणें संत्रासोन । प्राण घेऊन पळाले ।। ११ ।। काय कारण भयासि म्हणसी । तरी या दोघीं शतधन्व्यासी । प्रयोजिलें मणिहरणासी । वधावयासि सत्राजिता ।। १२ ।। अंतरवेत्ता श्रीभगवान । आमुच्या अपराधा जाणोन । सहसा घेईल

आमुचे प्राण । यास्तव पलायन आदरिले ॥ १३ ॥ द्वारकेपासोनि बाहेरी । पळोनि गेले सहपरिवारीं । त्यांमाजि उभयतांची परी । पृथक्प्रकारीं कथिजेते ॥ १४ ॥ अक्रूर गेला कृष्णानुमतें । भयें कवळिलें कृतवर्म्यातें । तेणें न कळतांचि कोण्हातें । द्वारावतीतें उपेक्षिलें ॥ २१५ ॥ कीं भक्तपक्षपाती श्रीहरि । हे बिरुदाची प्रकट थोरी । भक्तैकपक्षें कृतागस मारी । ऐसिया विचारीं गुप्त पळे ॥ १६ ॥ श्रोते शंका करिती येथें । जे अक्रूर पळाला कृष्णानुमतें । संमत आणि पलायनातें । तें विरोध ज्ञाते मानिती ॥१७॥ तरी कृष्णा न कळत पळाले म्हणतां । वृथा हरीची सर्वज्ञता । विदित असतां पळणें वृथा । या वृत्तान्ता अवधारा ॥ १८ ॥ शतधन्व्यातें निराकरिलें । तें त्या हरीचें ऐश्वर्य कथिलें । ईश्वरा वंचूनि पलायन केलें । कोण्या बोलें हें साच ॥ १९ ॥ ईश्वर सर्वज्ञ श्रीकृष्णनाथ । त्यां कळलीच होती मात । यालागिं घेऊनि तदनुमत । पळाले त्वरित पुरीहूनी ॥ २२० ॥ निजानुमतें कां पळवी हरि । हें परिसावें विचारचतुरीं । जे बळरामाचा संशय दुरी । व्हावया करी कैवाडें हें ॥ २१ ॥ म्हणाल सत्यभामावचन । करिता जाला कां भगवान । यदर्थीं ऐका सावधान । शंकानिरसन होआवया ॥ २२ ॥ शतधन्व्याचे प्रयोजक । हेही दोघे शत्रु देख । तद्वत यांचा वध निष्टंक । भामा सशोक करवील ॥ २३ ॥ जरी प्रियेचें मानस धरूं । तरी निजभक्तातें केंवि मारूं । ऐसा विवरूनियां विचारु । कृष्णें अक्रूर पळविला ॥ २४ ॥ न मारितां अक्रूराप्रति । भंगेल सत्यभामेची प्रीति । यावज्जन्म विकल्पावाप्ति । हें जाणोनि श्रीपति त्यां पळवी ॥ २२५ ॥ भक्तैकपक्षी श्रीहरि । हे बिरुदाची प्रकट थोरी । भक्तापराधिया अवश्य मारी । तर्की अंतरीं कृतवर्मा ॥ २६ ॥ शतधन्व्यासि आमुचा बोध । तेणें सत्राजिताचा केला वध । सर्वज्ञ जाणे श्रीमुकुंद । तें मरणखेद कीं आम्हां ॥ २७ ॥ कृतापराधाची धुकधुक । केंवि हरीतें दाविजे मुख । यालागिं होऊनि सशंक । न कळत देख पळाला ॥ २८ ॥ विकल्पाचे हेतु इतुके । क्षाळावया जगन्नायकें । कैवाड रचिलें तें हें निकें । नृपा श्रीशुकें निरूपिलें ॥ २९ ॥ तें हें स्यमंतकाख्यान । मणिप्रसंगकथा-कथन । मणि लक्षून निरूपण । अक्रूराकडील परिमा हो ॥ २३० ॥ राहो कृतवर्म्याची गोठी । अक्रूरें जाऊनि जाह्नवीतटीं । काशीक्षेत्रीं केली रहाटी । संमत श्रेष्ठीं सर्वत्र ॥ ३१ ॥ तेचि रहाटी म्हणाल कैसी । अक्रूरें वसोनि वाराणसीं । दानपति या अभिधानासी । प्रकट केलें सर्वत्र ॥ ३२ ॥ अहरह कनकभार अष्ट । स्यमंतकमणि प्रसवे श्रेष्ठ । अक्रूर परम स्वधर्मनिष्ठ । तेणें अभीष्ट मख यजिले ॥ ३३ ॥ दानपतिनामा पैं यजमान । रुक्मवेदिकामंडित यज्ञ । साङ्गोपाङ्गविधानज्ञ । करी म्हणोन जन वदती ॥ ३४ ॥ पुन्हा कोण्ही म्हणती ऐसें । येथें कृष्णेंचि स्थापिला असे । दिव्ययज्ञांच्या उद्देशें । गुह्य आपैसें हें कथिती ॥ २३५ ॥ ऐसी जनाची गुजगुज । येथें कृष्णाचें रहस्य गुज । तेंही राया कथितों तुज । ऐकें सहज सिंहदृशा ॥ ३६ ॥ जें सत्यभामा संकर्षण । इत्यादिकांचें समाधान । जनसंग्रहार्थ वृद्धवचन । मान्य करूनि श्रीकृष्णें ॥ ३७ ॥ बाहूनि अक्रूराकारणें । त्यापें मणि मागूनि घेणें । शंका सर्वांची परिहरणें । भगवत्संमत व्याख्यान हें ॥ ३८ ॥ आच्छादूनि हें भगवन्मत । कित्तेक ऋषि लाप-निकार्थ । अक्रूरानयनीं वदती हेत । तो वदोनि दूषित शुकवक्ता ॥ ३९ ॥ तोचि हेतु म्हणाल कैसा । तरी श्रवणीं सादर होऊनि परिसा । अक्रूर गेलिया द्वारकौकसां । ऊठिला वळसा विघ्नांचा ॥ २४० ॥

अक्रूरे प्रोषितेऽरिष्टान्यासन्वै द्वारकौकसाम् । शारीरा मानसास्तापा मुहुर्दैविकभौतिकाः ॥३० ॥

शारीर विघ्नें परोपरी । विविध ज्वर सीतें शारीं । वातपित्तकफविकारीं । द्वारकापुरीं जनक्लेशी ॥ ४१ ॥ चिंता हृद्रोग संताप । तिरस्कार विषाद कोप । मानसविघ्नांचा प्रताप । नाना विकल्प संचरले ॥ ४२ ॥ विघ्नें दैविकें दारुण । प्रयत्न होती लाभशून्य । उल्कापात विद्युत्पतन । अवर्षण दुर्वृष्टि ॥ ४३ ॥ भौतिकें विघ्नें प्रकट जालीं । सर्पवृश्चिकभयें उठिलीं । नगरीं श्वानें पिसाळलीं । कलहाथिलीं मार्जारें ॥ ४४ ॥ महिष भांडती चौवारां । अजा अविकां गोधना वारा । क्षोभ श्वापदां व्याघ्रादि हिंस्रां । महाभेदरा पुरगर्भीं ॥ २४५ ॥ वारंवार दुखणीं बहाणीं । वारंवार बहुधा विघ्नीं । द्वारकेमाजि हे जाचणी । होतां वचनीं जन तर्की ॥ ४६ ॥ अहो अक्रूर येथूनि गेला । तैंहूनि विघ्नां उदय जाला । अनिष्टांचा पूर पेटला । प्रलय मांडला पुरौकसां ॥ ४७ ॥ ऐसें प्राचीन एक ऋषि । वाखाणिती त्यां शुकेन्द्र दूषी । इये श्लोकीं तें परिसावयासी । श्रोतयांसी हे सूचना ॥ ४८ ॥

इत्यंगोपदिशंत्येके विस्मृत्य प्रागुदाहृतम् । मुनिवासनिवासे किं घटेतारिष्टदर्शनम् ॥ ३१ ॥

कोमलवचनीं आमंत्रण । अंग म्हणोनि संबोधन । नृपा संबोधी शुक सर्वज्ञ । सुचवूनियां हरिगरिमा ॥ ४९ ॥ भो भो राया प्राचीनऋषि । विसरोनि श्रीकृष्णगरिमेसी । अक्रूर गेलिया द्वारकेसी । विघ्नें ऐसीं जे वदले ॥ २५० ॥ तयांसि दूषण त्यांचेनि बोलें । कृष्णमहिमा विसरूनि गेले । म्हणोनि अक्रूरा प्रशंसिलें । विघ्नबाहुल्यें वदोनियां ॥ ५१ ॥ अक्रूर कृतवर्म्याच्या उक्ति । शतधन्व्याची निराकृति । तें पूर्वील व्याख्यान विसरोनि पुढती । वाखाणिती अनारिसें ॥ ५२ ॥ कृष्ण असतां द्वारकेआंत । अक्रूर गेलिया महोत्पात । हेंचि व्याख्यान असंमत । काय निमित्त तें ऐका ॥ ५३ ॥ सकळ कल्याणाच्या श्रेणी । तपोधनांच्या आशीर्वचनीं । त्या मुनींचा वास सदैव कृष्णीं । तो द्वारकाभुवनीं हरि असतां ॥ ५४ ॥ कैसें अरिष्टदर्शन घडे । हें बोलणेंचि अवघें कुडें । अक्रूर मात्र गेलिया पुढें । कीं गरिमा उडे कृष्णाची ॥ २५५ ॥ स्फुलिङ्गें वीण अग्निचि वृथा । कीं तरंगेंवीण सागर रिता । तेंवि अक्रूरें वीण कृष्णसामर्थ्या । आली न्यूनता म्हणो ये ॥ ५६ ॥ कृष्ण असतां अक्रूरेंवीण । द्वारके अरिष्टदर्शन । ऐसें कोण्ही वदले गौण । तें अप्रमाण तुज कथिलें ॥ ५७ ॥ हें ऐकोनि राजा पुसे । तरी द्वारके उत्पात संभव कैसे । ये शंकेचें निरासिलें पिसें । व्यासऔरसें हरिइच्छे ॥ ५८ ॥ कृष्ण स्वलीला इच्छामात्रें । चाळी सर्वांचीं अंतरें । भूतें भौतिकें कृष्णतंत्रें । सत्तासूत्रें चेष्टती ॥ ५९ ॥ तस्मात् कृष्णइच्छावशें । अक्रूर वाराणसी प्रवेशे । रामभामेची शंका निरसे । तदुद्देशें उत्पात ॥ २६० ॥ तेचि लक्षूनि उत्पात । द्वारकावासी जन तर्कित । प्राचीन ऋषीचें संमत । तेचि प्रस्तुत अवधारा ॥ ६१ ॥

देवेऽवर्षति काशीशः श्वफल्कायागताय वै ॥ स्वसुतां गांदिनीं प्रादात्ततोऽवर्षत्स्म काशिषु ॥ ३२ ॥

अक्रूर गेलियां उत्पात । जनमानसीं हा वितर्कहेत । प्रेरक सर्वग श्रीकृष्णनाथ । तो ऐका वृत्तान्त जनचर्चा ॥ ६२ ॥ द्वारकावासी वृद्ध वृद्ध । मिळोनि वदती एवंविध । काशिप्रान्तीं अवृष्टिखेद । पूर्वी

जनपद जैं पावे ॥ ६३ ॥ तैं भूपाळ काशीश्वर । करितां वृष्टीचा विचार । श्वफल्क देखोनि पुण्यप्रचुर । स्वकन्या सुंदर त्या अर्पी ॥ ६४ ॥ काशीश्वराची गान्दिनी कन्या । श्वफल्कें करितां निजाङ्गना । परमानंद त्रिभुवना । अमृतघना सुर करिती ॥ २६५ ॥ अमृतरूप जाली वृष्टि । परमानंदें धाली सृष्टि । ऐसी श्वफल्काची गोठी । सुत त्या पोटीं अक्रूर हा ॥ ६६ ॥ यालागीं अक्रूर पुण्यशीळ । गांदिनीजठरीं श्वफल्कबाळ । याचा प्रभाव अमळ । तोही प्राञ्जळ अवधारा ॥ ६७ ॥

तत्सुतस्तत्प्रभावोऽसावक्रूरो यत्र यत्र ह । देवोऽभिवर्षते तत्र नोपतापा न मारिकाः ॥ ३३ ॥

पितरां ऐसाचि प्रभाव याचा । जेथ हा अक्रूर वसे साचा । तेथ वर्षाव पर्जन्याचा । आणि विघ्नाचा असंभव ॥ ६८ ॥ चिंता हृद्रोग संताप । पीडा रोग न बधी अल्प । महामारी अरिष्टकल्प । नुपजे विकल्प कोण्हातें ॥ ६९ ॥ ऐसे जनपद ठायीं ठायीं । वृद्ध मिळोनि वदती पाहीं । तेंचि श्रोत्यांचे श्रवणालयीं । रिघोनि हृदयीं प्रवेशो ॥ २७० ॥

इति वृद्धवच श्रुत्वा नैतावदिह कारणम् ॥ इति मत्वा समानाय्य प्राहाक्रूरं जनार्दनः ॥ ३४ ॥

ऐसें द्वारकेमाजी वृद्ध वृद्ध । लहान थोर बुधाबुध । ठायीं ठायीं करिती वाद । ऐकोनि गोविंद तद्वचनें ॥ ७१ ॥ सभास्थानीं प्रसंगचर्चा । प्रस्ताव केला वृद्धोक्तींचा । वृद्ध मेळवूनियां त्यांचा । अभिप्राय अवगमिला ॥ ७२ ॥ तंव ते म्हणती अक्रूर गेला । तेंहूनि द्वारके उपसर्ग आला । तस्मात् सुकृति अक्रूर भला । कल्याण जनांला तत्संगें ॥ ७३ ॥ हें ऐकोनि जनार्दन । म्हणे यथार्थ वृद्धवचन । यदर्थीं आणीकही कारण । आम्हांलागूनि भासतसे ॥ ७४ ॥ अक्रूर कल्याणाची मूर्ति । हे तों यथार्थचि वृद्धभारती । अपर कारणही यदर्थीं । असे तें चित्तीं विवरा हो ॥ २७५ ॥ स्यमंतकमणि भास्करदत्त । तो जेथ असे अभ्यर्चित । तत्प्रभावही एवंभूत । हेंही यथार्थ कीं ना हो ॥ ७६ ॥ केवळ अक्रूर गेलिया- साठीं । द्वारकेमाजि अरिष्टकोटी । ऐसी प्रशंसूं नये गोठी । अपगत शेवटीं स्यमंतकही ॥ ७७ ॥ जेथ अक्रूराचा निवास । स्यमंतकाचाही तेथेंचि वास । तिये देशीं सुखसंतोष । अरिष्टां विघ्नांस असंभव ॥ ७८ ॥ ऐसें प्राचीन ऋषींचें मत । वाखाणिलें इत्थंभूत । यावरी शुकादिकांचें जें संमत । तो इत्यर्थ अवधारा ॥ ७९ ॥ वृद्धवचन करूनि मान्य । अक्रूराचें गवेषण । करूनि आणवी श्रीभगवान । आज्ञावचनें नृपाचिया ॥ २८० ॥ अक्रूर आणूनि आज्ञावचनें । सम्मानिला नृपसम्मानें । द्वारकेमाजि बसतां तेणें । अरिष्टें विघ्नें उप- शमलीं ॥ ८१ ॥ शुकादिकांचें संमत ऐसें । विघ्नें अरिष्टें जीं बहुवसें । अक्रूरागमनमात्रें निरसे । हें बालिशें प्रशंसिती ॥ ८२ ॥ म्हणाल तरी कां द्वारकापुरीं । अरिष्टें अक्रूर गेलियावरी । हे मुख्य कृष्ण- लीलेची थोरी । यथार्थ चतुरीं जाणावी ॥ ८३ ॥ अक्रूर आलिया द्वारकेआंत । विघ्नें अरिष्टें जालीं शांत । हेंही कृष्णलीलेचें कृत्य । वास्तव अर्थ हा मुख्य ॥ ८४ ॥ अक्रूर द्वारकाभुवना आला । सर्वारिष्टां उपशम जाला । जनपद म्हणती भला भला । पुण्याथिला श्वाफल्कि ॥ २८५ ॥ अक्रूरागमनाहूनि पूर्वीं ।

उग्रसेनासि प्रार्थूनि सर्वीं । संकर्षणातें तो आणवी । उद्धवादिकां प्रेरूनियां ॥ ८६ ॥ बळराम द्वारके आलियावरी । कित्तेक दिवसां जनवैखरी । ऐकोनि अक्रूरा आणवी हरि । सविस्तरीं तें कथिलें ॥ ८७ ॥ देवक वसुदेव उग्रसेन । अपर यादव थोर लहान । कृष्णप्रमुख संकर्षण । सभास्थानीं उपविष्ट ॥ ८८ ॥ वृद्धजनांची मानूनि वाणी । अक्रूरातें चक्रपाणि । पाचारूनियां सभेसी आणी । मग त्या वचनीं काय वदे ॥ ८९ ॥

पूजयित्वाऽभिभाष्यैनं कथयित्वा प्रियाः कथा. । विज्ञाताखिलचित्तज्ञः स्मयमान उवाच ह ॥ ३५ ॥

येतां देखोनि अक्रूरासी । अभ्युत्थानें हृषीकेशी । साधुवचनीं गौरवी त्यासी । प्रियकथांसि कथूनियां ॥ २९० ॥ चिरकाळ वियोगाची वार्ता । आवडीचिया गोष्टी माता । परस्परें अनुवादतां । जाला बोलता काय तया ॥ ९१ ॥ भूत भविष्य वर्तमान । त्रिलोकींचें त्रिकालीन । जाणता म्हणोनि तो अखिलज्ञ । सर्वचितज्ञ सर्वात्मा ॥ ९२ ॥ सर्व विदित असे ज्यासी । वंचन न चले तयापासीं । कोण प्रतारणा तयासीं । करूं शकेल अल्पज्ञ ॥ ९३ ॥ असो ऐसा श्रीभगवान । षड्गुणैश्वर्यसंपन्न । बोलता जाला हास्य करून । अक्रूरालागून तें ऐका ॥ ९४ ॥

ननु दानपते न्यस्तस्त्वय्यास्ते शतधन्वना । स्यमतको मणिः श्रीमान्विदितः पूर्वमेव न. ॥ ३६ ॥

श्रीकृष्ण म्हणे अक्रूरासी । शतधन्व्यानें तुजपासीं । स्यमंतकमणि ठेविला ऐसी । गोष्टी आम्हांसि विदित असे ॥ २९५ ॥ प्रत्यक्ष प्रत्यय बाणला जनीं । तुवां जाऊनि काशीभुवनीं । अहरह अष्टौ भार सुवर्णीं । विविधा यजनीं मख यजिले ॥ ९६ ॥ म्हणसी मणीचें प्रयोजन काय । तरी तोही ऐकें अभिप्राय । मणीचा अधिकारी जो होय । शास्त्रनिर्णय तो कथितों ॥ ९७ ॥

सत्राजितोऽनपत्यत्वाद्गृह्णीयुर्दुहितुः सुताः । दायं निनीयापः पिडान्विमुच्यर्ण च शेषितम् ॥ ३७ ॥

सत्राजितासि अनपत्यता । तद्दायाधिकार दुहितृसुतां । पारलौकिक क्रिया समस्ता । करूनि उर्वरिता विभागा ॥ ९८ ॥ सत्राजितासि पिंडोदक । देती सत्यभामेचे तोक । तदृणविमुक्त जालिया देख । घेती सम्यक शेषदाय ॥ ९९ ॥ शेषदायविभागीं कोण । अभावीं उत्तरोत्तर गौण । मुख्य असतां अपर जाण । अप्रमाण अधिकारा ॥ ३०० ॥ पत्नी पुत्र दौहित्र दुहिता । माता पितर सहोदर भ्राता । तत्सुत साप्त गोत्रीय आप्तां । शिष्यां व्रतस्था पर्यंत ॥ १ ॥ तस्मात्सत्यभामेचे कुमर । स्यमंतकग्रहणीं त्यां अधिकार । तथापि स्यमंतकरक्षणपर । कोण्ही अपर हों न शके ॥ २ ॥

तथापि दुर्द्धरस्त्वन्यैस्त्वय्यास्तां सुव्रते मणिः । कि तु मामग्रजः सम्यङ्न प्रत्येति मणि प्रति ॥ ३८ ॥

अबाधितें सुष्ठुव्रतें । जया पुरुषाचीं शुभ सुकृतें । तयावेगळा आणिकातें । मणि सर्वार्थें दुर्धर हा ॥ ३ ॥ यालागीं तूं सुष्ठुव्रती । म्हणोनि मणि हा तुझ्याचि हातीं । असो ऐसी आमुची मति ।

हृदयीं निश्चिती जाणावी ॥ ४ ॥ तरी कां मणीची चर्चा करितां । ऐसा संशय बांधील चित्ता । कीं जे अग्रजें माझिये माथां ॥ ३०५ ॥ मणिवंचकता आरोपिली । मणिवंचक मी नोहें ऐसा । अग्रजा प्रत्यय न बाणे सहसा । यालागिं सर्वांचिया मानसा प्रत्यय बाणे तें करीं ॥ ६ ॥ निःसंशय सर्वांतरीं । कैसेनि बाणे म्हणसी जरी । यदर्थीं अक्रूरा तूं अवधारीं । मम वैखरी विश्वासें ॥ ७ ॥

दर्शयस्व महाभाग बंधूना शांतिमावह । अव्युच्छिन्ना मखास्तेऽद्य वर्तन्ते रुक्मवेदयः ॥ ३९ ॥

मणि दाखवीं सभास्थानीं । स्नेह वाढवीं बंधुजनीं । विकल्पाची निरसीं रजनी । भेदभानीं प्रापक जे ॥ ८ ॥ येचि समयीं अक्रूरापासीं । कृष्णें मणि दिधला ऐसी । शंका नुपजेचि कोण्हासी । कारण ये विशीं अवधारीं ॥ ९ ॥ सुवर्णवेदिकामंडित मख । संतत यजिले तां सम्यक । तें धन प्रसवे स्यमंतक । हेतु प्रत्यक्ष हा येथें ॥ ३१० ॥ तस्मात् वसतां वाराणसीं । स्यमंतक होता तुजचिपासीं । परिहार न करितां हें सर्वांसी । प्रत्ययासि प्रकाशक ॥ ११ ॥ प्रेमळ तूं आमुचा इष्ट । अवंचक सत्य स्वधर्मनिष्ठ । इष्टांमाजि विकल्प कष्ट । ते तां स्पष्ट निरसावे ॥ १२ ॥

एवं सामभिरालब्धः श्वफल्कतनयो मणिम् । आदाय वाससाच्छन्नं ददौ सूर्यसमप्रभम् ॥ ४० ॥

ऐसा कृष्णें आपुल्या मुखें । सामोपचारें मधुर वाक्यें । प्रार्थिला असतां श्वफल्कतोकें । दीर्घविवेकें विचारिलें ॥ १३ ॥ मिथ्याभिशापनिरसना । मणिदर्शन करी स्वजना । दुर्द्धर मिषें प्रत्यर्पणा । निरभिलाषता सूचविली ॥ १४ ॥ एवं मणिदर्शनीं कांहीं । कृष्णें दूषण माझ्या ठायीं । न लाविलें हें जाणोनि हृदयीं । मणि ते समयीं उघडिला ॥ ३१५ ॥ वस्त्रें आच्छादिला होता । तो ते समयीं जाला देता । सूर्यासमान प्रभाढ्यता । भासे तत्वता रविवलय ॥ १६ ॥ कृष्णवाक्यें सभास्थानीं । प्रकट केला स्यमंतकमणि । त्यातें देखतां सर्वां नयनीं । झांपडी पडिली बहुतेजें ॥ १७ ॥

स्यमंतकं दर्शयित्वा ज्ञातिभ्यो रज आत्मनः । विमृज्य मणिना भूयस्तस्मै प्रत्यर्पयत्प्रभुः ॥ ४१ ॥

सभास्थानीं गोत्रजांप्रति । मणीतें दावूनि ऐसिया रीती । मिथ्याभिशापाची दुरुक्ति । आपुली श्रीपति प्रक्षाळी ॥ १८ ॥ मणिदर्शनें दूषणरज । आपुलें क्षाळूनि अधोक्षज । पुढती स्यमंतक तेजःपुंज । अर्पिला सहज अक्रूरातें ॥ १९ ॥ प्रभु समर्थ श्रीगोविंद । यथार्थ केला पूर्वानुवाद । मणिदर्शनें क्षाळिला बाध । तैं निरपराध हरि कळला ॥ ३२० ॥ शुक म्हणे गा विचक्षणा । कुरुभूपाळमौळाभरणा । ऐसिया या स्यमंतकाख्याना । करितां श्रवणा फळ ऐकें ॥ २१ ॥

यस्त्वेतद्‌भगवत ईश्वरस्य विष्णोर्वीर्याढ्यं वृजिनहरं सुमंगलं च ।
आख्यानं पठति शृणोत्यनुस्मरेद्वा दुष्कीर्तिं दुरितमपोह्य याति शांतिम् ॥ ४२ ॥

जो हें ईश्वरा भगवंताचें । वीर्याढ्य आख्यान ऐके साचें । अथवा जो पढेल स्ववाचे । श्रीशुक त्याचें फळ वर्णी ॥ २२ ॥ समष्टीपासून दृश्य भान । गौणप्रकृतीतें व्यापून । वर्त्ते विष्णु जो श्रीकृष्ण । पुण्याख्यान हें त्याचें ॥ २३ ॥ ऊर्जितप्रतापमंडित यश । लीला प्रकटी हृषीकेश । श्रवणें पठणें दुःखनिरास । करी अशेष सुमंगळ जें ॥ २४ ॥ श्रवणपठणें अनुस्मरणें । दुष्कीर्ति दुरित नाशे येणें । अक्षयशान्ति शुभ कल्याणें । श्रोते वक्ते अनुभविती ॥ ३२५ ॥ ऐशी श्रीमद्भागवतीं । दशमस्कंधीं श्रीशुकोक्ति । स्यमंतकाख्यान कथिलें निगुती । यथामति तें निरूपिलें ॥ २६ ॥ पुढें अध्यायीं अठ्ठावन्नें । श्रीकृष्ण पंच पाणिग्रहणें । करील तियें कथेच्या श्रवणें । भव निस्तरणें भाविकीं ॥ २७ ॥ अखिलात्मकत्वें एकनाथ । चिदानंदाख्य घन वर्षत । तेणें स्वानंदें सनाथ । करी गोमंत गोगोप्ता ॥ २८ ॥ तया गोविंदचरणजळें । सप्रेम दयार्णव उचंबळे । श्रवणरसिकां लाभतीं फळें । सुखकल्लोळें निमज्जनीं ॥ ३२९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां स्यमंतकाख्यानं नाम सप्तपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५७ ॥

श्लोक ४२ ॥ ओवी-संख्या ३२९ ॥ एवं संख्या ३७१ ॥
(सत्तावन्नावा अध्याय मिळून ओवीसंख्या २७३२६)

अध्याय सत्तावन्नावा समाप्त

कृष्णदयार्णवकृत

# हरिवरदा

## अध्याय ५८ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीमत्पंढरपुरवासिने नमः । परमपूज्या पूज्यतमा । परमपुरुषा श्रीपरमात्मा । गुणगणगरिमा अगम्य निगमा । गोविंदनामा गोमंता ॥ १ ॥ तव वराच्या प्रतापतेजें । सत्तावन्नाध्याय वोजे । वाखाणिले ते परिसोनि सहजें । सत्समाजें गौरविलें ॥ २ ॥ आतां अठ्ठावन्नाविया । सज्जन सादर परिसावया । तो तव कृपेच्या वराश्रया । लाहूनि अन्वया वाखाणीं ॥ ३ ॥ शुक म्हणे गा कुरुनररत्ना । तुवां न करितांही प्रश्ना । सादर श्रवणीं देखोनि तृष्णा । उल्लास कृष्णान्वयकथनीं ॥ ४ ॥ क्षुधित भोक्ता भोजनपात्रीं । रुचि आस्वादक पदार्थमात्रीं । परिवेषक तें देखूनि नेत्रीं । अर्पी स्वकरीं न याचितां ॥ ५ ॥ तेंवि तव श्रवणास्थेच्या तोषें । कथनीं ममान्तर उल्लासे । यालागीं सादर होऊनि परिसें । निःश्रेयसदें हरिचरितें ॥ ६ ॥

श्रीशुक उवाच–एकदा पाण्डवान्द्रष्टु प्रतीतान्पुरुषोत्तमः । इंद्रप्रस्थं गतः श्रीमान्युयुधानादिभिर्वृतः ॥ १ ॥

राया अठ्ठावन्नीं कथा । पंच पाणिग्रहणें कर्ता । जाला श्रीकृष्ण तत्वता । ते तूं वार्ता अवधारीं ॥ ७ ॥ कालिंदीच्या पाणिग्रहणा । हृदयीं चिंतूनि द्वारकाराणा । गेला पाण्डवांचिया दर्शना । सवें युयुधाना घेऊनि ॥ ८ ॥ कालिंदीचा उद्वाहकाम । किमर्थ चिंती मेघश्याम । तरी तो स्वजन-कल्पद्रुम । जाणोनि प्रेम तयेचें ॥ ९ ॥ असो हें प्रसंगें येईल पुढें । प्रस्तुत पाण्डवदर्शनचाडे । गेले इंद्रप्रस्थाकडे । तेंचि निवाडें अवधारा ॥ १० ॥ रुक्मिणी आणि जाम्बवती । तृतीय सत्यभामा युवती । तद्विलासप्रेमासक्ति । लालस श्रीपतिरतिरसिका ॥ ११ ॥ आहुकभूपासन्निधानीं । सुखोपविष्ट

सभास्थानीं । स्वधर्मचर्चापुण्यश्रवणीं । चक्रपाणि वर्ततसे ॥ १२ ॥ उखामंडळीं मृगयामिषें । भोजान्धकवृष्णिसरिसे । भ्रमण करितां सुखसंतोषें । मुनिमानसें प्रोत्साही ॥ १३ ॥ ऐसा आनंदभरित काळ । क्रमित असतां श्रीगोपाळ । तंव आठवला पुण्यशीळ । हृदयकमळीं युधिष्ठिर ॥ १४ ॥ मग कोण्हे एके सुदैव दिवसीं । पाण्डवप्रेमें हृषीकेशी । जाकळूनि त्यां देखावयासी । इंद्रप्रस्थासी चालिला ॥ १५ ॥ प्रेमें जाकळावया कारण । जे लाक्षागारीं पाण्डवां मरण । तेचि प्रकटले पुन्हां वांचोन । पाञ्चाळभुवनीं अकस्मात ॥ १६ ॥ द्रौपदीचिये स्वयंवरीं । प्रकट जाले पाञ्चाळपुरीं । यंत्र भेदूनि राजे समरीं । जिणोनि नोवरी परणिली ॥ १७ ॥ कौरवांचा भंगिला दर्प । दाविला भूचक्रीं प्रताप । इंद्रप्रस्थीं युधिष्ठिर नृप । गृहस्थ होऊनि नांदतसे ॥ १८ ॥ ऐसिया पाण्डवांतें श्रीपति । पहावयाकारणें सप्रेमप्रीति । सात्यकिप्रमुख वाहिनीपति । दारुक सारथि रथ सज्जी ॥ १९ ॥ शुभमुहूर्तीं द्वारकापुर । सोडूनि निघाला जगदीश्वर । वामभागीं चास मयूर । जातां सूचिती शुभ शकुन ॥ २० ॥ दक्षिणभागीं सवत्स धेनु । स्वर्चित ब्राह्मण प्रसन्नवदन । भेटले तिहीं आशीर्वचन । देऊनि कल्याण इच्छिलें ॥ २१ ॥ कुंजरपृष्ठीं प्रस्थानभेरी । भ्रूसंकेतें ठोकिल्या गजरीं । जननीजनकां भूपा हरि । नमूनि रहंवरीं आरूढले ॥२२॥ लंघूनि साभ्रमतीचें जळ । पुष्करतीर्थीं श्रीगोपाळ । तीर्थविधानें क्रमूनि काळ । मथुरामंडळ ठाकिलें ॥२३॥ तेथूनि पातले पुरंदरप्रस्था । गजभेरीचा ध्वनि ऐकतां । युधिष्ठिरराया किंकरीं वार्ता । निवेदन करितां जाणवला ॥ २४ ॥ भीमार्जुनयुधिष्ठिर । सहित माद्रीचेही कुमर । वार्ताश्रवणें अतिसत्वर । कैसे उठिले तें ऐका ॥ २५ ॥

दृष्ट्वा तमागतं पार्था मुकुंदमखिलेश्वरम् । उत्तस्थुर्युगपद्वीराः प्राणा मुख्यमिवाऽऽगतम् ॥ २ ॥

एकेचि समयीं पांचही वीर । वळघोनि उत्तुंग गोपुर । समीप देखोनियां श्रीधर । धांविले सत्वर सामोरे ॥ २६ ॥ अवयव इंद्रियें पंचप्राण । उपरम पावतां विश्वाभिमान । असतांही सचेतन । वृत्तिशून्य तीं आघवीं ॥ २७ ॥ कीं मुख्यविश्वाभिमानागमनें । होती सर्वही सचेतनें । स्वव्यापारीं प्राणकरणें । तच्चैतन्यें प्रवर्तती ॥ २८ ॥ तेंवि अखिलात्मा अखिलेश्वर । मुकुंद सुखकंद श्रीधर । तदागमनें अतिसत्वर । उठिले कुमर पाण्डूचे ॥ २९ ॥ चंद्रें अधिष्ठितां उदयाद्रि । सिंधुजळ धांवे सामोरी । तेंवि पाण्डव पादचारी । सेविती हरि अभिगमनें ॥ ३० ॥ पांचही बंधु एकेचि समयीं । देखोनियां शेषशायी । कैसे भेटते जाले तेंही । श्रवणालयीं निवेदितों ॥ ३१ ॥

परिष्वज्याच्युतं वीरा अंगसंगहतैनसः । सानुरागस्मितं वक्त्रं वीक्ष्य तस्य मुदं ययुः ॥ ३ ॥

रथीं असतां जनार्दन । सर्वीं करूनि अभिवंदन । सप्रेम प्रीती हास्यवदन । अवलोकून निवाले ॥ ३२ ॥ युधिष्ठिराचिया आगमनीं । रथावरूनि चक्रपाणि । भेटता जाला उतरूनि धरणी । पाहूनि नयनीं संतुष्ट ॥ ३३ ॥ अच्युतातें आलिंगून । पाण्डव निवाले संपूर्ण । जालें पापाचें क्षालन । असंगांगसंस्पर्शें ॥ ३४ ॥ तिये भेटीचा विचार । यथाशास्त्र वृद्धाचार । तो तूं ऐकें सविस्तर । श्रवणीं सादर होऊनी ॥ ३५ ॥

युधिष्ठिरस्य भीमस्य कृत्वा पादाभिवंदनम् । अर्जुन परिरभ्याथ यमाभ्यां चाभिवंदितः ।। ४ ।।

युधिष्ठिरासह भीमाचे । कृष्णें चरण वंदिले साचे । समानवयस्का अर्जुनाचें । हृदय हृदयीं आळंगिलें ।। ३६ ।। माद्रीतनय चरणांवरी । मस्तक ठेवूनि नमिती हरि । कृष्णें स्पर्शोनि शंतमकरीं । अतिसत्वरी उठविले ।। ३७ ।। कृष्णदर्शनें मोदावाप्ति । संस्पर्शनें अघनिवृत्ति । मग भेटले सप्रेम भक्ति । युयुधानादि अनुगातें ।। ३८ ।। बैसोनियां एके रथीं । नगरीं चालतां राजपथीं । पुढें नगरजनांच्या पंक्ति । हरि अर्चिती सप्रेमें ।। ३९ ।। कुर्वंड्नि सांडिती बळी । साष्टांग नमिती भूमंडळीं । गीतनृत्यांची धुमाळी । वाहूनि टाळी हरि स्मरती ।। ४० ।। बहुविध वाद्यें दोहींकडे । सप्रेमदर्शनाचिये चाडे । लोक दाटतां पुढें पुढें । वेत्रपाणि निवारिती ।। ४१ ।। ऐसिया परी परमोत्साहीं । सदना नेऊनि शेषशायी । पाण्डव करिते जाले कायी । तें तूं नवायी अवधारीं ।। ४२ ।।

परमासनमासीनं कृष्णा कृष्णमनिन्दिता । नवोढा व्रीडिता किंचिच्छनैरेत्याभ्यवन्दत ।। ५ ।।

परमश्रेष्ठ दिव्यासन । तेथें बैसविला भगवान । येर यादव सह युयुधान । सभास्थानीं बैसविले ।। ४३ ।। लावूनि अंतर्धानपट । पांचही बंधु कृष्णानिकट । याज्ञसेनी अंतर्निष्ठ । येती जाली हरिनमना ।। ४४ ।। कृष्णा म्हणिजे याज्ञसेनी । अनिंदिता या विशेषणीं । विशेषिली काय म्हणोनी । तें सज्जनीं परिसावें ।। ४५ ।। पांचा बंधूंसि भार्या एकी । निर्दोष सुस्नात अग्निमुखीं । यास्तव निंदेच्या कलंकीं । कोण्ही न नोकी जगत्त्रयीं ।। ४६ ।। ऐसी द्रौपदी नव नोवरी । पाण्डवें सहित देखोनि हरि । किंचित् व्रीडिता स्वशरीरीं । आली बाहेरी मंदगती ।। ४७ ।। आच्छादूनियां अंगयष्टि । श्रीकृष्णाचे चरण दृष्टी । नमिती जाली ते गोरटी । उत्साह पोटीं मानूनी ।। ४८ ।। द्रौपदी कृष्णासि बोलावया । कांहीं संकोच करील राया । म्हणोनि यादवां पूजावया । पाण्डवीं सपर्या आणिली ।। ४९ ।।

तथैव सात्यकिः पार्थैः पूजितश्चाभिवंदितः । निषसादाऽऽसनेऽन्ये च पूजिताः पर्युपासत ।। ६ ।।

जैसा श्रीकृष्ण सम्मानिला । तैसाचि युयुधानही पूजिला । पृथगासनीं बैसविला । संतोषविला उपचारीं ।। ५० ।। तयाचिपरी अन्य यादव । कृष्णपार्षद जे कां सर्व । सभास्थानीं कृतगौरव । पूजा तदर्ह त्यां केली ।। ५१ ।। समस्तांचें औपासन । लक्षूनि तिष्ठती पांचै जण । तंव येरीकडे श्रीभगवान । काय करी तें ऐका ।। ५२ ।।

पृथां समागत्य कृताभिवादनस्तयातिहार्दार्द्रदृशाऽभिरंभितः ।
आपृष्टवांस्तां कुशलं सहस्नुषां पितृष्वसारं परिपृष्टबांधवः ।। ७ ।।

पृथेप्रति जनार्दन । येऊनि करी अभिवादन । तिणें देखतां भ्रातृनंदन । आसनावरून ऊठिली ।।५३।। हार्द म्हणिजे स्नेहसुभरें । आर्द्र दृष्टी जळ पाझरे । पृथेनें तया सप्रेमभरें । श्रीकृष्ण आदरें आळंगिला ।।५४।।

मग तयेनें क्षेमकुशल । पुशिलें स्वबंधुवर्ग सकळ । तैसाचि भावुजयांचा मेळ । कंकाकंसादि पुशिलिया ॥५५॥ श्रीकृष्णाच्या सापत्नमाता । इरा मदिरा देवरक्षिता । रोहिणीप्रमुखा त्या समस्ता । संतानसहिता पुशिलिया ॥ ५६ ॥ स्नुषासहित कुंतीप्रति । क्षेम पुसे स्वयें श्रीपति । हें ऐकोनि अश्रुपातीं । गहिंवरें कुंती दाटली ॥ ५७ ॥

तमाह प्रेमवैक्लव्यरुद्धकंठाश्रुलोचना । स्मरंती तान्बहून्क्लेशान्क्लेशापायात्मदर्शनम् ॥ ८ ॥

सप्रेमस्नेहाचिये भरीं । कळवळूनियां अभ्यंतरीं । कंठ दाटोनि स्फुंदन करी । बाष्प नेत्रीं पाझरती ॥ ५८ ॥ श्रीकृष्णातें बोले वचनीं । कौरवांची कापट्यकरणी । भस्म केलें लाक्षासदनीं । कीं गरदानीं भीमवध ॥ ५९ ॥ गान्धारांचिया दुरुक्ति दुष्टा । कीं सौबळादिकांचिया कुचेष्टा । नित्य नूतन देती कष्टा । नेणों अभीष्टा तद्योगें ॥ ६० ॥ पदोपदीं दुःखराशि । किती सांगाव्या तुजपाशीं । तूं नांदसी हृदयकोशीं । सर्व जाणसी हृदयस्थ ॥ ६१ ॥ बहुतां क्लेशांतें स्मरोन । ग्लानि पावोनि करी कथन । करुणावत्सल श्रीभगवान । तत्कारुण्य वांछितसे ॥ ६२ ॥ निजभक्तांचे जितुके क्लेश । निरसावया ते अशेष । आपणातें दर्शवी त्यांस । तेणें क्लेशांस भंग करी ॥ ६३ ॥ दर्शनें क्लेश निवारी सर्व । ऐसा नैसर्गिक स्वभाव । तो तूं प्रत्यक्ष वासुदेव । आमुची कींव तुजपोटीं ॥ ६४ ॥

तदैव कुशलं नो भूत्सनाथास्ते कृता वयम् । ज्ञातीन्नः स्मरता कृष्ण भ्राता मे प्रेषितस्त्वया ॥ ९ ॥

तैंचि आमुचें कल्याण जालें । जैं तां कृपेनें सनाथ केलें । आम्हां बंधूंतें हृदयीं स्मरिलें । सांभाळिलें कृपेनें ॥ ६५ ॥ आमुचा कळवळा अंतरा । म्हणोनि मम भ्राता हस्तिनापुरा । अक्रूरनामा धाडिला खरा । तैं तेणें लेंकुरां आश्वासिलें ॥ ६६ ॥ जैं तां पाठविला श्वाफल्कि । तेणें आम्हांसि केलें सुखी । अन्याय धृतराष्ट्रामस्तकीं । बोधिलीं निकीं धर्मवाक्यें ॥ ६७ ॥ आपुल्या ज्ञातीसमान आम्हां । तुवां लेखिलें पुरुषोत्तमा । आप्त परकीय मोहभ्रमा । तूं परमात्मा नातळसी ॥ ६८ ॥ आपपर हें तुझ्या ठायीं । कोण्हे काळीं स्पर्शलेंचि नाहीं । म्हणसी कंसादि वधिले तेही । ऐकें नवाई तुज कथितें ॥ ६९ ॥

न तेऽस्ति स्वपरभ्रांतिर्विश्वस्य सुहृदात्मनः । तथापि स्मरतां शश्वत्क्लेशान्हंसि हृदि स्थितः ॥ १० ॥

आत्मयाहूनि प्रियतम सुहृद । अपर कोण तो शाश्वत सुखद । विश्वसोयरा तूं आम्हां विशद । सच्चिदानंदा परमात्मा ॥ ७० ॥ स्वपर ऐशी अविद्याभ्रांति । अविद्याग्रस्तां जीवांप्रति । तुझ्या ठायीं नसे श्रीपति । तथापि चरितीं भासतसे ॥ ७१ ॥ ऐकें तयाचें कारण । तूं हृदयस्थ सर्वग पूर्ण । भजतां छेदिसी अविद्यावरण । विवेकसंपन्न करूनियां ॥ ७२ ॥ विवेकसंपन्न कृपेनें करिसी । तैं अविवेकाची निरसे निशी । विस्मरणाचिये सुपुप्तीसी । शांति आपैसी मग होय ॥ ७३ ॥ विस्मरणाचिये सुषुप्तीमाजि । भेदभ्रमाची स्वप्नराजि । साच मानूनि क्लेशपुंजीं । बुडूनि सहजीं तळमळिती ॥ ७४ ॥ तें सत्स्मरण

दिनोदयीं । विस्मरणाची सुप्ति नाहीं । तैं भेदभ्रमाच्या स्वप्नीं पाहीं । क्लेश कायी उतरतील ।। ७५ ।। शश्वत्स्मरणाच्या जागरीं । क्लेशहंता तूं हृदयस्थ हरि । भेदभ्रमितां क्लेशकारीं । सुषुप्तीभरीं विसराचे ।। ७६ ।। यालागीं तूंतें निरंतर स्मरती । तत्क्लेशहंता तूं श्रीपति । भेदभ्रमें तुज द्वेषिती । ते भाविती शत्रुत्वें ।। ७७ ।। पितृष्वसेनें इत्यादिवचनीं । संसारसुखदुःखांची कहाणी । निवेदिली ते ऐकोनि श्रवणीं । आज्ञा घेऊनि निघाला ।। ७८ ।। मग येऊनि सभागारा । सात्यकिप्रमुखां यादववीरां । सहित येऊनि युधिष्ठिरा । पाण्डुकुमरांसह बैसे ।। ७९ ।। तिये काळीं बद्धपाणि । धर्म बोलिला सरळवाणी । ते तूं कौरवचूडामणि । ऐकें श्रवणीं सप्रेमें ।। ८० ।।

युधिष्ठिर उवाच-कि न आचरितं श्रेयो न वेदाहमधीश्वर । योगेश्वराणां दुर्दर्शो यन्नो दृष्टः कुमेधसाम् ।। ११ ।।

प्रतिब्रह्मांडीं ईश्वर एक । मायानियंता गुणव्यापक । तूं अखिल ब्रह्मांडात्मक । अधीश्वर सम्यक संबोधनें ।। ८१ ।। भो भो अखिलेश्वरा हरि । आम्ही अनेक जन्मान्तरीं । आचरलों जीं सुकृतें भारी । नेणवे थोरी कर्मांची ।। ८२ ।। जया कर्मांच्या आचरणीं । आम्ही कुमतिनिबद्ध त्रिगुणीं । अविद्याचक्रीं संसारभ्रमणीं । विषयवाहणीं कुमेधसा ।। ८३ ।। ऐसिया आम्हांसि तव दर्शन । हें नेणवे सुकृत कोण । योगियांचे जे ईश्वर पूर्ण । त्यांहीलागून दुर्घट जें ।। ८४ ।। तस्मात् आमुचीं सुकृतें सफळ । आजि उद्धरली पूर्वजमाळ । जन्मसार्थक आजि केवळ । जें देखों गोपाळ प्रकट आम्ही ।। ८५ ।। ऐसा पाण्डवीं स्तुतिस्तवनीं । संतोषवूनि चक्रपाणि । बहुधा प्रार्थूनियां विनवणी । करूनि चरणीं लागती ।। ८६ ।। विषयमृगजळभ्रांती भ्रमतां । उद्दामदैवें आजि अमृता । मेळविलिया तृषाक्रांता । पुरवीं आस्था धणीवरी पैं ।। ८७ ।। एवं अनेक जन्मपाठीं । फळल्या अनेकसुकृतकोटी । तेणें तव पद पडिलें दृष्टी । परी वासना पोटीं उरलीसे ।। ८८ ।। ते तूं वासना म्हणसी काय । जे वार्षिक मासचतुष्टय । स्थिर होऊनि आमुचें हृदय । निववीं सदयशिरोमणि ।। ८९ ।। स्वभक्तांचे प्रार्थनोत्तरीं । कृपे कळवळूनियां श्रीहरि । इंद्रप्रस्थीं मास चारी । धर्ममंदिरीं स्थिरावला ।। ९० ।।

इति वै वार्षिकान्मासान्राज्ञा सोऽभ्यर्थितः सुखम् । जनयन्नयनानंदमिंद्रप्रस्थौकसां विभु. ।। १२ ।।

विश्वविभवाचें कारण । विभुसमर्थ तो भगवान । नृपें अभ्यर्थितां पूर्ण । सुखसंपन्न हृत्कमळीं ।। ९१ ।। सुखसंपन्न जैसा होय । राहता जाला तैसिया स्नेहें । कीं प्रार्थनेचिया अभिप्रायें । सुखतम सदय होत्साता ।। ९२ ।। इंद्रप्रस्थींचिया जनां । दर्शनानंदें निववी नयनां । चातुर्मास्य काळक्रमणा । करिता जाला वार्षिकी ।। ९३ ।। अनेक क्रीडा सभागारीं । मृगयाव्याजें गिरिकांतारीं । धनुर्विद्येच्या अभ्यासकुसरी । परस्परीं ते दाखविती ।। ९४ ।। नाट्यनृत्यगीतश्रवणें । धर्मचर्चा श्रुतिपुराणें । धनुर्वेदाच्या व्याख्यानें । छात्ररत्नें गौरविती ।। ९५ ।। कालिंदीची तपश्चर्या । आली जाणोनि फळोदया । कोण्हे एके दिवशीं राया । धनंजयासह कृष्ण ।। ९६ ।।

एकदा रथमारुह्य विजयो वानरध्वजम् । गांडीवं धनुरादाय तूणौ चाक्षयसायकौ ।। १३ ।।
साकं कृष्णेन सन्नद्धो विहर्तुं विपिनं वनम् । बहुव्यालमृगाकीर्णं प्राविशत्परवीरहा ।। १४ ।।

कोण्हे एके अपूर्व समयीं । विजयनामा अर्जुन पाहीं । वानरध्वज रथाच्या ठायीं । आरूढोनियां निघाला ।।९७।। अग्निदत्त अमोघ बाण । तिहीं भरिले अक्षय तूण । गांडीव चापातें घेऊन । रथारोहण करूनियां ।।९८।। कृष्णेंसहित सन्नद्धबद्ध । मृगयेकारणें साटोप सिद्ध । विपिनीं विहरावया प्रसिद्ध । गहन अगाध प्रवेशले ।। ९९ ।। कैसें म्हणाल अगाध गहन । व्याघ्रप्रमुखमृगाकीर्ण । सर्प वृश्चिक शकुंत श्येन । ऋक्षराक्षसकपिव्याप्त ।। १०० ।। ऐसिये वनीं कोंवि निर्भय । तरी परवीरहंता वीर विजय । प्रवेशावया कारण काय । तोही अन्वय अवधारा ।। १ ।।

तत्राविध्यच्छरैर्व्याघ्रान्सूकरान्महिषान्रुरून् । शरभान्गवयान्खड्गान्हरिणाञ्शशशल्लकान् ।। १५ ।।
तान्निन्युः किंकरा राज्ञे मेध्यान्पर्वण्युपागते । तृट्परीतः परिश्रांतो बीभत्सुर्यमुनामगात् ।। १६ ।।

पर्वणी प्राप्त जाली असतां । धर्मराजाच्या मखकार्यार्था । पवित्र श्वापदें पाठविता । जाला तत्त्वता वधूनियां ।। २ ।। तेथ पारधी करितां वनीं । वधिल्या श्वापदांचिया श्रेणी । त्या निरूपी बादरायणि । ऐकें श्रवणीं परीक्षिति ।। ३ ।। रथ लोटूनि पवनवेगें । धुंडावितां दरकुटें दांगें । क्रूरश्वापदांचिया लागें । देखतां मागें चौकटती ।। ४ ।। तेथ बाणें विंधी व्याघ्रा । महिषा रुरू मृगां सूकरां । शरभां गवयां खड्गां इतरां । शशशल्लकां सारंगा ।। १०५ ।। तया श्वापदांचिया श्रेणी । कावडी भरूनि किंकरजनीं । यज्ञसिद्ध्यर्थ पुण्यपर्वणी । नृपाकारणें नेयिजती ।। ६ ।। ऐशीं यज्ञार्थ श्वापदें मेध्यें । वधूनि पाठविलीं पैं सद्यें । बीभत्सुनामा अर्जुन मोदें । सहमुकुंदें विहरतमे ।। ७।। मारितां श्वापदांचिया श्रेणी । भास्करतापें परिश्रांत वनीं । तृषार्त यमुनेतें टाकुनी । गांडीवपाणि पातला ।। ८ ।। भास्करें लंघूनियां मध्याह्ना । प्रतीची उजू करितां गमना । कृष्णार्जुन यमुनापुलिना । जवें स्यंदनामाजि आले ।। ९ ।। प्राशूनि यमुना-जळ निर्मळ । तुरंग जाले सुशीतळ । त्यानंतरें पार्थ गोपाळ । सेविती सलिल तें ऐका ।। ११० ।।

तत्रोपस्पृश्य विशदं पीत्वा वारि महारथौ । कृष्णौ ददर्शतुः कन्यां चरन्तीं चारुदर्शनाम् ।। १७ ।।

महारथी कृष्णार्जुन । करूनि करचरणक्षाळण । करिती निर्मळ जळप्राशन । छाया सेवून स्थिरावले ।। ११ ।। कृष्णा आणि धनुर्धरा । कृष्णनामचि दोघां वीरां । देखते जाले ते सुंदरा । कन्या नीरामाजिवडी ।। १२ ।। दर्शनमात्रें समाधाना । पाववी यास्तव चारुदर्शना । यमुनाजीवनीं क्रीडतां नयनां । गोचर जाली उभयांच्या ।। १३ ।। श्रीकृष्ण म्हणे पार्था सखया । कांहीं अपूर्व देखिलें राया । येरु म्हणे स्वामीचिया । वचनें जाणाया अर्हता ।। १४ ।। ऐकोनि म्हणे श्रीभगवान । पैल यमुनेंत कन्यारत्न । क्रीडतां तीचें लावण्यकिरण । फाकतां पुलिन प्रकाशिती ।। ११५ ।। तुवां जावोनि तियेप्रति । प्रश्न करावा विविधा रीती । कोण कोणाची दुहिता युवती । काय वांछिती हृत्कमळीं ।। १६ ।। कोठूनि

आली वसे कोठें । काय तयेतें अभीष्ट मोठें । जरी हें मद्वाक्य प्रियतम वाटे । तरी तूं वेठें तत्कार्या ॥१७॥ ऐकोनि प्रभूचें आज्ञावचन । जिवलग सखा प्रिय फाल्गुन । जाता जाला त्वरेंकरून । तें तूं श्रवण करीं राया ॥ १८ ॥

तामासाद्य वरारोहां सुद्विजां रुचिराननाम् । पप्रच्छ प्रेषितः सख्या फाल्गुनः प्रमदोत्तमाम् ॥ १८ ॥

सखया कृष्णानें प्रेरिला । फाल्गुन सवेग तियेप्रति गेला । जावोनि प्रश्न करिता जाला । कृष्णाज्ञेला लक्षूनी ॥ १९ ॥ अर्जुनें देखिलें कन्यारत्न । सुरेख अवयव रूपलावण्य । विशेषणीं तें व्यासनंदन । करी निरूपण भूपातें ॥ १२० ॥ जयेचे आरोह वर उत्तम । सुंदर दशन हिरियांसम । सशंक मयंक वदनपद्म । देखोनि पावे क्षयरोगा ॥ २१ ॥ मदिरा मादक आस्वादनें । श्रीमद् ऊर्जित ऐश्वर्यगुणें । ललना लावण्य ललितेक्षणें । प्रमदा म्हणणें यालागीं ॥ २२ ॥ त्यामाजि साध्वी सद्गुणखाणी । सुभगा सुशीला कल्याणी । प्रमदोत्तमा तये लागूनी । वदती मुनि शास्त्रज्ञ ॥ २३ ॥ ऐशी लावण्यगुणसंपत्ति । अर्जुन देखोनि तियेप्रति । पुमता जाला सख्याच्या उक्ति । त्या तूं नृपति अवधारीं ॥ २४ ॥

का त्वं कस्यासि सुश्रोणि कुतो वा किं चिकीर्षसि । मन्ये त्वां पतिमिच्छंती सर्वं कथय शोभने ॥ १९ ॥

कोण कोणाची तूं कन्या । सुंदर श्रोणी नितंबजघना । ललितापांगी रुचिरानना । परम शोभना सौंदर्यें ॥ १२५ ॥ अवो शोभने सुमध्यमे । कोठूनि आलीस कोण्या नामें । येथें वर्तसी कोण्या कामें । हें सप्रेमें मज सांगें ॥ २६ ॥ मी मानितों तूंतें ऐसें । जें पति वांछिसी निजमानसें । यावरी तवाभिप्रेत जैसें । तें अनायासें मज सांगें ॥ २७ ॥ ऐशा परिसोनि फाल्गुनोक्ति । जाली कालिंदी बोलती । तें तूं परिसें परीक्षिति । कौरवनृपति श्रुतिरसिका ॥ २८ ॥

कालिंद्युवाच–अहं देवस्य सवितुर्दुहिता पतिमिच्छती । विष्णुं वरेण्यं वरदं तपः परममास्थिता ॥ २० ॥

कालिंदी म्हणे गा पुरुषवर्या । जाण तूं मातें भास्करतनया । पतिवांछेनें कवळिलें हृदया । करीं तपश्चर्या तत्कामें ॥ २९ ॥ वर वांछीं तया जो वरेण्य । वरदा वरद जो कां विष्णु । तो वर वांछी अंतःकरण । तपआचरण तदुद्देशें ॥ १३० ॥ निरोधूनियां करणवृत्ति । तपश्चर्या आचरें भक्ति । इतुकें बोलूनि अर्जुनाप्रति । तर्की चित्तीं तें ऐका ॥ ३१ ॥

नान्यं पतिं वृणे वीर तमृते श्रीनिकेतनम् । तुष्यतां मे स भगवान्मुकुंदोऽनाथसंश्रयः ॥ २१ ॥

झणें हा म्हणेल मातेंचि वरीं । यालागिं पहिलेंचि निरुत्तर करी । जे मी वांछितें वर श्रीहरि । त्यावीण न वरीं त्रैलोक्यीं ॥ ३२ ॥ म्हणसी हरि हें बहुतांसि नाम । तरी ज्याचे हृदयीं श्रीवत्सलक्ष्म ।

ममाभीष्ट तो पुरुषोत्तम । हा दृढ नेम मम हृदयीं ॥ ३३ ॥ म्हणसी दुर्लभ त्याची प्राप्ति । केविं तूं वरिसी तयाप्रति । तरी अनाथसंश्रय तो श्रीपति । माझी आर्ति पुरवील ॥ ३४ ॥ तूं येथ करिसी अनुष्ठान । तो वैकुंठीं विराजमान । त्यापें जाऊनि सांगेल कोण । ऐकें वचन यदर्थीं ॥ १३५ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न हरि । वसे सर्वांच्या अभ्यंतरीं । ज्याची व्याप्ति सचराचरीं । तो मजवरी संतोषे ॥ ३६ ॥ स्वभक्ताचे निरसूनि कष्ट । कृपेनें पुरवी तदभीष्ट । यालागिं मुकुंद नाम हें स्पष्ट । पढती श्रेष्ठ तिहीं लोकीं ॥ ३७ ॥ कोण तूं म्हणोनि तुवां पुशिलें । तरी तेंही कथितें परिसें वहिलें । चातुर्य देखोनि अर्जुनें केलें । आश्चर्य आपुले हृत्कमळीं ॥ ३८ ॥

कालिंदीति समाख्याता वसामि यमुनाजले । निर्मिते भवने पित्रा यावदच्युतदर्शनम् ॥ २२ ॥

कालज्ञापक माझा पिता । कालिंदी मी त्याची दुहिता । कालिंदी या नामें ख्याता । जाण तत्त्वता मजलागीं ॥ ३९ ॥ पित्यानें यमुनेचिया सलिलीं । मंदिररचना मदर्थ केली । तेथ वसोनि सर्वकाळीं । नियमें चाळीं तपश्चर्या ॥ १४० ॥ कोण काळवरी वससी येथें । ऐसें तूं जरी पुससी मातें । तरी अच्युतदर्शन जालिया त्यातें । वरूनि सांगातें जाईन ॥ ४१ ॥ ऐसीं कालिंदीचीं वचनें । ऐकूनि अर्जुन निवाला मनें । मग तो स्वमुखें हरिकारणें । कथिता जाला तें ऐका ॥ ४२ ॥

तथाऽवदद्गुडाकेशो वासुदेवाय सोऽपि ताम् । रथमारोप्य तद्विद्वान्धर्मराजमुपागमत् ॥ २३ ॥

जैसी लिखित पत्रिका पढतां । पर्याय पालटूं न शके वक्ता । तैसेंचि अर्जुनें श्रीभगवंता । कथिलें तत्त्वता तदुदित जें ॥ ४३ ॥ तोही ऐकोनि अर्जुनवाणी । तद्वृत्त पूर्वींच चक्रपाणि । सर्व जाणता अंतःकरणीं । त्याची करणी अवधारा ॥ ४४ ॥ रथ लोटूनि घडघडाट । जाऊनि यमुनासलिलानिकट । कालिंदीचें यथाभीष्ट । केली उपविष्ट रहंवरीं ॥ १४५ ॥ शंतम हस्तें करग्रहण । करूनि घेतली उचलून । रथावरौती आरोपून । निघे भगवान् इंद्रप्रस्था ॥ ४६ ॥ भगवंताच्या करस्पर्शें । हृदयीं कालिंदी संतोषे । तया सुखासि तुलना असे । विधिही ऐसें वदों न शके ॥ ४७ ॥ पहातां श्रीकृष्णाचें वक्त्र । कालिंदीचे निवाले नेत्र । त्रैलोक्यविभवा जाली पात्र । फावली स्वतंत्र विश्रांती ॥ ४८ ॥ मग विलोकी चरणांकडे । रथीं मौनस्था न बोले तोंडें । हृत्कमळींच्या सुखसुरवाडें । प्रेम वोसंडे सर्वांगीं ॥ ४९ ॥ कालिंदीचा हर्षोत्कर्ष । वर्णूं न शके विरिंचि शेष । असो यानंतर आदिपुरुष । इंद्रप्रस्थास चालिला ॥ १५० ॥ भास्करभ्रमणें वय वोसरे । तैसाचि मार्ग क्रमूनि त्वरें । धर्मराजाप्रति स्नेहसुभरें । येता जाला श्रीभगवान् ॥ ५१ ॥ सेवक धांवोनि कथिती पुढें । कृष्णलावण्यगुणपरिपाडें । कन्या जोडली कनकीं ठिकडे । जेविं जिडे पाचूचे ॥ ५२ ॥ हें ऐकूनि धर्मराज । सभीम माद्रीचे आत्मज । परमाह्लादें नाचती भोज । जाणोनि भाज हरियोग्य ॥ ५३ ॥ हर्षें सामोरे धांवती । स्थळोस्थळीं बळी सांडिती । विविध द्रव्यें कुरवंडिती । तेणें वारिती दृग्दोष ॥ ५४ ॥ अनेक वाजंत्रांचिया ध्वनि । घाव घातला पैं निशाणीं ।

परमोत्साहें चक्रपाणि । राजसदनीं प्रवेशला ।। १५५ ।। शिबिकारूढ येऊनि कुंती । नेली कालिंदी आतौती । पाहोनि लावण्य अवयवकांति । सदैव म्हणती हरिरमणी ।। ५६ ।। इचिया सुकृता नोहे सीमा । जिणें वरिलें पुरुषोत्तमा । उभयतांची लावण्यगरिमा । अयोग्य ब्रह्मा कथावया ।। ५७ ।। मा इतरांचा पाड किती । नर सुर किन्नर मंदमति । मुनिवर तेही अल्पसुकृती । केंवि अवगमिती भगवंता ।। ५८ ।। असो धर्माच्या अंतःपुरीं । द्रौपदीप्रमुख समस्त नारी । कालिंदीची सौभाग्यथोरी । सौंदर्यकुसरी प्रशंसिती ।। ५९ ।। यावरी श्रीकृष्ण सभास्थानीं । धर्मराजाच्या सन्निधानीं । बैसले असतां पाण्डवीं वचनीं । विनंति केली ते ऐका ।। १६० ।।

यदैव कृष्णः संदिष्टः पार्थानां परमाद्भुतम् । कारयामास नगरं विचित्रं विश्वकर्मणा ।। २४ ।।

जेव्हां पाण्डवीं संप्रार्थिला । अघटितघटनापटीचा दादुला । तेव्हांचि आज्ञापिता जाला । विश्वकर्म्याला संकेतें ।। ६१ ।। पार्थ पाची पाण्डुकुमर । त्यांचें अद्भुत विचित्रतर । करविता जाला शार्ङ्गधर । जें अमरेंद्रपुर भूलोकीं ।। ६२ ।। विश्वकर्मा जो देवशिल्पिक । तेणें कृष्णाज्ञेस्तव सम्यक । विचित्र नगर रचिलें देख । निर्जरलोकतुळणेचें ।। ६३ ।। सर्व सौकर्यें जिये ठायीं । चिंता हृद्रोगव्यथा नाहीं । अमरेंद्रासम पाटव देहीं । प्रज्ञाविजयीं गीष्पतिवत् ।। ६४ ।। पाण्डवांसहित पापान्तक । तेथ वसोनि मन्मथजनक । करिता जाला जें कौतुक । तें तूं नावेक अवधारीं ।। १६५ ।।

भगवांस्तत्र निवसन्स्वानां प्रियचिकीर्षया । अग्नये खाण्डवं दातुमर्जुनस्याऽऽस सारथिः ।। २५ ।।

स्वजनांचिये प्रीतीकरून । वसवीत होत्साता तें सदन । कांहीं एक महत्कारण । लक्षूनि भगवान स्थिरावला ।। ६६ ।। श्वेतकिरायाचिये अध्वरीं । घृतावदानें पावका जठरीं । आमय जाला तत्परिहारीं । जाऊनि विचारी दुहिणातें ।। ६७ ।। तेणें ऐकोनि तत्प्रार्थना । पावक प्रेरिला खाण्डववना । तें जाणवतां संक्रंदना । वर्षोनि घना तो विझवी ।। ६८ ।। तेणें श्रमला हुताशन । पुढती प्रार्थिला चतुरानन । मग त्या देऊनि आश्वासन । गुह्य कारण प्रबोधिलें ।। ६९ ।। नरनारायण महारथी । त्यांतें भेटोनियां एकांतीं । विप्रवेषें भेषज प्रार्थीं । ते तव आर्ती परिहरिती ।। १७० ।। तो येणार आपुले भेटी । भावी जाणोनि हे जगजेठी । खाण्डवप्रस्थीं अर्जुना निकटीं । सुखसंतुष्टी स्थिरावला ।। ७१ ।। विप्रवेषें हुताशन । अर्जुना प्रार्थील पैं येऊन । आपण सारथि तैं होऊन । खाण्डव अर्पण त्या करणें ।। ७२ ।। निरतिशय ऐश्वर्यवंत । म्हणाल अचिंत्यगुण भगवंत । स्वयें द्यावया तो असमर्थ । किमर्थ सारथ्य अवलंबी ।।७३।। तरी पार्थ आपुली अपरमूर्ति । वाढवावया तद्यश कीर्ति । खाण्डवा अर्पितां अग्नीप्रति । स्वयें सारथि हरि होय ।। ७४ ।। खाण्डव भक्षूनि हुताशन । नीरुज होऊनि सुप्रसन्न । गाण्डीव धनुष्य दिव्य स्यंदन । अक्षय इषुधि अर्पील ।। १७५ ।। तेथ रक्षितां मयासुर । तो इच्छून प्रत्युपकार । निर्मूनि देईल सभागार । सुधर्मा अपर भूलोकीं ।। ७६ ।। एवं सखयाच्या लाभासाठीं । सारथ्य करी धरूनि काठी । तथापि

ऐश्वर्या नोहे तुटी । त्रैलोक्यमुकुटीं मिरवतसे ॥ ७७ ॥ असो ऐसी संभावना । इंद्रप्रस्थीं कृष्णार्जुना । क्रीडत असतां हुताशना । येतां समय जाणोनी ॥ ७८ ॥ कृष्णें सज्ज केला रथ । आरूढोनियां पार्थासहित । मृगयाव्याजें निघाले त्वरित । खाण्डवप्रांत अधिष्ठिला ॥ ७९ ॥ तंव अकस्मात हुताशन । भेटला विप्रवेषें येऊन । याचितां तयासि खाण्डववन । केलें अर्पण गदहरणा ॥ १८० ॥ इंद्र निवारी वर्षोनि घना । पावक जाणवी कृष्णार्जुना । तिहीं देऊनि अभयदाना । शरसंधाना आदरिलें ॥ ८१ ॥ द्वादश योजनें गगना आंत । अभेद्य मंडप शरनिर्मित । निर्मूनि पर्जन्य वारिला त्वरित । पावकें स्वस्थ वन ग्रासिलें ॥ ८२ ॥ अस्त्रीं शस्त्रीं करूनि युद्ध । भंगूनि अमरेंद्र सुरासुर क्रुद्ध । अर्जुनरूपें धनुर्वेद । जातवेदा संतर्पी ॥ ८३ ॥ तेथ जळतां मयदानव । तेणें स्तविले कृष्णपाण्डव । तेव्हां अवलंबूनियां कींव । रक्षिला जीव तयाचा ॥ ८४ ॥ असो पावकरोगनिवृत्ति । जालिया येऊनि उभयांप्रति । प्रार्थूनि केली प्रत्युपकृति । ते तूं भूपति अवधारीं ॥ १८५ ॥

सोऽग्निस्तुष्टो धनुरदाद्धयाञ्श्वेतान्रथं नृप । अर्जुनायाक्षयौ तूणौ चर्म चाभेद्यमस्त्रिभिः ॥ २६ ॥

अरोग केला जो कृशान । तो होऊनि संतुष्टमान । पार्थालागीं गाण्डीवसंज्ञ । देता जाला कोदंड ॥ ८६ ॥ क्षीरोदसंभव अश्व रत्ना । समान जवीन क्रमिती गगना । दिव्य तुरंग ते स्यंदना । सहित अर्जुना समर्पी ॥ ८७ ॥ अक्षयसायकमंडित तूण । अभेद्यचर्म म्हणिजे वोडण । परशरघातें नोहे भिन्न । इत्यादि अर्पण करूनियां ॥ ८८ ॥ म्हणे मज तुमचा उपकार फार । उत्तीर्ण नोहें मी अणुमात्र । येथूनि तुमचा आज्ञाधर । स्मरतां तत्पर सेवेसी ॥ ८९ ॥ ऐसी ऐकोनि पावकवाणी । पाण्डव आणि चक्रपाणि । पावकालागीं मधुरवचनीं । गौरवूनियां बोळविला ॥ १९० ॥ असो अग्नीची हे गोष्टी । यावरी ऐकें मयराहटी । तेणें प्रार्थूनियां जगजेठी । नामिला किरीटी नतमौळें ॥ ९१ ॥

मयश्च मोचितो वह्नेः सभां सख्य उपाहरत् । यस्मिन्दुर्योधनस्याऽऽसीज्जलस्थलदृशिभ्रमः ॥ २७ ॥

अग्नीपासूनि वांचविला । म्हणोनि उपकारें दाटला । प्रत्युपकरणा अर्पिता जाला । सभा निर्मूनि निजसखया ॥ ९२ ॥ मय असुराचा विश्वकर्मा । तेणें सभा परमोत्तमा । गौण जियेपुढें सुधर्मा । हेमललामात्मक अवघी ॥ ९३ ॥ दुर्योधनासि जिये ठायीं । स्थलजलभ्रांति झाली पाहीं । पतन होतां नृप सर्वही । ललनादिकांहीं स्मय केला ॥ ९४ ॥ हास्य करितां लहान थोर । तेणें सलज्ज धार्तराष्ट्र । कांति उतरोनि काळें वक्त्र । कांपे थरथर सक्रोधें ॥ १९५ ॥ पाण्डवीं बहुधा सम्मानिला । परि तो हृदयीं सशल्य जाला । जेंवि कां सर्पे डाव धरिला । तेंवि दुःखाला विसरेना ॥ ९६ ॥ असो पाण्डवाकडील कथा । अपार भारत न सरे कथितां । वैशंपायन तुझिया सुता । होईल कथिता व्यासाज्ञा ॥ ९७ ॥ यानंतरें श्रीभगवान । मय पावक दोघे जण । विसर्जूनियां सभासदन । पाहोनि संपूर्ण संतोषे ॥ ९८ ॥ एवं आनंदें इंद्रप्रस्थीं । धर्मा निकटीं करितां वसती । देवकी वसुदेव हलधर चित्तीं । आठवी श्रीपति

औत्सुक्यें ॥ ९९ ॥ मग पुसोनि कुरुनरेशा । नमस्कारूनि पितृष्वसा । हस्तें स्पर्शोनि द्रौपदी शिरसा । आज्ञा घेता हरि जाला ॥ २०० ॥ संकेतमात्रें प्रस्थानभेरी । सवेग वाहूनियां कुंजरीं । मुहूर्तें ठोकितां तयांच्या गजरीं । जाली परिवारीं लगबग ॥ १ ॥ सारथि जुंपिती रहंवर । मंदुरशाळेतें मादुर । सज्जिले अंबष्ठीं कुंजर । पदाति वीर सिद्ध जाले ॥ २ ॥ सेना निघाली बाहेर । पश्चिम मार्गें चालिले भार । धर्मराजें श्रीयदुवीर । बोळविला तो अवधारा ॥ ३ ॥

स तेन समनुज्ञातः सुहृद्भिश्चानुमोदितः । आययौ द्वारकां भूयः सात्यकिप्रमुखैर्वृतः ॥ २८ ॥

रत्नजडितें कनकाभरणें । अर्पिलीं कालिंदीकारणें । माळा गळीं विचित्र वसनें । सात्यकि-प्रमुखां समर्पिलीं ॥ ४ ॥ भगवंतासि सर्वोपचार । अनर्घ्य रत्नें अलंकार । विद्युत्प्राय पीतांबर । प्रेमें परिधान करविला ॥ २०५ ॥ मुकुट कुंडलें मेखळा । कटकांगदें मुद्रिका माळा । वांकी तोडर चरण-युगळा । रत्नपादुका समर्पिल्या ॥ ६ ॥ गंधाक्षता कुसुमहार । वरी उधळिला दिव्य धूसर । नीराजनीं जयजयकार । करितां स्वार हरि जाला ॥ ७ ॥ तो श्रीकृष्ण या प्रकारें । आज्ञा देऊनि युधिष्ठिरें । बोळविलिया सुहृदीं गजरें । अत्यादरें अनुमोदिला ॥ ८ ॥ पाण्डववेष्टित वासुदेव । सात्यकिप्रमुख सह-यादव । नागरजनीं कृतगौरव । अर्पिलीं अपूर्व उपायनें ॥ ९ ॥ पांचै जणीं पाण्डववीरीं । आरूढोनियां निज रहंवरीं । युयुधानेंसीं कैटभारि । वेष्टित गजरीं निघाला ॥ २१० ॥ त्रिगव्यूतीपर्यंत ऐसे । अनुगमनार्थ कृष्णा सरिसे । तेथूनि राहविले यादवेशें । प्रेमसौरसें गौरवुनी ॥ ११ ॥ नृपासनाचिया बंधनीं । वत्स गोवूनि धेनु तान्ही । वना जातां वोरसें दोन्ही । दाटती तैसे परस्परें ॥ १२ ॥ पाण्डव पाहती कृष्णवदन । पाण्डववदना पाहे कृष्ण । स्नेहसुभरें द्रवती नयन । पुसूनि प्रयाण आदरिलें ॥ १३ ॥ श्रीकृष्ण म्हणे माझिया स्मरणें । तुम्हां न बधिजे कोणा विघ्नें । पाण्डव म्हणती कृपेच्या घनें । स्नेह-कारुण्यें तर्पावें ॥ १४ ॥ ऐसें बोलूनि परस्परीं । पुन्हां बैसोनि रहंवरीं । द्वारके उजू कैटभारि । सह-परिवारीं चालिला ॥ २१५ ॥ कालिंदीतें शिबिकायानीं । सहचरी सखिया वीजिती व्यजनीं । सवें घेऊनि चक्रपाणि । द्वारकाभुवनीं प्रवेशला ॥ १६ ॥ युयुधानेंसीं कमलानाथ । घेऊनि कालिंदी समवेत । द्वारकेप्रति येतां दूत । पुढें नगरांत पाठविले ॥ १७ ॥ उद्धव अक्रूर संकर्षण । देवकप्रमुख यादवगण । स्नेहें सामोरे येऊन । कृष्ण पाहोन निवाले ॥ १८ ॥ पाहोनि कालिंदीचें मुख । सर्वां जाला सुख-संतोष । गीत नृत्य मंगलघोष । भद्रासनास पातले ॥ १९ ॥ नमूनि राजा उग्रसेन । वसुदेवप्रमुखां केलें नमन । येर समस्त यादवगण । अवलोकून वंदिले ॥ २२० ॥ मग करूनि जयजयकार । प्रवेशले निजमंदिर । कालिंदीचें पाहूनि वक्त्र । निवती समस्त पुरवासी ॥ २१ ॥ ऐसा द्वारकाप्रवेश कथिला । यावरी जो कां वृत्तान्त वितला । तो तूं परिसें कुरुनृपाळा । सदस्यमेळासमवेत ॥ २२ ॥

अथोपयेमे कालिंदीं सुपुण्यर्त्वृक्ष ऊर्जिते । वितन्वन्परमानंदं स्वानां परममंगलम् ॥ २९ ॥

यानन्तरें उत्तम दिवसीं । भद्रासनीं नृपापासीं । वसुदेवादि हृषीकेशी । संकर्षणेंशीं उपविष्ट ॥२३॥ प्रसंगें नृपाचिये कर्णीं । वृत्तांत जाणवी सुनंदपाणि । कालिंदीचिये पाणिग्रहणीं । यथाविधानीं हा काळ ॥ २४ ॥ रायें पाचारिलें ब्राह्मण । पुरोहित ज्योतिषी विधानज्ञ । तिहीं केलें कालज्ञान । पंचांग-पठन करूनियां ॥ २२५ ॥ ऋतु वरिष्ठ कुसुमाकर । वैशाख माधव श्रेयस्कर । उच्चासनारूढ भास्कर । ऊर्जितविभवें विराजित ॥ २६ ॥ अखिल मंगळां मंगलायतन । तो श्रीकृष्ण कल्याणभुवन । त्याचें साधावया सुलग्न । मंगळ दिन द्विज पाहती ॥ २७ ॥ ताराबळ चंद्रबळ । वाक्पति विद्यादैवबळ । गोचरप्रकरणीं पाहोनि अमळ । दैवज्ञ कुशळ विचारिती ॥ २८ ॥ द्रेष्काण होरा नवांश ग्रह । द्वादशांश त्र्यंशांश षड्वर्गसमूह । ज्याचे अधिपति शुभग्रह । करिती निर्वाह विवरूनी ॥ २९ ॥ गोत्रनिर्णय वर्णात्मकां । राशिचिंतन अनुलोमप्रमुखां । पंचकोत्तीर्ण लग्नघटिका । इष्ट बलिष्ठ विलोकिलें ॥ २३० ॥ लाभीं सर्व शुभावह । केन्द्रीं त्रिकोणीं सौम्य ग्रह । सहज शत्रुभुवनीं निचय । पापग्रहांचा शुभफलद ॥३१॥ ऐसी करूनियां विचारणा । लग्नपत्रिका वर्तिली जाणा । हळदी लावूनि दोघां जणां । देवकप्रतिष्ठा पैं केली ॥ ३२ ॥ ऊर्जित दैवें ओंपुण्यकाळ । लग्नविधान शुभमंगल । ब्राह्मण तपोधन निर्मळ । भूभुजमेळ सुहृदांचा ॥ ३३ ॥ वाजंत्रांची एक घायी । सुरवर सुमनें वर्षती पाहीं । परमानंद सर्वां देहीं । कृष्णविवाहीं वोसंडे ॥ ३४ ॥ धनें गोधनें वांटिलीं द्विजां । भद्रासनीं आहुकराजा । सुहृदीं अहेरीं पूजिला वोजा । गरुडध्वजा लक्षूनी ॥ २३५ ॥ देवकी रोहिणी सापत्न जननी । वरमाता या वरिष्ठ मानीं । बैसोनि मिरवती सुखासनीं । वाद्यगायनीं पुरगर्भी ॥ ३६ ॥ समस्तां सदनीं महोत्सव । वऱ्हाडी भोजान्धक यादव । रामप्रमुख वासुदेव । अहेरगौरव यां करिती ॥ ३७ ॥ मंगलमंडित षोडश दिवस । लक्ष्मीपूजन गृहप्रवेश । निरवूनियां भाणवसास । गृहस्थ जगदीश चौघींसीं ॥ ३८ ॥ कालिंदीचें पाणिग्रहण । द्वारकेमाजि जालें पूर्ण । प्रसंगें विवाहप्रकरण । पंचम लग्न शुक सांगे ॥ ३९ ॥

विदानुविंदावावंत्यौ दुर्योधनवशानुगौ । स्वयंवरे स्वभगिनीं कृष्णे सक्तां न्यषेधताम् ॥ ३० ॥

त्यानंतरें अल्पा दिवसीं । द्वारके वसतां श्रीहृषीकेशी । अवंतीहूनि सर्वां देशीं । मूळें रायांसि पैं आलीं ॥ २४० ॥ विंदानुविंद बंधु दोघ । दुर्योधनासि स्नेहयोग । तद्वशवर्ती होऊनि अनुग । राज्यभूभाग भोगिती ॥ ४१ ॥ दुर्योधनाच्या स्नेहादरें । कृष्णीं वर्तती द्वेषाचारें । तिहीं भूपति निज सोयरे । पत्रद्वारें पाचारिले ॥ ४२ ॥ क्षिप्रापगेच्या उभय तटीं । शिबिरें उभिलीं लक्ष कोटी । भूमंडळींच्या भूभुजथाटी । अवंती निकटीं उतरलिया ॥ ४३ ॥ मित्रविंदेचें स्वयंवर । ऐकोनि मिळाले नृपवर । एक वर्जूनि द्वारकापुर । सोयरे अपार पातले ॥ ४४ ॥ गुण लावण्य ऐश्वर्यथोरी । श्रीकृष्णाची परस्परीं । ऐकोनि मित्रविंदा सुंदरी । मनें निर्धारी हरि भर्ता ॥ २४५ ॥ मातेपासीं कथिलें गुज । जें मम भर्ता गरुडध्वज । हें ऐकोनि अवंतिराज । म्हणती लाज हे आम्हां ॥ ४६ ॥ कृष्णासि नाहीं नृपासन । केवळ

गोरक्ष हीन दीन । चैद्य मागध दुर्योधन । भूभुज मान्य हे आम्हां ॥ ४७ ॥ मित्रविंदेतें निषेधिती । कृष्ण अयोग्य नृपसंपत्ति । यालागिं सांडूनि तदासक्ति । वरीं भूपति माने तो ॥ ४८ ॥ अखिल भूमंडळींचे भूप । अमोघ ऐश्वर्य शौर्य प्रताप । त्यांमाजि पाहूनि ऐश्वर्यकल्प । लावण्यदीप नृप वरिजे ॥ ४९ ॥ सहज येतील स्वयंवरीं । श्रवणें नयनें पाहोनि विवरीं । प्रियतम वाटेल तो तूं वरीं । भगिनी यापरी प्रबोधिती ॥ २५० ॥ ऐकोनि बंधूंचें उत्तर । जेविं मृद्घटीं दृढ पाथर । पडतां भंगी तेंवि अंतर । भंगोनि विचार हारपला ॥ ५१ ॥ थरथरां कांपे अंगयष्टि । झरझर नीर पाझरे दृष्टी । मर मर दैवा म्हणोनि कष्टी । होय गोरटी अनुतापें ॥ ५२ ॥ कृष्णावेगळा स्वयंवरीं । अन्य भूपाळ सहसा न वरीं । ऐसा निश्चय दृढ अंतरीं । करूनि श्रीहरी चिंतितसे ॥ ५३ ॥ मित्रविंदेचें अंतर । सर्वज्ञ सर्वग कमलाकर । जाणोनि पातला पैं सत्वर । तोही प्रकार अवधारा ॥ ५४ ॥

राजाधिदेव्यास्तनयां मित्रविंदां पितृष्वसु । प्रसह्य हृतवान्कृष्णो राजन्राज्ञां प्रपश्यताम् ॥ ३१ ॥

भक्तवत्सल जो श्रीपति । जाणोनि मित्रविंदेची आर्ति । कृपेनें द्रवोनि विवरी चित्तीं । कुरुवर नृपति तें ऐकें ॥ २५५ ॥ वसुदेवाची कनिष्ठ भगिनी । राजाधिदेवी चातुर्यखाणी । जयत्सेनाची वरिष्ठ पत्नी । कृष्णें जाणोनि पितृष्वसा ॥ ५६ ॥ पितृष्वसेचें कन्यारत्न । सप्रेमभावें मदेकशरण । विंदानुविंदीं करूनि विघ्न । मजलागून उपेक्षिलें ॥ ५७ ॥ रुक्मिणीचिये विवाहकाळीं । रुक्मि जैसा विरोधशाळी । तैसीच मित्रविंदा वेल्हाळी । विंदानुविंदीं निषेधिली ॥ ५८ ॥ तरी मी जाऊनि अकस्मात । जिंकूनि भूभुज विवाहीं प्राप्त । मित्रविंदेचें पुरवीन आर्त । हा सिद्धांत दृढ केला ॥ ५९ ॥ मग आज्ञापि दारुका-प्रति । तेणें तुरंग जुंपिले रथीं । गरुडध्वज सहसा रथीं । पावला श्रीपति अवंतिके ॥ २६० ॥ तंव मंडपीं नृपांच्या श्रेणी । बैसल्या असती ऐश्वर्यखाणी । नोवरी आणिली श्रृंगारूनी । पाहती नयनीं नृपरत्नें ॥ ६१ ॥ सखिया कथिती नृपांच्या नामा । वीर्यशौर्यादि प्रतापगरिमा । परंतु मित्रविंदेचा प्रेमा । मेघश्यामा अनुसरला ॥ ६२ ॥ ऐसिये समयीं अकस्मात । मृगेंद्र जैसा कुंजरांत । उडी घालूनि आमिष नेत । तेंवि हरि हरित नोवरिये ॥ ६३ ॥ बलात्कारें धांवोनि हरि । नोवरी उचलूनि दोहीं करीं । वाहता जाला निजरहंवरीं । नृपें घाबिरीं खळबळिलीं ॥ ६४ ॥ घ्या घ्या म्हणोनि उठिले एक । एक म्हणती पहा कौतुक । एक म्हणती यदुनायक । मागधप्रमुखनिर्जेता ॥ २६५ ॥ भो भो राया कौरव-प्रवरा । पाहत असतां भूभुजचक्रा । चक्रपाणि सुचारुवक्त्रा । वाहूनि रहंवरा निघाला ॥ ६६ ॥ आस्फुरिला पाञ्चजन्य । तेणें दणाणिलें त्रिभुवन । नृपचक्राचा भंगला मान । जाले म्लानमुख अवघे ॥ ६७ ॥ कोण्ही न करिती पाठिलागा । अवलंबूनियां निजपुरमार्गा । भूपति फिरोनि गेले मागां । वरी श्रीरंगा यशोलक्ष्मी ॥ ६८ ॥ मित्रविंदा वाहूनि रथीं । द्वारके आला कमलापति । ऐकूनि वधू-हरणाची ख्याति । यादव गर्जती जयघोषें ॥ ६९ ॥ पितृष्वसेची तनया ऐसी । कृष्णें हरिली लावण्य-राशि । द्वारकेमाजि यथाविधीसीं । लग्न सुदिवसीं लावियलें ॥ २७० ॥ नित्यनोवरा द्वारकाधीश । वऱ्हाडी यादव निर्जरअंश । रूपें धरूनियां बहुवस । वरी कृष्णास यशोलक्ष्मी ॥ ७१ ॥ विधिविधान

पुनः पुनः । कथितां ग्रंथ नावरे गगना । यालागिं पूर्वोक्त पाणिग्रहणा । समान सूचना श्रोत्यांसी ॥७२॥ यानंतरें षष्ठ विवाहो । करिता जाला रुक्मिणीनाहो । तोही परिसें महोत्साहो । करूनि लाहो अवधाना ॥ ७३ ॥

नग्नजिन्नाम कौशल्य आसीद्राजाऽतिधार्मिकः । तस्य सत्याऽभवत्कन्या देवी नाग्नजिती नृप ॥ ३२ ॥

राया परिसें परीक्षिति । कोशलदेशीं अयोध्यापति । नग्नजिन्नामा पैं भूपति । स्वधर्ममूर्ति धार्मिक जो ॥ ७४ ॥ तयाची कन्या सुभगा सत्या । नाग्नजिती जे पितृनामता । तिचिया स्वयंवरसंकेता । नृपें तत्वता पण केला ॥ ७५ ॥ सप्त प्रमत्त मारुतगण । तैसे अपेट बलीवर्द जाण । एक्याच समयीं त्या बाधून । करी शासन बाहुबळें ॥ ७६ ॥ तया नृपातें नाग्निजिती । वरूनि होईल सुभगा युवती । हें ऐकूनि बहु भूपति । विमुख जाती लाजूनी ॥ ७७ ॥ राया म्हणसी ऐसें काय । गोवृषांचें केउतें भय । तरी तूं क्षणैक सावध होय । पीयूषप्राय हरियश घे ॥ ७८ ॥

न तां शेकुर्नृपा वोढुमजित्वा सप्त गोवृषान् । तीक्ष्णश्रृंगान्सुदुर्धर्षान्वीरगंधासहान्खलान् ॥ ३३ ॥

सत्या पर्णूं न शकती भूप । सप्त गोवृष विद्युत्कल्प । त्यांतें न जिंकूनियां अल्प । विगलितदर्प बहु जाले ॥ ७९ ॥ राया ऐकें गोवृषांतें । तीक्ष्ण श्रृंगें असती ज्यांतें । बळें थडकिती कुंजरांतें । निर्भय पुरते बळराशि ॥ २८० ॥ न साहती वीरांची घाणी । तरुण बलिष्ठ फळदुर्गुणी । देखतां थडकिती धांवोनी । श्रृंगीं भेदूनि मारक जे ॥ ८१ ॥ ऐसियांतें देखोनि राजे । पर्णूं न शकती भूपात्मजे । असत्या आयुष्यें वृथा कां मरिजे । असाध्य पैजे भजोनियां ॥ ८२ ॥ ऐसिया योगें नृपाच्या सदनीं । नोवरी उपवर लावण्यखाणी । हें ऐकोनि पंकजपाणि । पाणिग्रहणीं प्रवर्तला ॥ ८३ ॥

तां श्रुत्वा वृषजिल्लभ्यां भगवान्सात्वतां पतिः । जगाम कौशल्यपुरं सैन्येन महता वृतः ॥ ३४ ॥

सप्तवृषजयें नोवरी लाभे । ऐसें ऐकोनि पंकजनाभें । निघता जाला समारंभें । परम वालभें नृपनगरा ॥ ८४ ॥ चतुरंगिणी सेना सज्ज । करूनि चालिला अधोक्षज । दारुकसारथि गरुडध्वज । वृष्णिभोजयदुकटक ॥ २८५ ॥ महासैन्येंसीं वेष्टित हरि । जाऊनि उतरला कौशल्यपुरीं । सात्वतपति या नामोच्चारीं । भक्तकैवारी हें बिरुद ॥ ८६ ॥ देखोनि शरयूतट प्रशस्त । यदुवाहिनी जाली स्वस्थ । पुढें प्रेरूनि वार्तिक दूत । नृपा वृत्तान्त जाणविला ॥ ८७ ॥

स कोशलपतिः प्रीतः प्रत्युत्थानासनादिभिः । अर्हणेनापि गुरुणा पूजयन्प्रतिनंदितः ॥ ३५ ॥

मग तो ऐकूनि कोशलपति । कृष्णदर्शना परम प्रीति । पुढें जाऊनि सप्रेम भक्ति । भावें श्रीपति गौरविला ॥ ८८ ॥ साष्टांग घालूनि लोटांगण । स्नेहें दिधलें आलिंगन । तेणेंचि न्यायें यदुनंदन ।

सम्मानिले यूथपति ॥ ८९ ॥ मग आणूनि निजमंदिरा । आसनें अर्पिलीं यादववीरां । भद्रीं बैसवूनियां श्रीधरा । राजोपचारां समर्पिलें ॥ २९० ॥ गुरु म्हणिजे परमश्रेष्ठ । तया अर्हणें श्रीवैकुंठ । पूजिता जाला सद्भावनिष्ठ । तेणें संतुष्ट हरि जाला ॥ ९१ ॥ देखूनि अंतःकरणशुद्धि । पूजाविधान सप्रेम विधि । नृपाची कळली विशुद्धबुद्धि । मग आनंदी मृदुवचनीं ॥ ९२ ॥ म्हणे राया धन्य धन्य । येणेंचि सार्थक भद्रासन । सुहृदां आप्तां कृतसम्मान । देव ब्राह्मण प्रिय ज्यातें ॥ ९३ ॥ रायें पुशिलें स्वागत । क्षेम कुशल यथास्थित । कृपेनें केलें मज सनाथ । कथिजे हेत आगमनीं ॥ ९४ ॥ हें ऐकोनि शार्ङ्गपाणि । कोशलपतीतें अमृतवचनीं । आगमनाचा हेतु श्रवणीं । घालिता जाला संक्षेपें ॥ २९५ ॥ राया तुमचें दुहितारत्न । उपवर सुंदर सद्गुणभुवन । ऐकोनि केलें म्यां आगमन । हेतु यावीण अन्य नसे ॥ ९६ ॥ कृष्णपूजनाच्या अवसरीं । कोशलपतीच्या अंतःपुरीं । गवाक्षमार्गे पाहती नारी । सहित नोवरी नाग्नजिती ॥ ९७ ॥ श्रीकृष्णाच्या लावण्यतेजें । कोटिकंदर्पश्रेणी लाजे । वाङ्माधुर्या पीयूष न सजे । तुळणे तुळितां गौणत्वें ॥ ९८ ॥ ठाणमाण रूपलावण्य । सस्मित ईक्षण मृदुभाषण । देखोनि नाग्नजितीचें मन । कृष्णीं रंगोन राहिलें ॥ ९९ ॥ साखरेवरूनि नुडे माशी । तैसी टकमक डोळ्यांसी । कृष्णस्वरूपें केली पिशी । तेंचि नृपासी शुक सांगे ॥ ३०० ॥

वरं विलोक्याभिमत समागत नरेंद्रकन्या चकमे रमापतिम् ।
भूयादय मे पतिराशिषोऽमलाः करोतु सत्या यदि मे धृतो व्रतैः ॥ ३६ ॥

जैसा इच्छित होती मनीं । त्याहूनि वरिष्ठ कोटिगुणीं । भर्ता देखूनि नृपनंदिनी । मन्मथबाणीं भेदियली ॥ १ ॥ आवडीऐसा प्रिय संमत । आपण होऊनि जाला प्राप्त । त्यातें नृपदुहितेचें चित्त । जालें आसक्त सर्वस्वें ॥ २ ॥ जो कां रमेचा रमणीय भर्ता । तो वर विलोकूनि नरेंद्रदुहिता । मानसें वश जाली तत्सुरता । चिंती चित्तामाजिवडी ॥ ३ ॥ दैवें मज हा हो कां पति । माझ्या अनेक व्रत-संपत्ति । अमळआशीर्वादांची प्राप्ति । तेणें श्रीपति वर लाभो ॥ ४ ॥ दृढव्रतें म्यां वरिला मनीं । तो परमात्मा मज ये क्षणीं । फलद हो हा वर योजुनी । नृपनंदिनी हें वांच्छी ॥ ३०५ ॥ नाग्नजितीचे मनोरथ । सबाह्य जाले कृष्णासक्त । ऐसी निरोपूनियां मात । नृप प्रार्थित तें ऐका ॥ ६ ॥

अर्चितं पुनरित्याह नारायण जगत्पते । आत्मानदेन पूर्णस्य करवाणि किमल्पकः ॥ ३७ ॥

सभास्थानीं कोशलपति । स्वर्चित सुप्रसन्न श्रीपति । देखोनि त्यातें पुढतोपुढती । करी विनंति सप्रेमें ॥ ७ ॥ भो भो निर्गुणा नीरायतना । जगत्पते श्रीनारायणा । किंकराची विज्ञापना । ऐकोनि आज्ञा मज दीजे ॥ ८ ॥ देहधारियां जीवांप्रति । विषयसंयोगें आनंदप्राप्ति । आत्मानंदें ज्यासि तृप्ति । तया पूर्णासि विनंति काय करूं ॥ ९ ॥ मी तो अल्प हीन दीन । तूं परमात्मा आनंदघन । काय करूं मी दास्याचरण । हें आज्ञापन मज कीजे ॥ ३१० ॥ त्रिजगीं विस्तृत तुझा महिमा । विदित विदुषा आगमनिगमां । भाग्यें तो तूं आजि आम्हां । सुलभ परमात्मा झालासी ॥ ११ ॥

यत्पादपंकजरज: शिरसा बिभर्ति श्रीरब्जज: सगिरिश: सहलोकपालै: ।
लीलातनु: स्वगतसेतुपरीप्सयेश: काले दधत्स भगवान्मम केन तुष्येत् ।। ३८ ।।

ज्याचे पादपंकजरज । शिरीं धरिती शिवअब्जज । लोकपाळांहीं सहित सहज । सुकृतपूज्य नरसुरही ।। १२ ।। कमला पदकमळाची धुळी । दुर्लभ लाभें धरूनि मौळीं । कमलवासिनी निजकरकमळीं । चरणकमला संवाहनीं ।। १३ ।। स्वकृतस्वधर्मसेतुपालना । इच्छूनि स्वजनाचिया कल्याणा । अवतार धरूनि लीला नाना । जगदुद्धरणा करी ईश ।। १४ ।। जिये काळीं स्वधर्मभंग । होतां देखोनि इंदिरारंग । पुढती स्वधर्म स्थापी साङ्ग । षड्गुण अभंग प्रकटूनी ।। ३१५ ।। ऐसा मजवरी परमेश्वर । तोषोनि होय कृपाकर । कोण्ह्या उपचारें हें सधर । मम अंतर तर्कीना ।। १६ ।। अनेक जन्मांचें सुकृत । कीं पूर्वजांचें पूर्वार्जित । तेणें कृपेनें द्रवोनि येथ । मज सनाथ केलें पैं ।। १७ ।। आतां कृपेनें आज्ञा कीजे । जेणें जन्मसार्थक माझें । हें ऐकोनि गरुडध्वजें । तोषोनि सहजें वदिजेल ।। १८ ।।

श्रीशुक उवाच—तमाह भगवान्कृष्ण: कृतासनपरिग्रह: । मेघगंभीरया वाचा सस्मितं कुरुनंदन ।। ३९ ।।

शुक म्हणे गा परीक्षिति । नृपाची देखोनि अमळभक्ति । कृपेनें तोषोनि कमलापति । बोले त्याप्रति सप्रेमें ।। १९ ।। आसनीं बैसोनि सुपूजित । मेघगंभीरवाचा वदत । परमानंदें हास्ययुक्त । षड्गुणवंत हरि बोले ।। ३२० ।।

श्रीभगवानुवाच--नरेंद्र याञ्चा कविभिर्विगर्हिता राजन्यबंधोर्निजधर्मवर्तिन: ।
तथापि याचे तव सौहृदेच्छया कन्यां त्वदीयां न हि शुल्कदा वयम् ।। ४० ।।

कृष्ण म्हणे गा राजेश्वरा । आम्हां क्षत्रियांचिया आचारा । याञ्चा परम निंद्यतरा । महर्षिप्रवरीं निषेधिली ।।२१।। जन्मोनियां क्षत्रियकुळीं । जे सर्वदा स्वधर्मशाळी । तयां याञ्चा नाहीं बोलिली । शास्त्रकुशलीं सर्वज्ञीं ।। २२ ।। तथापि याचितों मी आपण । तुझिये सुहृदइच्छेकरून । तुझें जठरींचें कन्यारत्न । मजलागून समर्पी ।। २३ ।। शुल्क म्हणिजे द्रव्यमात्र । तदर्थ आम्ही न हों पात्र । तुवां प्रार्थिलें त्याचें उत्तर । इतुकेंचि सार जाणावें ।। २४ ।। द्रव्यदानाचें पात्र नाहों । कन्यायाचक आलों आहों । तुवां पुशिलें काय देवों । तरी हा निर्वाह जाणावा ।। ३२५ ।। ऐसी ऐकोनि भगवद्वाणी । राजा तोषोनि अंत:करणीं । बोलता जाला तें तूं श्रवणीं । ऐकें करणी तत्कृत जे ।। २६ ।।

राजोवाच—कोऽन्यस्तेऽभ्यधिको नाथ कन्यावर इहेप्सित: । गुणैकधाम्नो यस्यांगे श्रीर्वसत्यनपायिनी ।। ४१ ।।

अचिंत्यगुणांचें एकायतन । लक्ष्मी विश्वश्री आपण । आंगीं वसते अपायविहीन । संतोषोनियां सर्वस्वें ।। २७ ।। ऐसिया तुजह्नि अधिकतर । भो भो नाथ श्रेष्ठवर । कोण अन्य असे प्रियकर । हें तूं अंतर जाणसी ।। २८ ।। इह म्हणिजे या भूमंडळीं । कन्येसि ईप्सित नृपवरमौळी । ऐश्वर्यसंपन्न

सद्‌गुणशाळी । कोण वनमाळी तुजहूनी ।। २९ ।। राज्यलक्ष्मीसी भुलती जन । ते लक्ष्मी भुलोनि सेवी चरण । यालागीं तुजहूनि कोण आन । असे संपन्न श्रेष्ठ वर ।। ३३० ।। यावरी तूं जरी म्हणसी हरि । कन्या अर्पिजे विवाहगजरीं । यदर्थीं नियमाच्या उत्तरीं । समय मुरारि म्यां केला ।। ३१ ।। कोण नियम कैसा समय । तो तुज कथितों परिसता होय । जाणती भूमंडळींचे राय । दुर्घट काय तें ऐक ।। ३२ ।।

किं त्वस्माभिः कृत. पूर्व समयः सात्वतर्षभ । पुंसां वीर्यपरीक्षार्थं कन्यावरपरीप्सया ।। ४२ ।।

तव दर्शना पूर्वीं आम्हीं । प्रतिज्ञासमय केला नियमीं । किमर्थ तो ही सात्वतस्वामी । तां हृत्पद्मीं विवरावा ।। ३३ ।। आम्हां क्षत्रियांचा हा धर्म । वीर्यशौर्यपरीक्षाकाम । स्वयंवरीं करूनि दुर्घट नियम । कन्याललाम मग द्यावें ।। ३४ ।। कन्येयोग्य इच्छूनि वर । पुरुषपरीक्षेकारणें घोर । प्रतिज्ञा केली म्यां दुर्धर । ते तूं सादर अवधारीं ।। ३३५ ।।

सप्तैते गोवृषा वीर दुर्दांता दुरवग्रहाः । एतैर्भग्ना सुबहवो भिन्नगात्रा नृपात्मजाः ।। ४३ ।।

ऐसें म्हणोनि श्रीकृष्ण हातीं । धरूनि उठिला कोसलनृपति । माडियेवरूनि तया प्रति । वृषभ-शाळा दाखविली ।। ३६ ।। सातही वृषभ कृतान्तकल्प । अपेट अशिक्षित दुर्दर्प । यांतें दमावया अनाटोप । भंगिले नृप बहु यांहीं ।। ३७ ।। कारुष कलिंग नेपाळ । तेलंग तिगळ मल्याळ चौळ । टंकण कोंकण वळित मावळ । महाराष्ट्र केरळ मत्स्यादि ।। ३८ ।। पुन्नाट कर्णाट पुलिंद द्रविड । आंध्र वैदर्भ पांचाळ पाण्ड्य । चैद्य मागध नैषध गौड । मालव प्रचंड विंधादि ।। ३९ ।। मद्रसैन्धवादि काश्मीर । कच्छ बर्बर गुर्जर अपर । हैहय केकय इत्यादि थोर । नृपकुमार भंगियले ।। ३४० ।। विषाणप्रहारीं भेदिलीं गात्रें । थडका मारूनि चूर्ण शरीरें । होऊनि नृपात्मज माघारे । गेले काविरें घेऊनियां ।। ४१ ।। ऐशा नृपसुतांच्या गति । ऐकोनि कन्यावरणीं पुढती । कोण्ही हांव न धरिती चित्तीं । समय श्रीपति तो ऐसा ।। ४२ ।। न दमितां हे वृषभ सप्त । कन्या अर्पूं मानूनि आप्त । तरी प्रतिज्ञाभंगदोषें लिप्त । हें गुज गुप्त तुज कथितों ।। ४३ ।। प्रतिज्ञाभंग न घडे मज । जामाता जोडे गरुडध्वज । कन्यामनोरथ पुरती सहज । तैं नाचेन भोज आनंदें ।। ४४ ।। मत्कृतसमयभंग न पवे । कन्यामनोरथ सफल व्हावे । भीड सांडूनि ऐसिया भावें । बोलता जाला कृष्णेंसीं ।। ३४५ ।।

यदि मे निगृहीताः स्युस्त्वयैव यदुनंदन । परो भवानभिमतो दुहितुर्मे श्रियःपते ।। ४४ ।।

भो भो यदुकुळनंदना । तूं या वृषांच्या करिसी दमना । तरी मी अर्पीन कन्यारत्ना । जे सोयरा जुना जुनाट ।। ४६ ।। माझिये कन्येसि अभिमत वर । तूं एक सर्वज्ञ जगदीश्वर । तुझिये परीक्षेचा विचार । न लगे इतरां सम करणें ।। ४७ ।। जे श्री ईश्वरातें जन्मवी । सर्वज्ञत्वादि लेणें लेववी ।

पुढती थापटुनियां निजवी । कैवल्यपदवीमाजिवडी ।। ४८ ।। ते पूर्णश्रियेचा तूं पति । सामान्य श्रिया दास्य करिती । कन्या अर्पितां त्या तुज प्रति । पूर्वज नाचती आनंदें ।। ४९ ।। माझे पुरवूनि मनोरथ । मत्कन्येचे पुरविजे आर्त । वृषभ दमूनि मम जामात । होऊनि सनाथ मज कीजे ।। ३५० ।। ऐसी सप्रेम नृपाची वाणी । ऐकोनि ऊठिला चक्रपाणि । कुरुकंजाकरप्रबोधतरणि । ते तूं श्रवणीं अवधारीं ।। ५१ ।।

एवं समयमाकर्ण्य बध्वा परिकरं प्रभुः । आत्मानं सप्तधा कृत्वा न्यगृण्हाल्लीलयैव तान् ।। ४५ ।।

ऐसा प्रतिज्ञासमयनियम । श्रवण होतांचि पुरुषोत्तम । कंचुकपल्लवीं परिकरोत्तम । बांधोनि सन्नद्ध जाहला ।। ५२ ।। कास कासिली मालगांठी । मस्तकीं बांधली वीरगुंठी । माळा खोवूनियां परवंटी । स्वयें जगजेठी उठावला ।। ५३ ।। सभागारीं वर्तली कथा । अंतःपुरीं हे ऐकोनि वार्ता । नोवरीसहित नृपाच्या कांता । गवाक्षपथें विलोकिती ।। ५४ ।। सूक्ष्म रंध्रीं जालांतरीं । सादर पाहती नृपाच्या नारी । तंव राजाज्ञेच्या संकेतसूत्रीं । वृषभ किंकरीं चेतविले ।। ३५५ ।। वृषभशाळेचें कपाट मुक्त । करूनि धुडाविले उन्मत्त । बाहेरी लोटले अकस्मात । जेंवि कृतान्त प्रळयान्तीं ।। ५६ ।। कौतुक पहावया नागरजनीं । सभा घनवटली उच्चस्थानीं । भवतीं कपाटें पिहित करूनी । वृषभ प्राङ्गणीं शोभविले ।। ५७ ।। निर्बीज अग्नियंत्राचे कडके । पटह दुंदुभि वाद्यें अनेकें । वीर गर्जना करिती मुखें । सामान्य लोकें संत्रस्त ।। ५८ ।। व्याघ्राजिनें वंशयष्टि । लंबाळ बांधोनि वृषभा दृष्टि । दावितां बावरे जाले हट्टी । महाफुंफाटीं उठावती ।। ५९ ।। मही उकरिती पुढिला चरणीं । उलथूं पाहती तीक्ष्ण विषाणीं । व्याघ्रचर्मांची पडतां घाणी । बळें क्षोभोनि फुंपाती ।। ३६० ।। क्षणक्षणा मूत्र पुरीष । करिती दुर्दान्त सप्त वृष । तद्दमनार्थ महदावेश । धरूनि परेश उठावला ।। ६१ ।। नोवरी मानसीं नवस करी । शिव भवानी कुळेश्वरी । मज पावो ये अवसरीं । विजयी हरि हो वृषदमनीं ।। ६२ ।। अगा सवितया भास्करा । विश्वचक्षु विश्वंभरा । धांवें पावें इंदिरावरा । कृष्ण नोवरा मज योजीं ।। ६३ ।। अनेक-जन्मान्तरींचें पुण्य । व्रत तप दानें अनुष्ठान । सफळ हो कां मजलागून । यदुनंदनवरलाभें ।। ६४ ।। नोवरीचे संकल्प ऐसे । जाणोनि हृदयस्थें परेशें । वृषभदमना परमोल्लासें । उडी घातली सभाङ्गणीं ।। ३६५ ।। अरिष्ट दमिता जो श्रीपति । आपुल्या करूनि सप्तधा मूर्ति । तैसाचि सप्त वृषभांप्रति । निग्रही निगुती लीलेनें ।। ६६ ।। धुधुवत विखार कालियाना । प्रळयकाळचि सकळा जना । गारुडी कंठीं घालूनि वसना । समान मिरवी कीं ना हो ।। ६७ ।। व्याघ्रादि क्रूर श्वापदजाति । साबरमंत्रें अभिमंत्रिती । श्रवणीं धरूनि नाचविती । सर्वांप्रति हें विदित असे ।। ६८ ।। ऐशा सामान्य मनुजापासीं । कृत्रिम कौशल्यांचिया राशि । हा तों हृदयस्थ हृषीकेशी । चराचरांसि चेतविता ।। ६९ ।। मशक मेरूहूनि घनवट । मेरु मशकाहूनि फळकट । स्वसत्ता कर्त्ता वैकुंठपीठ । त्या दुर्घट हें काय ।। ३७० ।। सर्व जनासि नयनानंद । कर्ता श्रीहरि परमानंद । लीलेकरूनि सप्त बलिवर्द । खेळवी विनोद दावावया ।। ७१ ।। मस्तकीं हाणोनियां थापा । सप्त वृषभां आणी कोपा । सर्वेचि धरूनि सातही शेंपा । वोढी वत्सपांसम वत्सां ।। ७२ ।। गगना विंधतां तीक्ष्ण बाण । वृथा जाय जेंवि संधान । तेंवि वृषांचीं शृंगें तीक्ष्ण ।

हाणिता कृष्ण गवसेना ॥ ७३ ॥ वृषभा हाणितां टिरीवरी । तो परतोनि शृंगें मारी । तंव पुढें ठाकोनियां मुरारि । प्रतापें धरी शृंगाग्रा ॥ ७४ ॥ बस्त उन्मत्त मस्त जाले । परी कुंजरें धरितां सुटिका न चले । तेंवि सप्तधा होऊनि सप्त मोकळे । वृष आकळिले घननीळें ॥ ३७५ ॥ शृंगीं धरूनि शतधनुष्यें । मागें लोटिलें पुराणपुरुषें । सर्वेचि सप्तांचीं धरूनि पुसें । वोढी आवेशें फरफरा ॥ ७६ ॥ ऐसें कौतुक सभेच्या जनां । दाविता जाला यादवराणा । विशेष नाग्नजितीच्या मना । संशयनिरसनालागूनी ॥ ७७ ॥ हें ऐकोनि श्रोते जन । म्हणती तयेसी संशय कोण । कृष्णीं आसक्त तियेचें मन । जाणोनि वधूगण उपहासी ॥ ७८ ॥ कृष्ण कमनीय नोवरा खरा । रुचला तुझिया अभ्यंतरा । परंतु यातें बहुत दारा । तुज शेजारा कैं जोडे ॥ ७९ ॥ इत्यादि स्त्रियांच्या उपहासवचनीं । संशयापन्न नृपनंदिनी । जाणोनि सप्तधा चक्रपाणि । होऊनि दमनीं वृष बांधे ॥ ३८० ॥ बहुधा रूपें धरूनि हरि । असपत्नभावें रमवी नारी । ऐसा संशय करूनि दुरी । स्वयें नोवरी प्रोत्साही ॥ ८१ ॥ येऱ्हवीं एकला सातां जणां । समर्थ असतां वृषनिग्रहणा । सप्तधा जाला त्या कारणा । श्रोत्यां सज्जनां सूचविलें ॥ ८२ ॥ सभाप्राङ्गणीं मुहूर्त चारी । वृषभां खेळवी कैटभारि । त्यानंतरें बांधोनि दोरीं । वोढी श्रीहरि तें ऐका ॥ ८३ ॥

बध्वा तान्दामभिः शौरिर्भग्नदर्पान्हतौजसः । व्यकर्षल्लीलया बद्धान्बालो दारुमयान्यथा ॥ ४६ ॥

शूरसेनाचा नातु हरि । यालागीं नामें बोलिजे शौरि । तेणें सातही वृषभ एके हारी । बांधोनि दोरीं आकर्षिले ॥ ८४ ॥ दर्प भंगला त्या वृषभाचा । तेजोलोप जाला साचा । घर्म निथळे सर्वांगाचा । लोप शक्तीचा जाला पैं ॥ ३८५ ॥ ऐसियांतें चक्रपाणि । वोढिता जाला धरूनि कानीं । सभानायकां दाविलें नयनीं । प्रतिज्ञा जिणोनि आश्चर्य ॥ ८६ ॥ जेंवि काष्ठाचीं वृषभ घोडीं । दोर बांधूनि बाळक वोढी । सप्त वृषभां ते परवडी । केली रोकडी श्रीकृष्णें ॥ ८७ ॥ हें देखोनि कोशलपति । आणि पुरजनींहि समस्तीं । जयजयकार केला प्रीति । नाग्नजिती हरिखेली ॥ ८८ ॥ यादववीर थरारिले । तिहीं जयजयकार केले । कृष्णें नोवरीतें जिंकिलें । आतां वहिलें चला म्हणती ॥ ८९ ॥ शृंगारूनियां नाग्नजिती । नेते जाले शिबिराप्रति । कोशलराजा करी विनति । सप्रेमभक्ति यदुवर्या ॥ ३९० ॥ म्हणे माझें पूर्वसंचित । होतें अनंतजन्मार्जित । तया पुण्यें आजि येथ । कृष्ण जामात जोडला ॥ ९१ ॥ प्रतापें नोवरी जिंकिली पणीं । त्यावरी माझी एक विनवणी । यथासूत्रें विधिविधानीं । पाणिग्रहणीं वरावी ॥ ९२ ॥ दासांमाजि गणूनि मातें । सनाथ कीजे श्रीभगवंतें । चाऱ्ही दिवस राहोनि येथें । मत्पूजेतें स्वीकारिजे ॥ ९३ ॥ ऐसें विनवितां कोसलपति । ऐकोनि तोषला कमलापति । शिबिरा नेऊनि नाग्नजिती । दिधली पुढती रायातें ॥ ९४ ॥

ततः प्रीतः सुतां राजा ददौ कृष्णाय विस्मितः । तां प्रत्यगृण्हाद्भगवान्विधिवत्सदृशीं प्रभुः ॥ ४७ ॥

त्यानंतरें प्रीतीकरून । कोसलपति कन्यादान । करिता जाला विस्मयें करून । कृष्णाकारणें सद्भावें ॥ ३९५ ॥ दोहींकडील मूळपत्रिका । सुहृदां आप्तां धाडिल्या देखा । वसनीं गौरवूनियां

वार्तिकां । म्हणती ठाका समयातें ॥ ९६ ॥ अक्रूर गेला हस्तिनापुरा । पत्रिका अर्पिली युधिष्ठिरा । तेणें प्रेरिलें पार्थवीरा । माद्रीकुमरांसमवेत ॥ ९७ ॥ उभयपक्षींचे सोयिरे आप्त । ऐकोनि पातले जी समस्त । वैदिक दैवज्ञ विपश्चित । आणिले त्वरित लग्नासी ॥ ९८ ॥ देवकप्रतिष्ठा दोहींकडे । करिते जाले द्विज निवाडे । ब्राह्मण पूजिले वाडेंकोडें । अहेर ज्येष्ठा अर्पिती ॥ ९९ ॥ सेवती रुखवत अर्पिलें हरि । कोशलें आदर केला भारी । अनेक वाद्यांचिया गजरीं । कोसलपुरी गर्जतसे ॥ ४०० ॥ साळंकृत नारी नर । मिरवती जैसे स्वर्गीं अमर । गुढिया मखरीं साळंकार । लाजवी नगर अमरपुरा ॥ १ ॥ मार्तंडमंडलोदय लक्षूनी । घटिका प्रतिष्ठिली जीवनीं । वधूमंडपा फळ घेऊनी । गजरें यादव पातले ॥ २ ॥ मंडपा आणूनि नाग्नजिती । अक्रूरें पूजिली यथानिगुती । वस्त्राभरणें अर्पूनि भक्ति । गेले पुढती स्वशिबिरा ॥ ३ ॥ सर्वेंचि वरासि निघालें मूळ । नग्नजितराजा कोशलपाळ । सर्वें घेऊनि सोयरे सकळ । आला तत्काळ हरिशिबिरा ॥ ४ ॥ वाजंत्रांची लागली घायी । नर्तकी नाचती ठायीं ठायीं । बिरुदावळी पढती पाहीं । भाट बंदिजन बहुसाल ॥ ४०५ ॥ रायें करूनि श्रीकृष्णपूजा । वस्त्राभरणें अर्पिलीं वोजा । वोहमायेनें सहजीं सहजा । तेलवणासी समर्पिलें ॥ ६ ॥ अमूल्य तुरंग श्यामकर्ण । त्यावरी आरूढ जाला कृष्ण । भंवता सुवासिनींचा गण । अक्षता मौळीं समर्पिती ॥ ७ ॥ सात्वत दाशार्ह यादव । वृष्णि अंधक भोज माधव । अर्जुनप्रमुख वऱ्हाडी सर्व । निघाले स्वमेव उत्साहें ॥ ८ ॥ दणाणिलिया कुंजरभेरी । पताका डोलती दिव्यांबरीं । गगन झांकलें तुंगातपत्रीं । श्वेतचामरीं हरि वीजिती ॥ ९ ॥ शशांकवलयासमान छत्रें । विकसित गमती सहस्रपत्रें । आश्चर्य मानिजे दशशतनेत्रें । ऐकोनि श्रोत्रें हरिगरिमा ॥ ४१० ॥ विवाहमंडपा आला वर । दासी पिहित करिती द्वार । त्यांसि देऊनि तदुपचार । वसनाभरणीं गौरविल्या ॥ ११ ॥ वोंवाळूनि सांडिती मुद । नेत्रां स्पर्शिती तोय विशुद्ध । तळीं उतरूनियां मुकुंद । मंडपीं प्रसिद्ध मग नेती ॥ १२ ॥ रत्नखचित चौकीवरी । मृद्वासन सह झल्लरी । त्यावरी बैसवूनियां श्रीहरि । राजा करी मधुपर्क ॥ १३ ॥ अर्घ्य पाद्य सर्वोपचार । अर्पूनि पूजिला जगदीश्वर । रत्नखचित अलंकार । पीताम्बर नेसविला ॥ १४ ॥ वैरणा घालूनि क्षीरोदक । उभा केला त्रैलोक्यजनक । मध्यें धरूनिया जवनिक । नोवरी सम्यक आणियली ॥ ४१५ ॥ द्विजवर पढती मंगलपद्यें । हरियशमिश्रें कविकृत सद्यें । म्हणती सावधान उपाध्यें । दैवतें आद्यें चिंता हो ॥ १६ ॥ लक्ष्मीनारायणचिंतन । कीजे म्हणती सावधान । नाहीं लग्नासी व्यवधान । घटिका पूर्ण जाणोनी ॥ १७ ॥ ग्रहहोरा द्रेष्काण शुद्ध । नवांश द्वादशांश अमळ विशुद्ध । त्र्यंशांशांचा स्वामी बुध । अमोघफलद जाणा हो ॥ १८ ॥ ॐपुण्यकाळीं अंतःपट । सुटतां वधूवरें एकवट । द्विजवर करिती निगमपाठ । जाला बोभाट वाद्यांचा ॥ १९ ॥ मुक्ताफळीं लग्नाक्षता । कृष्णें घातल्या नोवरीमाथा । तेव्हां लाहूनि पूर्णता । जाली तत्त्वता हरियोग्य ॥ ४२० ॥ कृष्णकृपेची योग्यता जाली । मग नोवरी हरिवरी अक्षता घाली । वियोगाची काळिमा गेली । सबाह्य भरली हरिलाभें ॥ २१ ॥ ऐसें पाणिग्रहण जालें । कंकण उभयांसि बांधलें । बोहर बोहला बैसविलें । मग आदरिलें हवनातें ॥ २२ ॥ अग्निप्रतिष्ठा आसादनीं । विवाहहोमीं शांतिपठनीं । अक्षता वधूवरांच्या मूर्ध्नि । टाकिल्या ब्राह्मणीं ते काळीं ॥ २३ ॥

सप्तपदी करपीडनीं । वरदाक्षिणा चक्रपाणि । देता जाला आनंदोनी । कल्याणखाणी वधूजनक ॥ २४ ॥ भूरि दक्षिणा वांटिलें कनक । मंडपीं गौरविले याचक । श्रवण पिळावया श्यालक । जाले सम्मुख ते काळीं ॥ ४२५ ॥ त्यांसी तदुचित वसनाभरणें । देऊनि गौरविले मेहुणे । यावरी राजा सप्रेम वचनें । करी प्रार्थने यदुवर्या ॥ २६ ॥ वृद्धाचारें चक्रपाणि । चतुर्थ होम आमुचे सदनीं । सहपरिवारें साङ्ग करूनी । मजलागूनि तोषविजे ॥ २७ ॥ प्रार्थनेसरिसा श्रीमुरारि । मंडपीं राहोनि दिवस चारी । विवाहोत्सव साङ्ग करी । नवनोवरीसमवेत ॥ २८ ॥ नवऱ्हाडियांसि तिलक माळा । परिमळद्रव्यें धूसर उधळा । विडे देऊनियां सकळां । नृपें केला जयगजर ॥ २९ ॥ नोवरी देऊनि कडियेवरी । गौरीहरातें नेती हरि । तेथें पूजुनि शंकरगौरी । आम्र वधूवरीं शिंपियला ॥ ४३० ॥ चाऱ्ही दिवस अन्नशान्ति । रायें करूनि यथानिगुती । मांडिली साडियांची आइती । शुभ मुहूर्तीं द्विजवचनें ॥ ३१ ॥ वाणपालटण जालियावरी । साडे आरंभिले दिवसीं येरीं । मुहूर्त पाहोनियां द्विजवरीं । केली सामग्री साडियांची ॥ ३२ ॥ प्राङ्मुख बैसवूनियां वधूवरें । प्रत्यङ्मुखें कोशलेश्वरें । उभयपक्षी निजसोयरे । बैसते जाले स्वपक्षीं ॥ ३३ ॥ ऐरणीपूजन करिती द्विज । नाग्नजितीसह गरुडध्वज । पूजिता जाला कोशलराज । सहितभाज वधूजननी ॥ ३४ ॥ वायनें अर्पूनियां द्विजवरां । अहेरीं गौरवी यादववीरां । नोवरी निरवी शार्ङ्गधरा । आणि अक्रूरादिकां सकळां ॥ ४३५ ॥ वंशपात्र विस्तारून । शिरीं ठेवूनि देती मान । कृष्णप्रमुख यादवगण । करिती निरवण त्यांप्रति ॥ ३६ ॥ कोशलपतीच्या समस्त वनिता । देखोनियां जामात दुहिता । हर्षनिर्भर जाल्या चित्ता । तेंचि श्रोतां परिसावें ॥ ३७ ॥

राजपत्न्यश्च दुहितु कृष्णं लब्ध्वा प्रिय पतिम् । लेभिरे परमानदं जातश्च परमोत्सवः ॥ ४८ ॥

राजपत्न्या प्रहृष्टचित्तीं । कृष्ण लाधली नाग्नजिती । परस्परें प्रियदंपती । भाग्य म्हणती कुमरीचें ॥ ३८ ॥ नेत्रीं आणोनियां अश्रुपात । कन्या निरविती त्या समस्त । परमानंदें वोसंडत । म्हणती सुकृत हें फळलें ॥ ३९ ॥ जन्मोनियां आमुचे जठरीं । दैवें वरिला त्वां श्रीहरि । कुळतारिणी नौका खरी । भवसागरीं तूं आम्हां ॥ ४४० ॥ आमुचे कुळीं हे जन्मली । आम्हीं पुत्रवत् प्रतिपाळिली । आतां यदुनंदना अर्पिली । तुम्हीं पाळिली पाहिजे ॥ ४१ ॥ जन्मोनियां आमुचे कुळीं । इणें वरिला श्रीवनमाळी । कृष्णअर्धांगीं शोभली । यास्तव जाली जगज्जननी ॥ ४२ ॥ उचलूनियां दोहीं करीं । यादवांचे मांडियेवरी । बैसवूनियां विनति करी । जे स्नेहें नोवरी पाळावी ॥ ४३ ॥ दिव्य वसनें रत्नाभरणें । अर्पिलीं यादवांकारणें । सुगंधद्रव्यें माळा सुमनें । ताम्बूल देती चहूंकडे ॥ ४४ ॥ लागली वाजंत्रांची घाई । भाट बिरुदें पढती पाहीं । गृहप्रवेशाचिये समयीं । उत्साह करिती तो ऐका ॥ ४४५ ॥

शंखभेर्यानिका नेदुर्गीतवाद्यद्विजाशिषः । नरा नार्यश्च मुदिताः सुवासःस्रगलंकृताः ॥ ४९ ॥

ढोल दमामे शंख भेरी । आनक गोमुख काहळा गजरीं । दुंदुभिघोषें कोशलनगरी । गर्जे अंबरीं मेघरवें ॥ ४६ ॥ नाचणीचे नाचती थाट । ठायीं ठायीं लखलखाट । नागरनरनारी संतुष्ट । वसनीं

समृष्ट उज्वलित ॥ ४७ ॥ अमरपुरंध्री अमरावती । माजि उत्साहें मिरवती । तैसिया साळंकृता युवती । नरसुरपति सम तोषें ॥ ४८ ॥ सुमनावतंस सुमनहार । वस्त्राभरणीं शोभती नर । यावरी आंदण राजेश्वर । देता जाला तें ऐका ॥ ४९ ॥

दशधेनुसहस्राणि पारिबर्हमदाद्विभुः । युवतीनां त्रिसाहस्रं निष्कग्रीवं सुवाससाम् ॥ ५० ॥

कामधेनूच्या काल्हवडी । दुभती सुरसुरभीसुरवाडीं । तनुजाजामात आवडी । पंक्तिसहस्र आंदणा दे ॥ ४५० ॥ कार्तस्वराचीं भूषणें । वरी जडियलीं अमूल्य रत्नें । पदकेंसहित कंठाभरणें । ग्रीवामंडित विराजती ॥ ५१ ॥ अग्निधौतें कनकवसनें । बहुधा रंगीं विराजमानें । बुंथी कंचुकिया परिधानें । माळा सुमनीं सुशोभिता ॥ ५२ ॥ चारु चपळा चातुर्यखाणी । अवयवपूर्णा सुभगा तरुणी । ऐसिया तीन सहस्र आंदणीं । दासी दिधल्या दुहितेतें ॥ ५३ ॥

नवनागसहस्राणि नागाच्छतगुणान्रथान् । रथाच्छतगुणानश्वानश्वाच्छतगुणान्नरान् ॥ ५१ ॥

भूमंडळींचा पुरंदर । यालागिं क्षीरोद्भव कुंजर । जिणती तैसे नव सहस्र । सालंकार गज दिधले ॥ ५४ ॥ कुंजरां शतगुणें रहंवर । कनकाम्बरीं कृतगुढार । रत्नखचित राजेश्वर । देता जाला नव नियुतें ॥ ४५५ ॥ गगनगामी तुरंगरत्नें । हेमललाममय पल्याणें । रथसंख्येचिया शतगुणें । आंदणा दिधलीं नव कोटी ॥ ५६ ॥ अश्वां शतगुणीं पदातिवीर । तरुण सगुण सुंदर चतुर । दिव्याम्बरीं सालंकार । दिधले किंकर नवार्बुदें ॥ ५७ ॥ शिबिरें जवनिका अंतःपट । दिव्यासनें भाजनें श्रेष्ठ । सुगंध द्रव्यें रसस्वादिष्ट । शाकटी शकटीसह उग्र ॥ ५८ ॥ पारिबर्ह ऐसियापरी । राजा वधूवरां अर्पण करी । मग नोवरी घेऊनियां मुरारि । गेला गजरीं निजशिबिरा ॥ ५९ ॥ राजपत्न्यांसहित नृपति । सुहृदां आप्तां नागरां युवती । मूळ वर्‍हाडी रथ पदाति । शिबिरा जाती बोळवित ॥ ४६० ॥ तेथ समस्तां बहु सम्मान । उपायनें समर्पून । सुमनें सुगंध ताम्बूलदान । प्रार्थना करून बोळविले ॥ ६१ ॥ कृष्णें प्रार्थितां भोजनाप्रति । कोशलरायें केली विनति । पुत्र प्रसवेल नाग्नजिती । तैं देइजे पंक्ती निजशेष ॥ ६२ ॥ वेदमर्यादा जाणोनि हरि । भोजनाचा आग्रह न करी । नोवरी घेऊनि सहपरिवारीं । द्वारके मुरारि चालिला ॥ ६३ ॥ कुंजरभेरीच्या संकेतीं । सेना सन्नद्ध जाली निगुती । वीर वळघले अश्वीं रथीं । द्वारकापंथीं चमू चाले ॥ ६४ ॥ कोशलपति निज सेनेसीं । बोळवावया वधूवरांसीं । जाता जाला द्वारकेसी । आह्लादेंसीं हरिसंगें ॥ ४६५ ॥

दंपती रथमारोप्य महत्या सेनया वृतौ । स्नेहविक्लिन्नहृदयो यापयामास कोशलः ॥ ५२ ॥

रथीं बैसवूनियां दंपती । प्रबळसेनावेष्टित भोंवती । स्नेहाविष्ट कोशलपति । द्रवला चित्तीं ते काळीं ॥ ६६ ॥ नाग्नजितीचा वियोगखेद । कीं कृष्णलाभाचा परमानंद । उभययोगें न वदे शब्द । पुत्री

बाष्पोद पुनःपुन्हा ॥ ६७ ॥ छत्रचामरें आतपत्रें । ध्वजा झळकती दिव्याम्बरें । दुंदुभिप्रमुखवाद्यगजरें । जातां सामोरे द्विज आले ॥ ६८ ॥ स्वार्चित सुस्नात कुसुमपाणि । अनुवादती मंगळवाणी । वधूवरांतें आशीर्वचनीं । गौरविती ते द्विजवर्य ॥ ६९ ॥ पुरंध्री भेटल्या पूर्णकलशीं । बल्लव बल्लवीसह गोरसीं । चास नकुळ वामदेशीं । भारद्वाजेंसिं पैं गेले ॥ ४७० ॥ आज्ञा मागोनि कोशलपति । मूळ वऱ्हाडी स्वपुरा जाती । यादव चालतां द्वारकापथीं । वर्तली ख्याति तें ऐका ॥ ७१ ॥

श्रुत्वैतद्रुरुधुर्भूपा नयंत पथि कन्यकाम् । भग्नवीर्याः दुर्मर्षा सुयदुभिर्गोवृषैः पुरा ॥ ५३ ॥

नाग्नजितीच्या लावण्यरूपा । ऐकोनि अवस्था लागली भूपां । तिहीं पूर्वीं वृषभदर्पा । दमितां संतापा पावले ॥ ७२ ॥ वृषभ दमितां पावले भंगा । विषाणप्रहारीं भेदले अंगा । लज्जित होऊनि गेले मागां । तिहीं या प्रसंगा ऐकोनी ॥ ७३ ॥ कृष्णें सप्त वृषभ दमिले । नाग्नजितीतें प्रतापें वरिलें । हें ऐकोनि विषादा चढिले । रोधिते जाले मार्गातें ॥ ७४ ॥ पूर्वीं वैदर्भीच्या हरणीं । यादवीं भंगिले समराङ्गणीं । जरासंधाच्या साह्याचरणीं । त्रासिले रणीं यदुसुभटीं ॥ ४७५ ॥ भग्नवीर्य नग्न उघडे । निर्लज्ज पळाले यादवांपुढें । सप्त वृषभीं मोडिलीं हाडें । वधूचे चाडे तिहीं पुढती ॥ ७६ ॥ राठापुरीच्या पश्चिमदेशीं । निर्जळमरुमंडळप्रदेशीं । वळें नोवरी हारावयासी । मार्ग रोधूनि राहिले ॥ ७७ ॥ पूर्वीं भंगले होते जितुके । समानदुःखी मिळोनि तितुके । कन्या नेतां यदुनायकें । दुर्मर्ष तवकें उठावले ॥ ७८ ॥ घ्या घ्या म्हणोनि यादवभारीं । रिघोनि करिती मारामारी । एक वर्षती बाणधारीं । एक शस्त्रास्त्रीं भिडताती ॥ ७९ ॥ भिंडिपाळांचे गुंडेमार । अग्नियंत्रें सुटती क्रूर । बिकट मार्ग रोधूनि शूर । पायभार स्थिरावले ॥ ४८० ॥ ठायीं ठायीं झाडोझाडीं । राहूनि लोटिती प्रचंड धोंडी । घ्या घ्या मारा म्हणती तोंडीं । यादवें बापुडीं सांपडलीं ॥ ८१ ॥ आजिचा समय फावला आम्हां । जीत धराया मेघश्यामा । नाग्नजितीचा धरिला प्रेमा । तेणें संग्रामा वरपडला ॥ ८२ ॥ आतां जाईल कोणीकडे । पडला बलिष्ठाचिये दाढे । कोशलपतिही बापुडें । सौहार्दभिडे सांपडलें ॥ ८३ ॥ नोवरी हिरोनि धरा हरि । नेऊनि मागधाचिये नगरीं । उमचा मागील समरहारी । म्हणोनि शस्त्रास्त्रीं वर्षती ॥ ८४ ॥ जैसे दरवडेकरी चोर । दुष्ट दुर्मद लहान थोर । वस्त्राहरणासि तत्पर । तेंवि पामर संघटती ॥ ४८५ ॥ यादवांचें सन्नद्ध सैन्य । अग्रभागीं वीर अर्जुन । पार्ष्णिरक्षक तो युयुधान । गान्दिनीनंदन सव्यपार्श्वीं ॥ ८६ ॥ वामपार्श्वीं उद्धव वीर । मध्यें कोशल आणि श्रीधर । अष्टौ भागीं यदुकुमार । धीर गंभीर प्रतापी ॥ ८७ ॥ ऐकोन परवीरांची हाक । यादव उठावले निःशंक । घृतावदानें जेंवि पावक । तेंवि सम्मुख चौकटले ॥ ८८ ॥ पर्वताचिये अवघड संधीं । मार्ग रोधूनियां दुर्मदीं । बाण वर्षतां विशालबुद्धि । बीभित्सु युद्धीं उठावला ॥ ८९ ॥

तानस्यतः शरव्रातान्बंधुप्रियकृदर्जुनः । गांडिवी कालयामास सिंहः क्षुद्रमृगानिव ।। ५४ ।।

सोयरा म्हणिजे सुहृद् बंधु । त्या कृष्णातें करावया मोदु । फाल्गुन करिता जाला युद्ध । तो प्रबंधु अवधारा ।। ४९० ।। मार्गे रोधूनि बळिष्ठ वैरी । वर्षत असतां बाणधारीं । अर्जुनें तोषूनि अभ्यंतरीं । गांडीव करी ज्याबद्ध ।। ९१ ।। प्रळयवातें भंगती मेघ । तेंवि पार्थाचे शर अमोघ । शत्रुसैन्या केला भंग । सोडूनि मार्गे ते पळती ।। ९२ ।। आकर्ण गांडिवाकृष्ट बाणीं । रणा आणिल्या वीरश्रेणी । पुढें समरीं न थरे कोण्ही । प्राण घेऊनि पळाले ।। ९३ ।। जेंवि लोटतां मृगनायकें । लपती पळती जंबुकें शशकें । अजसम गजादि श्वापदें मशकें । तेंवि क्षुल्लकें भयभीतें ।। ९४ ।। भग्नवीर्य नृपांच्या थाटी । पळती समरीं देऊनि पाठी । यादव प्रतापी महाहठी । त्यांतें लुंठिती विजयार्थ ।। ४९५ ।। जिंकिले अश्व रथ कुंजर । कित्तेक जीत धरिले वीर । सामान्य पदातियांचा भार । वोझीं देऊनि चालविले ।। ९६ ।। कित्तेक तृणें धरिती दांतीं । प्राणदाना एक मागती । एकीं भेदरा घेतला चित्तीं । उदो म्हणती जीवभयें ।। ९७ ।। वस्त्रें हिरतल्या नागव्या झुंडी । वोडणाची करूनि परवडी । खड्ग दिवटी उदो तोंडीं । म्हणती नव खंडीं फिरों भूतें ।। ९८ ।। साधुनिंदा घडली मुखें । श्वान म्हणविती तया दोषें । भुंकभुंको नाचती सुखें । येळकोटघोषें गर्जोनी ।। ९९ ।। प्राण वांचवावया रणीं । एक म्हणविती दिंडिगाणी । भस्मोद्धूलनीं शंखस्फुरणीं । पाषाण मूर्ध्नीं एक वाहती ।। ५०० ।। एक उताणे पडिले पंथीं । नेत्रीं घालूनि अपयशमाती । अंध पंगू म्हणविताती । मुखें गर्जती धर्म जागो ।। १ ।। ऐसे असंख्य वेषधारी । प्राणरक्षणें परोपरी । भराडे बाळसंतोष भिकारी । बहुधा शरीरीं नट नटले ।। २ ।। दीनाहूनि दीन फकीर । पोटासाठीं दारोदार । कंठशोषें करिती किरकिर । केंवि दुस्तर निस्तरवे ।। ३ ।। शौर्य हारपोनि गेलें समरीं । पुरुषार्थभंगें म्हणविती नारी । सौऱ्या नाचती देऊनि फेरी । श्मश्रु वक्त्रीं लाजविती ।। ४ ।। ऐसियांतें यादववीर । सोडिती देऊनि नाभीकार । पाखंडवेषें भरूनि उदर । लज्जित स्वपुरें प्रवेशती ।। ५०५ ।। कैंची नोवरी कैंचें यश । हारविले गजरथाश्व निःशेष । नागवे उघडे देशोदेश । पावोनि अपयश रिपु गेले ।। ६ ।। कृष्णें वरिली विजयलक्ष्मी । यादव यशस्वी संग्रामीं । भगवत्प्रताप भरला व्योमीं । हेमललामीं गज भरिले ।। ७ ।। परमानंदें चढले घाट । रथ चालती घडघडाट । महावाद्यांचा बोभाट । पढती भाट जयबिरुदें ।। ८ ।। श्वफल्कप्रमुख यादवश्रेष्ठ । येतां देखूनि श्रीवैकुंठ । त्यातें भेटूनि रथोपविष्ट । होऊनि संतुष्ट चालिले ।। ९ ।। लंघूनियां साभ्रमती । पुढें ठाकिली द्वारावती । वार्ता ऐकोनि रेवतीपति । नृपसंकेतीं पातला ।। ५१० ।। महाद्वारीं दंपतीवरूनी । बळी सांडिले वोवाळूनी । विप्रां रत्नांजलि अर्पूनी । सभास्थानीं प्रवेशले ।। ११ ।। भद्रासनीं उग्रसेन । प्रमुदित दंपती लक्षून । कृष्णप्रमुखां आलिंगून । सदनालागून पाठविले ।। १२ ।। पारिबर्ह कोशलदत्त । नृपा अर्पूनि केलें विदित । उग्रसेनें तें समस्त । देऊनि भगवंत गौरविला ।। १३ ।। कोशलपतीतें आलिंगन । देवक वसुदेव उग्रसेन । स्नेहसंभ्रमें देती जाण । म्हणती धन्य तव योगें ।। १४ ।। येरु चरणीं घाली मिठी । म्हणे मज विलोका कृपादृष्टी । तुमच्या सौजन्यें भूपृष्ठीं । सनाथ जालों

स्वामियां ॥ ५१५ ॥ परस्परीं मधुरोत्तरीं । स्नेह वर्षती अमृतधारीं । नृपाची आज्ञा घेऊनि हरि । पारिबर्हेशीं निघाला ॥ १६ ॥

पारिबर्हमुपागृह्य द्वारकामेत्य सत्यया । रेमे यदूनामृषभो भगवान्देवकीसुतः ॥ ५५ ॥

आंदणा नाम पारिबर्ह । कोशलें दीधलें तितुकें सर्व । घेऊनियां वासुदेव । निजभुवनाप्रति पातला ॥ १७ ॥ सत्या म्हणिजे नाग्नजिती । तिच्या ठायीं परमप्रीति । विशेष कोशलनृपाची भक्ति । तिणें श्रीपति वश केला ॥ १८ ॥ जो कां देवकीचा तनय । ज्याचें अचिंत्य गुणैश्वर्य । यदूंमाजि ऋषभ जो यदुवर्य । सत्याप्रिय तो जाला ॥ १९ ॥ चैत्ररथादि नंदनवनीं । अमरेन्द्र क्रीडे सह इंद्राणी । सत्यासमवेत चक्रपाणि । द्वारकाभुवनीं तेंवि रमे ॥ ५२० ॥ सत्यारहित श्रीभगवंत । निमेष नोहे असत्यावृत । यालागिं सदैव सत्यायुक्त । क्रीडे त्रिजगांत जगदात्मा ॥ २१ ॥ लोकत्रयीं अपूर्व वस्तु । सत्येकारणें दे भगवंत । मनीं असमायी वृत्तान्त । तो एकान्त सत्येसीं ॥ २२ ॥ माशब्दें जे निषेधोक्ति । मिथ्या माया अविद्याभ्रान्ति । तीतें विसरोनियां श्रीपति । रमे एकान्तीं सह सत्या ॥ २३ ॥ एवं श्रीकृष्ण सत्यारमण । त्यासि नावडे असत्य भान । सत्या प्रियतम जीवप्राण । श्रोते सज्ञान जाणती ॥ २४ ॥ ऐसें कथिलें विवाहषट्क । यावरी सप्तमाचा विवेक । सावध होऊनि नावेक । श्रोतीं सम्यक परिसावा ॥ ५२५ ॥

श्रुतकीर्तेः सुतां भद्रामुपयेमे पितृष्वसुः । कैकेयी भ्रातृभिर्दत्तां कृष्णः संतर्दनादिभिः ॥ ५६ ॥

श्रुतकीर्ति जे वसुदेवभगिनी । कैकेय धृष्टकेतूची राणी । भद्रा तयेची नंदिनी । कृष्णालागूनि दीधली ॥ २६ ॥ संतर्दनादि पांचै बंधु । तिहीं जननीसीं संवादु । करूनि केला तनुसंबंधु । आनंद-कंदवरनियमें ॥ २७ ॥ प्रधान पुरोहित ज्योतिषी । द्वारके धाडिले रायापासीं । कन्यादान श्रीकृष्णासी । वाङ्नियमेशीं दृढ केलें ॥ २८ ॥ वसुदेवप्रमुख यादव वृष्णि । देवकीप्रमुख वऱ्हाडिणी । सेनासंभारें जाऊनी । भद्रा पर्णूनि हरि आला ॥ २९ ॥ यथाविधानें विवाह साङ्ग । कन्यादानादिप्रसंग । करूनि पूजिला श्रीरंग । धृष्टकेतुनृपनाथें ॥ ५३० ॥ संतर्दनापि पांचही जाण । परम प्रियतम नृपनंदन । तिहीं भगिनी कृष्णार्पण । केली अनन्यसद्भावें ॥ ३१ ॥ विधिविधान वृद्धाचार । विवाहसोहळा सविस्तर । कथितां ग्रंथ वाढेल फार । यालागिं मुनिवरवत् व्याख्या ॥ ३२ ॥ यावरी अष्टमविवाहकथा । सावधचित्तें परिसिजे श्रोतां । कथिली योगीन्द्रें भारता । त्या वृत्तान्ता अवधारा ॥ ३३ ॥

सुतां च मद्राधिपतेर्लक्ष्मणां लक्षणैर्युताम् । स्वयंवरे जहारैकः स सुपर्णः सुधामिव ॥ ५७ ॥

मद्ररायाची कुमारी । लक्ष्मणानामें अतिसुंदरी । शुभलक्षणीं जैसी गौरी । कीं सावित्री दुहिणाची ॥ ३४ ॥ शुभलक्षणीं सालंकृत । कन्या जाणोनि मद्राधिनाथ । विष्णु वरेण्य मूर्तिमंत । इच्छी

जामात करावया ॥ ५३५ ॥ सर्वांमाजि जो वरिष्ठ। बळप्रतापें सद्गुणें श्रेष्ठ। त्रैलोक्यनायक श्रीवैकुंठ। निगमपाठ वाखाणी ॥ ३६ ॥ ऐसिया वेदोदितविश्वासें। वरपरीक्षेकारणें कैसें। प्रतिज्ञायंत्र निर्मिलें असें। मद्रनरेशें चातुर्यें ॥ ३७ ॥ पांचाळपतीनें राया यंत्र। अर्जुनपरीक्षेलागिं विचित्र। हेंही तैसेंचि अतिदुस्तर। केलें श्रीधरप्राप्त्यर्थ ॥ ३८ ॥ स्तंभातळवटीं मांडूनि कलश। स्तंभाग्रवंशीं निर्मिला भास। कलशीं लक्षूनि भेदील त्यास। नृपतनयेस तो पर्णो ॥ ३९ ॥ हें ऐकोनि स्वयंवराप्रति। मिनले भूतळींचे भूपति। कौरव पाण्डव मागध नृपति। चैद्य सैन्धव मत्स्यादि ॥ ६४० ॥ यंत्र भेदितां नृपनंदन। पावले बहुतेक अपमान। द्रौपदी जिंकिता जो अर्जुन। नोहे आंगवण तयासही ॥ ४१ ॥ जाणोनि रायाचें अंतर। सर्वसाक्षी जगदाधार। सज्ज करूनियां रहंवर। पावला सत्वर मद्रपुरा ॥ ४२ ॥ एकला एकाकी वनमाळी। प्रवेशोनियां नृपमंडळीं। यंत्र भेदूनि पाडिलें तळीं। मद्रेन्द्रबाळी पर्णिली ॥ ४३ ॥ लक्ष्मणेनें पाहूनि हरि। आनंदली अभ्यंतरीं। कृष्णें उचलूनि दोहीं करीं। सवेग रहंवरीं बैसविली ॥ ४४ ॥ एकला देखोनि श्रीभगवान। भूभुज करिती समराङ्गण। त्यांचा भंगूनियां अभिमान। नोवरी जिंकूनि जय वरिला ॥ ५४५ ॥ जेंवि सुपर्णें जिंकूनि विबुधां। स्वर्गींहूनि आणिली सुधा। तेंवि श्रीकृष्णें भूपाळवृंदा। भंगूनि प्रमदा पर्णियली ॥ ४६ ॥ लोकत्रयीं दाविली ख्याति। भंगले भूप स्वपुरा जाती। यथाविधानें मद्रनृपति। कन्या श्रीपती मग अर्पी ॥ ४७ ॥ विजयश्रियेसिं वाद्यगजरीं। कृष्ण प्रवेशे द्वारकापुरीं। मद्रपतिही स्वसैन्यभारीं। बोळवी श्रीहरि सप्रेमें ॥ ४८ ॥ लक्ष्य भेदूनि लक्ष्मणा वरिली। मूळश्लोकीं हे नाहीं बोली। म्हणाल वृथा व्याख्या केली। तरी कथा सूचिली ते ऐका ॥ ४९ ॥ कुरुक्षेत्रयात्राकथनीं। द्रौपदी आणि श्रीकृष्णपत्नी। संवाद करिती तिये प्रकरणीं। संशयापन्नीं विलोकिजे ॥ ५५० ॥ सहज कथा ते येईल पुढां। येथ कासया देऊं झाडा। अल्पज्ञशंकानिरसनचाडा। उल्लेख थोडा सूचविला ॥ ५१ ॥ रुक्मि विटंबून रुक्मिणी-हरण। स्यमंतकार्थ ऋक्ष दमून। जाम्बवतीचें पाणिग्रहण। विवरीं रिघोन पैं केलें ॥ ५२ ॥ ग्लानि पावोनि सत्राजितें। स्यमंतकेंसीं सत्यभामेतें। पाणिग्रहणीं श्रीकृष्णातें। अर्पूनि स्नेहातें वाढविलें ॥ ५३ ॥ कालिन्दीनें यमुनाजळीं। नियमें आराधूनि वनमाळी। प्रेमें वरूनि वनिता जाली। सदा शोभली अर्धांगी ॥ ५४ ॥ जयत्सेन अवंतिराजा। मित्रविंदा हे त्याची तनुजा। स्वपदीं निरत जाणोनि भाजा। कृष्णें केली प्रतापें ॥५५५॥ कोशलदेशींचा नग्नजिन्नृपति। त्याची तनया नाग्नजिती। सप्त वृषभां दमूनि युक्ति। वरी श्रीपति तत्प्रेमें ॥ ५६ ॥ श्रुतकीर्ति जे वसुदेवभागिनी। तयेची तनया लावण्यखाणी। केकयपतीनें पाणिग्रहणीं। भद्रा कृष्णा समर्पिली ॥ ५७ ॥ मद्रेन्द्रतनया शुभलक्षणा। नामें म्हणती जे लक्ष्मणा। यंत्र भेदूनि पाणिग्रहणा। करूनि कृष्णें पर्णियली ॥ ५८ ॥ अष्टमहिषीपाणिग्रहणें। यापरी प्रतापें केलीं कृष्णें। यावरी भौमासुराच्या निधनें। ललनारत्नें बहु वरिलीं ॥ ५९ ॥

अन्याश्चैवंविधा भार्याः कृष्णस्याऽऽसन्सहस्रशः । भौमं हत्वा तन्निरोधादाहृताश्चारुदर्शनाः ।। ५८ ।।

अष्टमहिषी वेगळ्या तिया । विविधा परीच्या अन्यत्र भार्या । कृष्णासि असत्या जाल्या राया । षोडशसहस्रशतोत्तरा ।। ५६० ।। कोठें होत्या तिया म्हणसी । पृथग्विवाह त्यांचे पुससी । तरी तूं ऐकें इयेविषीं । गोष्टी अल्पसी तुज कथितों ।। ६१ ।। भौमासुराच्या अंतःपुरीं । निरुद्ध होत्या बहु कुमारी । भौमासुरातें मारूनि हरि । द्वारकेमाझारी आणिल्या त्या ।। ६२ ।। विध्युक्त करूनि पाणिग्रहणा । वरिता जाला त्रैलोक्यराणा । सुभगा साध्वी चारुदर्शना । कृष्णांगना त्या सुरवंद्या ।। ६३ ।। ऐसी ऐकूनि श्रीशुकवाणी । अभिमन्युतनय चातुर्यखाणी । प्रश्नालागूनि वक्ष्यमाणीं । अंतःकरणीं सोत्कंठ ।। ६४ ।। कैसा मारिला भौमासुर । कैशा वरिल्या वधू समग्र । भौमें कन्यकासंग्रह फार । केला सादर कोठूनी ।। ५६५ ।। हें समग्र पुसावया । चित्तीं आवडी कौरवराया । तें निरूपण शुकाचार्या । पुढिले अध्यायीं करील ।। ६६ ।। श्रीमद्भागवतीं हे कथा । दशमस्कंधीं वाखाणितां । देवकीच्या अष्टम सुता । अष्टांगना अट्ठावन्नीं ।। ६७ ।। पुढें श्रोतीं सावध होणें । षोडश सहस्र पाणिग्रहणें । एके समयीं केलीं कृष्णें । तें परिसणें कुरुनृपवत् ।। ६८ ।। ब्रह्माण्डमठीं साम्राज्यपीठीं । श्रीएकनाथ देशिकांमुकुटीं । चिदानन्दाच्या श्रवणपुटीं । चित्सुखपेटी सांठविली ।। ६९ ।। तेणें चित्सुखें स्वानन्द भरला । वरें गोविंद तन्मय केला । गोविंदकृपेच्या प्रबोधमलिला । पात्र योजिला दयार्णव ।।५७०।। तेथील जे हे वाङ्मयसुधा । सुसेव्य गुरुपदनिरतां विबुधां । दुर्गम दुर्जनां निंदकां अबुधां । गोचिड दुग्धापडिपाडें ।। ७१ ।। चकोरीं चन्द्रामृत सेविजे । तद्रुचि ध्वांक्षगणीं नेणिजे । दैवी आसुरी प्रकृति वोजे । विभाग सहजें विधिकृत हे ।।५७२।। इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कन्धे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां पंचपाणिग्रहणकथनं नामाष्टपंचाशत्तमोऽध्यायः ।। ५८ ।।

श्लोक ५८ ।। ओवी-संख्या ३२९ ।। एवं संख्या ६३० ।।
( सत्तावन्नावा अध्याय मिळून ओवीसंख्या २७८९८)

अध्याय अठ्ठावन्नावा समाप्त

कृष्णदयार्णवकृत

# हरिवरदा

## अध्याय ५९ वा

श्रीगणेशाय नमः। विश्वभावना विश्वावनका। विश्वंभरिता विश्वात्मका। विश्वस्थितिलयप्रकाशका। निगमगोपका गोविंदा ॥१॥ आज्ञावरें अट्ठावन्न। पर्यंत यथामति व्याख्यान। करूनि पूजिले श्रोतृकर्ण। पुढें अवधान देइजे ॥ २ ॥ एकोनषष्टितमे अध्यायांत। भौमा वधूनि श्रीकृष्णनाथ। कन्या नेऊनि तत्सहित। मग त्या समस्त पर्णील ॥ ३ ॥ भौमहनन कन्याग्रहण। अमर जिंकूनि पार्यातहरण। इतुकें कथेचें व्याख्यान। इये अध्यायीं कथिजेल ॥ ४ ॥ अट्ठावन्नाच्या अंतीं। शुकें ग्रथिली कथासंगति। जे भौमा वधूनियां श्रीपति। पर्णी युवती अनुरक्ता ॥ ५ ॥ हें ऐकोनि मुनीची वाणी। कुरुभूचक्रचूडामणि। सादर होऊनि सप्रेम श्रवणीं। करी विनवणी ते ऐका ॥ ६ ॥

राजोवाच – यथा हतो भगवता भौमे येन च ताः स्त्रियाः। निरुद्धा यत्तदाचक्ष्य विक्रमं शाङ्‍र्गधन्वनः ॥ १ ॥

वाङ्मयप्रकाशकभास्करा। विशिष्ठाचिया प्रपौत्रपुत्रा। त्रिकालज्ञा योगीश्वरा। हरियशवक्त्रामृत पाजीं ॥ ७ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न। त्या कृष्णानें भौमहनन। जैसें केलें तैसें कथन। करूनि श्रवण तृप्त करीं ॥ ८ ॥ षोडश सहस्र कन्यारत्नें। भौमासुरानें हरूनि यत्नें। निरोधूनियां रक्षिलीं प्रयत्नें। तेंहीं श्रवणें परिसवीं ॥ ९ ॥ चकारार्थी भौमनिधन। योजिलें कोण्या कारणें करून। तें सविस्तर निरूपण। कीजे कथन मुनिवर्या ॥ १० ॥ इया श्रवणामाजि लाभ। चाऱ्ही पुरुषार्थ स्वयंभ। जोडती आणि पद्मनाभ। होय वल्लभ सप्रेमें ॥ ११ ॥ क्षीरोदमथनोद्भवरत्न। तेजें शार्ङ्गशरासन। वाहे म्हणोन श्रीभगवान। शार्ङ्गधन्वा कवि म्हणती ॥ १२ ॥ शार्ङ्गपाणीचा विक्रम। कैसा

भौमनिधनोद्यम । कन्या हरूनि मेघश्याम । विवाहसंभ्रम संपादी ।। १३ ।। हें मज सांगा विस्तारून । म्हणोनि रायें केला प्रश्न । तो निरूपी शुक भगवान । कीजे श्रवण तें संतीं ।। १४ ।।

श्रीशुक उवाच – इंद्रेण हृतच्छत्रेण हृतकुंडलबंधुना । हृतामराद्रिस्थानेन ज्ञापितो भौमचेष्टितम् । सभार्यो गरुडारूढः प्राग्ज्योतिषपुरं ययौ ।। २ ।।

राया कुरुकुळक्षीरोदका । वाङ्माधुर्यपीयूषजनका । हरिगुणप्रश्नप्रकाशका । ललामतिलका कौस्तुभा ।। १५ ।। तव जठरींचा करुणाङ्कुर । तोचि केवळ सुरतरुवर । ऐश्वर्यलक्ष्मीविजयचंद्र । मारक गर खळकुटिलां ।। १६ ।। धर्मोपचारक धन्वंतरि । कलिमलरुग्णा निरुजा करी । याचकस्वेच्छा दुभाळु भारी । ते तव दित्सा सुरसुरभि ।। १७ ।। दृढधैर्याचा ऐरावती । तुजपासाव तत्प्रसूति । त्वद्भवचातुर्यकळा दिगंतीं । नृत्य करिती सुरांगना ।। १८ ।। तुझा प्रताप उच्चैःश्रवा । तरणिसमान तुझिया नांवा । वाहूनि तावी दुष्टदानवां । बोधक सर्वां जवाथिला ।। १९ ।। लावण्यरौचर्याची मदिरा । नयनीं प्राशितां ललनानिकरा । प्रमदा होती प्रमादपरा । मन्मथतंत्रा विवशत्वें ।। २० ।। नीतिप्रत्यंचामंडित । शार्ङ्गकोदंड तव चेष्टित । कैं कोण्हाही नोहे नत । भूभुज भ्रान्त गुणघोषें ।। २१ ।। भीतां अभयद दृप्तां भयद । त्वद्भवकंबुसंभवनाद । तुझी बिरुदावळी विशद । एवं क्षीरोद तूं राया ।। २२ ।। तुझिया प्रश्नीं माझें मन । होऊनि हरिगुणगरिमाभिज्ञ । परमोत्साहें कथितां पूर्ण । श्रवणीं सज्जन रंजविसी ।। २३ ।। द्वारकेमाजि वसतां हरि । इंद्रें येऊनि दीनापरी । भौमचेष्टित परोपरी । करुणोत्तरीं [illegible]त केलें ।। २४ ।। अमृतस्रावी वरुणच्छत्र । हरिता जाला धरित्रीपुत्र । मान भंगोनि क्लेशपात्र । संतप्तगात्र सुरवर्य ।। २५ ।। लोकपाळांमाजि वरुण । तत्प्रभुत्वें संक्रंदन । हरिलें जाणोनि आतपत्राण । मरणासमान श्रम मानी ।। २६ ।। बंधु म्हणिजे माता अदिति । भौमें तिचिया कुंडलांप्रति । हिरूनि नेलिया हृदयीं खंती । मानी सुरपति बहुसाळ ।। २७ ।। अमरलोकीं मणिपर्वत । विचित्रधातुरत्नमंडित । प्राग्ज्योतिष नगर तेथ । भौमें रचिलें प्रतापें ।। २८ ।। इत्यादि दुःखें दिवस्पति । हृदयीं स्मरूनि कृष्णाप्रति । विदित करूनि केली विनंती । भौमदुर्मतिहननार्थ ।। २९ ।। कोणे समयीं कोणे ठायीं । इंद्रें प्रार्थिला शेषशायी । हें तूं राया पुससी कांहीं । तरी तें सर्वही तुज कथितों ।। ३० ।। वाराहपुराणींचा संकेत । भूमिदेवीनें भगवंत । प्रार्थूनि भौमासुराचा घात । न करीं म्हणोनि याचिला ।। ३१ ।। तेव्हां भूमिदेवीतें हरि । अभय देऊनि प्रतिज्ञा करी । तुझिये आज्ञे-वेगळा न मरीं । जाण निर्धारीं भौमा मी ।। ३२ ।। तिये भूमिदेवीचा अंश । जाणोनि सत्यभामा प्रत्यक्ष । सवें घेऊनि जगदधीश । भौमवधास पैं गेला ।। ३३ ।। अग्निपुराणीं कथा ऐसी । सत्यभामा प्रिय कृष्णासी । तिचिये सदनीं असतां त्यासी । इंद्रें येऊनि प्रार्थिलें ।। ३४ ।। तेव्हां प्रियेचिया वालभें । सवें नेऊनि पद्मनाभें । भौम वधिला समरक्षोभें । कौतुक कनकाभें दाखविलें ।। ३५ ।। असो हरिवंशीं विस्तृत । निरूपिला जो वृत्तान्त । तोही अवधारा संकेत । अल्पसा येथ कथिजेल ।। ३६ ।। द्वारकाभुवन निर्मिल्यावरी । तेथ ऐश्वर्यें नांदतां हरि । धरूनि दर्शनेच्छा अंतरीं । नारदमुनि

पातला ॥ ३७ ॥ सुरतरूचें प्रसून एक । कृष्णचरणीं अर्पिलें देख । तया सुवासें सम्यक । द्वारकाभुवन कोंदलें ॥ ३८ ॥ अमरलोकींचें अमोघ सुमन । रुक्मिणीप्रेमें श्रीभगवान । देता जाला कौतुकेंकरून । घ्राणतर्पण मानूनी ॥ ३९ ॥ द्वारकेमाजि तो परिमाळ । भरतां वेधले प्राणि सकळ । चंदनीं व्याळ कमळीं अलिउळ । तैसे विह्वळ सौरभ्यें ॥ ४० ॥ सूर्यरश्मि ब्रह्मांडमठीं । प्रसरती परंतु बिंबानिकटीं । उष्मा प्रकाश विशेष दाटी । सौरभ्य उठी तेंवि सुमनीं ॥ ४१ ॥ केवळ रुक्मिणीचें मांदिर । झालें दिव्यसुगंधागार । गुंजारवती कृष्णभ्रमर । तेणें अंबर मुखरित ॥ ४२ ॥ तिये रुक्मिणीचिया दासी । सहज विचरतां पण्यदेशीं । सत्यभामेच्या किंकरींसीं । संगम जाला अवचिता ॥ ४३ ॥ तंव त्या डवरल्या दिव्यसुगंधें । रुक्मिण्यैश्वर्य वदती शब्दें । श्रीकृष्णाचीं वाक्यें स्निग्धें । अन्य नायिका न लाहती ॥ ४४ ॥ स्वस्वामिनीचा कृष्णीं प्रेमा । यास्तव प्रियतम पुरुषोत्तमा । अन्य नायिका हरिसंगमा । इच्छितां श्रमा पावती ॥ ४५ ॥ पट्टमहिषी रुक्मिणी एकी । येरी नायिका मात्र कामुकी । कृष्णपढियंती भीमकी । सुरनरपन्नगीं विख्यात ॥ ४६ ॥ काली पातला ब्रह्मनंदन । तेणें कृष्णासि उपायन । अर्पिलें अमरलोकींचें सुमन । जें द्वारकाभुवन भरी वासें ॥ ४७ ॥ आमुची स्वामिनी हरिवल्लभा । परम पढियंती पंकजनाभा । तियेच्या रतिरसगौरवलाभा । सौरभ्यशोभा हरि अर्पी ॥ ४८ ॥ ऐशा बोलती परस्परीं । ऐकोनि भामेच्या किंकरी । खेद पावोनि अभ्यंतरीं । पातल्या झडकरी निज सदना ॥ ४९ ॥ नमस्कारूनि गोसाविणी । म्हणती वृथा आमुचीं जिणीं । बाह्य विचरतां लाजिरवाणीं । धन्य रुक्मिणी सेविती त्या ॥ ५० ॥ रुक्मिणी आवडे पुरुषोत्तमा । उभयतांचा उत्कृष्ट प्रेमा । इतर नायिका हरिसंगमा । हृदयपद्मामाजि झुरती ॥ ५१ ॥ सत्यभामा हे ऐकोनि गोष्टी । म्हणे मजवीण अवघे सृष्टी । कृष्णासि प्रियतमा गोरटी । नाहींच पोटीं निश्चय हा ॥ ५२ ॥ ऐसें असतां आजि हे वार्ता । तुमच्या वदनें म्यां ऐकतां । परम विस्मय गमला चित्ता । कारण तत्त्वता मज सांगा ॥ ५३ ॥ तंव त्या म्हणती गोसाविणी । सद्गुणचातुर्यलावण्यखाणी । आजिपर्यंत आमुचे मनीं । नाहीं मुखरणी आन वधू ॥ ५४ ॥ तुझिया वचनासाठीं जीव । देऊं शके वासुदेव । ऐसा होता आमुचा भाव । तो आजि वाव जाला पैं ॥ ५५ ॥ आजि आम्हांसि हाटवटीं । जातां भेटल्या रुक्मिणीचेटी । परस्परें वदतां गोठी । ऐकोनि पोटीं स्मय गमला ॥ ५६ ॥ स्वर्गींहूनि नारदमुनि । येऊनि भेटला चक्रपाणी । तेणें श्रीकृष्णाचे चरणीं । दिव्य सुमन समर्पिलें ॥ ५७ ॥ तयाच्या गंधें द्वारकापुर । जालें संपूर्ण सौरभ्यप्रचुर । अपूर्व जाणोनि शार्ङ्गधर । देता जाला भीमकिये ॥ ५८ ॥ कामुकी मात्र अपरांगना । रुक्मिणी मुखरणी वरांगना । इत्यादि ऐकूनि दासीवचना । विषादें मना बाचटिलें ॥ ५९ ॥ ऐसें ऐकोनि किंकरीवचन । क्षोभलें सत्यभामेचें मन । पिटूनि हृदय ललाट वदन । दीर्घ रुदन आदरिलें ॥ ६० ॥ गडबडां लोळे धरणीवरी । भंवत्या सांवरिती किंकरी । म्हणती स्वामिनी शोक न करीं । झणें श्रीहरि परिसेल ॥ ६१ ॥ तंव ते म्हणे परत्या सरा । रुक्मिणी पढियंती श्रीधरा । माझिया स्नेहा पडला चिरा । आतां शरीरा मी न रखें ॥ ६२ ॥ केश तोडितां करतळीं । सुटली वीरगुंठी मोकळी । तुटली मुक्ताफळांची जाळी । मुक्तें भूतळीं विखुरलीं ॥ ६३ ॥ तडतडां तोडिले कंठींचे हार । फाडिली कंचुकी दिव्याम्बर । कर्ण घ्राण करपद शिर ।

रत्नालंकार विसंचिले ॥ ६४ ॥ दांत खाऊनि ओष्ठ रगडी । दीर्घाक्रोशें बोटें मोडी । म्हणे सवतीनें तडातोडी । प्रेमविघडी पैं केली ॥ ६५ ॥ बोल कायसा सवतीप्रति । कुटिल कपटी हा श्रीपति । कार्यापुरती लावूनि प्रीति । वर्ते निश्चिति बहिरंग ॥ ६६ ॥ भोळी नेणें मी कपट याचें । वालभ मानीं बहिरंगाचें । साजणें खंडलें येथूनि साचें । कोण जिणियाचें सुख आतां ॥ ६७ ॥ म्हणोनि धडधडां बडवी उर । करतळीं पिटी निकरें शिर । आक्रंदोनि टाकी शरीर । किंकरीनिकर सांवरिती ॥ ६८ ॥ कंठीं घालूं पाहे पाश । शस्त्रें करूं इच्छी नाश । हृदयीं घालूनि पाषाणास । प्राण निःशेष देऊं इच्छी ॥ ६९ ॥ कपटियाचें साजणें काय । सधर माहेर नाहीं माय । यालागीं छेदूनि सांडीन काय । पुन्हा न पाहें मुख हरीचें ॥ ७० ॥ माझिया सखिया सांगातिणी । तुम्ही जिवलगा मायबहिणी । वोज करा माझिये मरणीं । न लवा पाणी कपटियाच्या ॥ ७१ ॥ येथें आलिया गिरिधर । त्यासि न वदावें उत्तर । माजें झांकूनि शरीर । त्यास बाहीर दवडा गे ॥ ७२ ॥ आतां कायसी भीड त्याची । प्रकट गोष्टी वदा साची । जे अधिकारी दिव्यपुष्पाची । वाढवीं तयेची वल्लभता ॥ ७३ ॥ ऐसी सांडूनि हरीची भीड । त्याचें कपट दावा उघड । पुढती बोलतां आला उभड । घेऊनि तोंड रडे पडे ॥ ७४ ॥ गडबडां धरणीवरी लोळे । सर्वांग धुळीनें माखलें । मूर्च्छा गात्र विकळ पडिलें । प्राण जाले व्याकुळ ॥ ७५ ॥ ऐसिये समयीं किंकरीजनीं । मंचकीं पहुडविली उचलुनी । झांकूनियां सूक्ष्म वसनीं । मौनें दुरूनि निरीक्षिती ॥ ७६ ॥ भामामंदिरीं वर्तलें ऐसें । जाणोनि सर्वज्ञें परेशें । पूर्वभजनप्रेमोत्कर्षे । प्रकटी विशेषें लाम्पट्य ॥ ७७ ॥ अकस्मात भामासदनीं । येऊनियां चक्रपाणि । उद्विग्न देखूनि परिचारिणी । करसंकेतें पुसतसे ॥७८॥ अस्ताव्यस्त गृहोपकरणें । त्रुटितें खंडितें रत्नाभरणें । मुक्ताहार मणिभूषणें । अन्वेषणें करिताती ॥ ७९ ॥ ऐसिया व्यग्र किंकरीगणा । करसंकेतें त्रैलोक्यराणा । पुसतां उपांशु करिती कथना । सर्वाचरणा भामेच्या ॥ ८० ॥ विदित असतांही श्रीहरि । तर्जनी ठेवूनि नासिकेवरी । मौनमुद्रेनें किंकरी वारी । शय्यागारीं प्रवेशे ॥८१॥ भामा अचेतन पुत्रिकाप्राय । देखोनि म्हणे परमाश्चर्य । वृथा श्रमाचें कारण काय । महदन्याय हा केला ॥ ८२ ॥ मग बैसोनि मंचकावरी । उपबर्हणा काढूनि हरि । भामामस्तक मांडियेवरी । धरूनि आदरी सान्तवना ॥८३॥ मुखावरील वसनाञ्चळ । काढूनि कारुण्यें गोपाळ । स्पर्शे शंतम श्रीकर कमळ । चिह्नें सकळ अवलोकी ॥८४॥ केश मोकळे मुखावरी । श्रवणामागें वारूनि हरि । नम्र परिमार्जूनि करीं । अधर अंबरें पूशिले ॥८५॥ साञ्जन द्रवले बाष्पबिंदु । तेणें कळंकी वदनेंदु । राहु स्पर्शासम सखेदु । मंदानंदु म्लानत्वें ॥ ८६ ॥ सूर्योपरागीं खग्रास होतां । पद्मां कुमुदां समसाम्यता । तेंवि नयनाब्जां कुड्मलीकृतां । मन्मथजनिता अवलोकी ॥८७॥ कनककदळीचिया वना । प्रबळ झगटतां शोकपवना । चिरफळ्या होती सुकुमारपर्णा । कंचुकावसना तेंवि दशा ॥ ८८ ॥ जेंवि हाटकेश्वराचिया लिंगा । सार्द्र कुसुमीं पूजिल्या आंगा । कल्माष उठती तेंवि डागां । कज्जलबाष्पीं कुचकुंभीं ॥८९॥ पद्मजाच्या प्रबोधनीं । पद्मालयेच्या पाणिग्रहणीं । पद्मारहिता अभयदानी । शंतमपणि विलसती जे ॥ ९० ॥ तया पाणिपद्में हरि । स्पर्शोनि भामापयोधरीं । कज्जलबिंदु मार्जन करी । आणि मोहरी कामोर्मि ॥९१॥ घृतादिद्रावक सहस्रकिरण । जलसान्निध्यें द्रवे लवण ।

पूर्णचंद्रातें विलोकून । द्रवे संपूर्ण शशिकान्त ॥ ९२ ॥ तेंवि कृष्णाच्या कृपापाङ्गें । चेतना द्रवलीं भामाअंगें । तथापि ईर्ष्या मानभंगें । न करी जागें निजवर्ष्मा ॥९३॥ ऐसें जाणोनि श्रीमुकुंद । अखिलाद्यैक आनंदकंद । म्हणे कायसा एवढा खेद । किमर्थ विषाद संभवला ॥ ९४ ॥ पट्टमहिषी प्रियतमा मज । यालागिं सांगों आलों गुज । सखेद देखोनि हृदयकंज । विह्वळ जालें पैं माझें ॥९५॥ कोणतें शोकाचें कारण । प्रियतमेवीण सांगेल कोण । कथिल्यावांचूनि अंतःकरण । खेदमार्जन केंवि करी ॥ ९६ ॥ ऐसें वदनें बोले हरि । गात्र कुरवाळी शंतमकरीं । हें ऐकोनि रोषातुरी । काय करी सत्यभामा ॥ ९७ ॥ करकरां खाऊनियां दांत । क्रोधें झिडकूनि टाकिला हात । ओष्ठ चावोनि हुंकारयुक्त । तिग्मदृक्पात वक्रमुखें ॥ ९८ ॥ करूनि गात्रा परिवर्तन । किमर्थ कितवाचें आगमन । मम गात्राचें संस्पर्शन । अयोग्य जाण कुहकत्वें ॥ ९९ ॥ सुमनसभुवनोद्भव जें सुमन । मुनिप्रसादमय संपूर्ण । तें जियेतें समर्पून । सुप्रसन्न पैं केलें ॥ १०० ॥ जयेच्या सौमनस्याकारणें । सुमनससुमना समर्पणें । तियेचे सुरतीं सुख भोगणें । संस्पर्शन तद्गात्रा ॥ १ ॥ कैतवभावें प्रतारणा । करूनि दाविली स्निग्धभावना । आजिपर्यंत अंतःकरणा । भांबाविलें पैं माझ्या ॥ २ ॥ आजि जाणों आले गुण । कळलें प्रेमाचें लक्षण । यावरी सर्वथा न ठेवीं प्राण । न दावीं वदन सवतीतें ॥३॥ वडील वडवडिली मजभोंवतीं । वालभ लावूनि विघडिला पति । वाडवा वरपडली मम प्रीति । फुटलें मोतीं सांधेना ॥ ४ ॥ इत्यादि सरोष क्रूरवचनें । सोढव्य करूनि जनार्दनें । चुंबन देऊनि हास्यवदनें । ललितलालनें लालवित ॥१०५॥ म्हणे तूं मज दयिताग्रणी । हें तूंचि जाणसी अंतःकरणीं । वृथा प्रवर्तो परिहारकरणीं । कैतवकरणीसमसाम्य ॥६॥ तव वचनाची मज शिराणी । जे तूं दयिता वरिष्ठ राणी । म्हणोनि अपूर्व गोष्टी कर्णीं । आलों धांवोनि कथावया ॥ ७ ॥ येथ देखोनि तुझी हे दशा । खेदें कवळिलें करणत्रिदशा । कथूं आलों गुह्य पदशा । अवधारणें हें तुज उचित ॥ ८ ॥ इत्यादि वचनें मेघनीळा । वर्षतां विषाददावानळा । शांत करूनि हृत्पद्ममुकुळा । फुल्लार केलें संस्पर्शें ॥ ९ ॥ कटीपासूनि शयनाकार । अर्ध अर्धांगीं धृतशरीर । चुम्बूनि वक्त्रसहस्रार । श्रवणीं श्रीधर गुज सांगे ॥ ११० ॥ आर्यवर्यांचिये मुकुटीं । ज्याची पूज्यता वैकुण्ठपीठीं । तो मुनि कृपेनें पातला भेटी । ते अमृतवृष्टीसम घटिका ॥ ११ ॥ सुरसद्मभव तेणें सुमन । सुरवरभोग्यसौरभ्यपूर्ण । समर्पिलें मज उपायन । स्नेहवर्धन करूनियां ॥ १२ ॥ तयाच्या दर्शनें भुलले नयन । सौरभ्यवेधें वेधिलें घ्राण । तेव्हां माझें अंतःकरण । विचारीं पूर्ण प्रवर्तलें ॥ १३ ॥ हें अर्पावें दयितेप्रति । दयिताग्रणी ते सात्राजिती । तृतीय पत्नी लौकिकरीती । वडील म्हणती भीमकिये ॥ १४ ॥ जें जें आचरिजे पैं श्रेष्ठीं । इतरां जनां तेचि राहटी । यालागिं वेदशास्त्रपरिपाटी । लौकिकदृष्टि रक्षावया ॥ ११५ ॥ पुष्पार्पणें वडिलपण । रक्षिलें तीसी देऊनि मान । परंतु आमुचें अंतःकरण । कोण्हालागून न तर्के ॥ १६ ॥ पुष्पदर्शनें आह्लाद जाला । तेव्हांचि चित्तें संकल्प केला । सुद्रुम आणूनि सत्यभामेला । समर्पावा सप्रेमें ॥ १७ ॥ कीं ते माझी प्रियांतुरी । सर्वदा राहणें तिचिये घरीं । सुरद्रुमसुमनाच्या सेजारीं । पौरंदरीशचीसाम्य ॥ १८ ॥ ऐसें संकल्पिलें मनीं । तें गुजकथना तुजलागूनी । येथ आलिया हे तव करणी । देखोनि मनीं स्मय गमला ॥ १९ ॥ तुजसारिखी चातुर्यखाणी । पट्टमहिषी वरिष्ठराणी । निजगुजकथनाची शिराणी । अंतःकरणीं बहु वाटे ॥ १२० ॥ कोणें डहुळिलें मानसा । प्रबळ विषाद

हा कायसा । ईर्ष्याखेदें ऐसी दशा । आंगवणें हें अनुचित पैं ॥ २१ ॥ पूर्वी तुझिये पाणिग्रहणीं । प्रसन्न पितरें देवता अग्नि । महर्षि वदले आशीर्वचनीं । अविच्छिन्ना प्रीतिरस्तु ॥ २२ ॥ तया आशीर्वाद-निश्चयें । तव विषादीं न वाटे भय । आजि देखोनि हा अतिशय । परमाश्चर्य मज जालें ॥ २३ ॥ भीमकीच्या पाणिग्रहणीं । वीर पडिले समराङ्गणीं । धडमुण्डांकित जाली धरणी । विडम्बणी रुक्मिया ॥ २४ ॥ बळात्कारें केलें हरण । तेथ कें सुखाचें पाणिग्रहण । मातापिताजन उद्विग्न । आशीर्वचनें तैशींची ॥ १२५ ॥ असो येथूनि सांडी खेद । सत्य मानूनि ममानुवाद । प्रेमा अविच्छिन्न अभेद । वृथा विषाद न करावा ॥ २६ ॥ ऐसें बोधितां कैटभारि। भामा प्रमुदित अभ्यन्तरीं । तथापि विषाद जो बाहेरी । तो झडकरी न सांडवे ॥ २७ ॥ मेघ उघडल्या सलिल वाहे । अग्निगोपनीं धूम्र राहे । तेंवि ईर्ष्या दाविती होय । आनन्दमय जाल्याही ॥ २८ ॥ श्वास सांडूनि श्रमितापरी । झिडकूनि बैसे पाठिमोरी । म्हणे ऐसिया मधुरोत्तरीं । कितव प्रतारी मुग्धांतें ॥ २९ ॥ जेथें रुचलें असेल मन । तेथ सुखें करावें गमन । भूत भविष्य वर्तमान । आमुचें येथून अदृष्टें ॥ १३० ॥ ऐसी उदासीन भामा । वचनें बोले मेघश्यामा । रोषें दुणावी पूर्वप्रेमा । रतिसंगमा वांछूनी ॥ ३१ ॥ हें जाणोनि कमलारमण । खुणावूनियां किंकरीगण । पात्रीं भरूनि उष्णजीवन । गंडूषपात्र आणविलें ॥ ३२ ॥ गंडूषपात्र धरिती एकी । दुजी जळ घाली हरिहस्तकीं । द्विभुजीं भामा कवळूनि निकी। अपरीं कौतुकीं मुख क्षाळी ॥३३॥ सूक्ष्मवसनें पुसूनि वदन । धूसर कांति परिमार्जून । तगटी कंचुकी लेववून । करवी परिधान पट्टकुळ ॥ ३४ ॥ केशशोधनपट्टिकायंत्र । स्वकरीं घेऊनि त्रैलोक्यमित्र । धम्मिल्ल विंचरूनि सुतार । ग्रथी वेणिका निजहस्तें ॥ १३५ ॥ अर्धशशांक मौळसुमन । मध्यें बिजोरा देदीप्यमान । तद्वत तंतूकृत गोपन । वेणिकारचनकौशल्यें ॥ ३६ ॥ मूद राखडी केतकीपत्र । कांकडोळा श्रीफळ बदर । पथ्या आमळक गुच्छोत्तर । रत्नखचित खेवणिका ॥ ३७ ॥ सुनीळ यमुना केशपाश । श्वेत जाह्नवी पुष्पविशेष । रत्नाभरणें भारतीस । साम्य त्रिवेणी भासुरभा ॥ ३८ ॥ ऐसी वेणिका रचूनि शौरि । पृष्ठीं संवाहन स्वकरीं करी । तेणें सत्यभामा घाबिरी । नमस्कारी हरिचरणां ॥ ३९ ॥ सखिया हांसती मंद मंद । म्हणती आजिचा परमानंद । भोगावया वनितावृंद । अल्प सुकृतें योग्य नव्हे ॥ १४० ॥ हें ऐकोनि भामावदन। जालें प्रमुदित फुल्लारमान । तुलना न करी राकारमण । अमृतपूर्ण असतांही ॥४१॥ कृष्णें केशर घेऊनि करीं । निढळीं रेखिली कुंकुमचिरी । ऊर्ध्वरेखा तयाउपरी । रम्य कस्तूरी कोरींव ॥ ४२ ॥ भृकुटिमध्यस्थ भा गोंदिली । तया उपरि चंदनटिकली । त्रियामा मोहूनि परिमार्जिली । वदनपंकजा मर्दूनियां ॥ ४३ ॥ नयनीं सूदलें दिव्यांजन । तेणें सोज्वळ दिसती नयन । तद्भाभोक्ता जगज्जीवन । प्रमुदित मन भामेचें ॥ ४४ ॥ वसनें कंचुकीसह कुचतटीं । झांकूनि कंठा दिधली उटी । कोंपरकळाविया मणगटीं । मलयज पोटीं चर्चिला ॥ १४५ ॥ रत्नमंजूषाउत्कीलनें । स्वकरीं लेववी रत्नभूषणें । मुक्ताफळादि श्रवणाभरणें । निडळमाळिका आकर्ण ॥ ४६ ॥ बाहुभूषणें जडित चुडे । रत्नखचित कंकणजोडे । मुद्रिकांवरी अनर्घ्य खडे । ते चहूंकडे भा तरळे ॥ ४७ ॥ ग्रैवेयकें कंठाभरणें । मुक्तमाळिका पदकें पूर्णे । वैडूर्यमंडित कांचनसुमनें । हार डोलती कुचकलशीं ॥ ४८ ॥ सांवरूनियां

क्षौमवसना । कटिप्रदेशीं अमूल्य रशना । स्वकरीं लेववी त्रैलोक्यराणा । पाशकीलना योजूनी ॥ ४९ ॥ मंजीर नूपुर अंदु वाळे । पदाग्रीं योजवी दशांगुळें । अणवट जोडवियांच्या ताळें । पोल्हारियांचा रव गाजे ॥ १५० ॥ विरोद्या शफरिका सेवटीं । रत्नजडिता कनिष्ठ बोटीं । सुमनहार घालूनि कंठीं । चुंबी गोरटी परमात्मा ॥ ५१ ॥ कृष्णें खुणावितां सहचरी । मुकुर दाखवी घेऊनि करीं । दंपती देखूनि मुकुरान्तरीं । भामा अंतरीं उल्लासे ॥ ५२ ॥ ऐसिया सालंकृता वर्ष्मा । भोगीं योग्यता पुरुषोत्तमा । ऐसें अंतरीं भावूनि भामा । प्रमुदित क्षेमा अभिलाषी ॥ ५३ ॥ इत्यादि दावूनि स्त्रैणचर्या । प्रकुपित प्रसन्न केली जाया । पुढें लक्षूनि अन्य कार्या । तें कुरुवर्या अवधारीं ॥ ५४ ॥ श्रीकृष्णइच्छेच्या प्रेरणें । ऐसिये समयीं संक्रंदनें । भामासदनीं दीनवदनें । कथिलें गाऱ्हाणें भौमाचें ॥ १५५ ॥ श्रीकृष्णातें वृद्धश्रवा । म्हणे भो भो वासुदेवा । भौमें त्रासिलें अमरां सर्वा । तो श्रम आघवा तुज विदित ॥ ५६ ॥ अमृतस्रावी वरुणच्छत्र । हरिलें करूनि बळात्कार । अदितिमातेचा शृंगार । कुंडलें रुचिरें अपहरिलीं ॥ ५७ ॥ अमराद्रि जो बोलिजे स्वर्ग । तेथ जें उत्तम मणिशृंग । तें स्थान हरूनियां निलाग । राहे अभंग दुष्टात्मा ॥ ५८ ॥ डोळां हरळ जैसा खुपे । जिंकिला न वचे निजप्रतापें । अमर कांपती ज्याचेनि दर्पें । खगेंद्र झडपे सर्पवत् ॥ ५९ ॥ करावयासि सुरकैपक्ष । अवतरलासि तूं गोप्ता दक्ष । जाणोनि आलों शरणापेक्ष । रक्षीं स्वपक्ष साक्षेपें ॥ १६० ॥ शरणागताची आर्ति हरणें । हेंचि विवरिजे अंतःकरणें । त्यावीण वनितावालभ करणें । श्रेष्ठांकारणें अनुचित हें ॥ ६१ ॥ ऐसें ऐकोनि अमरावनकें । अभीष्ट मानिलें मन्मथजनकें । म्हणे प्रसंगें योजलें निकें । समरकौतुकें स्मरलास्य ॥६२॥ भूमितनय भौमासुर । भामा भूमीचा अवतार । इचिये आज्ञेनें हा असुर । संहारीन ये काळीं ॥ ६३ ॥ ऐसें विवरूनि अंतःकरणीं । भामेसहित चक्रपाणि । गरुडारूढ भौमहननीं । सज्ज होऊनि निघाला ॥६४॥ बुझावितां भामासती । इंद्रें कथिली सुरविपत्ति । दोहीं संकटांची निवृत्ति । करी श्रीपति कौतुकें ॥१६५॥ यत्नीं पत्नी बुझाली । पुढती तिची उपेक्षा केली । तैं लालसता वृथा गेली । आंगीं लागली कुहकता ॥ ६६ । शरणागताच्या आर्तिहरणा । न करूनि करितां स्त्रैणाचरणा । तैं धिक्कार श्रेष्ठपणा । सुरमुनिगणामाजिवडा ॥ ६७ ॥ यालागिं दोन्ही एके समयीं । साधावया शेषशायी । केली कौशल्यें नवाई । दोघां हृदयीं सुखवृद्धि ॥ ६८ ॥ गरुडारूढ अंकासनीं । प्राणवल्लभा समराङ्गणीं । सत्यभामे वेगळी कोण्ही । चक्रपाणि आन नेणे ॥ ६९ ॥ ऐसिया बोधें प्रमुदित भामा । रतिरस सांडूनि हरि संग्रामा । आला म्हणोनि अमरोत्तमा । हृदयीं प्रेमा उचंबळे ॥ १७० ॥ प्राग्ज्योतिषपुराप्रति । गरुडारूढ मारुतगति । दैवतासहित दयिताप्रीती । गेला श्रीपति उत्साहें ॥ ७१ ॥ म्हणाल किमर्थ गरुडारूढ । तोही ऐका अर्थ उघड । प्राग्ज्योतिषपुर अवघड । पवना सांकडें प्रवेशीं ॥ ७२ ॥

गिरिदुर्गैः शस्त्रदुर्गैर्जलाग्न्यनिलदुर्गमम् । मुरपाशायुतैर्घोरैर्दृढैः सर्वत आवृतम् ॥ ३ ॥

परम दुर्गम उत्तुंग गिरि । दुर्घट दुर्ग तया उपरि । उत्तरोत्तर सहस्रवरी । दुर्गान्तरीं प्रतिदुर्गें ॥७३॥ तदंतरीं शस्त्रदुर्गें । दुर्घट दुर्गमें अभंगें । कृतान्तदशनासम निलागें । प्राग्ज्योतिषपुरवप्रीं ॥ ७४ ॥ प्रति-

दुर्गाश्रित परिखारूप। अगाध अक्षोभ भंवर्ते आप। मकर नक्र काळसर्प। ग्रह अमूप जळगर्भीं ॥१७५॥ तदंतःपाती वज्रपर्वत। चंड कठोर परमोच्छ्रित। त्यावरी अग्निदुर्ग अद्भुत। ज्वाळा उसळत नभोगर्भीं ॥७६॥ तदूर्ध्वे नियमित पवनपरिधि। अग्निदुर्गातें प्रबोधी। गगनीं खगगणा चालतां रोधी। असाध्य समृद्धि असुरांची ॥ ७७ ॥ मुरदैत्याच्या पाशश्रेणी। अभिचारदेवतामंत्रपठनीं। शिक्षिता नियमित गगनीं धरणी। पुर वेष्टूनि तिष्ठती ॥ ७८ ॥ ऐसें दुर्गमा दुर्गमतर। निर्मूनि प्राग्ज्योतिषपुर। प्रतापें नांदे भौमासुर। सशक्र निर्जर त्रासूनी ॥ ७९ ॥ ऐसें जाणोनि दनुजदमन। सवें नेघेचि मनुजसैन्य। करूनि अंडजवरवाहन। चंडविक्रमें निघाला ॥१८०॥ दुर्गमदुर्गें कैटभारि। भंगिता जाला कवणेपरी। तें तूं कुरुवर्या अवधारीं। शौर्यवीरश्री कृष्णाची ॥ ८१ ॥

गदया निर्बिभेदाद्रीञ्शस्त्रदुर्गाणि सायकैः। चक्रेणाग्निं जलं वायुं मुरपाशांस्तथाऽसिना ॥ ४ ॥

वज्रघातें जैसा वज्री। पर्वत भंगी प्रचण्डप्रहारीं। तेंवि गुर्वी गदा घेऊनि करीं। भंगी श्रीहरि गिरिदुर्गें ॥ ८२ ॥ दुर्गम पर्वत उत्तरोत्तर। प्राग्ज्योतिषपुरप्राकार। भंगिता जाला गदाधर। गदाप्रहारीं ते अवघे ॥ ८३ ॥ पुढें अवघड शस्त्रदुर्गें। शार्ङ्ग सज्जूनि कमलारंगें। धनुर्विद्येच्या अमोघमार्गें। बाणीं सवेगें भंगिलीं ॥ ८४ ॥ श्रीकृष्णाचे अमोघ बाण। कृतान्ताचे घेती प्राण। तेथ कायसी आंगवण। शस्त्रावरणविखण्डनीं ॥१८५॥ सांदीपनिप्रसादलब्ध। ते ते जपोनि प्रयोग सिद्ध। शरौघ वर्षोनियां अगाध। केला उच्छेद शस्त्रदुर्गा ॥ ८६ ॥ पुढें कृत्यानिर्मित आग्नि। शतयोजनें धडके गगनीं। सहस्रारचक्रें करूनी। चक्रपाणि त्या भंगी ॥८७॥ दुर्वासाची जेंवि जटा। संक्षुब्धप्रळयहव्यवाटा। अम्बरीषाच्या भरितां घोटा। तेणें वैकुण्ठा आठविलें ॥ ८८ ॥ तैं सुदर्शन प्रेरी हरि। जटाकृत्याग्नि तिरोहित करी। दुर्वासातें पाडिलें फेरीं। त्रिजगीं भवरी देवविली ॥ ८९ ॥ त्याहूनि सहस्रधा प्रदीप्त। सुदर्शनाग्नि धगधगीत। देखूनि लोपलें कृत्याकृत्य। अग्नि समस्त हारपला ॥ १९० ॥ सुदर्शनाग्निप्रळयकोप। तेणें शोषिलें समस्त आप। देखोनि ज्वाळांचा प्रताप। पवन सन्ताप पावला ॥ ९१ ॥ अग्निसख हें पवना नांव। अधिष्ठूनियां दैत्यभाव। साधूनि दुर्गमदुर्गआव। होता स्वमेव नभोगर्भीं ॥ ९२ ॥ सुदर्शनाच्या धडधडाटें। जगत्प्राण तो पोळला नेटें। अङ्ग झाडूनियां झडझडाटें। ब्रह्माण्डमठीं पसरला ॥ ९३ ॥ पुढें प्रवेशे गरुडारूढ। मुरपाशांचें आवरण दृढ। देखोनि काढिला खड्ग प्रचंड। नंदकनामा रिपुहंता ॥ ९४ ॥ कराळ कर्कश नंदकधारा। देखतां पाशश्रेणी घोरा। कृत्या निर्मित ज्या अभिचारा। त्या त्या समग्रा भंगल्या ॥१९५॥ तटतटां तोडिल्या पाशश्रेणी। गरुडझडपें भंगले फणी। दैत्यें अभिचारानुष्ठानीं। पाशस्थानीं नियमित जे ॥ ९६ ॥ प्राग्ज्योतिषदुर्ग पुढें। ज्यावरी यंत्रमार देहुडे। कृष्णें भंगिले कवण्या पाडें। तेंही निवाडें अवधारा ॥ ९७ ॥

शंखनादेन यंत्राणि हृदयानि मनस्विनाम् । प्राकारं गदया गुर्व्या निर्बिभेद गदाधरः ।। ५ ।।

पाञ्चजन्याचा ध्वनि उद्भट । तेणें दणाणिला ब्रह्माण्डमठ । त्यापुढें यंत्रध्वनि फळकट । हृदयस्फोट असुरांतें ।। ९८ ।। मनस्वी यूथप असुरश्रेणी । निर्भय अमरां समरङ्गणीं । हृदयस्फोट त्यां ते क्षणीं । पडिले धरणी प्रेतवत् ।। ९९ ।। प्राकाररक्षणीं कोण्ही सज्ज । पुढें न थरेचि असुरपुंज । तये काळीं गरुडध्वज । परजी सुतेज कौमोदकी ।। २०० ।। गगनचुंबितवज्रदुर्ग । गदाप्रहारीं पावले भंग । भौमनिर्दळणा श्रीरंग । मध्यभूभाग प्रवेशला ।। १ ।। पुर प्रवेशतां श्रीहरि । मुरनामा जो पंचशिरी । उठावला कवणे परी । तेंही चतुरीं परिसावें ।। २ ।।

पाञ्चजन्यध्वनि श्रुत्वा युगांताशनिभीषणम् । मुरः शयान उत्तस्थौ दैत्यः पंचशिरा जलात् ।। ६ ।।

जलामाजि ज्याचें निलय । महाप्रतापी असुरवर्य । जो कां प्रळयरुद्रप्राय । पंचवदनी मुरनामा ।। ३ ।। कृष्णें जेव्हां पाञ्चजन्य । स्फुरिला चंडावेशें करून । तेणें दणाणिलें ब्रह्माण्डभुवन । मुर ऐकोन तो घोष ।। ४ ।। महर्युगाचे प्रलयकाळीं । संवर्तनामा घनमंडळीं । विद्युत्पतनगर्जनाशाळी । त्याहूनि आगळी भयंकर ।। २०५ ।। पाञ्चजन्याची प्रचंड ध्वनि । मुरदैत्याचे पडतां श्रवणीं । उठिला परिखाजळापासूनी । पंचवदनी महादैत्य ।। ६ ।। ज्याचा आश्रय भौमासुरा । समरीं अजिंक अमरां असुरां । तेथ भूचरां पामरां नरां । दळणीं दरारा काय तया ।। ७ ।। तेणें परिसोनि शंखस्वना । केली प्रचंड गडगर्जना । जल सांडूनि पातला रणा । कुरुनररत्ना तें परिसें ।। ८ ।।

त्रिशूलमुद्यम्य सुदुर्निरीक्षणो युगांतसूर्यानलरोचिरुल्बणः ।
ग्रसस्त्रिलोकीमिव पंचभिर्मुखैरभ्यद्रवत्तार्क्ष्यसुतं यथोरगः ।। ७ ।।

प्राग्ज्योतिषपुरावकाशीं । अकस्मात हृषीकेशी । गरुडारूढ तेजोराशि । सत्यभामेसीं देखिला ।।९।। महाप्रलयींच्या सौदामनी । तैसीं आयुधें वसविलीं पाणीं । मुर देखूनि सक्रोध नयनीं । समप्रलयाग्नि प्रज्वळला ।। २१० ।। पडताळूनि प्रचंड त्रिशूळ । तुळिता जाला स्वबाहुबळ । युगान्तसूर्यप्रळयानळ । उल्बण प्रबळ तत्साम्य ।। ११ ।। भासुर भयंकर ज्याची वपु । कालाग्निरुद्रासमान कोपु । अमरां अशक्य समरीं दर्पु । पाहतां लोप सुरनयनां ।। १२ ।। दुःखें न पाहवे ज्याकडे । कोण तयासि समरीं भीडे । त्रैलोक्य ग्रासील पांचही तोंडें । रोषें प्रचंडें उठावला ।। १३ ।। खगेंद्रदळणा दंदशूक । क्रोधे धांवे जेंवि सम्मुख । गरुडारूढ त्रैलोक्यजनक । देखोनि सरोख उठावला ।। १४ ।।

आविध्य शूलं तरसा गरुत्मते निरस्य वक्त्रैर्व्यनदत्स पंचभिः ।
स रोदसी सर्वदिशोऽम्बरं महानापूरयन्नंडकटाहमावृणोत् ।। ८ ।।

तरसा म्हणिजे सवेग समरीं । शूळनिक्षेप गरुडावरी । करूनि गर्जना पांचही वक्त्रीं । करिता जाला भयंकर ।। २१५ ।। पंचवक्त्रोद्भव गर्जना । सप्त पाताळें भूगोल गगना । पूर्ण करूनि दिक्कंकणा ।

ब्रह्मकटाह कोंदला ॥ १६ ॥ तेणें सुरलोक हडबडी । पडली कृतान्ता झांपडी । एकवीस स्वर्गांच्या उतरंडी । पडों पाहती एकसरा ॥ १७ ॥ ऐसा मुरदैत्याचा यावा । त्रिशूळें गरुड जंव भेदावा । कृष्णें हास्य करूनि तेव्हां । केलें लाघवा तें ऐका ॥ १८ ॥

तदाऽऽपतद्वै त्रिशिखं गरुत्मते हरिः शराभ्यामभिनत्त्रिधौजसा ।
मुखेषु तं चापि शरैरताडयत्तस्मै गदां सोऽपि रुषा व्यमुञ्चत ॥ ९ ॥

त्रिशूळें गरुड भेदे न भेदे । तंव शार्ङ्ग सज्जूनि गोविन्दें । दोहीं बाणीं छेदिला मध्यें । त्रिखण्ड करूनि पाडिला ॥ १९ ॥ बाणपंचकें पांचां वदनीं । दैत्य विंधिला लीलेंकरूनी । तोही क्षोभला आवेशोनी । गदा घेऊनि उठावला ॥ २२० ॥ वज्रप्राय गदाप्रहार । येतां देखोनि गदाधर । गदाप्रहारें गदाप्रहार । वारिता जाला तें ऐका ॥ २१ ॥

तामापतन्ती गदया गदामृधे गदाग्रजो निर्बिभिदे सहस्रधा ।
उद्यम्य बाहूनभिधावतोऽजितः शिरासि चक्रेण जहार लीलया ।
व्यसुः पपाताऽम्भसि कृत्तशीर्षो निकृत्तशृंगोऽद्रिरिवेन्द्रतेजसा ॥ १० ॥

दैत्यें प्रेरिली कठोर गदा । तिणें करितां हृदयभेदा । स्वगदेनें केली सहस्रधा । गर्जूनि जलदासम कृष्णें ॥ २२ ॥ वृथा गेला गदाप्रहार । तेणें दैत्य क्षोभला थोर । बाहु उभारूनि सत्वर । कृष्णासमोर धांविन्नला ॥ २३ ॥ त्रिजगज्जेता कृष्ण अजित । चक्र प्रेरूनि धगधगीत । पांचही शिरें सरसिजवत् । लीलालाघवें छेदिलीं ॥ २४ ॥ शिरें छेदिलीं वरिच्यावरी । गर्जत भरलीं तीं अम्बरीं । कबन्ध पडलें जळान्तरीं । जैसा अद्रि वज्रहत ॥२२५॥ शिरें खण्डतां गेले प्राण । छिन्नशीर्ष प्राणविहीन । दैत्यकलेवर गिरिसमान । परिखा जीवनीं रिचवलें ॥ २६ ॥ इन्द्र प्रतापें वज्रघातें । गिरिशृंग भंगी अवचितें । तें जेंवि समुद्रा आतौतें । पावे निघातें अधःपतन ॥ २७ ॥ तैसा परिखाजळीं बळी । छेदूनि पाडिला जिये वेळीं । तेव्हां हाहाकार आरोळी । दैत्यमण्डळीं प्रवर्तली ॥ २८ ॥ तें ऐकोनि त्यांचे सुत । त्यांहूनि प्रतापी अत्यद्भुत । क्षोभें उठिले ते मात । राया समस्त मुनि सांगे ॥ २९ ॥

तस्यात्मजाः सप्त पितुर्वधातुराः प्रतिक्रियामर्षजुषः समुद्यताः ।
ताम्रोऽन्तरिक्षः श्रवणो विभावसुर्वसुर्नभस्वानरुणश्च सप्तमः ॥ ११ ॥

पितृवधाचें दुःख पोटीं । धरूनि क्षोभले ते जगजेठी । सातही जण महा हठी । जनकासाठीं उठावले ॥ २३० ॥ घ्यावया निजजनकाचा सूड । क्रोधें समरा जाले दृढ । दृष्टी लक्षूनि गरुडारूढ । लोटले प्रचण्ड साटोपें ॥ ३१ ॥ ताम्र अन्तरिक्ष तिसरा श्रवण । वसु विभावसु नभस्वान् अरुण । जनकासमान आंगवण । सातही जण उग्रकर्मे ॥ ३२ ॥ भौमें प्रेरिलें कृष्णावरी । पितृवधाचे प्रतिकारीं । निखंदोनियां विषमोत्तरीं । सेना आसुरी देऊनियां ॥ ३३ ॥

पीठं पुरस्कृत्य चमूपतिमृधे भौमप्रयुक्ता निरगन्धृतायुधाः ।
प्रायुंजताऽऽसाद्य शरानसीन्गदाः शक्त्यृष्टिशूलान्यजिते रुषोल्बणाः ।। १२ ।।

भौमासुराचा सेनापति। पीठनामा दैत्य दुर्मति। भौमाज्ञेनें समराप्रति। जाला निगुती सन्नद्ध ।। ३४ ।। प्रचण्ड सेना चतुरंगिणी। सज्जूनि सवेग पातला रणीं। ताम्रप्रमुख सातही जणीं। समराङ्गणीं तो केला ।। २३५ ।। रथीं बैसले महारथी। गजारोहणीं यूथपति। अश्वसादी समरक्षिती। प्रतापें दाविती हयशिक्षा ।। ३६ ।। पदाति बळिष्ठ महावीर। यन्त्रधारी धनुर्धर। शस्त्रसाधनविद्याचतुर। प्रतापी समरप्रवीण ।। ३७ ।। ऐसी चतुरंग सेना। गर्जत पातली समरांगणा। पाचारूनि जनार्दना। आयुधें नाना प्रेरिती ।। ३८ ।। सिंहनादआस्फोटनें। अश्वहेषितें गजगर्जनें। गमे वांकुर्डा घातलीं घनें। तैसीं सन्धानें बाणांचीं ।। ३९ ।। शरीं झांकोळलें गगन। विद्युत्प्राय तीक्ष्ण बाण। विंधिती लक्षूनि जनार्दन। दाविती आंगवण समरंगीं ।। २४० ।। खड्ग परजूनि तळपती एक। म्हणती छेदूं हरिमस्तक। गदा टाकिती एक सम्मुख। शस्त्रें अनेक पृथक्त्वें ।। ४१ ।। इन्द्रजिताचिया प्रतिकारीं। सौमित्रहनना रावणें समरीं। शक्ति प्रेरिली तैसियापरी। दैत्य हरिवरी टाकिती ।। ४२ ।। मन्त्रदेवता चेतवून। अभिचारविद्याप्रयोगपठन। कृष्णमारणीं प्रक्षोभून। शक्तिमोक्षण करिताती ।। ४३ ।। ऋष्टिनामकें शस्त्रें क्रूर। एक टाकिती महाअसुर। एक प्रतापी समरधीर। शूळीं खगेन्द्र भेदिती ।। ४४ ।। लीलेकरूनि त्रिजगज्जेता। ऐसिया अजिता श्रीभगवन्ता। सक्रोधदैत्यीं उल्बण घाता। करित अमतां साटोपें ।। २४५ ।। तया दैत्यांचीं शस्त्रजाळें। जैसीं अकाळघनमण्डळें। देखोनि कृष्णें काय केलें। तें परिसिलें पाहिजे ।। ४६ ।।

तच्छस्त्रकूटं भगवन्स्वमार्गणैरमोघवीर्यस्तिलशश्चकर्तह ।
तान्पीठमुख्याननयद्यमालयं निकृत्तशीर्षोरुरुजांघ्रिवर्मणः ।। १३ ।।

शार्ङ्ग सज्जूनि शार्ङ्गपाणि। अमोघ मार्गण लावूनि गुणीं। दैत्य प्रेरिता शस्त्रास्त्रश्रेणी। तिलतुल्य छेदूनि पाडिल्या ।। ४७ ।। वीरश्रीयशःश्रीसंपन्न। पूर्णैश्वर्य श्रीभगवान। अमोघप्रताप-लीलेकरून। दैत्यास्त्रघन विध्वंसी ।। ४८ ।। छेदूनि पाडिलीं शस्त्रें सकळ। जेंवि पवनें घनमंडळ। भंवता भासे उडुगणमेळ। तेंवि रिपुदळ प्रकाशिलें ।। ४९ ।। मग वर्षोनि तीक्ष्णबाणीं। रणीं पाडिल्या सुभटश्रेणी। पीठनामा जो सेनानी। शिर छेदूनि पाडिला ।। २५० ।। कृष्णसायक कनकपुंख। शार्ङ्गनिर्मुक्त परम तीख। छेदती दैत्यांचें मस्तक। लक्षें लक्ष चमत्कारें ।। ५१ ।। जानु जंघा मांडिया कटी। छेदूनि पाडिले लक्षकोटी। शिरें उसळती गगनपोटीं। पडती भूतटीं उडुगणवत् ।। ५२ ।। गजाश्वपाखरा कवचें टोप। छेदूनि भेदिले वीर अमूप। सुभटीं सांडिले समरदर्प। धेनुकळपसम पळती ।। ५३ ।। हाहाकार माजला रणीं। समरीं योद्धा न थरे कोण्ही। तें ताम्रप्रमुख सातही जणीं। शार्ङ्गपाणि पडखळिला ।। ५४ ।। ताम्र अंतरिक्ष श्रवण। वसु विभावसु नभस्वान। अरुणासहित

सातही जण । दिशा वेष्टून भीडती ॥ २५५ ॥ ताम्र वर्षे बाणजाळें । श्रवण खगेन्द्रा हाणे मुसळें । विभावसु प्रबळबळें । भेदी त्रिशूळें घननीळा ॥ ५६ ॥ वसुनामकें कराळ खड्ग । काढूनि ताडिला भामारंग । नभस्वतें करूनि लागवेग । करूनि परिघ प्रहारिला ॥ ५७ ॥ अरुणें होऊनि करुणारहित । कृष्णहनना खाऊनि दांत । हृदयीं ताडिला द्वारकानाथ । शक्ति अद्भुत प्रेरूनी ॥ ५८ ॥ ऐसें अनेक शस्त्रास्त्रवृष्टि । हरिवरी वर्षती दैत्य हठी । तें देखोनि कृष्ण जगजेठी । शार्ङ्ग मुष्टी स्फाळिलें ॥ ५९ ॥ बाणीं तोडूनि पाडिलीं शस्त्रें । सातही मस्तकें छेदिलीं चक्रें । रहंवर भेदिलें गदाप्रहारें । वनितापुत्रें बळ दमिलें ॥ २६० ॥ पक्षघाताचीं झडपणी । गगनीं उडविल्या वीरश्रेणी । चक्रवात मिरवे तृणीं । तेंवि भ्रमणीं चमू पडिली ॥ ६१ ॥ हें देखोनि नरकासुर । भौमनामक जो धराकुमर । क्षोभला जैसा प्रळयाङ्गार । निघे बाहीर तें ऐका ॥ ६२ ॥

स्वानीकपानच्युतचक्रसायकैस्तथा निरस्तान्नरको धरासुतः ।
निरीक्ष्य दुर्मर्षण आस्रवन्मदैर्गजैः पयोधिप्रभवैर्निराक्रमत् ॥ १४ ॥

आपुला सेनापति पीठ । आणि मुरात्मज सप्त सुभट । सेनायूथप वांठवांठ । पडिले उद्भट समरंगीं ॥ ६३ ॥ श्रीकृष्णाच्या चक्रसायकीं । प्रळय केला दैत्यकटकीं । सेना भंगली देखोनि तवकीं । निघे सम्मुखीं युद्धार्थ ॥ ६४ ॥ क्षीरसमुद्रोद्भव कुंजर । सन्नद्ध बद्ध शत सहस्र । दानोदकाचे पाझर । द्रवती सर्वत्र ज्या आंगीं ॥ २६५ ॥ मदोदकमंडित गंडयुगळ । मोदें उन्मत्त भ्रमरमेळ । गुंजारवतां घनमंडळ । भासे केवळ जननयनां ॥ ६६ ॥ मयनिर्मित कुंतदंती । लोहशृंखळा शुंडाप्रान्तीं । कवची अंबष्ठ शृणिनिघातीं । शिक्षितदंतिप्रेरक जे ॥ ६७ ॥ मयनिर्मित गजपाखरा । कठोर अभेद्य वज्रप्रहारा । पृष्ठीं गुढारें प्रासादशिखरा । सम उत्तुंग कलशाढ्यें ॥ ६८ ॥ स्तंबेरमारूढ वीर । शस्त्रास्त्रयोद्धे महाशूर । पार्ष्णिग्राह दैत्य क्रूर । शक्तिशूळी परश्वधी ॥६९॥ उच्च पताका फडकती गगनीं । गजदुंदुभि जळदस्वनीं । प्रचंड यंत्रांचिया श्रेणी । समराङ्गणीं विजयार्थ ॥२७०॥ ऐसे सन्नद्ध बद्ध करटी । शतसहस्रसेनाघरटी । मध्यें प्रचंडकुंजरपृष्ठीं । भौम जगजेठी वळघला ॥ ७१ ॥ ऐरावतारूढ वज्री । जैसा मिरवे निर्जरभारीं । तैसा पातला रणचत्वरीं । लक्षी श्रीहरि तें ऐका ॥ ७२ ॥

दृष्ट्वा सभार्यं गरुडोपरि स्थितं सूर्योपरिष्टात्स तडिद्घनं यथा ।
कृष्णं स तस्मै व्यसृजच्छतघ्नीं योधाश्च सर्वे युगपत्स्म विव्यधुः ॥ १५ ॥

जैसें सूर्यावरी घनमंडळ । सौदामनीसहित सजळ । तैसा गरुडावरी जलदनीळ । सत्यभामेसीं शोभला ॥ ७३ ॥ त्यातें देखोनि जगतीतनुज । भौमनामा प्रतापपुंज । विकटगर्जनीं लोटला गज । गरुडध्वज वधावया ॥ ७४ ॥ देखोनि ऐसिया कृष्णातें । शतघ्नी शक्ति सोडिली दैत्यें । प्रलयकाळीं रुद्र जियेतें । प्रेरूनि विश्व विध्वंसी ॥ ७५ ॥ तये शक्तीचा कडकडाट । संतप्त झाला ब्रह्माण्डघट । आणिक

दैत्ययोद्धे श्रेष्ठ । तेही उद्भट विंधिती ॥ ७६ ॥ प्रळयकाळाची जावळी । तैसीं आयुधें वर्षती बळी । सर्व दैत्यीं करूनि फळी । भोंवता वनमाळी वेढिला ॥ ७७ ॥ हा हा म्हणोनि हाकिती शब्दें । घे घे म्हणोनि लोटती योद्धे । एक गर्जती सिंहनादें । अनेक आयुधें टाकिती ॥ ७८ ॥ शतघ्नी शक्ति उसळली नभा । ज्वाळा कोंदल्या ब्रह्माण्डगर्भा । प्रळयाग्नि रुद्र न सरे क्षोभा । ते पद्मनाभावरी पडतां ॥ ७९ ॥ शूळ त्रिशूळ तीक्ष्ण बाण । एक टाकिती वज्रपाषाण । भिंदिपाळाचे गुंडे गगन । भरूनि झणाण झुंझाती ॥२८०॥ कुंत पट्टिश तोमर । शक्ति कृपाण कुठार । प्रास परिघ गदा मुद्गर । विक्रमें वीर टाकिती ॥ ८१ ॥ वरुणपाश विविधें चक्रें । विविधा शक्ति विविधा मंत्रें । अभिमंत्रूनि विविध शस्त्रें । सोडिती वक्त्रें गर्जूनियां ॥ ८२ ॥ विविध वीरांची आरोळी । आणि ते प्रचंड शस्त्रावळी । पडतां न डंडळी वनमाळी । विरश्रीकेलिपटुतर जो ॥ ८३ ॥ देखोनि तीक्ष्ण शस्त्रधारा । वीरश्री उत्साह शार्ङ्गधरा । लघुलाघवें चमत्कारा । दाविता झाला तें ऐका ॥ ८४ ॥

तद्भौमसैन्यं भगवान्गदाग्रजो विचित्रवाजैर्निशितैः शिलीमुखैः ॥
निकृत्तबाहूरुशिरोध्रविग्रहं चकार तर्ह्येव हताश्वकुंजरम् ॥ १६ ॥

अचिंत्यैश्वर्याचा पुंज । तो श्रीभगवान गदाग्रज । शार्ङ्गनिर्मुक्त अमोघ वाज । प्रळयाग्नितेज वर्षला ॥२८५॥ वाज ह्मणिजे शरांप्रति । तिहीं कर्मार शाणनिशितीं । शिलीमुखीं तैलमार्जितीं । पाडिली क्षिती भौमचमू ॥ ८६ ॥ जैं भौमाचें प्रचंड सैन्य । गजारोहणीं दैत्य निर्घृण । शार्ङ्गनिर्मुक्त वाज घन । निवटी वर्षोन गदाग्रज ॥ ८७ ॥ कृष्णहस्तींच्या तीक्ष्णबाणीं । दैत्यमस्तकें उसळती गगनीं । बाहु छेदितां भासती फणी । समराङ्गणीं नभोगर्भी ॥ ८८ ॥ जानु जंघा मांडिया संधि । बाणधारां तुटोनि युद्धीं । पडती त्यांची गणना विधि । न शके त्रिशुद्धि करावया ॥ ८९ ॥ ग्रीवा अंस वक्षस्थळें । कंधरा शिरोध्र कंठनाळें । छिन्न अवयव कृत वेगळे । रणीं कोथळे रिचवती ॥२९०॥ ऐसे अवयव खंडविखंड । पर्वतप्राय धडमुंड । आधीं करूनि गरुडारूढ । दावी कैवाड सुरासुरां ॥ ९१ ॥ त्यानंतरें तत्प्रेरितें । शस्त्रें छेदिलीं कृष्णनाथें । परमाश्चर्य हें निर्जरांतें । आणि दैत्यांतें दाखवी ॥ ९२ ॥ कुर्वन्वय-भूज्वळीकरणा । शशाङ्करूपा यशःकीर्तिकिरणा । यालागीं कुरूद्वहसंबोधना । हरिगुणश्रवणा तूं योग्य ॥ ९३॥ श्रीकृष्णाचें करचापल्य । मनःपवनादि नव्हती तुल्य । कालकलनाशक्ति अतुल्य । तें कौशल्य अवधारीं ॥ ९४ ॥

यानि योधैः प्रयुक्तानि शस्त्रास्त्राणि कुरूद्वह । हरिस्तान्यच्छिनत्तीक्ष्णैः शरैरेकैकशस्त्रिभिः ॥
उह्यमानः सुपर्णेन पक्षाभ्यां निघ्नता गजान् ॥ १७ ॥

परमाश्चर्य केलें कैसें । अपारदैत्यीं समरावेशें । शस्त्रास्त्रांच्या प्रलयवर्षें । वर्षतां रोषें क्षोभोनी ॥२९५॥ श्रीकृष्णाच्या करलाघवें । प्रबळ दैत्यसैन्यचि आघवें । छेदूनि विखंड केलीं शवें । जंव भेदावें तच्छस्त्रीं ॥ ९६ ॥ शस्त्रास्त्रप्रेरक योद्धे रणीं । आधीं खंडूनि पाडिले बाणीं । मग तीं शस्त्रास्त्रें छेदूनी । पाडिलीं धरणीं कौतुक हें ॥ ९७ ॥ अपारदैत्यांची शस्त्रवृष्टि । एकलें शार्ङ्ग कृष्णमुष्टी । एकैक शस्त्र

तीं तीं कांठीं । छेदूनि भूतटीं पाडियलीं ॥ ९८ ॥ परम तीक्ष्ण मार्गणधारा । जवें वर्षतां शार्ङ्गधरा । तीं तीं बाणीं एकैक शस्त्रा । छेदूनि धुळोरा उधळिला ॥ ९९ ॥ सुपर्ण म्हणिजेतो खगेंद्र । कृष्ण वाहतां चपळतर । समरीं भ्रमरी देतां चतुर । वारणभार विध्वंसी ॥३००॥ सादी पडिले कृष्णबाणीं । खगेंद्रपक्षें गजभंगाणी । झाली तें तूं ऐकें श्रवणीं । चातुर्यखाणी कुरुवर्या ॥ १ ॥

गरुत्मता हन्यमानास्तुंडपक्षनखैर्गजाः । पुरमेवाऽऽविशन्नार्ता नरको युध्ययुध्यत ॥ १८ ॥

मदोन्मत्त कुंजरभार । तीक्ष्ण गरुडाचें नखाग्र । रुततां समरीं झाले किर । सहसा धीर न संवरे ॥ २ ॥ तुंडें विदारितां गंड । कुंजरीं भावूनियां भैरुंड । लपती एकमेकां आड । टाकिती धडें भूपृष्ठीं ॥ ३ ॥ गरुडपक्षांचा महामार । तेणें भंगला कुंजरभार । धाकें कांपती ते थरथर । दुःखें स्वपुर प्रवेशले ॥ ४ ॥ कुंजरभार भंगल्यावरी । भौमासुर क्षोभला भारी । समरी कृष्णातें पाचारी । भिडे निकरीं तें ऐका ॥ ३०५ ॥

दृष्ट्वा विद्रावित सैन्यं गरुडेनाऽऽर्दितं स्वकम् । तं भौमः प्राहरच्छक्त्या वज्रः प्रतिहतो यतः ॥ १९ ॥

खगेन्द्र क्षोभोनि पक्षघातीं । स्वसैन्य भंगिलें समरक्षिती । हें देखोनि भौम दुर्मति । परम निघातीं क्षोभला ॥ ६ ॥ काळाग्निज्वाला धगधगित । तैसा खगेन्द्रा शक्तिघात । करिता झाला भौम दैत्य । वज्रप्रातिहत जेंवि शरें ॥ ७ ॥ जिये शक्तीकरूनि बळी । समरीं अमरेन्द्र वज्र वळी । भंगी तृणप्राय दंभोलि । खगेन्द्रमौळि तत्प्रहारें ॥ ८ ॥ हाणितां तिये शक्तीचा प्रहार । खगेन्द्र मानी अर्कतूळाग्र । चंचळ न होतां अणुमात्र । झडपिला कुञ्जर भौमाचा ॥ ९ ॥

नाकंपत तया विद्धो मालाहत इव द्विपः । शूलं भौमोऽच्युतं हंतुमाददे वितथोद्यमः ॥ २० ॥

दिग्गज हाणितां माळाघातें । भयाची शंका न मनी चित्तें । शक्तिप्रहार खगेन्द्रातें । भौमहस्तें तत्तुल्य ॥ ३१० ॥ शक्तिप्रहार वृथा गेला । रसरसित भौम ठेला । वीरश्री आवेश भंगला । मनीं शंकला ते काळीं ॥ ११ ॥ गरुडें झडपितां भौमगजा । संघट भौमा अधोक्षजा । अच्युतातें हाणी पैजा । सतेज शूळें भूपुत्र ॥ १२ ॥ शूळ उचली जंव करतळीं । तंव सुदर्शनचक्रें श्रीवनमाळी । भौमासुराचा छेदी मौळि । समरशाळी तें ऐका ॥ १३ ॥

तद्विसर्गात्पूर्वमेव नरकस्य शिरो हरिः । अपाहरद्गजस्थस्य चक्रेण क्षुरनेमिना ॥ २१ ॥

शूळप्रेरणापूर्वींच कृष्णें । क्षुरपर्वें सुदर्शनें । गजस्था नरकासुराचें यत्नें । शिर छेदून उडविलें ॥ १४ ॥ बालार्ककोटिप्रभाभासुर । सुदर्शनचक्र सहस्त्रार । क्षुरपर्वतीक्ष्णधार । लागतां प्रहार तयाचा ॥ ३१५ ॥ शिर उडालें गगनोदरीं । कबंध पडिलें पृथ्वीवरी । विमानीं देखिलें सुरवरीं । कवणेपरी तें परिसा ॥ १६ ॥

सकुण्डलं चारुकिरीटभूषणं बभौ पृथिव्यां पतितं समुज्ज्वलम् ।
हाहेति साध्वित्यृषयः सुरेश्वरा माल्यैर्मुकुंदं विकिरंत ईडिरे ॥ २२ ॥

अभेद्य वज्र किरीटमूर्ध्नि । अनर्घ्ये जडित श्रवणीं । गण्ड मंडित उभयकर्णीं । भासुर सुरवर विलोकिती ॥ १७ ॥ भुजंग भंगूनि भूतळवटीं । खगेन्द्र संचरे गगनपृष्ठीं । पुन्हा झेंपावे जगजेठी । तेंवि भूतटीं उतरले ॥ १८ ॥ विमानीं देखोनि सुरवरीं । दिव्यलोचनीं ऋषीश्वरीं । पुष्पवृष्टि कृष्णावरी । जयजयकारीं वर्षले ॥ १९ ॥ दिव्यकुण्डलकिरीटवंत । नरकासुराचा मस्तक पतित । भूमंडळीं उज्वाळित । देखती दैत्यअनुयायी ॥ ३२० ॥ हाहाकार करिती असुर । म्हणती भंगला भौमासुर । शेष यूथप पलायनपर । रडती किंकर सभोंवते ॥ २१ ॥ निर्जर करिती पुष्पवृष्टि । साधु म्हणती सुखसंतुष्टि । आशीर्वादप्रणीतमुष्टि । मंत्राक्षतांच्या मुनिहस्तें ॥ २२ ॥ गगनीं लागल्या सुरदुंदुभि । दिव्यपताका फडकती नभीं । सुमनवृष्टीचा सुगंध सुरभि । पंकजनाभीवरी वर्षे ॥ २३ ॥ दैत्यदानवां महापळणी । भौमपरिवार विलपे रणीं । निर्जर मुनिवर नाना स्तवनीं । कृष्णालागूनि स्तविताती ॥ २४ ॥ ऐसिये समयीं भौममाता । भूमिदेवी सशोक मुदिता । येऊनि भेटली श्रीभगवंता । तें गुरुनाथा अवधारीं ॥ ३२५ ॥

ततश्च भूः कृष्णमुपेत्य कुंडले प्रतप्तजांबूनदरत्नभास्वरे ।
सवैजयंत्या वनमालयार्पयत्प्राचेतसं छत्रमथो महामणिम् ॥ २३ ॥

तनयभंगें शोकाकुळा । स्वामिदर्शनें आह्लाद बहळा । सवेग येऊनि कृष्णाजवळा । विनीत गोपाळा भेटली ॥ २६ ॥ सत्यभामारूपें आपण । कृष्णेंसहित अवलोकून । म्हणे त्वां पाळिलें मम प्रार्थन । वधिला नंदन मम प्रेमें ॥ २७ ॥ कुण्डलें अदितीचीं भास्वरें । ललामरचितें दिव्य रुचिरें । जियें जाम्बूनदकार्तस्वरें । कुशलत्वष्टारें निर्मिलीं ॥ २८ ॥ वैजयंतीवनमाळेसहित । कृष्णा अर्पिती झाली त्वरित । वरुणच्छत्र अत्युद्भुत । अमृतस्रावी समर्पिलें ॥ २९ ॥ तैसाचि अर्पिला महामणि । स्वतेजें लाजवी जो दिनमणि । मंद शिखररत्नखाणी । मेर्वंश म्हणोनि वज्रमय ॥ ३३० ॥ इत्यादि अनेक रत्नसंपत्ति । समर्पूनियां कृष्णाप्रति । बद्धाञ्जाळि नम्र क्षिति । स्तविती झाली तें ऐका ॥ ३१ ॥

अस्तोषीदथ विश्वेशं देवीदेववरार्चितम् । प्रांजलिः प्रणता राजन्भक्तिप्रवणया धिया ॥ २४ ॥

बुद्धिपूर्वक प्रेमभरिता । कृष्णचरणारविंदीं प्रणता । स्तविती झाली मंगलमाता । कुरुभूकान्ता तें ऐक ॥ ३२ ॥ अकारमात्रामुकुरान्तरीं । स्फारिली जितुकी दृश्य लहरी । बुद्ध्यादि उदान चक्षु वेर्हीं । परादि व्यापारीं श्रुतिगदिता ॥ ३३ ॥ समष्टिकारण देवतामापें । उमाणितां सत्य संकल्पें । शब्दस्पर्श-रसगंधरूपें । विश्व या पडपें ठी केली ॥ ३४ ॥ तया विश्वाचें ईशितव्य । जया आंगीं वर्ते सर्व । म्हणोनि विश्वेश ऐसें नांव । बोलती सर्व सुरवर्य ॥ ३३५ ॥ तया सुरवरपूज्याप्रति । अनन्यभावें स्तविते क्षिति । क्षणैक सावध होऊनि श्रोतीं । श्रवण परीक्षितीसम कीजे ॥ ३६ ॥

भूमिरुवाच–नमस्ते देवदेवेश शंखचक्रगदाधर । भक्तेच्छोपात्तरूपाय परमात्मन्नमोऽस्तु ते ।। २५ ।।

देव म्हणिजे द्योतमान । अमळ अबाधित वास्तव ज्ञान । भूत भविष्य वर्तमान । नोहे कालीन आधुनिक जें ।। ३७ ।। कालकलनेचा प्रवाह । त्रिकालीन जो तदनुभव । केवळ कालज्ञानोद्भव । नव्हे तो वास्तव तव बोध ।। ३८ ।। तस्मात्स्वबोधें द्योतमान । देव ऐसें त्या अभिधान । त्या देवांचा देव पूर्ण । त्या तुज नमन देवदेवा ।। ३९ ।। निःश्वासोद्भव वेदजनन । यथापूर्व विधिविधान । ब्राह्मण निगम-कर्माचरण । प्रणवप्रसवन जें केलें ।। ३४० ।। तदाचरणें त्रिविध फळ । इष्टानिष्ट मिश्र केवळ । प्रकटी त्रयीविद्या प्राञ्जळ । जें कां मूळ त्रिभुवना ।। ४१ ।। अभीष्टसुकृतभोक्ते दैव । मिश्रफळभोक्ते मानव । अनिष्टकर्मफळासि जीव । तिर्यक सर्व तामिस्र ।। ४२ ।। ऐसी स्वधर्मसंस्थापना । भंगावया दानव विघ्ना । करिती तेव्हां संरक्षणा । साधुपालना अवतरसी ।। ४३ ।। देव सांगती गाऱ्हाणें । आविष्करसी तदभिमानें । यालागीं देवेश या संबोधनें । तुज कारणें मी नमितें ।। ४४ ।। स्वधर्मसेतु भंगिती दैत्य । तयांचा करावया निःपात । शंखचक्राब्जगदाभृत । हा नामसंकेत मी नमितें ।। ३४५ ।। वेदत्रयीच्या कर्माचरणें । फलभोगार्थी तिन्ही भुवनें । तें कर्म नसतां तुजकारणें । रूपा येणें भक्तेच्छा ।। ४६ ।। भक्तेच्छोपात्तरूपाय । म्हणोनि नमितें तुझे पाय । यावरी वास्तव जैसें होय । ते स्मरोनि सोय भू नमिते ।। ४७ ।। पंचकोशातीत परम । चित्सुख सन्मात्र निःसीम । सर्व सर्वग पुरुषोत्तम । तो पूर्णकाम मी नमितें ।। ४८ ।। परात्पर जो मायातीत । तो परमात्मा अनुस्यूत । अखिलात्मकत्वें ओतप्रोत । तो भगवंत मी नमितें ।। ४९ ।। राया कुरुकुलव्यंजकमुकुरा । पूर्वी कुन्तीनें श्रीधरा । स्तविलें त्याचि जपोनि मंत्रा । नमिते धरा तें ऐक ।। ३५० ।।

नमः पंकजनाभाय नमः पंकजमालिने । नमः पंकजनेत्राय नमस्ते पंकजाङ्घ्रये ।। २६ ।।

तुझी प्रपितामही जे कुंती । तिनें ज्या मंत्रें श्रीपति । प्रसन्न केला तो मंत्र क्षिति । जपूनि स्तविती पदनमनें ।। ५१ ।। जयाचिया नाभिपद्मा । पासून जन्मला रजात्मक ब्रह्मा । तेणें सृजिलें ब्रह्माण्डधामा । रूपनामात्मक विश्व ।। ५२ ।। त्या तुज जगत्कारणा नयन । तूं त्रिजगाचें उपादान । भूतभौतिकां अधिष्ठान । तुजवीण आन असेना ।। ५३ ।। पंकजमयी माला कंठीं । वाहसी तयेची ऐसी गोठी । सत्कीर्तिपराग ब्रह्माण्डघटीं । धवलित सृष्टि तव यशभा ।। ५४ ।। अमळकोमळपंकजनेत्र- । मंडित ध्याती जे तव गात्र । ते स्वसुखाचे होती पात्र । एवं पवित्र तव ध्यान ।। ३५५ ।। पदतल रातोत्पलवत् मृदुल । जेथ सश्रीक सुचिह्नमेळ । आमोघवेधें सत्प्रेमळ । अलिउळ गुंजारव करिती ।। ५६ ।। इत्यादि चतुर्थ्यंत नामीं । अर्थेसहित हृदयपद्मीं । चिंतूनि प्रभूतें वसुधा नमी । तें मुनिवाग्मी निरूपी ।। ५७ ।। पुढती काय इळादेवी । नमूनि भगवंतातें स्तवी । श्रोतीं व्युत्पत्ति ते आघवी । स्वस्थ परिसावी हरिगरिमा ।। ५८ ।।

नमो भगवते तुभ्यं वासुदेवाय विष्णवे । पुरुषायाऽऽदिबीजाय पूर्णबोधाय ते नमः ॥ २७ ॥

नमो भगवंता तुजकारणें । निरतिशयानंद ऐश्वर्यगुणें । विराजमान पूर्णपणें । वास्तव वयुनें मत्प्रणति ॥ ५९ ॥ निरतिशयानंद ऐश्वर्य । यास्तव सर्वभूताश्रय । अखिलाद्यत्वें निवासमय । वासुदेवाय नमो नमः ॥ ३६० ॥ अखिल ब्रह्माण्डें व्यापून । व्याप्यव्यापकत्वें न होतां भिन्न । शुद्ध शाश्वत सनातन । विष्णवे नमन एतदर्थें ॥ ६१ ॥ म्हणसी परिच्छिन्न मी देहधारी । जन्मलों वसुदेवाचे जठरीं । सर्वभूताश्रय मम शरीरीं । न घडे निर्धारीं व्यक्तत्वें ॥ ६२ ॥ सर्वाश्रयत्व कोठूनि कैसें । माझ्या ठायीं लक्षिलें असे । ऐसें म्हणिजेल आदिपुरुषें । तरी विश्वेशें परिसावें ॥ ६३ ॥ सर्वत्र कार्यापासूनि पूर्वीं । सन्मात्रत्व श्रुतिगौरवीं । प्रतिपादिलें तें पुरुषनांवीं । लक्षूनि उर्वी नमो म्हणे ॥ ६४ ॥ सर्व सर्वग सर्वात्मक । सन्मात्र अभेद अद्वय एक । तो तूं पुरुष श्रुतिवाचक । जाणोनि निष्टंक भू वंदी ॥ ३६५ ॥ हेंही कैसें घडेल म्हणसी । तरी जगत्कारणें प्रधानेंसीं । त्या सर्वांतें जें प्रकाशी । सत्तायोगेंसीं आदिबीज ॥ ६६ ॥ तया आदिबीजात्मका तूतें । जाणोनि नमिलें म्यां निरुतें । उपादान या प्रपंचातें । तुजवीण येथें असेना ॥ ६७ ॥ म्हणसी घटमठादिकार्याप्रति । उपादान केवळ माती । जड अचेतन याचि रीती । त्वां मजप्रति जाणितलें ॥ ६८ ॥ ऐसें न म्हणावें गोपाळा । मृदादि उपादानां सकळां । जडत्व असतां कार्यमेळा । प्रकट केला कर्त्यानें ॥ ६९ ॥ निमित्त कर्तृकारणाविण । मृदादिकारणा अनुपकरण । संविन्मात्र स्वबोधपूर्ण । तूं सर्वज्ञ सर्वदृक् ॥ ३७० ॥ प्रधानादि कारणें जडें । कार्यें प्रसवती तव उजिवडें । अन्यकारणापेक्षा पडे । हें प्राकृत कोडें तुज नाहीं ॥ ७१ ॥ जरी सर्वोत्कृष्ट कारणांपूर्वीं । असणें माझें बोलसी उर्वी । तरी त्या असणियाचें कारण कैंवी । प्रतिपादिसी तें सांग ॥७२॥ ये शंकेच्या परिहरणीं । प्रभूतें नमूनि बोले धरणी । श्लोकोक्त सातां विशेषणीं । तें सज्जनीं परिसावें ॥७३॥

अजाय जनयित्रेऽस्य ब्रह्मणेऽनंतशक्तये । परावरात्मन्भूतात्मन्परमात्मन्नमोऽस्तु ते ॥ २८ ॥

कार्यरूपें जायमान । त्यासी कारण असे आन । तूं अज अव्यय सनातन । अकारण अनादि ॥ ७४ ॥ तुझिया योगसत्ताबळें माया सचेत ऐसी कळे । अनंत ब्रह्माण्डांचिये माळे । गुण प्रसवोनि्म्रां गौण रची ॥ ३७५ ॥ तस्मात् तूंचि या जनयिता । अजत्वें अनादि अकारण असतां । कारणाकारणद्वयसंकेता । श्लोकोक्त हेतुद्वय बोधी ॥ ७६ ॥ ब्रह्मणे या विशेषणें । बृहत्वात् ब्रह्म तूतें म्हणणें । अनादि अजत्व प्रतिपादणें । तुजकारणें या हेतू ॥ ७७ ॥ अज असतां सृजन कैसें । जनयितृत्व कैंवि दिसे । तरी अनंतशक्तये या विशेषणवशें । प्रतिपाद्य असे निगमोक्त ॥ ७८ ॥ बृहत्वास्तव अजत्व सिद्ध । तैसेंच जनयितृत्वही विषद । अनंतशक्तित्वें प्रतिपाद्य । एवं अविरोध मम नमन ॥७९॥ परावरात्मन् ऐसिया पदें । संबोधिलें वाक्यें विशदें । येथींचा अर्थ श्रीमुकुन्दें । अखिलकोविदें आणिजेत ॥ ३८० ॥ पित्यापासून पुत्र झाला । पित्यातें आजा प्रसवला । आज्यालागून पणजा व्याला । प्रसवे पणज्याला निपणजा ॥ ८१ ॥ एवं ओषधीपासूनि अन्न । अन्न अन्नापासूनि रेत उत्पन्न । रेत रुधिर

परिणमोन । पुरुष उत्पन्न होतसे ॥ ८२ ॥ तिया ओषधि भूसंभव । पर्जन्यें बीजप्रादुर्भाव । तेजोनिळें जलवर्षाव । पर्जन्य नांव त्या होय ॥ ८३ ॥ पंच भूतां प्रसवे नभ । तेथें कारण काळक्षोभ । एवं अष्टधाप्रकृतिकोंभ । परावरत्वें तुज कथिला ॥ ८४ ॥ एवं अष्टधा प्रकृति जड । परावरत्वें कथिली रूढ । तीमाजि आत्मत्वें जो उघड । प्रकाश सुघड चिदाभास ॥ ३८५ ॥ ऐसा अनुगत तव प्रकाश । वेदान्तवाच्य चिदाभास । जीवशब्दें बोलिजे ज्यास । स्वकर्मास जो भोक्ता ॥ ८६ ॥ स्वकर्मद्वारा फलानुरूप । भोगणें घडे पुण्यपाप । सुरनरतिर्यग्योनि अमूप । कृतसंकल्प परावर ॥ ८७ ॥ जरी तूं म्हणसी तमादि त्रिगुण । विश्वसृजनादिहेतु जाण । गुणत्रयासही कारण । प्रसवे प्रधान प्रसिद्ध ॥ ८८ ॥ पुरुष प्रधाना क्षोभक । तोही काळनैमित्तिक । येथ माझा स्तवनघोक । कोण विवेक करावया ॥ ८९ ॥ ऐसें न म्हणावें गोपाळा । यदर्थीं स्वमुखें प्रार्थी इला । तो तूं परिसें कुरुनृपाळा । हेत्वर्थ सरळा ये श्लोकीं ॥ ३९० ॥

त्वं वै सिसृक्षू रज उत्कटं प्रभो तमो निरोधाय बिभर्ष्यसंवृतः ।
स्थानाय सत्त्वं जगतो जगत्पते कालः प्रधानं पुरुषो भवान्परः ॥ २९ ॥

पूर्वश्लोकींचें अंतिम पद । तेंचि वाखाणावया विशद । इये श्लोकीं शुक कोविद । कारणानुवाद वाखाणी ॥ ९१ ॥ विश्वसृजनाकारणें । तूंचि उत्कट रजोगुणें । अवगोनि करिसी अनेक सृजनें । प्रवृत्तिभानें नावरितां ॥ ९२ ॥ तया विश्वाचा संस्थितिहेतु । त्वत्कृत प्राचीन स्वधर्मसेतु । तत्पालन सत्ववंतु । आविर्भूत सत्त्वात्मा ॥ ९३ ॥ तेचि वाढल्या बहुवस सृष्टि । उत्पथ अनावर देखूनि दृष्टी । तमोत्कर्षें घालिसी पोटीं । निर्मोह शेवटीं अलिप्त तूं ॥ ९४ ॥ काळपुरुषप्रधानगुण । इयें कारणें भिन्न भिन्न । तुजवीण यांतें प्रकाशक आन । भो परमात्मन् कोण असे ॥ ३९५ ॥ सूर्यापासूनि निघती किरण । तत्प्रकाशें धवळे गगन । तेणें विश्वा प्रवर्तन । देखणें नयनें तद्योगें ॥ ९६ ॥ तया तेजाचा उपसंहार । करूनि पाहतां एक भास्कर । भास्करात्मा तूं अगोचर । तेज गोचर विषयरूप ॥ ९७ ॥ भूतभौतिकां अंतर्गत । व्यंजकत्वें साक्षीभूत । पुरुष प्रधान गुण समस्त । कालनिमित्त तूं अवधारीं ॥ ९८ ॥ तुझिया प्रकाशव्यंजकगुणें । करणें होतीं विषयात्मभिज्ञें । तियें निर्विषया तुजकारणें । कवण्या वयुनें अवगमिती ॥ ९९ ॥ व्यष्टिगोगम्य नव्हसी म्हणों । तरी समष्टीचा जो गोगण । यासही तुझें अगोचर वयुन । तो तूं परमात्मन् परात्पर ॥ ४०० ॥ मृषा आभास जडतन्मात्रें । तदभिज्ञें करणें परें । करणांसही पर मानस खरें । बुद्धि निर्धारें मनःपरा ॥ १ ॥ बुद्धीहूनि जो परात्पर । तो तूं परमात्मा अगोचर । कार्य कारण सृष्टिप्रकार । तुजमाजी अपर तो कैंचा ॥ २ ॥ वास्तव आत्मा अद्वितीय । तेथ कैंचा व्यतिरेकान्वय । ये श्लोकीं तो अभिप्राय । भू वदताहे तें ऐका ॥ ३ ॥

अहं पयो ज्योतिरथानिलो नभो मात्राणि देवा मन इंद्रियाणि ॥
कर्ता महानित्यखिलं चराचरं त्वय्यद्वितीये भगवन्नयं भ्रमः ॥ ३० ॥

आधाररूपा जे कां मही । तिये मज पृथक्सत्तत्व नाहीं । आपोमात्रा अमृतमयी । तुजवीण कायी पृथक् असे ॥ ४ ॥ रसाकर्षण अभिवर्षण । कर्ता आदित्य जो पर्जन्य । तिये ज्योतीस अधिष्ठान । नसे तुजवीण जगदीशा ॥४०५॥ अनिलचलनें ज्योति झळके । तेणें लखलखितां पावकें । शोषणें वर्षणें पचनात्मकें । होती अशेखें तव सत्ता ॥ ६ ॥ एवं भू जल अनळानिळ । गगनगर्भीं साळुमाळ । तया गगना कोण स्थूळ । तुजमाजी केवळ त्यां वसती ॥ ७ ॥ पंच भूतें इथें पृथगाकारें । शब्दस्पर्शादिकें तन्मात्रें । प्रकटलीं तामसें अहंकारें । सबाह्यान्तरें तूं त्यांत ॥ ८ ॥ वाक् पाणि पादोपस्थ गुद । कर्मेंद्रियांचे पांचही भेद । श्रोत्र त्वक् चक्षु रसना घ्राण विशद । इयें प्रसिद्ध ज्ञानेंद्रियें ॥ ९ ॥ प्राणापानादि चेष्टाकरणें । पंधरा प्रकाशती रजोगुणें । तुजवीण यांचें होणें जाणें । कोठें कोणें म्हणिजेल ॥४१०॥ दिक्पवनार्क वरुण दस्र । हव्यवाहन इंद्रोपेन्द्र । प्रजापति निर्ऋति हें सुरचक्र । कैचें अपर हें तुजमाजी ॥११॥ अंतःकरणादि कर्तृकरणें । विष्णुशशाङ्ककमलासनें । नारायणें गौरीरमणें । पंचधाभिन्नें अधिष्ठिलीं ॥१२॥ एवं त्रिगुणात्मकें कार्यें । त्रिधा अहंकारें विराटमयें । तो अहंकार तुजमाजी काय । वर्तता होय पृथक्त्वें ॥ १३ ॥ अहंकाराचें कारण । ज्यासी महत्तत्त्व हें अभिधान । त्यातें प्रसवें अव्यक्त जाण । इत्यादि कारणपरंपरा ॥ १४ ॥ एवं उपक्रमोपसंहार । बोधप्रवृत्ति श्रुतिगोचर । येथ तूं अद्वितीय अगोचर हा विचार भ्रम अवघा ॥ ४१५ ॥ जैसी उकारमात्रेमाजी । विक्षेपवयुनें स्वप्नराजी । तैजस अवगमी ते प्रबोध उमजीं । भ्रमावांचून साच असे ॥ १६ ॥ तेंवि तूं सच्चिदानंद अद्वितीय । तेथ प्रपंचभ्रम हा मायामय । एंव तूंचि व्यतिरेकान्वय । भ्रमाचा लय तव बोधीं ॥ १७ ॥ एवंविधा जगदीश्वरा । नमनें स्तवनें प्रार्थूनि धरा । भौमासुराचिया कुमरा । अभय श्रीधरा याचीतसे ॥ १८ ॥ विनीतभावें करूनि विनती । प्रसन्न केला कमलापति । मग भौमपुत्र धरूनि हातीं । निरोवी क्षिति तें ऐका ॥ १९ ॥

तस्याऽऽत्मजोऽयं तव पादपंकजं भीतः प्रपन्नार्तिहरोपसादितः ।
तत्पालयैनं कुरु हस्तपंकजं शिरस्यमुष्याखिलकल्मषापहम् ॥ ३१ ॥

शरणागताचा दुःखपरिहार । करी तो प्रपन्नार्तिहर । साभिप्राय जगदीश्वर । धरा मधुर संबोधी ॥४२०॥ भो भो प्रपन्नार्तिहरणा । नरकात्मज हा तुझिया चरणा । शरण पातला यावरी करुणा । करूनि सर्वज्ञें रक्षावा ॥ २१ ॥ तस्यात्मज हा त्याचाचि पुत्र । म्हणूनि नरकाहूनि नरकतर । तरी हा तैसाचि हें साचार । तथापि विचार अवधारीं ॥ २२ ॥ तुझिया काळचक्रापुढें । असुर प्रतापी न वाढे । गेले हिरण्याक्षाएवढे । किती ते तोंडें कोण वदे ॥ २३ ॥ रजतमात्मक आसुरी प्रकृति । सुरविरोधी जन्मप्रभृतिं । जातिनिसर्गें जे दुष्कृति । दैत्याराति तव नामें ॥ २४ ॥ करिकेसरिनिसर्गवैर । धेनुव्याघ्र मत्स्यधीवर । धूर्तकुरंग बिडाळउंदिर । तैसा श्रीधर दैत्यारि ॥ ४२५ ॥ प्रत्यक्ष भौमासुरमर्दन ।

करूनियां मारिलें अपार सैन्य । मी तंव नरकाचा नंदन । मजलागून हरि कां न मरी ॥ २६ ॥ सहज-जातिनिसर्गवैर । विशेष शत्रूचा मी कुमर । मजला देखतांचि श्रीधर । करील संहार तत्काळ ॥ २७ ॥ ऐसी भयाची कणकणी । पितृशोकार्त अंतःकरणीं । म्हणोनि म्यां तुझिये चरणीं । प्रविष्ट केला प्रपन्न ॥२८॥ तूं तंव प्रपन्नार्तिहर । हा तव बिरुदाचा बडिवार । तरी याचे मस्तकीं अभय कर । ठेवोनि किंकर पाळीं हा ॥ २९ ॥ जन्मला नरकासुराच्या कुसीं । म्हणसी केवळ कल्मषराशि । तरी अभय हस्त त्वां ठेविजे शिर्शी । अखिल अघांसी तूं हंता ॥ ४३० ॥ तुझिया शंतम करारविंदें । पावन होती अघिष्ठवृंदें । यालागीं भगदत्त हा मुकुन्दें । अभयवरदें पाळावा ॥ ३१ ॥ मजवरी करूनि पूर्ण स्नेह । माझ्या तनयाचा हा तनय । वरदहस्तें देऊनि अभय । कृपानुग्रहें पाळावा ॥ ३२ ॥ बादरायणि म्हणे राया । हे भूप्रार्थना ऐकोनियां । भगदत्तावरी केली दया । परिसा तिया व्याख्याना ॥ ३३ ॥

श्रीशुक उवाच - इति भूम्यार्थितो वाग्भिर्भगवान्भक्तिनम्रया । दत्वाऽभयं भौमगृहं प्राविशत्सकलर्द्धिमत् ॥३२॥

इत्यादि मधुरवाणीकरून । धरादेवीनें श्रीभगवान । पूजिला भक्तिप्रेमें पूर्ण । कृपेनें सकरुण कळवळिला ॥ ३४ ॥ धरादेवीनें धरूनि हातीं । बद्धाञ्जली विनीतभक्ति । नयन स्रवती अश्रुपातीं । सस्वेदकान्ति रोमाञ्चित ॥ ४३५ ॥ ऐसा भगदत्त कृष्णचरणीं । नेवोनि घालिती झाली धरणि । अभय देऊनि पंकजपाणि । स्पर्शोनि मूर्ध्नि उठविला ॥ ३६ ॥ भगदत्त म्हणे श्रीगोपाळा । मनुष्यनाट्यें दाविसी लीला । धर्मस्थापक सुरमुनिपाळा । अवतारमाळा युगीं युगीं ॥ ३७ ॥ भो भो सर्वात्मक सर्वगा । चराचरात्मा तूंचि अवघा । शत्रु मित्र सुरासुरवर्गा । भेदविभागा कैं ठाव ॥ ३८ ॥ तथापि धर्मोच्छेदक दैत्य । तद्वधाचें मुख्य कृत्य । यालागीं अवतार असंख्यात । सुरकार्यार्थ आंगाविसी ॥३९॥ प्रकृतिजनित विरोधी गुण । दैवीसंपत्ति सुरगण । आसुरी आसुर राक्षस निघृण । धर्मोच्छेदनकारक जे ॥ ४४० ॥ तूं उभयात्मक चैतन्य । नोहसी प्राकृत प्रकृतिगुण । तूं नेणसी भेदमान । अभेद पूर्ण जगदात्मा ॥ ४१ ॥ सत्वसंपत्ति देव भजती । रजतमें असुर विरोधिती । देहाभिमानें उत्पथमाति । ते संहरती निजकर्में ॥ ४२ ॥ यास्तव माझी हे प्रार्थना । नैसर्गिकां असुरां गुणां । निरसूनि रक्षीं चरणशरणा । स्वदासगणांमाजी गणीं ॥ ४३ ॥ ऐसी ऐकोनि विनवणी । कृपेनें द्रवला चक्रपाणि । प्रेमें हृदयीं आलिंगूनी । स्पर्शिला मूर्ध्नि पद्मकरें ॥ ४४ ॥ म्हणे तुजला येथोनि अभय । इंद्रप्रमुख अमरवर्य । तुजसीं चालती पूर्णस्नेह । राहें निर्भय निज नगरीं ॥ ४४५ ॥ बोलावूनियां प्रजाजन । किंकरपार्षदसह प्रधान । भौमासुराचें भद्रासन । भगदत्तासी समर्पिलें ॥ ४६ ॥ मग तेणें वंदूनि भगवच्चरण । प्रार्थूनि प्रवेशवी भौमासन । म्हणे हें स्वामींचें ऐश्वर्य भुवन । अपेक्षित धन स्वीकीजे ॥४७॥ सकळ समृद्धिमंत गृह । नाहीं कोणाचा आग्रह । मजवरी करूनि पूर्ण स्नेह । वस्तुसमूह नेइजे ॥४८॥ भौमसदनीं श्रीभगवान । प्रवेशला देदीप्यमान । तेथ घेतल्या वस्तु कोण । तें संपूर्ण अवधारा ॥४९॥

तत्र राजेंद्रकन्यानां षट्सहस्राधिकायुतम् । भौमाहृतानां विक्रम्य राजभ्यो ददृशे हरिः ॥ ३३ ॥

प्रधानामात्यपार्षदसचिव । किंकरवेष्टित वासुदेव । भौमगृहींच्या वस्तु सर्व । सादर स्वमेव अवलोकी ॥ ४५० ॥ भगदत्ताचे आज्ञेवरूनी । गृहरक्षकीं उत्कीलनीं । पृथक पृथक कोष्ठश्रेणी । कपाटें उघडोनि दाविती ॥ ५१ ॥ अनर्घ्य रत्नें वैदूर्यमणि । जडित जाम्बूनदसुवर्णीं । दिव्य भूषणें त्वाष्ट्रघडणीं । भौमें स्वर्गौनि जियें हरिलीं ॥ ५२ ॥ तिया विशाळा मंजूषा । उघडूनि दाविती हृषीकेशा । कीं ते लक्ष्मीच सुरतावेशा । स्वकान्तेंसीं तनु प्रकटी ॥ ५३ ॥ अमूल्य विचित्रा वसनशाळा । अग्निधौता दिव्यदुकूळां । देखतां शक्रा सहस्रडोळां । झांपडी पडे ज्या तेजें ॥ ५४ ॥ चिंतामणि गुरुत्मन्ममणि । मुक्ता माणिक्य वैदूर्यमणि । नादवेधादि स्पर्शमणि । ललामश्रेणी बहुजाति ॥ ४५५ ॥ वज्र गोमेद पाच प्रवाळ । सद्गुणाढ्य इंद्रनीळ । शाळा उघडूनि रक्षकमेळ । दावूनि गोपाळ तोषविती ॥ ५६ ॥ ऐसीं पाहतां भौमभुवनें । तेथ देखता झाला ललनारत्नें । भौमें संगृहिलीं प्रयत्नें । समराङ्गणें करूनियां ॥५७॥ राजे जिंकूनि राजतनया । शतोत्तर सोळा सहस्रें राया । भौमें ठेविल्या पर्णावया । शुभमुहूर्तीं एकसन्या ॥ ५८ ॥ तेथ तें ललनाललाभुवन । देखता झाला जगज्जीवन । कन्यारत्नीं पुरुषरत्न । नयनीं देखोन वेधलिया ॥ ५९ ॥ श्रोते शंका करिती येथ । शतोत्तर नाहीं श्लोकसंमत । तरी विष्णुपुराणीं प्रकट अर्थ । आजा बोलिला शुकाचा ॥ ४६० ॥

विष्णुपुराणोक्तम्–कन्यापुरे सकन्यानां षोडशातुलविक्रमः । शताधिकानि ददृशे सहस्राणि महामते ॥

राजकन्या हें वदला शुक । परी त्या देवादिकांच्या सम्यक । तोही पराशरमुखींचा श्लोक । ऐकोनि निःशंक श्रवण कीजे ॥ ६१ ॥

देवसिद्धासुरादीनां नृपाणां च जनार्दन । हृत्वा हिंस्रोऽसुरः कन्यारुरोध निजमंदिरे ॥

देवासुरगंधर्वराजा । सिद्धचारणमनुष्यराज । एवं राजकन्याचि त्या सहज । प्रतापपुंज भौम हरी ॥ ६२ ॥ त्यांतें देखतां गरुडध्वजें । तेव्हां त्यांचीं हृदयकंजें । फुल्लारमान झालीं वोजें । तें कुरुराजे परिसावें ॥ ६३ ॥

तं प्रविष्टं स्त्रियो वीक्ष्य नरवीरं विमोहिताः । मनसा वव्रिरेऽभीष्टं पतिं दैवोपसादितम् ॥ ३४ ॥

आधींच उपवर कन्यारत्नें । विशेष दैत्यें रोधिलीं यत्नें । तेथोनि सुटिकेच्या प्रयत्नें । सांडविलीं जीं दुःखार्तें ॥ ६४ ॥ तेथ अवचित नरवीररत्ना । दैवें पाहती त्यांचे नयन । म्हणती प्रविष्ट झाला कोण । लावण्यभुवन ये ठायीं ॥ ४६५ ॥ मनेंकरूनि तिहीं वरिला । म्हणती दैवें प्राप्त केला । आम्हां हा अभीष्ट पति जोडला । तरी तुष्टला जगदीश ॥ ६६ ॥

भूयात्पतिरयं मह्यं धाता तदनुमोदताम् । इति सर्वाः पृथक् कृष्णे भावेन हृदयं दधुः ॥ ३५ ॥

मजकारणें हा अभीष्ट पति । दैवें अनुकूळ जरी यदर्थी । विधिही प्रेरक हो याप्रति । ऐशा भाविती पृथक्पृथक् ॥ ६७ ॥ सप्रेम आस्तिक्यभावें करूनी । आपुलाल्या अंतःकरणीं । कृष्ण वरिती अवघ्या जणी । म्हणती भवानी तुष्टो कां ॥ ६८ ॥ माता पिता तुटला आम्हां । वरपड्या झाल्या होतों भौमा । कृपा आली पुरुषोत्तमा । तरी नरललामा योजियलें ॥ ६९ ॥ म्हणती मनोरथ पावो सिद्धी । यदर्थी साह्य हो कां विधि । ऐसी जाणोनियां तयांची बुद्धि । करुणानिधि कळवळिला ॥ ४७० ॥

ताः प्राहिणोद्द्वारवतीं सुमृष्टविरजोऽम्बराः । नरयानैर्महाकोशान्रथाश्वान्द्रविणं महत् ॥ ३६ ॥

जाणोनि कृष्णाज्ञासंकेत । कुशला किंकरीं शतानुशत । कन्यका दास्यार्थी भगदत्त । नियोजी समस्त पृथक्पृथक् ॥ ७१ ॥ जवादि केशर कस्तूरी उटणीं । सुगंध तैलाभ्यक्त मूर्ध्नि । उष्णोदकीं मंगलस्नानीं । सुमृष्टगात्रा त्या केल्या ॥ ७२ ॥ वसनशाळेमाजील वसनें । अग्निधौतें विरजें नवीनें । कंचुकी उत्तरीयें परिधानें । सर्वांकारणें सुमृष्टें ॥ ७३ ॥ उघडोनियां नेपथ्यनिलयें । रत्नखचितें कर्बूरमयें । लेवविलीं यथान्वयें । पृथगवयवीं सुमृष्टें ॥ ७४ ॥ एवं सुमृष्टा विरजोऽम्बरा । सशत सहस्र षोडश दारा । शिबिकायानीं द्वारकापुरा । कमनीयतरा पाठविल्या ॥ ४७५ ॥ रत्नवैदूर्यमणींचे कोश । कनकमुद्रामय अशेष । भरूनि रथ गज क्रमेळ वृष । धाडी जगदीश त्यांसंगें ॥ ७६ ॥ अश्वरत्नें कुंजररत्नें । स्यंदनप्रमुखें विचित्रें यानें । मयनिर्मित दिव्याभरणें । द्वारके कृष्णें पाठविलीं ॥ ७७ ॥

ऐरावतकुलेभांश्च चतुर्दंतांस्तरस्विनः । पाण्डुरांश्च चतुःषष्टिं प्रेषयामास केशवः ॥ ३७ ॥

क्षीरोदमथनोद्भव कुंजर । ज्यावरी आरूढे पुरंदर । तद्वीर्यसंभव संततिप्रवर । जवें समीर समतेचें ॥ ७८ ॥ पयःफेनपाण्डुरवर्ण । चतुर्दंतविराजमान । शुंडा लंबाळ त्रिवळीपूर्ण । छायाविहीन देदीप्य ॥ ७९ ॥ ते चौसष्टी स्वर्गभूषण । सालंकृत सपल्ल्याण । कृष्णें द्वारके दिव्य वारण । रत्नें भरून पाठविले ॥ ४८० ॥ नाना शस्त्रास्त्रसमृद्धि । अनर्घ्य वस्तु अनर्घ्य विधि । मनुष्यलोकीं कोणीं कधीं । देखिलिया नायकिलिया ॥ ८१ ॥ भगदत्त विरक्त भगवत्प्राण । सर्व समृद्धि समर्पून । संतुष्ट केला भामारमण । अनन्य शरण होत्साता ॥ ८२ ॥ प्राग्ज्योतिषपुरींचा नृप । भद्रीं स्थापूनि भगदत्त भूप । कृष्णें ठाकिलें त्रिविष्टप । सुरपादपहरणार्थ ॥८३॥ निरसावया निर्जराधि । त्यांची प्रकटावया कृतघ्नबुद्धि । अमर जिंकावया युद्धीं । गेला त्रिशुद्धी तें ऐका ॥ ८४ ॥

गत्वा सुरेंद्रभवनं दत्वाऽदित्यै च कुण्डले । पूजितस्त्रिदशेन्द्रेण सहेंद्राण्या च सप्रियः ॥ ३८ ॥

जाऊनियां शक्रसदना । आह्लाद केला संक्रंदना । नामिलें अदितिमातृचरणा । सत्यभामे समवेत ॥४८५॥ दिव्य कुंडलें भौमापहृतें । आणोनि समर्पिलीं मातेतें । देखोनि आल्हादभरित चित्तें ।

आशीर्वचनें त्या दिधलीं ॥ ८६ ॥ सपादशतायुर्वैभव । भोगीं त्रैलोक्यविजयविभव । भामासौभाग्य-सलिलें प्रवाहो । सुरनिम्नगा चिरकाळ ॥ ८७ ॥ शक्रें नेवोनि भद्रासनीं । सत्यभामेसीं चक्रपाणि । सर्वे घेऊनि इंद्राणी । पादार्चनीं प्रवर्तला ॥ ८८ ॥ कनककुम्भ कुंभस्तनी । धरूनि जळ ओती इंद्राणी । महर्षि सजीव मंत्रपठनीं । सामगायनीं देवर्षि ॥ ८९ ॥ परिधान करवूनि कनकवसनें । रत्नखचितें दिव्याभरणें । दिव्यगंधें विलेपनें । स्वर्गसुमनें समर्पिलीं ॥४९०॥ उधळूनि सुगंधचूर्णरोळा । दिव्या-वतंस सुमनमाळा । धूप दीप चरणकमळा । उजळूनि केला जयगजर ॥ ९१ ॥ अमृत ओगरिलें नैवेद्या । सुरसा फळादि पदार्थां मेध्यां । सुरवरसेव्यां खाद्या हृद्यां । विधिहरवंद्या समर्पिती ॥ ९२ ॥ सर्वस्वदानें अनन्यदास । होवोनि नमिला श्रीनिवास । नीराजनादि मंगळघोष । मंत्रपुष्पें समर्पिलीं ॥ ९३ ॥ स्तुतिस्तवनें प्रदक्षिणा । करूनि निर्जर लागती चरणां । म्हणती रक्षिलें अमरभुवना । भौमा दुर्जना वधूनियां ॥ ९४ ॥ शचीनें सत्यभामा हातीं । धरूनि स्वसदनीं एकान्तीं । नेवोनि पूजिली यथा-निगुती । सप्रेमभक्ती गौरविली ॥४९५॥ समर्पूनि स्वसंपत्ति । म्हणे धन्य तूं ये त्रिजगतीं । सुकृतें वरिला जगत्पति । अमर सेविती तच्चरणा ॥ ९६ ॥ घेऊनि निर्जरवरसम्मान । सत्यभामेसीं भगवान । खगेन्द्र-पृष्ठीं आरोहण । करूनि गमना आदरिलें ॥ ९७ ॥ द्वारके निघतां श्रीगोपाळा । बोलिली सत्राजिताची बाळा । पार्यातग्रहणीं विसर पडला । तो घेतला पाहिजे ॥ ९८ ॥ हरि म्हणे घेतां कल्पद्रुम । विक्षेप मानील अमरोत्तम । घडेल अमरेंसीं संग्राम । त्यांसीं विक्रम केंवि घडे ॥ ९९ ॥ ऐकोनि हांसिली सत्य-भामा । निर्जर कांपती ज्याचिया नामा । क्षणार्धें मारिलें तया भौमा । किमर्थ आम्हां भेडाविसी ॥५००॥ अवश्य कीजे पार्यातहरण । अमरेंसीं मी करीन रण । ऐकोनि सत्यभामेचें वचन । श्रीभगवान हांसिला ॥ १ ॥

नोदितो भार्ययोत्पाटच पारिजातं गरुत्मति । आरोप्य सेंद्रान्विबुधान्निर्जित्योपानयत्पुरम् ॥४०॥

प्रेरिला भार्येनें होत्साता । नंदनवनीं प्रवेशतां । रक्षक वारिती भगवंता । म्हणती अनुचिता न करावें ॥ २ ॥ इंद्राणीचें हें उपभोगवन । न करवे कोण्हा अवलोकन । बळात्कारें रिघतां पूर्ण । सद्यः शासन पावाल ॥ ३ ॥ ऐकोनि हांसिली सत्यभामा । इंद्राणीची कायसी गरिमा । मी पढियंती मेघ-श्यामा । माझिया नामा तीसि वदा ॥ ४ ॥ इंद्रमानिनी या अभिमानें । गौण मानिसी तिन्ही भुवनें । मी कृष्णाच्या वालभगुणें । नाणीं गणने तुजलागीं ॥५०५॥ ऐसें बोले जंव सत्यभामा । तंव आवेश आला पुरुषोत्तमा । उत्पाटूनियां कल्पद्रुमा । विहंगोत्तमा वोळंघला ॥ ६ ॥ रक्षकीं केला हाहाकार । म्हणती नेला सुरतरुवर । ऐकोनि क्षोभला पुरंदर । अमरभार उठावले ॥ ७ ॥ वसु पातले समरक्षिती । पावकनामा यूथपति । तेणें हाकिला श्रीपति । सैन्यसंपत्तिसमवेत ॥ ८ ॥ विष्णुनामा आदित्य दळीं । तेणें हांकिला वनमाळी । खट्वाङ्गपाणि रुद्रमंडळीं । शंकरनामा लोटला ॥ ९ ॥ सिद्ध साध्य चारण यक्ष । चित्ररथादि गंधर्वमुख्य । किन्नर मरुद्गण किम्पुरुष । लोटली अशेष देवचमू ॥ ५१० ॥ त्यानंतरें लोकपाळ । आपुलालें सज्जूनि दळ । ऐसी सुरसेना तुंबळ । मिळूनि गोपाळ वेष्टिला ॥ ११ ॥

गुह्यकपति द्रविणपति। कुबेर उत्तरेचा दिक्पति। गदा पडताळूनियां हातीं। तेणें श्रीपति पाचारिला ॥१२॥ विजयध्वजींचें व्याख्यान । सत्यभामेनें धनुष्यबाण । घेऊनि धनदेंसीं दारुण । केलें रण शस्त्रास्त्रीं ॥१३॥ सत्यभामेनें समराङ्गणीं। कुबेर भंगिला अर्धक्षणीं। गरुडें वरुण संत्रासूनी। रणमेदिनी सांडविली ॥१४॥ हें देखोनि परमाश्चर्य । हास्य करूनि वृष्णिधुर्य । भंगिता झाला निर्जरनिचय। कक्षप्राय पावकवत् ॥ ५१५ ॥ तिये समयीं पावक पवन । पिशाचसैन्येंसीं ईशान । दण्डपाणि कुणपासन । मिळोनि भगवान पडखळिला ॥ १६ ॥ शार्ङ्ग सज्जूनि शार्ङ्गपाणि । त्यांचीं शस्त्रास्त्रें तोडूनी । सर्वही भंगिले समराङ्गणीं । पाठी देऊनि पळाले ॥ १७ ॥ तिये समयीं पुरंदर । पालाणूनि सुरकुंजर । करें पडताळूनियां वज्र । समयीं श्रीधर पाचारी ॥ १८ ॥ वज्र हाणितां खगेश्वरा । तेणें लाघवें चमत्कारा । करूनि त्रासिलें सुरकुंजरा । चंचुप्रहारा करूनियां ॥ १९ ॥ कृष्णें परजूनि सुदर्शन । अमरेंद्राचे घ्या रे प्राण । तंव बृहस्पतीनें करूनि स्तवन । निजयजमान वांचविला ॥ ५२० ॥ मग बद्धाञ्जळि नम्र मौळें। लक्षूनि कृष्णाचीं पदकमळें । अष्टभावीं सहस्र डोळे । सप्रेम जळें गळताती ॥ २१ ॥ म्हणे जय जय जगदीश्वरा । आम्हां कृतघ्नां पामरां । कृपेनें देऊनि अभयकरा । रक्षिसी अमरां निज दासां ॥ २२ ॥ अमरेंद्रत्वाचा अभिमान । यास्तव गोकुळीं केलें विघ्न । तैं त्वां धरूनि गोवर्धन । गर्व भंगूनि लाजविलें ॥ २३ ॥ त्रिदशमंडळीं पावलों तपा । तैं त्वां पुढती करूनि कृपा । रक्षिलें असतां सुरपादपा-। निमित्त आतां विरोधिलें ॥ २४ ॥ सर्वापराध करूनि क्षमा । कृपावत्सला पुरुषोत्तमा । दासांमाजी कृतघ्नां अधमां । रक्षिजे आम्हां मातृवत् ॥ ५२५ ॥ मातृगर्भींचे क्लेश नाना । विशेष प्रसूतिसमयीं जाणा । बाल्यावयवसंरक्षणा । पुत्र कृतघ्नासम विसरे ॥ २६ ॥ तथापि करुणावत्सल माता । सहसा न करी पुत्रघाता । तेंवि आम्हां स्वजठरस्थां । विभो समर्था रक्षावें ॥ २७ ॥ ऐसें ऐकोनियां वचन । कृपेनें द्रवला जनार्दन । म्हणे म्यां त्यजिलिया मृत्युभुवन । द्रुम घेऊन येइजे ॥ २८ ॥ इंद्र म्हणे माझा कुमर । त्रितीय पाण्डव तव किंकर । तो रक्षिजे हें वारंवार । जोडोनि कर प्रार्थितसे ॥ २९ ॥ हें ऐकोनि म्हणे हरि। तद्विषयीं तूं चिंता न करीं। सख्य करूनि प्राणांपरी। रक्षीन समरीं मी त्यातें ॥५३०॥ इंद्रादि अमरां विसर्जून । भामा सद्रुम जनार्दन । खगेंद्रारूढ रत्नाभरण । द्वारकाभुवन पातला ॥ ३१ ॥ असो ऐशी पुराणान्तरीं । कथा बोलिली बहु विस्तारीं । येथ संकेतें शुकवैखरी । मुकुरापरी बीजवत् ॥ ३२ ॥ ऐकोनि भार्येचें उत्तर । उत्पाटूनि सुरतरुवर । गरुडीं वाहूनि सामर इंद्र । जिंकूनि सत्वर स्वपुरा ने ॥ ३३ ॥ म्हणाल नेऊनि लाविला कोठें । तेंही परिसा श्रवणपुटें । वदलें शुकाचें मुखवटें । तेंचि गोमटें वाखाणूं ॥ ३४ ॥

स्थापितः सत्यभामाया गृहोद्यानोपशोभनः । अन्वगुर्भ्रमराः स्वर्गात्तद्गंधासवलंपटाः ॥ ४० ॥

प्रत्यय उपजे अंतःकरणीं । तंववरी फेडिली शिराणी । सत्यभामा वरिष्ठ राणी । चक्रपाणि-प्रियललना ॥५३५॥ सत्यभामेच्या गृहोद्यानीं । कल्पतरु लाविला यत्नीं । ज्याच्या सौरभ्या वेधूनी । आले स्वर्गौनि सुरभ्रमर ॥ ३६ ॥ निष्कुट म्हणजे गृहोद्यान । पार्यातकुसुमीं सौरभ्यपूर्ण । तेणें अत्यंत

शोभायमान । भामाभुवन दिविसाम्यें ।। ३७ ।। इंद्रें सहित निर्जरपंक्ति । जिणोनि पार्यात आणिला क्षिती । हें ऐकोनि परीक्षिति । उदित चित्तीं प्रश्नार्थे ।। ३८ ।। अहो इंद्रें भाकूनि करुणा । कृष्ण प्रार्थिला स्वार्थसाधना । तो कार्यार्थ साधूनि दिधल्या जाणा । कीं कीजे कदना तेणेंसीं ।। ३९ ।। ऐसी सुरांची कृतघ्नता । भासली परीक्षितीच्या चित्ता । तो अभिप्राय सर्वज्ञ वक्ता । बोले तत्त्वता शुक योगी ।।५४०।।

ययाच आनम्य किरीटकोटिभिः पादौ स्पृशन्नच्युतमर्थसाधनम् ।
सिद्धार्थ एतेन विगृह्यते महानहो सुराणां च तमो धिगाढ्यताम् ।। ४१ ।।

राया पहा पां कौरवनाथा । केवढी देवांची कृतघ्नता । धिग् धिग् त्यांची वरिष्ठता । द्रविणाढ्यता धिक् त्यांची ।। ४१ ।। अहो इंद्रें द्वारकेप्रति । जाऊनि परमदीनवृत्ति । करुणा भाकूनियां श्रीपति । कथिली आर्ति बहुसाल ।। ४२ ।। श्रीकृष्णाच्या चरणा निकटीं । नमस्कारितां मुकुटकोटि । वारंवार पाद-पीठीं । संघटती तें विसरला ।। ४३ ।। दीनवदनें अनाथपणें । सांगे रडोनियां गाऱ्हाणें । तोंड करूनि केविलवाणें । विनीतपणें विनवूनियां ।। ४४ ।। स्वकार्य साधावयालागीं । याचिला कैपक्षी शार्ङ्गी । तें कार्य साधिल्या लागवेगीं । युद्धप्रसंगीं मिसळला ।।५४५।। अच्युतैश्वर्यसंपन्न । विशेष आपुला अर्थ-साधन । ऐशातें जाणोनि संक्रंदन । सिद्धार्थ होऊन पालटला ।। ४६ ।। आपुला साधल्यानंतर अर्थ । पार्यातकाचा धरूनि स्वार्थ । इंद्राणीचे भिडेनिमित्त । त्रैलोक्यनाथ विरोधिला ।। ४७ ।। विचार तरी केला काय । भौमापुढें इंद्र गाय । तो भौम जेणें मशकप्राय । वधूनि सुरसाह्य साधिलें ।। ४८ ।। तो कृष्ण आकळेल संग्रामीं । हें न जाणवे हृदयपद्मीं । महाक्रोधतमाची ऊर्मी । बळें संग्रामीं संघटले ।। ४९ ।। ऐसें सुरांचें मूर्खपण । धिग् धिग् महत्त्व थोरपण । धिग् धिग् ऐश्वर्यताअभिमान । धिक्कार पूर्ण धनाढ्यत्वा ।।५५०।। ऐसे धिक्कारूनि सुरगण । रायासि करूनि सावधान । म्हणे व्यासाचा नंदन । कृष्णकीर्तन अवधारीं ।। ५१ ।। कृष्णें सशत सहस्रें सोळा । भौमसंग्रहीता कन्यका सकळा । द्वारके नेऊनि पर्णिता झाला । विचित्र सोहळा तो ऐका ।। ५२ ।।

अहो मुहूर्त एकस्मिन्नानागारेषु ताः स्त्रियः । यथोपयेमे भगवांस्तावद्रूपधरोऽव्ययः ।। ४२ ।।

अहो म्हणिजे परमाश्चर्य । कुरुभूपाळा सांगिजे काय । एक्या मुहूर्तें वधूसमुदाय । कृष्णें पर्णिला पृथक्पृथक् ।। ५३ ।। यथाविधानें यथाविभवें । सर्वांप्रति सम गौरवें । न्यून पूर्ण कोण्हा नव्हे । न होतां ठावें परस्परें ।। ५४ ।। समस्तांचीं मातापितरें । त्यांचे आप्त स्वजन सोयरे । कृष्णें आणिले चमत्कारें । कीं तीं शरीरें स्वयें धरिलीं ।।५५५।। रत्नखचितें दिव्य भुवनें । तयां वोपिलीं वसतिस्थानें । पृथग्रूपें धरिलीं कृष्णें । त्यांसी सम्मानें भेटला ।। ५६ ।। तिहीं नेऊनि एकान्तासी । गुह्य वदती भगवंतेंसी । जे ते म्हणतीं मम कन्येसी । ज्येष्ठत्व दीजे पर्णूनी ।। ५७ ।। मी सर्वस्वें हीन

दीन । भाग्यें लाधलों भगवच्चरण । आधीं माझेंचि कन्यारत्न । वरूनि मान्य मज कीजे ॥ ५८ ॥ ऐकोनि हांसे चक्रपाणि । म्हणे एक मुहूर्ते सर्वां लग्नीं । तथापि तुमची आज्ञा मूर्ध्नि । मी वंदूनि वर्तेन ॥५९॥ पुढती श्वशुर विनति करिती । राम वसुदेव सह भूपति । सर्व यादव सहित युवती । मंडपा निगुती आणावे ॥ ५६० ॥ रेवती रुक्मिणी जाम्बवती । भामा कालिंदी नाग्नजिती । मित्रविंदा भद्रा सती । लक्ष्मणे सहित आणाव्या ॥ ६१ ॥ देवकी आदि वरमातरा । सुभद्राप्रमुखा करवल्या इतरा । गर्ग-प्रमुखां ऋषीश्वरां । आणूनि वरा मम कन्या ॥ ६२ ॥ प्रद्युम्न आणिजे रतिसहित । उपचारसामग्री-समवेत । नियोगीं स्थापूनि कथिजे कृत्य । मज सनाथ करूनियां ॥ ६३ ॥ ऐसेंच सर्वांही विनविलें । कृष्णें सर्वही मान्य केलें । त्याहूनि विशेष संपादिलें । तेंही कथिलें जातसे ॥ ६४ ॥ तिहीं कथिलीं तितुकीं रूपें । स्वयें नटोनि कंदर्पबापें । तितुकिये मंडपीं साक्षेपें । पाणिग्रहणीं सादर पैं ॥ ५६५ ॥ मंडप बहुळी शिल्पनवाई । करावया सर्वां ठायीं । तितुके विश्वकर्मे पाहीं । कृष्णें लवलाहीं निर्मिले ॥ ६६ ॥ रत्नखचितें सभास्थानें । विविध शाळा सह सोपानें । विचित्र रंगीं चित्रिलीं भुवनें । उडती जीवनें ऊर्ध्वगती ॥ ६७ ॥ कनकपुटांचीं चित्रासनें । रत्नखचितें दिव्यवितानें । गाद्या मृदोळिया वोटंगणें । विचित्र वसनें जवनिका ॥ ६८ ॥ विचित्र पाकशाळांच्या ठायीं । अन्नपूर्णा निर्मिल्या पाहीं । न्यून पूर्ण कोठें कांहीं । शेषशायी पडों नेदी ॥ ६९ ॥ वरुणें केली जलसमृद्धि । अन्नपूर्णेची पाकसिद्धि । उभयसुहृदीं यादवमांदी । सभास्थानीं विराजली ॥ ५७० ॥ रंभाप्रमुख नृत्याङ्गना । गंधर्व आलाप करिती नाना । नारद तुम्बुरु सामगाना । भावमूर्च्छना दाखविती ॥ ७१ ॥ ध्वजा छत्रें आतपत्रें । शंख दुंदुभि मंगळतुरें । रत्नदंडी दिव्य चामरें । सभास्थानीं ढळताती ॥ ७२ ॥ गणेशपूजनीं मंगळ-मूर्ति । प्रकट झाला वरदास्थिती । मातृकागृहगणांची पंक्ति । प्रकट घेती सपर्या ॥ ७३ ॥ पुण्याहवाचनीं महर्षि सकळ । स्वस्तिपुण्याह शुभमंगळ । आशीर्वाद ओपिती सफळ । नान्दीश्राद्ध सारूनी ॥ ७४ ॥ देवकप्रतिष्ठा उभय भागीं । सर्वां मंडपीं झाली वेगीं । जो तो मानी श्रीशार्ङ्गी । आम्हीं ये प्रसंगीं जोडिला ॥५७५॥ संपादूनि कुळधर्मासी । तेलहळदी दोहों पक्षीं । द्विजपूजनें भोजनासी । सारूनि घटिका प्रतिष्ठिली ॥ ७६ ॥ भास्करभट्ट समयकथनीं । ब्रह्म घटिका प्रतिष्ठी जीवनीं । काळंभट्ट अवलोकनीं । सावधानीं बैसला ॥ ७७ ॥ वधूसी समर्पिलें फळ । सर्वेंचि वरासी आलें मूळ । नगरीं मिरवूनि गोपाळ । नेला तत्काळ मंडपा ॥ ७८ ॥ मुहूर्तमात्र लग्नावकाश । यालागीं मिरवणुकेचा विशेष । न वाढवूनियां हृषीकेश । मंडपास त्वरें आले ॥ ७९ ॥ वधूबापें वरपूजन । मधुपर्केसीं केलें जाण । तैसेंचि वसुदेवें आपण । केलें पूजन वधूचें ॥ ५८० ॥ तंव भास्करभट्टें सावधान । म्हणोनि सूचिलें घटिकामान । ब्रह्मदेवें विधिविधान । सारूनि जवनिक धरियेलें ॥ ८१ ॥ नोवरा उभा पूर्वाभिमुख । नोवरी नोवरियासम्मुख । मध्यें भेदाचें जवनिक । धरूनि म्हणती सावधान ॥ ८२ ॥ अष्टेक्षण स्पष्टगिरा । निगमचतुष्टय कृतो-च्चारा । मंगळाष्टकीं वधूवरां । आशीर्वाद अभीष्ट दे ॥ ८३ ॥ प्रत्यगात्मत्वें नोवरी पाहे । वरा पूर्णत्वें हृदयीं ध्याये । ओंपुण्यकाळाचा लक्षिती समय । शबळीं शुद्धत्व निवडूनी ॥ ८४ ॥ संश्लिष्टतादि भूमिका चारी । करवल्या अक्षता टाकिती शिरीं । काळंभट्ट सावध करी । अतिसमय वर्तत ह्मणोनियां ॥ ८५ ॥

अतिसमयीं करावें काय । तरी लक्ष्मीनारायणचिंतनोपाय । अंतीं मति ते गति होय । यालागीं सोय हे धरावी ॥ ८६ ॥ बहुविध शास्त्रांचा लौकिक । गलबला सांडूनि हा निष्टंक । कुळ संकेतें अन्वयात्मक । स्वामी व्यतिरेकें चिंतावा ॥ ८७ ॥ अन्वयें जाणोनि आपुलें कुळ । कुळस्वामी जो कुळाचें मूळ । तो चिन्मात्र चिंतिजे अमळ । सावध निश्चळ निःशब्द ॥ ८८ ॥ ओंपुण्यकाळाचिया गजरा । लक्षूनि सूचना वाजान्तरां । सुटतां साक्षित्व जवनिकपदरा । दशविध तुरा उत्साह ॥ ८९ ॥ ऐसें करितां सावधान । सरलें समयाचें व्यवधान । ओंपुण्यकाळीं लागलें लग्न । प्रत्यक्प्रवण अभेदें ॥५९०॥ त्वंतत्पदांची निरासता । असिपदीं आत्मैक्यता । लग्न लागतांचि तत्त्वता । विपरीतावस्था पारुषली ॥ ९१ ॥ नोवरा बैसला पूर्वाभिमुख । नोवरी झाली प्रत्यग्मुख । कंकण बांधूनि पृथक् पृथक् । एकात्मसुख परस्परें ॥ ९२ ॥ असो हे अध्यात्मपरिभाषा । सामान्य श्रोतयांच्या मानसा । बोध न होतां मानिती विरसा । यालागीं परिसा सरळार्थ ॥ ९३ ॥ गर्गाचार्य याज्ञिक सारी । कुबेर ब्राह्मणां वांटी भूरी । चंद्रमा ताम्बूल अर्पी करीं । अश्विनीकुमारीं सौरभ्य ॥ ९४ ॥ इंद्र अर्पी सुमनमाळा । सभानायकां लोकां सकळां । कृष्णविवाहसुखसोहळा । पाहोनि डोळां त्रिजग निवे ॥ ५९५ ॥ निशाणें लागल्या दुंदुभि । सुरांचे जयजयकार नभीं । पुष्पवृष्टीचा सुसेव्य सुरभि । प्रसरे ककुभीं न समात ॥९६॥ गौरीहरां पूजावया । आम्रवृक्ष सिंपावया । नोवरी कडिये घेवोनियां । यादवराया चला ह्मणती ॥ ९७ ॥ वृद्धाचारा देऊनि मान । नोवरी घेऊनि जनार्दन । पूजावया गौरीरमण । आला वचन नुलंघितां ॥ ९८ ॥ कृष्ण वंदूनि गौरीरमण । म्हणे माझे हृदयीं तुझें ध्यान । तुझे हृदयीं आमुचें स्थान । प्रेमपूजन परस्परें ॥ ९९ ॥ वधूचीं जियें मातापितरें । प्रेमें निर्भर परस्परें । देखोनि संतुष्ट वधूवरें । म्हणती श्रीधरें सुख दिधलें ॥६००॥ सोळा सहस्र वडीलपणा । कन्येसीं देऊनि यादवराणा । मान दिधला आमुच्या वचना । संतुष्ट मनामाजिवडी ॥ १ ॥ यानंतरें वधूचा तात । समस्त यादवां विनवी विदित । माझा मंडप शोभिवंत । चारी दिवस करावा ॥२॥ माझिये मंडपीं तुमचें शेष । मजला देऊनि कीजे तोष । आज्ञा प्रमाण हृषीकेश । म्हणोनि वचनास मान्य करी ॥ ३ ॥ पुढती म्हणे जी दातारा । आपुलिया सुहृदां आप्तां समग्रां । अक्षत देऊनि परमादरा । करूनि पाचारा पंक्तीसी ॥ ४ ॥ ऐकोनि तोषला जनार्दन । उद्धव अक्रूर पाचारून । म्हणे मम श्वशुरासवें जाऊन । अक्षत देऊन येइजे ॥ ६०५ ॥ मंगळतुरांचिया गजरीं । प्रथम सोळा सहस्रां घरीं । नूतन सुहृदां सांगोनि त्वरीं । द्वारकापुरीं मग सांगों ॥ ६ ॥ म्हणोनि जातां मंदिरा एका । तंव द्वारीं बळरामा सात्त्विका । सहित देखिलें वधूजनका । एकमेकां निमंत्रिती ॥ ७ ॥ तेणें नेतां मंडपान्तरीं । तेथेंही श्रीकृष्ण आणि नोवरी । ओहर देखूनि बोहल्यावरी । झाला अंतरीं विस्मित तो ॥ ८ ॥ उग्रसेनेसीं यादवसभा । इंद्रादि सुरवरसमूह उभा । सर्व सामग्री मंडपशोभा । स्वमंडपींची अवगमिली ॥ ९ ॥ परंतु वधू आणि वधूचीं पितरें । तत्पक्षींचीं सुहृदें इतरें । पृथक् पृथक् इतुकींचि मात्रें । येरें समग्र पूर्ववत् ॥ ६१० ॥ ऐसीच सोळा सहस्र सदनीं । अक्षत परस्परें सर्वां जनीं । नेतां वधूवरां देखोनी । आश्चर्य मनीं न समाये ॥ ११ ॥ म्हणती आमुचे मंडपीं हरि । आमुची तनया वरूनि गजरीं । ओहर उपविष्ट बोहल्यावरी । येथ मुरारि कैं आला ॥ १२ ॥ तंव तेथिंचा वधूबाप

येवूनि पुढां । म्हणे क्षणैक बैसोनि घ्या जी विडा । आम्ही तुमचिया बिऱ्हाडा । अक्षत घेवोनि येतसों ॥१३॥ उग्रसेनादि अभ्युत्थानें । देऊनि बैसविती सम्मानें । परिमळद्रव्यें माळा सुमनें । अहेर वसनें समर्पिती ॥ १४ ॥ उद्धव अक्रूर सवें होते । ते उपचार अर्पितां देखोनि तेथें । परमाश्चर्यें म्हणती त्यांतें । येथें तेथें केंवि तुम्ही ॥ ६१५ ॥ मंडपगर्भीं जंव पाहती । तंव यादवेंसीं आहुकनृपति । देवकीप्रमुखा सर्व युवति । सुरमुनिपंक्ति नटनाट्यें ॥ १६ ॥ देखोनि मानिती आपुले मनीं । कृष्ण आमुचे मंडपींहूनी । पर्णावया हे नृपनंदिनी । आला घेवोनि सर्वांतें ॥ १७ ॥ प्रथम पाळिलें आमुचें वचन । कन्या पर्णूनि केलें धन्य । आतां यांचे भिडे करून । सर्वां घेऊन हरि आला ॥ १८ ॥ यादवेंसीं आलिया हरि । मागें मंडपामाझारी । कोणी नसेल हो झडकरी । आज्ञा घेऊनि जाइजे ॥ १९ ॥ मग आज्ञा घेवोनि उठिले । सवेग निज मंडपा आले । तंव यथापूर्व देखते झाले । सभा वोहरें सुरमुनिही ॥ ६२० ॥ तेणें झाले सविस्मय । म्हणती केवढें परमाश्चर्य । सर्वांठायीं देवकीतनय । सभासमुदायसमवेत ॥ २१ ॥ जेथवरी आपुली धांव पुरे । तितुकीं फिरोनि पाहती घरें । सर्व समृद्धि सभा ओहरें । देखोनि मुरे मन बुद्धि ॥ २२ ॥ अनेक दर्पणीं एकचि बिंब । एक जीवन अनेक थेंब । एक द्रुमबीज अनेक कोंभ । सर्वग स्वयंभ हरि तैसा ॥ २३ ॥ मुळीं शुकाचा गूढार्थ । तो उपलविला अल्पसा येथ । सविस्तर कथावया असमर्थ । भारतीनाथ चहुं वदनीं ॥ २४ ॥ तावत् म्हणिजे तितुकीं रूपें । धरूनि यथावत् विधीच्या बापें । अव्यय म्हणिजे सत्यसंकल्पें । वेंच न होतां कल्पिलीं ॥ ६२५ ॥ चैतन्य समान सर्वां ठायीं । तोंवि न्यून पूर्ण कोठें नाहीं । भगवत्पदें हें सामर्थ्य पाहीं । ऐश्वर्यनवाई प्रकाशी ॥ २६ ॥ यथावत्पदें वृद्धाचार । जरी वर्णावा सूत्रानुसार । तरी प्रभु एकनाथ तो विस्तार । अध्यात्मप्रचुर बोलिले ॥ २७ ॥ रुक्मिणीस्वयंवरा-माझारी । वदली स्वामींची वैखरी । तेचि पुढती वदतां चतुरीं । काय म्हणिजेल तें विवरा ॥ २८ ॥ बेगड सोन्याहूनि पिंवळी । आंबिल अमृताहूनि आगळी । तैसी हे वक्तृत्वनव्हाळी । स्वामिकाव्यसम गमिजे ॥ २९ ॥ जवा आगळीक काशी ऐसें । सर्व तीर्थां म्हणिजेत असें । परी जवा आगळें माहोर ऐसें । वाराणसीतें न म्हणती ॥ ६३० ॥ वेदा न म्हणिजे कवित्व । विवर्त नोहे मुख्य तत्त्व । कर्मबद्ध अपर जीव । वासुदेवासम न कीजे ॥ ३१ ॥ तोंवि प्रभूचिया व्याख्याना । सम न कराव्या कविता आना । विप्रवेशें द्वारकाराणा । वाहे जीवना ज्या सदनीं ॥३२॥ तया प्रभूचिया कृपावरदें । वाखाणिलीं मुळींचीं पदें । एक मुहूर्तें विवाहसमुदें । केलीं मुकुन्दें तीं कथिलीं ॥ ३३ ॥ एवं सर्वत्र समसमान । चारी दिवस लग्नविधान । ऐरणीपूजन वंशपात्रदान । साडे वाहून गृहभरणी ॥ ३४ ॥ सर्वां एकचि गृहप्रवेश । करूनि लक्ष्मीपूजनास । रुक्मिणीप्रमुख भाणवस । अष्ट वरिष्ठा निरोविती ॥ ६३५ ॥ ऐसा षोडश दिन सोहळा । शतोत्तर षोडश सहस्र अबळा । पर्णूनियां घनसांवळा । गृहस्थ झाला कुरुवर्या ॥ ३६ ॥ बहुत वनिता ये अवतारीं । किमर्थ पर्णी कैटभारि । राया ऐसी शंका न करीं । रहस्य अवधारीं यदर्थीं ॥ ३७ ॥ आब्रह्मकल्पापासून कल्प । निष्कळ गाळीव कल्मषपंक । तयाचा निर्मिला कळिकाळपुरुष । जो निःशेष दोषात्मा ॥ ३८ ॥ जन्मलिया बाळकासी । अवयव मात्र असती त्यासी । प्रकट होती प्रौढ वयसीं । हेही तैसी गोष्टी असे ॥ ३९ ॥ ब्रह्मवयसा चढोवढी । चढती युगांच्या परवडी । तैसीं तैसीं दुष्कृतें

गाढीं । कळिकाळप्रौढी पावतसे ॥ ६४० ॥ पन्नास वरुषें ब्रह्मयाचीं । पूर्वपरार्धीं संपलीं साचीं । तैसीच प्रौढता कळिकाळाची । वृद्धि दोषांची जुनावली ॥ ४१ ॥ जंव जंव विषाचा वाढे तरु । तितुकी मारकता होय निबर । कीं दिवसेंदिवस अभ्यासपर । विद्या कुविद्या वाढतसे ॥ ४२ ॥ तेंवि वर्तमान ब्रह्मयास । द्वितीय परार्ध पूर्व दिवस । युगचौकडिया अठ्ठावीस । कळिकाळास प्रौढत्व ॥ ४३ ॥ ऐसा प्रौढ कळिमळाब्धि । प्राणी तरती कवणे विधी । स्वहितविषयीं नुदैजे बुद्धि । विषयोन्मादीं निमज्जती ॥४४॥ नटापरी साधनाभास । श्रौतस्मार्तव्रतसंन्यास । वर्णाश्रमधर्म पडिले ओस । वेदशास्त्रांस कोण पुसे ॥६४५॥ शिस्नोदरपरायण । संप्रदाय कौळाचरण । जारणमारण वशीकरण । बोधप्रवीण गुरुवर्य ॥ ४६ ॥ धर्मपत्नीचा करूनि त्याग । दंड कमंडलु संन्यासमार्ग । अनलकांचा करिती संग । आश्रमसोंगविडंबना ॥४७॥ धनधान्याच्या संग्रहार्थ । उपार्जिती धनिक गृहस्थ । जार चौर्य मद्यद्यूत । घातपातपरायण ॥४८॥ वेदान्तवक्ते ब्रह्मनिष्ठ । विषयप्राप्ति मानिती उत्कृष्ट । ज्ञान बोधूनि भरिती पोट । म्हणती भ्रष्ट विरागिया ॥ ४९ ॥ आधींच अज्ञानें आंधळीं । वरी ज्ञात्यांची ऐसी चाली । कलिमलसमुद्रामाजी पडलीं । कोणा काढिलीं न वचती ॥ ६५० ॥ विषयावांचून न रुचे कांहीं । पश्वादिकां समान पाहीं । विषयाभिलाष सर्वां देहीं । बाह्य सर्वेही श्रुतिमार्ग ॥ ५१ ॥ वामी कामीं लावूनि ध्वजा । गुरुत्वें बोधिती कौलपूजा । यथा राजा तथा प्रजा । कोणा लज्जा कोणाची ॥ ५२ ॥ पाखंडियांचे शिष्टाचार । साबरागमींचे चमत्कार । हेतुवादी वक्ते चतुर । जार चोर प्रतिष्ठित ॥ ५३ ॥ ऐशिया पापाब्धि-माझारीं । नौका जर्जर झालिया चारी । त्यांचीं नांवें तूं अवधारीं । कुरुधरित्रीवल्लभा ॥ ५४ ॥ कर्म उपासना ज्ञानयोग । हे तरणोपायनौका साङ्ग । कलियुगीं यांचा झाला भंग । तोही प्रसंग अवधारीं ॥ ६५५ ॥ अनाचारें बुडालें कर्म । देश काळ पात्र विषम । मंत्र तंत्र द्रव्य अधम । कर्ता सकाम विषयार्थी ॥ ५६ ॥ भक्तीवांचूनि उपासना । देहलोभें भंगिली जाणा । गुरुवेदान्तशास्त्रवचना । विश्वासेना कोणीही ॥ ५७ ॥ विरागेंवीण भंगलें ज्ञान । ज्ञात्यासि न सुटे विषयाचरण । म्हणती आत्मा निर्लेप पूर्ण । यथेष्टाचरण प्रबोधिती ॥५८॥ निरुपद्रवी न मिळे स्थळ । योगारूढ गुरु प्राञ्जळ । प्रवृत्तिदमनीं नोहे बळ । मानस चंचळ अनावर ॥ ५९ ॥ गोगण नोहे प्रत्यक्प्रवण । अन्नाविणें व्याकुळ प्राण । सहसा न सुटे विषयाचरण । कैंवि पवन निरोधवे ॥ ६६० ॥ एवं नावा न चलती चारी । कळिकाळ-पापाब्धिमाझारी । प्राणी बुडतां कवण तारी । म्हणोनि श्रीहरि कळवळिला ॥ ६१ ॥ एक तरणोपाय दृढ । नाममात्रें तरती मूढ । ज्ञानविहीन केवळ जड । जैसे दगड सेतुपथीं ॥ ६२ ॥ परंतु नाम न घेती कोणी । यालागीं स्वयें चक्रपाणि । प्रवृत्ति दावी विषयाचरणीं । अवतरोनि यदुवंशीं ॥ ६३ ॥ साधक बाधक संसाररीति । कर्मप्रवृत्तिनिवृत्ति । गुणानुरूप रोचक मति । दावी श्रीपति वर्तोनी ॥ ६४ ॥ मुचुकुंदासी केला बोध । समरीं भंगिला जरासंध । रुक्मिणी वरिली भावनाशुद्ध । रुक्मि विरुद्ध विडंबिला ॥ ६६५ ॥ असो ऐसी वर्तमानीं । गुणानुसार दाविली करणी । भावी कामुक विषयी प्राणी । ह्यांलागोनि तरावया ॥ ६६ ॥ गीत संगीत कामशास्त्र । जें कां श्रृंगाररसप्रचुर । संपादूनि त्रिविध कलत्र । क्रीडला विचित्र यदुवर्य ॥ ६७ ॥ त्रिविध कैशा म्हणाल दारा । त्याही सांगिजती

अवधारा । एकी स्वकीया दुसरी परा । तिसरी वेश्या अभिसारिका ॥ ६८ ॥ परकीयेची रसोत्पत्ति । कामशास्त्रीं विशेष वदती । यालागीं भोगोनि बल्लवयुवति । कामुकां प्रवृत्ति हरि दावी ॥ ६९ ॥ अभिसारिकेची निर्भय रति । क्षणभंगुर प्रेमोत्पत्ति । कुब्जा भोगूनि ते प्रवृत्ति । दावी श्रीपति कामुकां ॥ ६७० ॥ स्वकीयांचा रतिविलास । ललना पर्णूनियां बहुवस । गृहमेधियांसम विन्यास । हृषीकेश स्वयें दावी ॥ ७१ ॥ त्रिविधहरिक्रीडाचिंतनें । कामुकां लागती तीव्र ध्यानें । श्रवणें पठनें स्मरणें मननें । लीलाकथनें भव तरती ॥ ७२ ॥ वस्तुसामर्थ्यमहिमा ऐसा । लोह पालटे स्पर्शतां स्पर्शा । तसे हरिगुण क्षालिती दोषा । गातां सदोषा हरिलीला ॥ ७३ ॥ परकीया आणि अभिसारिका । पूर्वार्धीं कथिल्या कुरुनायका । स्वकीया पर्णूनि गृहकौतुका । दावी कामुकां जगदात्मा ॥ ७४ ॥ विषयी कामुक तारावया । पूर्णकामेंही कामचर्या । यथेष्टाचरणादि त्रिविध राया । केली स्वमाया-लाघवें ॥ ६७५ ॥ तें कृष्णाचें गृहस्थपण । विषयविलास स्वधर्माचरण । येथूनि कथिजेल वक्ष्यमाण । तें कीजे श्रवण सत्पुरुषीं ॥ ७६ ॥

> गृहेषु तासामनपाय्यतर्क्यकृन्निरस्तसाम्यातिशयेष्ववस्थितः ।
> रेमे रमाभिर्निजकामसंप्लुतो यथेतरो गार्हकमेधिकाश्चरन् ॥ ४४ ॥

शतोत्तर षोडश सहस्रां गृहीं । न्यूनाधिक कोठें नाहीं । सर्वां समान शेषशायी । अतर्क्य नवाई दाखवी ॥ ७७ ॥ जें ऐश्वर्य नेणे विधि । विश्वकर्मा न सृजी कधीं । ऐशिया अनेक भोगसमृद्धि । स्वयें उपपादी अतर्क्य ॥ ७८ ॥ जे ते मानी आपणावरी । परम प्रीति श्रीकृष्ण करी । मजवेगळा न वचे दुरी । कदा श्रीहरि आणकी पैं ॥ ७९ ॥ अष्टनायिकाकेलिविहारी । सप्रेम सोळा सहस्रां घरीं । एके रमेसींच क्रीडे हरि । निर्विकारी आत्मरत ॥ ६८० ॥ अनेक शुद्धोपाधिवशें । अनेक आत्म-प्रतिभाभासें । तेथ रमिजे स्वात्मविलासें । जेंवि पुरुषें अद्वैतें ॥ ८१ ॥ तेही आत्मभा रमादेवी । साष्ट शत षोडश सहस्रां नांवीं । एक रुक्मिणीच जाणावी । अंश भावी पृथक्त्वें ॥ ८२ ॥ स्वानंद-परिपूर्ण जो कां हरि । आत्मप्रभेसीं क्रीडा करी । एकानेक पृथगाकारीं । भेदकुसरी रुचवूनी ॥ ८३ ॥ मिथ्याविषयाभासीं रमती । त्यासीं अपाय काळवृत्ति । तैसी नव्हे पैं आत्मरति । स्वानंदपूर्ति अजस्र ॥ ८४ ॥ एन्हवीं गृहमेधियां परी । गृहस्थधर्म आचरे हरि । युवायुवतिविलासकुसरी । स्मरविकारीं अनुकरणें ॥ ६८५ ॥ तियें अनुकरणें यथाविधि । परीक्षितीतें शुक प्रबोधी । श्रोतीं परिसावीं कुशलबुद्धी । श्लोक प्रतिपादी व्याख्यानीं ॥ ८६ ॥

> इत्थं रमापतिमवाप्य पतिं स्त्रियस्ता ब्रह्मादयोऽपि न विदुः पदवीं यदीयाम् ।
> भेजुर्मुदाऽविरतमेधितयाऽनुरागहासावलोकनवसंगमजल्पलज्जाः ॥ ४५ ॥

इत्थं पूर्वोक्त स्त्रिया समस्ती । रमारमण जो कमलापति । पावोनि सप्रेमें दंपती- । भावें वर्तती अनुरागें ॥ ८७ ॥ ज्याची पदवी ब्रह्मादि हर । जाणों न शकती सविस्तर । ऐशियातें वनितानिकर ।

स्मरविकार अनुभविती ॥ ८८ ॥ मुदा म्हणिजे हर्षोत्कर्षें । सानुरागावलोकहासें । प्रथमनवसंगावेशें । सलज्ज भजती वाग्जल्पें ॥ ८९ ॥ कटाक्षबाणें विंधिती कृष्णा । स्निग्ध सस्मित मुरडिती वदना । नवसंगमीं वदती वचना । संकेतसूचना नर्मोक्ति ॥६९०॥ वेणिकाकर्षण वाममुष्टी । अपरें धरूनियां हनुवटी । चुंबन देतां दशन ओष्ठीं । स्मरसंतुष्टी रोविती ॥ ९१ ॥ मन्मथकदनीं धरितां कुच । तन्वंगिया तनुसंकोच । करूनि वदती उच्चावच । जीं अवाच्यें स्मरगुह्यें ॥ ९२ ॥ इत्यादिप्रकारीं समस्त वनिता । जिया रमेच्या अंशभूता । लाहोनि रमारमण भर्ता । झाल्या भजत्या भगवंतीं ॥ ९३ ॥ ललितलाघवलालनीं ललना । स्मरसंगमीं ललितां यूनां । मग ते चढे गर्वाभिमाना । गुणलावण्या वर मानी ॥ ९४ ॥ तेणें मदगर्वें अपाय । उभयप्रेमामाजी होय । तैसा नोहे वधूसमुदाय । जिहीं यदुराय वर वरिला ॥ ६९५ ॥ स्मरविकारभरें रमण । झाला गमतांही स्वाधीन । तरी अगर्व दास्याचरण । ज्या संपूर्ण न सांडिती ॥ ९६ ॥ सर्व समृद्धि असतां घरीं । परंतु निजाङ्गें सेवाधिकारी । नियमें भजती सर्वोपचारीं । तें अवधारीं कुरुवर्या ॥ ९७ ॥

प्रत्युद्गमासनवरार्हणपादशौचतांबूलविश्रमणवीजनगंधमाल्यैः ।
केशप्रसारशयनस्नपनोपहार्यैर्दासीशता अपि विभोर्विदधुः स्म दास्यम् ॥ ४६ ॥

सदनीं शतानुशत दासी । कुशल चतुरा गुणैकराशि । असतां निजाङ्गें सेवेसी । करिती दिननिशीं हरिरमणी ॥ ९८ ॥ स्वकान्त देखोनियां सम्मुख । उठोनि ठाती चरणोन्मुख । होऊनि तिरोहित सम्यक । दास्य अचुक आचरती ॥ ९९ ॥ दिव्यासनरचनाविधि । वोळंगे सादर कुशल बुद्धि । वरिष्ठ साळंकार-समृद्धि । चित्रप्रभेदीं लेवविती ॥ ७०० ॥ पादशौचाच्या आचरणीं । मंचकीं उपविष्ट चक्रपाणि । कनककलशीं उष्ण पाणी । कनकभाजनीं पादार्चा ॥ १ ॥ रत्नखचित प्रवाळवज्रीं । पदतळ क्षाळिती कंकण-गजरीं । सविलास स्मेरापाङ्गें शौरि । निरखी साजिरी सर्व तनु ॥२॥ चंचळ कचकुचश्रवणाभरणें । नितंब-गुच्छ कंठभूषणें । क्वणितकिंकिणीकरकंकणें । पाहे नयनें नलिनाक्ष ॥ ३ ॥ नर्मोत्तरीं मानस मोही । लीले-करूनि स्पर्शे देहीं । तत्स्पर्शाची सुखनवाई । अमोघ सुकृतें अनुभविती ॥ ४ ॥ अभ्यंगपरिचर्येच्या काजा । करूनि रत्नपीठीं गरुडध्वजा । बैसवूनियां बरवे ओजा । मुक्त मूर्धजां उकलिती ॥७०५॥ कनकपात्रीं सुगंध तैला । दासी माखिती भगवत्कुरळां । वनिताहस्तें निषेध केला । म्हणोनि जवळी तिष्ठती त्या ॥६॥ सुगंधद्रव्यीं उद्वर्तना । कृष्णशरीरीं उटिती ललना । प्रमुदितहृदयें पाहती वदना । सलज्जनयना स्मितवक्त्रीं ॥ ७ ॥ त्वाष्ट्र सुघटित मांडूनि चौकी । कृष्ण बैसवोनि उष्णोदकीं । भोंवतीं ओळंगती सेवकी । वनिताहस्तकीं जळकलशी ॥ ८ ॥ करकौशल्यें क्षाळिती केश । केशप्रसाधनपट्टिकेस । घेऊनि विंचरती विशेष । स्निग्धता अशेष क्षाळूनी ॥ ९ ॥ भुज पद पृष्ठ मर्दिती करीं । उद्वर्तनांश संलग्न जठरीं । तोही क्षाळूनि अभिषेक शिरीं । करिती सुंदरी उष्णजळें ॥ ७१० ॥ पंचप्रकारीं नीराजनें । जळ फळ सुमनें रत्नें अन्नें । तदुपरि अंगपरिमार्जनें । सूक्ष्मवसनें वधू करिती ॥ ११ ॥ रत्नपादुका अर्पिती चरणीं । देती पीताम्बर परिधानीं । आर्द्रवस्त्रा निष्पीडनीं । उत्तरीय देऊनि प्रवर्तती ॥ १२ ॥ दिव्यासनीं

बैसवून । केशर कस्तूरी हरिचंदन । तिलकधारण विलेपन । करिती चर्चन सर्वाङ्गीं ॥ १३ ॥ संध्यावंदना शुद्धोदक । आचमनार्थ पृथक् पृथक । कनककलशीं देती सम्यक । भूषणें अनेक लेवविती ॥ १४ ॥ रत्नखचितें कुंडलें श्रवणीं । मुक्तमाळिका कौस्तुभमणि । वैजयंती कंठाभरणीं । बाहुभूषणें मुद्रिका ॥ ७१५ ॥ करकंकणें कटिमेखळा । पदभूषणें चरणयुगळा । सुमनहार पंकजमाळा । कुसुमें कुरळां ग्रथिताती ॥ १६ ॥ धूपदीपार्पणोत्तर । विविध नैवेद्य अमृतोपहार । मध्य पानीय सुतप्त नीर । आंचवणार्थ समर्पिती ॥ १७ ॥ गंडूषपात्र मांडूनि तळीं । धारा वोतिती हरिकरतळीं । वदन कर पद क्षाळूनि चैलीं । परिमार्जिती सुधौत ॥ १८ ॥ रुचिरें रोचक पाचक फळें । मधुरें सुपक्वें रसाळें । अर्पूनियां त्रयोदशमेळें । ताम्बूलविडियां समर्पिती ॥ १९ ॥ काया वाचा तनु मन धन । करूनि सर्वस्वें अर्पण । करीं घेवोनि नलदव्यजन । करिती विश्रमण मंदतर ॥ ७२० ॥ त्यानंतरें मंचकयानीं । राजोपचार समर्पूनी । सुगंधचूर्णाच्या उधळणीं । मुकुटीं खोविती अवतंस ॥ २१ ॥ दिव्य दर्पण देऊनि करीं । ललामदंडी द्वय चामरीं । क्वणितकंकणा ढाळिती नारी । अपरा सुचिरीं करतरळा ॥ २२ ॥ नाना कौतुकें रसिकानंद । काव्यकौशल्यें छंदप्रबंध । गीत नृत्य हास्य विनोद । स्तवनीं गोविंद रंजविती ॥ २३ ॥ मुरजप्रमुख वाद्यकुसरी । अक्षक्रीडा नानापरि । इतिहासादि कीर्तनगजरीं । वल्लभा चतुरी रंजविती ॥ २४ ॥ सदनीं शतानुशत दासी । सुंदरा चतुरा गुणैकराशि । असतां स्वामीचे सेवेसीं । निजाङ्गेंसीं अनुरक्ता ॥ ७२५ ॥ साष्ट शतें सहस्रें सोळा । समान ओळंगती घननीळा । त्यांमाजी कोणीचा कळवळा । न्यून आगळा जरी पुससी ॥ २६ ॥ तरी ते एकाचि कमळादेवी । अनेकरूपें रतिगौरवीं । नटोनि स्वनाथमनोरथभावीं । विविधा दावी रसचर्या ॥ २७ ॥ जैसा गान्धर्वनिगमवेत्ता । विपंची सज्जी आपुल्या चित्ता । जेंवि ते तैसीच स्वरसंमता । होय तद्गीता अनुसरती ॥ २८ ॥ तेंवि कृष्णाच्या अंतर्भावीं । अष्टनायिका रसगौरवीं । बहुधा नटोनि कमलादेवी । दावी आघवीं अनुकरणें ॥ २९ ॥ सूत्रधाराच्या करचाळणें । सायखाडियांच्या पुतळ्या चळणें । तेंवि नटती नायिका गुणें । हरीच्छेनें हरिरमणी ॥ ७३० ॥ असो ऐसे कळिकाळीन । विषयसागरीं नर निमग्न । तत्कारुण्यें कळवळून । विषयाचरण हरि प्रकटी ॥ ३१ ॥ तया कथांचिया श्रवणीं । बैसतां प्रेमा अंतःकरणीं । प्रकटे तैं तो भवनिस्तरणीं । सुदृढतरणीमय होय ॥ ३२ ॥ ऐसें जाणोनि साधकवर्गीं । भजिजे हरिगुणनौकामार्गीं । श्रवणें मननें निजान्तरंगीं । रमतां भंगी कलिमलता ॥ ३३ ॥ कुरुनरपाळा इतुकी कथा । वैय्यासाकि झाला कथिता । वक्ष्यमाणीं हरीच्या चित्ता । सम अनुकरता वाखाणी ॥ ३४ ॥ सर्वां वरिष्ठ मुख्य राणी । मनोऽनुकूळा वरवर्णिनी । कृष्णाप्रियतमा जे रुक्मिणी । स्तोभीं प्रेरणीं हरीच्छा ॥ ७३५ ॥ तिये व्याख्यानीं चिद्रसपाना । श्रोतीं सावध बैसिजे श्रवणा । दयार्णवाची विज्ञापना । इतुकी सज्जना सलगीची ॥ ३६ ॥ इतुकें श्रीमद्भागवतीं । दशमस्कंधीं श्रीशुक कथी । तें परिसोनि परीक्षिति । श्रवणीं प्रीति वाड करी ॥ ३७ ॥ विषयाचरण श्रीकृष्णाचें । परि हें रहस्य उपनिषदांचें । संहितारूप गुह्य साचें । परमहंसाचें शुक आशंसी ॥ ३८ ॥ दशमींचा हा एकोनषष्टि । श्रवणें मननें विवेकदृष्टि । श्रोतयां कैवल्यरसाची वृष्टि । प्रेम संतुष्टीमाजि करी ॥ ३९ ॥ श्रीएकनाथ कल्पतरु । चिदानंद सुमनभारु ।

स्वानंदाचा फळविस्तारु । गोविंदरसें सुरसाळ ॥ ७४० ॥ तद्रस रसाळ पूर्णानुभव । बोधें भरला दयार्णव । श्रवणें पर्वीं पुण्यवैभव । श्रोते सदैव लाहती ॥ ४१ ॥ । इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां भौमासुरवधपार्यातहरणसुरमदक्षालनसशतषोडशसहस्रनृपकन्यापाणिग्रहणं नामैकोनषष्टितमोऽध्यायः ॥ ५९ ॥

श्लोक ४६ ॥ ओवी-संख्या ७४१ ॥ एवं संख्या ७८७ ॥
( अठ्ठावन्नावा अध्याय मिळून ओवीसंख्या २८६३९ )

**अध्याय एकोणसाठावा समाप्त**

कृष्णदयार्णवकृत

# ह रि व र दा

## अध्याय ६० वा

श्रीकृष्णपरमात्मने नमः । भवगजहंता पंचानन । पंचप्रलयहुताशन । पंच प्रणवां अधिष्ठान । गोगोपन गोविंद ॥ १ ॥ नमूनि तत्पदपंकज भावें । आज्ञावरदें दयार्णवें । षष्टितमाध्यायीं देवें । चरित केलें तें कथावया ॥ २ ॥ श्रोतयां मागोनि अवधान । करूनि मुमुक्षु सावधान । रुक्मिणीप्रेमकलहाख्यान । भाषाव्याख्यान आदरिलें ॥३॥ षष्टितमाध्यायीं कथा । पट्टमहिषी विदर्भसुता । तिये रुक्मिणीचिये चित्ता । क्षोभवी भर्ता उपहासें ॥ ४ ॥ विषम मानूनि स्वपादनिरता । झाली देखोनियां मूर्च्छिता । सान्तवूनि पुढती सुरता । सज्ज केली तें ऐका ॥ ५ ॥ किमर्थ क्षोभवी रुक्मिणीचित्ता । हाही भावार्थ ऐका पुरता । कलिकालीनां विषयग्रस्तां । कीर्तनपंथा लावावया ॥ ६ ॥ ललनाविलासपरायण । नरनिकर जो कलिकालीन । त्यासी तरणोपाय कीर्तन । तदर्थ विडंबन स्त्रैणाचें ॥ ७ ॥ स्वऐश्वर्यें आनंदजनक । स्त्रैणलीलारसकौतुक । रुक्मिणीप्रेमें कलहमिष । कलिमलपंकानिस्तरणा ॥ ८ ॥ तिये कथेचिये श्रवणीं । परीक्षितीतें बादरायणि । हरिगुणसुधारसभोजनीं । सावध करूनि बैसवी ॥ ९ ॥

श्रीशुक उवाच—कर्हिचित्सुखमासीनं स्वतल्पस्थं जगद्गुरुम् । पतिं पर्यचरद्भैष्मी व्यजनेन सखीजनैः ॥ १ ॥

राया कुरुकुळप्रवरमाळा-। मंडनमेरो गुणगणशीळा । मौळावतंस भूभुजपाळा । प्रतापतेजें भासुर तूं ॥ १० ॥ भूतभविष्यवर्तमानीं । सुशीळ धार्मिक नृपांच्या श्रेणी । त्यां शोभविसी हरिगुणश्रवणीं । जैसा तरणि तामरसां ॥ ११ ॥ राया कोणे एके समयीं । निजमंचकीं शेषशायी । उपविष्ट असतां सेवाविषयीं । तनुमनें तन्मय तन्वंगी ॥ १२ ॥ भीष्मकरायाची नंदिनी । हरिपदनिरता अनन्यपणीं ।

त्रैलोक्यजनक चक्रपाणि । स्वकान्त लक्ष्मीनि सेवीतसे ॥ १३ ॥ शतानुशता सद्गुणराशि । सेवनीं सादर असतां दासी । तथापि रुक्मिणी उपचारेंसीं । सखीजनेंसीं ओळंगे ॥ १४ ॥ व्यजनहस्तें वीजी मंद । व्यंकटापाङ्गें श्रीमुकुन्द । पाहोनि मानी परमानंद । हृदयपद्मीं पद्माक्षी ॥१५॥ जगद्गुरु जो चक्रपाणि । म्हणाल किमर्थ द्वारकाभुवनीं । अवतरोनियां मनुष्यपणीं । लीलाचरणीं अनुकरे ॥ १६ ॥ तरी ते ऐका शुकवैखरी । सूत्रप्राय सूचना करी । झणें कुरुवर संशय धरी । म्हणोनि परिहरी शंकेतें ॥ १७ ॥

यस्त्वेतल्लीलया विश्वं सृजत्यत्त्यवतीश्वरः । स हि जातः स्वसेतूनां गोपीथाय यदुष्वजः ॥ २ ॥

व्यंकटापाङ्गें सीतापाङ्गी । जगद्गुरुत्व कान्ताआंगीं । पूर्ण ऐश्वर्य अंतरंगीं । स्मरोनि भोगी स्वानंदा ॥ १८ ॥ म्हणे जो निर्गुण कैवल्यधाम । पूर्ण ऐश्वर्यें पुरुषोत्तम । तोचि हा सगुण मेघश्याम । अज अव्यय यदुवंशीं ॥ १९ ॥ ऐशिया अनेक अवतारलीला । करूनि प्रकटी गुणगणमाळा । अनंत-ब्रह्माण्डांचिया खेळा । सृजी पाळी संहारी ॥ २० ॥ तोचि हा ईश्वर मम प्रियतम । स्वप्रणीत जो निगमक्रम । स्वसेतुसंरक्षणसकाम । नरवरवर्ष्म अवगोनी ॥ २१ ॥ ऐशिया कान्ताचा एकान्त । लाहोनि धन्य मी त्रिजगांत । मानूनि भैष्मी आनंदभरित । सादर स्वकान्त उपासी ॥ २२ ॥ जिये मंदिरीं मंचकारूढ । स्वभक्तां प्रकट अभक्तां गूढ । तिये मंदिरींचा सुरवाड । रचना अपाड त्वष्टयाची ॥ २३ ॥ तिहीं श्लोकीं तें शुक वर्णी । सादर कुरुवर परिसे कर्णीं । सुकृतबहळीं श्रोतीं श्रवणीं । अंतःकरणीं कवळावें ॥ २४ ॥

तस्मिन्नंतर्गृहे भ्राजन्मुक्तादामविलंबिना । विराजिते वितानेन दीपैर्मणिमयैरपि ॥ ३ ॥

जेव्हां द्वारका निर्मिली । तैं हरिभुवनाची शोभा कथिली । येथ प्रसंगें उपायली । ते स्वल्प बोलिली जातसे ॥ २५ ॥ पुरटघटिता उच्चतरा । प्राकारभित्ति गगनोदरा । चुंबिती तदग्रीं सुंदरा । दर्वीकरासम चरया ॥ २६ ॥ विविध रत्नीं खचित चित्रें । त्वाष्ट्रनिर्मितें कौशल्यसूत्रें । अनेकावतार-चरित्रें । सविस्तरें विराजितें ॥ २७ ॥ तयांमाजी सुविस्तीर्ण । रुक्मिणीचें राजभुवन । त्याहीमाजी विलाससदन । क्रीडास्थान कृष्णाचें ॥ २८ ॥ तस्मिन् म्हणिजे तिये ठायीं । प्रसिद्ध शोभा अंतर्गृहीं । त्यामाजी कथिलीं कांहीं कांहीं । ते नवाई अवधारा ॥ २९ ॥ भ्राजत् म्हणिजे शोभायमानें । मुक्ताफळें जेंवि उडुगणें । देखिलीं नसतीच सहस्रनयनें । शतमखपुण्यें सुरलोकीं ॥ ३० ॥ तयांचे समान सरळ हार । वितानीं ग्रथित जे चतुरस्र । चतुर्दिक्षु श्रेणीकार । तेणें मंदिर विराजित ॥ ३१ ॥ जैसे उगवले कोटि तरणि । तैसे अनर्घ्य भासुर मणि । विराजमान तिहींकरोनी । दीपस्थानीं प्रतिभाती ॥ ३२ ॥ वितान रंगाढ्य परिकर । चित्रविचित्ररंगप्रचुर । मणिमुक्तादिगुच्छनिकर । कनकसूत्रीं विलंबित ॥ ३३ ॥

मल्लिकादामभिः पुष्पैर्द्विरेफकुलनादिते । जालरंध्रप्रविष्टैश्च गोभिश्चंद्रमसोऽमलैः ॥ ४ ॥

ऐशिया वितानें विराजित। विशेष पुष्पजाति अनंत। अनंतलोकींच्या मघमवित। तद्दामयुक्त गंधाढ्य ॥ ३४ ॥ तया सुमनांचिया वेधें। अनेक द्विरेफ जाती मोदें। रुंजी करिती परमानंदें। तेणें नादें सुनादित ॥ ३५ ॥ भ्रमरीं भावोनि सुमनोद्यान। गुंजारवती आनंदोन। तेणें मुखरित विलासभुवन। क्रीडास्थान कृष्णाचें ॥ ३६ ॥ चंद्रकान्ताच्या जालंधरीं। प्रविष्टा चंद्रकिरणहारी। निर्मळ मुक्तादामावरी। पीयूषतुषारीं द्रव भासे ॥ ३७ ॥ चांदिवा भावूनि चंद्रस्थानीं। चकोरें चंद्रज्योत्स्नापानीं। निर्मळ सुधा प्राशिती नयनीं। क्रीडती भुवनीं स्वानंदें ॥ ३८ ॥

पारिजातवनामोदवायुनोद्यानशालिना। धूपैरगुरुजै राजञ्जालरंध्रविनिर्गतैः ॥ ५ ॥

याहूनि राया आश्चर्यकर। भगवद्भुवन मनोहर। पार्यातवन संभवसमीर। अतिसुखतर सर्व जीवां ॥ ३९ ॥ दशाङ्ग मलयागुरुसंभव। जवादि कस्तूरी चंद्रोद्भव। परिमळवहळ भुवन सर्व। लीलालाघव रसरुचिर ॥ ४० ॥ सौरभ्य धूपाची पिंजरी। जाळरंध्रें गगनोदरीं। भरतां भावूनि मेघापरी। ककी केकारीं नाचती ॥ ४१ ॥ घनश्याम भासुर घन। लक्षूनि नाचती मयूरगण। चकोरें प्राशूनि चंद्रवदन। अमृतपान अनुभविती ॥ ४२ ॥ भ्रमर लोधती उद्दाम दामा। मुमुक्षु जैसे कैवल्यकामा। ललनालावण्य नरललामा। धरिती प्रेमा रतिरंगीं ॥ ४३ ॥ एवं विश्ववेधक हरि। ऐशिये विराजित मंदिरीं। सुखोपविष्ट मंचकावरी। तें अवधारीं कुरुभूपा ॥ ४४ ॥

पयःफेननिभे शुभ्रे पर्यंके कशिपूत्तमे। उपतस्थे सुखासीन जगतामीश्वरं पतिम् ॥ ६ ॥

क्षीरसागरसंभव फेन। पर्यंक तैसा देदीप्यमान। किंवा अपर अनंत शयन। मृदुलास्तरण तदुपरिही ॥ ४५ ॥ हंसतूळिका उत्तमोत्तम। वरी पासोडा उज्वळ परम। उपबर्हण कुसुमाराम। मेघश्याम उपविष्ट ॥ ४६ ॥ ऐशिये मंचकीं सुखासीन। जो जगदीश्वर पूर्णचैतन्य। तया स्वपतीतें वालव्यजन। स्वकरीं घेऊन वीजितसे ॥ ४७ ॥

वालव्यजनमादाय रत्नदंड सखीकरात्। तेन वीजयती देवी उपासाचक्र ईश्वरम् ॥ ७ ॥

व्यजनसेवेच्या अधिकारिणी। सखिया लावण्यचातुर्यखाणी। तयां सर्वांची जे मुखरणी। तयेपासोनि धृतव्यजन ॥ ४८ ॥ सखीहस्तींचा घेऊनि व्यजन। रत्नदंडीं देदीप्यमान। मंद जाणवी तेणें पवन। करी उपासन नम्रपणें ॥ ४९ ॥ पादपंकजीं सलज्ज दृष्टि। वसनाभरणीं मंडितयष्टि। स्वामीसमीप दक्षिणमुष्टी। व्यजन धरूनि वीजितसे ॥ ५० ॥ समासें रुक्मिणीरूपलावण्य। ठाणठकार वसनाभरण। नृपा निरूपी शुकभगवान। तें निरूपण अवधारा ॥ ५१ ॥

सोपाच्युतं क्वणयती मणिनूपुराभ्यां रेजेंऽगुलीयवलयव्यजनाग्रहस्ता ।
वस्त्रांतगूढकुचकुंकुमशोणहारभासा नितंबधृतया च परार्ध्यकाच्या ।। ८ ।।

जें कां निर्गुण परमामृत । सच्चित्सुखमय श्रुत्यनुभूत । तेंचि त्रिपदें सगुण मूर्त । व्यक्ताव्यक्त स्फुट होती ।। ५२ ।। सत्पद तेचि भगवन्मूर्ति । चित्पद लावण्यचिद्व्यक्ति । ते जगदंबा जगज्ज्योति । रुक्मिणी सती सन्निष्ठा ।। ५३ ।। सच्चित्पद अभेद वस्तु । म्हणोनि अनन्य सप्रेम तंतु । अगाध ऐक्याचा एकान्तु । न वसे जेथें भवगरिमा ।। ५४ ।। सत्पदाचित्पदांचें अभेद प्रेम । तेंचि अद्वय आनंद-धाम । व्यक्ताव्यक्त परब्रह्म । अनुभवगम्य अनेतरा ।। ५५ ।। गौण सृष्टि जे त्रिगुणात्मक । विपरीत-बोधें प्रातिभासक । भ्रमभासुर दृश्यावलोक । त्रिविध सम्यक जीवकोटि ।। ५६ ।। तयां अगम्य हा अनुभव । म्हणोनि कामिती अवास्तव । यालागीं इतर त्यांचें नांव । विवर्तभाव ज्यां नुमजे ।। ५७ ।। असो रुक्मिणी सोपाच्युत । समीपवर्ती भेदरहित । गुणलावण्यें चित्पद मूर्त । प्रतिभा बिम्बित त्रिजगीं जे ।। ५८ ।। तयेच्या गुणरूपलावण्या । अथवा दिव्या वसनाभरणा । वर्णूं शके ऐसी धिषणा । त्रिजगीं कोणा कविवर्या ।। ५९ ।। तथापि योगसिद्धीच्या बळें । अपरोक्षस्वानुभवें प्राञ्जळें । व्यासें कथिलें तें ताद्बळें । योगानुभवें वर्णिलें ।। ६० ।। तें परिसावया परीक्षिति । श्रवणीं पूर्णानुभवसंपत्ति । गर्भीं रक्षी ज्या श्रीपति । अधिकारप्राप्ति तद्योगें ।। ६१ ।। तैसेचि श्रोते गुरुपदानिरत । साधनसंपन्न भवविरक्त । ते अधिकारी येर प्राकृत । श्रवणें कलिमल क्षाळिती ।। ६२ ।। कलिमलभंगें अधिकार होय । अनादि-भवभ्रम फिटोनि जाय । ऐसा लक्षूनि तरणोपाय । श्रवणीं सोय हरि लावी ।। ६३ ।। प्राकृतापरी विषयाचरण । क्रीडोनि करवी गुणकीर्तन । श्रवणमननें विषयी जन । भवानिस्तरणीं अनुकंपा ।। ६४ ।। असो अच्युतासमीपवर्ती । रुक्मिणी अच्युतैश्वर्यभक्ति । मणिमयभूषणविराजिती । सबाह्य व्यक्ति सप्रेम ।। ६५ ।। सबाह्य प्रेमाची ठेव । तेंचि तारुण्य नवगौरव । तेणें लावण्यें अवयव । मन्मथमोदें टव-टाविती ।। ६६ ।। सकळ भूषणां भूषण । सुरेख यौवन सुंदरपण । त्यावरी मिरवी मणिभूषण । कान्त-सेवनप्रमुदितभा ।। ६७ ।। मणिमय नूपुरें उभय चरणीं । पदविन्यासीं उमटती ध्वनि । करमुद्रिका करकंकणीं । विलोल व्यजनें रुणझुणिती ।। ६८ ।। व्यजनदंड धृत हस्ताग्रीं । सुमंद वीजितां चंचळ करीं । वलयमुद्रिका साङ्गद गजरीं । लावण्यलहरी प्रस्फुरित ।। ६९ ।। नवयौवनोत्थित कुच सघन । तदुपरि कुंकुमविलेपन । तल्लेपनें शोणायमान । हार कंठींचे विराजती ।। ७० ।। अमूल्य श्वेत सूक्ष्म सपुर । परिधान केलें दिव्याम्बर । तया ओढूनि हार कुचाग्र । तेणें भासुर राजतसे ।। ७१ ।। अमूल्यरत्नमय मेखळा । कटिप्रदेशीं भीमकबाळा । तेणें निबद्ध दिव्य दुकूळा । सांवरूनियां विराजते ।। ७२ ।। ठाण-ठकार वसनाभरणें । नवयौवनें रूपलावण्यें । शृंगाररसाचें पारणें । नयनीं देखणें हरि मानी ।। ७३ ।। तयेतें लक्षूनि नेत्रकंजीं । हरि सर्वज्ञ हृत्पंकजीं । विनोदवैरस्य उपहास वाजी । प्रेमसंभ्रम अवलंबी ।।७४।।

तां रूपिणीं श्रियमनन्यगतिं निरीक्ष्य या लीलया धृततनोरनुरूपरूपा ।
*प्रीतः स्मयन्नलककुण्डलनिष्ककंठवक्त्रोल्लसत्स्मितसुधां हरिराबभाषे ।। ९ ।।*

तियेतें लक्षिलें कवणेपरी । सर्वज्ञत्वें अभ्यंतरीं । जाणोनि श्रृंगाररसमाधुरी । कलहकारी उपहासी ॥ ७५ ॥ सर्वज्ञ जो कां सर्वसाक्षी । लक्ष्मी अनुरूपा कंजाक्षी । लीलावतारचरित्रपक्षीं । निज-रूपेंसीं अनुरूपा ॥ ७६ ॥ निर्गुणस्वरूपीं निर्गुणा । पूर्णब्रह्मीं श्री परिपूर्णा । सगुणविग्रहीं व्यक्ति नाना । लीलावतारीं अनुरूप ॥ ७७ ॥ शक्रीं शक्रश्री पौलोमी । द्रुहिणीं क्रिया स्वरा ब्राह्मी । केशवीं क्षीरार्णवजा लक्ष्मी । संहाररुद्रीं हैमवती ॥ ७८ ॥ सूर्यीं तपना चंद्रीं ज्योत्स्ना । यमीं याम्या वरुणीं रसना । स्वाहा स्वधा जे कृशाना । दहना पचना अनुरूपा ॥ ७९ ॥ नैर्ऋति जे कां नैशाचरी । पवनीं पावनी गति खेचरी । असुरीं संपदा जे आसुरी । देवी अमरीं अनुरूपा ॥ ८० ॥ मत्स्यीं मत्स्यी जे चपळता । कूर्मीं अमृतापाङ्ग ईक्षिता । दृढ धारिष्टें धारिण्यता । द्राढिष्ठ धृष्टता वाराहीं ॥ ८१ ॥ क्रूर उग्रता नारसिंहीं । प्रचंड वीरश्री भार्गवीं । त्रिजगद्वत्सलता राघवीं । भूजारूपें अनुकरे ॥ ८२ ॥ असो ऐसिया अनेक तनु । तिर्यक् दैवी मानवी भिन्नु । तत्तद्रूपीं अनुकरून । वर्ते अभिन्न जे मजसी ॥ ८३ ॥ अनन्यरूपा अंतरंगा । प्रियतमा भीमकी श्रीरंगा । यास्तव सप्रेम प्रसंगा । माजी विरागा प्रकटवी ॥ ८४ ॥ सत्यभामेचें वाङ्माधुर्य । ऐकोनि इच्छी वृष्णिधुर्य । रुक्मिणीचें वाक्चातुर्य । प्रेमसंभ्रमें परिसावया ॥ ८५ ॥ व्यजनहस्ता पार्श्वभागीं । कनकाभरणीं उत्तमाङ्गी । मुक्ताफळांची झगमगी । चंद्रकिरणां लाजवी ॥ ८६ ॥ ग्रथितालकीं सलंब वेणी । सुमनीं संमिश्र जडित लेणीं । चंचळ नासिकींचें सुपाणी । श्रवणाभरणीं विराजित ॥ ८७ ॥ कुण्डलमण्डित गंड रुचिर । दशनदीप्ति विद्रुमाधर । ऊर्ध्वे कुंकुम साञ्जित नेत्र । सुंदर वक्त्र स्मितयुक्त ॥ ८८ ॥ जडितरत्नाचें पदक कंठीं । कनकाभरणें बाहु-वटीं । हास्यप्रभा फांके सृष्टी । पाहे दृष्टी जगदात्मा ॥ ८९ ॥ ऐसिये अनन्य वैदर्भीतें । कृष्णें लक्षूनि प्रमन्नचित्तें । बोधिता झाला तें नृपातें । भगवद्वाक्यें शुक बोधी ॥ ९० ॥

श्रीभगवानुवाच–राजपुत्रीप्सिता भूपैर्लोकपालविभूतिभिः । महानुभावैः श्रीमद्भी रूपौदार्यबलोर्जितैः ॥१०॥

लावण्ययुक्त समर्याद । सस्मित लक्षूनि मुखारविंद । भीमकीवदनें रुचिर शब्द । करी विनोद परिसावया ॥ ९१ ॥ वसनाभरणीं विराजमान । गुणलावण्यें विनीत पूर्ण । तथापि होसी बुद्धिहीन । वदे भगवान या आशयें ॥ ९२ ॥ बुद्धिमंदता म्हणसी कैसी । अकरा श्लोकीं तें प्रकाशी । लाघव दावूनि आपणासी । नृपा प्रशंसी तद्व्याजें ॥ ९३ ॥ अवो वैदर्भी राजपुत्री । जितलोकत्रयलावण्यगात्री । कोटि कंदर्प असाम्य वक्त्रीं । राकारात्रिप्रिय असतु ॥ ९४ ॥ राजपुत्रि या संबोधनें । विनय लावण्य नृपजाचिह्नें । परंतु न्यूनता चातुर्यगुणें । आम्हांकारणें वाटतसे ॥ ९५ ॥ बुद्धिमंदता माझे ठायीं । म्हणसी देखिली कोणे विषयीं । तरी ते कथितों श्रवणीं घेईं । विषाद हृदयीं न धरूनी ॥ ९६ ॥ इंद्र वरुण यम कुबेर । इत्यादि लोकपाळ विभवें थोर । अपर तयांचेचि अवतार । ऐश्वर्यधर नृपति जे ॥९७॥ रूपें जिणती अश्विनीकुमरां । द्रविणें न गणिती जे कुबेरा । बळप्रतापें प्रळयरुद्रा । तुळिती जळधरा औदार्यें ॥ ९८ ॥ महाप्रभावें महानुभाव । विष्णुजिगीषे धरिती हाव । तुच्छ करूनि मानव सर्व । वाहती गर्व आढ्यत्वें ॥ ९९ ॥ ऐसे ऊर्जित सर्व गुणीं । भूभुज पूर्वींच तुजलागूनी । इच्छित असतां

त्यां त्यागूनी । आम्हांलागूनि त्वां वरिलें ॥ १०० ॥ म्हणसी पूर्वीं जरी नृपांहीं । मनोरथ इच्छा आपुले ठायीं । केली तथापि वाङ्निश्चयीं । न देतां कहीं ते लाहती ॥ १ ॥ तरी तें सर्वेही अनुकूल होतें । तेंचि वदतों ऐकें चित्तें । उपेक्षूनि ऐशियांतें । वरिलें आम्हांतें अनुचित हें ॥ २ ॥

तान्प्राप्तानर्थिनो हित्वा चैद्यादीन्स्मरदुर्मदान् । दत्ता भ्रात्रा स्वपित्रा च कस्मान्नो ववृषेऽसमान् ॥ ११ ॥

रुक्मी तुझा अग्रज बंधु । तेणें लक्षूनि स्नेहवादु । वर निर्धारें नेमिला चैद्यु । ऐश्वर्यसिंधु जाणोनी ॥ ३ ॥ तदनुकूल मातापितरें । सम्मत पुरोहित सोयरे । वाङ्निश्चयें कृतनिर्धारें । गणकविचारें घटितार्थ ॥ ४ ॥ एवं अनुकूल सर्वां परी । शाल्वमागध सहपरिवारीं । आले असतां विवाहगजरीं । त्यां त्वां सुन्दरी उपेक्षिलें ॥ १०५ ॥ आर्तभूत नोवरीकाम । नगरा आले नृपोत्तम । त्यांतें सांडोनि आम्ही असम । करोनि श्रम कां वरिले ॥ ६ ॥ परस्परें समान श्रुत । परस्परें समान वित्त । परस्परें तुल्य पुरुषार्थ । मैत्रसुहृदार्थ त्यांमाजी ॥ ७ ॥ आम्ही असाम्य सर्वांपरी । कैसे म्हणसी जरी तूं सुंदरी । तेंही कथितों तूं अवधारीं । बरवें अंतरीं विवरोनी ॥ ८ ॥

राजभ्यो बिभ्यतः सुभ्रूः समुद्र शरणं गतान् । बलवद्भिः कृतद्वेषान्प्रायस्त्यक्तनृपासनान् ॥ १२ ॥

जरासंधसमराङ्गणीं । बहळभूपाळांपासोनी । भय पावलों अंतःकरणीं । सांडूनि अवनीं पळालों ॥ ९ ॥ समुद्रातें गेलों शरण । बलिष्ठांचें द्वेषभाजन । विशेषें त्यक्तनृपासन । कैंवि त्यां समान तूं गणिसी ॥ ११० ॥

अस्पष्टवर्त्मनां पुंसामलोकपथमीयुषाम् । आस्थिताः पदवी सुभ्रूः प्रायः सीदंति योषित. ॥ १३ ॥

ज्यांचा आचार न कळे प्रकट । लौकिकरहित ज्यांची वाट । त्यांच्या मार्गी झालिया विनट । पावती कष्ट कुलस्त्रिया ॥ ११ ॥ लौकिकराहित पद्धति कैसी । तेही कथितों तूं परियेसीं । सूचनामात्रें सर्वज्ञांसी । नुमजे मूर्खांसी बहु कथितां ॥ १२ ॥

निष्किंचना वयं शश्वन्निष्किंचनजनप्रियाः । तस्मात्प्रायेण न ह्याढ्या मां भजंति सुमध्यमे ॥ १४ ॥

लोक सकिंचनास्पदीभूत । आम्ही निष्किंचन संतत । निष्किंचन जन जे आम्हां भजत । आम्ही बहुत प्रियतम त्यां ॥ १३ ॥ तस्मात् आम्ही आढ्य न हों । आढ्यां आम्हां न घडे स्नेहो । यालागीं असाम्य सुहृद्भावो । रायां आम्हां नृपतनये ॥१४॥ जीच्या मध्यासी सिंह उपमा । तियेसि म्हाणिजे सुमध्यमा । म्हणोनि संबोधी परमात्मा । सुमध्यमे या संबोधनें ॥ ११५ ॥ म्हणसी समता कोणेपरी । शास्त्रनिर्दिष्ट-ग्रंथान्तरीं । तेंही कथिजेल तूं अवधारीं । अभ्यंतरीं विवरूनी ॥ १६ ॥

ययोरात्मसमं वित्तं जन्मैश्वर्याकृतिर्भवः । तयोर्विवाहो मैत्री च नोत्तमाधमयोः क्वचित् ॥ १५ ॥

परस्परें समान वित्त । समान ज्यांचें श्रुताधीत । जन्म कर्म वय समस्त । समान वृत्त जयांचें ॥ १७ ॥ वृत्ति व्यवहार कुळाचार । ऐश्वर्य आकृति संसार । गोत्रनिर्णय परात्पर । सुहृदाचार सम उभयां ॥ १८ ॥ ऐशियांमाजी परस्परें । विवाह मैत्री परमादरें । चाले आणि स्नेहसुभरें । परस्परें उपकरती ॥ १९ ॥ अधमोत्तमांमाजि मैत्री । कोठें न घडे वो राजपुत्री । घडल्या अनादर उभयत्रीं । वैराधारीं प्रवर्तती ॥ १२० ॥

वैदर्भ्येतदविज्ञाय त्वयाऽदीर्घसमीक्षया । वृता वयं गुणैर्हीना भिक्षुभिः श्लाघिता मुधा ॥ १६ ॥

अवो वैदर्भिये चतुरे । तुवां नेणोनि या प्रकारें । आदि पश्चात् शास्त्राधारें । दीर्घ विचारें न शोधितां ॥ २१ ॥ गुणविहीनां वरिलें आम्हां । भिक्षुकांचिये वचनीं प्रेमा । धरूनि भुललीस निष्कामकामा । राजसत्तमां सांडूनी ॥ २२ ॥ त्यांचा उगाचि हा आग्रह । माझ्या ठायीं धरूनि स्नेह । कीर्तनमिसें परमोत्साह । करिती निःस्पृह सर्वत्र ॥ २३ ॥ विरक्त निःस्पृह परमहंस । सदैव ऐक्य आम्हां त्यांस । ते मज स्तविती त्या वचनास । भाळलीस नृपतनये ॥ २४ ॥ तिहीं श्लाघ्य केलों स्तवनें । तूं भुललीसी तयांच्या वचनें । आम्हां गुणहीनांकारणें । वरिलें विचार न करूनी ॥ १२५ ॥ यानंतरें म्हणे हरि । आझूनि दीर्घ विचार करीं । आम्ही वदतों त्या प्रकारीं । स्वहिताचारीं प्रवर्तें ॥ २६ ॥

अथाऽत्मनोऽनुरूप वै भजस्व क्षत्रियर्षभम् । येन त्वमाशिष. सत्या इहामुत्र च लक्ष्यसे ॥ १७ ॥

आपुल्या रूपें अनुरूप वर । क्षत्रियांमाजी श्रेष्ठतर । गुण लावण्य ऐश्वर्य सधर । त्यातें सत्वर भजावें ॥ २७ ॥ आशिष म्हणिजे मनोरथ । तुझे संपूर्ण होती जेथ । इहलोकींचे सर्व अर्थ । जो समर्थ पुरवील ॥ २८ ॥ आणि स्वर्गींचीही जे संपत्ति । होय जयाचेनि आपैती । ऐसा क्षत्रियश्रेष्ठ भूपति । भजें निश्चिती नृपतनये ॥ २९ ॥ ऐसा म्हणसी आहे कोण । देतों तयाची आठवण । जेथें झळंबे अंतःकरण । त्यालागून त्वां भजिजे ॥ १३० ॥

चैद्यशाल्वजरासंधदंतवक्रादयो नृपाः । मम द्विषति वामोरु रुक्मी चापि तवाग्रजः ॥ १८ ॥

चैद्यदेशींचा भूपाळ । क्षत्रीं वरिष्ठ जो शिशुपाळ । आणि शाल्वनामा प्रबळ । प्रतापी तुंबळ दळ ज्याचें ॥ ३१ ॥ जरासंध मदोद्धत । ज्याच्या भयें समुद्राआंत । आम्ही राहिलों तो विख्यात । आणि वक्रदंत नृपवर्य ॥ ३२ ॥ हे मम द्वेष्टे रुक्मिणी । ऐसाचि द्वेष्ट्यां अग्रगणी । तुझा अग्रज रुक्मी न गणी । आम्हांलागोनि स्वप्नींही ॥ ३३ ॥ हे म्यां कथिले वरिष्ठ वीर । यांवेगळे अनेक शूर । भूभुज श्रीमंत सुंदरतर । प्रेमें प्रियकर भज भावें ॥ ३४ ॥ जरी तूं म्हणसी ऐसें होतें । तरी कां पूर्वींच हरिलें मातें । ऐकें तयाही वृत्तातें । सावध चित्तें वामोरु ॥ १३५ ॥ रंभा म्हणिजे कदलीतरु । तिच्या स्तंभासम मृदुल ऊरु । तियेसी रंभोरु वामोरु । वदती श्रृंगाररसवेत्ते ॥ ३६ ॥

तेषां वीर्यमदांधानां दृप्तानां स्मयनुत्तये । आनीताऽसि मया भद्रे तेजोऽपहरताऽसताम् ॥ १९ ॥

ज्याचीं नामें तुज म्यां कथिलीं । ते ते मदान्ध प्रतापशाली । उन्मत्त उत्पथ महाबळी । द्वेष्टे सकळी पैं आमुचे ॥ ३७ ॥ ते मिनले तव स्वयंवरीं । आणितां निज ग्लानि लिहिली पत्रीं । यास्तव न पढूनि अव्हेरीं । दुर्मदां समरीं म्यां दमिलें ॥ ३८ ॥ त्यांचा दुर्मद झाडावया । प्रवर्तलों मी हरणा तुझिया । समरीं मथूनि दुर्मदां तयां । तुज निज जाया म्यां केली ॥ ३९ ॥ द्वेष्टे दुर्मद जे असंत । त्यांचा प्रताप गर्वोपहत । करूनि आणिलें तुज म्यां येथ । विजयस्वार्थ लक्षूनी ॥ १४० ॥ यावेगळा आमुचे ठायीं । कामलोभाचा स्पर्श नाहीं । हें तूं जाणसी आपुले हृदयीं । तथापि कांहीं बोलतसों ॥४१॥

उदासीना वयं नूनं स्त्र्यपत्यार्थकामुकाः । आत्मलब्ध्याऽऽस्महे पूर्णा गेहयोर्ज्योतिरक्रियाः ॥ २० ॥

आम्ही निश्चयें उदासीन । स्त्रीपुत्रादिकामनाशून्य । अर्थस्वार्थकामविहीन । काय म्हणोन तें ऐका ॥ ४२ ॥ निजात्मसुखाची उपलब्धि । तिणें पूर्णता मनोबुद्धी । अक्षुब्ध जैसा अमृतोदधि । तैसा समाधि सर्वत्र ॥ ४३ ॥ म्हणसी एवढा यदुसमुदाय । तुमच्या योगें चालता होय । यदर्थीं ऐकें विदर्भतनये । कोणा न्यायें वर्ततसों ॥ ४४ ॥ गृहामध्यें जैसा दीप- । प्रकाशें सर्व कार्यकलाप । चालवूनियां साक्षिरूप । क्रिया अल्प न स्पर्शे ॥ ४५ ॥ आम्ही वर्तों ऐशिया परी । उदास देहगेहांवरी । वधूसुतधनकामांची उरी । आम्हांमाझारी न वसे पैं ॥ ४६ ॥ भ्रतारांची उदासीनता । दुःखें साहों न शकती वनिता । हें जाणोनि मन्मथजनिता । रुक्मिणीचित्ता क्षुब्ध करी ॥ ४७ ॥ आपुलें औदासीन्य प्रकट । स्वमुखें कथितां कंबुकंठ । तेणें दाटला रुक्मिणीकंठ । हृदयस्फोट होऊं पाहे ॥ ४८ ॥ शुक म्हणे गा कुरुनरपाळा । श्रोतयांमाजी पुण्यशीळा । श्रीकृष्णाची गुणगणमाळा । सप्रेमळा अवधारीं ॥४९॥

श्रीशुक उवाच–एतावदुक्त्वा भगवानात्मानं वल्लभामिव । मन्यमानामविश्लेषात्तद्दर्पघ्न उपारमत् ॥ २१ ॥

व्यंग्योक्तीचें उपसंहरण । मुख्यत्वें हेंचि तत्कारण । इतुकीं वाक्यें श्रीभगवान । बोलोनि इत्यर्थ जो धरिला ॥ १५० ॥ भगवंताच्या प्रेमगुणें । भीमकी जाणे स्वलावण्यें । सर्वांहूनि प्रियतमपणें । मजकारणें हरि मानी ॥ ५१ ॥ ऐसा वैदर्भीचा दर्प । निरसावया मन्मथबाप । उपहासवाक्यांचा कलाप । इतुका बोलोनि आवरिला ॥ ५२ ॥ इतुकें कृष्ण बोलिल्यावरी । भीष्मकरायाची कुमारी । विदर्प होवोनि अभ्यंतरीं । मानी मेरु कोसळला ॥ ५३ ॥

इति त्रिलोकेशपतेस्तदाऽऽत्मनः प्रियस्य देव्यश्रुतपूर्वमप्रियम् ।
आश्रुत्य भीता हृदि जातवेपथुश्चिन्तां दुरंतां रुदती जगाम ह ॥ २२ ॥

त्रैलोक्याचा नायक हरि । निजवल्लभ तो व्यंग्योत्तरीं । बोलतां भंगली अभ्यंतरीं । तें अवधारीं नृपवर्या ॥ ५४ ॥ जन्मापासूनि जो प्रियतम । तयाच्या वदनें वाक्यें विषम । ऐकतांचि भंगलें प्रेम । मानसीं श्रम संचरला ॥ १५५ ॥ द्योतमाना रुक्मिणी देवी । जिणें हीं वाक्यें कदापि पूर्वीं । ऐकिलीं

नव्हतीं तीं ऐकूनि जीवीं । चिह्नें भयाचीं उमटलीं ॥ ५६ ॥ हृदयामाजी खोचली वेगीं । कंप दाटला सर्वाङ्गीं । जलप्रवाह नेत्रमार्गीं । करणवर्गीं वैकल्य ॥ ५७ ॥ जयेसि नाहीं पैल पार । ऐसी दुस्तर चिंता घोर । पावती झाली पैं सकुमार । तो चिह्नप्रकार अवधारा ॥ ५८ ॥

पदा सुजातेन नखारुणश्रिया भुवं लिखंत्यश्रुभिरंजनासितैः ॥
आसिंचती कुंकुमरूषितौ स्तनौ तस्थावधोमुख्यतिदुःखरुद्धवाक् ॥ २३ ॥

नखशशाङ्ककलाकिरण । तिहीं रंजित पदतळ अरुण । तया चरणें भूलेखन । करीत राहिली तटस्थ ॥ ५९ ॥ कज्जलमिश्रित अश्रु स्रवती । सजल कृष्ण कर्दमें क्षिति । टपटपां सिंपीत होत्साती । अधोमुखी स्फुंदतसे ॥ १६० ॥ डवडबूनि आला घर्म । तेणें द्रवलें कुचकुंकुम । तत्कर्दमें अंशुकोत्तम । शोणायमान भासतसे ॥ ६१ ॥ नयनींचे सकज्जल बाष्पबिंदु । श्वेतवसनीं स्रवती विशदु । शोण सकुंकुम कुचस्वेदु । वसन भेदूनि प्रकटला ॥ ६२ ॥ सितासिता उभय सरितां । माजी सरस्वती ते शोणता । त्रिवेणीसंगम हृदयावरुता । माधव नेत्रीं अवलोकी ॥ ६३ ॥ भगवन्मुखींचें अप्रिय वचन । परम कडवट मरणाहून । श्रवणीं पडतांचि खिळिलें वदन । पडिलें मौन वैखरिये ॥ ६४ ॥ याहूनि विशेष जे अवस्था । पावती झाली वैदर्भसुता । ते तूं ऐकें कौरवनाथा । म्हणे वक्ता शुकयोगी ॥ १६५ ॥

तस्याः सुदुःखभयशोकविनष्टबुद्धेर्हस्ताच्छ्लथद्वलयतो व्यजनं पपात ।
देहश्च विक्लवधियः सहसैव मुह्यन्रंभेव वायुविहता प्रविकीर्य केशान् ॥ २४ ॥

सुदुःख म्हणजे काय म्हणसी । तरी अप्रियवाक्यश्रवणासरसी । महाभय काळजी मानसीं । आनंदकोशीं झळंबली ॥ ६६ ॥ अप्रियोक्तीचें नमतां काज । आजि कां वदला गरुडध्वज । यावरी माझा त्याग सहज । हें दृढ बीज शंकेचें ॥ ६७ ॥ सशोक ऐसिये शंकेकरूनी । अनुतापवितर्क करितां मनीं । बुद्धि गेली हारपोनी । धैर्यापासोनि सांडवली ॥ ६८ ॥ विगतधैर्यें रुक्मिणीचीं । हस्तापासूनि वलयें साचीं । गळोनि पडलीं परी तयांची । शुद्धि अणुमात्र नुपलभे ॥ ६९ ॥ धरिला होता वालव्यजन । गळोनि पडला हस्तांतून । मुखभा गेली हारपोन । विवर्ण वदन रुदनेंसी ॥ १७० ॥ अकस्मात पावली मोह । मूर्च्छा वैकल्य जाकळी देह । तया सांवराया रोह । अधैर्य धैर्या करूं न दे ॥ ७१ ॥ प्रचंडवातें जैसी कदळी । तेंवि उलथली भूमंडळीं । सुटली केशांची मोळी । ते वदनपाळी विखुरली ॥ ७२ ॥ ऐसीं चिह्नें वल्लभेआंगीं । देखोनि कळवळिला शार्ङ्गी । प्रेमवात्सल्य ये प्रसंगीं । श्रीशुकयोगी वर्णितसे ॥ ७३ ॥

तद्दृष्ट्वा भगवान्कृष्णः प्रियायाः प्रेमबंधनम् । हास्यप्रौढीमजानंत्यः करुणः सोऽन्वकंपत ॥ २५ ॥

आपुल्या वाग्बाणीं भेदलें हृदय । तेणें रुक्मिणी प्रेतप्राय । तें देखोनि यादवराय । परम सदय कळवळिला ॥ ७४ ॥ नेणोनि हास्यरहस्यखोली । भीमकी वाग्बाणीं भंगली । ऐसियेवरी करुणा आली ।

**मग आदरिली अनुकंपा ॥ १७५ ॥ पूर्विलाह्लानि प्रेमा वृद्धी । पावे ऐसी लक्षूनि बुद्धि । करिता झाला कृपानिधि । तें शुक बोधी नृपातें ॥ ७६ ॥**

पर्यंकादवरुह्याशु तामुत्थाप्य चतुर्भुजः । केशान्समुह्य तद्वक्त्रं प्रामृजत्पद्मपाणिना ॥ २६ ॥

**रुक्मिण्यवस्थेचा प्रकार । देखोनियां अभ्यंतर । द्रवलें तेणें अतिसत्वर । मंचकावरूनि उतरूनी ॥ ७७ ॥ द्विभुज सर्वत्र मुरारि । वर्तत असतां यादवभारीं । रुक्मिणीवैकल्य देखूनि नेत्रीं । बाहु चाऱ्ही प्रकटिले ॥ ७८ ॥ चहूं भुजीं केलें काय । तो परियेसीं अभिप्राय । एक्या हस्तें रुक्मिणी-काय । सांवरूनियां बैसाविला ॥ ७९ ॥ दुजिया हस्तें पुसिलें वदन । तिजेनें केशकलापरचन । चतुर्थ-हस्तें आलिंगन । देऊनि वदन चुंबिलें ॥ १८० ॥ जेंवि प्रियेच्या रतिरंगणीं । उद्योगवंत विलसती पाणि । त्याच पद्महस्तें रुक्मिणी । हृदयीं कवळूनि आलिङ्गिली ॥ ८१ ॥**

प्रमृज्याश्रुकले नेत्रे स्तनौ चोपहतौ शुचा । आश्लिष्य बाहुना राजन्ननन्यविषयां सतीम् ॥ २७ ॥

**अश्रुकलायुक्त नयन । शंतम करें परिमार्जन । शोकें संतप्त हृदय स्तन । तेही स्पर्शोन निवविले ॥ ८२ ॥ आन विषय नेणे स्वप्नीं । आपणावांचूनि जे रुक्मिणी । हें जाणोनि चक्रपाणि । बाहु पसरोनि आलिङ्गी ॥ ८३ ॥ जिच्या सतीपणाची सीमा । सन्मय व्रतें श्रीपरमात्मा । सेवी म्हणोनि अनन्य प्रेमा । परस्परें अनिवड ॥ ८४ ॥ विषमोत्तरीं भंगलें हृदय । जाणोनि कृपेनें द्रवला सदय । सान्त्वनाचा अभिप्राय । विवरी काय तो ऐका ॥ १८५ ॥**

सान्त्वयामास सांत्वज्ञः कृपया कृपणां प्रभुः । हास्यप्रौढीभ्रमच्चित्तामतदर्हां सतां गतिः ॥ २८ ॥

**हास्यप्रौढीचीं उत्तरें । स्पर्शिलीं असतां अभ्यंतरें । भ्रमणचक्रीं चित्त फिरे । धृति शरीरें सांडूनी ॥ ८६ ॥ हास्यप्रौढीच्या विलासा । योग्य रुक्मिणी नोहे सहसा । जाणोनि स्वजनाचा कुवासा । पुन्हा संतोषा उपजवी ॥ ८७ ॥ सान्त्वनकोविद असती जे जे । तयांच्या मुकुटीं जो विराजे । तया सान्त्वनज्ञें यादवराजें । रुक्मिणी ओजें सान्ताविली ॥ ८८ ॥ सज्जनाचें प्राप्तिस्थान । सताङ्गति तो भगवान । प्रभु म्हणिजे समर्थ पूर्ण । अनुनयवचन बोलतसे ॥ ८९ ॥**

श्रीभगवानुवाच–मा मा वैदर्भ्यसूयेथा जाने त्वां मत्परायणाम् । त्वद्वचः श्रोतुकामेन क्ष्वेल्याचरितमंगने ॥ २९ ॥

**अवो वैदर्भि गुणैकराशि । म्हणें मत्पर ईर्ष्या धरिसी । म्हणें माझी असूया करिसी । अभिप्रायासी नेणोनी ॥१९०॥ तूतें जाणें मी अनन्य । मन्निरता मत्परायण । उपहासमिषें तुझें वचन । करावें श्रवण हे इच्छा ॥ ९१ ॥ तुझिये मुखींचीं मधुर वचनें । स्मितापाङ्गें विलासपूर्णें । पीयूषप्राय घेतां श्रवणें । रसाळपणें सुख करिती ॥ ९२ ॥ तुझ्या वचनाचा श्रवणकाम । धरूनि विनोदें जें सम विषम । बोलिलों**

तें नेणोनि वर्म । तूं भय श्रम भजलीस ॥ ९३ ॥ विनोदें बोलिलों ज्या व्यंगोक्ती । त्या सत्यत्वें मानूनि चित्तीं । मूर्च्छा पावलीस अवचिती । हें मजप्रति जाणवलें ॥ ९४ ॥ जीं बोलिलों विषम वचनें । उपहासप्रौढीपरी तीं जाणें । सत्य न मनीं अंतःकरणें । चतुरे सुजाणे ममाङ्गने ॥ १९५ ॥ तत्त्वता ऐसींच जरी तीं असतीं । तैं कें घडती सप्रेम रति । अनन्यप्रियतमा तुजपरौती । कोण ते चित्तीं विवरीं पां ॥ ९६ ॥ तुज न विसंबें मी क्षणभरी । तुजवेगळा न वर्चे दुरी । तुजवीण द्वैताची अवसरी । मज संसारीं सर्वस्वें ॥ ९७ ॥ मत्प्रेमसुखाचें दर्पण । तें एक तुझेंचि अंतःकरण । एऱ्हवीं अवघा मी परिपूर्ण । द्वैतविहीन एकात्मा ॥ ९८ ॥ तुज पहावया मी डोळस । तव प्रेमास्तव रूपस । तव जाणावया मानस । एऱ्हवीं निःशेष हृन्छून्य ॥ ९९ ॥ तव गुणश्रवणीं मी सश्रवण । तव रसार्थ रसनावान । तव सौरभ्या मी सघ्राण । तवालिङ्गना त्वग्वंत ॥ २०० ॥ तूं मज अनन्य सर्वांपरी । मी तुज तैसाचि बाह्यान्तरीं । हें विसरोनि नर्मोत्तरीं । मूर्छा शरीरीं अनुभविली ॥ १ ॥ आतां जाणोनि सप्रेमभावो । नर्मोक्तींचा न धरीं भेवो । ऐसें बोलतां यादवरावो । परतला जीव भीमकीचा ॥ २ ॥ मग परिमार्जूनि सर्वावयव । हनुवटी धरूनियां स्वयमेव । वदन चुंबूनि वासुदेव । नर्मोक्तिभाव प्रकाशी ॥ ३ ॥ अवो सुंदरि नर्मोक्तिवचना । बोलोनि निरखितां दयितावदना । तये काळींच्या पाहोनि चिह्ना । आनंद नयनां रमणाच्या ॥ ४ ॥ प्रेमसंरंभीं चिह्नें कोण । जिहींकरूनि मंडित वदन । तें मी कथितों तुजलागून । परिसें लावण्यरससरिते ॥ २०५ ॥

मुखं च प्रेमसंरम्भस्फुरिताधरमीक्षितुम् । कटाक्षेपारुणापाङ्गं सुंदरभ्रुकुटीतटम् ॥ ३० ॥

रमण करितां प्रेमोपहास । तेणें रमणीचें मानस । क्षोभें धरी ईर्ष्यावेश । चिह्नें उदयास तैं येती ॥ ६ ॥ प्रेमसंरंभयुक्त मुख । प्रेमसंरंभ उक्ति देख । पहावयाकारणें मिष । नर्मोक्तीचें जाणिजे ॥ ७ ॥ मानसक्षोभें स्फुरिताधर । कटाक्षविक्षेप अपाङ्गरुचिर । सग्रंथि भ्रुकुटी किंचिद्वक्र । वदन सुंदर या चिह्नीं ॥ ८ ॥ इत्यादि चिह्नीं मंडित वदना । निरखावया नर्मोक्तिवचना । कामुक वदती ऐसी सूचना । रतिसंपन्ना विदित असे ॥ ९ ॥ जरी तूं म्हणसी विदर्भदुहिते । मंचकीं कान्ताप्रियतमचित्तें । रंगलीं असतां कलह तेथें । कैंवि सुखातें उपपादी ॥ २१० ॥ तरी तूं ऐकें वो मम रमणी । दंपती मीनल्या रतिरंगणीं । लिंगसाङ्घट्यें अर्धक्षणीं । शुक्रस्खलनीं वैरस्य ॥ ११ ॥ मग घालूनि कंठीं हात । स्वपती दंपती तें निवांत । यालागीं कामशास्त्रनिर्णीत । प्रेमसंरंभ उपहासें ॥ १२ ॥

अयं हि परमो लाभो गृहेषु गृहमेधिनाम् । यन्नर्मैर्नीयते यामः प्रियया भीरु भामिनि ॥ ३१ ॥

कोपसंचार जिये शरीरीं । भामिनी म्हणिजे तिये सुंदरी । यालागीं संबोधी श्रीहरि । भामिनी-नामें भीमकिये ॥ १३ ॥ गृहमेधी जो गृहस्थधर्मी । वर्तत असतां गृहस्थाश्रमीं । तो कैवल्यसुखा-समान उपमीं । हाचि लाभ रतिरस जो ॥ १४ ॥ गुणलावण्या चातुर्यखाणी । शयनीं संप्राप्त असतां

रमणी । हास्यनर्मोक्तिभाषणीं । जो काळ क्रमिती चारुतर ॥ २१५ ॥ प्रेमकलहें वदती ललना । तद्युक्त आवेशचिह्नें वदना । ऐकोनि पाहों श्रवणा नयना । लाभ यूना परम हा ॥ १६ ॥ प्रेमसंरंभीं ज्या व्यंग्योक्ति । हारपोनि जाती तितुक्या सुरतीं । विशुद्धमानसें प्रिय दंपती । आनंदती परस्परें ॥ १७ ॥ नातरी पश्वादि श्वानसूकर । रमतां करिती गुरगुर क्रूर । रासभादि लत्ताप्रहार । मन्मथसमर-प्रसंगीं ॥ १८ ॥ तेंवि संसारीं प्राकृत नर । मनुष्यरूपें श्वानसूकर । नेणती मन्मथक्रीडासार । करिती संसार वैरस्यें ॥ १९ ॥ यालागीं नरवर अमरांसम । जाणती रतिरसविलासक्रम । नर्मव्यंग्योक्तींचें प्रेम । भाषणकाम परस्परें ॥ २२० ॥ असो ऐसिया नर्मोत्तरीं । उपहासिलीस वो सुंदरी । तें नेणोनि अभ्यंतरीं । दुःखलहरी अनुभविली ॥ २१ ॥ आतां सांडोनि मनींचा खेद । निःशंक करीं प्रेमानुवाद । तेणें होईल परमानंद । म्हणे मुकुन्द भीमाकिये ॥ २२ ॥

श्रीशुक उवाच–सैव भगवता राजन्वैदर्भी परिसांत्विता।ज्ञात्वा तत्परिहासोक्ति प्रियत्यागभयं जहौ ॥३२॥

कुरुजलधिभवसुधारसा । ऐकें हरिकीर्तनलालसा । ऐशिया प्रकारीं मृगडोळसा । परमपुरुषें सान्तविली ॥२३॥ मानस निववीलें प्रेमोत्तरीं । शरीर स्पर्शोनि शंतमकरीं । चुंबनालिङ्गनें बाह्यान्तरीं । आनन्दलहरी प्रकटिली ॥२४॥ मग ते वैदर्भी निजमनीं । परिहासोक्ति भगवद्वचनीं । मद्वाक्यश्रवणाची शिराणी । ऐसें जाणोनि हरिखेली ॥२२५॥ पूर्वीं व्यंग्योक्ति निष्ठुरा । ऐकोनि भयाचा भेदरा । झळंबला जो अभ्यंतरा । तो तैं बाहेरा बोळविला ॥२६॥ माझिया विवाहाचिये क्षणीं । अवघीं प्रतिकूळ देखोनी । मग म्यां केली अघटित करणी । पत्र प्रेरूनि हरि वरिला ॥२७॥ ऐसें ढालगजपण जें माझें । हृदयामाजी गरुडध्वजें । ठेविलें होतें तें आजि सहजें । विषम हृदयींचें उपशिलें ॥२८॥ आतां शाल्व-मागधचैद्या । भजें म्हणोनि वदला शब्दा । अयोग्य जाणोनियां प्रमदा । रुचला मुकुन्दा मम त्याग ॥२९॥ पक्वान्नपरवडी अमृतप्राय । त्यांमाजी विष जैं भोक्ता खाय । तें दुःख हृदयांमाजी तो वाहे । मग करी उपाय त्यागार्थ ॥२३०॥ वमनरेचनपाचनयोगें । निरुज होय विषाच्या त्यागें । तैसेंचि मजलागीं श्रीरंगें । परिहासप्रसंगें आदरिलें ॥३१॥ भाग्यें पत्रलेखनावरी । प्रियतम वरिला श्रीमुरारि । तया आनंदें आजिवरी । होत्यें अंतरीं प्रफुल्लित ॥३२॥ आजि ऐकोनि व्यंग्योत्तरें । त्यागभयाचें आलें शारें । पुढती सान्तवितां श्रीधरें । प्रेमोपचारें तें हरिलें ॥ ३३ ॥ ऐसें प्रियत्यागाचें भय । सांडोनि वैदर्भी निर्भय । होवोनि वल्लभा वदती होय । हे रससोय शुक वर्णी ॥ ३४ ॥

बभाष ऋषभं पुंसां वीक्षंती भगवन्मुखम् । सव्रीडहासरुचिरस्निग्धापांगेन भारत ॥ ३३ ॥

सांडूनि भयाचा भेदरा । चेतना प्राप्त करणानिकरा । कृष्णसान्त्वनें सुंदरा । प्रेमाधिकारा पावली ॥ २३५ ॥ कृष्णसान्त्वनोक्तीवरी । पूर्वोक्तीचें कारण चतुरीं । विवरूनि पूर्वापर अंतरीं । अभिप्राय अवगामिला ॥ ३६ ॥ अयं हि परमोलाभ । ऐसें बोलिला पंकजनाभ । या वचनाचा जाणोनि गर्भ । स्मितापाङ्गें अवलोकी ॥ ३७ ॥ पूर्व नर्मोक्ती स्वत्यागपर । तैं भंगलें होतें अंतर । कृष्णसान्त्वनें

प्रेमादर । झाला निर्धार अभयाचा ।। ३८ ।। माझिया मुखें स्निग्धोत्तरें। ऐकावया परमेश्वरें । बोलिल्या नमोक्ती आदरें । नव्हतीं निष्ठुर क्रोधवाक्यें ।। ३९ ।। ऐसें विवरोनि पूर्वापर । जाणोनि स्वामीचें अंतर । निर्भयभावें परम सधीर । झाली सादर प्रतिवचना ।। २४० ।। सलज्ज सस्मित रुचिरापाङ्ग। कटाक्षविक्षेप भृकुटी चांग । इत्यादि लक्षणीं नाथोत्तमाङ्ग । नयनभृंगें प्राशीतसे ।। ४१ ।। पुरुषांमाजी उत्तम पुरुष । तो श्रीकृष्ण जगदीश । अंतरीं पावोनि परमोल्लास । भाषण करीत तेणेंसी ।। ४२ ।।

रुक्मिण्युवाच – नन्वेवमेतदरविंदविलोचनाऽऽह यद्वै भवान्भगवतोऽसदृशी विभूम्नः ।
क्व स्वे महिम्न्यभिरतो भगवांस्त्र्यधीशः क्वाहं गुणप्रकृतिरज्ञ गृहीतपादा ।। ३४ ।।

आपुले ठायीं दोष सोळा । घेऊनि वदला घनसांवळा । उभय दोषीं भीमकबाळा । बुद्धिमंदत्वें नोकिली ।। ४३ ।। दोषारोपित श्रीकृष्णशब्द । करूनि तद्दोषापवाद । गुणगणमंडित स्तवनानुवाद । त्यामाजी विशद प्रतिपादी ।। ४४ ।। म्हणे अरविंदलोचना । जें तूं वदलासि भो सर्वज्ञा । आम्हां अममां कोण्याकारणा । राजपुत्रि त्वां वरिलें ।। २४५ ।। तरी तें यथार्थ अन्यथा नोहे । तुझा महिमा केवढा पाहें । तेथ मज किंमात्रेची सोय । कैसेनि ये समतेसी ।। ४६ ।। तुजसीं समान न सजे भाज । तुशीं रमतां परम लाज । यथार्थ वदले गरुडध्वज । परिहासबीज हें स्पष्ट ।। ४७ ।। तुझा महिमा कोणीकडे । ब्रह्मादि त्रिदेवां नियमिसी दंडें । तेथ प्राकृत जड मूढ वेडें । कोण्या तोंडें सम म्हणवूं ।।४८।। तुझी स्वगत जे पूर्णश्री । गुणसाम्यप्रकृति ऐश्वर्यधात्री । जियेतें सनकादि सर्वत्रीं । त्रिविधा नरीं भजिजेत ।। ४९ ।। बद्ध मुमुक्षु आणि मुक्त । विषयी साधक सिद्ध स्वरत । तव वल्लभा भेदरहित । जाणोनि संतत भजताती ।। २५० ।। तेही समता तुजसीं न करीं । तेथ मी प्राकृता गुणविकारी । गुणमयी प्रकृति तुजसी सरी । सहसा न करीं हें सत्य ।। ५१ ।। अज्ञ म्हणिजे मूर्ख जन । प्रपंचीं निरत विषयाभिज्ञ । ते आराधिती माझे चरण । विरक्त सर्वज्ञ उपेक्षिती।। ५२ ।। रात्रीदिसा समता न घडे । चैतन्यसमता न कीजे दगडें । हें सर्वांसी कळों ये उघडें । नोहे वांकुडें वदलां तें ।। ५३ ।। पूर्वोक्तीचा वास्तव बोध । विवरूनि निरसिला अपवाद । हें ऐकोनि श्रीमुकुंद । मानी कोविद वैदर्भी ।। ५४ ।। यावरी हरीचें द्वितीयोत्तर । दोष निरसूनि ऐश्वर्यपर । प्रतिपादिती झाली चतुर । बोधी मुनिवर तें राया ।। २५५ ।।

सत्यं भयादिव गुणेभ्य उरुक्रमांतः शेते समुद्र उपलंभनमात्र आत्मा ।
नित्यं कदिंद्रियगणैः कृतविग्रहस्त्वं त्वत्सेवकैर्नृपपद विधुतं तमोऽधम् ।। ३५ ।।

हेंही सत्य हो मुरारि । भय पावलियाचे परी । शरण समुद्रा गेलों हरि । म्हणसी वैखरी हे उचित ।। ५६ ।। तरी परिसा जी उरुक्रमा । तुम्हांसि भयाची न शिवे गरिमा । तो तूं रायांच्या पराक्रमा । भेणें धामा जळीं करिसी ।। ५७ ।। शब्दस्पर्शादिक जे गुण । राजे राजताति हे म्हणोन ।

यांपासोन भय पावोन । हृदयसमुद्रीं दुर्गम तूं ॥ ५८ ॥ भय पावलासि हें भासे मूढां । येऱ्हवीं निर्भय तूं धडफुडा । अंतरसमुद्रामाजी गूढा । गूढ होवोनि वसतोसी ॥ ५९ ॥ समुद्राहूनि अगाधतर । विषय राजयां अगोचर । जेथ निश्चळ प्रकाशकर । समुद्रान्तर वसाविशी ॥ २६० ॥ उपलंभननामें मात्रा । तिहीं अनुमेय तूं स्वतंत्रा । आत्मा चैतन्यघन या विचारा । प्रतिपादिती अनुमानें ॥ ६१ ॥ आणि बाळिष्ठांहीं केला द्वेष । ऐसें बोलिले परमपुरुष । तेंही सत्यचि हा विशेष । सावकाश अवधारा ॥ ६२ ॥ कुत्सित इंद्रियांचा जो गण । बाह्यज्ञानें बाळिष्ठ पूर्ण । ते द्वेषिती तुजलागून । अप्राप्त म्हणून अप्रिय त्यां ॥ ६३ ॥ अप्रिय म्हणोनि द्वेषानिष्ठ । प्रवृत्ति मानिती परम मिष्ठ । भेदें विषयीं रत पापिष्ठ । भोगिती कष्ट यास्तव ते ॥ ६४ ॥ आम्ही त्यक्तनृपासन । ऐसें बोलिले जें भगवान । ऐका तयाचें निरूपण । सत्य म्हणोन प्रतिपादी ॥ २६५ ॥ तुझे सेवक जे विरक्त । विषयीं विमुख निजात्मरत । तिहीं नृपासन जें त्यक्त । गाढ ध्वान्त मानूनी ॥ ६६ ॥ परम दुष्कृत निरयस्थान । गाढ अन्धतम नृपासन । तें तव सेवक त्यजिती पूर्ण । मां तूं कोठून स्वीकरिसी ॥ ६७ ॥ अस्पष्टमार्गगामी आम्ही । नाकळो लौकिकमार्गधर्मीं । हेंही बोलिलां सत्य स्वामी । नेणिजे अधर्मीं पथ तुमचा ॥ ६८ ॥

त्वत्पादपद्ममकरंदजुषां मुनीनां वर्त्मास्फुटं नृपशुभिर्ननु दुर्विभाव्यम् ॥
यस्मादलौकिकमिवेहितमीश्वरस्य भूमंस्तवेहितमथो अनु ये भवंतम् ॥३६॥

त्वत्पदपद्मामोद भ्रमरा । होवोनि सेविती जे मुनिवर । त्यांचाचि मार्ग नेणती नर । जे पामर पशुरूपी ॥ ६९ ॥ नराकार पशूंच्या व्यक्ति । विवेकशून्य विषयीं रमती । आहारनिद्राभयस्त्रीरति । ते कैं जाणती मुनिपदवी ॥२७०॥ त्वत्पदपद्मभजकांचा आचार । नरपशूंतें अगोचर । मा तूं केवळ परमेश्वर । त्वत्पथ गोचर केंवि तयां ॥ ७१ ॥ पिहित मार्ग तव भजकांचा । अलौकिक यालागीं साचा । म्हणोनि अस्पष्ट मार्ग तुमचा । बोलिला वाचा तो सत्य ॥ ७२ ॥ अस्पष्टमार्गी यालागिं आम्हां । आश्रयिती ज्या सकाम वामा । त्या भोगिती दुःखधामा । ऐशिया नर्मा वदलां जे ॥ ७३ ॥ याचें उत्तर श्लोकान्तरीं । देइजेल श्रीमुरारि । निष्किंचनत्व तज्जनमित्रीं । आढ्यत्व दुरी परिहरित ॥ ७४ ॥

निष्किंचनो ननु भवान्न यतोऽस्ति किंचिद्यस्मै बलिं बलिभुजोऽपि हरंत्यजाद्याः ।
न त्वा विदंत्यसुतृपोऽन्तकमाढ्यतांधाः प्रेष्ठो भवान्बलिभुजामपि तेऽपि तुभ्यम् ॥ ३७ ॥

आम्ही निष्किंचन म्हणोनी । यथार्थ वदली प्रभूची वाणी । आढ्य निष्किंचनालागोनी । न भजती स्वर्मीं भो सुभ्रू ॥ २७५ ॥ तुम्हांवांचून किञ्चिन्नाहीं । हें अकिंचनत्व तुमचे ठायीं । पूज्यापूज्य जें जें कांहीं । भजती तेही पद तुमचें ॥ ७६ ॥ बळिनामें बोलिजे पूजा । तुम्हां जे अर्पिती बरवे वोजा । परस्परेंचि गरुडध्वजा । प्रियतम ते तुम्हां त्यांसि तुम्ही ॥ ७७ ॥ विद्याधनबळें मदाढ्य मूढ । प्राणतर्पक विषयीं रूढ । ते कैं जाणती हृदयस्थ गूढ । अंतक प्रौढ मदर्तो ॥ ७८ ॥ आढ्यपणेंचि जे मदान्ध ।

विषयनिष्ठ बुद्धिमंद । काळात्मया तुझा त्यां बोध । न घडे प्रसिद्ध त्रिवाचा ॥ ७९ ॥ यालागीं निष्किंश्चनजनप्रिय । बोलिलां तैसेंचि सत्य होय । आढ्य नेणती तुमची सोय । हाही प्रत्यय प्रत्यक्ष ॥२८०॥ आढ्य नभजती अकिंचना । ऐशिया अस्पष्टमार्गभजना । भजती सकाम ज्या अंगना । त्या दुःखभाजना निरंतर ॥ ८१ ॥ एवं उभयतां असम घटित । करणें केवळ हें अनुचित । या वाक्याचा इत्थंभूत । विवरी अर्थ वैदर्भी ॥ ८२ ॥ तो परिसिजे श्रोतीं चतुरीं । वाखाणिजेल शुकवैखरी । मराळप्राय क्षीरनीरीं । श्रवणचंचुव्यापारें ॥ ८३ ॥

त्वं वै समस्तपुरुषार्थमयः फलात्मा यद्वांछया सुमतयो विसृजति कृत्स्नम् ।
तेषां विभो समुचितो भवत. समाजः पुंसः स्त्रियाश्च रतयोः सुखदुःखिनोर्न ॥ ३८ ॥

समस्त पुरुषार्थांचें फळ । सुकृतोत्थित जें सुख केवळ । तो तूं परमानंदबहळ । आत्मा निर्मळ सर्वगत ॥ २८५ ॥ ऐशिया तुझिया वांछेकरून । सुमति जे जे मुनि सर्वज्ञ । सेव्यसेवकभावाभिज्ञ । सुखसंपन्न भजताती ॥ ८६ ॥ ते निष्काम कामरहित । उचित भोगिती तव एकान्त । स्त्रीपुम्भावें मिथुनीभूत । सकाम दुःखित सत्यचि हें ॥ ८७ ॥ इहामुष्मिकविषयगोडी । कामिनी कामुक कामनाप्रौढी । रमती ते मग दुःखकोडी । भोगितां घडिघडी रडताती ॥ ८८ ॥ हेंचि अनुचित सर्वांपरी । यथार्थ स्वामीची वैखरी । भिक्षुस्तवनें उगाचि थोरी । ते यावरी परिहरिते ॥ ८९ ॥

त्वं न्यस्तदंडमुनिभिर्गदितानुभाव आत्माऽऽत्मदश्च जगतामिति मे वृतोऽसि ।
हित्वा भवद्भ्रुव उदीरितकालवेगध्वस्ताशिषोऽब्जभवनाकपतीन्कुतोऽन्ये ॥ ३९ ॥

नेणोनि न विचारूनि सोय । भीमकी मातें वरिलेंसि काय । बुद्धिमंदत्वें दोषद्वय । आरोपिलें जें स्वामीनें ॥ २९० ॥ ऐका तयाचा परिहार । म्यां जो निर्दोष विचार । करूनि धरिला तुमचा कर । तोही प्रकार अवधारा ॥ ९१ ॥ आत्मा सर्वां प्रियतम पूर्ण । तो तूं जगदात्मा श्रीभगवान । वृथा नव्हेचि तुझें वचन । मुनि सर्वज्ञ वर्णिती जें ॥ ९२ ॥ तूतें जाणोनियां सर्वग । जिहीं केला दंडत्याग । तव वर्णनीं वेंठले चांग । समरसरंग लाहूनी ॥ ९३ ॥ त्यांचें वर्णन नव्हे वृथा । कीं ते उचितचि सर्वगता । सर्व भूतीं एकात्मता । परमात्मया जगदीशा ॥ ९४ ॥ ज्याचिया आनंदमात्रें करून । अन्य भूतां उपजीवन । तो म्यां वरिलासि अमृतघन । नाहीं नेणोनि भ्रमलें पैं ॥ २९५ ॥ हा दोष लाविला मजकडे । परन्तु असो घडेल तिकडे । अधिक सहसा न वदें तोंडें । सप्रेम चाडे तथापि हें ॥ ९६ ॥ लोकपाळांचिया विभूति- । संपन्न राजे तुज वांछिती । त्यांतें त्यजिलें मंदमति । हा दोष निश्चिती मज न लावा ॥ ९७ ॥ तुम्हांपासोनि जे जे अवर । वरिष्ठविधि भवशक्रादि अमर । काळकळनेचा वाहती घोर । व्याकुळतर सुखदुःखें ॥ ९८ ॥ तुजपासोनि उदया आला । तो काळ सर्वां ग्रासिता झाला । विधिहरांच्या मनोरथाला । विध्वंस केला पैं ज्यानें ॥ ९९ ॥ विधिहरांचीं आशीर्बळें । प्रतापें

भंगिलीं जया काळें । तेथ कायसीं नृपांचीं कुळें । तुच्छें विकळें भवग्रस्तें ।। ३०० ।। जो सिंहाची नरडी मुरडी । त्यापुढें केउती मशकप्रौढी । एवं नृपकुळें बराडी । सकाम वेडीं मम लोभें ।। १ ।। ऐसें विवरूनियां चित्तीं । म्यां त्यागिलें नृपांप्रति । मज म्हणितलें मंदमति । तद्दोषनिवृत्ति हे केली ।।२।। बुद्धिमंदत्व माझिये माथां । बोलिलां तें परिहारितां । यावरी कोणीकडे जडता । दिसोनि आली तें विवरा ।। ३ ।। आपुल्या दोषाची निवृत्ति । करूनि बोलती झाली पुढती । म्हणे स्वामी ऐका विनती । व्यंग्य नर्मोक्ति ज्या वदलां ।। ४ ।। आपुली सर्वज्ञता लोपून । सद्गुणप्रतापा आच्छादून । क्षुद्रपुरुषांचें गुणवर्णन । स्वमुखें निंदून आपणातें ।। ३०५ ।। इत्यादि वचनीं माझ्या ठायीं । प्रदीप्त कोप करूनि पाहीं । प्रेमकलहाची नवाई । ते चतुराई तुम्हां योग्य ।। ६ ।। अनन्य अवंचक स्वपदनिरता । विदित असतां सर्वगता । वंचूनि स्वगुण ऐसिये छळितां । आली जडता कोणीकडे ।। ७ ।।

जाड्यं वचस्तव गदाग्रज यस्तु भूपान्विद्राव्य शार्ङ्गनिनदेन जहर्थ मां त्वम् ।
सिंहो यथा स्वबलिमीश पशून्स्वभागं तेभ्यो भयाद्यदुदधिं शरणं प्रपन्नः ।। ४० ।।

अजां अविकां पश्वादिकां । शूकरां वानरां ऋक्षां शशकां । गजव्याघ्रादिवृकजंबुकां । आमिषभागार्थ झोंबतां ।। ८ ।। त्यांमाजि प्रतापें मृगेन्द्र जैसा । तयां विध्वंसी गर्जनेसरिसा । धाकें पळती दाही दिशा । मग आपैसा बळि हरी ।। ९ ।। तैसेंचि तुवां कौण्डिन्यपुरीं । ज्याबद्धशार्ङ्गटणत्कारीं जरासंधादि भूपें समरीं । पळती घाबरीं पशुसाम्यें ।। ३१० ।। नृपें भंगिलीं जीं किंमात्रें । पळालीं प्राणावशिष्टगात्रें । झालीं अपयशाचीं पात्रें । हें म्यां स्वनेत्रें देखिलें ।। ११ ।। तयांमाजूनि आपुला भाग । मजला मानूनि रमांश चांग । जाणोनि आपुलें अर्धाङ्ग । हरण केलें प्रतापें ।। १२ ।। तयां पामरां नृपांभेणें । समुद्रा शरण ठालों म्हणणें । जाड्य मान्द्य या भाषणें । म्हणावें कोणें परकीयें ।।१३।। आणि अस्पष्टवर्त्मनां आम्हां । ज्या ज्या आश्रयिती पैं वामा । त्या त्या पात्र होती श्रमा । मेघश्यामा हें वदलां ।। १४ ।। हेंही मान्द्याचिमाजी पडे । बोलों न शकवे जरी भिडे । प्रेमसंरंभाचिये चाडे । बोलणें आवडे तरी ऐका ।। ३१५ ।।

यद्वांछया नृपशिखामणयोऽङ्गवैन्यजायंतनाहुषगयादय ऐकपत्यम् ।
राज्यं विसृज्य विविशुर्वनमंबुजाक्ष सीदंति तेऽनुपदवीं त इहास्थिताः किम् ।। ४१ ।।

ज्या तुमचिया भजनासाठीं । विरक्त भूप कोट्यानकोटी । भववैभवा देवोनि पाठी । लागले वाटीं भजनाचे ।। १६ ।। तया नृपांचे शिखामणि । श्रेष्ठ श्रेष्ठ वदती वाणी । ते परिसावे चक्रपाणि । जे पुराणीं विख्यात ।। १७ ।। अंगनामा पृथूचा आजा । वैन्य पृथूचि गरुडध्वजा । जायंतनामें भरत सहजा । अंबरीषादि सर्वही ।। १८ ।। नाहुष नाम यदूचा जनक । गयभूपाळ पुण्यश्लोक । ऐसे तव मार्गी अनेक । आश्रयूनियां राहिले ।। १९ ।। ते दुःखाचें पात्र झाले । ऐसें कोणीं कैं ऐकिलें । तव

पदपद्मामृतें धाले । ते समरसले सायुज्यीं ॥ ३२० ॥ आमुच्या मार्गा जे आश्रयिती । ते दुःखाचें पात्र होती । ऐसी गोष्टी जे अघडती । शोभे निश्चिती स्वामींतें ॥ २१ ॥ असो आणिकी ऐकें परी । आढ्यां अकिंचनां न घडे सरी । आपणा अनुरूप भूप विचारीं । कां हे वैखरी मंद नव्हे ॥ २२ ॥

काऽन्यं श्रयेत तव पादसरोजगंधमाघ्राय सन्मुखरितं जनताऽपवर्गम् ।
लक्ष्म्यालयं त्वविगणय्य गुणालयस्य मर्त्यासदोरुभयमर्थविविक्तदृष्टिः ॥ ४२ ॥

तं त्वाऽनुरूपमभजं जगतामधीशमात्मानमत्र च परत्र च कामपूरम् ।
स्यान्मे तवांघ्रिररणं सृतिभिर्भ्रमंत्यां यो वै भजंतमुपयात्यनृतापवर्गः ॥ ४३ ॥

तूं जो अनंतगुणपरिपूर्ण । अनंत अमोघ नामेंकरून । कालत्रयीं विराजमान । जगदुद्धरण यशोगानें ॥ २३ ॥ यश वर्णितां उरगपति । पार न पावोनि झाला सुपति । मौनावल्या श्रुति स्मृति । नव नव कीर्ति नाकळतां ॥ २४ ॥ ऐसिया तुझा पादाब्जगंध । तव पदभजकां मोक्षप्रद । लक्ष्मीचें जें स्थान विशद । सज्जनवृंद ज्या वर्णी ॥ ३२५ ॥ त्यातें करूनि अवघ्राण । ऐसियातेंही अवगणून । कोणती वधू अमज्ञान । मर्त्यालागून भजतसे ॥ २६ ॥ अर्थीं अविविक्त दृष्टि जिची । यास्तव मर्त्यां न जाणेचि । जेथ संपदा बहु भयाची । तया अन्याची प्रीत तिये ॥ २७ ॥ यास्तव मरणधर्मिका तेही । पडूनि वहळभवप्रवाहीं । सदैव निमग्न दुःखडोहीं । नश्वरनिरता म्हणोनियां ॥ २८ ॥ अगुणत्वदोष आपणाकडे । बोलिलां तेंही वचन कुडें । अचिंत्यानंतगुणपडिपाडें । येर बापुडें कोण तुके ॥ २९ ॥ अनुरूप वरीं म्हणोनि वदलां । तरी अनुरूप जाणोनि पूर्वींच वरिलां । त्रिजगदधीश जो दादुला । इहा-मुष्मिककामद जो ॥ ३३० ॥ तया तुम्हांहूनियां थोर । बहळभयाकुळ पामर । अनुरूप वरीं हें उत्तर । जाड्यतर कीं नाहीं ॥ ३१ ॥ तवांघ्रिपद्मप्राप्ति शरण । मजकारणें हें अनुरूप पूर्ण । असो ऐसें मम प्रार्थन । स्वामीलागोन नित्यत्वें ॥ ३२ ॥ सृतिशब्दें संसृतीमाजी । देवतिर्यङ्मर्त्यराजी । अक्षय-सुखार्थ तव पदकंजीं । न भजोनि झाली भ्रमग्रस्त ॥ ३३ ॥ तया भ्रमाचें कारण । वेदार्थफळवाद करूनि श्रवण । इहामुष्मिक अभिवांछून । करिती भ्रमण भवस्वर्गीं ॥ ३४ ॥ पशुबंध सोमचयन पौण्ड्रक । वाजपेय गोमेध हयमेध मुख्य । ज्योतिष्टोमादि मख सम्यक । करूनि याज्ञिक भवीं भ्रमती ॥ ३३५ ॥ इहामुष्मिक नश्वर फळ । यज्ञाचरणीं क्लेश बहळ । वेदार्थवादांचें देवोनि बळ । संसृति-व्याकुळ त्रिविधत्वें ॥ ३६ ॥ देवतिर्यङ्मानव भ्रमती । त्यांमाजी कोणी तव पदभक्ति । अनुसरतां तो अमृतावाप्ति । लाहे निश्चिती पदभजनें ॥ ३७ ॥ भवाभास जो हा अनृत । करणगोचर विवर्तभूत । त्याचा अपवर्ग म्हणिजे अंत । इत्थंभूत पदभजनें ॥ ३८ ॥ ज्या पदभजनास्तव भवनाश । भजकां आत्मत्वीं समरस । ते तव चरण भवभीतांस । शरणागतांस शरण्य ॥ ३९ ॥ अनुरूप म्हणिजे भजना-योग्य । सर्व भयाचा जेथ भंग । जाणोनि म्यां वरिला श्रीरंग । जडता ममाङ्ग न शिवे पैं ॥ ३४० ॥ आणिक प्रभूची विपरीत उक्ति । रोषें निरूपी भीमकी सती । लोकपाळांच्या नृपविभूति । त्या तुज वांछिती सप्रेम ॥ ४१ ॥ बलाढ्य धनाढ्य गुणाढ्य भूप । रूपें स्मराचा करिती लोप । ज्यांचा अचाट

वीर्यप्रताप । गुणगण अमूप जयांचे ।। ४२ ।। ऐसे ही जे तुज वांछिती । उपेक्षूनियां तयांप्रति । आम्हां वरिलें हें निजमतीं । अयुक्त सर्वार्थी वदलेती ।। ४३ ।। याचें उत्तर देतिये समयीं । ईर्ष्या उदेली भीमकीहृदयीं । सशाप अंगुलिभंगें पाहीं । वदती दोहीं श्लोकार्थी ।। ४४ ।।

तस्याः स्युरच्युत नृपा भवतोपदिष्टाः स्त्रीणां गृहेषु खरगोश्वबिडालभृत्याः ।
यत्कर्णमूलमरिकर्षण नोपयायाद् युष्मत्कथा मृडविरिंचसभासु गीताः ।। ४४ ।।
त्वक्श्मश्रुरोमनखकेशपिनद्धमंतर्मांसास्थिरक्तकृमिविट्कफवातपित्तम् ।
जीवच्छवं भजति कांतमतिर्विमूढा या ते पदाब्जमकरंदमजिघ्रती स्त्री ।। ४५ ।।

जळो तें दुर्भगेचें वदन । म्हणे अंजलि भंगून । जे विषयान्ध मूर्ख अज्ञान । ते तीलागून वर होत ।। ३४५ ।। ते कोण ऐसें म्हणाल स्वामी । जे उपदेशिले प्रेमसंरंभीं । जे निरंतर स्त्रियांचे सद्मीं । वर्तती कर्मी तिर्यग्वत् ।। ४६ ।। अच्युतैश्वर्यविराजमान । यालागीं अच्युत संबोधन । देऊनि निरूपी नृपांचे गुण । परमसज्ञान वैदर्भी ।। ४७ ।। तुम्हीं उपदेशिले जे राय । तयांचें ऐश्वर्य सांगों काय । स्त्रियांचे सदनीं तिर्यक्प्राय । वर्तती सोय ते ऐका ।। ४८ ।। केवळ रासभाचिये परी । प्रपंच ओझें वाहती शिरीं । किंवा बलीवर्दाचे परी । गृहव्यापारीं कृषीवलवत् ।। ४९ ।। वेसणीसहित विषाणीं दोरा । लावोनी जुंपिती नांगरा । पूर्व पश्चिम प्रपंचफेरा । करवितां प्रहारा करिताती ।। ३५० ।। किंवा श्वानाचिये परी । नित्य जागती स्त्रियेचिये द्वारीं । अपर देखोनियां गुरगुरी । स्त्रीशरीरीं लुलुवत ।। ५१ ।। धिक्कारिल्या दुरी न वचे । निर्भर्त्सिल्या मनीं न कांचे । लुब्धकरूनि बोले वाचे । जेंवि श्वानाचे कुर्यी शब्द ।। ५२ ।। तुकडा देखोनि पुसाटी हलवी । तेंवि स्त्रियेच्या रुचिरावयवीं । वक्रकटाक्षें नयन गोवी । मानी नयनीं श्लाघ्यत्व ।। ५३ ।। हाडी म्हणतां लोळण घाली । चुचुकारितां गोंडा घोळी । मिटक्या देवोनि चाटी अवाळी । स्त्रीमुखाजवळी श्वानवत् ।। ५४ ।। डोळे मिचकावूनि पाहे । अवमानिलें तितुकें साहे । पुढतीं आश्रयूनियां पाय । श्वानप्राय लुडबुडती ।। ३५५ ।। छो म्हणतां पाठी लागे । हाडी म्हणतां राहे उगें । तैसे स्त्रियेच्या वचनासंगें । होती सवेगें रुष्ट तुष्ट ।। ५६ ।। मारूं जातां पायीं लोटे । तोंडें विचकूनि होय उफराटें । लोटूनि देतां बळेंचि भेटे । अनेक कूटें सोसूनी ।। ५७ ।। असो ऐसे श्वानापरी । अवमान साहती स्त्रियांचे घरीं । याहूनियां नीचतरीं । साम्य मार्जारीं अनुकरिती ।। ५८ ।। ताटाभोंवतें मांजर फिरे । तेंवि भोंवते घालिती फेरे । मेऊं शब्दाच्या अनुकारें । नर्मोत्तरें टोंकती ।। ५९ ।। याहूनि नीचतर राहटी । मांजर जैसें पोटासाठीं । वधी क्षुद्र-जीवांच्या थाटी । तैसे सृष्टी हिंसक जे ।। ३६० ।। एके स्त्रियेची पुरवितां आशा । भंगिती बहुतांच्या मानसा । न मानिती हिंसादोषा । भोगलालसाव्यापारीं ।। ६१ ।। अथवा स्त्रियांचिये घरीं । नीचकार्यें किंकरापरी । अष्टौ प्रहर ओरबारीं । जे संसारीं रखडती ।। ६२ ।। ऐसे जे हे क्षुद्र नृपति । स्वमुखें बोधिले जे यदुपति । ते त्या दुर्भगा स्त्रियांचे पति । असोत निश्चिती दैवबळें ।।६३।। त्या दुर्भगा म्हणाल कैशा । जेणें श्रवणीं तुमचिया यशा । ऐकोनि महिमा तव मानसा । नाहीं आपैसा अनुभविला ।।६४।।

त्यां तव महिमा गोचर नेसा। नृपवल्लभता प्रियतम असो। तवगुणकीर्तनविमुखां भासो। विषय पीयूषापडि-पाडे ॥३६५॥ म्हणसी मत्कथा कोणा रुचती। तरी मृडानीमृड कैलासपति। स्कंद नंदिकेश्वर अगस्ति। संवादती शिवसदनीं ॥ ६६ ॥ तैसेचि विरंचिसभेमाजी। सनकादि नारद तुम्बुरु सहजीं। वर्णितां तच्छ्रवणें हृदयाब्जीं। महर्षिप्रमुख निवताती ॥ ६७ ॥ शक्रसदनीं बृहस्पति। प्रह्लादप्रमुखां शुक सुमति। भोगभुवनीं वासुकीप्रति। निरूपिती कमलाक्ष ॥ ६८ ॥ विष्णुभक्तीं भूमंडळीं। तव गुणगरिमा स्थळोस्थळीं। वाखाणितां सप्रेमळीं। सावध श्रवणीं प्राशिजेत ॥ ६९ ॥ ऐसें तव गुणकथा-मृत। जीचिया श्रवणीं नाहीं प्राप्त। ते नश्वर नृपातें कान्त। करूनि एकान्त भोगो पैं ॥ ३७० ॥ तवपदकमळींचा मकरंद। श्रवणमानसा अनुपलब्ध। घ्राणें सेविती जेंवि षट्पद। तेंवि तन्मोद जी नेणे ॥ ७१ ॥ तेचि वनिता मूढमति। भुञ्जूनि नृपाचिये संपत्ती। कान्त मानूनि जीवत्प्रेतीं। सप्रेमरतिरुचिरत्वें ॥ ७२ ॥ जैसे मृत्तिकेचे गोळे। पुरुषाकारें करकौशल्यें। लेप्यें शृंगारिताति कुशलें। भुलती अबळें लावण्या ॥७३॥ तैसें सजीव नरवरमडें। चर्में मढिलें चहूंकडे। मूर्धज कुंतळ स्मश्रु खांडें। समांस हाडें माजिवडीं ॥ ७४ ॥ लावण्य भासे श्याम गौर। तो त्वचारंग बाह्याकार। माजी भरलें कुत्सिततर। तोही प्रकार अवधारा ॥ ३७५ ॥ रक्तपूर्ण शिरांच्या सूत्रें। आपाद वेष्टिलीं सर्वगात्रें। आंत भरलीं विष्ठामूत्रें। दुर्गंधिपात्रें ज्यापरी ॥ ७६ ॥ वातपित्तकफादि रोग। शरीरमात्रीं यांचा योग। न्यूनाधिक्यें होती सरोग। सुखदुःखभोग अनुभविती ॥ ७७ ॥ वदनीं प्रवाह चाले लाळे। सर्वदा घ्राणें श्लेष्मा गळे। चिपडीं चिपडे होती डोळे। श्रवणीं मळें दुर्गंधि ॥ ७८ ॥ शिश्नद्वारें मूत्र पाझरे। स्त्रीचिंतनें वीर्य क्षरे। श्वास सांडितां अधोद्वारें। घ्राण घाबरें त्या गंधें ॥ ७९ ॥ कृमि जंतु यूका लिखा। सबाह्य बुचबुचिती पैं देखा। ऐसियांच्या आश्लेषसुखा। भजती मूर्खा मंदमती ॥३८०॥ तव पदकंजांचा सुवास। अवघ्राण नाहींच ज्यांस। त्याचि सजीवा नरकुणपास। भजती संतोष मानूनी ॥ ८१ ॥ आढ्या टाकूनि औदासीन्य। वरणें तेंचि अनुचित पूर्ण। ऐसें बोलिले श्रीभगवान। ऐका वचन तद्विषयीं ॥ ८२ ॥

> अस्त्वंबुजाक्ष मम ते चरणानुराग आत्मन्रतस्य मयि चानतिरिक्तदृष्टेः।
> यर्ह्यस्य वृद्धय उपात्तरजोऽतिमात्रो मामीक्षसे तदु ह न. परमाऽनुकपा ॥ ४६ ॥

तरी तेंही सुखें असो स्वामी। औदासीन्य तुमचे तुम्ही। मिरवत असतां सर्व धर्मीं। आम्हां हृत्पद्मीं तें न वसो ॥ ८३ ॥ निरपेक्षत्वें तुमची प्रीति। कोठें न गुंतो श्रीपति। आम्हां तव पदकंजरति। असो निश्चिती अनुरागें ॥ ८४ ॥ माझ्या ठायीं बाह्यविषयीं। म्हणाल माझी प्रीति नाहीं। आत्मनिरत सर्वदाही। वरिल्या कायी फळलाभ ॥ ३८५ ॥ तरी तव चरणींचा अनुराग। हें अनंतजन्मींचें सुकृत-भाग्य। उत्कृष्ट लाभ हाचि चांग। याहूनि भाग्य नापेक्षूं ॥ ८६ ॥ जरी तूं विश्ववृद्धीकारणें। अल्प वेंठसी रजोगुणें। तैं या त्रिजगा सुखपारणें। अल्प कारुण्यें औत्कंठ्यें ॥ ८७ ॥ तैसा होत्साता जरी

मातें । अवलोकिसी अपाङ्गपातें । याहूनि वरिष्ठ सुख कोणतें । माझे चित्तें न मनिजे ।। ८८ ।। तेचि तुझी परमानुकंपा । अत्युत्कृष्ट अनुग्रहरूपा । या वेगळें मम संकल्पा । मन्मथबापा न रुचों दे ।।८९।। जरी तूं निरपेक्ष उदासीन । तथापि तव पदीं मम मन लीन । सप्रेम रंगें रंगो पूर्ण । इतुकें वरदान पुरे आम्हां ।। ३९० ।। तूं सर्वदा आत्मनिरत । माझें तव पदीं मानस रत । असो अनन्य भ्रमरवत । अनुरागवंत जगदीशा ।। ९१ ।। ऐसीं भगवंताचीं वचनें । भगवंताच्या प्रेमसंमानें । वाखाणिलीं रुक्मिणीनें । तत्तोष श्रवणें उपजाव्या ।। ९२ ।। यानंतरें प्रसन्नचित्ता । संमत हरीच्या मनोगता । होवोनि वदली विदर्भदुहिता । तें कुरुनाथा अवधारीं ।। ९३ ।।

नैवालीकमहं मन्ये वचस्ते मधुसूदन । अम्बाया इव हि प्रायः कन्यायाः स्याद्रतिः क्वचित् ।। ४७ ।।

स्वामी बोलिले जियेपरी । लटकी नोहे ते वैखरी । कन्या असतां जनका घरीं । भूपा अंतरीं कामिती ।। ९४ ।। अंबा अंबिका अंबालिका । तिघी काशीश्वराच्या कन्यका । त्यांमाजी शाल्वाच्या अभिलाखा । अंबा करिती जाहली ।। ३९५ ।। तिये अंबेचिये परी । कन्या असंस्कृता जनकाघरीं । वर वांछी ते स्वयंवरीं । अभ्यंतरीं अनुरूप ।। ९६ ।। क्वचित् कोठें कोठें ऐसी । कन्या अनुरूप वर अभिलाषी । स्वामी वदले जे याविशीं । तें मिथ्या कोणासी म्हणवेल ।। ९७ ।। भगवद्वचना देऊनि मान । इतुकें केलें उपपादन । याहूनि कांहीं बोलिली आन । तें सर्वज्ञ परिस तूं ।। ९८ ।।

व्यूढायाश्चापि पुंश्चल्या मनोऽभ्येति नवं नवम् । बुधोऽसतीं न बिभृयात्ता बिभ्रदुभयच्युतः ।। ४८ ।।

म्हणे स्वामी अद्यापिवरी । चैद्यमागधप्रमुखां वरीं । हेही स्वामींची वैखरी । जनव्यवहारीं वर्ततसे ।। ९९ ।। एकें पर्णून आणिली घरा । जे पुंश्चळी असती दारा । नव नव यूनां देखोनि नरां । विकार अंतरामाजी उठती ।। ४०० ।। पर्णित पुरुष असतां शेजे । मानसें नव नव तरुणां भजे । सज्ञान पुरुष तीतें उमजे । मानी ओझें भरणादि ।।१।। भरण पोषण तीचें न करी । त्यागी जाणोनि दुराचारी । विषयसुखास्तव न टाकी दुरी । तो अधिकारी नरकाचा ।। २ ।। सज्ञान जाणोनि तिची चर्या । तत्काळ त्यागी पुंश्चळी जाया । तदासक्त तो लोकद्वया । पासोनि पतन पावतसे ।। ३ ।। जनांमाजी क्वचित् वर्ते । म्हणोनि बोलिलें श्रीअनंतें । येऱ्हवीं मद्विषयीं अघडतें । सर्वज्ञातें विदित असे ।। ४ ।। माझें नव नव पुरुषांवरी । मानस धांवत असेल जरी । जाणोनि सर्वज्ञ अंतरीं । मग मज बाहेरी घालावें ।। ४०५ ।। अपराध नसतां प्रेमकलहें । स्वामी वदलां कठोर जें हें । तें भेदतां वज्रप्रायें । पुढती स्नेहें सान्तविलें ।। ६ ।। जाणोनि सान्तवनाचें प्रेम । मीही वदलें जें समविषम । त्या नर्मोक्ति कुसुमा-सम । दुरुक्ति अधम न मानाव्या ।। ७ ।। कामसंभ्रमामाझारी । दंपती वदतां नर्मोत्तरीं । आनंदभरित ते परस्परीं । रोष अंतरीं न स्पर्शे ।। ८ ।। यालागीं उच्चावचें वचनें । सर्व क्षमावीं जनार्दनें । इतुकी प्रार्थना करूनि मौनें । चरण लक्षूनि तिष्ठतसे ।। ९ ।। हें ऐकूनि जगदीश । भीमकीचें मनःसारस । निर्भय पावावया संतोष । बोले पीयूषमय वचनें ।। ४१० ।।

श्रीभगवानुवाच-साध्व्येतच्छ्रोतुकामैस्त्वं राजपुत्रि प्रलंभिता। मयोदितं यदन्वात्थ सर्वं तत्सत्यमेव हि ॥ ४९ ॥

हरि म्हणे वो साधुशीले । पतिव्रते भीष्मकबाळे । विनोदवचनें तवमुखकमळें । उपहास केले परिसावया ॥ ११ ॥ तुवां बोलावें मृदुतर वचनीं । गुणलावण्यचातुर्यखाणी । तववाक्यश्रवणाची शिराणी । आमुचे मनीं बहुकाळ ॥ १२ ॥ यालागीं आजि ये विलाससमयीं । नर्मोक्ति वदलों ज्या ज्या कांहीं । ते ते प्रेमसंरंभनवाई । नेणोनि हृदयीं भंगलीस ॥ १३ ॥ मग म्यां केलें सान्तवन । तेणें होवोनि निर्भय पूर्ण । तुझें यथोचित भाषण । तें यथार्थ व्याख्यान मान्य आम्हां ॥ १४ ॥ माझिया वचनामाजील अर्थ । तुवां वाखाणिला अन्वर्थ । तो तैसाचि होय हें यथार्थ । जाण निश्चित भीमकिये ॥ ४१५ ॥ राजपुत्रि या संबोधनें । भीमकी सम्मानिली बहुमानें । यावरी बोले प्रसन्नमनें । तीं हरिवचनें अवधारा ॥ १६ ॥

यान्यान्कामयसे कामान्मय्यकामाय भामिनि । संति ह्येकातभक्तायास्तव कल्याणि नित्यदा ॥ ५० ॥

माझ्या ठायीं एकान्तभक्ता । भववैभवीं पूर्ण विरक्ता । जे जे काम कामिसी आतां । ते ते तत्त्वतां सफळाचि ॥ १७ ॥ कामकामी जे जे जीव । जन्ममरणें भोगिती भव । ते मोक्षाचें नेणती नांव । ह्मणें हा भाव मनीं धरिसी ॥ १७ ॥ एकान्तभक्ता माझे ठायीं । तुझे काम जे जे कांहीं । ते सफळचि सर्वदा-हीं । हे नवाई मद्भजनीं ॥१८॥ कामनिवृत्तिकारणें । मज कामिलें कामाचि जाण । मोक्षीं समरस करिती पूर्ण । हें महिमान मत्कामीं ॥१९॥ प्रेमसंरंभें सकोपिनी । जाणोनि संबोधी भो भामिनी । कोपनिवृत्ति झालिये क्षणीं । म्हणे कल्याणि भीमकिये ॥४२०॥ तुझेनि त्रिजगाचें कल्याण । ते तूं ऐकोनि उपहासवचन । हृदयीं झालीस परमोद्विग्न । असमाधान मानूनी ॥२१॥ तुझिया उक्तिश्रवणा-साठीं । आम्ही वदलों उपहासगोठी । जाणोनि विषाद न धरीं पोटीं । म्हणे जगजेठी तें ऐका ॥२२॥

उपलब्धं पतिप्रेम पातिव्रत्यं च तेऽनघे । यद्वाक्यैश्चाल्यमानाया न धीर्मय्यपकर्षिता ॥ ५१ ॥

ऐसिया अनुवादेंकरून । भोगमोक्षादि वर देऊन । भीमकीतें श्रीभगवान । आनंदपूर्ण करीतसे ॥२३॥ अनघे म्हणोनि संबोधिलें । म्हणे निष्पापे ऐकिलें । तुझें पातिव्रत्य भलें । त्वां जोडिलें पतिप्रेमें ॥२४॥ आम्ही उपहासवाक्यंकरून । चंचल केलें तुझें मन । परी त्वां माझे ठायींहून । बुद्धिकर्षण न केलें ॥४२५॥ माझिया नर्मोक्तीच्या श्रवणीं । चंचळ न होतां अन्तःकरणीं । बुद्धि अन्यत्र विषयगामिनी । नव्हे म्हणोनि मी जाणें ॥२६॥ इतुकें बोलोनि रुक्मिणीप्रति । सकाम तापस जे जे व्रती । त्यांतें निंदी एकान्तभक्ति । दृढ कराया कारणें ॥२७॥

ये मां भजंति दांपत्ये तपसा व्रतचर्यया । कामात्मानोऽपवर्गेशं मोहिता मम मायया ॥५२॥

कठोर तपें तीव्र व्रतें । करूनि सकाम भजती मातें । भजूनि कामिती सुखातें । मिथुनीभूतें दाम्पत्यें ॥२८॥ दंपती म्हणजे कान्तकामिनी । त्यांसि भोगार्ह ज्या भोगश्रेणी । त्या वांछिती माझिया भजनीं । कैवल्यदानी मीं असतां ॥२९॥ मी जो अपवर्गाचा पति । त्या मज दाम्पत्यसुख वांछिती । मम मायेनें घातली भ्रान्ति । यास्तव नुमगती अपवर्ग ॥४३०॥ क्षीरसमुद्रीं देवोनि बुडी । जेंवि वांछिती फुटकी कवडी । कीं कल्पतरुतळवटीं बराडीं । क्षुधे कडाडी तुष सेवी ॥३१॥ जाऊनि कुबेराचिये मठीं । मागती फुटकी कांचवटी । तेंवि मज भजती भोगांसाठीं । केवळ करंटीं बहिर्मुखें ॥३२॥ तैसें नव्हेचि तुझें भजन । एकान्तभक्ता तुज जाणून । इहामुष्मिक कैवल्यदान । भोगनिर्वाण तुज दिधलें ॥३३॥ सकाम तुझ्याचि ठायीं भजती । तरी कां नोहे भवनिवृत्ति । ऐसी आशंका धरिसी चित्तीं । तरी परिसें यदर्थीं भीमकिये ॥३४॥ दुरत्यया जे मम माया । मोहावर्तें कवळी जयां । तयांची भ्रान्ति निरसावया । समर्थ नव्हती विधि हरही ॥४३५॥ मामेव ये प्रपद्यंते । तेचि तरती मम मायेतें । येरां रजतमसंवलितातें । भजतां मोहातें वरपडती ॥३६॥ पंचायतनीं जे जे भजती । ते ते पावती मजचि प्रति । तरी कां माया न निस्तरती । म्हणसी सुमति तरी ऐक ॥३७॥ रजोगुणीं संभवे राग । तमोगुणीं द्वेषप्रसंग । रागद्वेषरहित चांग । शुद्ध सत्त्वात्मक मम भजन ॥३८॥ म्हणसी सकाम जे जे भजती । ते कैं कोणांतें द्वेषिती । रागें कोणां प्रीति करिती । तेंही निगुतीं अवधारीं ॥३९॥ जियेविषयीं उपजे राग । तोचि विषय कामिती चांग । जिया विषयावरी विराग । द्वेषप्रसंग ते ठायीं ॥४४०॥ बाळक्रीडेच्या प्रसंगीं । अनुराग वर्ते सहोदरवर्गीं । तेचि पितृदायाच्या विभागीं । द्वेषमार्गीं प्रवर्तती ॥४१॥ मातृस्तन्याचा अनुराग । तैं माताच आवडे चांग । यूनां प्रियकर युवतिलिंग । तैं मानी उबग जननीचा ॥४२॥ एवं रागद्वेषोक्त मद्भजन । तेंचि भ्रमाचें मुख्य भाजन । मोहावर्तीं करी निमग्न । तें तूं संपूर्ण अवधारीं ॥४३॥

मां प्राप्य मानिन्यपवर्गसंपदं वांछंति ये संपद एव तत्पतिम् ।
ते मंदभाग्या निरयेऽपि ये नृणां मात्रात्मकत्वान्निरयः सुसंगमः ॥ ५३ ॥

भोग मोक्ष ज्याच्या ठायीं । सहज वर्तती सर्वदाही । ऐसिया मातें भजोनि पाहीं । वांछिती विषयी संपत्ति ॥ ४४ ॥ मातें भजूनि चिरकाळवरी । प्रसन्नतेचिये अवसरीं । मोक्ष न मागूनि विषयविकारीं । संपदा आसुरी वांछिती ॥ ४४५ ॥ मी जो भोगमोक्षांचा पति । प्रसन्न करूनि त्या मजप्रति । मोक्ष न मागूनि भयसंपत्ति । जे वांछिती ते निरयी ॥ ४६ ॥ निरयी म्हणसील कोणेपरी । तेंही भीमकिये अवधारीं । निरययातनामयशरीरीं । जे संसारीं पचताती ॥ ४७ ॥ विष्ठेमाजील जे जे किडे । त्यांसी विष्ठेमाजी पचणें घडे । ऐसें नव्हे तेंचि उघडें । नरक रोकडे देहेंसी ॥ ४८ ॥ विष्ठेमाजी जंतु पचती । सदयें काढून तयांप्रति । ठेविलें दुग्धीं शर्कराघृतीं । तेथ विश्रान्ति त्यां कैंची ॥ ४९ ॥ तस्मात् शरीरें नरकमय । धरूनि पातकीजनसमुदाय । सदेह नरकयातनाप्राय । भोगिता होय

अधगरिमा ॥ ४५० ॥ ऐशिया नरकामाजी पचती । तेथही मैथुनसुखावाप्ति । आहारनिद्राभयोन्नति । वर्ते जातिस्वभावें ॥ ५१ ॥ तस्मान्नरकामाजी जे भोग । अनेक जन्में भोगिले साङ्ग । मज भजोनि तोचि प्रसंग । सकाम दुर्भग वांछिती ॥ ५२ ॥ नरकापासून सोडविता । अक्षय सुखाचा दाता । त्या मज भजून कैवल्यनाथा । नरकसंपदा वांछिती ॥ ५३ ॥ एवं तन्मात्रात्मक जें सुख । तोचि जाणावा उघड नरक । मजही भजूनि तें मागती मूर्ख । विषयकामुक अभाग्य ॥ ५४ ॥ तैसें भजन तुवां न केलें । भवविरागें मन क्षाळिलें । निष्कामप्रेमें आधारिलें । तेंही कथिलें जातसे ॥ ४५५ ॥

दिष्टया गृहेश्वर्यसकृन्मयि त्वया कृतानुवृत्तिर्भवमोचनी खलैः ।
सुदुष्करासौ सुतरां दुराशिषो ह्यसुभराया निकृतिजुषः स्त्रियः ॥ ५४ ॥

पट्टमहिषिये गृहेश्वरी । ऐकें विदर्भनृपकुमारी । माझ्या ठायीं अनुवृत्ति पुरी । केली निर्धारीं एकदाचि ॥ ५६ ॥ ते तूं अनुवृत्ति कैसी म्हणसी । जे मोक्ष देऊनि भवातें निरसी । दिष्टया म्हणिजे कल्याणराशि । निश्चयेंसी तुज लब्ध ॥ ५७ ॥ हेंचि महाभाग्य जाण । आकल्प जोडिलें निष्काम पुण्य । निष्काम अनुवृत्तीसी कारण । भवमोचन ज्या योगें ॥ ५८ ॥ येर ज्या सकाम दुर्वृत्ता नारी । दुष्ट अभिप्राय ज्यां अंतरीं । वंचनपरा सर्वांपरी । दुराचारी दुर्भाग्या ॥ ५९ ॥ यास्तव प्राणतर्पणपरा । वशवर्तिनी खळविकारा । निष्काम अनुवृत्तीचा वारा । त्यांसी दुष्कर जाण पां ॥ ४६० ॥ ऐसिया बुडती भवसागरीं । विषय कामिती नानापरी । दुष्ट मनोरथ ज्यां अंतरीं । प्राणपोषणपरायणा ॥ ६१ ॥ असो त्या दुर्भगांचिया गोष्टी । तुजसारिखी इये सृष्टी । धन्यतमा अन्य गोरटी । न देखें दृष्टी भीमकिये ॥ ६२ ॥

न त्वादृशी प्रणयिनी गृहिणी गृहेषु पश्यामि मानिनि यया स्वविवाहकाले ।
प्राप्तान्नृपानवगणय्य रहोहरो मे प्रस्थापितो द्विज उपश्रुतसत्कथस्य ॥ ५५ ॥

ऐकान्तिकी निष्कामभक्ति । भीमकीची अनन्य प्रीति । स्वमुखें सम्मानी श्रीपति । पूर्वानुष्ठितें स्मरोनी ॥ ६३ ॥ तुजसारिखी इये त्रिभुवनीं । न देखों अन्य प्रणयिनी । विनयभावें माझ्या भजनीं । कायवाङ्मनीं मन्निष्ठा ॥ ६४ ॥ गृहिणी म्हणिजे गृहमेधिनी । पोष्यवर्गाच्या प्रतिपालनीं । ज्येष्ठां श्रेष्ठांचिया सम्मानीं । विनयगुणीं अनुकूळ ॥४६५॥ ऐसी कोठें कोणे गृहीं । तुजसारिखी दुसरी पाहीं । आम्ही कदापि देखिली नाहीं । कान्तविषयीं अनीर्ष्या ॥ ६६ ॥ अवो मानिनि स्वविवाहकाळीं । विख्यात भूभुज भूमंडळीं । तिया नृपांची मंडळी । जिणें त्यागिली वमनवत् ॥ ६७ ॥ कळो नेदितां मातापितरां । विप्र धाडिला द्वारकापुरा । पत्रिकालेखनें अभ्यंतरा । निजनिर्धारा जाणविलें ॥ ६८ ॥ वैष्णव जे मत्परायण । तयांच्या मुखें मत्कथाश्रवण । होतां मन्निष्ठ अंतःकरण । जाणोनि हरण म्यां केलें ॥ ६९ ॥ तैंहूनि माय माहेरींची । सोडोनि दिधली सर्वही रुचि । कदापि गोष्टी बंधुवर्गाची ।

ना इतरांची न काढिसी ॥ ४७० ॥ माता पिता बन्धु स्वजन । त्यांचें श्रवणीं पडतां न्यून । कळवळूनियां स्त्रियांचें मन । होवोनि उद्विग्न पतिभजनीं ॥ ७१ ॥ तैसी नव्हेसि तूं रुक्मिणी । भवविरक्त जैसे ज्ञानी । ईषणात्यागें कैवल्यदानी । जाणोनि भजनीं अनुसरती ॥ ७२ ॥ तैसेंचि तुझें निर्वाणभजन । माता पिता बन्धु स्वजन । सांडून जालीस मदेकशरण । तेंही संपूर्ण अवधारीं ॥ ७३ ॥

भ्रातुर्विरूपकरणं युधि निर्जितस्य प्रोद्वाहपर्वणि च तद्वधमक्षगोष्ठ्यम् ।
दुःखं समुत्थमसहोऽस्मदयोगभीत्या नैवाऽब्रवीः किमपि तेन वयं जितास्ते ॥ ५६ ॥

तुझिया विवाहप्रसंगीं । राजे भंगिले म्यां समरंगीं । तुझा अग्रज रुक्मी वेगीं । पाठीलागीं पावला ॥ ७४ ॥ सांडूनि यादवांचा दळभार । माझा रोधिला रहंवर । युद्ध केलें परम क्रूर । अस्त्रें निष्ठुर वर्षला ॥ ४७५ ॥ तैं त्या मारितां गदाप्रहारें । त्वां प्रार्थिलें करुणोत्तरें । मग त्या विरूप करूनि त्वरें । सजीव शरीरें सोडिला ॥ ७६ ॥ तें तूं अद्यापि कोणे काळीं । वदली नाहींस कोणाजवळी । दुःख न धरूनि हृदयकमळीं । प्रेमकल्लोळीं मज भजसी ॥ ७७ ॥ याहीहूनि विशेष दुःख । तवाग्रजें पौत्रीस्वयंवरीं देख । द्यूतक्रीडेमाजी सम्यक । बळभद्र मुख्य हेळिला ॥ ७८ ॥ तेणें सकोप परिघप्रहारें । रुक्मि मारिला असतां निकरें । तैं त्वां आमुच्या स्नेहादरें । सशोक उत्तरें नाठविलीं ॥ ७९ ॥ अद्यापि कोठें कोणाजवळीं । वदली नाहींस वेल्हाळी । शल्य धरूनि हृदयकमळीं । सर्व काळीं मज भजसी ॥ ४८० ॥ बन्धुस्नेहें विषमोत्तरें । ऐकतां स्वामीच्या अंतरें । क्षोभें ओसंडिजेल अव्हेरें । चित्त घाबरें या योगें ॥ ८१ ॥ याचिया भयास्तव दुःसह दुःख । तुवां गिळिलें समपीयूष । हें मी जाणें अंतरसाक्ष । जिंकिलें नावेक त्वां आम्हां ॥ ८२ ॥ जिहीं अंतरशत्रु जिणिले । सर्वभूतात्मका मज भजले । अभेदबोधें जे उमजले । आम्ही अंकिले पैं त्यांचे ॥ ८३ ॥ आणखी अनन्य संप्रेमभावें । आम्हां जिंकिलें तुवां देवें । कैसें म्हणसी तें आघवें । कथितों स्वभावें तव चरित ॥ ८४ ॥

दूतस्त्वयाऽऽत्मलभने सुविविक्तमंत्र प्रस्थापितो मयि चिरायति शून्यमेतत् ।
मत्वा जिहास इदमंगमनन्ययोग्यं तिष्ठेत तत्त्वयि वयं प्रतिनंदयामः ॥ ५७ ॥

अखिलान्तर्गत जो मी आत्मा । त्या मत्प्राप्तीचिया प्रयत्नकामा । पत्रीं लिहूनि धाडिलें नेमा । ते चातुर्यगरिमा मी जाणें ॥४८५॥ उदयिक दिन लंघूनि परवां । मम विवाहीं नृपां सर्वां । जिंकावया सहयादवां । त्वरित यावें मम हरणा ॥ ८६ ॥ अंग या कोमलामंत्रणें । संबोधूनियां मजकारणें । पत्रीं केलें निश्चयसूचने । तें मी जाणें भीमकिये ॥ ८७ ॥ कदाचित्समयीं तूं न पवसी । मी न लाहें तव चरणांसी । तैं शून्यता त्रैलोक्यासी । झाली ऐसी मी मानीं ॥ ८८ ॥ अंतर्यामीं तूं अनन्य । अनन्ययोग्य हें ममाङ्ग जाण । इणें प्राकृत स्पर्शती आन । यास्तव त्यागीन प्रयत्नें ॥ ८९ ॥ तुझी पत्रिकेमाजील उक्ति । ते मज अद्यापि स्मरती चित्तीं । अंबुजाक्षा तव प्रसादप्राप्ति । न होतां

निश्चिती तनु न राखें ॥४९०॥ प्राण सोडीन तेचि घडी । जन्मान्तरीं व्रतकडाडी । जन्मशतां सुकृतप्रौढी । तव पद आवडी वरीन ॥९१॥ तवानुग्रह न होतां देह । सोडी ऐसा दृढ निश्चय । हा जाणोनि अभिप्राय । माझें हृदय कळवळिलें ॥९२॥ ऐसी सप्रेम निष्ठा तुझी । देखोनि चित्तवृत्ति माझी । वेधली जैसा भ्रमर कंजीं । लंपट रुंजी रसलोभें ॥९३॥ हे तव निष्ठा तुजचि साजे । हर ब्रह्मेन्द्रां दुर्लभ सहजें । एवं उत्तीर्णतेचें ओझें । उतरूनि भजें प्रेमाचें ॥९४॥ तुझिया प्रेमा मी उत्तीर्ण । होऊं न शकें सत्य जाण । विनोदवचनीं तुझें मन । आनंदपूर्ण करीतसें ॥४९५॥ प्रेमसंरंभनर्मोक्ति । याचें कारण हेंच सुमति । तव मनातें आनंदप्राप्ति । करणें निश्चिती भीमकिये ॥९६॥ ऐसीं कृष्णमुखींचीं वचनें । निरोपूनियां व्यासनंदनें । पुढें परीक्षितीकारणें । करी कथन तें अवधारा ॥९७॥

श्रीशुक उवाच—एवं सौरतसंलापैर्भगवान्देवकीसुतः । स्वरतो रमया रेमे नरलोक विडंबयन् ॥ ५८ ॥

एवं म्हणिजे ऐशिया परी । राया देवकीतनय जो हरि । सुरतक्रीडेच्या अवसरीं । मानवाकारीं रमतसे ॥ ९८ ॥ स्वरत म्हणिजे आत्मरत । तोही रमेसह ऐसा रमत । नरलोकाची अवगणीभूत । निज आचरित प्रकाशी ॥ ९९ ॥ षड्गुणैश्वर्यपरिपूर्ण । योगमायाप्रभावेंकरून । अभेदीं भेदाचें रोचन । करी सर्वज्ञ सविलासें ॥ ५०० ॥ एवं सुरतक्रीडावसरीं । प्रेमसंरंभनर्मोत्तरीं । कृष्ण रुक्मिणी निज मंदिरीं । परस्परें वदलीं जें ॥ १ ॥ तो कृष्णरुक्मिणीप्रेमकलह । सुरतसंरंभकथारोह । कथिल्यावरी कमलानाहो । करी नवलाव तो ऐका ॥ २ ॥

तथाऽन्यासामपि विभुर्गृहेषु गृहवानिव । आस्थितो गृहमेधीयान्धर्मांल्लोकगुरुर्हरिः ॥ ५९ ॥

जैसा रुक्मिणीचिये मंदिरीं । परमानंदें क्रीडे हरि । सशतषोडशसहस्रां घरीं । त्याच प्रकारें गृहधर्मीं ॥ ३ ॥ शता आगळीं सहस्रें सोळा । आणि या वेगळ्या अष्ट अबळा । तितुकीं रूपें एकी कमळा । रुक्मिणीदेवी जाणावी ॥४॥ तैसाच तितुक्या सदनीं पृथक । गृहस्थधर्मीं गृहस्थलोक । वर्तती तैसा यदुनायक । गृहवंतासम वर्ततसे ॥ ५०५ ॥ सर्व लोकांचा गुरु विधाता । त्या विधातयाचाही जो जनिता । तोही नरचर्या अनुसरता । झाला तत्त्वतां कुरुवर्या ॥ ६ ॥ इतुकी कथा व्याससुतें । निरूपिली परीक्षितीतें । मुनिचक्रें सह शौनकातें । सूतपुत्रें निरूपिली ॥ ७ ॥ तें हें भागवत सविस्तर । व्यासप्रणीत अठरा सहस्र । परमहंसाचें पीयूषपात्र । शुककुरुवरसंवाद ॥ ८ ॥ त्यामाजील दशम स्कंध । कृष्णरुक्मिणीनर्मानुवाद । दयार्णववदनें भाषा विशद । व्याख्यान शुद्ध हारिवरद ॥ ९ ॥ एवं षष्टितमेऽध्यायीं । इतुकी कथा कथिली पाहीं । एकषष्टाव्यामाजी कायी । शेषशायी करी लीला ॥५१०॥ साष्ट सशत सहस्रें सोळा । कृष्णें वरिल्या ज्या नृपबाळा । तत्संततिवृद्धिसोहळा । आणि विवाह संततीचे ॥ ११ ॥ हें निरूपण सविस्तर । पुढिले अध्यायीं कुरुवर । परिसेल तेथ पंक्तिकार । श्रोतीं सादर होइजे ॥ १२ ॥ दयार्णवाची इतुकी विनति । रुक्मिणीऐसी सप्रेम भक्ति । लाहोनि भजिजे

रुक्मिणीपति। भवनिवृत्ति तद्योगें ॥ १३ ॥ श्रीएकनाथ प्रतिष्ठानीं। चिदानंदाच्या सिंहासनीं। विराजमान स्वानंदभुवनीं। सर्वांग गोगणीं गोविंद ॥ १४ ॥ तत्पादोदकप्रवाहिनी। निरत गौतम गौतमीपानीं। पिपीलिकानिवासस्थानीं। दयार्णववदनें हरि वदला ॥ ५१५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां कृष्णरुक्मिणीप्रेमसंरंभकथनं नाम षष्टितमोऽध्यायः ॥ ६० ॥

श्लोक ५९ ॥ ओवी-संख्या ५१५ ॥ एवं संख्या ५७४ ॥
( एकोणसाठावा अध्याय मिळून ओवीसंख्या २८८५४)

**अध्याय साठावा समाप्त**

कृष्णदयार्णवकृत

# हरिवरदा

## अध्याय ६१ वा

श्रीकृष्णपरमात्मने नमः । जयजय जगन्निलयजठरा । जयजय जगद्व्योमयमाठरा । समष्टिव्यष्टिगतजाठरा । जगदाधारा गोविंदा ॥ १ ॥ श्रीपदकंज प्रफुल्लार । आमोदपानें मनोमधुकर । गुंजारवतां निरंतर । अन्य संचार विसरला ॥ २ ॥ तेथील आमोदप्रबोधपानें । सांडवलिया विवर्तभानें । पदपंकजीं गुंततां गानें । सुमनकाननें डोलवी ॥ ३ ॥ भ्रमर म्हणिजे भ्रमणशील । पदाब्जपरागीं तो निश्चळ । जेथींचा प्रबोधामोद बहळ । भवभ्रम केवळ परिहर्ता ॥ ४ ॥ सुमनस लोधले शतमखसुमनीं । मत्त होऊन सुकृतपानीं । रुंजी करिती स्वर्गकाननीं । न चुके भ्रमणीं अध ऊर्ध्व ॥ ५ ॥ तैसा नोहे श्रीपदामोद । सेवितां होय भ्रमापवाद । भोगिती अक्षय परमानंद । प्रपन्नवृंद पदलाभें ॥ ६ ॥ तया पदाब्जपरागपानें । सुमनकाननीं गुंजतां गानें । दशमस्कंधाच्या व्याख्यानें । निवती श्रवणें मुनिवृंद ॥ ७ ॥ तेथ षष्टितमाध्यायीं कथा । प्रेमसंरंभें श्रीकृष्णनाथा । क्षोभवूनि रुक्मिणीचित्ता । वचनामृता परिसावया ॥ ८ ॥ तंव ते रुक्मिणी चातुर्यखाणी । कृष्णीं विलसे अनन्यपणीं । तयेच्या उक्ति परिसूनि श्रवणीं । निवाला मनीं जगदात्मा ॥ ९ ॥ पूर्वीं एकोनषष्टाध्यायीं । सत्यभामेची चतुरायी । ऐकूनि वाटलें कृष्णहृदयीं । रुक्मिणी कांहीं वदवावी ॥ १० ॥ यास्तव रुक्मिणीकलहवार्ता । ऐकूनि निवाला कमलाभर्ता । इतुकी नृपासी सांगूनि कथा । बोले वक्ता शुकयोगी ॥ ११ ॥ एकषष्टाच्यामाजी राया । पट्टमहिषी अष्ट जाया । सशत षोडश सहस्र भार्या । सम यदुवर्या प्रियतम ज्या ॥ १२ ॥ तया सर्वां ठायीं हरि । समान वर्ते कवणे परी । संततिसंपत्तिऐश्वर्यगजरीं । तें अवधारीं कुरुवर्या ॥ १३ ॥ वृत्तिरूप ज्या कामिनी । समान न थरती चंचलपणीं । आत्मा अच्युत चिन्मात्र तरणि । निश्चळपणीं समसाम्य ॥ १४ ॥

श्रीशुक उवाच–एकैकशस्ताः कृष्णस्य पुत्रान्दश दशाबलाः । अजीजनन्ननवमान्पितुः सर्वात्मसंपदा ॥१॥

श्रीकृष्णाच्या वनिता अबळा । साष्ट सशत सहस्रें सोळा । एकैकी दश पुत्रांला । प्रसवत्या झाल्या सर्वेही ॥ १५ ॥ दश दश पुत्र एकैक कन्या । प्रसवत्या झाल्या सर्वाङ्गना । गुणलावण्यैश्वर्य-तुलना । मधुसूदना समसाम्य ॥ १६ ॥ सर्वां सदनीं सम ऐश्वर्य । सर्वां प्रियतम श्रीयदुवर्य । सर्वां कलशीं बिंबे सूर्य । वृष्णिधुर्य तत्त्वता पैं ॥ १७ ॥ गुणलावण्यसंपदेकरून । पित्याहून सर्व नंदन । ऐश्वर्यप्रतापें अन्यून । समता पूर्ण हे हरीची ॥ १८ ॥

गृहादनपगं वीक्ष्य राजपुत्र्योऽच्युतं स्थितम् । प्रेष्ठं न्यमंसत स्वं स्वं न तत्तत्त्वविदः स्त्रियः ॥ २ ॥

पृथक्पृथक् आपुल्या सदनीं । जे ते अच्युतातें देखोनि । बाहीर न वचे कवणे क्षणीं । विसंबूनि आपणया ॥ १९ ॥ गृहापासूनि न वचे दुरी । ऐसें देखोनि नृपकुमारी । मानिती आपुले अभ्यंतरीं । वेधला मम प्रेमें ॥ २० ॥ मजचिवरी हरीची प्रीती । मीचि कृष्णासि आवडती । उपेक्षूनि सर्वेही सवती । सदैव वसती मम सदनीं ॥ २१ ॥ ऐसें मानिती सर्वेही अबळा । नेणती कृष्णाची अतर्क्य लीळा । जे तो व्यापूनि ब्रह्माण्डगोळा । असे वेगळा उर्वरित ॥ २२ ॥ मजहूनि प्रियतम नाहींच कोठें । ऐसें जे ते स्त्रियेतें वाटे । तंव तंव विशेष सप्रेमनिष्ठे । भजती अभीष्टें कौशल्यें ॥ २३ ॥ कृष्णें मोहिल्या त्या कामिनी । वरचातुर्यलावण्यगुणीं । ठाणठकारें प्रियभाषणीं । ऐकें श्रवणीं तें राया ॥२४॥

चार्वब्जकोशवदनायतबाहुनेत्रसप्रेमहासरसवीक्षितवल्गुजल्पैः ।
संमोहिता भगवतो न मनो विजेतुं स्वैर्विभ्रमैः समशकन्वनिता विभून्मः ॥ ३ ॥

सुंदर नवशरदंबुजकला । तद्वत् शोभा वदनकमला । विस्तीर्ण बाहु नेत्रोत्पलां । कटाक्षलीला सविभ्रमा ॥ २५ ॥ सप्रेमभरित मंदस्मित । तद्रसयुक्त अपाङ्गपात । ऐशिया स्निग्धावलोकनांत । वचनामृत मधुरतर ॥ २६ ॥ इत्यादि अनेक कौशल्याचे । विलास विभ्रम भगवंताचे । तिहींकरूनि निजवनितांचे । आशय मोहूनि अपहरिले ॥ २७ ॥ तैशाच त्याही अमराङ्गना । असाम्य करिती पदनखतुलना । ज्याचिया लावण्यचातुर्यगुणा । त्रिगुणाङ्गना अनुकरिती ॥ २८ ॥ परंतु आपुल्या गुणरौचियें । वसनाभरणाङ्गसौन्दर्यें । जिंकूं न शकती कृष्णहृदयें । विभ्रमोपायें स्मररासिकें ॥ २९ ॥ कीं तो पूर्ण गगनाकार । म्हणोनि विभून्म नामोच्चार । ऐशिया परिपूर्णा विकार । वनितानिकर करूं न शके ॥ ३० ॥ राया म्हणसी कवणे परी । विलास विभ्रम स्मरविकारीं । वशीकरूं न शकती हरी । तियें अवधारीं वधूचिह्नें ॥ ३१ ॥

स्मायावलोकलवदर्शितभावहारिभ्रूमंडलप्रहितसौरतमंत्रशौंडैः ।
पत्न्यस्तु षोडशसहस्रमनंगबाणैर्यस्येंद्रिय विमथितुं कुहकैर्न शेकुः ॥ ४ ॥

कान्तप्रेमें गूढ हसित । प्रेष्ठावलोकनें जें तद्युक्त । सविलास कटाक्ष अपाङ्गपात । भाव सूचिती तद्योगें ॥ ३२ ॥ नम्र लाघवें सविलास प्रेम । येणें चोजवे हृदयपद्म । मोहकत्व हें स्त्रियांचें परम । भावसंभ्रम चोजवणें ॥३३॥ तद्युक्त भ्रूमंडळाची भंगी । ऐशिया कामोद्दीपनापाङ्गीं । सुरतमंत्रप्रेरणायोगीं । प्रगल्भस्मरशरीं वेधिती ॥ ३४ ॥ करणें म्हणिजे स्मरोपकरणें । कामशास्त्रप्रणीतें चिह्नें । तदुपयोगी कुहकाचरणें । स्मरद्योतनें जिहींकरूनी ॥ ३५ ॥ कामशास्त्रप्रवीणा नारी । वृद्ध चतुरा ठेवूनि घरीं । उदाहरणें सूत्रानुसारीं । नृपकुमारी शिक्षिती ज्या ॥ ३६ ॥ कामशास्त्रींची आसनशिक्षा । तन्मंडपीं मन्मथदीक्षा । स्मरसमरीं शौर्यपरीक्षा । पूर्वोत्तराङ्गीं प्रपठिती ॥ ३७ ॥ उभयकरणीं ऋत्विजगणीं । तत्समंत्रक मंथा अरणि । मथितां षोडश सहस्र पत्नी । हरिमनोमथनीं असमर्था ॥ ३८ ॥ यून युवति चित्रकारें । स्मरसमरंगीं आसनपरें । विलासभुवनें शिल्पिकें चतुरें । शास्त्रानुसारें विनिर्मितें ॥ ३९ ॥ तैसींच कामक्षोभकें द्रव्यें । स्मरसंगरारंभीं सेव्यें । मन्मथचेष्टापौष्टिकें दिव्यें । आसवें गव्यें फळमूळें ॥४०॥ ताम्बूलादि उपचारभरणें । लेपनें सुमनें घ्राणतर्पणें । इत्यादि मन्मथकुहकोपकरणें । कृष्णाकारणें न मोहवे ॥ ४१ ॥ कृष्णविभ्रमीं मोहिता अबळा । मोहूं न शकती त्या घननीळा । परमाश्चर्य कुरुनृपाळा । अतर्क्य लीळा कृष्णाची ॥ ४२ ॥ पूर्वाध्यायींचें श्लोकद्वय । श्रीशुक वक्तयांमाजी धुर्य । ये अध्यायीं वदता होय । तो अभिप्राय अवधारा ॥ ४३॥ पूर्वाध्यायींचें प्रमेय येथ । कथान्वयेंकरूनि प्राप्त । तत्सौन्दर्यप्रस्तावनार्थ । श्रोतीं पुनरुक्त न मनावें ॥ ४४ ॥

इत्थं रमापतिमवाप्य पतिं स्त्रियस्ता ब्रह्मादयोऽपि न विदुः पदवीं यदीयाम् ।
भेजुर्मुदाऽविरतमेधितयानुरागहासावलोकनवसंगमलालसाद्यम् ॥ ५ ॥

ऐसा वास्तव कमलापति । तो त्या स्त्रिया लाहूनि स्वपति । निरंतर भजत्या जाहल्या प्रीती । अनुरागसंपत्ति वाढवूनी ॥ ४५ ॥ ब्रह्मा हरसुरशक्रादिक । ज्याची पदवी यां अनोळख । तया कृष्णाचा वामाङ्क । वनिता सम्यक लाहूनी ॥ ४६ ॥ भजत्या झाल्या कोणेपरी । अनुकूळ तनुमनोवाग्व्यापारीं । सानुराग अपाङ्गनेत्रीं । सलज्ज वक्त्रीं स्मितमंत ॥ ४७ ॥ स्मरोत्कर्षाची आसक्ति । औत्सुक्य म्हणिजे तयाप्रति । इत्यादि विभ्रमचिह्नीं बहुतीं । वनिता भजती वनजाक्षा ॥ ४८ ॥ सलज्जहासप्रेमापाङ्ग । तद्युक्त नवसंगप्रसंग। लालसतेस्तव इत्यादि योग । योजूनि श्रीरंग ज्या भजती ॥ ४९ ॥ तथापि हरीचें मनोमधुकरू । सहसा न शकती स्वाधीनकरूं । ज्याचा महिमा अगोचरू । विधि हर मुनि सुर नेणती पैं ॥ ५० ॥ एकैक कन्या दश दश पुत्र । प्रसवतां झाल्या प्रौढतापात्र । तयांचा नवसंगमप्रकार । केंवि सर्वत्र वर्णितसां ॥ ५१ ॥ ऐसें राया न मनीं मनीं । नित्य नूतना भगवद्रमणी । कमलाशत्वें करूनी । अम्लानयौवनीं अधिरूढा ॥ ५२ ॥ कौमारवयसेचा अतिक्रम । यौवनदशेचा नवोद्गम । होतां युवती-

आंगीं प्रेम । धरिती सकाम नरनिकर ॥ ५३ ॥ नवयौवन गात्रा सज्जी । तेव्हां निडारे अवयवराजी । आकर्णदीर्घता नेत्रकंजीं । वदनपंकजीं प्रमुदित भा ॥ ५४ ॥ दानोदकाचा स्निग्ध पाझर । पुलकोद्गमाचा उमटे घोर । वदनपंकज प्रफुल्लार । राकारमणा विरमवी ॥ ५५ ॥ भ्रमरभासुर धम्मिल्लप्रभा । गंडमंडित कुंडलशोभा । निडळपट्टिका झळकतां नभा । माजी शशिभा उमटतसे ॥ ५६ ॥ सरळ नासिका अधर रुचिर । भ्रू भासती कार्मुकाकार । हनु कपोल अतिसुंदर । वज्रभासुर द्विजपंक्ति ॥ ५७ ॥ मंजुळ मंदस्मित मंजरी । पूर्ण शशिभा वदनचंद्रीं । पीयूषप्राय वाङ्माधुरी । अपाङ्ग नेत्रीं सविलास ॥ ५८ ॥ कंठीं पंचम स्वर कोकिळा । स्वररत्नाच्या फांकती किळा । सुपीन सरळता बाहुयुगळा । रातोत्पलासम पाणि ॥ ५९ ॥ न्युब्ज तालपुटकें दोन्ही । तैसी समता नूतन स्तनीं । रोमराजी ऊर्ध्वगामिनी । नाभी-पर्यंत सुशोभित ॥ ६० ॥ कारण काञ्चनभासुर पूर्वी । त्यावरी तनुरुहोद्गम भा दावी । पृथुळ नितंब रुचिरावयवीं । गजगामिनी रंभोरु ॥ ६१ ॥ तारुण्य तरुणीच्या शरीरीं । प्रवेश करितां बाह्यात्कारीं । इत्यादि अवयवभासुर नारी । विभ्रमकारी नरनिकरा ॥ ६२ ॥ बाह्य ऐसें नव शरीर । अंतरीं उठती स्मरविकार । सबाह्य इंगितें तदनुसार । प्रमादपर प्रमदाङ्ग ॥ ६३ ॥ रतिलालसता कवळी मना । नव संगमीं सलज्ज ललना । स्मितापाङ्गें मुरडी नयनां । कटाक्षबाणीं विंधूनी ॥ ६४ ॥ चाटु चटुल चिह्नें आघवीं । नवसंगमीं सुभगा दावी । वरकरस्पर्शें सर्वावयवीं । संकोच भावी सुख मानी ॥ ६५ ॥ जंव जंव कुञ्चित करी अवयवां । तंव तंव कामुक कवळी खेंवा । मन्मथसमरंगा चढावा । करिती हांवा उभयत्र ॥ ६६ ॥ युवतीआंगीं यौवनभर । त्यामाजी नवसंगम सार । यूना उपजे प्रेमादर । दास्यीं तत्पर तल्लाभें ॥ ६७ ॥ परंतु वयोगणनेच्या मापें । मोवितां नवावयवता लोपे । तरुणी पालटे करणविरूपें । तनु साक्षेपें सांवरितां ॥ ६८ ॥ कुंकुम निढळी कज्जल नयनीं । मुखपंकजीं विलिप्त रजनी । अवयव मंडित वसनाभरणीं । नवकामिनीसम न तुके ॥ ६९ ॥ तैशा न होती श्रीकृष्णवामा । नित्य नूतना नव-संगमा । अमृतोद्भवा काञ्चनपद्मा । अम्लानसुषमा नित्यत्वें ॥ ७० ॥ यथापूर्व स्मरमंदिरें । कालकलना-तीत शरीरें । नित्य नूतनें कोमळें रुचिरें । रतिरससारें परिपूर्णें ॥ ७१ ॥ नवसंगमीं स्मरविकार । नित्य नूतन तो प्रेमादर । वियोग न साहवे अणुमात्र । विरहातुर होत्सात्या ॥ ७२ ॥ यावज्जन्म प्राशिती जळ । मार्गीं तावितां वसंतकाळ । जळवियोगें प्राण व्याकुळ । प्रतीति केवळ नववत तैं ॥ ७३ ॥ एवं सदैव नवसंगमा । सारिखा अनुभव श्रीकृष्णवामा । भोगिती तैसें पुरुषोत्तमा । स्वभक्तकामा अनुकरणें ॥ ७४ ॥ एऱ्हवीं तो निर्विकार । उदास अभोक्ता अगोचर । ऐसियातेंही वनितानिकर । सेवी सादर तें ऐका ॥ ७५ ॥

प्रत्युद्गमासनवरार्हणपादशौचतांबूलविश्रमणवीजनगंधमाल्यैः ।
केशप्रसारशयनस्नपनोपहार्यैर्दासीशता अपि विभोर्विदधुः स्म दास्यम् ॥ ६ ॥

अभ्युत्थानें प्रत्युद्गमनें । आसनें वसनें दिव्याभरणें । पादशौचादि महापूजनें । ताम्बूलदानें ओळंगती ॥ ७६ ॥ तनुसंवाहन विश्रमणीं । गंधमाल्यें मंदव्यजनीं । उपहारादि उपचारभरणीं । दास्या-चरणीं अनुरक्ता ॥ ७७ ॥ केशसंवाहन विविधापरी । अभ्यंगोद्वर्तनप्रकारीं । स्नानदानाच्या अवसरीं ।

सर्वोपचारीं अनुसरती ॥ ७८ ॥ सुमनशय्येच्या अरुवारीं । पूर्वोत्तराङ्गीं कामाध्वरीं । मंदमधुरचटु-लोत्तरीं । सेविती श्रीहरी सप्रेमें ॥ ७९ ॥ शतानुशता सुभगा दासी । पृथक्पृथक्का एकीकीसी । असती तथापि प्रेमोत्कर्षीं । करिती सेवेसी निजाङ्गें ॥ ८० ॥ एकूणसाठाव्या माझारी । श्लोकोक्त सेवा सविस्तरीं । वाखाणिली ते अवसरीं । मुणुळाकारीं सूचविली ॥ ८१ ॥ असो ऐशिया हरिवल्लभा । सप्रेमभावें पंकजनाभा । सेविती उत्कट प्रीतिलाभा । नववालभा प्रकटूनी ॥ ८२ ॥ इतुकें कथूनि कुरुवरिष्ठा । शुक म्हणे गा श्रवणनिष्ठा । कृष्णाङ्गनाकनिष्ठा ज्येष्ठ । समान संतति लाधल्या ॥ ८३ ॥ दश दश पुत्र एकैक कन्या । प्रसवल्या समस्त कृष्णाङ्गना । कथितां संततीच्या अभिधाना । व्याख्यान-गणना नाटोपे ॥ ८४ ॥

तासां या दशपुत्राणां कृष्णस्त्रीणां पुरोदिताः । अष्टौ महिष्यस्तत्पुत्रान्प्रद्युम्नादीन्गृणामि ते ॥ ७ ॥

यालागीं पट्टमहिषी अष्ट । तत्संततिनामें स्पष्ट । परिसें होत्ोनि श्रवणनिष्ठ । ज्येष्ठश्रेष्ठ यथाक्रमें ॥ ८५ ॥ प्रद्युम्न सर्वां आदिकरून । प्रथम भीमकीचें संतान । निरूपीन तें सावधान । एकें येथून परीक्षिति ॥ ८६ ॥

चारुदेष्णः सुदेष्णश्च चारुदेहश्च वीर्यवान् । सुचारुश्चारुगुप्तश्च भद्रचारुस्तथापरः ॥ ८ ॥
चारुचद्रो विचारुश्च चारुश्च दशमो हरेः । प्रद्युम्नप्रमुखा जाता रुक्मिण्यां नावमाः पितुः ॥ ९ ॥

चारुदेष्ण सुदेष्ण दुसरा । चारुदेह वरिष्ठ वीरां । सुचारु चौथा पांचवा खरा । चारुगुप्त तुज कथिला ॥ ८७ ॥ तैसाचि साहवा चारुभद्र । सातवा बोलिजे चारुचंद्र । आठवा विचारु नववा चारु । दहावा स्मर वर सर्वां ॥ ८८ ॥ कुमारदशक हें रुक्मिणीजठरीं । जनकासमान सर्वांपरी । गुणलावण्य-इंगिताकारीं । विभववीरश्री अन्यून ॥ ८९ ॥ यावरी सत्यभामेचें तनय । कथिता झाला योगिवर्य । अनुक्रमें तो नामान्वय । कौरवधुर्य अवधारी ॥ ९० ॥

भानुः सुभानुः स्वर्भानुः प्रभानुर्भानुमांस्तथा । चंद्रभानुर्बृहद्भानुरतिभानुस्तथाऽष्टमः ।
श्रीभानुः प्रतिभानुश्च सत्यभामात्मजा दश ॥ १० ॥

भानु सुभानु आणि स्वर्भानु । प्रभानु भानुमंत चंद्रभानु । बृहद्भानु अतिभानु श्रीभानु । दहावा प्रतिभानु भामेय ॥ ९१ ॥ यावरी जाम्बवतीचे दश । अपर श्रीकृष्णप्रतिबिंबांश । कथितां त्यांचा नामविशेष । कुरुनरेश अवधारी ॥ ९२ ॥

सांबः सुमित्रः पुरुजिच्छतजिच्च सहस्रजित् । विजयश्चित्रकेतुश्च वसुमान्द्रविडः क्रतु. ॥
जांबवत्याः सुता ह्येते सांबाद्याः पितृसंमताः ॥ ११ ॥

जाम्बवतीचा साम्ब प्रथम । सुमित्र पुरुजित् तृतीय नाम । शतजित् सहस्रजित् विजयधाम । चित्रकेतु सातवा ॥ ९३ ॥ वसुमंत द्रविड क्रतु । जाम्बवतीचे हे दशसुत । सर्वां गुणीं प्रतापवंत ।

अपर मूर्त हरि गमती ॥ ९४ ॥ यावरी नाग्नजितीचे कुमर । कृष्णप्रतापतेजोऽङ्कुर । यथाक्रमें तो नामोच्चार । सांगे मुनिवर दाहींचा ॥ ९५ ॥

वीरश्चंद्रोऽश्वसेनश्च चित्रगुर्वेगवान्वृषः । आमः शंकुर्वसुः श्रीमान्कुंतिर्नाग्नजितेः सुताः ॥१२॥

वीर चंद्र अश्वसेन । चित्रगु वेगवान वृषाभिधान । आम शंकु वसु श्रीमान । कुंतिनामा तेजस्वी । ॥ ९६ ॥ श्रीमान् ऐसें विशेषण । कुंतिनामकाचेंचि पूर्ण । एवं नाग्नजितीसंतान । कृष्णासमान सर्वां गुणीं ॥ ९७ ॥ यावरी कालिन्दीचे जठरीं । दश पुत्रांतें कैटभारि । आपणासमान सर्वां परी । उत्पन्न करी तें ऐका ॥ ९८ ॥

श्रुतः कविर्वृषो वीरः सुबाहुर्भद्र एकलः । शांतिर्दर्शः पूर्णमासः कालिंद्याः सोमकोऽवरः ॥ १३ ॥

कनिष्ठ सर्वांमाजी सोमक । प्रथम श्रुत कवि वृष । वीर सुबाहु भद्रप्रमुख । शांति दर्श पूर्णमास ॥ ९९ ॥ एकल ऐसें विशेषण । भद्रनामकाचेंचि जाण । यावरी माद्रीचे नंदन । क्रमेंचि श्रवण करीं राया ॥ १०० ॥

प्रघोषो गात्रवान्सिंहो बलः प्रबल ऊर्ध्वगः । माद्रयाः पुत्रा महाशक्तिः सह ऊर्जोऽपराजितः ॥ १४ ॥

प्रघोष गात्रवंत सिंहसंकेती । बळ प्रबळ आणि ऊर्ध्वगति । सह ऊर्ज अपराजित महाशक्ति । पुत्रदशक माद्रीचें ॥ १ ॥ यावरी मित्रविंदासंतति । दश पुत्रांचीं नामें नृपति । एकाग्र करूनि चित्तवृत्ति । परिसें सुमति कथितों तें ॥ २ ॥

वृको हलोऽनिलो गृध्रो वर्धनोऽन्नाद एव च । महीशः पावनो वह्निर्मित्रविंदात्मजाः क्षुधिः ॥ १५ ॥

वृष हल अनिल नामक । गृध्र वर्धन अन्नभक्षक । महीपति पावन वह्निप्रमुख । सर्वां कनिष्ठ क्षुधिनामा ॥ ३ ॥ यावरी भद्राजठरशुक्ति । माजी दश पुत्रांची पंक्ति । कृष्णवीर्यें पावली व्यक्ति । तें तूं भूपति अवधारीं ॥ ४ ॥

संग्रामजिद्बृहत्सेनः शूरः प्रहरणोऽरिजित् । जयः सुभद्रो भद्राया वाम आयुश्च सत्यकः ॥ १६ ॥

संग्रामजित बृहत्सेन । शूर अरिजित् आणि प्रहरण । वाम सुभद्र जयवान । आयुष्मान सत्यक पैं ॥ १०५ ॥ अष्टमहिषींची संतति । कथिली एवमादि भूपती । रोहिणीचिये जठरशुक्ती । माजी जन्मले ते ऐक ॥ ६ ॥

दीप्तिमांस्ताम्रतप्ताद्या रोहिण्यास्तनया हरेः ॥

दीप्तिमंत ताम्रतप्त । इत्यादि जे रोहिणीसुत । आदिशब्दामाजीच गुप्त । दशकसंकेत मुनि वदला ॥ ७ ॥ अष्टमहिषींहूनि रोहिणी । म्हणाल नववी हे कोठोनी । शैब्यानामका हेचि म्हणोनी । श्रीधरी व्याख्यानीं भागवतीं ॥ ८ ॥ प्रसिद्ध वैदर्भी ते रुक्मिणी । जाम्बवती ते ऋक्षयोनि । सात्राजिती भामाभिधानी । चौथी तारणि कालिन्दी ॥ ९ ॥ मित्रविंदा अवंतिभवा । सत्या नाग्नजिती या द्वय नांवा । वाहे कोसलनृपोद्भवा । जे वैरी केशवा वृष मथितां ॥ ११० ॥ केकयदेशसंभवा भद्रा । वसुदेवभागिनेयी सुन्दरा । संतर्दनादि सहोदरा । सादर जाणोनि हरि पर्णी ॥ ११ ॥ मद्ररायाची कुमारी । यंत्र भेदूनि स्वयंवरीं । हरिता झाला कैटभारि । शुभलक्षणा लक्ष्मणा जे ॥ १२ ॥ यांमाजी शैब्या कथिली नाहीं । म्हणोनि नववी म्हणतां पाहीं । परिमित संख्येचिया ठायीं । विरोध येतो मूळार्थी ॥ १३ ॥ विष्णुपुराणींचिये व्याख्यानीं । जाम्बवती तेचि रोहिणी । ऋक्षत्वास्तव कामरूपिणी । ऐसा टिप्पणीं लेख असे ॥ १४ ॥ तथापि पुत्रगणना पृथक । वदला भागवतीं श्रीशुक । एवं संदिग्ध संशयात्मक । स्पष्ट विवेक उमजेना ॥ ११५ ॥ विष्णुपुराणींचिये टिप्पणीं । शैब्याचि मित्रविंदा म्हणोनी । वदला तथापि संतानकथनीं । पूर्वापर विरोधोक्ति ॥ १६ ॥ कोणी म्हणती रोहिणी पृथक । कृष्णभार्या असती अनेक । संतानवृद्धीचा विवेक । वदला सूचक पराशर ॥ १७ ॥

संमतविष्णुपुराणोक्त । अन्यासां चैव भार्याणां समुत्पन्ना निचक्रिणः ।
अष्टायुतानि पुत्राणां सहस्राणां शतंतथा ॥ १ ॥
प्रद्युम्नः प्रथमस्तेषां सर्वेषां रुक्मिणीसुतः ।

असो ऐसें हरिसंतान । त्यामाजी मुख्य जो प्रद्युम्न । रुक्मिणीचा ज्येष्ठ नंदन । तत्संतान अवधारा ॥ १८ ॥

प्रद्युम्नाच्चानिरुद्धोभूद्रुक्मवत्यां महाबलः । पुत्र्यां तु रुक्मिणो राजन्नाम्ना भोजकटे पुरे ॥ १७ ॥

प्रद्युम्नाची पूर्वभार्या । आणिली शंबर वधूनियां । त्यानंतरें रुक्मितनया । प्रणिली जाया रुक्मवती ॥ १९ ॥ प्रद्युम्नवीर्यें तिचे जठरीं । अनिरुद्ध जन्मला भोजकटनगरीं । महाबळिष्ठ प्रतापी क्षत्री । जेणें अंतुरी उषा केली ॥ १२० ॥ सर्व स्त्रियांचीं संततिनांवें । पौत्रप्रपौत्रादि आघवें । तत्संततिविवाहविभवें । कथितां नागवे ग्रंथ नभीं ॥ २१ ॥ यालागीं संकेतसंग्रहें शुक । बोलिला तो ऐका श्लोक । बीजामाजी जैसा रुख । तेंवि विवेक जाणावया ॥ २२ ॥

एतेषां पुत्रपौत्राश्च बभूवुः कोटिशो नृप । मातरः कृष्णजातानां सहस्राणि च षोडश ॥ १८ ॥

साष्ट सशत षोडशसहस्र । श्रीकृष्णाचें अंतःपुर । त्यांचे पोटीं जन्मले कुमर । तत्पुत्रपौत्र कोटिशः ॥ २३ ॥ कृष्णौरसांचिया माता । षोडश सहस्र म्हणाल उक्ता । चकारार्थें साष्ट शता ।

शुकसंकेता जाणावें ॥ २४ ॥ ऐसा नृपातें बादरायणि । संग्रहरूपें वदला वाणी । ऐकोनि कौरवचूडामणि । बहु थोडेनि समजला ॥ १२५ ॥ पुढती सिंहावलोकनें । रुक्मिकन्या वरिली मदनें । तिये कथेच्या श्रवणावधानें शुककारणें प्रश्न करी ॥ २६ ॥

राजोवाच—कथं रुक्म्यरिपुत्राय प्रादाद्दुहितरं युधि । कृष्णेन परिभूतोऽसौ हंतु रंध्रं प्रतीक्षते ॥१९॥
एतदाख्याहि मे विद्वन्द्विषोर्वैवाहिकं मिथः ॥ २० ॥

राजा म्हणे बादरायणि । वक्तयांमाजी चातुर्यखाणी । संशय गमला निरूपणीं । तन्निरसनीं मम प्रश्न ॥ २७ ॥ कृष्ण वधावयाकारणें । समय संधि लक्षी मनें । तो केंवि पुढती कन्यादानें । स्नेहवर्धना प्रवर्ते ॥ २८ ॥ पूर्वीं कृष्णें रुक्मिणीहरणीं । विटंबिला बीभत्सवपनीं । पराभविला समराङ्गणीं । तें तो मनीं शल्य स्मरे ॥ २९ ॥ भुजंग हाणीतला चरणें । तो न विसरे जिता मरणें । छिद्र लक्षी घ्यावया उसणें । अंतःकरणें हा तैसा ॥ १३० ॥ पुढती कृष्णाचिया सुता । केंवि देता झाला दुहिता । परम विस्मय हा गमला चित्ता । तो मज आतां निरूपिजे ॥ ३१ ॥ परस्परें द्वेषनिष्ठ । घात करूं इच्छिती स्पष्ट । ऐसे वैरी तेचि प्रकट । केंवि संतुष्ट वैवाहिकें ॥ ३२ ॥ विद्वान् म्हणिजे ज्ञानवंत । श्रेष्ठ असती ब्रह्माण्डांत । तयांमाजी शुक समर्थ । कीं तूं योगिचूडामणि ॥ ३३ ॥ योगसिद्धीची ऐश्वर्यखाणी । देदीप्यमान जैसा तरणि । मम प्रश्नाच्या निरूपणीं । समर्थ जाणोनि प्रार्थितसें ॥ ३४ ॥

अनागतमतीतं च वर्तमानमतीन्द्रियम् । विप्रकृष्टं व्यवहितं सम्यक्पश्यंति योगिनः ॥ २१ ॥

म्हणसी रुक्मी भीष्मकतनय । त्याचे हृदयींचा अभिप्राय । केंवि आम्हांसी ठाऊक होय । बहुत समय अतिक्रमल्या ॥ १३५ ॥ अनागत पुढें जें होणार । योगियां अतीन्द्रियज्ञानें गोचर । होवोनि गेले दिवस फार । तेंही गोचर प्रस्तुतवत् ॥ ३६ ॥ चतुर्दिक्षु वर्तमान । देखती योगियांचे नयन । विप्रकृष्ट जें आच्छादून । कृतगोपन दूरस्थ ॥ ३७ ॥ त्रिविध व्यवधानें व्यवहित । देशकाळ-पदार्थजनित । तेही योगियां दृश्य होत । अतीन्द्रियज्ञानदृष्टि ॥ ३८ ॥ ऐसें ऐकूनि नृपाचें वचन । आह्लादयुक्त शुक सर्वज्ञ । करिता झाला निरूपण । तें सज्जन परिसोत ॥ ३९ ॥

श्रीशुक उवाच वृतः—स्वयंवरे साक्षादनंगोऽगयुतस्तया । राज्ञः समेतान्निर्जित्य जहारैकरथो युधि ॥ २२ ॥

राया कुरुवर्य चक्रवर्ती । विदर्भतनया रुक्मवती । उपवर जाणोनि विदर्भनृपति । आदरी निगुती स्वयंवर ॥ १४० ॥ अंग वंग कलिंग भूप । कारूष कैकेय कामरूप । चैद्य मागध नैषध नृप । मिनले अमूप भोजकटीं ॥ ४१ ॥ मद्र सैन्धव सुबळपति । गौड पांचाळ द्राविड नृपति । चौळ मल्यार केरळ क्षिति । पालक भूपति महाराष्ट्र ॥ ४२ ॥ असो छपन्न देशधर । शाण्णव कुळावतंस थोर । ऐश्वर्य-प्रतापें अपर शक्र । मीनले अपार स्वयंवरीं ॥ ४३ ॥ वार्ता वार्तिकीं द्वारके कथिली । रामकृष्णीं ते

उपेक्षिली । मातुळकन्या हातींची गेली । गोष्टी लागली प्रद्युम्ना ॥ ४४ ॥ मकरकेतुस्यंदन सिद्ध । शस्त्रास्त्रेंसी सन्नद्ध बद्ध । प्रद्युम्न प्रतापी अगाध । गेला संबंध स्मरूनी ॥ १४५ ॥ मातुळकन्या रुक्मवती । प्रतापें जिणूनि करीन युवति । सर्व भूभुजां लावीन ख्याति । केंवि ते नेती मम भाग ॥ ४६ ॥ कंठीरवाचिया कवळा । हरणीं हांव जैशी शृगाला । तैं मज देखतां विदर्भबाळा । अन्य भूपाळां वरील ॥४७॥ ऐसा संकल्प करूनि मनीं । झणें तर्कील अपर कोणी । यालागीं एकाकी स्यंदनीं । आरूढ होवोनि निघाला ॥ ४८ ॥ सारथि दारुकाचा तनय । अश्व जवन पवनप्राय । स्वयंवराचा साधूनि समय । खगेन्द्रन्यायें पातला ॥ ४९ ॥ बैसली भूभुजांची सभा । तेथ जाऊनि ठाकला उभा । रुक्मवतीच्या विरहक्षोभा । निजाङ्गप्रभा पावविला ॥ १५० ॥ ललनामोहक लावण्य तनु । ठाणठकार नवयौवन । साक्षात् अनंग साङ्ग देखोन । रुतले नयन नवरीचे ॥ ५१ ॥ वधूवरांची दृष्टादृष्टि । होतांचि प्रद्युम्नें गोरटी । हरूनि रहंवरीं उठाउठीं । वाहोनि जगजेठी निघाला ॥ ५२ ॥ हें देखोनि राजकुमर । म्हणती अपमान झाला थोर । आम्हां देखतां एकला वीर । नवरी हरूनि चालिला ॥ ५३ ॥ धिकार आमुचे आंगवणे । कायसें अश्लाघ्यपणाचें जिणें । तोंड घेऊनि स्वपुरा जाणें । लाजिरवाणें स्वजनांत ॥ ५४ ॥ ऐसें निष्ठुरें निखंदिती । एकमेकांतें नोकिती । न्यूनोत्तरीं सर्व नृपति । क्षोभें धांवती पाठीलागे ॥ १५५ । कोणे कुळींचा कोण वीर । नोवरी हरूनि नेतसे चोर । धरा मारा अतिसत्वर । कार्मुकीं शर सज्जिती ते ॥ ५६ ॥ तंव तो कार्ष्णि द्वारकापथीं । जात असतां पवनगति । लागा पातले देखोनि नृपति । रहंवर निगुती स्थिराविला ॥ ५७ ॥ भंवती चमूची पडली घरटी । वीरीं कार्मुकें कवळिलीं मुष्टी । अवघे करिती बाणवृष्टि । म्हणती गोरटी त्यजीं वेगीं ॥ ५८ ॥ मरण आलिया निकटवर्ती । पिपीलिकेतें पक्षोत्पत्ति । तेंवि तुज हे रुक्मवती । रुचली चित्तीं जीवघेणी ॥ ५९ ॥ दीप देखोनियां पतंगीं । नयना रुचतां ते झगमगी । आंगें कवटाळितां आगी । उरती तद्भागीं भस्ममय ॥ १६० ॥ तेंवि तूं सुंदर देखोनि ललना । शौर्यें प्रवर्तलासि हरणा । आतां करितां समराङ्गणा । व्यर्थ प्राणां मुकसील ॥६१॥ अद्यापि दांतीं धरूनि तृण । शस्त्रें सोडून होईं शरण । नोवरी टाकूनि वांचवीं प्राण । कीं आंगवण प्रकट करीं ॥ ६२ ॥ हें ऐकूनि रुक्मिणीतनय । हास्य करूनि वदता होय । कुंजर देखोनि श्वाननिचय । तेणें न्यायें भुंकतसां ॥ ६३ ॥ वीरश्री वागवीतसां आंगीं । तरी ते मिरवावी समरंगीं । ऐसें म्हणोनि लागवेगीं । ज्या कार्मुकीं वाहिली ॥ ६४ ॥ निषंग केला पिधानरहित । शर सज्जिला धगधगीत । जेंवि सुटला चक्रवात । तृणें उधळीत गगनपथीं ॥ ६५ ॥ तेंवि रायांची बाणवृष्टि । छेदूनि धुरोळा दाविला दृष्टी । चपळ संधानें खिळिल्या मुष्टि । कार्मुकयष्टि खंडिलिया ॥६६॥ बाणीं भेदितां प्रबळदळ । धाकें तिहीं घेतला पळ । अंगप्रौढी राजे सबळ । करिती तुंबळ महारण ॥ ६७ ॥ तोमर मुद्गर कुंत पट्टिश । खड्ग खेटक शूळ पाश । परिघ परश्वध शक्तिविशेष । शस्त्रें अशेष टाकिती ॥ ६८ ॥ चहूंकडूनि शस्त्रमार । होतां निर्भय रुक्मिणीकुमर । निषंगांतूनि काढिला शर । जैसा अपर प्रळयार्क ॥ ६९ ॥ झंझावात कुसुमा विधुळी । तैसीं नृपमौळें भूतळीं । बाणें पाडितां समरशाळी । भंगली फळी भूपांची ॥ १७० ॥ सैन्यें पळूनि गेलीं पुढें । मागें भूपति नागवे उघडे । शरीं

खोंचतां झाले वेडे । पिशाचपाडें वावडती ॥ ७१ ॥ दाही दिशा भरले भूप । पूर्वस्मृतीचा झाला लोप । राख राख हा करिती जल्प । पुढें पादप देखूनी ॥ ७२ ॥ ऐसे समरीं जिंकूनि राजे । शिक्षा लाविली वीरश्रीओजें । रुक्मवतीतें हरूनि पैजे । द्वारके बीजे आदरिलें ॥७३॥ हें देखोनि विदर्भनृपति । परमाश्चर्य मानी चित्तीं । म्हणे रुक्मिणीचिये गर्भशुक्ती । अपर श्रीपति अवतरला ॥७४॥ प्रतापें कृष्णाहूनि आगळा । वीरश्रीमंडन यादवकुळा । एक्या रथेंसी भूपां प्रबळां । न भरतां पळा पळविलें पैं ॥ १७५ ॥ ऐसा वीर अद्वितीय । विशेष आपुला भागिनेय । रुक्मवतीतें परम प्रिय । जाणोनि स्नेह आदरिला ॥ ७६ ॥ श्यामसुंदर देखूनि कान्ति । प्रत्यक्ष साङ्ग अनंगव्यक्ति । लक्षूनि म्हणे रुक्मवती । यावीण नृपति न वरीं मी ॥ ७७ ॥ राया तुवां जो प्रश्न केला । त्यामाजी स्वयंवरोत्साह कथिला । यावरी रुक्मि प्रशस्त झाला । कन्यार्पणाला तें ऐका ॥ ७८ ॥

यद्यप्यनुस्मरन्वैरं रुक्मी कृष्णावमानितः । व्यतरद्भागिनेयाय सुतां कुर्वन्स्वसुः प्रियम् ॥२३॥

रुक्मिणीचिये स्वयंवरीं । रुक्मि अवमानिला हरी । जरी तें शल्य स्मरे अंतरीं । तथापि कुमारी दे मदना ॥ ७९ ॥ रूप लावण्य सुंदर । प्रतापी भर्ग कीं भार्गव वीर । ऐसा जामाता कैंचा अपर । विशेष आदर भगिनीचा ॥ १८० ॥ रुक्मिणीचिया स्नेहगौरवीं । प्रद्युम्नातें स्वकन्या द्यावी । ऐसा विचार करूनि जीवीं । जातां राहवी प्रार्थूनी ॥ ८१ ॥ सर्वे घेऊनि नागरजन । सहित पुरोहित प्रधान । रुक्मी निघाला आपण । प्रार्थून प्रद्युम्न आणावया ॥ ८२ ॥ अश्वसादी वेत्रपाणि । पुढें धाडिले तत्क्षणीं । एका पत्रिका देऊनी । द्वारकाभुवनीं पाठविलें ॥ ८३ ॥ मूळपत्रिका लिहोनि शुद्ध । देवकीवसुदेव यादववृंद । कृष्ण रुक्मिणी हलायुध । लग्न विशद पाचारिले ॥ ८४ ॥ स्वपुत्र धाडूनि द्वारवती । आपण प्रद्युम्नातें प्रार्थी । कन्या हरूनि सर्व भूपती । जिणोनि ख्याति दाखविली ॥ १८५॥ आतां चला जी माझिया सदना । सारूनि वेदोक्त विधिविधाना । रुक्मवतीच्या पाणिग्रहणा । करूनि अंगना मग न्यावी ॥ ८६ ॥ द्वारके लिहूनियां कागळ । स्वपुत्र प्रधान धाडिले मूळ । ऐसें प्रार्थितां मातुळ । प्रद्युम्न तत्काळ परतला ॥ ८७ ॥ पुरा निकटीं पुष्पोद्यानीं । सीमान्तपूजा संपादूनी । नगरा जामात नेऊनी । वस्त्रसदनीं राहविला ॥ ८८ ॥ नगर श्रृंगारिलें साजिरें । उभविलीं तोरणें पताका मखरें । जानवशार्थ रम्य शिबिरें । अतिविस्तारें उभविलीं ॥ ८९ ॥ मूळ प्रविष्ट द्वारकापुरीं । पत्रिका पाहोनि राममुरारी । प्रद्युम्नप्रताप ऐकतां भारी । अभ्यंतरीं संतुष्ट ॥ १९० ॥ सवें देऊनियां गद । चारुदेष्णादि कुमरवृंद । अक्रूर सात्यकि सन्नद्धबद्ध । रुक्मिणीसमवेत पाठविले ॥ ९१ ॥ भोजकटपुरा जाऊनि सकळी । अग्रजा भेटली भीमकबाळी । अक्रूर सात्यकिक्षेमें कवळी । चारुदेष्णादि आळंगिले ॥९२॥ सुहृद् आप्त सर्व मीनले । देखोनि रुक्मिणी अग्रजा बोले । म्हणे त्वां स्नेहवर्धन केलें । दुणाविलें सोयरिके ॥ ९३ ॥ येरू म्हणे हें ब्रह्मसूत्र । अघटित घडवी दैव विचित्र । तव पुत्रानें करूनि क्षात्र । केलें कलत्र मम कन्ये ॥ ९४ ॥ इत्यादि उपचारवचनादरें । क्षेमकुशल परस्परें । वेदविहित-विधानगजरें । लग्नस्वसूत्रें लाविलें ॥ १९५ ॥ बोहलां वधूवरें गोमटीं । संतुष्ट रुक्मिणी पाहोनि पोटीं ।

झणें कोणाची लागेल दृष्टि। लोण स्वमुष्टी उतरीतसे ॥ ९६ ॥ प्रद्युम्न वीर झुंझार गाढा। न कळत प्रवर्तला कैवाडा। रूपलावण्यसरीपाडा। समान जोडा मेळविला ॥ ९७ ॥ झुंजार राजे भंगिले समरीं। जिंकिली पैजेसि नोवरी। रंभा उर्वशी न पवे सरी। परम सुन्दरी रुक्मवती ॥ ९८ ॥ सोळा दिवस सोहळा केला। सुहृद स्वजन गौरविला। याचकसमुदाय संतोषविला। स्वेच्छादानें वैदर्भें ॥ ९९ ॥ रुक्मिणीचे प्रीतीकारणें पृथक्पृथक् दिव्याभरणें। वसनें वाहनें सह भाजनें। दिवस सोळाही समर्पिलीं ॥ २०० ॥ रामकृष्णाचिया मानें। गद गौरविला वसनाभरणें। पोष्यांमाजी मज जाणणें। रुक्मि म्हणे सप्रेमें ॥ १ ॥ चारुदेष्णादि उपजामात। सर्वाभरणीं सालंकृत। अक्रूर सात्यकि यादव समस्त। सेनेसहित गौरविले ॥ २ ॥ शिबिकाहयगजरथादि यानें। सालंकृतें सपल्याणें। दासदासी-सहोपकरणें। दिधल्या आंदण बहु वस्तु ॥ ३ ॥ रुक्मिणीनें बंधुवनिता। वस्त्राभरणीं आनंदभरिता। करूनि सोयरियां समस्तां। अर्पिलीं उचित उपायनें ॥ ४ ॥ दास दासी नागरिक। वस्त्राभरणीं एकें एक। संतुष्ट करूनियां सम्यक। प्रतापदीपक उजाळिला ॥ २०५ ॥ याचकमंडळी बोळविली। कीर्ति तन्मुखें दिगंता गेली। नृपां जिंकूनि ख्याति केली। मदनें वरिली रुक्मवती ॥६॥ त्यानंतरें सुमुहूर्ती। वरात निघाली द्वारकेप्रति। कुञ्जरभेरी गर्जताती। विचित्र वाजती वाजंतरें ॥७॥ हय रथ कुंजर यादवभार। सन्नद्ध सात्यकि गद अक्रूर। सज्जूनि चातुरंग परिवार। नगराबाहेर निघाले ॥ ८ ॥ अंबिकापुरीं पंचरात्र। राहूनि उत्साह स्वतंत्र। केला सपर्यापुरस्सर। नमी वोहर जगदंबे ॥ ९ ॥ मग पातलीं द्वारकापुरा। ऐकूनि कुंजरभेरीगजरा। सवें घेऊनि कृष्णकुमरा। आला सामोरा बळभद्र ॥ २१० ॥ द्वारका शृंगारिली कोडें। कुंकुमसिक्ता चहूंकडे। मखरें तोरणें पताका जोडे। रंगीं बागडे नाचती ॥ ११ ॥ विचित्र शोभा दामोदरीं। नगरीं सालंकृत नर नारी। ठायीं ठायीं नृत्यकारी। नाचती गजरीं सुताळें ॥ १२ ॥ महाद्वारीं सांडूनि बळी। वधूवरेंसहित भीमकबाळी। गद सात्यकि अक्रूर हली। नृपाजवळी पातले ॥ १३ ॥ आहुकराजा उग्रसेन। तोषला वधूवरें देखोन। देवकी वसुदेव जनार्दन। नमी प्रद्युम्न वनितेशीं ॥ १४ ॥ सवेग उठूनियां उद्धवें। ओहर रुक्मिणी घेवोनि सवें। देवक वंदूनि कृत्य आघवें। श्रीपूजन संपविलें ॥ २१५ ॥ जाम्बवती रेवती रति। भाणवसातें निरोपिती। निजाभरणें देऊनि प्रीति। आलिंगिती रुक्मवतीतें ॥ १६ ॥ नगरनागरिकां सोहळा। वसनाभरणें टिळे माळा। अहेर अर्पिती घननीळा। आहुकनृपाळा बसुदेवा ॥ १७ ॥ करूनि ब्राह्मण-संतर्पणें। कुलविधानें देवार्चनें। नगरनागरिकां भोजनें। सर्व सम्मानें पूजिले ॥ १८ ॥ विदर्भपुत्र प्रधानें सहित। सवें आले जे बोळवित। तयांसी अहेर यथोचित। देऊनि समस्त सुखी केले ॥ १९ ॥ रुक्मिणीचिये हरणकाळीं। रुक्मि विटंबिला वनमाळी। हृदयीं वाहे जे काजळी। ते ये वेळीं विसरला ॥ २२० ॥ द्वेषभाव परिमार्जिला। सुहृद्भाव दुणाविला। रुक्मिणीस्नेहें प्रद्युम्नाला। देता झाला निज

तनया ॥ २१ ॥ परस्परें वैर असतां । सुहृद्भावा हेतु कोणता । राया प्रश्न जो केला होता । तो हा तत्वतां निरूपिला ॥ २२ ॥ यावरी रुक्मिणीचिये पोटीं । दहा पुत्रांहूनि धाकुटी । कन्या चारुमती गोमटी । तियें जगजेठी वर पाहे ॥ २३ ॥ जिचिया रूपलावण्यगुणा । सरी न पवती अमराङ्गना । ऐसी नोवरी प्राप्त कोणा । त्याही कथना अवधारीं ॥ २४ ॥

रुक्मिण्यास्तनयां राजन्कृतवर्मसुतो बली । उपयेमे विशालाक्षीं कन्यां चारुमतीं किल ॥ २४ ॥

कृतवर्म्याचा तनय बळी । गुणलावण्यसमरशाली । कन्या चारुमती वेल्हाळी । दे वनमाळी तयातें ॥ २२५ ॥ प्रथम रुक्मिणीची तनया । पुढती कन्या म्हणतां राया । द्विरुक्ति सहसा न नमूनियां । अभिप्राया जाणावें ॥ २६ ॥ कन्या म्हणिजे अष्टवार्षी । मृगलोचना विशालाक्षी । जोडा लक्षूनि सर्वसाक्षी । देता झाला सर्वज्ञ ॥ २७ ॥ यथाविधि वेदविधान । कृष्णें केलें कन्यादान । कृतवर्म्याचा ज्येष्ठ नंदन । वरी आपण करग्रहणें ॥ २८ ॥ कृष्णें आंदण दिधलें बहुत । सोहळा केला परमाद्भुत । इष्टमित्र सोयरे आप्त । संतोषभरित गौरविले ॥ २९ ॥ मूळवराडी लहान थोर । रुक्मिणीचे बंधु समग्र । तिहीं गौरविलें वोहर । सुहृदां अहेर समर्पिले ॥ २३० ॥ परस्परें लेणीं लुगडीं । आदरें बोळविले वऱ्हाडी । भीमकी रुक्मवतीच्या आवडी । रुक्मी घाडिघडि सांभाळी ॥ ३१ ॥ पूर्वील द्वेष हारपला । सुहृद्भाव प्रवर्तला । तदनुसार सोयरिकेला । करिता झाला तें ऐका ॥ ३२ ॥ चारुमतीचें कन्यादान । करिता झाला जनार्दन । याचि प्रकारें राया जाण । कन्या संपूर्ण उजविल्या ॥ ३३ ॥ साष्ट शत सहस्र सोळा । दश दश पुत्र एकेकीला । एकेक कन्या घनसांवळा । देता झाला स्ववीर्यें ॥ ३४ ॥ तयां सर्वांचे विवाह । कथितां पृथक्त्वें उत्साह । होईल ग्रंथासी परिणाह । यास्तव समूह आवरिला ॥ २३५ ॥ नृपाचें आयुष्य अल्प उरलें । भागवत पाहिजे संपविलें । म्हणोनि समासें कथन केलें । पुढें बोलले तें ऐका ॥ ३६ ॥

दौहित्रायानिरुद्धाय पौत्री रुक्म्यददद्धरेः । रोचनां बद्धवैरोऽपि स्वसुः प्रियचिकीर्षया ॥
जानन्नधर्मं तद्यौनं स्नेहपाशानुबंधनः ॥ २५ ॥

श्रीकृष्णाचा बद्धवैरी । वपनें विटंबिला जो समरीं । ऐसा असतांही अंतरीं । भगिनीस्वकुमरीस्तव द्रवला ॥ ३७ ॥ कैसा द्रवला म्हणसी राया । तरी भगवंताची अगाध माया । जिणें मोहिलें जगत्त्रया । ते तत्कार्या प्रवर्तवी ॥ ३८ ॥ भगिनीचिया स्नेहादरें । कन्या दिधली सप्रेमभरें । वैर असतांही सोयरे । ऐशा प्रकारें ते झाले ॥ ३९ ॥ रुक्मवतीचिये जठरीं । प्रद्युम्नवीर्यें जन्मला क्षत्री । अनिरुद्ध नामा अपर शौरि । जो अजिंक समरीं सुरासुरां ॥ २४० ॥ लावण्यरसाचा पुतळा । गुणगणमंडित यौवनकळा । प्रतापें तुळितां ज्याचिया बळा । शक्रही आगळा हों न शके ॥ ४१ ॥ रुक्मी ऐशा दौहित्रातें । नोवरा योजी स्वपौत्रीतें । रोचनेच्या लावण्यातें । समता चित्तें जाणोनी ॥ ४२ ॥ आपुल्या दौहित्रा-

कारणें । पौत्री रोचना कलत्र करणें । एवं स्नेहाच्या अवतरणें । द्वेषाचरणें सांडवला ॥ ४३ ॥ अन्न न भक्षिजे द्वेष्टयाचें । आपुलें त्यासी न दीजे साचें । हेंचि कारण अधर्माचें । जें उभयां स्नेहाचें सुहृदत्व ॥ ४४ ॥ उभयांमाजी द्वेष असतां । विवाहसंबंध तो अधर्मता । जाणत जाणत करूं जातां । विघ्नावर्तावर पडती ॥ २४५ ॥ ऊर्ध्वगतीचे नाशकर । अपकीर्तिदायक लोकोत्तर । धर्मानुकूळही असतां चतुर । न होती तत्पर ते कर्मीं ॥ ४६ ॥ तस्मात् रुक्मि भगवद्द्वेष्टा । परंतु भगिनीस्नेहाभीष्टा । भजूनि करितां सुहृदनिष्ठा । पावला कष्टा तद्योगें ॥ ४७ ॥ तें निरूपण येईल पुढें । ऐक वैवाहिक रोकडें । ब्रह्मरेखा कवणा मोडे । भवितव्य घडे दैवबळें ॥ ४८ ॥

तस्मिन्नभ्युदये राजन्रुक्मिणी रामकेशवौ । पुरं भोजकटं जग्मुः साम्बप्रद्युम्नकादयः ॥ २६ ॥

लोकविरुद्धाचरण करितां । वरपडें होइजे विघ्नावर्ता । हें राहटीमाजी मन्मथजनिता । दावी तत्वता वर्तूनी ॥ ४९ ॥ रुक्मरथादि बन्धुगण । द्वारकाभुवना पाठवून । स्वपौत्रीचें कन्यादान । दौहित्रातें नेमिलें ॥ २५० ॥ तया विवाहोत्सवाच्या ठायीं । रामकेशव स्वसमुदायीं । सन्नद्ध बद्ध होवोनि पाहीं । जाते झाले भोजकटा ॥ ५१ ॥ रति रुक्मवती वरमाता । रेवती रुक्मिणी तयांसहिता । शिबिकायानीं उत्साहभरिता । जाती तत्वता लग्नासी ॥ ५२ ॥ जाम्बवतीचे साम्बप्रमुख । प्रद्युम्नादि रुक्मिणीतोक । सात्यकिउद्धवाक्रूरादिक । सेनानायक दळभारीं ॥ ५३ ॥ प्रविष्ट झाले भोजकटीं । सम्मुख रुक्मि पातला भेटी । विसरूनि मागल्या द्वेषगोष्टी । स्नेहसंतुष्टी आलिंगी ॥ ५४ ॥ करूनि सीमान्तपूजन । जानवशाचें दाविलें स्थान । शिबिरें देवोनि जनार्दन । तेथ ससैन्य उतरला ॥ २५५ ॥ देवकप्रातिष्ठा दोहींकडे । सर्वत्रांसी वांटिले विडे । मंत्रघोष करिती तोंडें । विप्र वऱ्हाडें आले ते ॥ ५६ ॥ यादवीं वधूसी अर्पिलें फळ । विदर्भे वरासि धाडिलें मूळ । वाद्यें वाजती सुमंगळ । भेरी मांदळ पणवादि ॥ ५७ ॥ करूनि वराचें पूजन । वसनाभरणें समर्पून । समस्तांसी ताम्बूलदान । स्रक्चंदन परस्परें ॥ ५८ ॥ नोवरा वाहूनि अश्वावरी । विवाहमंडपा चालिले गजरीं । नृत्यगीतादि वाजंतरीं । घोष अंबरीं न समाये ॥ ५९ ॥ नाना कौतुकें दाविती पंथीं । कृत्रिम गजाश्व नर्तविती । अग्नियंत्रे विविधाकृति । प्रकट करिती कौशल्यें ॥ २६० ॥ कौतुकदर्शकां देऊनि त्याग । पुढें चालिले बळ श्रीरंग । तंव गायक नर्तकी नर्तक साङ्ग । भरिती रंग पदोपदीं ॥ ६१ ॥ एवं मंडपीं प्रवेशले । मदनें लक्ष्मीपूजन केलें । अनिरुद्धातें समर्चिलें । विदर्भभूपें मधुपर्कें ॥ ६२ ॥ उपाध्ये म्हणती सावधान । मध्यें अंतःपट धरून । वधूवरें उभीं केलीं पूर्ण । मंगलपठनें द्विज करिती ॥ ६३ ॥ लक्ष्मीनारायण चिंतिजे । कुलस्वामीचें चिन्तन कीजे । अतिसमय वर्ततां ओजें । सावध राहें हे सूचना ॥ ६४ ॥ दोहींकडे करवल्या नारी । अक्षता टाकिती ओहरावरी । जीवनें घटिका भरतां पुरी । तेचि अवसरीं ओंपुण्य ॥ २६५ ॥ वधूवरें परस्परें माथां । अक्षता घालिती ओंपुण्याय होतां । मग बैसवूनियां तत्वतां । कंकण बांधिती द्विजवर्य ॥ ६६ ॥ कडिये घेवोनियां नोवरी । नोवरा नेवोनि बोहल्यावरी । अग्निप्रतिष्ठा करूनि विप्रीं । होम सारिला विध्युक्त ॥ ६७ ॥ करिती अक्षवणें सुवासिनी । वोहरांवरूनि ओंवाळणी ।

ओंवाळिती वऱ्हाडिणी । मंगळध्वनि वाद्यांचा ॥ ६८ ॥ ब्राह्मणांचें वेदपठन । बिरुदें पढती बंदिजन । परिमळद्रव्यें स्रक्चंदन । ताम्बूल तिलक सर्वांसी ॥ ६९ ॥ कनकरत्नें भूरि दक्षिणा । वांटिली सर्वत्र ब्राह्मणां । त्यागदानें बंदिजनां । विद्योपजीवियां तोषविलें ॥ २७० ॥ मग बैसोनि एक पंक्ति । भोजनें सारिलीं सुहृदीं आप्तीं । एवं सोहळा षोडश राती । केला निगुतीं वैदर्भें ॥ ७१ ॥ पृथक्पृथक् विधिविधानें । नित्य नूतन वस्त्राभरणें । वोहरावरमातांकारणें संतुष्टमनें समर्पिलीं ॥ ७२ ॥ साडे ऐरणीपूजन । वंशपात्र करूनि दान । सवें नोवरिये घेऊन । आले यदुगण स्वशिबिरा । ॥ ७३ ॥ आणिली स्वमंडपा वरात । लक्ष्मीपूजन इत्थंभूत । करूनि यादवीं वैदर्भनाथ । अहेरीं यथोचित गौरविला ॥ ७४ ॥ परस्परें लेणीं लुगडीं । अहेरीं तोषविले वऱ्हाडी । अमृतासमान लोटली घडी । सप्रेम गोडी वाढविली ॥ २७५ ॥ लोकविरुद्धधर्माचरण । तें केलिया बाधी विघ्न । कैसें म्हणसी तें व्याख्यान । ऐकें येथून सांगतसें ॥ ७६ ॥

तस्मिन्निवृत्त उद्वाहे कालिंगप्रमुखा नृपाः । दृप्तास्ते रुक्मिणं प्रोचुर्बलमक्षैर्विनिर्जय ॥
अनक्षज्ञो ह्यय राजन्नपि तद्व्यसनं महत् ॥ २७ ॥

विवाहसमारंभ संपला । उभयपक्षीं आनंद झाला । अकस्मात तो विघ्नघाला । उदया आला दुर्दैवें ॥ ७७ ॥ कालिङ्गप्रमुख दृप्त नृपति । विदर्भाचे पक्षपाती । केवळ दुष्टात्मे दुर्मति । ते रुक्मी बोधिती दुर्मंत्रें ॥ ७८ ॥ प्रभाते यादव सुमुहूर्तीं । नोवरी घेऊनि द्वारके जाती । यालागीं कांहीं विदर्भनृपति । रहस्ययुक्ति अवधारीं ॥ ७९ ॥ द्यूतकर्मीं अप्रवीण । द्यूतक्रीडेचें वाहे व्यसन । वृथाभिमानी संकर्षण । अनक्षज्ञ जिंकावा ॥ २८० ॥ तो हा बळभद्र विदर्भराया । प्रसंगें आला विवाहकार्या । द्यूतीं प्रतिज्ञा करूनियां । जिंकावया प्रवर्तिजे ॥ ८१ ॥ कौतुकें मांडूनि द्यूत खेळ । आम्ही प्रेक्षक बैसूं सकळ । अक्षविद्येनें जिंकूनि बळ । मागील सळ उमचावें ॥ ८२ ॥ द्यूतक्रीडेचा अभ्यास । नाहीं बलरामा निःशेष । अतज्ज्ञ असोनि तो हव्यास । अंगीं बहुवस वाहतसे ॥ ८३ ॥ ऐसा रुक्मी कालिङ्गप्रमुखीं । बोधितां ऐकूनि भरला तंवकीं । दुर्बुद्धि देऊनि काळमुखीं । होमिती ऐसें उमजेना ॥ ८४ ॥ कामुका पराङ्गनेची रति । दुर्मित्र जैसे योजोनि देती । परी शूळारोपण नरकावाप्ति । हे विपत्ति त्या नुमजे ॥ २८५ ॥ तैसाच कालिङ्गप्रमुखीं राया । रुक्मी दुर्मंत्र बोधूनियां । प्रवर्तविला द्यूतकार्या । तत्कृतचर्या अवधारीं ॥ ८६ ॥

इत्युक्त्वा बलमाहूय तेनाक्षै रुक्म्यदीव्यत । शतं सहस्रमयुतं रामस्तत्राऽऽददे पणम् ॥ २८ ॥

राजे घेऊनि स्वपक्षपाती । रामकृष्णांतें प्रार्थूनि निगुती । द्यूतक्रीडेचिये आर्ती । क्षणैक समस्तीं वैसावें ॥ ८७ ॥ उद्धवप्रमुख बैसिजे तुम्हीं । बळरामेंसीं खेळूं आम्ही । क्षत्रिय द्यूतीं कां संग्रामीं । विमुख न होती आमंत्रितां ॥ ८८ ॥ ऐसें ऐकूनियां वचन । उत्साहभरित संकर्षण । प्रतिज्ञापूर्वक करूनि पण । म्हणे आपण सिद्ध असों ॥ ८९ ॥ उद्धव अक्रूर वदती बोला । म्हणती चिरकाळ जागर

झाला । अंगीं उजगरा असे भरला । आजि या खेळा नादरिजे ॥ २९० ॥ प्रभाते जाणें द्वारकापुरा । आतां क्षणैक विश्रान्ति करा । घूर्मी दाटली असे नेत्रां । जडता गात्रा जाकळिते ॥ ९१ ॥ हें ऐकोनि रुक्मि म्हणे । तुम्हीं अवश्य निद्रा करणें । आम्हांसमवेत संकर्षणें । द्यूत खेळणें आवश्यक ॥ ९२ ॥ भविष्य जाणोनियां हरि । सहसा कोणातें न निवारी । आपण स्वसुखें निद्रा करी । क्रीडा येरीं आदरिली ॥ ९३ ॥ कालिङ्ग प्रमुख राजे सकळी । येऊनि बैसले सभामंडळीं । राम रुक्मी क्रीडाशाळी । द्यूतखेळीं प्रवर्तले ॥ ९४ ॥ रामें मांडिला शतनिष्कपण । विदर्भे नेला तो जिंकोन । पुढतीं सहस्र निष्क सुवर्ण । राम घेऊन क्रीडतसे ॥ २९५ ॥ तोही रुक्मि जिंकूनि नेतां । अयुत निष्क झाला धरिता । तोही डाव रुक्मी हरितां । रेवतीकान्ता नृप हंसती ॥ ९६ ॥

तं तु रुक्म्यजयत्तत्र कालिंगः प्राहसद्बलम् । दंतान्संदर्शयन्नुच्चैर्नामृष्यत्तद्धलायुधः ॥ २९ ॥

बळभद्रातें कालिङ्ग नृपति । दांत दावूनि हांसतां कुमति । उच्चस्वरें हास्य करिती । त्या अनुकरती अपरही ॥ ९७ ॥ तें न गणूनि हलायुध । विदर्भातें म्हणे सावध । आपणा म्हणविसी अक्षकोविद । तरी धर्मता शुद्ध पण जिंकें ॥ ९८ ॥

ततो लक्षं रुक्म्यगृण्हाद् ग्लहं तत्राजयद्बलः । जितवानहमित्याह रुक्मी कैतवमाश्रितः ॥ ३० ॥

हें ऐकूनि रुक्मी म्हणे । लक्ष निष्क म्यां धरिले पणें । तुम्हीं धर्मता जिंकूनि नेणें । अक्ष ढाळणें झडकरी ॥ ९९ ॥ अक्ष ढाळूनि तत्क्षणें । पण जिंकिला संकर्षणें । कपटाश्रयें त्या विदर्भ म्हणे । म्यां जिंकिला पण आतां ॥ ३०० ॥ सर्व प्रेक्षक सभासद । साक्ष देती भूपाळवृंद । तुम्ही धर्मता अक्षकोविद । मिथ्या वाद करूं नका ॥ १ ॥ ऐसा ऐकूनि कुटिल शब्द । क्रोधें बळराम झाला क्षुब्ध । आंगीं वीरश्रीचा मद । प्रळयीं क्षारोद ज्यापरी ॥ २ ॥

मन्युना क्षुभितः श्रीमान्समुद्र इव पर्वणि । जात्यारुणाक्षोऽतिरुषा न्यर्बुदं ग्लहमाददे ॥ ३१ ॥

नातरी अमावास्येच्या दिवसीं । प्रबळ भरतें महोदधीसी । त्याहूनि बळराममानसीं । क्रोध विशेष प्रज्वळला ॥ ३ ॥ क्षोभें आरक्त झाले नयन । दहा कोटि घेतला पण । अक्ष धर्मता ढाळून । रामें तो पण जिंकिला ॥ ४ ॥ न्यर्बुद म्हणिजे दहा कोटि । ग्लह जिंकितां राम जगजेठी । रुक्मी मुमूर्षु दुर्मति कपटी । बोलिला गोठी ते ऐका ॥ ३०५ ॥

त चापि जितवान्रामो धर्मेण च्छलमाश्रितः । रुक्मी जितं मयात्रेमे वदंतु प्राश्निका इति ॥३२॥

कपटाश्रयें बोले बोला । म्हणे म्यां हा ग्लह जिंकिला । प्रेक्षक नृपवर्ग बैसला । तुम्हां आम्हांला साक्षी हा ॥ ६ ॥ यथार्थ साक्षी हे बोलत । ऐसी रुक्मी वदतां मात । चमत्कार अकस्मात । जाला तेथ तो ऐका ॥ ७ ॥

तदाऽब्रवीन्नभोवाणी बलेनैव जितो ग्लहः । धर्मतो वचनेनैव रुक्मी वदति वै मृषा ॥३३॥

गगनीं वाचा अशरीरी । बोलती झाली दीर्घ स्वरीं । रामें जिंकिला ग्लह निर्धारीं । धर्मवैखरी हे जाणा ॥ ८ ॥ कपटें रुक्मी बोले मृषा । धरूनि नृपांचा भरंवसा । लज्जा न वाटे गतायुषा । सद्यचि नाशा पावेल ॥ ९ ॥ गगनवाणी सर्वां कर्णीं । पडली असतां रुक्मी न गणी । पुढें वर्तली जैसी करणी । ऐकें श्रवणीं ते राया ॥ ३१० ॥

तामनादृत्य वैदर्भो दुष्टराजन्यचोदितः । संकर्षणं परिहसन्बभाषे कालचोदितः ॥ ३४ ॥

अनादरूनि नभोक्तीला । रुक्मी दुर्मदें मत्त झाला । दुष्ट रायांहीं प्रेरिला । संकर्षणा उपहासी ॥ ११ ॥ पातली अंतकाळाची घडी । काळें बुद्धि प्रेरिली कुडी । रामा हांसोनि दांत काढी । म्हणे वांकुडी नभोवाणी ॥१२॥ हेलना करूनि संकर्षणा । बोले दुरुक्ति उपहासवचना । कालिङ्गप्रमुखां भूपाळगणा । माजी वल्गना करीतसे ॥१३॥ तिया वल्गना ऐक राया । स्वमुखें वदोनि पावला क्षया । त्या तुज कथितों सह श्रोतयां । विवरीं हृदयामाजिवड्या ॥ १४ ॥

नैवाक्षकोविदा यूयं गोपाला वनगोचराः । अक्षैर्दीव्यंति राजानो बाणैश्च न भवादृशाः ॥३५॥

तुम्ही गोपाळ गोरक्षक । गिरिकाननें परीक्षक । अक्षविद्येचें कौतुक । तुम्हां नावेक दूरतर ॥३१५॥ गाईरक्षणें विचरां वनीं । फळमूळांची घेइजे धणी । राजमंडळीं द्यूतक्रीडनीं । तुम्हांलागूनी अयोग्यता ॥ १६ ॥ यवस तरुवर दारुशकलें । गोमय फळ मूळें वल्कलें । यांवीण तुम्हां परीक्षा न कळे । तुम्ही गोवळे गिरिगामी ॥ १७ ॥ निर्यास लाक्षा शिंकीं दोर । मधुमक्षिकासंभव क्षौद्र । इत्यादि आजन्मकृत व्यापार । अक्षचतुर नव्हां तुम्ही ॥ १८ ॥ अक्षक्रीडा खेळती राजे । अनर्घ्य पदार्थ मांडूनि पैजे । कीं लक्ष भेदूनि दाविती ओजें । बाणसंधानें धनुर्विद्या ॥ १९ ॥ समराङ्गणीं द्यूतपर्णीं । भूप मिरवती चातुर्यखाणी । तुम्हांऐसिया गोरक्षगणीं । गिरिकाननीं मिरवावें ॥३२०॥ हमामा हुंबरी तुमचा खेळ । तुम्हां अनोळख नृपमंडळ । यालागीं नव्हां अक्षकुशळ । रक्षिजे केवळ अजा अविकां ॥ २१ ॥ द्यूत खेळिजे नृपगणीं आम्हीं । अजा अविकें रक्षिजे तुम्हीं । वृथा वाहतां ऐश्वर्यऊर्मी । परि क्षात्रधर्मीं योग्य नव्हां ॥ २२ ॥ एवं द्यूतक्रीडामिसें । बळरामातें विदर्भाधीशें । निष्ठुर निर्भर्त्सितां उपहासें । क्षोभला रोषें तें ऐका ॥ २३ ॥

रुक्मिणैवमधिक्षिप्तो राजभिश्चोपहासितः । क्रुद्धः परिघमुद्यम्य जघ्ने तं नृम्णसंसदि ॥ ३६ ॥

विदर्भें ऐसा संकर्षण । गोरक्षदोषें हिणावून । गोरक्षचर्या परम न्यून । आंगीं लावून निखंदिला ॥२४॥ आणि उपहासें सभास्थानीं । कालिङ्गादि भूपाळगणीं । हेलना करितां संकर्षणीं । काळकोपाग्नि

प्रज्वळला ॥ ३२५ ॥ जैं सृष्टीचा प्रलयकाळ । तैं रुद्राचा नेत्रानळ । प्रकटूनि जाळी ब्रह्माण्डगोळ । त्याहूनि प्रबळ बळराम ॥ २६ ॥ नेत्र आरक्त खदिराङ्गार । ऊर्ध्व दशनीं रगडूनि अधर । परिघ पडताळूनि सत्वर । केला प्रहार रुक्मीतें ॥ २७ ॥ आम्हां गोरक्षकांची क्रीडा । पणेंसहित घेई मूढा । म्हणोनि परिघप्रहार गाढा । माथां रोकडा ओपियला ॥ २८ ॥ सभास्थानीं परिघघातीं । विदर्भभूप पाडिला क्षिती । मुखामध्यें भरली माती । भडके वाहती रुधिराचे ॥ २९ ॥ हाहाकार सभास्थानीं । कालिङ्गप्रमुखां झाली पळणी । एकीं धरिलीं तृणें दशनीं । कितिएक धरणी प्रेतवत् ॥ ३३० ॥ राया कुरुकुळगगनचंद्रा । आवेश न धरे बळसमुद्रा । ऐकें तयाची प्रतापमुद्रा । प्रळयरुद्रापडिपाडें ॥ ३१ ॥

कलिंगराजं तरसा गृहीत्वा दशमे पदे । दंतानपातयत्क्रुद्धो योऽहसद्विवृतैर्द्विजैः ॥ ३७ ॥

मंगळसभामध्यवर्ती । रुक्मी झोडूनि पाडिला क्षिती । अपर राजे प्रतापमूर्ती । पळती दिगंतीं प्राणभयें ॥ ३२ ॥ पदविन्यास क्रमिले नव । दशमे पदीं कालिङ्गराव । धरूनि हृदयीं दिधला पाव । मग केला अभाव दशनांचा ॥ ३३ ॥ सभास्थानीं हेलनायुक्त । कालिङ्ग हांसिला विचकूनि दांत । ते बळरामें हाणोनि लाथ । पाडिले समस्त चौकीचे ॥ ३४ ॥ लत्ताप्रहारें पाडिले दशन । रुधिर प्रवाहे मुखामधून । कालिङ्ग तळमळी जैसा मीन । पावतां पतन उष्ण पुलिनीं ॥ ३३५ ॥ राजे जे जे नामाविलें । शस्त्रास्त्रेंसीं सज्ज झाले । परिघें बळरामें ठोकिले । तें तूं वहिलें अवधारीं ॥ ३६ ॥

अन्ये निर्भिन्नबाहूरुशिरसो रुधिरोक्षिताः । राजानो दुद्रुवुर्भीता बलेन परिघार्दिताः ॥ ३८ ॥

कालिङ्गाचे पाडिले दांत । कितिएकांचे मोडिले हात । लागतां कठोर परिघघात । बाहु चूर्णित अस्थींसीं ॥ ३७ ॥ मोडल्या एकांच्या मांडिया । गुडघे घोंटी पोटरिया । कटी एकांच्या भंगलिया । कुक्षि वक्षें कंठ शिरें ॥ ३८ ॥ उभ्या रक्तें नाहले वीर । शस्त्रास्त्रांचे पडिले विसर । एक पळाले सत्वर । पलायन शूरधीरांचें ॥ ३९ ॥ बळभद्राचा परिघमार । कोणी सांवरूं न शके वीर । एक म्हणती आम्ही किंकर । न कीजे निकर क्रीडेचा ॥ ३४० ॥ सेवकीं राजे परिघक्षतीं । वळखूनि उचलूनि घातले रथीं । आपुलाल्या नगरा नेती । जाली समाप्ति सोहळिया ॥ ४१ ॥ रुक्मिणीचिया स्वयंवरीं । बळराम कळला असतां समरीं । पुढती द्यूतसभागारीं । कां पां नृपवरीं तो छळिला ॥ ४२ ॥ केलें तैसें पावलें फळ । रुक्मि वधिला विदर्भपाळ । आपुलाल्या नगरा सकळ । गेले भूपाळ भग्नाङ्गीं ॥ ४३ ॥ एकीं ओढूनि बांधिलें शिर । एकीं गळां घातले कर । यष्टिकापीठीं देऊनि भार । एकां संचार पदभग्नां ॥ ४४ ॥ लोकविद्विष्ट सौहार्द केलें । त्याचें तैसेंचि फळही घडलें । तस्माच्छास्त्रें निषेधिलें । तें आचरिलें न पाहिजे ॥ ३४५ ॥ रुक्मि मेला विदर्भपति । वनिता पुत्र प्रधान रुदती । यानें सज्जूनि वातगति । द्वारके निघती बाळकृष्ण ॥ ४६ ॥ सोहळ्यामाजी झालें विघ्न । मृत्युपंचकीं होतें लग्न । एक म्हणती कुलाचरण । दैवविधान विसरले ॥ ४७ ॥ एक म्हणती होणार न टळे । लाभ विजय जैसा सुवेळे । हानि मृत्यु काळवेळे । आपुल्या फळे

फळदानीं ॥ ४८ ॥ द्यूतक्रीडेचें करूनि मिष । दैवें केला बुद्धिभ्रंश । निमित्त देऊनि बळरामास । काळें भूपास ग्रासिलें ॥ ४९ ॥ तिये समयीं जनार्दन । कोण्हा कांहीं न वदे वचन । धरूनि ठेला महामौन । काय म्हणून तें ऐका ॥ ३५० ॥

निहते रुक्मिणि श्याले नाब्रवीत्साध्वसाधु वा । रुक्मिणीबलयो राजन्स्नेहभंगभयाद्धरिः ॥ ३९ ॥

सखा मेहुणा रुक्मि मेला । असतां कृष्ण न बोले बोला । हृदयीं पूर्ण विचार केला । म्हणोनि राहिला मौनस्थ ॥ ५१ ॥ मागें सरों जातां आड । पुढें होतां विहीर अवघड । दोहीं प्रकारें सांकड । न मोडे भीड दोघांचीही ॥ ५२ ॥ मेहुण्यासाठीं मानितां विषम । बळरामाचें भंगेल प्रेम । रुक्मि निंदक म्हणतां अधम । भीमकी विराम पावेल ॥ ५३ ॥ भीमकीबळरामाचें मन । दुखवेल म्हणोनि धरिलें मौन । तैसाचि न वदे पैं प्रद्युम्न । वनिताजननीरामाभिडे ॥ ५४ ॥ दोहींकडे भंगेल स्नेहे । यालागीं कांहीं बोलतां न ये । यानें सज्जूनियां लवलाहें । द्वारावतिये चालिले ॥ ३५५ ॥ रति रेवती रुक्मवती । रुक्मिणी सहित बैसल्या रथीं । नवी नोवरी रोचना सती । बैसे स्वपतिसह यानीं ॥ ५६ ॥ दिव्य रहंवर रत्नखचित । लोलपताकाकलशयुक्त । अनिरुद्ध आरूढे रोचनेसहित । वोहर मिरवत यदुभारीं ॥ ५७ ॥ उद्धव अक्रूर चारुदेष्ण । साम्बप्रमुख कृष्णनंदन । द्वारके चालिले तें व्याख्यान । ऐकें संपूर्ण कुरुवर्या ॥ ५८ ॥

ततोऽनिरुद्धं सह सूर्यया वरं रथं समारोप्य ययुः कुशस्थलीम् ।
रामादयो भोजकटाद्दशार्हाः सिद्धाखिलार्था मधुसूदनाश्रयाः ॥ ४० ॥

नवी नोवरी रोचना सती । अनिरुद्धेंसीं दिव्य रथीं । वाहूनि कुशस्थळी प्रति । तदनंतरें चालिले ॥ ५९ ॥ रामप्रमुख यादवभार । वृष्णि अंधक दाशार्ह कुकुर । भोजकटपुरीहूनि सत्वर । सह-परिवार निघाले ॥ ३६० ॥ धराभार उतरावया । जे अवतरले अमरकार्या । धर्म स्थापूनि दुरात्मया । वधावया उद्युक्त ॥ ६१ ॥ ते येथ साधले सकळार्थ । सिद्धी गेलें विवाहकृत्य । रुक्मिप्रमुख राजे दृप्त । खेळतां द्यूत निर्दाळिले ॥ ६२ ॥ दुर्मदांचे गळाले मद । राजे पळाले होवोनि विमद । कृष्णाश्रयें यादववृंद । करिती आनंद विजयाचा ॥ ६३ ॥ मधुदैत्याचें सूदन– । कर्ता म्हणोनि मधुसूदन । त्याच्या आश्रयें सुपर्वाण । ते येथ यदुगण हरि पाळी ॥ ६४ ॥ ऐसे यादव आह्लादभरित । वधूवरेंसीं विराजित । रामकृष्णप्रमुख समस्त । क्रमिती पंथ द्वारकेचा ॥ ३६५ ॥ ठोकिल्या प्रस्थानकुञ्जरभेरी ।

वीर वळघले असिवारीं । गज रथ तुरंग पायभारीं । सेना साजिरी शोभतसे ।। ६६ ।। अग्रभागीं प्रद्युम्न वीर । पार्ष्णिरक्षकें उद्धवाक्रूर । साम्ब जाम्बवतीचा कुमर । दाक्षिणपार्श्वीं प्रतापी ।। ६७ ।। वामभागीं चारुदेष्ण–। प्रमुख रुक्मिणीचे नंदन । मध्यभागीं रामकृष्ण । सेना सज्जून चालिले ।। ६८ ।। रेवती-रुक्मिणीप्रमुखा नारी । रति रुक्मवती सह रहंवरीं । अनिरुद्ध रोचना नव नोवरी । रथीं साजिरीं विराजती ।। ६९ ।। यूथ पताका पृथक् पृथक् । गरुडध्वज आणि तालाङ्क । रथनेमींचा गर्जे घोष । गजर विशेष वाद्यांचा ।। ३७० ।। लंघूनि प्रणता तापीतट । भृगुक्षेत्रीं नर्मदाघाट । उतरूनि गुर्जरदेशा-निकट । आले सुभट जयगजरें ।। ७१ ।। दर्शना येती माण्डलिक । सामंत महीपति अनेक । अर्पूनि उपायनें सम्यक । नीच सेवक म्हणविती ।। ७२ ।। वार्तिक धाडिले आहुकराया । सेना पातली आनर्तविषयां । रेवताचळीं राहूनियां । रात्र क्रमिली ते ठायीं ।। ७३ ।। पुढें पातले द्वारकापुरा । आला श्वफल्क सामोरा । वसुदेवाच्या समस्त कुमरा । यादवभारासमवेत ।। ७४ ।। परस्परें झाल्या भेटी । नगरीं प्रवेशतां जगजेठी । बळि सांडूनि उठाउठी । कनकमुष्टि वांटिलिया ।। ३७५ ।। रोचना अनिरुद्ध वधूवरें । नृपा भेटी नेलीं गजरें । उग्रसेनें स्पर्शोनि करें । कनकाम्बरें गौरविलीं ।। ७६ ।। रामकृष्णीं वंदिला राजा । वसुदेव पिता देवक आजा । अपरां ज्येष्ठां वृष्णिभोजां । नम्र मस्तकीं जोहारिलें ।।७७।। सवेग नृपाची घेऊनि आज्ञा । मग प्रवेशले आत्मभुवना । यानें सेवकीं नेलीं स्थाना । कवचां वसनां विसर्जिलें ।। ७८ ।। लक्ष्मीपूजन गृहप्रवेश । विप्र करिती मंत्रघोष । अन्नीं वसनीं समस्तांस । केला संतोष यदुवर्यें ।। ७९ ।। सर्वत्र विस्तारली मात । रामहस्तें विदर्भघात । रोचना वरूनि विजयवंत । वोहरें सहित हरि आला ।। ३८० ।। पादाक्रान्त भूभुजगण । यादवांसीं समराङ्गण । करावया आंगवण । भूतळीं आन वीर नसे ।। ८१ ।। मागध पराभविला समरीं । काळयवन जाळिला विवरीं । द्यूतक्रीडेच्या अवसरीं । विदर्भ रामें निर्दाळिला ।। ८२ ।। सामान्यांची कायसी कथा । ब्रह्माण्डविभव द्वारकानाथा । शत्रु उभवूं न शकती माथा । कीर्ति दिगन्तामाजिवडी ।। ८३ ।। विभवमंडितद्वारकापुरीं । यदुकुळेंसीं नांदतां हरि । अमरावती न पवे सरी । सह निर्जरीं शक्रेंसीं ।। ८४ ।। इतुकें परीक्षितीचिये श्रवणीं । कृष्णचरित्र बादरायणि । निरूपितां तो अंतःकरणीं । प्रश्नालागूनि उद्युक्त ।। ३८५ ।। रोचनेचें पाणिग्रहण । केलें असतां स्मरनंदन । उषा पर्णी काय म्हणोन । तें कारण पुसों पाहे ।। ८६ ।। पुढिले अध्यायीं ते कथा । राजा पुसेल अरणीसुता । तेथ सावध होवोनि श्रोतां । निजपरमार्था साधावें ।। ८७ ।। श्रीमद्भागवत निर्वाणसत्र । व्यासें उभविलें हें स्वतंत्र । श्रोतीं होइजे केवळ पात्र । श्रवणमात्र करूनियां ।। ८८ ।। अठरा सहस्र गणित याचें । हृदयंगम परमहंसांचें । [illegible] । यश कृष्णाचें अगहंतें ।। ८९ ।। त्यांतील दशम स्कंध हा जाणा । वरिली अनिरुद्धें रोचना । [illegible] मुकला प्राणा । अध्यायगणना एकसष्टि ।। ३९० ।। श्रीमद्भागवत [illegible] । [illegible] ।

एकनाथ कैवल्यदानी । भद्रासनीं भ्रमहंता ॥ ९१ ॥ चिदानंदाचें शासन । तेणें स्वानंदभरित जन । गोविंदकृपेचा अमृतघन । दयार्णव भरून जग निववी ॥ ९२ ॥ येथील मुख्य हेंचि रहस्य । श्रवणीं न करावें वैरस्य । इतुकेनि सिद्धि करिती दास्य । स्वसामरस्य चित्स्वरूपीं ॥ ९३ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां श्रीकृष्णसंततिपुत्रपौत्रादिविवाहकथनं नामैकषष्टितमोऽध्यायः ।

श्लोक ४१ ॥ ओवी-संख्या ३९३ ॥ एवं संख्या ४३४ ॥
( साठावा अध्याय मिळून ओवी-संख्या २९२४७ )

## अध्याय एकसष्ठावा समाप्त

कृष्णदयार्णवकृत

# हरिवरदा

## अध्याय ६२ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीमद्रुक्मिणीरमणाय नमः । अहंता ममता त्वंता पदें । ज्याच्या प्रकाशें होती विशदें । तो सन्मात्र सेवितां सन्मुनिवृंदें । बोधें अबोधें सांडवती ॥ १ ॥ वंदूनि सज्जनसेव्या तया । गोगोप्तया गोविंदराया । दयार्णव द्विषष्टितमाध्याया । विवरावया प्रवर्ते ॥ २ ॥ श्रोतीं होवोनि सावधान । भाषा हरिवरदाव्याख्यान । श्रद्धापूर्वक करितां श्रवण । घरीं वैश्रवण दास्य करी ॥ ३ ॥ स्वानंदपूर्ण निष्कामभक्त । इहामुत्रार्थीं जरी विरक्त । तथापि हरिगुण श्रवणासक्त । होतां सर्वार्थ ओळगती ॥ ४ ॥ कैवल्यसुखाची जे कां जननी । अभेदभक्ति हरिगुरुचरणीं । अपरोक्षबोधें ते लाहूनी । चिदात्मभुवनीं विराजती ॥ ५ ॥ ते भागवतींचा द्विषष्टितम । अध्याय आरंभिला उत्तम । कैसा तयाचा अनुक्रम । तोही सुगम कथिजेतो ॥ ६ ॥ शोणितपुरीं बाणासुर । जो शिवाचा वरद कुमर । तेणें शंकरा याचिला वर । समरीं वीर प्रतियोद्धा ॥ ७ ॥ शंकरें कथिलें तयाप्रति । केतु भंगोनि पडेल क्षिती । तत्प्रसंगें मदोपहति । समरीं निश्चिती लाहसील ॥ ८ ॥ बाणतनया उषानाम्नी । सखी प्रेरूनि द्वारकाभुवनीं । अनिरुद्ध नेऊनि होईल पत्नी । बाण त्या कदनीं रोधील ॥ ९ ॥ ये अध्यायीं इतुकी कथा । शुक निरूपी मत्स्यजामाता । भाषाव्याख्यानें ते श्रोतां । एकाग्रता परिसावी ॥ १० ॥ रोचनेचें पाणिग्रहण । त्यामाजी कथिलें रुक्मिमरण । उषाहरणीं बाणकदन । कैसें म्हणोन भूप पुसे ॥ ११ ॥

राजोवाच – बाणस्य तनयामूषामुपयेमे यदूत्तमः । यत्र युद्धमभूद्घोरं हरिशङ्करयोर्महत् ।
एतत्सर्वं महायोगिन्समाख्यातुं त्वमर्हसि ॥ १ ॥

म्हणे सर्वज्ञ बादरायणि । प्रश्नापेक्षा अंतःकरणीं । वर्ते ते मज विवळ करूनी । घालिजे श्रवणीं स्वामिया ॥ १२ ॥ हिरण्यकशिपूचा जो कुमर । प्रह्लादनामा वैष्णवप्रवर । त्याचा पुत्र विरोचनवीर । वीर्याङ्कुर बळि त्याचा ॥ १३ ॥ बाणासुर बळीचा सुत । शोणितपुरीचा जो नृपनाथ । शङ्कराचा परम भक्त । वोळगे संतत शिवसेवे ॥ १४ ॥ उषानामका बाणतनया । पर्णूनि अनिरुद्धें केली जाया । तेथें शंकरा रुक्मिणीप्रिया । दारुण उभयां रण झालें ॥ १५ ॥ एकमेकांचे हृदयवासी । घोर युद्ध कैं घडलें त्यांसी । हें सर्वही कथावयासी । योग्य आहेसी योगीशा ॥ १६ ॥ ऐसा नृपाचा ऐकूनि प्रश्न । बादरायणि मुनि सर्वज्ञ । करिता झाला निरूपण । तें सज्जन परिस तूं ॥ १७ ॥

श्रीशुक उवाच – बाणः पुत्रशतज्येष्ठो बलेरासीन्महात्मनः । येन वामनरूपाय हरयेऽदायि मेदिनी ॥ २ ॥

शुक म्हणे गा भुवनपाळा । परीक्षिति हरिगुणश्रवणशीळा । हरिभक्तांची अन्वयमाळा । जे कलिमळा सुरसरिता ॥ १८ ॥ प्रह्लाद भजला गरुडध्वजा । अद्यापि ज्याची कीर्तिध्वजा । तत्सुत विरोचन सायुज्या । पातला ओजा रविभजनें ॥ १९ ॥ विरोचनवीर्यें जन्मला बळि । इंद्र मेळविला जेणें धुळी । समस्त त्रिदशांचिये मौळीं । अमरावतीस मिरवला ॥ २० ॥ जया बळीची प्रतापगरिमा । त्रिजगीं कोणी न पवे सीमा । क्षीराब्धि मथूनि दिव्य ललामा । अद्भुत महिमा प्रकाशिला ॥ २१ ॥ जयाचे शतमखयजनकाळीं । वामनरूपें श्रीवनमाळी । त्रिपादभूदानाच्या छळीं । छळितां न डंडळी सत्वस्थ ॥२२॥ ब्रह्माङ्गण भरलें द्विपादमात्र । तृतीयपदीं अर्पी गात्र । एवं वामन दानपात्र । अर्चूनि वेत्रधर केला ॥२३॥ तया बळीस शत एक पुत्र । त्यांमाजी ज्येष्ठ बाणासुर । तेणें आराधिला शंकर । भजनीं तत्पर होऊनी ॥ २४ ॥ वीर धीर प्रतापी बळि । अमरां अजिंक समरशाळी । तेणें तोषवूनि वनमाळी । केला देहलीपरिगोप्ता ॥ २५ ॥ ऐसा महात्मा बळि प्रसिद्ध । ब्राह्मणभजनें जिंकूनि विबुध । कीर्ति विस्तारिली अगाध । प्रतापी प्रह्लाद मानविला ॥ २६ ॥ पुढें तयाचें संतान । नोहे प्राकृतापरी गौण । तुवां केला जयाचा प्रश्न । तें व्याख्यान अवधारीं ॥ २७ ॥

तस्यौरसः सुतो बाणः शिवभक्तिरतः सदा । मान्यो वदान्यो धीमांश्च सत्यसंधो धृतव्रतः ॥ ३ ॥

तया बळीचा औरस कुमर । प्रतापमेरु बाणासुर । शिवसेवनीं निरंतर । चंद्रीं चकोर ज्यापरी ॥ २८ ॥ प्रमथगणीं वरिष्ठ मान्य । बुद्धिमंत आणि वदान्य । सत्य सन्मार्गीं व्रतस्थ पूर्ण । त्रिजगीं धन्य दैत्यकुळीं ॥ २९ ॥ तयाचें उद्दाम ऐश्वर्य । कथितों न्यग्रोधबीजप्राय । क्षणैक सावध परिसता होय । कुरुनरवर्यवैदूर्या ॥ ३० ॥

शोणिताख्ये पुरे रम्ये स राज्यमकरोत्पुरा । तस्य शंभोः प्रसादेन किंकरा इव तेऽमराः ।
सहस्रबाहुर्वाद्येन तांडवे तोषयन्मृडम् ॥ ४ ॥

शतशृंगीचें दुर्गम शृंग । त्यावरी शोणितपुर निलाग । सुरासुरां न करवे लाग । तेथ बाण अभंग राज्य करी ॥ ३१ ॥ शोणितपुरीचा राजा बाण । ऐश्वर्यवंत पूर्वींहून । त्यासी शंभूच्या प्रसादें करून । निर्जरगण दासवत् ॥ ३२ ॥ दास्य करिती ऋद्धिसिद्धि । निर्वैरभावें सेविजे विबुधीं । शिव-सेवेची प्रसादलब्धि । तेणें समृद्धि सर्व घरीं ॥ ३३ ॥ ऐसा संपन्न बाणासुर । जेंवि सहस्रकर भास्कर । शिवताण्डवीं वाद्यकार । होवोनि विचित्र रस भरिला ॥ ३४ ॥ डमरुढाङ्कारीं युग्म द्विकरीं । अपर करयुग्मीं ताल धरी । रुद्रवीणा मुरज झल्लरीं । नागस्वरीं स्वरबद्ध ॥ ३५ ॥ एवं वाद्यें पंच शत । संगीतसंमत मूर्छनायुक्त । शंकर करितां ताण्डवनृत्य । संतोष करित तद्गजरें ॥ ३६ ॥ आनंदभरित नर्तनकाळीं । बाण लक्षूनि वादित्रशाळी । संतुष्ट होवोनि चंद्रमौळी । म्हणे ये वेळीं वर मागें ॥ ३७ ॥ मृडानीरमण जो कां मृड । तो तोषविला चंद्रचूड । प्रसन्न वदनें वचन गोड । बोलिला उघड तें ऐका ॥ ३८ ॥

भगवान्सर्वभूतेशः शरण्यो भक्तवत्सलः । वरेणच्छंदयामास स तं वव्रे पुराधिपम् ॥ ५ ॥

सकलैश्वर्याचे मुकुटीं । सर्वभूतेश्वर जो धूर्जटि । शरण्य शरणागतांच्या कोटी । कृपादृष्टी उद्धर्ता ॥ ३९ ॥ भक्तवत्सल तो पंचवदन । वरें करून प्रलोभी बाण । तेणें शङ्करातें वरदान । स्वपुररक्षण याचिलें ॥ ४० ॥ तुम्ही वरदायी माझिये शिरीं । कृपेनें रक्षावी शोणितपुरी । याञ्चा ऐकूनियां त्रिपुरारि । म्हणे वैखरी तथास्तु ॥ ४१ ॥ वर लाहूनि संतुष्ट बाण । स्थाणु स्वपुरा करी रक्षण । स्वप्रतापासमान आन । पाहे त्रिभुवन शोधूनी ॥ ४२ ॥ मजसमान समराङ्गणीं । योद्धा न दिसे त्रिभुवनीं । म्हणे प्रार्थूनि शूळपाणि । मानसशिराणी पुरवावी ॥ ४३ ॥

स एकदाऽऽह गिरिशं पार्श्वस्थं वीर्यदुर्मदः । किरीटेनार्कवर्णेन संस्पृशंस्तत्पदांबुजम् ॥ ६ ॥

तो मग कोणे एके काळीं । बाण पातला शंभूजवळी । शिवपदाम्बुज वंदूनि मौळीं । बद्धाञ्जळि प्रार्थितसे ॥ ४४ ॥ गिरिमस्तकीं ज्याचें शयन । गिरिशनामा तो ईशान । तया पार्श्वस्थातें नमून । करी प्रार्थन औद्धत्यें ॥ ४५ ॥ प्रतापवीर्यें जो दुर्मद । अदीर्घदर्शी बुद्धिमंद । अर्कभासुरकिरीटें पद । वंदूनि वरद जें मागे ॥ ४६ ॥ ते बाण याचीच वैखरी । शुक रायातें कथन करी । तें व्याख्यान सावध श्रोत्रीं । सुकृतपात्रीं सेवावें ॥ ४७ ॥

नमस्ये त्वां महादेव लोकानां गुरुमीश्वरम् । पुंसामपूर्णकामानां कामपूरामरांघ्रिपम् ॥ ७ ॥

अगा हे महादेवा तूतें । विश्वनियंत्या जगद्गुरूतें । मी नमीतसें परम आर्तें । अमरद्रुमातें जाणोनी ॥ ४८ ॥ आम्हांऐशांचे अपूर्ण काम । पूर्णकर्ता तूं अमरद्रुम । हें जाणोनि श्रीपदपद्म । नमितों सप्रेम

सद्भावें ॥ ४९ ॥ विनीत ऐकूनि बाणवाणी । शंभु पुसे दावूनि पाणि । काय अभीष्ट तुझिये मनीं । मागें म्हणूनि आज्ञापी ॥ ५० ॥ शिवाची प्रसन्नता देखोनी । मागता झाला सहस्रपाणि । तें निरूपी बादरायणि । ऐकें श्रवणीं कुरुवर्या ॥ ५१ ॥

दोः सहस्रं त्वया दत्तं परं भाराय मेऽभवत् । त्रिलोक्यां प्रतियोद्धारं न लभे त्वदृते समम् ॥ ८ ॥

शङ्करातें म्हणे बाणा । सहस्र बाहूंची आंगवण । त्वां हे दिधली मजला पूर्ण । तो भार संपूर्ण मज वाटे ॥ ५२ ॥ पाहतां त्रैलोक्याच्या ठायीं । मजसीं प्रतियोद्धा अपर नाहीं । तुजवांचूनि दुसरा पाहीं । समरमहीं जोडेना ॥ ५३ ॥ तूंचि एक माझेनि पाडें । यालागीं सत्वर मजसी भिडें । बाहुस्फुरण दाटलें गाढें । योद्धा न जोडे बळसिंधु ॥ ५४ ॥

कंडूत्या निभृतैर्दोर्भिर्युयुत्सुर्दिग्गजानहम् । आद्याऽयां चूर्णयन्नद्रीन्भीतास्तेऽपि प्रदुद्रुवुः ॥ ९ ॥

मम दोर्दंडीं वीरश्रीकंडू । दाटला असे महाप्रचंडू । दिग्गजेंसी इच्छीं भिडूं । परी ते पाडू न करिती ॥ ५५ ॥ अगा हे आद्या प्रणवरूपा । वीर श्रीमदें चढूनि कोपा । धांवता तिहीं सांडूनि दर्पा । पळते झाले दिगंतीं ॥ ५६ ॥ पर्वत लोटलिया मजवरी । चूर्ण करीन मुष्टिप्रहारीं । यालागीं तूतें प्रार्थीं समरीं । पुरवीं त्रिपुरारि मम इच्छा ॥ ५७ ॥

तच्छ्रुत्वा भगवान्क्रुद्धः केतुस्ते भज्यते यदा । त्वद्दर्पघ्नं भवेन्मूढ संयुगं मत्समेन ते ॥१०॥

हें ऐकूनि शंभु म्हणे । अभाग्या कायसें हें मागणें । क्रोधें प्रज्वळलेनि नयनें । बोधी वरदानें प्रतियोद्धा ॥ ५८ ॥ गोपुरशिखरींचा मयूरकेतु । तुझा भंगेल जैं अकस्मातु । त्वद्दर्पहंता वीरश्रीनाथ । होईल प्राप्त तैं समरीं ॥ ५९ ॥ माझेनि पाडें अपर रुद्र । समरंगीं तुज जोडेल वीर । हें ऐकूनि बाणासुर । आह्लाद थोर पावला ॥ ६० ॥

इत्युक्तः कुमतिर्हृष्टः स्वगृहं प्राविशन्नृप । प्रतीक्षन्गिरिशादेशं स्ववीर्यनशनं कुधीः ॥ ११ ॥

इतुकी शङ्कर बाणाप्रति । बोलिला सक्रोध वरदोक्ति । ऐकोनि हरिखेला दुर्म्मति । सदनाप्रति प्रवेशला ॥६१॥ प्रवेशोनियां आत्मभुवनीं । विवरी शिवाची वरदवाणी । प्रलयरुद्रतुल्य रणीं । योद्धा लाहेन कैं आतां ॥ ६२ ॥ सहस्रबाहूंचें तुळी बळ । परजी लहुडी भुशुंडी शूळ । पाश पट्टिश चक्रें त्रिशूळ । भिंदिपाळ-परिघादि ॥ ६३ ॥ तोमर मुद्गर कुंत मुसळ । वज्र कृपाण खेटक हळ । गदापरश्वधविद्याकुशळ । शक्ति विशाळ पडताळी ॥ ६४ ॥ धनुर्वेदाचीं आवर्तनें । अस्त्रप्रयोग बीजपठनें । परशस्त्रांचीं निवारणें । उप-संहरणें दिव्यास्त्रां ॥ ६५ ॥ हें देखोनि प्रधान आप्त । पुसती कोण हा विचार गुप्त । कैसेनि आनंद

झाला प्राप्त । कीजे क्लृप्त तो आम्हां ॥ ६६ ॥ ऐसें ऐकूनि म्हणे बाण । म्यां प्रार्थिला गौरीरमण । मजसी करी समराङ्गण । तो योद्धा दारुण याचिला ॥ ६७ ॥ संतुष्ट होवोनिया शङ्कर । कामिलाऐसा दिधला वर । केतु भंगेल तैं तुज वीर । समरीं दुर्धर जोडेल ॥ ६८ ॥ ऐकोनि प्रधान मंत्री म्हणती । उदेली दुर्दैवें दुर्मति । अमृत हाणोनि लत्ताघातीं । धरिली प्रीति विषपानीं ॥ ६९ ॥ अपयश गर्भा आलें असे । म्हणोनि डोहळे झाले ऐसे । पावक कवळावया संतोषें । पतंग जैसे सोत्साह ॥ ७० ॥ आपुल्या वीर्याचें नाशन । कर्ता जुंझार रुद्रासमान । केव्हां मजशीं करील रण । तें शिववरदान प्रतीक्षी ॥ ७१ ॥ असो इतुकी बाणकथा । ध्वजभंगाचा हेतु कोणता । तोही पुससि जरी कुरुनाथा । तरी तत्त्वता निरूपितों ॥ ७२ ॥

तस्योषा नाम दुहिता स्वप्ने प्राद्युम्निना रतिम् । कन्याऽलभत कांतेन प्रागदृष्टश्रुतेन च ॥ १२ ॥

उषानामका दुहिता त्याची । अनुपनीतां असतां साची । स्वप्नामाजी अनिरुद्धाची । रति लाभली दैवबळें ॥ ७३ ॥ कन्याशब्दें अपर्णिता । सुरतक्रीडेची अनभिज्ञता । जो नर देखिला ऐकिला नसतां । तेणें तत्त्वता रति केली ॥ ७४ ॥ कान्त म्हणिजे अतिसुन्दर । नवयौवनें निमासुर । तेणें स्वप्नीं सुरता-चार । केला असुरतनयेशीं ॥ ७५ ॥ कोण्या साधनें कैसें दैव । कैसा स्वप्नप्रादुर्भाव । कोंवि लाभली नर अपूर्व । तेंही सर्व अवधारा ॥ ७६ ॥ तें येथ श्रीमद्भागवतीं । वदला श्रीशुक संकाळितीं । यालागीं विष्णुपुराणसंमति । कथान्वय निगुती कथिजेतों ॥ ७७ ॥ कथासंबंध उमजावयासी । वैष्णवोक्त इतिहासासी । संदर्भितां अनारिसी । टीका विदुषीं न मनावी ॥ ७८ ॥ बाणासुराची तनया उषा । जिचिया लावण्यरसपीयूषा । सुरनरामरलोचनां तृषा । चकोरां निशारमणवत् ॥ ७९ ॥ लावण्यरसाची पुतळी । नवयौवनें कोमळ बाळी । दिव्याभरणेंसी वेल्हाळी । रूपनव्हाळी देखतयां ॥८०॥ गौरीसेवनीं परम निरत । तंव कौतुक वर्तलें अकस्मात । पार्वती आणि कैलासनाथ । क्रीडा करिती स्वानंदें ॥८१॥ तें देखोनि बाणतनया । विरहें व्याकुळ झाली राया । कामज्वरें तापली काया । म्हणे मम वया वैयर्थ्य ॥ ८२ ॥ निजमानसीं स्पृहा करी । म्हणे सर्वज्ञ असतां गौरी । माझे अंतरींची अवसरी । परमेश्वरी कां नेणे ॥ ८३ ॥ ऐसें उषा चिंती मनीं । पार्श्वभागीं बालव्यजनी । तंव तयेतें कात्यायनी । पाहे फिरूनि स्मितवक्त्रें ॥ ८४ ॥ सकळचित्तज्ञा शाङ्करी । म्हणे सुन्दरे बाणकुमरी । हृदयीं कांहीं चिंता न करीं । रमसी निर्धारीं कान्तेंसी ॥ ८५ ॥ अतिशय स्मरसंतप्ता न होणें । स्वकान्तेंसी क्रीडा करणें । ऐकोनि येरी चित्तीं म्हणे । काळीं कोणे घडेल हें ॥ ८६ ॥ कोणता भर्ता नेमिला मज । केंवी कळे हें रहस्यगुज । ऐसें मानसीं भावितां सहज । कळलें बीज गौरीतें ॥ ८७ ॥ पार्वती म्हणे वो लावण्यराशि । शुक्लपक्षीं वैशाखमासीं । प्रदोषयुक्त द्वादशीसी । भर्ता भोगिसी निजशेजे ॥ ८८ ॥ रात्रीं स्वशेजे सुप्त असतां । स्वप्नामाजी भोगील भर्ता । तोचि कान्त तुज तत्त्वता । निर्धारूनि वर दिधला ॥ ८९ ॥ मग ते उषा प्रबुद्ध नवरी । अंगुलें दिवसगणना करी । वैशाखद्वादशीची शर्वरी । कैं मी नेत्रीं पाहीन ॥ ९० ॥ हरिवंशींचा कथाप्रकार । गौरीवराचा उषेसी विसर । असतां स्वप्नीं

मन्मथकुमर । बलात्कारें रमला पै ॥ ९१ ॥ तरी जयाची ज्यासी अवसरी । तयाचा विसर कोणेपरी । पडेल ऐसें जाणिजे चतुरीं । असो अंतरीं विवरूनी ॥ ८२ ॥ वस्त्राभरणें नित्य नूतन । मुकुरीं पाहे स्वलावण्य । म्हणे मजला पुरुष कोण । स्वमीं येऊन भोगील ॥ ९३ ॥ तंव पातला माधवमास । अवस्था वाढे दिवसेंदिवस । कामसमृद्धिकृत हव्यास । उपकरणांस संपादी ॥ ९४ ॥ वैशाख शुक्ल त्रिदिनव्रत । दशमी करूनि एकभुक्त । हरिहरकथा पुराणोक्त । श्रवणीं समस्त दिन गेला ॥ ९५ ॥ एकादशी निराहार । रात्रीं केला शिवजागर । प्रदोषीं पूजूनियां शङ्कर । पारणें द्विजवरसह पंक्ती ॥ ९६ ॥ त्यानंतरें कन्यागारीं । रत्नखचित दामोदरीं । उषा जाऊनि स्वमंदिरीं । तनु शृंगारी कौशल्यें ॥ ९७ ॥ चंद्रकिरणांऐसा श्वेत । शेला नेसली नूतन धौत । तगटीकंचुकी तटतटीत । ग्रंथियुक्त लेइली ॥ ९८ ॥ कनकरत्नाभरणीं वेणी । खोपा ग्रथिला सुगंध सुमनीं । अर्धचंद्र बिजोरा रत्नीं । जडित शीसफुल मुक्तलग ॥ ९९ ॥ श्रवणभूषणें कुंडलजोडे । गल्लदेशीं दोहींकडे । कुंडलप्रभा वदनीं पडे । शशाङ्कपाडें मुख भासे ॥ १०० ॥ स्निग्ध मोहित रजनीचूर्ण । करीं मर्दूनि चर्चिलें वदन । नयनीं सोगयाचें अंजन । कुंकुम कोरून रेखिलें ॥ १ ॥ भ्रूहनुवटीउभयभागीं । गोंदिली प्रभा गगनरंगीं । चंदनटिकली चंद्रासंगीं । चित्रांसंलग्न तेंवि गमे ॥ २ ॥ नाकीं नथनी नवरत्नजडित । ताम्बूल त्रयोदशपदार्थयुक्त । वाम कपोलीं दृग्दोषार्थ । अंजनाङ्क मिरवतसे ॥ ३ ॥ कुंतलकुटिलालकमंजरी । सूक्ष्म मिरवे दक्षिण श्रोत्रीं । नवयौवनें तनु साजिरी । गौर भासुर कनकाङ्गीं ॥ ४ ॥ बाहुभूषणें वलयें चुडे । रत्नखचित कंकणजोडे । मुद्रिकांवरी जोडिले खडे । कर भासुर तद्योगें ॥ १०५ ॥ मलयजगंधें घेऊनि उटी । मुक्ताफळांचे हार कंठीं । अमूल्य मेखळा कटितटीं । क्षुद्रघंटी रुणझुणती ॥ ६ ॥ अंद्रू नूपुर वांकी वाळे । अनुवट जोडवीं शुभवर्तुळें । विरोद्या पोल्हारे दशाङ्गुळें । कनिष्ठ बोटीं शफरिका ॥ ७ ॥ दिव्य सुमनांचे हार कंठीं । लावण्यललाम नवगोरटी । दर्पण धरूनि वाममुष्टि । पाहे दृष्टी तद्गत भा ॥ ८ ॥ मंचक झाडूनि हंसतूळिका । घालोनि पासोड्या झांकिला निका । जाति मोगरे शतपत्रिका । आरळ रचिलें कौतुकें ॥९॥ चांदिवा सुरंग स्वप्रकाश । झळकती मुक्ताफळांचे घोंस । सुगंधसुमनांचे विशेष । दीपप्रकाश रत्नांचे ॥ ११० ॥ कुम्भाण्ड बाणमंत्री निका । त्याची कन्या चित्रलेखा । तिसी वृत्तान्त हा ठाउका । उषेच्या सख्या अनुकूळ जे ॥ ११ ॥ रजनी क्रमिलिया याममात्र । पहावया उषाचरित्र । चित्रलेखा परम चतुर । आली सत्वर ते ठायीं ॥ १२ ॥ गौरीहरां करूनि नमन । स्मरूनि गौरीचें वरदान । उषा करिती झाली शयन । जागृत ठेवून चित्रलेखे ॥ १३ ॥ उपबर्हण घालूनि उसां । प्रावरण करूनि सूक्ष्मवासा । पहुडली साशंक हृदयकोशा । माजी परेशा चिंतूनी ॥ १४ ॥ उषा पहुडतां शेजेवरी । निद्रा लागली घटिका चारी । स्वप्न देखिलें तियेमाझारी । परमेश्वरीवरदानें ॥ ११५ ॥ श्याम सुंदर पंकजाक्ष । लावण्य तरुण सगुण दक्ष । दिव्याभरणीं नर प्रत्यक्ष । देखिला वक्षःसंलग्न ॥ १६ ॥ वामकरतळें धरूनि वेणी । वदन चुंबी अधरपानीं । कंचुकीग्रंथि विसर्जूनी । कुचमर्दनीं प्रवर्ते ॥ १७ ॥ स्मरमदगजाचे कुंभस्थळीं । कामाङ्कुशाचीं क्षतें केलीं । गाढालिङ्गनें हृदयीं कवळी । नीवीमोक्षण करूनियां ॥ १८ ॥ प्रथमसंगमीं साशंकित । सकंप अवयव आकुंचित । नरकरस्पर्शा निराकरित । चिह्नें

लक्षित चित्रलेखा ॥ १९ ॥ आलिङ्गनाच्या आवेशें । तरळ बाहुयुगल दिसे । मन्मथसदनाच्या विकाशें । उत्तानवर्ष्मीं चंचळता ॥ १२० ॥ ओष्ठ चावूनि कुसकुसी मुखें । स्पंदित अष्टाङ्ग मन्मथसुखें । जननी स्मरूनि अव्यक्तवाक्यें । अंग मोडूनि वदतसे ॥ २१ ॥ करणीं उदेला रजोद्गम । लोहिवलाछित दुकूलोत्तम । स्वेदें पुलकित वदनपद्म । भासे विराम स्मरचिह्नां ॥ २२ ॥ इतुका देखे चमत्कार । तंव झळकला प्रजागर । म्हणे केउता गेला चोर । स्मरमंदिर उघडूनी ॥ २३ ॥

सा तत्र तमपश्यन्ती क्वासि कांतेति वादिनी । सखीनां मध्य उत्तस्थौ विव्हला व्रीडिता भृशम् ॥ १३ ॥

मानसचिद्रत्नाची पेटी । स्मरसंगरीं उठाउठी । हरूनि गेला कवणे वाटीं । म्हणोनि दृष्टी हुडकितसे ॥ २४ ॥ म्हणे पाजूनि अधरामृता । रतिरसानुभव करूनि आतां । केउता गेलासि प्राणनाथा । दुश्चितचित्ता परिमार्गी ॥ १२५ ॥ अरतें परतें दुरी जवळी । मंदिरीं चहूंकडे धांडोळी । लवूनि पाहे मंचकतळीं । तंव हांसे वेल्हाळीं चित्ररेखा ॥ २६ ॥ अवो चतुरे बाणतनये । मंचका तळीं पाहसी काय । कैसा वर्तला अभिप्राय । कथिती होय तो आम्हां ॥ २७ ॥ चित्रलेखा ऐसें बोले । तंव सखी-मंडळ चेइरें झालें । उषेनें सलज्ज मौन धरिलें । अंतर व्यापिलें चिंतेनें ॥ २८ ॥ उठूनि बैसली सखियांमाजी । तंव त्या पुसती अपूर्व आजी । काय वर्तलें तयाची वाजी । करी समाजीं सखियांचे ॥ २९ ॥ तंव विरहें बहु व्याकुळा । सलज्ज बोलूं न शके बोला । अंतर जाणोनि सख्यांचा मेळा । दुरी वारिला चित्रलेखेनें ॥ १३० ॥

बाणस्य मंत्री कुंभांडश्चित्रलेखा च तत्सुता । सख्यपृच्छत्सखीमूषां कौतूहलसमन्विता ॥ १४ ॥

बाणासुराचा मुख्य प्रधान । कुम्भांडनामा मंत्री प्रवीण । त्याचे जठरींचें कन्यारत्न । चित्रलेखा उषासखी ॥ ३१ ॥ ससिखयांमाजी चातुर्यखाणी । विशेष उषेची तिललाहणी । रहस्य वदतां दोघी जणी । परस्परें न शंकती ॥ ३२ ॥ ते एकाकी प्रधानसुता । उषा नेऊनियां एकान्ता । परमकौतुका-विष्टचित्ता । पुसे वृत्तान्ता तें ऐका ॥ ३३ ॥

कं त्वं मृगयसे सुभ्रूः कीदृशस्ते मनोरथः । हस्तग्राहं न तेऽद्यापि राजपुत्र्युपलक्षये ॥ १५ ॥

चित्रलेखा म्हणे वो उषे । सुभ्रू सुन्दरे डोळसे । तुझा मनोरथ काय असे । तो मज विश्वासें सांग पां ॥ ३४ ॥ अद्यापि तुझें पाणिग्रहण । विध्युक्त झालें नाहीं लग्न । वरिलें नसतां पुरुषरत्न । करिसी गवेषण कोणाचें ॥ १३५ ॥ राजपुत्री तुझीं चिह्नें । अपूर्व भासतीं नवयौवनें । तियें म्यां उप-लक्षिलीं नयनें । गमसी यूनें संस्पृष्टा ॥ ३६ ॥ कोणा पुरुषातें तूं सदनीं । परिमार्गिसी नृपनंदिनी । जीवींचें रहस्य मजलागोनी । शंका सांडूनि सांग पां ॥ ३७ ॥ प्राणसखी तूं जिवलग माझी । प्राणही

वेचीन तुझिये काजीं । जें जें कौतुक देखिलें आजी । तें मज सहजीं सांगावें ॥ ३८ ॥ जिवलगे हें मज न सांगतां । कैंवि निस्तरिसी चिंतावर्ता । तुझी देखूनि विह्वळता । मजही अवस्था जाकळी ॥ ३९ ॥ ऐसें ऐकूनि सखीचें वचन । उषा सांवरी जातां प्राण । म्हणे तूं मज मायब्रहीण । गुह्य संपूर्ण अवधारीं ॥ १४० ॥

उषोवाच – दृष्टः कश्चिन्नरः स्वप्ने श्यामः कमललोचनः । पीतवासा बृहद्बाहुर्योषितां हृदयंगमः ॥ १६ ॥

स्वप्नामाजी पुरुषरत्न । कोणी एक म्यां देखिलें जाण । श्यामसुन्दर पद्मलोचन । पीत परिधान कौशेय ॥ ४१ ॥ बाहु विशाळ सरळ सलंब । गमे अपर मन्मथबिंब । ज्याच्या दर्शनें विरहक्षोभ । कामिनीकदंब पावतसे ॥ ४२ ॥ वनितानिचया हृदयंगम । तरुण सुन्दर मेघश्याम । अरुणापाङ्गें हृदयपद्म । हरूनि विराम मज केला ॥ ४३ ॥

तमहं मृगये कांतं पाययित्वाधरं मधु । क्वापि यातः स्पृहयती क्षिप्त्वा मां वृजिनार्णवे ॥ १७ ॥

तयातें हुडकितें मी सदनीं । कान्त लावण्यरसाची खाणी । मातें अधरामृत पाजूनी । गेला निघोनि केउता ॥ ४४ ॥ जयाची स्पृहा माझे हृदयीं । मातें दुःखार्णवाच्या ठायीं । टाकूनि गेला तो लवलाहीं । दिशा दाही हुडकीतसें ॥ १४५ ॥ मी जयाची स्पृहा करीं । तो मज टाकूनि दुःखसागरीं । निर्दय गेला कोठवरी । कवणे परी पुन्हा लाभे ॥ ४६ ॥ स्वप्नीं तुजसीं रमेल नर । तो निर्धारें नेमिला वर । पार्वतीचें हें वरोत्तर । कैंवि साचार हों पाहे ॥ ४७ ॥ पूर्वीं देखिला ऐकिला नाहीं । तो गिंवसावा कवणे ठायीं । यालागीं पडिलें दुःखडोहीं । चिंताप्रवाहीं तळमळितें ॥ ४८ ॥ ऐसें ऐकोनि उषेचें व्यसन । चित्रलेखेचें द्रवलें मन । काय बोलती झाली वचन । श्रोतीं श्रवण तें कीजे ॥ ४९ ॥

चित्रलेखोवाच – व्यसनं तेऽपकर्षामि त्रैलोक्यां यदि भाव्यते । तमानेष्ये नरं यस्ते मनोहर्ता तमादिश ॥ १८ ॥

चित्रलेखा म्हणे वो उषे । बाणतनये मृगडोळसे । अवघड व्यसन हें निरसे । उपाय तैसे करीन मी ॥ १५० ॥ जरी त्रैलोक्यामाजिवडा । दुर्गम स्थळीं असेल गूढा । तोही आणीन घालूनि होडा । प्रताप रोकडा दावीन ॥ ५१ ॥ स्वप्नीं रमला तुजसी भर्ता । तुझिया मानसाचा जो हर्ता । त्यातें आणीन हो तत्वतां । व्यसनावर्ता चुकवीन ॥ ५२ ॥ परंतु तूं वो इतुकें करीं । त्याची ओळखी हृदयीं धरीं । अवयवकान्ति सालंकारीं । मज निर्धारीं आज्ञापीं ॥ ५३ ॥ ध्यानीं चिंतूनि नररूपडें । प्रत्यक्ष दिसे नयनांपुढें । ऐसें सांगें मज निवाडें । त्या तुजपुढें आणीन ॥ ५४ ॥ ऐकूनि चित्रलेखेचें वचन । बाष्पें भरले उषेचे नयन । उकसाबुकसीं करी स्फुंदन । सावधान म्हणे येरी ॥ १५५ ॥ मजसारिखी

असतां सखी । नरवर धुंडीन तिहीं लोकीं । सांगें तयाची ओळखी निकी । वृथा दुःखी कां होसी ॥ ५६ ॥ उषा म्हणे वो मायबहिणी । जन्मापासूनि कन्याभवनीं । विरुद्ध असतां मजलागोनि । कोण कोठोनी कळों येती ॥ ५७ ॥ पूर्वी देखिला ऐकिला असे । तो नर स्वप्नामाजी जरी दिसे । जागृति झालिया कोणी पुसे । तरी अनायासें दावूं ये ॥ ५८ ॥ पूर्वी देखिला ना ऐकिला । त्रैलोक्यमोहन-रूपाथिला । तेणें स्वप्नीं सुरत केला । तो दादुला कैंवि दावूं ॥ ५९ ॥ पुढती दिसता जरी नयनांसी । तरी मी ओळखून देतें त्यासी । अगोचराची ओळखी कैसी । म्यां तुजपासीं सांगावी ॥१६०॥ यालागीं माझा मनोरथ । कैंवि साधिसी तूं अघटित । यावरी चित्रलेखा म्हणत । पुरवीन आर्त खेद त्यजीं ॥ ६१ ॥

इत्युक्त्वा देवगंधर्वसिद्धचारणपन्नगान् । दैत्यविद्याधरान्यक्षान्मनुजांश्च यथालिखत् ॥ १९ ॥

ऐसें बोलूनि चित्रलेखा । हातीं घेऊनि रंगशलाका । पटीं लिहिती झाली देखा । समस्त लोकां निज हस्तें ॥ ६२ ॥ प्रथम लिही अमरपुरी । शक्रें सहित सुरांच्या हारी । त्यांतें पाहोनि म्हणे येरी । नसे निर्धारीं तो येथें ॥ ६३ ॥ मग लिहिला गंधर्वलोक । हाहाहूहूतुम्बुरुप्रमुख । नारदपर्वतादि अनेक । उषा नावेक त्यां पाहे ॥ ६४ ॥ त्यामाजी न दिसे नरवैदूर्य । मग लिहिला सिद्धनिचय । तोही सादर निरखूनि पाहे । न दिसे सोय त्यांमाजी ॥१६५॥ त्यावरी लिहिले दिव्य चारण । माजी न दिसे पुरुषरत्न । त्यानंतरें पाताळभुवन । लिहिले संपूर्ण फणिवर्ग ॥६६॥ त्यांतें निरखोनि पाहे उषा । तेथ न दिसे पुरुष तैसा । तेणें झाली खिन्नमानसा । येरी धिंवसा पुन्हां धरी ॥६७॥ त्यावरी लिहिले विद्याधर । त्यांमाजी न दिसे नरसुन्दर । तदुपरि लिहिले दैत्यभार । गोत्र समग्र असुरांचें ॥६८॥ तें सर्वही पाहोनि दृष्टी । चित्रलेखेसी वदे गोष्टी । म्हणे कासया होसी कष्टी । नसे अदृष्टीं वरलाभ ॥ ६९ ॥ येरी म्हणे न टाकीं धीर । यथार्थ गौरीचें उत्तर । जाणोनि मानस करीं स्थिर । आणीन सत्वर तव भर्ता ॥१७०॥ कुबेर-प्रमुख यक्षपति । समस्त लोकपाळांच्या व्यक्ति । उषा लक्षूनि तयांप्रति । म्हणे मम पति येथ नसे ॥ ७१ ॥ मग लिहिला मनुष्यलोक । ब्राह्मण क्षत्रिय वैश्य सेवक । अन्वय सूर्यसोमप्रमुख । भूप अनेक विद्यमान ॥ ७२ ॥ उषा पाहोनि त्यांमाझारी । म्हणे कासया पडसी घोरीं । स्वप्नींचें जोडे लेखनावारीं । हें अघटित गौरी कैं घडवी ॥ ७३ ॥ येरी म्हणे न टाकीं धीर । आतां लिहितें द्वारकापुर । तें तूं अवलोकीं समग्र । वरनिर्धार करीं तेथ ॥ ७४ ॥

मनुजेषु च सा वृष्णीञ्शूरमानकदुंदुभिम् । व्यलिखद्रामकृष्णौ च प्रद्युम्नं वीक्ष्य लज्जिता ॥ २० ॥
अनिरुद्धं विलिखितं वीक्ष्योषाऽवाङ्मुखी ह्रिया । सोऽसावसाविति प्राह स्मयमाना महीपते ॥ २१ ॥

चित्रलेखा परम कुशल । जेथ अवतरला गोपाळ । आधीं तेंचि वृष्णिकुळ । दावी तत्काळ लिहूनि ॥ १७५ ॥ मनुष्यांमाजी वृष्णिराव । लिहिला शूरसेन पार्थिव । आनकदुंदुभि तत्संभव । ज्या वसुदेव अभिधान ॥ ७६ ॥ त्यातें लक्षूनि म्हणे उषा । कांहीं साम्यता गमे या वंशा । ऐकूनि चित्र-

लेखा मानसा । माजी भरंवसा अवलंबी ॥ ७७ ॥ मग लिहिले रामकृष्ण । अवयव ठाणठकार पूर्ण । आयुधेंसहित वस्त्राभरण । उषा लक्षून हरिखेली ॥ ७८ ॥ चित्रलेखेनें पाहूनि नयनीं । बाणतनया प्रसन्नवदनी । येथ झाली काय म्हणोनी । ऐसें निजमनीं तर्कीतसे ॥ ७९ ॥ तंव ते उषा म्हणे सखिये । मेघश्याम हा कवण होय । अपर याचा प्रत्याम्नाय । पुरुष पाहें सुजाणे ॥१८०॥ येरी म्हणे हा द्वारकाधीश । त्रैलोक्यनायक परमपुरुष । अपर याचा वीर्यविशेष । पाहें औरस प्रद्युम्न ॥ ८१ ॥ म्हणोनि लिहिली मन्मथमूर्ति । उषा देखोनि संदिग्ध चित्तीं । होय न होय ऐसी भ्रान्ति । सलज्जवृत्ति जाणविते ॥ ८२ ॥ लज्जित पल्लव सरसा करी । खुणा बोधी मंदोत्तरीं । यासारिखी प्रतिमा दुसरी । पाहें अंतरीं विवरूनी ॥ ८३ ॥ उषावचन ऐकूनि ऐसें । चित्रलेखेच्या मानसें । अनिरुद्धें ही भोगिली असें । दृढ विश्वासें अवगमिलें ॥ ८४ ॥ मग तो लिहिला रोचनाकान्त । सादरचित्तें सुरंगभरित । वसनाभरणीं सालंकृत । ठकारमंडित कंजाक्ष ॥१८५॥ त्यातें लक्षूनि बाणकुमरी । लाजूनि झाली पाठीमोरी । चित्रलेखेतें नमस्कारी । विवरीं पुढारीं सूचना ॥ ८६ ॥ हाचि हाचि तो होय ऐसें । चित्रलेखेतें सांगे हर्षें । संशय न धरीं वो मानसें । म्हणे विश्वासें कुरुवर्या ॥ ८७ ॥ महीपति हें संबोधन । कीं तूं पृथ्वी पाळिसी पूर्ण । ऐसें कौतुक कोठें आन । तुजलागून दृश्य असे ॥ ८८ ॥ येरू म्हणे जी योगाग्रणी । यावत्काळ आम्हीं कर्णीं । ऐकिलें नाहीं तेथ नयनीं । देखों कोठोनी स्वामिया ॥ ८९ ॥ यानंतरें वर्तलें काय । तो निरूपा अभिप्राय । ऐसें प्रार्थितां शुकाचार्य । वदता होय तें ऐका ॥ १९० ॥

चित्रलेखा तमाज्ञाय पौत्रं कृष्णस्य योगिनी । ययौ विहायसा राजन्द्वारकां कृष्णपालिताम् ॥ २२ ॥

परमयोगिनी चित्रलेखा । समस्त कृत्य आणूनि लेखा । पुढें धरिला जो आवांका । तोही ठाउका करीतसे ॥ ९१ ॥ श्रीकृष्णाचें पौत्ररत्न । अंतःकरणीं निर्धारून । त्यासी आणावयालागून । तत्काळ गमन आदरिलें ॥ ९२ ॥ हृदयीं चिंतूनि शिवभवानी । सिद्धपादुका लेइली चरणीं । गमनमार्गा अवलंबूनी । द्वारकाभुवनीं प्रवेशली ॥ ९३ ॥ कृष्ण पाळी जियेप्रति । सुरनरेंद्रां दुर्गम द्वारावती । रक्षकांचीं गुल्में भोंवती । दुर्गम भिंती दुर्गाच्या ॥ ९४ ॥ निमेषामाजी कोटि फेरे । सुदर्शनाची घरटी फिरे । रिघों न शके पारिकें वारें । केंवि संचरे ते ठायीं ॥१९५॥ योगिनी ऐशिया पदें करूनी । रहस्य वदला बादरायणि । हृदयीं चिंतूनि चक्रपाणि । चक्रा नमूनि प्रवेशली ॥ ९६ ॥ करावया दैत्यसंहार । द्वारके अवतरला श्रीकृष्णवीर । तत्कार्यार्थ उद्योगपर । जाणोनि चक्र न निवारी ॥ ९७ ॥ हरिवंशीं चित्रलेखेसी । नारद भेटला पुरप्रवेशीं । तेणें उपदेशिली तामसी । कार्यसिद्धीसी साधावया ॥ ९८ ॥ गगनमार्गें द्वारकेआंत । उतरती झाली खगेन्द्रवत । जिये सदनीं रोचनाकान्त । स्वानंदभरित नांदतसे ॥ ९९ ॥ त्रिदिनव्रताचा जागर । तेणें उजगरा होता फार । तथापि कीर्तनीं प्रेमादर । बैसला सादर सत्सदसीं ॥ २०० ॥ चित्रलेखा विवरी मनीं । भेटतां नये ऐशिये क्षणीं । गोष्टी पडतां इतरां कर्णीं । कार्यहानि हों पाहे ॥ १ ॥ मग खेचरी योगासिद्धि । जपूनि राहिली गुप्तविधि । कीर्तनाची पुरे अवधि । तंववरी बुद्धि दृढ केली ॥ २ ॥ संपलिया कथाप्रसंग । सदना गेला वैष्णववर्ग । अनिरुद्धासी निद्रायोग ।

मंचकीं सवेग पहुडला ॥ ३ ॥ दासदासींतें दिधली आज्ञा । निद्राभर जाकळी नयनां । मंचकीं निहूल करितां शयना । भेटली ललना ते समयीं ॥ ४ ॥ जोहारूनि चरणाम्बुजा । सर्व वृत्तान्त कथिला वोजा । उपानाम्नी बाणात्मजा । श्रीपदकंजा अनुसरली ॥ २०५ ॥ काली द्वादशीचिये रजनीं । तुम्ही संचार करूनि स्वप्नीं । अनूढा गूढ कन्यासदनीं । सुखशयनीं अनुभविली ॥ ६ ॥ तिणें हृदयीं निर्धार केला । स्वप्नीं मजसीं नरवर रमला । त्यावीण न वरीं आणिकाला । त्यजीन प्राणांला तद्विरह ॥ ७ ॥ ऐसा जाणोनि दृढ निर्धार । म्यां ठाकिलें द्वारकापुर । स्वामींस कथिला समाचार । आतां सत्वर चलावें॥८॥ तुम्हांवांचून एकली सदना । मज गेलिया टाकील प्राणां । तिचिया लावण्यनवयौवना । साफल्य जाणा तुमचेंनि ॥ ९ ॥ ऐसें ऐकोनि रोचनापति । द्वादशीची स्मरूनि राती । स्वप्नीं अनुभविली जे युवति । पाहे प्रतीतिमाजिवडी ॥ २१० ॥ तथापि म्हणे हे राक्षसी माया । येथ पातली कवण कार्या । कुत्सित मार्गे कामचर्या । सहसा आर्या योग्य नोहे ॥ ११ ॥ मग म्हणे वो चातुर्यखाणी । बळ प्रद्युम्न चक्रपाणि । वृत्तान्त घालूनि त्यांचे कर्णीं । करूं हे करणी त्याउपरी ॥ १२ ॥ अनिरुद्धवचन ऐकूनि ऐसें । चित्रलेखा निजमानसें । म्हणे विलंबें कार्य नासे । पुढती तुमसे प्रतिवचन ॥ १३ ॥ मग जपूनि तामसी विद्या । तत्काळ मोहिलें अनिरुद्धा । तेथूनि निघती झाली सद्या । नरवरवंद्या तें ऐक ॥ १४ ॥

तत्र सुप्तं सपर्यंके प्राद्युम्निं योगमास्थिता । गृहीत्वा शोणितपुरं सख्यै प्रियमदर्शयत् ॥ २३ ॥

तामसी योगमाया मोहिनी । तत्काळ मोहिला तो प्राद्युम्नि । मुकुलितमुद्रा पडिली नयनीं । निवात शयनीं पहुडला ॥ २१५ ॥ लेप्यलेखें विगतचेष्टा । तैसी निश्चळ लागली काष्ठा । नमूनि पार्वती-नीलकंठां । मग मंचक मुकुटीं वाहियला ॥ १६ ॥ अनिरुद्धेंसी मंचक शिरीं । घेऊनि निघाली खेचरी । सवेग नेऊनि शोणतपुरीं । उपामंदिरीं उतरिला ॥ १७ ॥ प्राणसखये उषेकारणें । म्हणे स्वकान्त ओळखीं नयनें । येरी आनंदभरित मनें । सस्मितवदनें उठिली ॥ १८ ॥ मुखावरील काढूनि पदर । सादर पाहे नरसुन्दर । नवयौवन ठाणठकार । केला निर्धार रमणाचा ॥ १९ ॥ चित्रलेखेतें म्हणे साजणी । तूं निजांची मायबहिणी । प्रत्यक्ष तव रूपें भवानी । मज निर्वाणीं पावली ॥ २२० ॥ तुझिया उपकारा उत्तीर्ण । व्हावया पदार्थ न दिसे आन । तनुमनप्राणें होऊनि शरण । धरिले चरण सद्भावें ॥ २१ ॥ येरी उचलोनि दोहीं करीं । आलिङ्गिली बाणकुमरी । म्हणे जैसी शंकरगौरी । तेंवि शेजारीं वर भोगीं ॥ २२ ॥ आतां होईल या जागर । साधीं परिचर्या सादर । सलज्ज होऊनि न राहें दूर । होईं तत्पर सेवेसी ॥ २३ ॥ प्रमदाशरीर प्रमादकर । मदिरेहूनि मादक फार । मदिरा मोही अष्ट प्रहर । शत संवत्सर प्रमदा पैं ॥ २४ ॥ मादकपणाची हेचि गरिमा । विनयभावें धरिजे प्रेमा । रंगता परिचर्येच्या कामा । कान्त संगमा अभिलाषी ॥ २२५ ॥ सस्मित सलज्ज मितभाषण । व्यंकटकटाक्षनिरीक्षण । सस्निग्ध करितां शुश्रूषण । पुरुष द्रवोन वश होय ॥ २६ ॥ सहसा न कीजे उतावळी । असंलग्न रहावें जवळी । सकाम पुरुष प्रेमें कवळी । अल्प करतळीं वारिजे त्या ॥ २७ ॥

निकरें न झाडावा कर । हास्यें वाढविजे आदर । तेणें पुरुष स्मरातुर । होय तत्पर क्रीडेसी ॥ २८ ॥ नवसंगमीं तनुइंगितें । सलज्ज संकोच अवयवांतें । करितां पुरुष आसक्तचित्तें । होय वनितेतें वशवर्ती ॥ २९ ॥ इत्यादि ललनालाघवयुक्ति । चित्रलेखेनें उषेप्रति । बोधूनि सदना झाली जाती । तामसी शक्ति निवारुनी ॥ २३० ॥ वारूनि मोहिनी तामसी विद्या । चित्रलेखा निघाली सद्या । कपाट देऊनियां अनिरुद्धा । सेवी प्रमदा सप्रेमें ॥ ३१ ॥

सा च तं सुन्दरवरं विलोक्य मुदितानना । दुष्प्रेक्ष्ये स्वगृहे पुंभी रेमे प्राद्युम्निना समम् ॥ २४ ॥

चित्रलेखा गेलियावरी । उषा निःशंक अभ्यंतरीं । प्रावरण सारूनि पाहे नेत्रीं । लोण उतरीं दृग्दोषा ॥ ३२ ॥ पाहोनि नवयौवन लावण्य । आनंदभरित अंतःकरण । सफळ गौरीचें वरदान । त्रिजगीं धन्य मी आतां । ॥ ३३ ॥ तंव झाला प्रातःकाळ । जेंगटगजरें सूचिली वेळ । भैरव बीभास भूपाळ । गाती कुशळ गान्धर्वी ॥ ३४ ॥ वैदिक करिती अध्ययनें । छात्र तन्मुखें करिती पठनें । साग्निकीं करूनि संध्यास्नानें । प्रादुषीकरणें आदरिलीं ॥ २३५ ॥ ऐसा होतां प्रभातगजर । झाला अनिरुद्धा जागर । मुखावरील सारूनि पदर । पाहे सादर चहूंकडे ॥ ३६ ॥ तंव ते समीप देखिली उषा । जिचिया लावण्यशृंगाररसा । प्राशितां तृप्ति नेत्रसारसां । नोहे सहसा औत्सुक्यें ॥ ३७ ॥ म्हणे स्वप्नीं जे देखिली । ते हे वाटे मन्मथपुतळी । निद्राकाळीं वार्ता कथिली । तेही वेल्हाळी येथ नसे ॥ ३८ ॥ नोहे आपुलें निद्रागार । भासे विचित्र रत्नमंदिर । स्वप्न किंवा हा जागर । करी विचार हृत्कमळीं ॥ ३९ ॥ मुखें करूनि नामस्मरण । पुढती घेऊनियां प्रावरण । मंचकीं निवान्त केलें शयन । येरी उद्विग्न हृत्कमळीं ॥ २४० ॥ शिकवूनि गेली चित्रलेखा । ते शिकवण स्मरूनि उषा । सवेग वळघूनिया मंचका । करी शुश्रूषा चरणांची ॥ ४१ ॥ म्हणे सरली सर्व शर्वरी । प्राची रंगली भास्करकरीं । निद्रा कायसी ये अवसरीं । आह्निकाचारीं प्रवर्तिजे ॥ ४२ ॥ कनककलशीं उष्ण पाणी । गंडूषपात्र ठेविलें धरणी । उठोनि बैसा मंचकासनीं । चरण क्षाळीन नावेक ॥ ४३ ॥ क्रमुकाङ्गार वज्रज्योती । शिवा स्फटिका मरीचि निगुती । चूर्ण घर्षण करूनि दंतीं । मुख क्षाळिजे स्वामिया ॥ ४४ ॥ इत्यादिवचनीं प्रबोधी उषा । तंव ते पातली चित्रलेखा । म्हणे स्वामिया उघडूनि मुखा । सादर विलोका भुवनातें ॥ २४५ ॥ ऐकूनि चित्रलेखेचें वचन । अनिरुद्ध पाहे उघडूनि नयन । म्हणे रात्रीं केलें शयन । तें मम सदन हें नोहे ॥ ४६ ॥ शयनकाळीं त्वां वार्ता कथिली । त्यावरी निद्रा मज लागली । जागृत होतां इये काळीं । अपर वेल्हाळी हे कोण ॥ ४७ ॥ येरी म्हणे जे कथिली उषा । स्वप्नामाजी नराधीशा । तुम्हीं अनुभविली डोळसा । ते हे राजसा बाणसुता ॥ ४८ ॥ तुम्हांवेगळा न वरीं वर । ऐसा उषेचा दृढ निर्धार । तुमच्या विरहें निज शरीर । झाली तत्पर त्यजावया ॥ ४९ ॥ जन्मापासूनि हे मम सखी । म्हणूनि करुणा आली निकी । ईचिया दुःखें होवोनि दुःखी । पुसिली ओळखी मग तुमची ॥ २५० ॥ लिहूनि दाविलें म्यां त्रिभुवन । त्यामाजी नसे पुरुषरत्न । मग म्यां लिहिलें द्वारकाभुवन । तेथ तुम्हांलागोन ओळखिलें ॥ ५१ ॥ तेव्हां निघालें गगनमार्गें । द्वारकापुर ठाकिलें वेगें । वृत्तान्त

तुमचें मानस नेघे । निद्राप्रसंगें जाकाळितां ॥ ५२ ॥ तुम्हांसी मंचकीं लागली निद्रा । मग म्यां आणिलें शोणितपुरा । स्वप्नीं अनुभविली सुन्दरा । ते गृहिणी करा करग्रहणें ॥ ५३ ॥ येरु म्हणे हें स्त्रीचरित्र । कायसा विवाह कोणतें सूत्र । येरी म्हणे यथाशास्त्र । गंधर्वतंत्र ये लोकीं ॥ ५४ ॥ येरें स्मरूनि श्रीकृष्णचरण । हृदयीं चिंतिला संकर्षण । पिता प्रद्युम्न आठवून । म्हणे हे गहन विधिरेखा ॥ २५५ ॥ गंधर्वांचा तुंबराचार्य । चित्रलेखा तो आणूनि आर्य । त्याच्या हस्तें विवाहकार्य । गान्धर्वविधीनें संपविलें ॥ ५६ ॥ अभ्यंग हरिद्रा उद्वर्तनें । दिव्याभरणें दिव्य वसनें । अन्नपानें विधि-विधानें । न लगे सांगणें याउपरी ॥ ५७ ॥ ऐसी अनिरुद्धें पर्णिली उषा । गौरीवरें येरी पुरुषा । वरूनि पावली संतोषा । कुरुनरेशा शुक वदला ॥ ५८ ॥ म्हणाल मूळीं हा विस्तार नाहीं । तरी पुराणें देती गाही । धर्मस्थापक शेषशायी । अविधि गेहीं वर्तेना ॥ ५९ ॥ अनिरुद्ध तों तयाचा पौत्र । अविधि नाचरे अणुमात्र । जारधर्माचें कलत्र । सदनीं अशास्त्र न ठेवी ॥२६०॥ पातिव्रत्याचरणें उषा । स्वप्नीं लाधली जया पुरुषा । त्यावीण आन न वरी सहसा । हा भरंवसा जाणोनी ॥ ६१ ॥ अनिरुद्धें ते निज नोवरी । पर्णिली गान्धर्वविधानसूत्रीं । सहसा खोडी न काढिजे चतुरीं । शास्त्रद्रष्टारीं सर्वज्ञीं ॥ ६२ ॥ विहित विधान करूनि पूर्ण । ओहरां देऊनि आशीर्वचन । तुम्बुरु चित्रलेखा पुसून । जातीं झालीं निज भुवना ॥ ६३ ॥ कोण्हा नकळत हा वृत्तान्त चित्रलेखेनें साधिलें कृत्य । गौरीवरें लाहोनि कांत । स्वानंदभरित रमे उषा ॥ ६४ ॥ सप्तखणाच्या दामोदरीं । उषा कान्तेसीं क्रीडा करी । राखणाइतांची भंवरी । अष्टौ प्रहरीं उदायुध ॥२६५॥ रिघों न शके पारकें वारें । तेथें कैं पाहों शकेल दुसरें । ऐसिये सदनीं आनंदगजरें । उषा निजवरेंसह क्रीडे ॥ ६६ ॥ जैसीं क्रीडती शङ्करगौरी । तैसीच उषा सुखसेजारी । स्मरपुत्रेंसी क्रीडा करी । सप्रेमगजरीं भयरहित ॥ ६७ ॥ तये क्रीडेचें व्याख्यान । समासें कीजेल निरूपण । तें तूं राया करी श्रवण । सावधान होऊनियां ॥ ६८ ॥

परार्ध्यवासः स्रग्गंधधूपदीपासनादिभिः । पानभोजनभक्ष्यैश्च वाक्यैः शुश्रूषयार्चितः ॥ २५ ॥

चित्रलेखेनें कथिली शिक्षा । तेचि उषेनें घेऊनि दीक्षा । सेवाविषयीं परम दक्षा । आणूनि लक्षा परिचर्या ॥ ६९ ॥ नित्य नूतनें वसनाभरणें । अर्पी अनिरुद्धाकारणें । अभ्यंगपूर्वक देऊनि स्नानें । दिव्य लेपनें समर्पी ॥ २७० ॥ सुमनहार घाली कंठीं । मलयजगंधें देऊनि उटी । दिव्य अवतंस खोवूनि मुकुटीं । दावी गोरटी मुकुरातें ॥ ७१ ॥ त्यावरी उधळी परिमळरोळा । ऊर्ध्व कस्तुरी रेखूनि भाळा । वैष्णवदशाङ्गधूपपरिमळा । दीपसोज्वळा चंद्रमय ॥ ७२ ॥ चंद्र नाम कर्पूराप्रती । त्या उजळूनि कर्पूरज्योति । ओंवाळूनि सप्रेमभक्ति । अर्पी निगुतीं दिव्यान्नें ॥ ७३ ॥ षड्रसपक्वान्नांच्या परी । संधितें व्यंजनें कोशिंबिरी । कान्तशेषाचें भोजन करी । प्रीति भारी परस्परें ॥ ७४ ॥ उष्णोदकें आंचवणें । परिमळद्रव्यें करोद्वर्तनें । मुख परिमार्जूनि सूक्ष्मवसनें । ताम्बूलविडिया देतसे ॥ २७५ ॥ आसन घालूनि भद्रपीठीं । उभी राहूनि कान्तनिकटीं । मृदुमंजुळ सांगे गोठी । सलज्ज गोरटी स्मितवक्त्रें ॥ ७६ ॥ ताम्बूल घेऊनियां करतळीं । विडिया देतां मुख न्याहाळी । म्हणे क्रीडेची नव्हाळी ।

रुचे हृत्कमळीं कोणते ॥७७॥ सारीपाट मांडूं पुढां । कीं झाडूं मंचकीं पासोडा । कीं सप्तस्वरीं गायन-चाडा । आणूं रोकडा मृदंग ॥ ७८ ॥ रुद्रवल्लकीं समानतंती । सप्तस्वरांची जेथ उत्पत्ति । कोणती क्रीडा रुचे चित्तीं । ते निश्चिती सांगावी ॥ ७९ ॥ कामोद्दीपकें दिव्य पानें । क्षौद्रें मैरेयें वारुणें । अर्पूनि वल्लभाकारणें । तदुचित वर्तनें शुभ द्रव्यें ॥ २८० ॥ द्राक्षें खर्जूरें अच्युत कदळें । शर्कराविकृतें दिव्यें बहळें । जायपत्री जातीफळें । त्रयोदशमेळें ताम्बूल ॥ ८१ ॥ सुमनशेजे पहुडल्या कान्त । तनु-शुश्रूषा करी निवान्त । कान्तें कंठीं घालितां हात । क्रीडे यथोचित सुखशयनीं ॥ ८२ ॥ म्हणाल एकली कान्ता निकटीं । द्रव्यानयनादि पाकराहटी । केव्हां करी हा संशय पोटीं । तरी ऐका गोष्टी तद्विषयीं ॥ ८३ ॥ कैलासाचिये परिसरीं । शिवें रक्षिजे शोणितपुरी । चिंतामणि घरोघरीं । सर्व सामग्री तज्जनिता ॥८४॥ कल्पतरूंचिया वाटिका । कामधेनूंचीं दुभतीं देखा । महासिद्धि परिचारिका । त्र्यंबकाम्बिकाप्रसादें ॥२८५॥ एवं इत्यादि सुखसुरवाडें । उषावालभसप्रेमचाडें । नवपंकजीं भ्रमर कोंडे । तेणें पाडें अनिरुद्ध ॥ ८६ ॥ सप्रेम अवंचक अनन्यभाव । देखतां पाषाणीं प्रकटे देव । मां जो प्रत्यक्ष सजीव सावयव । न धरी द्रव कां हृत्कमळीं ॥ ८७ ॥ अनुकूळ सर्वस्वसेवना । विशेष लावण्यललाम-ललना । क्रीडाकौतुकें मोहकचिह्ना । वर्तना यूना वश न करी ॥ ८८ ॥

गूढः कन्यागृहे शश्वत्प्रवृद्धस्नेहया तया ॥ नाहर्गणान्स बुबुध ऊषयाऽपहृतेंद्रियः ॥ २६ ॥

परम गूढ कन्यागार । भोंवता तळवटीं रक्षकभार । तेथ अनिरुद्ध निरंतर । क्रीडापर आन नुमजे ॥ ८९ ॥ नित्य नूतन वाढवी स्नेह । तये उषेनें घालूनि मोह । स्वाधीन केला इंद्रियसमूह । नुमजे गता-हर्गणातें तो ॥२९०॥ मज अंतरली द्वारकापुरी । कैंची कोण हे नव अंतुरी । किती क्रमिल्या दिवसरात्री । तें अंतरीं उमजेना ॥ ९१ ॥ असो अनिरुद्धाची कथा । निगूढ एकान्तीं वर्ततां । पुढें प्रकट झाली वार्ता । तें नृपनाथा अवधारीं ॥ ९२ ॥

तां तथा यदुवीरेण भुज्यमानां हतव्रताम् । हेतुभिर्लक्षयांचक्रुराप्रीतां दुरवच्छदैः ॥ २७ ॥

पूर्वोक्त प्रकारें यथोपचार । अनिरुद्धनामा जो यदुवीर । तेणें उषेतें निरंतर । भोगितां फार दिन गेले ॥ ९३ ॥ जियेचें पातिव्रत्य अभंग । लौकिकीं अविदित तो प्रसंग । कन्यकाव्रताचा झाला भंग । रक्षकवर्ग गुजबुजिती ॥ ९४ ॥ अनिरुद्धप्राप्तीचा परम हर्ष । नव नव क्रीडेचा उत्कर्ष । निर्भय निःशंक दुर्धर्ष । चिह्नें अशेष प्रकटलीं ॥ २९५ ॥ रमणें रमविली जे कां रमणी । ते जाणों ये अवयवचिह्नीं । अपरें चिह्नें संभाषणीं । क्रीडावर्तनीं प्रकटती ॥ ९६ ॥ पुरुषभुक्त झाली उषा । अनूढा असतां पावली दोषा । झांकूं न शके हेतुविशेषा । रक्षकां अशेषां जाणवलें ॥ ९७ ॥ दंतक्षतें उमटती अधरीं । नखक्षतें उरोजांवरी । कारणद्रावलांछनें वस्त्रीं । रहस्य किंकरी प्रकाशिती ॥ ९८ ॥ कर्णोपकर्णीं फांकली गोष्टी । रक्षक लक्षिती सूक्ष्मदृष्टी । गोचर होतां सर्व राहटी । म्हणती खोटी चर्या हे ॥ ९९ ॥ राजकन्या झाली भ्रष्ट । आम्हां भोंवेल हें अरिष्ट । यालागीं आतांचि नृपासी स्पष्ट । सांगोनि कष्ट निरसावे ॥३००॥

भटा आवेदयांचक्रू राजंस्ते दुहितुर्वयम् । विचेष्टितं लक्षयामः कन्यायाः कुलदूषणम् ॥ २८ ॥

कन्यागारींचे रक्षकगण । वदती जोहारूनियां बाणचरण । म्हणती कन्येनें दूषण । लाविलें संपूर्ण कुळातें ॥ १ ॥ तुमची कन्या जे कां उषा । रतली कोणा एका पुरुषा । क्रीडासुखें क्रमिती निशा । आम्हीं रहस्या लक्षिलें ॥ २ ॥ दुष्ट कन्येचें चेष्टित । लक्षूनि आम्हीं रक्षक दूत । तुम्हांसि कथिला तो वृत्तान्त । करावें उचित कळे तैसें ॥ ३ ॥ गुप्त पुरुष कन्यागारीं । उपेगाहित क्रीडा करी । प्रियतम वाटेल जरी अंतरीं । तरी त्या नोवरी सुखें दीजे ॥ ४ ॥ अथवा निकरें कराल दण्ड । तरी लौकिकीं होईल भंड । आम्हां रक्षकां जन उदंड । दूषितां तोंड न काढवे ॥ ३०५ ॥ रक्षकीं ऐसिया समाचारा । कथूनि स्वविषयीं परिहारा । देते झाले त्या प्रकारा । म्हणे अवधारा शुकयोगी ॥ ६ ॥

अनपायिभिरस्माभिर्गुप्तायाश्च गृहे प्रभो । कन्याया दूषणं पुंभिर्दुष्प्रेक्षाया न विद्महे ॥ २९ ॥

दूत म्हणती प्रभो समर्था । तुलना नाहीं तव सामर्थ्या । कन्येचिया दूषणें वृथा । केलें प्रभुत्वा तुमचिया ॥ ७ ॥ दुर्गम कन्यागारीं गुप्त । आम्ही रक्षकपुरुष नित्य । रक्षित असतां अपायरहित । केलें अद्भुत चरित्र हें ॥ ८ ॥ अपायरहित म्हणसी कैसें । अष्टौ प्रहर विभागवशें । अतंद्रित जागृत घरटीमिषें । सावध आपैसे शस्त्रास्त्रीं ॥ ९ ॥ ऐसे प्रमादरहित आम्ही । सावध रक्षित असतां स्वामी । विरुद्धाचरण कन्याधामीं । तें पाहूनि तुम्हीं नियमावें ॥ ३१० ॥ कोणी दावूं न शके बोटीं । दावितां पावे दुःखकोटी । ऐसिये मंदिरीं दुर्घटीं । विरुद्ध राहटी प्रवर्तली ॥ ११ ॥ कोण्या मार्गें कोण्या योगें । कोण्या विचारें कोण प्रसंगें । दुष्टाचरण कवणासंगें । कन्येसि लागे हें न कळे ॥ १२ ॥ रक्षण करितां अपाय कांहीं । रक्षकापासूनि घडला नाहीं । सावध रक्षितां सर्वदाही । वृत्तान्त सर्वही तुम्हां कथितों ॥ १३ ॥ कार्यप्रसंगें प्रेरणेची । परम दुष्टा सखी जीची । तिचिया विरुद्धआचरणाची । क्रिया रक्षक नेणों आम्ही ॥ १४ ॥ रक्षकांचें ऐकूनि वचन । काय करिता झाला बाण । श्रोतीं होवोनि सावधान । तें संपूर्ण परिसावें ॥ ३१५ ॥

ततः प्रव्यथितो बाणो दुहितुः श्रुतदूषणः । त्वरितं कन्यकागारं प्राप्तोऽद्राक्षीद्यदूद्वहम् ॥ ३० ॥

स्वकन्येचें दुष्टाचरण । ऐकोनि हृदयीं खोंचला बाण । त्यानंतरें कन्यासदन । शीघ्र आपण प्रवेशला ॥ १६ ॥ कन्यगारीं अकस्मात । सक्रोध बाण झाला प्राप्त । तंव तो देखतां झाला तेथ । वीर समर्थ यदूत्तम ॥ १७ ॥ यादवांमाजी धुरंधर । अनिरुद्ध नरवर्य सुन्दर । स्वकन्येसी क्रीडापर । देखे असुर तें ऐका ॥ १८ ॥

कामात्मजं तं भुवनैकसुंदरं श्यामं पिशंगांबरमंबुजेक्षणम् ।
बृहद्भुजं कुंडलकुन्तलत्विषा स्मितावलोकेन च मंडितानमम् ॥ ३१ ॥

काम केवळ जो अनंग । कृष्णवीर्यें तो झाला साङ्ग । तो कामात्मज लावण्यलिङ्ग । अपर अव्यंग निवडला ॥ १९ ॥ ब्रह्माण्डभुवनसुंदर एक । अपर तुलना न पवे पुरुष । श्याम मनोहर राजीवाक्ष ॥ ३२० ॥ विशाळ बाहु सुपीन सरळ । कुण्डलमंडित गंडयुगल । तद्वारंजित सुतेजाळ । श्रवणीं कुन्तळ झळकती ॥ २१ ॥ किरीट माथां रत्नखचित । कंठाभरणें पदकान्वित । अंगदें कटकें मुद्रिकायुक्त । मेखळामंडित भूषाढ्य ॥ २२ ॥ कनकाम्बर कशिलें कासे । वदन चंद्रासमान भासे । सस्मित कटाक्षें लक्ष्मी विलसे । अपाङ्गमोक्षें प्रस्फुरित ॥ २३ ॥ नवयौवन ठाणठकार । ऐसियातें बाणासुर । देखता झाला क्रीडापर । तें सविस्तर अवधारा ॥ २४ ॥

दीव्यंतमक्षैः प्रिययाभिनृम्णया तदंगसंगस्तनकुंकुमस्रजम् ।
बाह्वोर्दधानं मधुमल्लिकाश्रितां तस्याग्र आसीनमवेक्ष्य विस्मितः ॥ ३२ ॥

सर्व माङ्गल्यें मंगलभरिता । ऐसी उषा जे प्रियतम कान्ता । तिच्या स्तनकुंकुमें रंजिता । सुमनमाळा ज्या कंठीं ॥ ३२५ ॥ सुरतरंगालिङ्गनकाळीं । माळा रुळतां कुचमंडळीं । कुचकुंकुमें सुरंग झाली । ते वक्षस्थळीं जो मिरवी ॥ २६ ॥ मधुमासोद्भव मल्लिकासुमनें । तत्कृतमाळा कुचसंलग्न । कुङ्कुमलग्नें शोणायमानें । लांछिताचिह्नें प्रकाशती ॥ २७ ॥ तिये प्रियतमेसी निकट । अग्रभागीं बैसूनि नीट । खेळत असतां सारीपाट । बाण प्रकट त्यां देखे ॥ २८ ॥ त्यातें देखोनि विस्मित बाण । म्हणे हा उद्भट धीट कोण । मम कन्येसीं अंगसंलग्न । न धरी मरणभय पोटीं ॥ २९ ॥ ऐसा अनिरुद्ध बाणासुरें । देखूनि विस्मित निजान्तरें । बाणासुरातें देखिलें येरें । तेंही श्रोते अवधारा ॥ ३३० ॥

स तं प्रविष्टं वृतमाततायिभिर्भटैरनेकैरवलोक्य माधवः ।
उद्यम्य मौर्वं परिघं व्यवस्थितो यथांतको दंडधरो जिघांसया ॥ ३३ ॥

परमप्रतापी महाशूर । बाणभोजनीं पंक्तिकार । वसनाभरणें अलंकार । ज्यां दे असुर निजसाम्यें ॥ ३१ ॥ ऐसे भरंवशाचे जे वीर । परम निर्दय महाक्रूर । तिहींसी वेष्टित बाणासुर । कन्यागार प्रवेशला ॥ ३२ ॥ तो अनिरुद्ध देखूनि त्यातें । उदायुध आततायीही भोंवतें । सन्नद्ध बद्ध शतानुशतें । काय करिती तें अवधारा ॥ ३३ ॥ अकस्मात वेष्टित भटीं । उषेनें बाण देखिला दृष्टी । धाकें धडकी भरली पोटीं । पाहे गोरटी वरवक्त्रीं ॥ ३४ ॥ तंव तो प्रतापी माधव वीर । सुभटवेष्टित बाणासुर । देखूनि क्षोभला प्रळयरुद्र । परिघ सत्वर घेऊनी ॥ ३३५ ॥ वैकुंठकंठीरवाचे पोटीं । वीर प्रद्युम्न प्रतापजेठी । विधि हर साहूं न शकती काठी । तेथें कैं गोठी इतरांची ॥ ३६ ॥ तया प्रद्युम्नाचा बाळ । अनिरुद्ध प्रतापी प्रळयानळ । देखूनि बाणासुराचें दळ । परिघ विशाळ पडताळी ॥ ३७ ॥ लोहामार्जी वज्रतुल्य । विद्युत्पातावशिष्ट शल्य । मुरनामक लोहगोळ । परिघ विशाळ तत्कृत जो ॥ ३८ ॥ तो मौर्व परिघ पडताळूनी । जैसा अंतक दण्डपाणि । करावया प्राणहानि । सज्ज होऊनि राहिला ॥ ३९ ॥ करावया भूतसृष्टीचा अंत । दंड धरी जेंवि कृतान्त । तेंवि अनिरुद्ध परिघेंसहित । समरा व्यवस्थित

राहिला ॥ ३४० ॥ तिये समयीं निकट वीर । प्रेरिता झाला बाणासुर । म्हणे धरा मारा बांधा चोर । कन्यागारप्रवेशक ॥ ४१ ॥ ऐकोनि बाणासुराची गोठी । आततायी सुभट हठी । अनिरुद्धावरी लोटले कपटी । शस्त्रें मुष्टी कवळूनी ॥ ४२ ॥ वीर प्रवर्तले मारामारी । देखूनि अनिरुद्ध काय करी । तें तूं कुरुवर्या अवधारीं । स्वस्थ अंतरीं होवोनी ॥ ४३ ॥

जिघृक्षया तान्परितः प्रसर्पतः शुनो यथा सूकरयूथपोऽहनत् ।
ते हन्यमाना भवनाद्विनिर्गता निर्भिन्नमूर्धोरुभुजाः प्रदुद्रुवुः ॥ ३४ ॥

धरावयाचे इच्छेकरून । भोंवता लोटला दैत्यगण । सूकरयूथपा जैसे श्वान । चहूंकडून मेळविती ॥ ४४ ॥ तया श्वानातें सूकरपति । प्रचंडदंष्ट्राप्रहारक्षतीं । भंगी तेंवि ते दुर्मति । अनिरुद्धवीरें भंगिले ॥ ३४५ ॥ धरावया आपणातें । दुर्मद दैत्य धांवती भोंवतें । अनिरुद्धें त्यां परिघघातें । श्वान मानूनि झोडपिलें ॥ ४६ ॥ कित्येक खड्गखेटकधारी । मौर्वे परिघ बैसतां शिरीं । सुस्नात होवोनियां रुधिरीं । मूर्छित समरीं पहुडती ॥ ४७ ॥ अपर कुंतपट्टिशपाणि । यावज्जन्म अजिंक रणीं । ते परिघाचे झोडपणीं । पाठी देऊनि पळाले ॥ ४८ ॥ तोमर मुद्गर शूळ शक्ति । वीर प्रतापें हाणों जाती । ते झोडिले परिघघातीं । प्रवाह वमिती रुधिराचे ॥ ४९ ॥ परिघघातें भंगलीं शिरें । ते ते सुस्नात झाले रुधिरें । कर पद मोडले परिघमारें । पळों माघारे न लाहती ॥ ३५० ॥ करतळ मनगटें कोपर बाहू । मोडूनि पडिले वीर बहु । एक दुरूनि हाहाहूहू । करूनि शस्त्रें पराजिती ॥ ५१ ॥ सुभट झोडिले परिघघातीं । एकाआड एक लपती । कित्येक तृणें धरिती दांतीं । गाई म्हणती आम्ही तुझ्या ॥ ५२ ॥ पळतां दाटले देहळीं । साळी जैश्या मूसळातळीं । तेंवि परिघें झोडी बळी । प्रळयकाळीं कृतान्तवत् ॥ ५३ ॥ दैवें सांपडली ज्यां वाट । पावला म्हणती ते श्रीकंठ । भीक मागूनि भरूं पोट । यावरी सुभट म्हणवूं ना ॥ ५४ ॥ परिघघातें झोडितां बळी । भंगली बाणभटांची फळी । एक पळती रानोमाळीं । उडिया तळीं घालूनी ॥ ३५५ ॥ तें देखोनि बाणासुर । म्हणे हा प्रतापी महावीर । समरीं कोणी न धरी धीर । भासे अपर प्रळयाग्नि ॥ ५६ ॥ दुर्धर दैत्यभटांच्या चळथा । परिघघात ओपितां माथां । अवलंबिती मृत्युपंथा । पावली व्यथा मम सेना ॥ ५७ ॥ वीर नव्हे हा सामान्य । कोण माउली प्रसवला धन्य । अमोघ याची आंगवण । यत्नेंकरून धरूं यातें ॥ ५८ ॥ युद्धीं भिडतां अहळबाहळीं । हा झोडील परिघातळीं । म्हणोनि रथीं बैसला बळी । बाण ते काळीं साटोपें ॥ ५९ ॥ परिघें मारितां सुभटथाटी । अनिरुद्ध पावला बाणानिकटीं । येरें कार्मुकीं सज्जूनि काठी । वीर जगजेठी विंधिला ॥ ३६० ॥ परिघें निवारूनि तो शर । अश्व सारथि केले चूर । बाण सोडूनियां रहंवर । अतिसत्वर पळाला ॥ ६१ ॥ आज्ञा करूनि किंकरगणा । पाचारिली प्रचंड सेना । मध्यें वेष्टूनि वीरराणा । बाण सणसणा विंधिती ॥ ६२ ॥ येरें ठोकूनि परिघघातें । प्रचंड वीर पाडिले भोंवते । लत्ताप्रहारें काढिलीं आंतें । शरमारातें वारूनी ॥ ६३ ॥ यावरी कपटी बाणासुर । हृदयीं चिंतूनियां शङ्कर । करिता झाला जो विचार । तो समग्र अवधारा ॥ ६४ ॥

तं नागपाशैर्बलिनंदनो बली घ्नंतं स्वसैन्यं कुपितो बबंधह ।
उषा भृशं शोकविषादविव्हला बद्धं निशम्याश्रुकलाक्ष्यरोदिषीत् ।। ३५ ।।

दैत्यसेना कोट्यनुकोटि । अनिरुद्ध वेष्टूनि उठाउठीं । करिती शस्त्रास्त्रांची वृष्टि । विलोकी दृष्टी बळितनया ।। ३६५ ।। तंव तो प्रतापी उषारमण । दावी बाणातें आंगवण । परिघघातें झोडिलें सैन्य । पळती भणाण महादैत्य ।। ६६ ।। परिघें ठोकितां कुञ्जरदळें । घायें फुटती कुंभस्थळें । उसळोनि पडती मुक्ताफळें । जलदोपलांसम समरीं ।। ६७ ।। रथी मारिले परिघघातीं । अधोमुखें रुधिरें वमती । कित्येक मूर्छित पडिले क्षिती । एक दिगंतीं पळाले ।। ६८ ।। पायींचे लपती सांदीकोंदीं । वातवेगें अश्वसादी । बाणासुर विवरी बुद्धि । म्हणे हा युद्धीं नाटोपे ।। ६९ ।। मग स्मरूनि आसुरी माया । वारुणीविद्या जपूनियां । नागपाशीं प्रद्युम्नतनया । बांधूनियां पाडिलें ।। ३७० ।। जैसा प्रचंड महावात । अंगीं झगटे अनावरत । नागपाशीं अकस्मात । तेंवि मूर्छित पाडिला ।। ७१ ।। कंठ कर पद बांधिले पाशीं । स्मृति हारपली मानसीं । मूर्छित पडला रणभूमीसी । बाण तयासी वधूं पाहे ।। ७२ ।। तंव तो पातला कुंभाण्ड मंत्री । अनिरुद्धातें लक्षूनि नेत्रीं । म्हणे हा प्रतापी वीर क्षत्री । मूर्छित निःशस्त्री या न वधीं ।। ७३ ।। बलिष्ठ ठेवूनियां राखण । याचें करीं संरक्षण । कुल शील जाती कोण । शोधूं आपण साकल्यें ।। ७४ ।। येणें भोगिली तव नंदिनी । आन तयेच्या पाणिग्रहणीं । सहसा प्रवर्तों न शके कोणी । रहस्य जाणोनि या रक्षीं ।। ३७५ ।। जरी तूं मारिसील यालागून । दुःखें उषा देईल प्राण । उषेची जननी आक्रन्दून । पावेल मरण तत्काळ ।। ७६ ।। तुझी ऐकूनि हे राहटी । क्षोभेल गौरीसह धूर्जटि । यालागीं विवेक विवरूनि पोटीं । वीर जगजेठी रक्षावा ।। ७७ ।। ऐसें ऐकूनि प्रधानवचन । विवेकारूढ झाला बाण । ठेवूनि प्रतापी वीर रक्षण । गेला आपण निजसदना ।। ७८ ।। तंव उषा हृत्कमळीं घाबरी । करितां कान्ताची अवसरी । वार्ता घेऊनियां किंकरी । आल्या सहचरी ते काळीं ।। ७९ ।। म्हणती अवो बाणात्मजे । तुझ्या कान्तें प्रतापें तेजें । प्रचंड दैत्य मारिले पैजे । कोणी न झुंजे येणेंसी ।। ३८० ।। धुरा पाडिल्या समराङ्गणीं । केली गजदळा भंगाणी । रथी झोडिले परिघेंकरूनी । गेले पळोनि महावीर ।। ८१ ।। हा एकला ते बहुत । मारिती निष्ठुर शस्त्रघात । अनिरुद्धवीर प्रतापवंत । प्रलयकृतान्त तुलनेचा ।। ८२ ।। प्रचंड मारिली दैत्यसेना । परम संकट पडिलें बाणा । तेणें वारूनि कृतसाधना । आणिला रणा अनिरुद्ध ।। ८३ ।। बाणें नागपाशें बांधूनी । अनिरुद्ध पाडिला समराङ्गणीं । भोंवतीं रक्षणें ठेवूनी । आपण सदनीं प्रवेशला ।। ८४ ।। ऐसी अनिरुद्धाची वार्ता । किंकरीवदनें उषा ऐकतां । शोकविषादें विह्वळचित्ता । मूर्छित पडली धरणिये ।। ३८५ ।। किंकरी धांवूनि सांवरिती । म्हणती सखिये न करीं खंती । चिरंजीव तुझा पति । स्मरें वरदोक्ति गौरीची ।। ८६ ।। नागपाशीं बांधिला असे । तेणें जाकळे परमक्लेशें । एऱ्हवीं प्राणांचें भय नसे । दृढविश्वासें जाण पां ।।८७।। ऐकूनि उषा करी रुदन । म्हणे नागपाशांचें बंधन । न सोसतां त्यजील प्राण । परम निर्वाण ओढवलें ।। ८८ ।। शोकें जाकळे कलेवर । विषादें जाकळे अंतर । म्हणे जनकें साधिलें वैर । व्याघ्रमार्जारपाडिपाडें ।। ८९ ।। म्हणे माझीच बुद्धि कुडी । कान्त आणिला येथ अवघडीं । सप्रेम-

सुखाचिये आवडी । मरणा वरपडी पैं केला ॥३९०॥ आतां कोणा जाऊं शरण । कैसे वांचती वराचे प्राण । कां पां न पवे गौरीरमण । बद्धमोक्षण करावया ॥ ९१ ॥ जाऊनि प्रार्थूं जरी पितयासी । तरी तो केवळ अविवेकराशि । सांगों जातां मातेपासीं । संकट तयेसी न निवारे ॥ ९२ ॥ अनिरुद्ध सुकुमार सुन्दर । अनिरुद्ध झुंजार एकाङ्गवीर । पद्मिनीलोभें गुंते मधुकर । तेंवि दुस्तर वरपडला ॥ ९३ ॥ गुंतला माझिये प्रीतीसाठीं । म्हणोनि पडिला पाशसंकटीं । कोणापासीं सांगों गोष्टी । म्हणोनि पिटी ललाटीं ॥ ९४ ॥ तंव पातली चित्रलेखा । तिणें आश्वासिली उषा । कान्तविषयीं न धरीं धोका । स्मरें अंबिकावरदान ॥ ३९५ ॥ जिणें तुजला दिधला वर । ते रक्षील तव भर्तार । ऐसा देऊनि नाभीकार । गेली सत्वर तेथोनी ॥९६॥ मग जपूनि गरुडविद्या । विभूति चर्चिली अनिरुद्धा । कळों नेदितां रक्षकवृंदा । गेली प्रमदा गुप्तत्वें ॥ ९७ ॥ सामर्थ्य मंत्राचें विशेष । शिथिल झाले नागपाश । चालों लागले श्वासोच्छ्वास । क्लेश अशेष हारपले ॥ ९८ ॥ जैसा निद्रित पहुडे शयनीं । तेंवि अनिरुद्ध पाशबंधनीं । चित्रलेखेनें इतुकी करणी । करूनि सदनीं प्रवेशली ॥ ९९ ॥ इतुकी कथा शोणितपुरीं । वर्तली ते कथिली पुरी । यावरी द्वारकेमाझारीं । करिती अवसरी ते ऐका ॥ ४०० ॥ श्रीमद्भागवतामाझारीं । दशमस्कंधीं शुकवैखरी । कुरुवर्याचे श्रवणपात्रीं । सविस्तरीं निरूपिली ॥ १ ॥ पुढिले अध्यायीं बळ कृष्ण । अनिरुद्धाची सोडवण । करिती जिंकूनि गौरीमरण । बाहु खंडून बाणाचे ॥ २ ॥ परम रसाळ आहे ते कथा । एकाग्रचित्तें परिसिजे श्रोतां । कलिमल खंडूनि कमलाकान्ता । प्रियतम होणें तद्योगें ॥ ३ ॥ प्रतिष्ठानीं एकनाथ । कैवल्यदानी परम समर्थ । चिदानंदें सकळां तृप्त । स्वानंदभरित करीतसे ॥ ४ ॥ तेथ गोविंद गोकुळपति । लाहूनि स्वानंदसुखावाप्ति । निजचरणोदकभागीरथी । भरली निगुती दयार्णवीं ॥४०५॥ तेणें दयार्णव अगाध झाला । मुक्तरत्नांच्या संग्रहें भरला । साधूं जाणे त्या साधकाला । लाभ नेमिला तो अवघा ॥ ६ ॥ येरा क्रूर जलग्राह । वैराग्यदर्शनीं दाविती भय । तयांचा टांकी समुदाय । सेवूनि विषय वर्ततसे ॥ ७ ॥ जे वैराग्य न मनिती कठिन । होती दयार्णवीं निमग्न । मुक्तरत्नें संग्रहून । लाहती संपूर्ण मोक्षश्री ॥४०८॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायामुषाहरणानिरुद्धबंधनं नाम द्विषष्टितमोऽध्यायः ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

श्लोक ॥ ३५ ॥ ओवीसंख्या ४०८ ॥ एवं संख्या ४४३ ॥

( एकसष्टावा अध्याय मिळून ओवी-संख्या २९६५५ )

**अध्याय बासष्टावा समाप्त**

कृष्णदयार्णवकृत

# हरिवरदा

## अध्याय ६३ वा

श्रीकृष्णपरमात्मने नमः । जय जगदीशा जगन्मया । अगम्य अगोचर अद्वया । अभेदबोधें समरसतया । सुलभ सदया सद्रूपा ॥ १ ॥ तवपदभजनप्रसादलब्ध । आज्ञेवरोनि दशमस्कंध । बासष्टी अध्यायपर्यंत विशद । कृत हरिवरदाव्याख्यान ॥ २ ॥ तेथ अनिरुद्धें भोगिली उषा । तेणें बाण चढला द्वेषा । समरीं घालूनि नागपाशा । यादववत्सा बांधिलें ॥ ३ ॥ यावरी त्रिषष्टितमाध्यायीं । शोणितपुरा शेषशायी । जाईल सोडवणे लवलाही । युद्ध ते ठायीं होईल ॥ ४ ॥ तेथ शंकरा जाणिजेल हरि । बाण-बाहूंचें खंडन समरीं । करूनि अनिरुद्ध सह नोवरी । द्वारकापुरीं प्रवेशती ॥ ५ ॥ इतुकी कथा ये अध्यायीं । परिक्षितीचे श्रवणालयीं । शुकें कथिली ते मुनिसमुदायीं । शौनकसत्रीं सूत वदे ॥ ६ ॥

श्रीशुक उवाच– अपश्यतां चानिरुद्धं तद्बंधूनां च भारत । चत्वारो वार्षिका मासा व्यतीयुरनुशोचताम् ॥ १ ॥

चित्रलेखेनें अनिरुद्ध नेला । प्रभाते सदनीं गलबला झाला । रामकृष्णादि प्रद्युम्नाला । वृत्तान्त कथिला किङ्करीं ॥ ७ ॥ रति रुक्मिणी रुक्मवती । रोहिणी देवकीसह रेवती । रोचनेच्या सदना येती । वृत्तान्त पुसती तयेतें ॥ ८ ॥ येरी म्हणे त्रिदिनव्रत । व्रतस्थ होते कीर्तननिरत । म्हणोनि मजला हें अविदित । नव्हता एकान्तसुखशयनीं ॥ ९ ॥ किङ्कर म्हणती सभास्थानीं । अर्धरात्री क्रमिली श्रवणीं । कीर्तन संपतां मंचकासनीं । स्वेच्छा शयनीं पहुडलिया ॥ १० ॥ निद्रित झाले सेवक सर्व । प्रभाते वर्तलें अपूर्व । मंचकासहित रोचनाधव । नेला लाघव करूनियां ॥ ११ ॥ कोणें नेला ऐसें न कळे । पिहित द्वारें असतां सकळें । हें ऐकतां यादवकुळें । झालीं व्याकुळें सर्वत्र ॥ १२ ॥ न देखतां अनिरुद्धातें । समस्त बंधुवर्गाचीं चित्तें । झालीं अत्यंत शोकभरितें । शुद्धि कोणातें तर्केना

॥ १३ ॥ प्रसूतिकाळीं प्रद्युम्नासी । शंबरें नेलें वधावयासी । दैवें रक्षिलें तेथ त्यासी । हेही तैसीच गोष्टी गमे ॥ १४ ॥ ऐसें अनेक तर्क करिती । एक दैवज्ञा पूसती । देवदेव्हारें धुंडिती । घालूनि विनती आरतिया ॥ १५ ॥ रोचनेचा शोक भारी । भोंवत्या आश्वासिती नारी । गद प्रद्युम्न राम मुरारी । बाष्पें नेत्रीं ढाळिती ॥ १६ ॥ देवकी रोहिणी रेवती । रुक्मिणीसहित रुक्मवती । परमाक्रोशें आक्रंदती । आंगें टाकिती धरणीये ॥ १७ ॥ नेणती सगुण हे रोचना । कांतेंवीण दीनवदना । कैसी कंठील अहर्गणा । म्हणोनि ललना विलपती ॥ १८ ॥ तिये समयीं उद्धवाक्रूर । समस्तांतें देती धीर । म्हणती सावध स्थिर स्थिर । दीर्घ विचार करा म्हणती ॥ १९ ॥ तेव्हां रायें उग्रसेनें । अनिरुद्धाचे गवेषणे । चार प्रेरूनि वनोपवनें । द्वीपें भुवनें शोधविलीं ॥ २० ॥ ब्राह्मण घातले अनुष्ठानीं । एक व्रतस्थ बैसले मौनी । एक हरिहरदेवतायतनीं । नियमेंकरूनि राहिले ॥ २१ ॥ एक अश्वत्था प्रदक्षिणा । एक तुळसीवृंदावना । एक ते सूर्यनारायणा । अर्घ्यदानें तोषविती ॥ २२ ॥ अनिरुद्धाचा विसर न पडे । दुःखें यादव झाले वेडे । रुक्मवती सदैव रडे । रोचनेकडे पाहूनी ॥ २३ ॥ एक म्हणती अमरभुवनीं । अनिरुद्ध नेला निर्जरगणीं । पार्यांताची मानूनि हानि । वज्रपाणि क्षोभला ॥ २४ ॥ ऐसे अनेक तर्क करिती । दुःखें सदैव आक्रंदती । यावद्वर्षाकाळसमाप्ति । क्रमिल्या राती सशोक ॥ २५ ॥ चाऱ्ही मास वर्षाकाळीं । बंधुवर्गांची मंडळी । अनिरुद्धाच्या शोकानळीं । दुःखें समूळीं आहाळतसे ॥ २६ ॥ जेव्हां बाणें नागपाशीं । अनिरुद्ध बांधूनि रणभूमीसी । पाडिला त्याचे अवस्थेसी । देखूनि देवर्षि कळवळिला ॥ २७ ॥ सवेग पातला द्वारकापुरा । वार्ता कथिली द्वारकेश्वरा । अनिरुद्ध नेला बाणनगरा । उषा सुन्दरा पर्णावया ॥ २८ ॥ उषेसी भवानीचा वर । स्वप्नीं तुजसीं रमेल नर । तोचि होईल तव भर्तार । केला निर्धार वरदानें ॥ २९ ॥ शुक्लमाधवीं द्वादशीनिशीं । स्वप्नीं उषाअनिरुद्धेंसीं । योग झाला मग तयासी । शोणितपुरासी तिहीं नेलें ॥ ३० ॥ तेथें उषेचें पाणिग्रहण । केलें गान्धर्वविधानेंकरून । यावत्काळ वनितारत्न- । भोगीं वेधून राहिला ॥ ३१ ॥ बाणासुरासी हा वृत्तान्त । विदित होतां झाला तप्त । सवें घेऊनि प्रचंड दैत्य । अनिरुद्धातें धरूं गेला ॥ ३२ ॥ येरें परिघप्रहारातळीं । झोडिली शत्रुवर्गाची फळी । प्रचंड दैत्य मारिले बळी । केली रवंदळी रणाङ्गणीं ॥ ३३ ॥ रथही बाणाचा भंगिला । अन्यरथीं तो वळघला । तेणें नागपाशीं बांधिला । निरोधें रक्षिला अनिरुद्ध ॥ ३४ ॥ भगवंतासी पूर्वींच विदित । तथापि वर्ते अज्ञवत । साधावया अवतारकृत्य । करावया दैत्यमदभंग ॥ ३५ ॥

नारदात्तदुपाकर्ण्य वार्तां बद्धस्य कर्म च । प्रययुः शोणितपुरं वृष्णयः कृष्णदैवताः ॥ २ ॥

नारदमुखें सकळामाजीं । आपण ऐकता झाला सहजीं । अनिरुद्धाची शुद्धि आजी । लागली म्हणोनि प्रकाशी ॥ ३६ ॥ सभास्थानीं उग्रसेन । कृष्ण प्रद्युम्न संकर्षण । अनिरुद्धउषापाणिग्रहण । युद्ध दारुण दैत्येंसीं ॥ ३७ ॥ अनिरुद्धातें नागपाशीं । बाणें बांधिलें रणभूमीसी । यादवीं गोष्टी ऐकूनि ऐसी । परम आवेशीं उठावले ॥ ३८ ॥ कृष्णचि ज्यांची उपासना । कृष्णावीण न भजती आना ।

कृष्ण दैवत यादवगणां । श्रीकृष्णाज्ञा त्यां होतां ॥ ३९ ॥ ठोकिल्या प्रस्थानकुंजरभेरी । सन्नद्ध झाले ते शस्त्रास्त्रीं । प्रळययुद्धाची सामग्री । सेना आसुरी भंगावया ॥ ४० ॥ लघुतर यादवांचा अंकित । पाहूं न शके त्या कृतान्त । तेथ प्रत्यक्ष मन्मथसुत । बांधिती दैत्य हें नवल ॥ ४१ ॥ आजी विध्वंसूं शोणितपुर । समरीं मारूं बाणासुर । आडवा येईल जरी शङ्कर । तरी त्या निष्ठुर करूं शिक्षा ॥४२॥ परमदुर्मद यादवसैन्य । रात्रंदिवस इच्छिती रण । त्यांसी हे वार्ता होतां श्रवण । क्षोभें दारुण उठावले ॥ ४३ ॥ प्रतापें शोणितपुराप्रति । यादव जाते झाले किती । वीरांसहित सेनागणती । ऐक निश्चिती कुरुवर्या ॥ ४४ ॥

प्रद्युम्नो युयुधानश्च गदः सांबोऽथ सारण. । नंदोपनंदभद्राद्या रामकृष्णानुवर्तिनः ॥ ३ ॥
अक्षौहिणीभिर्द्वादशभिः समेताः सर्वतोदिशम् । रुरुधुर्बाणनगरं समंतात्सात्वतर्षभाः ॥ ४ ॥

विष्णुपुराणीं पराशर । राम कृष्ण प्रद्युम्नवीर । गेले गरुडीं होवोनि स्वार । नाहीं विस्तार बहु वदला ॥ ४५ ॥ येथें श्रीमद्भागवतीं । प्रबळ सेनेसीं श्रीपति । गेला शोणितपुराप्रति । वदला सुमति शुकयोगी ॥ ४६ ॥ ज्येष्ठ कृष्णाचा नंदन । जो कां मकरध्वज प्रद्युम्न । आणि प्रतापी युयुधान । सात्यकि अभिधान जयाचें ॥ ४७ ॥ तृतीय धाकुटा श्रीकृष्णबंधु । केवळ धनुर्विद्येचा सिंधु । जेणें भंगिला जरासंधु । रुक्मिणीहरणसमरंगीं ॥ ४८ ॥ चौथा जाम्बवतीचा तनय । साम्बनामा वृष्णिवर्य । ज्याचें अमोघ वीर्य शौर्य । समरीं प्रळयपावक जो ॥ ४९ ॥ सारणनामा पांचवा वीर । यदुयूथपांमाजी शूर । ज्यासीं सुभट न धरी धीर । प्रळयरुद्रसमतेचा ॥५०॥ नंद उपनंद हे दोघे । सव्यदक्षिणपार्श्वभागें । चालती रामकृष्णांसंगें । आज्ञाप्रसंगें वर्तती ॥ ५१ ॥ भद्रातनय भद्रवीर । श्रीकृष्णाचा औरस कुमर । प्रतापतेजस्वी भास्कर । अपर भृगुवर समरंगीं ॥ ५२ ॥ एवं यादवसेनाधर । वृष्णि अंधक भोज कुकुर । सांगतां सर्वांचा विस्तार । ग्रंथ फार वाढेल ॥ ५३ ॥ आद्यशब्दें हे समस्त । जाणती श्रोते विपश्चित । रामकृष्णीं परमविनीत । आज्ञानुवर्ती सर्वस्वें ॥ ५४ ॥ एवं द्वादश अक्षौहिणी । सन्नद्ध बद्ध चतुरंगिणी । सवें घेऊनि रामकृष्णीं । द्वारकेहूनि निघाले ॥ ५५ ॥ वाद्यें वाजती भयंकरें । म्हणती जयांतें रणतुरें । सिंहनादाचेनि गजरें । भरलें शारें कृतान्ता ॥ ५६ ॥ ऐसे वीर प्रतापजेठी । पातले शोणितपुरानिकटीं । बाणनगरा देऊनि घरटी । बैसले हठी बळसिंधु ॥ ५७ ॥ रोधूनि सर्वही दिग्विभाग । पुरग्रहणार्थ करिती लाग । बाहेर निघावयातें मार्ग । नागरवर्ग न लाहती ॥ ५८ ॥ ऐसे प्रतापी सात्वतश्रेष्ठ । झाले शोणितपुरीं प्रविष्ट । नगरनागरां देती कष्ट । तेंही स्पष्ट अवधारा ॥ ५९ ॥ म्हणाल मानुषी यादवसेना । केंवि पातली बाणभुवना । ऐसा संशय भासेल मना । यदर्थीं वचना अवधारा ॥ ६० ॥ द्वारका निर्मिली कवणेपरी । कैसी मथुरा नेली रात्रीं । ज्यातें सुधर्मा ओपिली अमरीं । तो काय न करी श्रीकृष्ण ॥ ६१ ॥ वोळगे तिष्ठती अमरगण । त्यातें विमानीं यादवसैन्य । वाहूनि नेतां प्रयास कोण । न कीजे प्रश्न येविषयीं ॥ ६२ ॥ सपक्ष तुरंग जुंतिले रथीं । सपक्ष अश्वीं वीरपंक्ति । मनोवेगें गगन-

पर्थी । जाऊनि रोधिती बाणपुरा ॥ ६३ ॥ नगर रोधूनि चहूंकडे । यादव प्रतापी बैसले गाढे । युद्ध करिती कोण्या पाडें । तें निवाडें परिसा हो ॥ ६४ ॥

भज्यमानपुरोद्यानप्राकाराट्टालगोपुरम् । प्रेक्षमाणो रुषाविष्टस्तुल्यसैन्योऽभिनिर्ययौ ॥ ५ ॥

नगराभोंवतीं वनोपवनें । विध्वंसिलीं यादवसैन्यें । उत्तुंगदुर्गें केलीं भग्नें । पुरगोपुरें ढांसळिलीं ॥ ६५ ॥ अट्टाळिया उच्चतर । पाडिल्या करूनि यंत्रप्रहार । कंपायमान केलें नगर । देखोनि असुर क्षोभला ॥ ६६ ॥ जैसें प्रतापी यादवदळ । तत्तुल्य दैत्यसैन्य प्रबळ । घेऊनि निघाला बळीचा बाळ । प्रळयानळपडिपाडें ॥ ६७॥ तये समयीं शिखंडकेतु । अकस्मात झाला पतितु । बाण खोंचला हृदया-आंतु । पार्वतीकान्त स्मरे मनीं ॥ ६८ ॥ माझा अभिमान गौरीरमणा । यथार्थ करीं निजवरदाना । प्रार्थिलासि म्यां पुररक्षणा । तें या क्षणाकारणें ॥ ६९ ॥ केतु भंगोनि पडतां क्षिती । बाण हृदयीं ऐसें चिंती । अंतर जाणोनि गौरीपति । रक्षणार्थी प्रवर्तला ॥ ७० ॥

बाणार्थे भगवान्रुद्र. सपुत्रैः प्रमथैर्वृतः । आरुह्य नदिवृषभं युयुधे रामकृष्णयोः ॥ ६ ॥

बाण रक्षावयाकारणें । षड्गुणैश्वर्यपरिपूर्णें । पुत्रेंसहित पार्वतीरमणें । केलें धावणें ते काळीं ॥ ७१ ॥ सकळ सृष्टीतें रडविता । म्हणोनि रुद्र हे नामप्रथा । वृषभीं वळघूनियां त्वरिता । प्रमथें सहित पातला ॥ ७२ ॥ बाण घालूनि पाठीसीं । स्वयें प्रवर्तला युद्धासी । परजूनियां शस्त्रास्त्रांसी । रामकृष्णेंसी संघटला ॥७३॥ युद्ध मांडिलें परमाद्भुत । सपुत्र शंकर सहित प्रमथ । यादववीर प्रतापवंत । कोण कोणातें पडखाळिती ॥ ७४ ॥ परस्परें ते वीरवरगणीं । सावध होवोनि परिसा कर्णीं । श्लोकद्वयें बादरायणि । घाली श्रवणीं भूपाचे ॥ ७५ ॥

आसीत्सुतुमुलं युद्धमद्भुतं रोमहर्षणम् । कृष्णशंकरयो राजन्प्रद्युम्नगुहयोरपि ॥ ७ ॥
कुंभांडकूपकर्णाभ्यां बलेन सह संयुगः । सांबस्य बाणपुत्रेण बाणेन सह सात्यकेः ॥ ८ ॥

तारकसमरासमान तुमुल । सुतराम् म्हणिजे अवंचकशील । परमाद्भुत युद्ध प्रबळ । झालें विशाळ समरंगीं ॥ ७६ ॥ जें ऐकतां अद्यापिवरी । सकंप रोमांच येती शरीरीं । समरांगणीं शङ्करहरि । भिडती निकरीं परस्परें ॥ ७७ ॥ यादवसैन्य शंकर मारी । देखूनि श्रीकृष्ण त्या पाचारी । प्रद्युम्न लोटला षण्मुखावरी । कठोरप्रहारीं हाणिताती ॥ ७८ ॥ प्रमथपुंगव कूपकर्ण । कुम्भाण्ड बाणाचा प्रधान । त्या दोघांहीं संकर्षण । समरांगणीं पडखाळिला ॥ ७९ ॥ झुंजार बाणासुराचा पुत्र । त्यावरी लोटला साम्ब वीर । जो कां जाम्बवतीचा कुमर । समरीं अपर प्रळयाग्नि ॥ ८० ॥ शङ्कर आला समराङ्गणा । युद्धीं हांकिलें रामकृष्णां । वीर दाविती आंगवणा । आवेश बाणा न सांवरे ॥ ८१ ॥ प्रचंडावेशें बाणासुर । ठोकूनि आला यादवभार । त्यावरी लोटला सात्यकिवीर । कार्मुकीं शर सज्जूनी ॥ ८२ ॥

ऐसे अनेक प्रमथगण । त्यांवरी यादव रणप्रवीण । लोटले त्यांचें द्वंद्वशा कथन । लिहितां भुवन अल्प गमे ॥ ८३ ॥ यालागीं द्वंद्वशा कथिले वीर । तयांवरूनि जाणिजे अपर । कासया कीजे बहु विस्तार । श्रोते चतुर समजती ॥ ८४ ॥ हरिहरांचें दारुण युद्ध । परंतु धर्मासि जें अविरुद्ध । तें पहावया निर्जरवृंद । आला विशद तो ऐका ॥ ८५ ॥

ब्रह्मादयः सुराधीशा मुनयः सिद्धचारणाः । गंधर्वाप्सरसो यक्षा विमानैर्द्रष्टुमागमन् ॥ ९ ॥

हंसविमानीं चतुर्मुख । आदिकरूनि सनकादिक । ब्रह्मनिष्ठ नारदप्रमुख । आले कौतुक पहावया ॥ ८६ ॥ देवयानीं पुरंदर । सर्वे वेष्टित अमरभार । पहावया हरिहरसमर । आले सत्वर बाणपुरा ॥ ८७ ॥ द्वादश आदित्यांचा गण । विश्वेदेव सिद्ध चारण । वसु साध्य सुपर्वाण । आले मुनिजन तपोनिधि ॥ ८८ ॥ मुख्य सप्त महर्षिप्रवर । अपर अठ्यायशीं सहस्र । विमानयानीं ऋषींचा भार । पातले समग्र बाणपुरा ॥ ८९ ॥ तैसेचि समस्त लोकपाळ । यक्ष गंधर्व अप्सरामेळ । हरिहराचें युद्ध तुमुल । आले केवळ विलोकना ॥ ९० ॥ असो विस्तार सांगों किती । गगनीं दाटल्या विमानपंक्ति । हरिहर भिडती कवणे रीती । तें तूं भूपति अवधारीं ॥ ९१ ॥

शङ्करानुचराञ्शौरिर्भूतप्रमथगुह्यकान् । डाकिनीर्यातुधानांश्च वेतालान्सविनायकान् ॥ १० ॥
प्रेतमातृपिशाचांश्च कूष्मांडान्ब्रह्मराक्षसान् । द्रावयामास तीक्ष्णाग्रैः शरैः शार्ङ्गधनुश्च्युतैः ॥ ११ ॥

शङ्कराचे जे अनुचर । निकटवर्ती प्रतापी शूर । तिहीं त्रासिले यादवभार । भिडती क्रूर प्रतापें ॥ ९२ ॥ भूतें पसरोनि मोकळीं भिसें । वीरां झोंबती अट्टहासें । संचार करूनि लाविती पिसें । मग त्यां नुमजे आपपर ॥ ९३ ॥ प्रमथ क्रूर कुठारपाणि । एक त्रिशूळें खोंचिती रणीं । एक खट्वाङ्गें फोडिती मूर्ध्नी । एक ते दशनीं विदारिती ॥ ९४ ॥ एक नखें फाडिती पोटें । एक नयनीं रोविती बोटें । मारूं जातां न दिसती कोठें । पिशाच कपटें भांडती ॥ ९५ ॥ शाकिनी डाकिनी यातुधानी । नग्न धांवती समराङ्गणीं । उन्मत्त नाचती रुधिरपानी । पिशिताशनी भयंकरा ॥ ९६ ॥ महामारिका कोटरा ज्येष्ठा । करिती भयंकर कुत्सित चेष्टा । संचार करूनि देती कष्टा । बळें अनिष्टा भेटविती ॥ ९७ ॥ वेताळ कंकाळ पिंगाक्ष पिंग । उन्मत्त महिषासुर मातंग । समरांगणीं करिती धिंग । कुष्माण्डवर्ग भ्रान्तिकर ॥ ९८ ॥ प्रचंड विघ्न विनायक । परम अघोर प्रेतनायक । ब्रह्मराक्षस क्रव्यादप्रमुख । वीरां सम्मुख घोळसिती ॥ ९९ ॥ नरगजाश्वीं संचार करिती । त्यांची हारपे समरस्मृति । अस्ताव्यस्त धांवताती । बळें मारिती निज सैन्या ॥ १०० ॥ आपुले आपणांमाजी वीर । एकमेकां मारिती प्रहार । आंगीं भूतांचा संचार । तेणें आपपर विसरले ॥ १ ॥ हाहाकार समरांगणीं । यादव त्रासिले पिशाचगणीं । हें देखोनि शार्ङ्गपाणि । अमोघ बाणीं वृष्टि करी ॥ २ ॥ शार्ङ्गनिर्मुक्त सुटतां शर । रणीं खोंचले पिशाचभार । भूतप्रेतप्रमथनिकर । पळती समर साण्डूनी ॥ ३ ॥ शाकिनीडाकिनीगुह्यकांतें ।

शार्ङ्गनिर्मुक्त बाणघातें । त्रासितां पळती गगनपथें । फिरूनि मागुते न पाहती ॥ ४ ॥ यातुधानी रुधिराशना । वेताळ कंकाळ पिंगाक्षगणा । लागतां शार्ङ्गनिर्मुक्त बाणा । पळती प्राणा घेऊनी ॥१०५॥ विनायक जे विघ्नपति । ब्रह्मराक्षस कुष्माण्डजाति । मातरा कोटरा ज्येष्ठा रेवती । पळती दिगंतीं प्राणभयें ॥ ६ ॥ प्रळयमेघांची वांकडी । बाणवृष्टि तत्पडिपाडीं । पिशाचसेना झोडिली प्रौढी । रणीं धांदर्डी नाचविलीं ॥ ७ ॥ शार्ङ्गशिंजिनीटणत्कार । करितां उठती नामोच्चार । शार्ङ्गनिर्मुक्त शरांचा मार । मंत्रोच्चारपूर्वक पैं ॥ ८ ॥ पिशाच पळती मंत्रश्रवणें । प्रथम खोंचले प्रचंड बाणें । समरीं न धरिती आंगवणे । जेंवि कां तृणें महावातें ॥ ९ ॥ पिशाच पळाले सांडूनि रण । कित्येकांचे घेतले प्राण । प्रमथ समरीं न धरिती त्राण । पातले शरण शर्वातें ॥११०॥ भो भो स्वामी भूतान्तका । त्रिपुरभंजका श्रीत्र्यंबका । साहों न शकों जी सायकां । अभयदायका संरक्षीं ॥ ११ ॥ पळोनि गेली पिशाचसेना । प्रमथ भाकिती ऐसी करुणा । ऐकूनि क्षोभला कैलासराणा । अस्त्रसंधाना आदरिलें ॥ १२ ॥ आंगीं भरला प्रचंड कोप । सवेग सज्जूनि पिनाकचाप । अस्त्रविद्येचा खटाटोप । दावी प्रताप समरंगीं ॥१३॥

पृथग्विधानि प्रायुंक्त पिनाक्यस्त्राणि शार्ङ्गिणे । प्रत्यस्त्रैः शमयामास शार्ङ्गपाणिरविस्मितः ॥ १२ ॥

पिनाक सज्जूनियां पिनाकी । पृथक्पृथक् अस्त्रें निकीं । शार्ङ्गपाणीतें लक्षूनि टाकी । समरीं हाकी भीमरवें ॥ १४ ॥ कठोर डामर उड्डामर । साबर अभिचार अघोर । प्रयोगमंत्र जपूनि क्रूर । प्रेरी सत्वर अस्त्रांतें ॥ ११५ ॥ तया अस्त्रांचे प्रतिकार । सांदीपनिदत्तमंत्र । गुरुपद स्मरूनि शार्ङ्गधर । अस्त्रीं प्रत्यस्त्र प्रयोगी ॥ १६ ॥ शंकर करकरां खाऊनि दांत । निकरें अस्त्रांतें प्रेरित । हास्यवदनें रमाकान्त । करी त्यां उपहत प्रत्यस्त्रें ॥ १७ ॥ कुरुवर भूसुरामरद्रुमा । याचकस्वेच्छापूर्णकामा । अस्त्रां प्रत्यस्त्रांचिया नामा । भूपललामा अवधारीं ॥ १८ ॥

ब्रह्मास्त्रस्य च ब्रह्मास्त्रं वायव्यस्य च पार्वतम् । आग्नेयस्य च पार्जन्यं नैजं पाशुपतस्य च ॥ १३ ॥

ब्रह्मास्त्रविद्या जपूनि मंत्रीं । शंकर योजी पीताम्बरीं । बगळामुखीं मंत्रोच्चारीं । शक्ति अंबरीं प्रज्वळली ॥ १९ ॥ अनिवार ब्रह्मास्त्राचा भार । भरलें प्रळयानळें अंबर । त्रिजगीं झाला हाहाकार । देखूनि श्रीधर काय करी ॥ १२० ॥ ब्रह्मास्त्राचिया निवारणा । करूं न शकती अस्त्रें नाना । हें जाणोनि वैकुंठराणा । अपर ब्रह्मास्त्र प्रयोजी ॥ २१ ॥ गायत्रीचें जें कां शिर । अमोघ अव्याहत ब्रह्मास्त्र । उपसंहरी व्याहृतिनिकर । जपोनी श्रीधर शर सोडी ॥ २२ ॥ ब्रह्मास्त्राचें निवारण । करितां ब्रह्मास्त्रें जनार्दन । हें देखोनि गौरीरमण । म्हणे दारुण प्रतियोद्धा ॥ २३ ॥ प्रभंजनास्त्र जपोनि पुढती । कृष्ण विंधी जवें पशुपति । तंव मारुतीं केली ख्याति । सैन्य आवर्तीं पाडिलें ॥ २४ ॥ तृणावर्ताची जैसी घरटी । तैसीं सैन्यें गरगराटीं । फिरती आणि गगनपोटीं । वीर जगजेठी उडताती ॥ १२५ ॥ अश्व कुंजर रथ पताका । प्रचंड पवनें उधळती देखा । पायदळाचा कवण लेखा । नोहे आवांका अति-

रथियां ॥ २६ ॥ पवनास्त्रमारें त्रासिलें सैन्य । ऐसें देखोनि जनार्दन । पर्वतास्त्र जपूनि पूर्ण । करी खंडन अनिळाचें ॥ २७ ॥ पर्वतास्त्राचेनि सामर्थ्यें । पवन लोपला जेथींचा तेथें । यूथपीं सैन्यें इत्थंभूतें । केलीं स्वस्थें सांवरूनी ॥ २८ ॥ हें देखोनि शूळपाणि । प्रळयानळास्त्र लाविलें गुणीं । ज्वाळा दाटल्या गगनीं धरणीं । जळती प्राणी उभेउभे ॥ २९ ॥ स्वस्थ शिबिरें पताका जळती । कुंजर पोळले सैरा पळती । अश्व आहळूनि वावळती । वीर कोसळती करपूनी ॥ १३० ॥ हाहाकार यादवदळीं । देखूनि प्रतापी श्रीवनमाळी । जीमूतास्त्रातें अस्त्रशाळी । योजूनि विधुळी अनळास्त्रा ॥ ३१ ॥ मुसळधारीं वर्षती मेघ । भंगला पावकास्त्रनिदाघ । खळबळां वाहती प्रचंड ओघ । तेणें भर्ग चाकाटला ॥ ३२ ॥ म्हणे हा नोहे मनुजकोटि । अमोघ योद्धा त्रिजगजेठी । यावरी न चले कोणी काठी । म्हणोनि हठी प्रज्वाळिला ॥ ३३ ॥ पाशुपतास्त्रें प्रळयकाळीं । क्षोभें ब्रह्माण्ड अवघें जाळी । तें प्रेरूनि करीन होळी । म्हणोनि शूळी अस्त्र जपे ॥ ३४ ॥ नयनीं धडकती प्रचंड ज्वाळा । जिह्वा पंचवक्त्रीं विशाळा । पाशुपतास्त्रविद्या प्रबळा । प्रेरिता झाला सक्रोधें ॥ १३५ ॥ पाशुपतास्त्रनिवारण । करितें अपर अस्त्र कोण । ऐसें विवरूनियां श्रीकृष्ण । निजास्त्र पूर्ण प्रयोजी ॥ ३६ ॥ निजास्त्र म्हणिजे वैष्णवास्त्र । नारायण हा नामोच्चार । प्रयोगपुरस्सर सोडितां शर । पाशुपतास्त्र भंगलें ॥ ३७ ॥ अपर अस्त्र जंव विवरी हर । तंव तो प्रतापी शार्ङ्गधर । काय केला चमत्कार । तोही सादर अवधारा ॥ ३८ ॥

मोहयित्वा तु गिरिशं जृंभणास्त्रेण जृंभितम् । बाणस्य पृतनां शौरिर्जघानासिगदेषुभिः ॥ १४ ॥

कृष्ण विवरी अभ्यंतरीं । तमःप्रचुर हा त्रिपुरारि । जृंभणास्त्रें यातें समरीं । निजनिर्धारीं जिंकावें ॥ ३९ ॥ मग स्मरूनि सांदिपनी । तामसी विद्या जपूनि वदनीं । जृंभणास्त्र लावूनि गुणीं । शूळपाणि भेदियला ॥ १४० ॥ तामसी विद्येचें सामर्थ्य निवाड । मोहित करूनि चंद्रचूड । केला जृंभणास्त्रा वरपड । येती कडकड आंगमोडे ॥ ४१ ॥ पांचही मुखें पसरूनि नेटें । जांभया येती कडकडाटें । दाही हस्तांचीं जुंबाडें । मागें पुढें आळीपिळी ॥ ४२ ॥ डोळे झांकती गपगपां । डुकल्या देतसे टपटपां । समरस्मृति पावली लोपा । मोहप्रतापा वश झाला ॥ ४३ ॥ गळालीं नेणे हातींचीं शस्त्रें । नुमजे आपणा भेदिलें अस्त्रें । तें देखूनि यादवेश्वरें । त्यजिलें निद्सुरे शंभूतें ॥ ४४ ॥ शंकरें आंवरिला श्रीहरि । जाणोनि बाणसेनेच्या वीरीं । यादवांवरी केली मारी । प्रमथीं अपरीं येरीकडे ॥ १४५ ॥ जृंभणास्त्रें शङ्करातें । मोहित करूनि रुक्मिणीकान्तें । शार्ङ्गनिर्मुक्त बाणघातें । बाणसेनेतें त्रासिलें ॥ ४६ ॥ प्रळयकाळींचे जैसे घन । तैसे सणसणा येती बाण । कोणा नोहेचि आंगवण । शरनिवारण करावया ॥ ४७ ॥ गरुड लोटूनि सेनेवरी । कित्येक मारिले गदाप्रहारीं । कित्येकांचीं खड्गधारीं । शिरें अंबरीं उडविलीं ॥ ४८ ॥ कुंभस्थळीं आपुंखशर । भेदितां भंगले कुञ्जरभार । लागतां दृढतर प्रहार । झाले रहंवर शत चूर्ण ॥ ४९ ॥ खगेंद्राचिये झडपेसवें । पायदळें पडलीं होवोनि निर्जीवें । एवं बाणसैन्य आघवें । भंगिलें केशवें क्षणमात्र ॥ १५० ॥

स्कंद: प्रद्युम्नबाणौघैरर्द्यमान: समंतत: । असृग्विमुंचन्गात्रेभ्य: शिखिनापाक्रमद्रणात् ॥ १५ ॥

तंव येरीकडे तारकारि । समरीं प्रद्युम्ना पाचारी । साहें म्हणोनि शक्तिप्रहारीं । हृदयावरी ताडिला ॥ ५१ ॥ हें देखोनि प्रद्युम्नवीर । रसाळकार्मुकीं लावोनि शर । येतां भंगिला शक्तिप्रहार । षण्मुखें तोमर उचलिला ॥ ५२ ॥ धनुर्विद्येचा सागर । रुक्मिणीतनय परम शूर । तेणें विंधूनिं पंच शर । केला जर्जर शिवतनय ॥ ५३ ॥ बाणें तोमर उडविला गगनीं । सायकें भेदिला मयूर मूर्ध्नि । क्रौंचदारण अमोघ बाणीं । समराङ्गणीं त्रासियला ॥ ५४ ॥ अंगुष्ठापासोनि मस्तकवरी । बाण भेदले स्कंदशरीरीं । बाणक्षतांच्या रुधिरधारीं । समरधरित्री रंगाविली ॥ १५५ ॥ सव्यदक्षिण येती बाण । बाणीं पूर्ण भरलें गगन । पुढें मागें तळीं वरून । भेदितां स्मरण हारपलें ॥ ५६ ॥ झालीं सर्वांगीं बाणक्षतें । त्यांपासोनि रुधिर भोंवतें । समराङ्गणीं झालें स्रवतें । प्राशिती भूतें संतुष्टें ॥ ५७ ॥ मूर्ध्नि पोळला बाणप्रहारें । तेणें मयूरा घायवारें । षण्मुखा घेवोनि पाठिमोरें । रणापासोनि पळाला ॥ ५८ ॥ षण्मुखातें देखोनि पळतां । भंगल्या प्रमथगणाच्या चळथा । कायसी भूतप्रेतांची कथा । पावले व्यथा यूथपति ॥ ५९ ॥ रणीं भंगिला शक्तिधर । जृंभणास्त्रें विकळ शङ्कर । बाणसेनेसी केला मार । जयजयकार यदुभारीं ॥ १६० ॥ तंव ते कुम्भाण्डकूपकर्ण । पाचारूनि संकर्षण । दाविते झाले आंगवण । अपार बाण वर्षूनी ॥ ६१ ॥

कुम्भाण्ड: कूपकर्णश्च पेततुर्मुसलार्दितौ । दुद्रुवुस्तदनीकानि हतनाथानि सर्वत: ॥ १६ ॥

बळरामाचिये शरीरीं । बाण लागती कवणेपरी । शलभ जैसे मेरूवरी । हेमंतशिशिरीं संघटती ॥ ६२ ॥ कुम्भाण्डकूपकर्णांचे शर । न गणूनियां लाङ्गलधर । मस्तकीं ओपूनि मुसळप्रहार । समरीं सत्वर लोळविले ॥ ६३ ॥ संकर्षणाच्या मुसळघातें । कुम्भाण्डकूपकर्णांचे माथे । फुटूनि भडभडां वाहती रक्तें । पडिले प्रेतें होवोनियां ॥ ६४ ॥ तया दोघांचें प्रचंड सैन्य । समरीं भंगलें नाथहीन । प्राणधाकें सांडूनि रण । दिगंतीं संपूर्ण पसरलें ॥ १६५ ॥ येरीकडे बाणकुमरें । साम्बा नोकूनि न्यूनोत्तरें । विंधिता झाला सहस्रशरें । चमत्कारें गर्जोनी ॥ ६६ ॥ तंव तो जाम्बवतीचा बाळ । बाणीं बाण तोडूनि सकळ । रथ सारथि अश्व चपळ । मारिले तत्काळ शरघातें ॥ ६७ ॥ धनुष्य तोडोनि पाडिलें क्षिति । बाणतनय केला विरथी । मग तो गदा घेऊनि हातीं । साम्बाप्रति धाविन्नला ॥ ६८ ॥ येरें सवेग तीक्ष्ण शरीं । गदा छेदिली वरच्यावरी । बाणकुमर उरीं शिरीं । भेदूनि समरीं पाडियला ॥ ६९ ॥ सारणावरी प्रधानकुमर । अष्टही करिती शरांचा मार । येरें छेदूनि त्यांचे शर । शिरें सत्वर उडविलीं ॥ १७० ॥ बळरामाच्या माराभेणें । पळतां देखूनि आपुलीं सैन्यें । रथ सवेग लोटिला बाणें । क्रोधें दारुणें उठावला ॥ ७१ ॥

विशीर्यमाणं स्वबलं दृष्ट्वा बाणोऽत्यमर्षण: । कृष्णमभ्यद्रवत्संख्ये रथी हित्वैव सात्यकिम् ॥ १७ ॥

कुम्भाण्ड आणि कूपकर्ण । समरीं पडिले गतप्राण । रामकृष्णीं त्रासिलें सैन्य । देखोनि बाण प्रज्वळला ॥ ७२ ॥ अवगणूनिं युयुधानातें । कृष्णासम्मुख एक्या रथें । धांवता झाला क्रोधें बहुतें । तें नृपातें शुक सांगे ॥ ७३ ॥

धनूंष्याकृष्य युगपद्बाणः पंचशतानि वै । एकैकस्मिन्शरौ द्वौ द्वौ संदधे रणदुर्मदः ॥ १८ ॥

महा आवेश चढला आंगीं । नेत्रद्वारा उसळे आगी । धनुष्यें पांचशतें समरंगीं । सहस्रां हस्तीं सज्जियलीं ॥ ७४ ॥ एकैक चापीं दोन दोन शर । एकसंधानीं शर सहस्र । लघुलाघवें चमत्कार । दावूनि असुर गर्जिन्नला ॥ १७५ ॥ आंगीं चढला रणदुर्मद । म्हणे कृष्णातें सावध । मजसीं करीं निर्वाण युद्ध । दावीं प्रसिद्ध आंगवण ॥ ७६ ॥ मानवांमाजी प्रताप तुझा । जंव न भेटे झुंजार दुजा । स्फुरणें दाटल्या माझिया भुजा । भिडें पैजा तूं मजसीं ॥ ७७ ॥ सैन्यें मारिसी फलकटें । तेणें शौर्यें न मासी कोठें । दावीं परतूनियां मुखवटें । वेठें उद्भटें पुरुषार्थें ॥७८॥ एक संधानें सहस्र शर । सवेग वर्षे बाणासुर । बाणीं कोंदलें अंबर । यादववीर थरारिले ॥ ७९ ॥ बाण सुटती घनदाट । प्रळय विजांचे कडकडाट । समरीं पवना न फुटे वाट । हृदयस्फोट सुरासुरां ॥१८०॥ देखोनि बाणासुराचा यावा । शंका उपजली यादवा । म्हणती स्मरा बळकेशवां । दैत्यलाघवा लक्षूनी ॥ ८१ ॥ तिये समयीं जनार्दन । शार्ङ्गशिंजिनी टणत्कारून । निषंगांतूनि काढिला बाण । जैसा कृशान प्रळयींचा ॥८२॥

तानि चिच्छेद भगवान्धनूंषि युगपद्धरिः । सारथिं रथमश्वांश्च हत्वा शंखमपूरयत् ॥ १९ ॥

प्रतिसंधानीं सहस्र शर । दैत्य वर्षे निरंतर । एकेचि संधानें श्रीधर । तोडी सत्वर ते अवघे ॥ ८३ ॥ कोट्यनुकोटि दीपहारी । नाशी प्रचंड वातलहरी । कीं पर्वत पेटला तृणाङ्कुरीं । विझवी सुरसरी क्षणमात्रें ॥ ८४ ॥ तेंवि असुराचे सायक । धनुष्येंसहित यदुनायक । सवेग छेदूनि एकें एक । दाविलें कौतुक सुरासुरां ॥ १८५ ॥ बाणरथींचे अश्व चपळ । मारिले शरघातें तत्काळ । सारथियाचें छेदिलें मौळ । भंगिला समूळ रहंवर ॥ ८६ ॥ अश्वेंसहित सारथि वधिला । बाणीं रहंवर चूर्ण केला । बाणासुर विरथ झाला । कृष्णें स्फुरिला पाञ्चजन्य ॥ ८७ ॥ ऐकूनि कृष्णाच्या शंखस्फुरणा । जयरवें गर्जे यादवसेना । प्राणधाकें बाणपृतना । प्रमथगणासह पळती ॥ ८८ ॥ तये समयीं कैटभारि । बाणा बांधूं पाहे समरीं । विरथ निःशस्त्र सहसा न मारी । क्षात्रविचारीं परायण ॥ ८९ ॥ आसुरी विद्या बाणमाता । कोटरानामें जे विख्याता । देखूनि बाणाची अवस्था । पावली तत्वता तें ऐका ॥ १९० ॥

तन्माता कोटरा नाम नग्ना मुक्तशिरोरुहा । पुरोऽवतस्थे कृष्णस्य पुत्रप्राणपरीप्सया ॥ २० ॥

भयानक नग्नवेष । मुक्त लोहित मस्तकीं केश । बाण घालूनियां पृष्ठीस । आली कृष्णास ठाकुनी ॥ ९१ ॥ स्वपुत्र बाणासुराचे प्राण । वांचवावयाचे इच्छेकरून । सवेग कृष्णापुढें येऊन । ठाकली

नग्न कोटरा ॥ ९२ ॥ नग्न शरीर मोकळें भीस । सम्मुख येतां हृषीकेश । पाहों नये नग्नवनितेस । म्हणोनि अश्व परतवी ॥ ९३ ॥

ततस्तिर्यङ्मुखो नग्नामनिरीक्षन्गदाग्रजः । बाणश्च तावद्विरथश्छिन्नधन्वाऽविशत्पुरम् ॥ २१ ॥

तिर्यङ्मुख होतां हरि । विरथ निःशस्त्र बाण समरीं । प्राणधाकें शोणितपुरीं । अतिसत्वरीं प्रवेशला ॥ ९४ ॥ गदाचा अग्रज जो कां कृष्ण । तेणें पळतां देखूनि बाण । दैत्य प्रमथ भूतसैन्य । अवशिष्ट संपूर्ण त्रासिलें ॥ १९५ ॥ ऐकें राया कुरुनरेन्द्रा । जृंभणास्त्रें मोहिलें रुद्रा । विरथ निःशस्त्र बाणासुरा । सांडूनि समरा पळविलें ॥ ९६ ॥

विद्राविते भूतगणे ज्वरस्तु त्रिशिरास्त्रिपात् । अभ्यधावत दाशार्हं दहन्निव दिशो दश ।
अथ नारायणो देवस्तं दृष्ट्वा व्यसृजज्ज्वरम् ॥ २२ ॥

बळभद्राच्या मुसळप्रहारीं । कुम्भाण्ड कूपकर्ण पडले समरीं । शार्ङ्गनिर्मुक्त तीक्ष्णशरीं । सेना आसुरी विध्वंसिली ॥ ९७ ॥ दर्प बाणाचा गळाला । प्रमथभूतगण पळाला । यादवसमुदाय मिळाला । विजय साधिला बळकृष्णीं ॥ ९८ ॥ तये समयीं रौद्रज्वर । त्रिशिरा त्रिपाद प्रळयांगार । भंगला देखूनि शाम्भवभार । कृष्णासमोर उठावला ॥ ९९ ॥ दाही दिशा जाळील ऐसा । रौद्रज्वर सताप वळसा । यादवसैन्यामाजी आपैसा । हाहाकार ओढवला ॥ २०० ॥ वीर ज्वरें संतप्त झाले । कित्येक रथावरी लोटले । एक भूतळीं उलंडले । ज्वरें त्रासिले बहुसाल ॥ १ ॥ रौद्रज्वरें तापले बळी । कोणी कोणा न सांभाळी । मत्स्य जैसे निर्जलस्थळीं । तेंवि भूतळीं तळमळती ॥ २ ॥ यानें मोकळीं समरांगणीं । प्रेतप्राय योद्धे रणीं । कृष्णप्रद्युम्नसंकर्षणीं । ज्वर ते क्षणीं संचरला ॥ ३ ॥ गळालीं हातींचीं हतियारें । देह तापले रौद्रज्वरें । पाणी मागती दावूनि करें । न दिसे दुसरें जलदाना ॥ ४ ॥ बळरामाचा प्रताप प्रबळ । रौद्रज्वरें केला विकळ । गळालें हातींचें नांगर मुसळ । पडिला व्याकुळ ज्वरतापें ॥ २०५ ॥ त्रिजगज्जेता रणरंगधीर । त्या प्रद्युम्नाआंगीं ज्वर । संचरोनि केला किर । पडिला विसर शस्त्रांचा ॥ ६ ॥ जो दैत्यारि मधुसूदन । रौद्रज्वरें तापला पूर्ण । गळालें हातींचें धनुष्य बाण । सहित कृपाण कौमोदकी ॥ ७ ॥ चक्र उचलूं पाहे करीं । ज्वरें शक्ति नसे शरीरीं । परम संताप दाटला गात्रीं । पडती नेत्रीं जळबिंदु ॥ ८ ॥ वणवयाच्या जैशा वाफा । मुखीं नासिकीं तैसिया धापा । रौद्रज्वरें पावले तापा । समरप्रतापा आंचवले ॥ ९ ॥ ऐसा त्रिपाद त्रिशिरा ज्वर । जेणें त्रासिले रामश्रीधर । यादवसैन्यें सांडिला धीर । पडिले झुंझार ज्वरतापें ॥ २१० ॥ ऐसिये समयीं श्रीभगवान । ज्ञानीं पाहे जंव विवरून । रौद्रज्वराचें विंदान । अंतःकरणीं ओळखिलें ॥ ११ ॥ ज्वरें व्यापिले यादव समरीं । देखूनि नारायण दैत्यारि । वैष्णवज्वर उत्पन्न करी । अभ्यंतरीं योगबळें ॥ १२ ॥ संतापरूपी रौद्रज्वर । कृष्णें निर्मिला शीतज्वर । तेणें त्रासिला माहेश्वर । झाले विज्वर यदुवर्ग ॥ १३ ॥ उभय

ज्वरांमाजी रण । राया आरंभलें दारुण । तया दोघांची आंगवण । ऐकें श्रवणसौभाग्या ॥ १४ ॥

माहेश्वरो वैष्णवश्च युयुधाते ज्वरावुभौ । माहेश्वरः समाक्रंदन्वैष्णवेन बलार्दितः ॥ २३ ॥

माहेश्वरनामक ज्वर । त्रिशिरा त्रिपाद् भयंकर । एक द्व्याहिक त्र्याहिक अपर । चातुर्थिक सेनानी ॥ २१५ ॥ जीर्णज्वर अस्थिगत । नवज्वर काळज्वर संतत । वात पैत्तशैत्यजनित । मेहसंभूत असाध्य ॥ १६ ॥ कायिक वाचिक मानसिक । वियोगविरहज्वर सशोक । अशीति यूथपति मुख्य । क्षुद्र अनेक ज्वरसेना ॥ १७ ॥ ऐसा रौद्रज्वराचा भार । त्यावरी वैष्णव शीतज्वर । उठावला अतिसत्वर । दांत करकर खाऊनी ॥ १८ ॥ ग्रीष्मीं पर्वता प्रदीप्त वणवा । मातता तद्वत जंतुकणवा । भगवत्प्रेरित मेघ उठावा । करूनि धांवा विझवीत ॥ १९ ॥ किंवा प्रेतपूर्ण धरणी । देखूनि दैत्यां समराङ्गणीं । शुक्र प्रेरितां संजीवनी । सवेग चैतन्यीं विनियोजी ॥ २२० ॥ नातरी जैसा स्पर्शमणि । पालटी स्पर्शें लोह सुवर्णीं । तेंवि रौद्रज्वरें संतप्त रणीं । ते शीतळ केले वैष्णवें ॥ २१ ॥ वैष्णवज्वराचें बळ प्रचंड । रौद्रज्वर नुधवी तोंड । करूं पाहे खंडविखंड । पिंडब्रह्माण्ड व्यापुनी ॥ २२ ॥ वैष्णवज्वर बळें करून । रौद्रज्वरेंसीं करितां कदन । येरू आदरी पलायन । तंव निर्भय स्थान लक्षेना ॥ २३ ॥ पळोनि जावें जया ठायां । तेथ पाविजे महाभया । ऐसें हृदयीं जाणूनियां । मग यदुवर्या आश्रयिलें ॥ २४ ॥

अलब्ध्वाऽभयमन्यत्र भीतो माहेश्वरो ज्वरः । शरणार्थी हृषीकेशं तुष्टाव प्रयतांजलिः ॥ २४ ॥

लोकत्रयासी भयंकर । तो मी माहेश्वर ज्वर । वैष्णवज्वरें त्रासितां क्रूर । निर्भय अन्यत्र स्थळ न दिसे ॥ २२५ ॥ सर्व लोकांसी संतापकर्ता । यालागीं विश्वीं मम शत्रुता । ऐसिया मज अभयदाता । कोण तत्त्वता हों पाहे ॥ २६ ॥ एवं अन्यत्र न पवोनि अभय । ज्वर माहेश्वर भयभीत पाहे । सर्वेंद्रियाचा जो कां राय । शरण जाय तयाप्रति ॥ २७ ॥ स्वयें होऊनियां शरणार्थी । दीनवदनें कृष्णाप्रति । जाऊनि करिता झाला स्तुति । बद्धहस्तीं ते ऐका ॥ २८ ॥ परमविनीत नियतेन्द्रिय । अंजलिबद्ध करद्वय । श्रीकृष्णातें स्तविता होय । तें श्लोकचतुष्टय शुक वर्णी ॥ २९ ॥

ज्वर उवाच—नमामि त्वाऽनंतशक्तिं परेशं सर्वात्मानं केवलं ज्ञप्तिमात्रम् ।
विश्वोत्पत्तिस्थानसंरोधहेतुं यत्तद्ब्रह्म ब्रह्मलिंगं प्रशान्तम् ॥ २५ ॥

रौद्रज्वर श्रीकृष्णातें । तावूं गेला स्वसामर्थ्यें । तंव नारायणज्वरें त्यातें । संतापातें पावविलें ॥ २३० ॥ मग तो त्रिपाद् त्रिशिरा ज्वर । करिता झाला दीर्घ विचार । म्हणे श्रीकृष्ण परमेश्वर । आत्मा सर्वत्र सदोदित ॥ ३१ ॥ श्रीकृष्ण चिन्मात्र वस्तु एक । येर अवस्तु विवर्त अशेष । संकल्पजनित त्रिगुणात्मक । दृश्य मायिक जडभ्रांति ॥ ३२ ॥ त्यामाजी तमोगुणात्मा रुद्र । तज्जनित मी

त्रिशिरा ज्वर । माझी शक्ति कियन्मात्र । कृष्ण स्वतंत्र परमात्मा ॥ ३३ ॥ कृष्णास्तिक्यें जग आभासे । कृष्णप्रकाशें संवित् विलसे । कृष्णानंदें वेधकदशे । विषयीं भासे आनंद ॥ ३४ ॥ त्या कृष्णातें संतापपीडा । करितां तापलों मीचि रोकडा । त्यालागीं कृष्णप्रताप गाढा । नये पडिपाडा गौण तया ॥ २३५ ॥ ऐसें विवरूनि अंतःकरणीं । निर्भय स्थान कृष्णचरणीं । ज्वरें माहेश्वरें लक्षूनी । नमनीं स्तवनीं प्रवर्तला ॥ ३६ ॥ अचिन्त्यानंतशक्तिमंता । तूंतें नमितों श्रीभगवंता । सगुण होसी सुरकार्यार्थी परेशा परता परेश तूं ॥ ३७ ॥ ब्रह्मादि गुणत्रयांच्या मूर्ति । परेश ऐसें त्यांस म्हणती । त्यांची ही जे ईशनशक्ति । तिची प्रवृत्ति तव सत्ता ॥ ३८ ॥ येथ म्हणसी हेतु काय । तरी सर्वात्मा तूं सर्वमय । चराचर चेतयिता चिन्मय । स्फुट आम्नाय प्रकाशिती ॥ ३९ ॥ तेंही कैसें घडेल म्हणसी । तरी या विवर्तविश्वाभासीं । केवळ ज्ञप्तिमात्र तूं होसी । चैतन्यघन शुद्धात्मा ॥ २४० ॥ तोंचि सर्वत्र चेतयितार । तो तूं परिपूर्ण परमेश्वर । विश्वसृजनावनाप्ययकर । हेतु साचार सर्वांचा ॥ ४१ ॥ ऐसें ब्रह्म निर्गुण म्हणसी । मी तंव जन्मलों देवकीकुशी । तरी हें सहसा हृषीकेशी । प्राकृतासी न चाळवीं ॥४२॥ इत्यादि ईशनसामर्थ्यवंत । तत्ब्रह्म या पदें प्रस्तुत । केला श्रुतींहीं सिद्धान्त । इत्थंभूत परेशा ॥ ४३ ॥ म्हणसी ब्रह्म तें कैसें काय । तरी ब्रह्म वेदाचें नामधेय । वेदप्रतिपाद्य निरामय । जें अमळ अद्वय अविनाश ॥४४॥ तया अविनाशत्वा हेतु । सर्व विक्रियारहित प्रशान्त । यालागीं नेति मुखें सिद्धान्त । करूनि मौनस्थ श्रुति झाल्या ॥२४५॥ सविशेष आणि निर्विशेष । अप्रशान्त आणि प्रशान्त । अक्रिय आणि क्रियावंत । तूं या हेतु दोहींचा ॥ ४६ ॥ जेथवरी सविशेष वस्तु । तेथ प्रभवों आम्ही समस्त । तूं जो केवळ विशेषातीत । अप्रभूत अकारण ॥ ४७ ॥ समस्तांचा तूं प्रभविता । तुजवर नसे प्रभवनकर्ता । यालागीं सर्वप्रभु तूं तत्वता । समर्थ सत्तायोगबळें ॥ ४८ ॥ ज्ञप्तिमात्रत्व तुझें कैसें । यथामति तें कथिजेत असे । करुणानिधे कारुण्यवशें । तें तूं परिसें साकल्यें ॥ ४९ ॥

कालो दैवं कर्म जीवः स्वभावो द्रव्यं क्षेत्रं प्राण आत्मा विकारः ।
तत्संघातो बीजरोहप्रवाहस्त्वन्मायैषा तन्निषेधं प्रपद्ये ॥ २६ ॥

जें कां निर्गुणनिरामय । कोंवि वाणे तत्प्रत्यय । केवळ ज्ञप्तिमात्र जें होय । ऐक सोय तयाची ॥ २५० ॥ सत्तास्फुरणमात्र काळ । गुणक्षोभक जो केवळ । गुणक्षोभें कर्म अखिल । निमित्त शील सृजनादि ॥ ५१ ॥ यथाकाळें रजोगुण । क्षुब्ध होवोनि करी सृजन । तैसाचि यथाकाळें क्षोभून । सत्वगुण प्रतिपाळी ॥ ५२ ॥ रजें सृष्ट सत्वें पुष्ट । तमःक्षोभें तें प्रळयाविष्ट । एवं त्रिविध हें कर्म स्पष्ट । निमित्त श्रेष्ठ या म्हणती ॥ ५३ ॥ फळाभिमुख तेंचि कर्म । दैव ऐसें पावे नाम । स्वभाव एक विदुषोत्तम । म्हणती निस्सीम संस्कारा ॥ ५४ ॥ संस्कारवंत बोलिजे जीव । अविद्या विंबित चैतन्यप्रभव । चिदाभास हें ज्याचें नांव । वदती स्वमेव वेदान्ती ॥ २५५ ॥ यांत जीवाची स्पष्टता । द्रव्यें क्षेत्रें सूत्र अहंता । विकारेंसीं या संघाता । ऐक तत्वता पृथक्त्वें ॥ ५६ ॥ द्रव्यें अंतःकरणपंचका नाव ।

क्षेत्र शरीर सावयव । सूत्र प्राणांचा समुदाव । अहंभाव तो आत्मा ॥ ५७ ॥ विकार म्हणिजे इंद्रियें अकरा । सहित महाभूतांचिया निकरा । एतत्संघात तो देह खरा । प्रवाह अवधारा पैं याचा ॥ ५८ ॥ बीजरोहरूपें जाण । प्रवाह अखंड दंडायमान । उत्तरोत्तर कार्यकारण । सांख्य सर्वज्ञ जाणती ॥ ५९ ॥ कर्मसंस्कारवंत जीव । तत्कार्य देह सावयव । बीजामाजूनि अंकुरप्रभव । तेंवि सावयव स्थूळवपु ॥२६०॥ अंकुरपरिपाकीं बीज निफजे । बीजामाजूनि अंकुर उपजे । एवं मायाप्रवाह उमजे । तैसिये ओजे तुज कथिला ॥ ६१ ॥ ते हे प्रवाहरूप तुझी माया । तिचा निषेध म्हणिजे लया । जेथ जाय तया ठाया । ब्रह्माद्वया मी शरण ॥ ६२ ॥ तूं म्हणसी मी देवकीसुत । मज कां वर्णिसी एवंभूत । तरी सगुणविग्रह हा काय निमित्त । धरिला यथार्थ तें ऐका ॥ ६३ ॥

नानाभावैर्लीलयैवोपपन्नैर्देवान्साधूल्लोकसेतून्बिभर्षि ।
हंस्युन्मार्गान्हिंसया वर्तमानाञ्जन्मैतत्ते भारहाराय भूमेः ॥ २७ ॥

तरी निर्विशेषपदें ख्यात । सर्वोपाधिविनिर्मुक्त । ऐसाही तूं सुरकार्यार्थ । भाव अनंत अवगसी ॥ ६४ ॥ मत्स्यकच्छवराहप्रमुख । यथास्वलीला धरूनि वेष । देवा रक्षूनि देसी तोष । स्वधर्म विशेष स्थापूनी ॥ २६५ ॥ वर्णाश्रम धर्माचार । लोकसेतु हा उत्तरोत्तर । यांच्या लक्षणें चराचर । त्रिजग सामर पाळिसी ॥ ६६ ॥ निर्जरचक्ररक्षणासाठीं । वर्णाश्रमधर्मराहटी । अनुलक्षूनि तत्परिपाटी । लोकसेतूतें स्थापिसी ॥ ६७ ॥ लोकसेतूचें संरक्षण । ज्या योगें त्या अनुलक्षून । तदनुष्ठाते साधुजन । त्यांतें संपूर्ण रक्षिसी ॥ ६८ ॥ त्यांतें रक्षावयाकारणें । असाधु दैत्यांतें मारणें । सेतु भंगिती उत्पथाचरणें । हिंसकपणें निर्भय जे ॥ ६९ ॥ नानावतारीं युगीं युगीं । लीलेकरूनि ऐशिये भंगी । सुरवर साधु स्वधर्ममार्गी । रक्षूनि अमार्गी संहरिसी ॥ २७० ॥ तो हा तुझा लीलावतार । उत्पथभूभारहरणपर । साधु सन्मार्ग सह सुरवर । रक्षणीं सादर पैं यांचे ॥ ७१ ॥ तूं कोणाचा नव्हसी पुत्र । अथवा नव्हसी शत्रु मित्र । विरुद्धाविरुद्ध यथाचार । होती पात्र शुभाशुभा ॥ ७२ ॥ ऐसिया तूंतें न जाणून । करूं आलों तुजसी कदन । मनुष्यबुद्धि तुज भावून । सामर्थ्य पूर्ण प्रकटिलें ॥ ७३ ॥ माझें नाम रौद्रज्वर । जगत्त्रयातें संतापकर । करितां तव देहीं संचार । पावलों दुस्तर संताप ॥ ७४ ॥ तुझें ऐश्वर्य इत्थंभूत । आतां झालें प्रतीतिगत । म्हणोनि आलों शरणागत । रक्षीं अंकित स्वामिया ॥ २७५ ॥ रौद्रज्वर शरणागत । होवोनि कृष्णातें विनवीत । त्याची विनंति इत्थंभूत । सावध समस्त अवधारा ॥ ७६ ॥

तप्तोऽहं ते तेजसा दुःसहेन शांतोग्रेणात्युल्बणेन ज्वरेण ।
तावत्तापो देहिनां तेंऽघ्रिमूलं नो सेवेरन्यावदाशाऽनुबद्धाः ॥ २८ ॥

तुझिया तेजें करूनि तप्त । झालों म्हणोनि शरणागत । पातलों मी तवाङ्कित । रक्षीं निवान्त निज शरण ॥ ७७ ॥ तुझें तेज नारायणा । दुःखें साहों न शके कोणा । तेणें तापलों करुणाघना ।

रक्षीं शरण्या शरणार्ते ॥ ७८ ॥ माझ्या तेजें न तपती कोणी । तूं कां करिसी एव्हडी ग्लानि । तरी ऐकावें चक्रपाणि । माझी करणी मज बाधी ॥७९॥ तूं सच्चिदानंदघन । जैसा सुरद्रुम सुखसंपन्न । फळे कामितयाचे इच्छेकरून । नाहीं दूषण त्या आंगीं ॥२८०॥ कामितां कल्याणेच्छा करी । तो त्या फळे तैसिया परी । अनिष्ट इच्छा ज्या अंतरीं । फळे निर्धारीं त्या तैसा ॥ ८१ ॥ तेंवि तवाङ्गीं नसे ताप । परंतु म्यां दीधला संताप । त्याचें फळही तदनुरूप । यथासंकल्प पावलों ॥ ८२ ॥ त्वां जो सृजिला वैष्णवज्वर । तोंचि तव तेज साचार । अग्नीं शान्त पश्चात् क्रूर । शीतज्वर ज्या म्हणती ॥ ८३ ॥ तेणें तापलों बहुसाळ । प्राण होताती व्याकुळ । तुजवीण नसे निर्भय स्थळ । रक्षीं कृपाळशिरोमणे ॥ ८४ ॥ म्हणसी परसंतापक जे होती । संताप देणें त्यां तदुचिती । हेंही यथार्थ जी श्रीपति । परि सेवकांप्रति अनुचित ॥ २८५ ॥ जंववरी तुझें चरणारविंद । न सेवितां प्राणिवृंद । आशापाशीं झाले बद्ध । संतापखेद तंववरी त्यां ॥ ८६ ॥ मी स्वामीच्या चरणकमळा । शरण आलों श्रीगोपाळा । कृपापाङ्गें वर्षोनि जळा । तापा वेगळा मज रक्षीं ॥ ८७ ॥ ऐशा रौद्रज्वराच्या उक्ति । ऐकूनि कृपाळु कमलापति । काय बोलिला तयाप्रति । तें तूं कुरुपति अवधारीं ॥ ८८ ॥

श्रीभगवानुवाच—त्रिशिरस्ते प्रसन्नोऽहं व्येतु ते मज्ज्वराद्भयम् ।
यो नौ स्मरति संवादं तस्य त्वन्न भवेद्भयम् ॥ २९ ॥

हरि म्हणे रे महाक्रूरा । त्रिशिरानामक रौद्रज्वरा । तुझी ऐकूनि स्तवनगिरा । प्रसन्न झालों ये काळीं ॥ ८९ ॥ माझे आज्ञेचें पाळण । करूनि स्वेच्छा वर्ते पूर्ण । आज्ञापालक तुज देखून । न करी विघ्न मम ज्वर ॥ २९० ॥ म्यां तुज दीधलें पूर्ण अभय । यावरी मम ज्वर न करी भय । आज्ञा पाळूनि लोकत्रय । विचरें निर्भय होत्साता ॥ ९१ ॥ कोणती आज्ञा ऐसें पुससी । तरी ऐकावें इयेविषीं । तुझा आमुचा जे इतिहासीं । संवाद झाला जो आतां ॥ ९२ ॥ तया इतिहासाचें श्रवण । अथवा हृदयीं करील स्मरण । तयासी भय तुजपासून । सहसा जाण न व्हावें ॥ ९३ ॥ जेंवि तूं झालासि मत्पदशरण । तैसे देखून प्रणत जन । त्यांतें संताप देखून । आज्ञापाळण हें कीजे ॥ ९४ ॥ ऐशिया ऐकूनि श्रीकृष्णबोला । रौद्रज्वर निर्भय झाला । पुढें वृत्तान्त जो वर्तला । तो भूपाळा अवधारीं ॥ २९५ ॥

इत्युक्तोऽच्युतमानम्य गतो माहेश्वरो ज्वरः । बाणस्तु रथमारूढः प्रागाद्योत्स्यञ्जनार्दनम् ॥ ३० ॥

कृष्णें आज्ञापिला ज्वर । करूनि अच्युता नमस्कार । जाता झाला अतिसत्वर । माहेश्वरनामक जो ॥ ९६ ॥ कृष्णनाम ज्यांचिये वाचे । हृदयीं कृष्णध्यान ज्यांचे । कृष्णभजनीं तत्पर साचे । दास्य त्यांचें मज उदित ॥ ९७ ॥ एवं ज्वराची संपली कथा । तंव बाणासुरें ऐकिली वार्ता । ज्वरें यादवां दिधली व्यथा । विकळ सर्वथा वीर पडिले ॥ ९८ ॥ ऐसिये समयीं समराङ्गणा । जाऊनि धरावें रामकृष्णां । मग समस्ता यादवगणा । बांधिजे तृणापडिपाडें ॥ ९९ ॥ ऐसा करूनि दृढ विचार ।

रथीं चढला बाणासुर । कृष्णाप्रति अतिसत्वर । झाला तत्पर युद्धासी ॥ ३०० ॥ प्रमथ म्हणती बाणासुरा । हर्षे प्रार्थूनियां शंकरा । युद्धीं निववी बाहुभारा । ऐसिया वीरा याचिलें ॥ १ ॥ तो वर आजि सफळ झाला । इच्छे सारिखा वीर आला । कंडू वर्ते तव भुजांला । करितो वाहिला प्रशान्त ॥ २ ॥ ध्वज भंगूनि पडिला क्षिती । तेव्हांचि फळली शिववरोक्ति । आतां जाऊनि समराप्रति । इच्छा पुरी करीं आपुली ॥ ३ ॥ तव रक्षणा गेला शिव । तोही पावला पराभव । यादवीं भंगिले महाशाम्भव । हा गौरव तव वरें ॥ ४ ॥ ऐसें नोकिती प्रमथगण । तें ऐकोनि क्षोभला बाण । पाचारूनि जनार्दन । दावी आंगवण ते ऐका ॥ ३०५ ॥

ततो बाहुसहस्रेण नानायुधधरोऽसुरः । मुमोच परमक्रुद्धो बाणांश्चक्रायुधे नृप ॥ ३१ ॥

सहस्र बाहूंचीं पृथग्विधें । रथीं घालूनि दिव्यायुधें । पांच शत धनुष्यें मौर्वीबद्धें । वाहूनि क्रोधें उठावला ॥ ६ ॥ एकेच समयीं सहस्र शर । चक्रधरावरी बाणासुर । विंधिता झाला परम क्रूर । म्हणे सधीर हो समरीं ॥ ७ ॥ दैत्य मायाप्रयोगास्त्रें । कृष्णावरी टाकिती निकरें । तितुकीं छेदिलीं कमलामित्रें । कोण्या प्रकारें तें ऐका ॥ ८ ॥

तस्यास्यतोऽस्त्राण्यसकृच्चक्रेण क्षुरनेमिना । चिच्छेद भगवान्बाहूञ्शाखा इव वनस्पतेः ॥ ३२ ॥

अनेक अस्त्रें अनेक शस्त्रें । बाणें प्रेरितां आसुरी मंत्रें । एकेच समयीं कमलामित्रें । छेदिलीं चक्रें अतितीक्ष्णें ॥ ९ ॥ क्षुरनेमि सहस्रार । प्रळयकाळींचा जेंवि भास्कर । श्रीकृष्णाचे आज्ञानुसार । समरीं तत्पर रणरासिक ॥ ३१० ॥ तया सुदर्शनचक्रा हरि । आज्ञा करूनि प्रेरी समरीं । अस्त्रें छेदूनि वरिच्या वरी । बाणशरीरीं संघटलें ॥ ११ ॥ सहस्र शस्त्रें परजूनि बाण । करूं पाहे निवारण । पावकीं पडतां जैसें तृण । गेलीं जळोन तेंवि शस्त्रें ॥ १२ ॥ गरगरां देवोनि भंवती भंवरी । बाणबाहूंचें खंडन करी । भंवते पनळ गळती रुधिरीं । असुर अंतरीं चाकाटला ॥ १३ ॥ चक्रा निवारण न चले कांहीं । बाहु तुटोनि पडती मही । दुजा कैपक्षी समरीं नाहीं । तैं आठवी हृदयीं शिवचरणां ॥ १४ ॥ वनस्पतीच्या जैशा शाखा । छेदितां महीवरी पडती देखा । बाणबाहूंचा तोचि लेखा । पडली मुखा दांतखिळी ॥ ३१५ ॥ आंगीं भयाची धडकी भरली । रणमदाची उठी उतरली । वीरश्रियेची अहंता गेली । पडली भुली शस्त्रास्त्रां ॥ १६ ॥ तये समयीं शंकरगौरी । स्मरता झाला अभ्यंतरीं । म्हणे माझी मज वैखरी । ऐसिये परी फळा आली ॥ १७ ॥ बाणें अंतरीं करितां स्मरण । भक्तकारुण्यें कळवळून । द्रवलें शिवाचें अंतःकरण । तें प्रकरण अवधारा ॥ १८ ॥

बाहुषु च्छिद्यमानेषु बाणस्य भगवान्भवः । भक्तानुकंप्युपव्रज्य चक्रायुधमभाषत ॥ ३३ ॥

चक्र खंडित असतां पाणि । शंकरें जाणोनि अंतःकरणीं । भक्तकारुण्यें कळवळूनी । मूर्छना

वारूनि उठावला ॥ १९ ॥ सावध होवोनि पाहे निरुतें । तंव सुदर्शन भंवे बाणाभंवतें । बाणबाहूंचीं खंडित शतें । जाणोनि चित्तें कळवळिला ॥ ३२० ॥ जृंभणास्त्राची मूर्छना गेली । भक्तकारुण्यें कृपा उदेली । सवेग येवोनि कृष्णा जवळी । स्तुति आदरिली ते ऐका ॥ २१ ॥ भक्तानुकंपी पार्वतीरमण । चक्रायुधाप्रति येऊन । भक्तरक्षणार्थ मृदुभाषण । स्वमुखें स्तवन आदरिलें ॥ २२ ॥

श्रीरुद्र उवाच– त्वं हि ब्रह्म परं ज्योतिर्गूढं ब्रह्मणि वाङ्मये। यं पश्यंत्यमलात्मान आकाशमिव केवलम् ॥३४॥

भो भो स्वामी चक्रायुधा । नेणोनि तुझिया वास्तव बोधा । बाण समरीं पावला युद्धा । ऐश्वर्य प्रबुद्धा हें न वटे ॥ २३ ॥ कां पां चित्र हें नव्हे म्हणसी । तरी ऐकावें इयेविशीं । तुझें गूढत्व शब्द-ब्रह्मासी । म्हणोनि वेदासी मौनमुद्रा ॥ २४ ॥ नामरूपवाच्यमान । वाङ्मयब्रह्मीं तच्छंसन । तूं अनाम अरूप अवाच्य पूर्ण । ब्रह्मनिर्गुण अविषय ॥ ३२५ ॥ नाम रूप करणविषय । ध्येय चिंत्य मनोविषय । तूं अचिन्त्य अप्रमेय । ब्रह्म वाङ्मय न प्रकटी ॥ २६ ॥ ज्ञानगम्य जें जें झालें । नेति मुखें तें निगमीं त्यजिलें । अगम्य अगोचर ब्रह्म उरलें । गूढ राहिलें निगमींही ॥ २७ ॥ अगोचर कैसें म्हणसी जरी । तरी परंज्योति या श्रुतिनिर्धारीं । ज्योतिषांतेंही प्रकाशकारी । स्वप्रकाश स्वतः सिद्ध ॥ २८ ॥ सूर्य-प्रमुखें ज्योतिर्मयें । तूतें प्रकाशूं शकती काये । तवाङ्गप्रभेच्या अन्वयें । ज्यांची सोय जग जाणे ॥२९॥ यालागीं परंज्योतिपदें । वाङ्मय ब्रह्म तूतें वदे । तरी कें भजती योगिवृंदें । प्रतीति नांदे त्यां कैसी ॥३३०॥ ब्रह्म प्रतीतिगोचर नाहीं । तरी नास्तिक्य सर्वां ठायीं । ऐसें न म्हणें शेषशायी । हेतु तद्विषयीं अवधारीं ॥ ३१ ॥ विशुद्धमानस जे अमलात्मे । ज्यातें पाहती अमळप्रेमें । केवळ आकाशाचिये प्रतिमे । अभ्यासनियमें अनुभविती ॥ ३२ ॥ एवं निर्गुणस्वरूप ज्ञान । असो सर्वांसी अगम्यमान । विराटविग्रह लीलेकरून । धरिला सगुण तो न कळे ॥ ३३ ॥ सगुण असोनि कां पां न कळे । तरी ऐकावें अंबुदनीळें । उदुंबरवृक्षासि अनेक फळें । जंतु मोकळे फळगर्भी ॥ ३४ ॥ उदुंबरफळांत अंतर्वर्ती । मशकां गोचर तत्प्रतीति । अनेक फळगर्भींची ज्ञप्ति । ते त्यांप्रति अगोचर ॥ ३३५ ॥ एवं महदल्पक-पर्यायें । विराटरूप श्लोकद्वयें । वाखाणूनि स्तविता होये । तें कुरुरायें परिसावें ॥ ३६ ॥

नाभिर्नभोऽग्निर्मुखमंबु रेतो द्यौः शीर्षमाशाः श्रुतिरंघ्रिरुर्वी ।
चंद्रो मनो यस्य दृगर्क आत्मा अह समुद्रो जठरं भुजेन्द्रः ॥ ३५ ॥
रोमाणि यस्यौषधयोऽबुवाहाः केशा विरिंचो धिषणा विसर्गः ।
प्रजापतिर्हृदयं यस्य धर्मः स वै भवान्पुरुषो लोककल्पः ॥ ३६ ॥

शिव म्हणे तव सगुण रूप । महत् म्हणिजे समष्टिकल्प । त्यांमाजी आम्ही व्यष्टि अल्प । मशकरूप उदुंबरीं ॥ ३७ ॥ अखिल ब्रह्माण्डमय समष्टि । त्यामाजी जीव अल्प व्यष्टि । जीवां केंवि तुझी गोष्टी । अवगमे दृष्टी साकल्यें ॥ ३८ ॥ समष्टिस्वरूप म्हणसी कैसें । वेदें विवरण केलें जैसें ।

तेंचि तुझिया कृपावशें । स्तवनमिषें निरोपितों ॥ ३९ ॥ तुझा नाभि म्हणिजे गगन । वैश्वानर तुझें वदन । तुझें रेत तें जीवन । बीज संपूर्ण त्रिजगाचें ॥ ३४० ॥ सुरलोक तें उत्तमाङ्ग । तुझे श्रवण ते दिग्विभाग । चरण केवळ हा भूभाग । नेत्र भग सोम मन ॥ ४१ ॥ आत्मा म्हणिजे अहंकार । तो प्रत्यक्ष मी शङ्कर । बाहु तुझे सर्व इंद्र । लोकेश्वर पृथक्त्वें ॥ ४२ ॥ समुद्र जठर ओषधि रोम । मेघ ते मस्तकींचे केशोद्गम । विरंचि तव बुद्धीचें नाम । विसर्गाराम प्रजापति ॥ ४३ ॥ अपान मलोत्सर्गे निर्ऋति । तुझें हृदय धर्ममूर्ति । एवं ब्रह्माण्ड अवयवव्यक्ति । लोकप्रतीति लोकात्मा ॥ ४४ ॥ आत्मा म्हणिजे तें शरीर । एवं अवयें सचराचर । व्यष्टि जीवलोकाकार । समष्टि समग्र तूं एक ॥ ३४५ ॥ जरी तूं म्हणसी परमेश्वरा । प्रादेशमात्र मम शरीरा । माजी पवाड चराचरा । कैंवि हे गिरा बोलतसां ॥ ४६ ॥ प्रादेशमात्र शरीर सान । त्याची नाभि म्हणतां गगन । दिशा श्रोत्र सूर्य नयन । चंद्रमा मन कैंवि घडे ॥ ४७ ॥ तरी ऐकें गा अकुंठधामा । तुझी अच्युत स्वरूपगरिमा । स्वधर्मसेतुरक्षणकामा । पुरुषोत्तमा अवतरसी ॥ ४८ ॥

तवावतारोऽयमकुंठधामन्धर्मस्य गुप्त्यै जगतो भवाय ।
वयं तु सर्वे भवतानुभाविता विभावयामो भुवनानि सप्त ॥ ३७ ॥

जगाचिया कल्याणार्थ । रक्षावया धर्मपथ । तुझा अवतार हो येथ । हें यथार्थ मी जाणें ॥ ४९ ॥ जगत्कल्याण इतुकेंचि न म्हणें । आमुच्या अनुग्रहाही कारणें । सगुण विग्रह तुझें धरणें । आणि पाळणें लोकपाळां ॥ ३५० ॥ आम्हां लोकपाळां पाळिलें तुम्हीं । सप्त भुवनांतें पाळूं आम्ही । येथ आशंका न करीं स्वामी । पृथक पाळक म्हणवोनियां ॥ ५१ ॥ जरी तूं म्हणसी जनार्दना । पाल्यमाना समस्त भुवना । समर्थ लोकपाळ तुम्ही पाळणा । तरी मज कां म्हणाल ब्रह्मा ऐसें ॥ ५२ ॥ सजातीय विजातीय स्वगत । ब्रह्मीं भेद हे असंभावित । ऐसें म्हणसी तरी हे मात । ऐकें यथार्थ जगदीशा ॥ ५३ ॥

त्वमेक आद्यः पुरुषोऽद्वितीयस्तुर्यः स्वदृग्घेतुरहेतुरीशः ।
प्रतीयसेऽथापि यथाविकारं स्वमायया सर्वगुणप्रसिद्ध्यै ॥ ३८ ॥

सजातीयरहित तूं एक । कैसा म्हणसी तरी आइक । केवळ पुराण आदिपुरुष । तोही विशेष अवधारीं ॥ ५४ ॥ उत्पत्ति स्थिति आणि संहार । अवस्थात्रयवंत पुरुषमात्र । त्यांहूनि आद्य तूं स्वतंत्र । केवळ सन्मात्र सदोदित ॥ ३५५ ॥ प्रकृतिभूत पुरुष म्हणणें । तो तूं तुरीय साक्षी जाणें । न वेंठसी प्रवृत्तिभरणें । याकारणें विशुद्ध तूं ॥ ५६ ॥ तोही विशुद्ध कैसा म्हणसी । तरी स्वप्रकाशक ज्ञानराशि । जो प्रसवे स्वप्रातिबिंबासी । उपाधियोगेंसी जीवपुरुषां ॥ ५७ ॥ अग्निपासून विस्फुलिंग । उपाधियोगें उठती अनेग । तेंवि आत्मस्वरूपीं मायायोग । होतां प्रसंग जीवदशे ॥ ५८ ॥ मायायोगें आत्मस्वरूपीं

अनेक जीव व्यष्टिरूपी । सजातीयादिभेदविकल्पीं । पुण्यपापीं निबद्ध ।। ५९ ।। तूं केवळ अद्वितीय । भेदरहित अप्रमेय । सजातीय विजातीय । भेद अन्वय तुज नाहीं ।। ३६० ।। भेद नाहीं कां पां म्हणसी । तूं सर्वांचा हेतु होसी । स्वयें अहेतु निर्विशेषीं । तुज कायसी भेदकुटी ।। ६१ ।। तूं जरी म्हणसी प्रतिशरीरीं । जीवभेद कवणेपरी । प्रतीतिगोचर होती तरी । तें अवधारीं जगदीशा ।। ६२ ।। इंधन व्यापूनि हुताशन । दहन पचन प्रकाशन । करी तैसाचि तूंही जाण । प्रकटिसी गुण स्वप्रकाशें ।। ६३ ।। जीवावच्छिन्न चैतन्यमात्र । स्वप्रत्ययें कवळिसी गात्र । तैं करणज्ञानें विषयपात्र । होसी स्वतंत्र असतांही ।। ६४ ।। एवं विषयप्रकाशना । जीवभेद अवगसी नाना । येथ तूं म्हणसी भव-निमग्ना । सांसारिकासम मीही ।। ३६५ ।। ऐसें सहसा न म्हणें हरि । दृष्टान्तरूपें मम वैखरी । वदते तेंही श्रवण करीं । असंसारी बोधावया ।। ६६ ।।

यथैव सूर्यः पिहितश्छायया स्वया छायां च रूपाणि च सचकास्ति ।
एवं गुणेनापिहितो गुणांस्त्वमात्मप्रदीपो गुणिनश्च भूमन् ।। ३९ ।।

मेघरूप जे सूर्यच्छाया । सूर्याप्रति आच्छादूनियां । अपरदृष्टीच्या ज्ञानविषया । लोपक ऐसी भासतसे ।। ६७ ।। तथापि मेघच्छायेकरून । सूर्या नोहे तिरोधान । कैसें म्हणसी तें लक्षण । सावधान अवधारीं ।। ६८ ।। सूर्य स्वच्छायाच्छादित झाला । तऱ्ही प्रकाशी त्या मेघाला । तदंतारितपदार्थाला । स्वआस्तिक्यें प्रकाशी ।। ६९ ।। सूर्य निःशेष नाहींच होता । तरी कें मेघां दावूं शकता । घटमठादि-पदार्थां वहुतां । प्रकाशकता मग कैंची ।। ३७० ।। तूंही स्वगुणें याचि प्रकारें । जीवात्मदेहात्माहंकारें । छादित अतज्ज्ञ मानिती खरें । परि त्यां न स्फुरें तव तेज ।। ७१ ।। आच्छादिलें हें जाणती । त्या जाणण्याची प्रकाशशक्ति । पृथक्त्वादि गुणप्रवृत्ति । प्रकाशती तव तेजें ।। ७२ ।। स्वप्नामाजी कोण्ही मेला । तो मरणाचा प्रकाशक झाला । तेंवि तूं सन्मात्र स्वकार्याला । आवृत गमसी अनावृत ।। ७३ ।। कोण्ही उन्मत्त द्रव्य सेवी । तो भुलला उपाधिभावीं । परि मी भुललों हे स्वजीवीं । प्रतीति ठावी कीं ना त्या ।। ७४ ।। एवं उपाधिअंतर्गत । स्वप्रकाशें सदोदित । आत्मसन्मात्र तूं संतत । तुज कें लिप्त संसार ।। ३७५ ।। सर्व साक्षी सर्वातीत । असंग अद्वय अनासक्त । त्या तुज संसाराची मात । कोणें किमर्थ वदिजेल ।। ७६ ।। भूमन् भो भो अपरिच्छिन्ना । तुझा आश्रय मायागुणा । माया भुलवी गौणजना । तुझिया आश्रयें करूनियां ।। ७७ ।। तवाश्रयें त्रिजग मोही । गुणावृत जीवा संसारडोहीं । बुडवितो तुज संसार नाहीं । म्हणणें कांहीं लागतसे ।। ७८ ।। तवाश्रयें माया भुलवी जना । द्योतूनि गुणात्मकाभिमाना । कैसी ते तूं जनार्दना । सावधान अवधारीं ।। ७९ ।।

यन्मायामोहितधियः पुत्रदारगृहादिषु । उन्मज्जति निमज्जंति प्रसक्ता वृजिनार्णवे ।। ४० ।।

ज्या तव मायेच्या मोहें । मोहितबुद्धि झाले देहें । पुत्रदारधनादिगेहें । दुःखसागरीं बुडताती

॥ ३८० ॥ आपण देहमात्र झाले । धनसुतवनितागृहें मोहिले । तदासक्तीस्तव बुडाले । दुःखसागरीं गुणबद्ध ॥ ८१ ॥ वृजिनार्णव हा परम गहन । यामाजी लोकत्रय निमग्न । उफळताति तळीं बुडून । पुन्हा उफळूनि बुडताती ॥ ८२ ॥ म्हणाल उफळणें बुडणें कैसें । तरी शुद्धसत्वात्मककर्मवशें । देवयोनि पाविजेत असे । उन्मज्जन तें ऊर्ध्वगति ॥ ८३ ॥ पुन्हा पुण्यक्षयाचे अंतीं । निमज्जन ते अधोगति । तिर्यग्योनीमाजी वसती । ते मज्जती अंधतमीं ॥ ८४ ॥ वायुपुराणींची संमति । विपर्ययश्च भवति । ब्रह्मत्वस्थावरत्वयोरिति । अधोर्ध्वगति परस्परें ॥ ३८५ ॥ ब्रह्मप्राप्ति पावला पूर्ण । म्हणतां पावे आरूढ पतन । कर्मक्षयान्तीं ऊर्ध्वगमन । तिर्यग्जंतु पैं लाहती ॥ ८६ ॥ कर्मक्षयान्तीं तिर्यग्जंतु । निःशेष ऊर्ध्वग ब्रह्मीभूत । ब्रह्मनिष्ठही विषयासक्त । आरूढ पतित होताती ॥ ८७ ॥ एवं तव मायामोहित । दुःखार्णवामाजी पतित । उन्मज्जत निमज्जत । तें हें समस्त निरूपिलें ॥ ८८ ॥ एवं समष्टिव्यष्टिकल्प । जीवेश्वरांचें व्यवस्थारूप । निरूपूनियां अल्पस्वल्प । अभक्त निष्पाप निंदीतसे ॥ ८९ ॥

देवदत्तमिमं लब्ध्वा नृलोकमजितेंद्रियः । यो नाद्रियेत त्वत्पादौ स शोच्यो ह्यात्मवंचकः ॥ ४१ ॥

देवदत्त कोण्ही एक । पूर्वकर्मांचा परिपाक । भोगवावया तत्प्रेरक । कर्माध्यक्ष जो कां तूं ॥ ३९० ॥ त्याच्या कर्मांच्या परिपाकें । अधोगतीचीं भोगिती दुःखें । ऊर्ध्वउन्मज्जनावेशें । दिधलें संतोषें नरदेहा ॥ ९१ ॥ तो हा नरदेह पावूनि मूढ । तव पदकंज न भजे दृढ । आत्मवंचक तो शोकारूढ । होवोनि अवघड दुःख भोगी ॥ ९२ ॥ किमर्थ शोकारूढ म्हणसी । तरी कारण ऐक इयेविषीं । अमृत सांडूनि विषातें प्राशी । मूळ दुःखासी तेंचि नव्हे ॥ ९३ ॥

यस्त्वां विसृजते मर्त्य आत्मानं प्रियमीश्वरम् । विपर्ययेंद्रियार्थार्थं विषमत्त्यमृतं त्यजन् ॥ ४२ ॥

आत्मा सच्चिदानंदघन । प्रियतम जो तूं ईश्वर पूर्ण । त्या तूंतें जो विसर्जून । विपरीत ज्ञान अवलंबी ॥ ९४ ॥ विपरीत ज्ञानें काय केलें । तुज हृदयस्था अंतरविलें । इंद्रियीं विषय जे दाविले । सुख भाविलें तद्योगें ॥ ३९५ ॥ देह गेह वधू धन क्षेत्र । एवं अवघेंचि दृश्यमात्र । सुखार्थ मानूनि हें सर्वत्र । जो होय पात्र क्लेशाचें ॥ ९६ ॥ विपरीतज्ञानें विपरीत केलें । आत्मया हृदयस्था विसरविलें । नश्वरां विषयांतें भजविलें । ऐसें उमजलें त्यां नाहीं ॥ ९७ ॥ तो मग टाकूनि परमामृता । विषयविषातें होय सेविता । वधूसुत देहगेहां भजतां । शोकावर्तामाजी पडे ॥ ९८ ॥ असो तयाची किमर्थ गोठी । विशुद्धमानस मुनिजन सृष्टि । मी ब्रह्मा आणि विबुधकोटी । करूं राहटी ते ऐका ॥ ९९ ॥

अहं ब्रह्माऽथ विबुधा मुनयश्चामलाशयाः । सर्वात्मना प्रपन्नास्त्वामात्मानं प्रेष्ठमीश्वरम् ॥ ४३ ॥

मी ब्रह्मा आणि विबुद्ध मुनि । विशुद्धमानस तव चिंतनीं । वृत्तिसमुच्चय एकवटूनी । तवपदभजनीं अनुसरलों ॥ ४०० ॥ तो तूं आत्मा सच्चिद्घन । प्रियतम ईश्वर सुखनिधान । ऐसिया तूंतें

होवोनि शरण । विषयभवभान नातळों ॥ १ ॥ करूनि अभक्तां धिक्कार । देऊनि स्वकीयां परिहार । भगवंतावीण भजनीय अपर । नसे हें रुद्र प्रतिपादी ॥ २ ॥

तं त्वा जगत्स्थित्युदयांतहेतु समं प्रशान्तं सुहृदात्मदैवम् ।
अनन्यमेकं जगदात्मकेतं भवापवर्गाय भजाम देवम् ॥ ४४ ॥

ऐसा जो तूं प्रकाश आत्मा । सुखतम सुसेव्य भूतग्रामा । तूतें आम्ही पुरुषोत्तमा । कल्याणार्थ भजतसों ॥ ३ ॥ कल्याण म्हणसी कवणेपरी । इहामुष्मिक भवव्यापारीं । अपायरहित निजाधिकारीं । वर्तत असतां क्षेमार्थ ॥ ४ ॥ अपवर्ग म्हणिजे स्वरूपबोध । मायावरण न पवे रोध । गुणव्यापारीं वर्ततां शुद्ध । स्वसंवेद्य निर्लेप ॥ ४०५ ॥ अथवा भवाचा निरास । अपवर्ग ऐसें म्हणिजे त्यास । तदर्थ आम्ही तव पदास । होवोनि दास भजतसों ॥ ६ ॥ तुम्ही गुणकार्यी समर्थ । असतां मद्भजन किमर्थ । ऐसें म्हणसी तरी हा अर्थ । इत्थंभूत अवधारीं ॥ ७ ॥ जगाची स्थिति उदय अंत । त्या तिहींचा तूंचि हेत । सम म्हणिजे विषमातीत । विश्वीं संतत वर्तसी ॥ ८ ॥ समत्वाचें कारण काय । प्रशान्तपदें बोलिलें होय । सुसेव्य म्हणिजे सुष्ठु हृदय । कैसें काय तें ऐका ॥ ९ ॥ सुहृत्वबुद्धीचा प्रवर्तणार । आत्मा सर्वात्मक साचार । एवंभूत जो ईश्वर । देव परतर तूं एक ॥ ४१० ॥ त्या तुज ईश्वराविण कोण । पृथक् भजनीय असे आन । नास्ति ऐसा निश्चय पूर्ण । तो तूं अनन्य एकात्मा ॥ ११ ॥ समानासमान-जातिरहित । तूं अखिलात्मा सर्वगत । कैसा म्हणसी तरी तो अर्थ । ऐक निश्चित जगदीशा ॥ १२ ॥ जगाचें आणि आत्मयाचें । निकेत म्हणिजे स्थान साचें । एवं अधिष्ठान तूं सर्वांचें । आन कैचें तुजवीण ॥ १३ ॥ विवर्तरूप जें हें जग । चिदाभास आत्मे अनेग । यांचें अधिष्ठान तूं चांग । त्या तुज अव्यंग भजों आम्ही ॥ १४ ॥ भवापवर्गाचि कारणें । ऐसिया तूतें आम्ही भजणें । एवं तव पदाराधनें । आमुचीं वर्तनें सफळित पैं ॥ ४१५ ॥ स्वयें इच्छूनि हा भक्तिप्रेमा । यावरी भक्ताच्या अभीष्टकामा । प्रार्थितसे पुरुषोत्तमा । कुरुसत्तमा तें ऐक ॥ १६ ॥

अय ममेष्टो दयितोऽनुवर्ती मयाऽभयं दत्तममुष्य देव ।
संपाद्यतां तद्भवतः प्रसादो यथा हि ते दैत्यपतौ प्रसादः ॥ ४५ ॥

श्रीकृष्णा हा बाणासुर । माझा इष्ट प्रियतम फार । प्रणत मद्भजनीं सादर । केवळ अनुचर मन्निष्ठ ॥ १७ ॥ ऐसियातें सर्वांपरी । अभय दिधलें म्यां श्रीहरि । तूंही तेंचि यथार्थ करीं । प्रसाद मजवरी करूनियां ॥ १८ ॥ तुझिया प्रसादाचें पात्र । जाणोनि हा बाणासुर । प्रसन्न होवोनि माझा वर । करीं साचार प्राग्दत्त ॥ १९ ॥ माझिया प्रसादा भाजन । तूं जरी म्हणसी कैसा बाण । यदर्थी पूर्वपरिज्ञान । देतों स्मरण करूनियां ॥ ४२० ॥ प्रह्राद तुझा अनन्य भक्त । त्याच्या ठायीं तव प्रसाद नित्य । बाण त्याचाचि प्रपौत्र सत्य । जाणोनि स्वाङ्कित कृपा करीं ॥ २१ ॥ प्रह्रादाच्या ठायीं

जैसा । तुझा प्रसाद द्वारकाधीशा । बाणावरीही करीं तैसा । जाणोनि स्वदासांमाजि आपुल्या ॥ २२ ॥ म्यां बाणातें दिधलें अभय । तें संरक्षीं कृपाळु होय । ऐसें प्रार्थितां गिरिजाप्रिय । श्रीकृष्ण काय बोलतसे ॥ २३ ॥

श्रीभगवानुवाच – यदात्थ भगवंस्त्वन्नः करवाम प्रियं तव ।
भवतो यद्व्यवसितं तन्मे साध्वनुमोदितम् ॥ ४६ ॥

भो भगवन्ता उमापति । त्वां जें प्रार्थिलें आम्हांप्रति । तें तव प्रिय सुनिश्चिती । आम्हां सर्वार्थीं करणीय ॥ २४ ॥ त्वां जें निश्चयें प्रतिपादिलें । आणि आम्हांतें अनुमोदिलें । तें सर्वार्थीं साधु भलें । मान्य केलें पैं आम्हीं ॥४२५॥ बाणासुराच्या रक्षणोद्देशें । आम्हां स्तविलें त्वां संतोषें । तें म्यां मान्य केलें असे । समरावेशें या न मारीं ॥ २६ ॥ आणिकही एक्या गुणें । बाणासुरा म्यां वांचवणें । तेंही कथितों तुजकारणें । सावध श्रवणें अवधारीं ॥ २७ ॥

अवध्योऽयं ममाप्येष वैरोचनिसुतोऽसुरः । प्राल्हादाय वरो दत्तो न वध्यो मे तवान्वयः ॥ ४७ ॥

हा मारावया योग्य नव्हे । काय म्हणोनि पुससी जरि हें । तरी वैरोचनि जो असुरवर्य । त्याचा तनय औरस हा ॥ २८ ॥ आणि प्रह्लादासि म्यां दिधला वर । तुझे वंशींचा न मारीं असुर । तस्मात् अवध्य बाणासुर । मजपासूनि हा निर्धारें ॥ २९ ॥ तुझिया स्तवनें तोषलों भारी । तव प्रार्थना अङ्गीकारीं । विशेष हा मद्भक्तान्वयधारी । न मारीं समरीं मी यातें ॥ ४३० ॥ जरी तूं म्हणसी तरी कां पहिलें । याचें सैन्य संहारिलें । बाणबाहूंचें खंडन केलें । तेंही वहिलें अवधारीं ॥ ३१ ॥

दर्पोपशमनायास्य प्रवृक्णा बाहवो मया । सूदितं च बलं भूरि यच्च भारायित भुवः ॥ ४८ ॥

सहस्र शाखांचा पादप । दैत्यें मानूनि धरिला दर्प । तया दर्पाचें स्वरूप । अल्प स्वल्प तुज कथितों ॥ ३२ ॥ पूर्वीं अनन्यभावें शरण । होवोनि भजतां तुझे चरण । तैं त्वां होवोनि सुप्रसन्न । मागें वरदान म्हणीतलें ॥ ३३ ॥ येणें शोणितपुररक्षणा । तुज याचिलें गौरीरमणा । पुढती प्रसन्न करूनि जाणा । समराङ्गणा प्रार्थिलें ॥ ३४ ॥ सहस्रबाहुबळप्रताप । तेणें दैत्या चढला दर्प । म्हणे त्रिजग समरीं मसीं अल्प । तुज साटोप धरीं म्हणे ॥ ४३५ ॥ सहस्र भुजांचें कंडूशमन । करावया समर्थ नाहीं आन । तुज शिवातें म्हणे बाण । समराङ्गण करीं मजसीं ॥ ३६ ॥ ऐकोनि याच्या सदर्प बोला । त्वांही क्षोभोनि वर दीधला । उषा वरील जैं दादुला । तैं मिळेल तुजला प्रतियोद्धा ॥ ३७ ॥ तया दर्पाचें उपशमन । सत्य करावया तव वरदान । बाणबाहूंचें कृंतन । चक्रेंकरून म्यां केलें ॥ ३८ ॥ आणि भूमीसी भाररूप । बाणचमूचा प्रचंड दर्प । तो म्यां सज्जूनि शार्ङ्गचाप । ससाक्षेप संहरिला ॥ ३९ ॥ आतां ऐकोनि तव प्रार्थना । म्यां जीवदान दिधलें बाणा । चारी बाहु रक्षिले जाणा । अजर तव गणामाजी असो ॥ ४४० ॥

चत्वारोऽस्य भुजाः शिष्टा भविष्यंत्यजरामराः । पार्षदमुख्यो भवतो नकुतश्चिद्भयोऽसुरः ॥ ४९ ॥

अवशिष्ट रक्षिले चारी कर । ते या होतील अजरामर । तव पार्षदांमाजी वर । निर्भय असुर मम वरें ॥ ४१ ॥ तुझ्या पार्षदांमाजी मुख्य । वरिष्ठ होवोनि भोगील सुख । माझा अनुग्रह हा निष्टंक । ऐकोनि त्र्यम्बक तोषला ॥ ४२ ॥ श्रीकृष्णाचा होतां वर । चक्रें रक्षिले चारी कर । शिवें आणूनि बाणासुर । ठेववी शिर हरिचरणीं ॥ ४३ ॥ कृष्णें हस्त ठेवूनियां माथां । झाला स्वमुखें अभय देता । बाणें सांडूनि जीवभयव्यथा । भजला तत्वता तें ऐक ॥ ४४ ॥

इति लब्ध्वाऽभयं कृष्णं प्रणम्य शिरसाऽसुरः । प्राद्युम्नि रथमारोप्य सवध्वा समुपानयत् ॥ ५० ॥

अभय लाहूनि ऐसिये परी । श्रीकृष्णातें वंदूनि शिरीं । प्रवेशोनिया शोणितपुरीं । सोडी झडकरी अनिरुद्धा ॥ ४४५ ॥ देऊनि अभ्यंग सोद्वर्तन । उषा नोवरी कन्यारत्न । वसनाभरणीं गौरवून । रथारोहण करवी त्यां ॥ ४६ ॥ वोहरें वाहोनि दिव्य रथीं । सवेग आणिलीं कृष्णाप्रति । बळकृष्णांतें करी विनंती । कीजे वसती दिन एक ॥ ४७ ॥ रामकृष्ण म्हणती तया । तुजवरी पूर्ण शिवाची दया । यालागीं ओपिलें पूर्ण अभया । स्नेह हृदयामाजी धरीं ॥ ४८ ॥ सेना पडली समराङ्गणीं । त्यांची पुरगर्भीं विलपणी । उत्साह न वटे अंतःकरणीं । आग्रह पूजनीं न करावा ॥ ४९ ॥ समरीं यादव झाले क्षती । अमृतापाङ्गें त्यां श्रीपति । अक्षत करूनि वाहे रथीं । द्वारके जाती तें ऐका ॥ ४५० ॥ हरिवंशीं बाणासुर । सोडिल्या शंकरें देवोनि वर । केला प्रमथगणीं किंकर । शोणितपुर त्यागूनी ॥५१॥ कुम्भाण्ड प्रधानें घेऊनि अभय । श्रीष्णेंसीं केला स्नेह । कृष्णें शोणितपुरींचा राय । शक्रप्राय तो केला ॥५२॥ उषाविवाह कुम्भाण्डकें । मन्मथपुत्रेंसीं कौतुकें । करूनि वधूवरें द्वारके । यादवेंसीं बोळविलीं ॥ ५३ ॥

अक्षौहिण्या परिवृत सुवासः समलंकृतम् । सपत्नीक पुरस्कृत्य ययौ रुद्रानुमोदितः ॥ ५१ ॥

द्वादश अक्षौहिणी सेना । वोहरें सहित दिव्य स्यंदना । वेष्टूनि चालिले द्वारकाभुवना । विजय-गर्जना करूनियां ॥ ५४ ॥ मंडित अनर्घ्य वसनाभरणीं । कुंकुमतिलक माळा सुमनीं । सवें सालंकृत उषा पत्नी । पुरस्कारूनियां अनिरुद्धा ॥ ४५५ ॥ दर्प भंगिला बाणाचा । वीर वर्णिती प्रताप वाचा । गजर केला गजभेरींचा । भार कृष्णाचा निघाला ॥ ५६ ॥ द्वारकापुरा निघते समयीं । शंकराज्ञा शेषशायी । घेतां शंकर कवळूनि हृदयीं । रहस्य कांहीं त्या वदला ॥ ५७ ॥ बाण मद्वरें झाला मत्त । समरा प्रार्थी मज उद्धट । तें हें माझें अभिप्रेत । पूर्ण समस्त त्वां केलें ॥ ५८ ॥ श्रीकृष्ण म्हणे मज-लागूनी । बहुत घडली उद्धट करणी । पराभविलें समराङ्गणीं । पिनाकपाणि तें क्षमिजे ॥ ५९ ॥ शिव म्हणे मम मनोगत । तैसें तुवां केलें उचित । अनुमोदूनि इत्थंभूत । यादव समस्त बोळविले ॥४६०॥ विचित्र वाजती मंगळ तुरें । सुरवर वर्षती सुमनभारें । वीर गर्जती जयजयकारें । सहित वोहरें विराजती ॥ ६१ ॥ अमर वंदूनि हरिहरांसी । ऋषि महर्षि देवर्षि । जाते झाले स्वस्थानासी । हरि-

विजयासी वर्णित ते ।। ६२ ।। हरिवंशादि ग्रंथान्तरीं । धेनु बाणाच्या वरुणाघरीं । तदर्थ वरुणेंसिं भिडे हरि । हे शुकवैखरी येथ नसे ।।६३।। असो ऐसें शोणितपुरीं । शंकरप्रमुख जिंकूनि समरीं । अनिरुद्धेंसी बाणकुमरी । द्वारकानगरीं प्रवेशले ।। ६४ ।। पुढें आहुकनृपाजवळी । वार्तिकां वार्ता कथिली समूळीं । वोहरें सहित राम वनमाळी । प्रतापशाळी पातले ।।४६५ ।। रायें ऐकूनि हे वार्ता । सहस्रें सहस्र प्रेरूनि दूतां । नगरी झाला शृंगारविता । पुढें सात्वता पाठविलें ।। ६६ ।। मंगळ तुरांचिया नगरीं । कैसे प्रवेशले गजरीं । रामकृष्ण यादवभारीं । तें अवधारीं कुरुवर्या ।। ६७ ।।

स्वराजधानीं समलंकृतां ध्वजैः सतोरणैरुक्षितमार्गचत्वराम् ।
विवेश शंखानकदुंदुभिस्वनैरभ्युद्यतः पौरसुहृद्द्विजातिभिः ।। ५२ ।।

नृपाची आज्ञा पडतां श्रवणीं । द्वारकेमाजी समस्त जनीं । आपुलालिये सदनोसदनीं । अलंकरणीं त्वरा केली ।। ६८ ।। चित्र विचित्र तगटी ध्वज । रत्नखचित कलश सुतेज । मंदिरें दिसती तेजःपुंज । तोरणीं स्रज सुमनांचे ।। ६९ ।। मार्गचत्वर पण्यवीथि । चंदनकुंकुमें प्रोक्षिल्या निगुती । पूर्ण कलश सदीपपंक्ति । विराजती सर्वत्र ।। ४७० ।। सालंकृत नारीनर । शोभती जैसे अप्सरा अमर । सज्जूनि हयरथकुंजरभार । आले नागर सामोरे ।। ७१ ।। आप्त सुहृद पौरवर्ग । वैदिक शास्त्रज्ञ द्विज अनेग । पुढें पाहूनियां श्रीरंग । करिती प्रसंग स्तवनाचा ।। ७२ ।। एक ओहरां प्रशंसिती । कित्येक रामकृष्णांतें स्तविती । कित्येक हरियश उज्वळ गाती । विप्र पढती शान्तिसूक्तें ।। ७३ ।। गजदुंदुभि वाजती गजरें । काहळा मृदंग मंगळ तुरें । आनकगोमुखकंबुस्वरें । पूर्व द्वारें प्रवेशले ।। ७४ ।। आपुली राजधानी द्वारका । सालंकृता सकौतुका । रामकृष्ण यादवकटका । सहित स्वपुरीं प्रवेशले ।। ४७५ ।। वोहरें मिरवूनि हाटवटीं । आले नृपासनानिकटीं । उषा अनिरुद्ध पाहतां दृष्टी । तोषला पोटीं उग्रसेन ।।७६।। दोघां घेऊनि मांडियेवरी । वसनाभरणें अलंकारी । हस्त उतरोनि मुखावरी । म्हणे हरगौरीसम नांदा ।।७७।। रामकृष्णप्रद्युम्नप्रमुखीं । राया वंदूनि निज मस्तकीं । उठूनि वसुदेवदेवकादिकीं । स्नेहविशेषीं आलिंगिलें ।।७८।। नम्रमौळें करूनि अपरां । आज्ञा मागूनियां नृपवरा । मग येऊनि निजमंदिरा । माता समग्रा हरि वंदी ।।७९।। रामकृष्णादिकांच्या जननी । अनिरुद्ध उषा देखोनि नयनीं । आनंदभरित अंतःकरणीं । आशीर्वचनीं गौरविती ।। ४८० ।। नातुनातसुनेचें मुख । पाहूनि रुक्मिणी मानी सुख । रेवतीहृदयीं न माय हरिख । तोषती अनेक हरिजाया ।। ८१ ।। रतिरुक्मवती नंदनस्नुषा । देखोनि पावल्या परम तोषा । रोचनासदनीं गृहप्रवेशा । आले विदुषांसमवेत ।। ८२ ।। करूनि लक्ष्मीपूजनासी । कनकमुद्रा ब्राह्मणांसी । भूरि वांटूनि हृषीकेशी । अहेर सुहृदांसी समर्पी ।। ८३ ।। रोचना रति रुक्मवती । भाणवसातें निरोविती । म्हणती वृद्धाचाररीति । यथानिगुती तूं चाळीं ।। ८४ ।। आपुले कंठींचीं कंठाभरणें । रत्नजडितें करकंकणें । समर्पोनि उषेकारणें । क्षीरप्राशनें करविती ।। ४८५ ।। आतां असो हा वृद्धाचार । कथितां ग्रंथ वाढेल फार । करूनि दिव्यान्नप्रकार । भोजनें नागर तोषविले ।। ८६ ।। कैसें केलें उषाहरण ।

हरिहरांचें समराङ्गण । राया त्वां जें पुशिलें पूर्ण । तें संपूर्ण निरूपिलें ॥ ८७ ॥ याचें श्रवणपठन करितां । दृष्टादृष्ट फळें होता । तें तूं परिसें कौरवनाथा । मी तत्वता तुज कथितों ॥ ८८ ॥

य एवं कृष्णविजयं शंकरेण च संयुगम् । संस्मरेत्प्रातरुत्थाय न तस्य स्यात्पराजयः ॥ ५३ ॥

सोयरीक दैत्या देवा । समराङ्गण शिवकेशवां । अघटित परीचा हा आघवा । स्मरे सद्भावें इतिहास ॥ ८९ ॥ बाणबाहूंचें खंडन । जृंभणास्त्रें उमारमण । जिंकूनि निर्जर जनार्दन । झाला आख्यान तें जें हें ॥४९०॥ प्रभाते श्रवणपठन करिती । अथवा हृदयीं जे स्मरती । ते नर सर्वदा विजय वरिती । पराजयविपत्ति त्यां न शिवे ॥ ९१ ॥ राया पावन हरीचे गुण । पुण्यश्लोक करिती श्रवण । ते सर्वदा विजयवान । कलिमलखंडन करूनियां ॥ ९२ ॥ हरियश उज्ज्वल त्रिजगामाजी । गंगा जन्मली हरिपदकंजीं । भगवन्मूर्ति हृत्पंकजीं । त्रिविधा आजि समरमतां ॥ ९३ ॥ श्रीमद्भागवतीं ऐसी । अठरा सहस्र विस्तारेंसीं । दशमस्कंधीं नृपापाशीं । कथाविशेषीं शुक वदला ॥९४॥ यावरी पुढिले अध्यायीं । नृगोद्धरण शेषशायी । करील ते कथा सर्वही । श्रवणालयीं सांठविजे ॥ ४९५ ॥ मखसुकृतें अमरत्व लाहती । शेखीं मरोनि मर्त्य होती । एक अमरत्वा वांछिती । एवं संसृति अवघीच ॥ ९६ ॥ एकनाथ प्रतिष्ठानीं । मर्त्यां अमर्त्यां अमृतदानी । चिदानंदें वास्तवपणीं । स्वानंदभुवनीं विराजती ॥ ९७ ॥ गोविन्दान्वयबोधात्मक । प्रपंचवस्तूसी अपृथक । वेदान्तवाक्याचा परिपाक । भरी चिद्रस दयार्णवीं ॥ ९८ ॥ तें हें हरिवरदा व्याख्यान । श्रोते श्रवणीं करिती पान । अमृतत्वीं समरसोन । ब्रह्म परिपूर्ण ते होती ॥ ४९९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां शंकरप्रमुखसमरवर्णनबाणबाहुखंडनानिरुद्धोषासहद्वारकानयनं नाम त्रिषष्टितमोऽध्यायः ।

श्लोक ५३ ॥ ओवी-संख्या ४९९ ॥ एवं संख्या ५५२ ॥

(बासष्टावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३०१५४)

त्रेसष्ठावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

# हरिवरदा

## अध्याय ६४ वा

श्रीमद्गोविंदात्मने नमः ॥ जयजय मार्तंडमंडलवर्ती । समष्टिकरणीं तव प्रवृत्ति । विवर्त प्रकटूनि निजात्मद्युती । रोचकभ्रान्ति त्रिजगभा ॥ १ ॥ नमो तया श्रीगोमंता । प्रणतपाळा गोपीनाथा । स्रष्टा गोप्ता उपसंहर्ता । नसे तुजपरता परिपूर्ण ॥२॥ तुझीं वंदूनि चरणकमलें । उपाहरण वाखाणिलें । नृगोद्धरण उपाइलें । तें वदविलें पाहिजे ॥ ३ ॥ तव पदपंकजस्मरणादरें । प्रज्ञा प्रमेयाङ्कुरीं मोहरे । जेंवि नौकेचिया आधारें । जड निस्तरे जलधिही ॥ ४ ॥ अगाध श्रीमद्भागवत । भाषाव्याख्यानीं प्रस्तुत । दशमामाजी श्रीकृष्णचरित । अध्याय कथिले त्रिषष्टि ॥ ५ ॥ चतुःषष्टितम याउपरि । वाखाणिजेल भाषाकुसरी । तो ऐकिजे पवित्र श्रोत्रीं । कैवल्यपात्रीं विपश्चितीं ॥ ६ ॥ चौसष्टाव्या अध्यायीं कथा । अज्ञात दोष नृगाच्या माथा । तेणें पावला अधःपाता । सरठरूपें अंधकूपीं ॥ ७ ॥ तया पापापासूनि हरि । नृगरायाचा उद्धार करी । उन्मत्त नृपांतें ब्रह्मस्वहारीं । दोषोत्तरीं शिक्षापी ॥ ८ ॥ आणि यादव जे स्वबाहुगुप्त । ऐश्वर्यभोगादिमदोद्धत । प्रसंगें यांतेंही शिक्षित । विप्रां विनीत होत्साता ॥ ९ ॥ ब्राह्मणाची अवज्ञा कोणीं । सहसा न कीजे मामकीं जनीं । भाविब्रह्मशापें करूनी । कुलक्षय जाणूनि शिक्षितसे ॥ १० ॥ ये अध्यायीं इतुकी कथा । स्वस्थचित्तें परिसिजे श्रोतां । परीक्षितीतें श्रीशुक वक्ता । झाला बोलता तें ऐका ॥ ११ ॥

श्रीशुक उवाच–एकदोपवनं राजञ्जग्मुर्यदुकुमारकाः । विहर्तुं सांबप्रद्युम्नचारुदेष्णगदादयः ॥ १ ॥

कोणे एके अपूर्व समयीं । यदुकुमार स्वसमुदायीं । क्रीडार्थ उपवनाच्या ठायीं । गेले सर्वही मेळोनिया ॥ १२ ॥ साम्ब प्रद्युम्न चारुदेष्ण । गद मरुवल्क सारण । भानु स्वर्भानु बृहद्भानु ।

भामानंदन इत्यादि ॥ १३ ॥ एवं सर्वही कृष्णतनय । अन्यत्र यदुकुळ संततिमय । उपवनीं क्रीडति रमणीय । वीटा कंदुक बहुक्रीडा ॥ १४ ॥ धनुर्विद्या लक्षसाधनें । छत्तीस दण्डायुधें परजणें । अश्व गज रथ विविध यानें । लघु लाघवें शिक्षिती पैं ॥ १५ ॥ कृत्रिमखड्गखेटकधर । परस्परें शिक्षापर । परीक्षा दाविती यदुकुमार । विविधा शरीर मोडूनी ॥ १६ ॥ शूळ पट्टिश चक्रें लहुडी । एक बळिष्ठ उचलिती धोंडी । एक आंगें मोडिती प्रौढी । कडोविकडी गुरुशिक्षा ॥ १७ ॥ ऐसे अनेकक्रीडापर । करितां उपवनीं विहार । नेणती दिवस चढला फार । झोंबती भास्करकर तप्त ॥ १८ ॥ प्रभाते उपहार करोनि सदनीं । स्वेच्छा विहरतां वनोपवनीं । छाया सुशीतल लक्षूनी । एकत्र होवोनि बैसले ॥ १९ ॥ कदलें द्राक्षें दाडिमीफळें । साकोट बदाम रायांवळे । चूत खर्जूर नारिकेळें । बदरें जांबळें पनसादि ॥ २० ॥ इक्षुदण्ड श्वेत कृष्ण । कंदमूळादि पदार्थ आन । स्वेच्छा तृप्त झाले भक्षून । तृषार्त जीवन हुडकिती ॥ २१ ॥

क्रीडित्वा सुचिरं तत्र विचिन्वंतः पिपासिताः । जलं निरुदके कूपे ददृशुः सत्त्वमद्भुतम् ॥ २ ॥

चिरकाळ करूनि विहारक्रीडा । तृषार्त हुडाकिती जीवनचाडा । तंव निर्जलकूपीं प्रचंड सरडा । देखोनि झाले विस्मित पैं ॥ २२ ॥ पहा हो म्हणती कूपान्तरीं । अद्भुत प्राणी स्थूळशरीरी । निर्जल आणि निराहारी । कोणे परी हा येथ वसे ॥ २३ ॥ लहान थोर यदुकुमार । कूपीं पाहती सर्व सादर । पाहोनि केला जो निर्धार । तो सविस्तर अवधारा ॥ २४ ॥

कृकलासं गिरिनिभं वीक्ष्य विस्मितमानसाः । तस्य चोद्धरणे यत्नं चक्रुस्ते कृपयान्विताः ॥ ३ ॥

पुच्छ शरीर चरण मौळ । गिरिसन्निभ महाविशाळ । देखूनि यदुकुमर सकळ । म्हणती विकराळ सरठतनू ॥ २५ ॥ गिरिसन्निभ कृकलासातें । देखूनि अवघे विस्मितचित्तें । कृपेनें कळवळिले होत्साते । करिती यत्नातें तदुद्धरणीं ॥ २६ ॥ म्हणती पहा हो केवढा प्राणी । सरठदेही निर्जलस्थानीं । क्षुधे तृषेची सोसी ग्लानि । यासी येथूनि काढावें ॥ २७ ॥ ऐसे सर्वही कृपापर । करिती उद्धरणार्थ विचार । नानाप्रकारीं यत्नपर । तोही प्रकार अवधारा ॥ २८ ॥

चर्मजैस्तांतवैः पाशैर्बद्ध्वा पतितमर्भकाः । नाशक्नुवन्समुद्धर्तुं कृष्णायाचख्युरुत्सुकाः ॥ ४ ॥

मातंगनिर्मित चर्मतंति । तन्मय पाश निर्मूनि निगुती । तेणें बांधोनि सरडाप्रति । बळें वोढिती अवघेही ॥ २९ ॥ अपर कौशेयतंतुमय । पाशें बांधूनि सरठदेह । कूपीं पडिला पर्वतप्राय । करिती उपाय तदुद्धरणीं ॥ ३० ॥ एक कार्पासतंतु अविशेष । पाशीं बांधूनि त्या प्राण्यास । उद्धरणीं धरूनि आवेश । ओढित अशेष आंगबळें ॥ ३१ ॥ परंतु शापें पतित कूपीं । राजा नृग कृकलासरूपी । सर्वी ओढितां निजप्रतापीं । अणुमात्र न ढळे बहु श्रमतां ॥ ३२ ॥ यदुकुमार समस्त जाण । करूं न शकती

नृगोद्धरण । कृष्णाकारणें करिती कथन । परम उत्सुक होत्साते ॥ ३३ ॥ नमूनि भगवत्पदारविन्दा । म्हणती स्वामी श्रीमुकुन्दा । उपवनीं क्रीडतां कुमारवृंदा । परमाश्चर्य देखियेलें ॥ ३४ ॥ अंधकूपीं सरठदेही । पर्वतप्राय प्राणी पाहीं । क्षुधे तृषेनें पीडतां कांहीं । विश्रान्ति नाहीं अणुमात्र ॥ ३५ ॥ तया देखोनि यदुकुमार । उद्धरणार्थ श्रमले फार । करूं न शकोंच तदुद्धार । मग सत्वर कथूं आलों ॥ ३६ ॥ हें ऐकूनि जनार्दन । द्रवला स्वभक्तकरुणेंकरून । ज्ञानदृष्टी नृगाचरण । पाहे विवरून विश्वदृक् ॥ ३७ ॥ त्रिकालीनज्ञानद्रष्टा । जाणोनि नृगाच्या कर्मानिष्टा । छेदावया शापकष्टा । उपवनीं पैठा स्वयें आला ॥ ३८ ॥

तत्राऽऽगत्यारविंदाक्षो भगवान्विश्वभावनः । वीक्ष्योज्जहार वामेन त करेण स लीलया ॥ ५ ॥

तेथें जाऊनि कूपापासीं । पंकजाक्ष ज्ञानैकराशि । षड्गुणैश्वर्यसंपन्नतेसीं । विश्वभावन विश्वात्मा ॥ ३९ ॥ विलोकूनियां कूपान्तरीं । कृपापाङ्गें सदय हरि । लीलेकरूनि वामकरीं । रज्जु धरूनि आकर्षी ॥ ४० ॥ दयापाङ्गें अवलोकिलें । तेणेंचि ऊर्ध्व आकर्षिलें । करस्पर्शाचें निमित्त केलें । मानुषीं लौकिकपरिहारा ॥ ४१ ॥ लोहचुंबक लोह आकर्षी । रज्जुहस्तादि नाहीं त्यासी । कृष्ण केवळ चैतन्य-राशि । तेथ कायसी ग्रहणक्रिया ॥ ४२ ॥ चुंबक लोहाचें जेंवि ग्रहण । तेंवि नृगाचें उद्धरण । स्पर्श लोहा करी सुवर्ण । तें लक्षण शुक वर्णी ॥ ४३ ॥

स उत्तमश्लोककराभिमृष्टो विहाय सद्यः कृकलासरूपम् ।
संतप्तचामीकरचारुवर्णः स्वर्ग्यद्भुतालंकरणावरस्रक् ॥ ६ ॥

सरठदेही जो तो नृग । कृपापाङ्गें कमलारंग । कडे काढूनि तद्देह साङ्ग । शंतमहस्तें कुरवाळी ॥ ४४ ॥ देव वर्णिती उत्तम कीर्ति । यालागीं उत्तमश्लोक म्हणती । पद्मकरें तो नृगाप्रति । स्पर्शे चित्तीं द्रवोनियां ॥ ४५ ॥ अमृतहस्तें सरठतनु । स्पर्शतांचि जनार्दनु । स्पर्श लोहा करी सुवर्ण । तेंवि काञ्चनमय झाला ॥ ४६ ॥ लोह काळिमा आणि जडता । सांडी तेंवि कृकलासता । टाकूनि दिव्य-तनूतें धरिता । झाला तत्वता नृगरावो ॥ ४७ ॥ सम्यक्तप्त जेंवि सुवर्ण । तैसा सुंदर तनूचा वर्ण । स्वर्गवासियांमाजी मान्य । वसनाभरणीं देदीप्य ॥ ४८ ॥ मनुष्यांमाजी उत्तमयोनी । श्रीमंत यशः-श्रीसुकृतखाणी । अंत्यादि पामर नीचयोनी । मानव म्हणोनि सम न कीजे ॥ ४९ ॥ तैसे पिशाच गुह्यक भूत । त्याही देवयोनिच निश्चित । तथापि शक्र ज्यां सम्मानित । ते अद्भुत स्वर्गवासी ॥ ५० ॥ तयां श्रेष्ठांमाजी गणना । मिरवी अद्भुतां वसनाभरणां । तुरंबूनियां मंदारसुमना । माळा अवतंस शोभवी ॥ ५१ ॥ एवं ऐसा दिव्यदेही । सरठतनू त्यागूनि पाहीं । हस्त स्पर्शतांचि नवाई । कृष्णें लवलाहीं प्रकटिली ॥ ५२ ॥ मुकुट कुंडलें कटिमेखळा । अंगदें कटकें कंठमाळा । त्रिदशपाळा अंगींची कळा । नृग लाधला हरिहस्तें ॥ ५३ ॥ सर्ववेत्ता श्रीभगवान । तथापि मानवाचिसमान । पुसता झाला त्यालागून । तेंही लक्षण अवधारा ॥ ५४ ॥

पप्रच्छ विद्वानपि तन्निदानं जनेषु विख्यापयितुं मुकुन्दः ।
कस्त्व महाभाग वरेण्यरूपो देवोत्तमं त्वां गणयामि नूनम् ॥ ७ ॥

कळोनि किमर्थ म्हणाल पुसिलें । तरी नृगाचरण जें कां पहिलें । लोकां प्रकटावया वहिलें । निमित्त केलें प्रश्नाचें ॥ ५५ ॥ अनवधानतेमाजी केवळ । अल्पही दुष्कर्माचें फळ । दुःखयातना भोगवी बहळ । ऐसें गोपाळ प्रकटितसे ॥ ५६ ॥ श्रीकृष्णाच्या कृपापाङ्गें । शंतम करें स्पर्शतां वेगें । सरठदेह टाकूनि नृगें । दिव्यनिजाङ्गें निवडला ॥ ५७ ॥ तया दिव्य पुरुषाप्रति । परमाश्चर्यें पुसे श्रीपति । महाभाग तूं कोण ये क्षिती । वरेण्यमूर्ति वराहे ॥ ५८ ॥ वर द्यावया योग्य होसी । यालागीं उत्तम त्रिविष्टपवासी । त्यांमाजी उत्तमोत्तम मानसीं । निश्चयेंसीं मी गणितों ॥ ५९ ॥ ऐशिया दिव्य पुरुषाप्रति । किमर्थ सरठदेहावाप्ति । अंधकूपीं अधोगति । मम प्रश्नोक्ति हे सांगें ॥६०॥

दशामिमांन वा कतमे कर्मणा संप्रापितोऽस्यतदर्हः सुभद्र ।
आत्मानमाख्याहि विवित्सतां नो यन्मन्यसे नः क्षममत्र वक्तुम् ॥ ८ ॥

कोण्या कर्में तुज हे दशा । पावविली गा पुण्यपुरुषा । तूं सुकृती ऐसिया क्लेशा । योग्य न होसी भोगावया ॥ ६१ ॥ सुभद्रा म्हणिजे कल्याणपात्रा । तव दर्शनें तृप्ति नेत्रां । भाषणश्रवणीं क्षुधा श्रोत्रा । ते सन्मित्रा पूर्ण करीं ॥ ६२ ॥ आपुल्या पूर्वकर्माची दशा । श्रोतृकामां आम्हां पुरुषां । कथनीं योग्यता मानसा । असतां सहसा गूज न राखें ॥ ६३ ॥ अख्याहि म्हणिजे प्रकट करीं । इतुकें कृष्ण बोलिल्यावरी । नृग बोलिला मधुरोत्तरीं । शुकवैखरी ते ऐका ॥ ६४ ॥

श्रीशुक उवाच – इति स्म राजा संपृष्टः कृष्णेनानंतमूर्तिना । माधवं प्रणिपत्याह किरीटेनार्कवर्चसा ॥ ९ ॥

जो कां अनंतगुणपरिपूर्ण । अनंतमूर्ति जो श्रीकृष्ण । तेणें इत्यादिप्रकारें प्रश्न । नृगासी केला होत्साता ॥ ६५ ॥ भास्करभास्वरकोटीरकोटी । श्रीकृष्णाच्या चरणानिकटीं । प्रणाम करूनियां वृत्तान्तगोठी । वदता झाला मारमणा ॥ ६६ ॥

नृग उवाच – नृगो नाम नरेद्रोऽहमिक्ष्वाकुतनयः प्रभो । दानिष्वाख्यायमानेषु यदि ते कर्णमस्पृशम् ॥१०॥

राजा इक्ष्वाकु सूर्यवंशीं । मी जन्मलों तयाचे कुशीं । विख्यात नृगनामा त्रिजगासी । जरी तूं जाणसी समर्था ॥ ६७ ॥ दानशीलांमाजी गणना । प्रकट कीर्ति श्रुतिपुराणां । विभो समर्था तुझिया कर्णा । स्पर्शली असेल जरी कांहीं ॥ ६८ ॥ कोणी एक विधिनिर्णय । वेदप्रमाणें निःसंशय । तैसाचि हाही अभिप्राय । कर्णगोचर जरी तुजला ॥ ६९ ॥ दानशील जे वाखाणिती । त्यांमाजी नृगनामाची

ख्याति । स्पर्शली असेल श्रवणपथीं । नरेंद्रमूर्ति तो हा मी ॥ ७० ॥ हेंही बोलणें बालिशपणें । विभो समर्था तुझेंनि वयुनें । त्रैलोक्य जागे ज्ञातेपणें । तेंही श्रवणें अवधारीं ॥ ७१ ॥

किन्नु तेऽविदितं नाथ सर्वभूतात्मसाक्षिणः । कालेनाव्याहतदृशो वक्ष्येऽथापि तवाज्ञया ॥११॥

सर्वभूतांचा अंतरात्मा । सर्वसाक्षी भूतग्रामा । तुज काय अविदित पुरुषोत्तमा । सर्वज्ञगरिमा हे तुझी ॥ ७२ ॥ कालकलनेच्या प्रवाहीं । सर्वत्र ज्ञानें लोपती पाहीं । अव्याहत दृक् तुझ्या ठायीं । म्हणोनि नाथ तूं सर्वांचा ॥ ७३ ॥ भूत भावी वर्तमान । तूं अव्याहत त्रिकालज्ञ । तथापि तुझिये आज्ञेवरून । करितों कथन तें ऐक ॥ ७४ ॥

यावंत्यः सिकता भूमेर्यावंत्यो दिवि तारकाः । यावंत्यो वर्षधाराश्च तावतीरददं स्म गाः ॥ १२ ॥

स्वमुखें कीर्ति नुच्चारिजे । समर्थाज्ञा नुलंघिजे । दोहींमाजी आज्ञाकाजें । स्वकीर्ति वर्णिजे निर्दोष ॥ ७५ ॥ तरी भूमीचे रजःकण । जितुके भरती गणनेकरून । किंवा गगनीं तारागण । कीं धारागणन मेघांचें ॥७६॥ यांची गणना जितुकी भरे । तितुकीं गोदानें निजकरें । देता झालों ज्या प्रकारें । तेंही आदरें अवधारीं ॥ ७७ ॥

पयस्विनीस्तरुणीः शीलरूपगुणोपपन्नाः कपिला हेमशृंगीः ।
न्यायार्जिता रूप्यखुराः सवत्सा दुकूलमालाभरणा ददावहम् ॥ १३ ॥

बहुत दुग्ध जयांचिये कांसे । सद्गुणी सुशील प्रथम वयसे । कपिला रूपसा मानसें । प्रसन्न होती देखिलिया ॥ ७८ ॥ ऐसिया न्यायार्जित सवत्सा । मुक्तप्रवाळप्रोतपुच्छा । पात्रप्रतिकृतिअनिच्छा । स्वर्णशृंगी रौप्यखुरा ॥ ७९ ॥ क्षौमाम्बरें झांकूनि पृष्टि । सर्वाभरणीं मंडित यष्टि । ग्रीवाभूषणें माला कंठीं । देता झालों द्विजवर्यां ॥ ८० ॥ दानपात्र जे ब्राह्मण । समासें त्यांचेही सद्गुण । स्वामीपाशीं करितों कथन । सादर श्रवण करीं प्रभो ॥ ८१ ॥

स्वलंकृतेभ्यो गुणशीलवद्भ्यः सीदत्कुटुंबेभ्य ऋतव्रतेभ्यः ।
तपःश्रुतब्रह्मवदान्यसद्भ्यः प्रादां युवभ्यो द्विजपुंगवेभ्यः ॥ १४ ॥

सुष्ठु अलंकारवंत । ब्रह्मवर्चस्वी वेदमूर्त । सार्थाध्ययनें पारंगत । क्रियामंडित तदुचित जे ॥ ८२ ॥ सफळ विद्या विनयितेकरून । बुद्धीचें फळ अनाग्रह पूर्ण । फळ पापाचें याश्चाव्यसन । तपस्वी फळवान् दातृत्वें ॥ ८३ ॥ श्रौतस्मार्ताद्यनुष्ठानें । सफळ ज्यांचीं वेदाध्ययनें । दत्तभुक्तें ज्यांचीं धनें । रतिसंतानें सफळ वधू ॥ ८४ ॥ सुशीळा साध्वी वनिता सदनीं । परापवाद अनृत वदनीं ।

अमेध्य मानिती श्वपळाहूनी । इत्यादि सद्गुणीं मंडित जे ॥ ८५ ॥ आर्यवर्यचर्या पाहीं । शील न भंगे काळीं कहीं । कुटुंबसुखदुःखाच्या ठायीं । हर्षामर्षा नातळती ॥ ८६ ॥ यथोक्त अनुष्ठानाच्या भरीं । कुटुंब खेद पावतां घरीं । सज्ज न होती तत्परिहारीं । अनाचारीं स्पर्शोनी ॥ ८७ ॥ अवस्थात्रयीं सत्यव्रती । न करिती दंभाची प्रवृत्ति । निष्कामतपस्वी ईश्वरप्राप्ती । श्रुतिवेदान्तीं श्रवणपर ॥ ८८ ॥ तपश्चर्यादिगुणेंकरून । ज्यांतें जाणती जगाचे श्रवण । ब्रह्म म्हणिजे निगमाध्यापन । उत्कृष्ट वदान्य अमृतत्वें ॥ ८९ ॥ धीर उदार सत्यव्रती । सुशीळ तपस्वी पुण्यकीर्ति । ऐसिया दानपात्रां द्विजांप्रति । यथानिगुती अर्चूनी ॥ ९० ॥ विष्टरमधुपर्कपुरस्सर । शाखाध्ययनें गोत्रोच्चार । करूनि स्वसत्तापरिहार । त्यागोत्पादन तत्सत्ता ॥ ९१ ॥ एवमादि विधिविधानें । यथासाङ्गें गोप्रदानें । पूर्वोक्त सत्पात्रांकारणें । दिधलीं द्रव्यें तें ऐकें ॥ ९२ ॥

गोभूहिरण्यायतनाश्वहस्तिनः कन्याः सदासीस्तिलरूप्यशय्याः ।
वासांसि रत्नानि परिच्छदान्रथानिष्टं च यज्ञैश्चरितं च पूर्तम् ॥ १५ ॥

चतुर्धा भूमिदानाची परी । वृत्तिसदनायतनक्षेत्रीं । चारी प्रकार सविस्तरीं । श्रोतीं चतुरीं परिसावे ॥ ९३ ॥ जीविकोद्देशें मिराशी करणें । वृत्तिभूमि त्यातें म्हणणें । नांदावया निलय देणें । सदानदानें त्या भूमी ॥ ९४ ॥ वापीकूपजलाशयें । यज्ञस्थानें देवालयें । धर्मशाळा प्रपानिलयें । आयतनरूपा या भूमी ॥ ९५ ॥ सजल निर्जल क्षेत्रें कृषि । वाटिका वनें वृक्षविशेषीं । इत्यादि चतुर्विध भूदानासी । सत्पात्रासी समर्पिलीं ॥ ९६ ॥ याचि प्रकारें हिरण्यदानें । ग्रंथ वाढेल बहुव्याख्यानें । अश्वगजादि शिबिका यानें । विप्रांकारणें समर्पिलीं ॥ ९७ ॥ कन्यादानें सालंकृतें । दासदासीसमृद्धियुक्तें । विप्रांकारणें यथोचितें । दिधलीं बहुतें भगवंता ॥ ९८ ॥ रौप्यप्रमुख अष्ट लोह । तिलपात्रादि धान्यनिचय । वितानें जवनिका शय्याविषय । उपबर्हणें सतूळिका ॥ ९९ ॥ नानाविध वसनदानें । वज्रमुक्तादि अनेक रत्नें । सोपस्करें रथादि यानें । अश्वसारथी शिबिरेंसीं ॥ १०० ॥ संस्थापूर्वक शत ऋतु । यजिले अच्छिद्र सालंकृत । वनोपवनें बहुधा पूर्त । वापीकूपादि निर्मिलीं ॥ १ ॥ ऐसें सांगूं कोठवरी । हृदयस्थ जाणसी श्रीहरि । सुकृत करितां पडिलों घोरीं । काय निमित्त तें ऐका ॥ २ ॥

कस्यचिद्द्विजमुख्यस्य भ्रष्टा गौर्मम गोधने । संपृक्ताऽविदुषा सा च मया दत्ता द्विजातये ॥ १६ ॥

कोणी एक विप्राग्रणी । वेदविहितकर्माचरणी । निवृत्त प्रतिग्रहापासुनी । प्रारब्धक्षेपणी मोक्षेच्छु ॥ ३ ॥ ऐसिया विप्रमुख्याप्रति । प्रार्थूनियां विनयभक्ती । पूर्वोक्त धेनु अर्पिली निगुती । आश्रमा नेतां तो तीतें ॥ ४ ॥ मार्गी नेतां तरुण धेनु । कळपाविहीन पारिकें रान । देखूनि पळाली त्यापासून ।

मम गोधनीं पुन्हां आली ॥ १०५ ॥ मज हें कळलें नसतां कांहीं । म्यां ते धेनु दानप्रवाहीं । आणिका ब्राह्मणा दिधलीं पाहीं । स्वाश्रमा तोही ते नेतां ॥ ६ ॥ पूर्वीं जयासी दिधली दान । मार्गीं भेटला तो ब्राह्मण । तेणें आणिला तो पडखळून । चोर म्हणून मजपाशीं ॥ ७ ॥

तां नीयमानां तत्स्वामी दृष्ट्वोवाच ममेति तम् । ममेति प्रतिग्राह्याह नृगो मे दत्तवानिति ॥ १७ ॥

पूर्व ब्राह्मण म्हणे हे माझी । नृगें मज दिधली द्विजसमाजीं । द्वितीय म्हणे प्रत्यक्ष आजी । दान घेतलें म्या ईचें ॥ ८ ॥ हस्तींचें वाळलें नाहीं जळ । कंठीं नृपार्पितसुमनमाळ । ललाटीं आर्द्र गंध केवळ । चौर्यशील केंवि माझें ॥ ९ ॥ ऐसें ब्राह्मण परस्परें । भांडतां वदती परुषोत्तरें । आपण निर्दोष ऐसें खरें । प्रतिपाद्विती तें ऐका ॥ ११० ॥

विप्रौ विवदमानौ मामूचतुः स्वार्थसाधकौ । भवान्दाताऽपहर्तेति तच्छ्रुत्वा मेऽभवद्भ्रमः ॥ १८ ॥

साधावया आपुला स्वार्थ । दोघे कथिती निज वृत्तान्त । तूं दाता कीं हर्ता येथ । हें ऐकोनि भ्रान्त मी झालों ॥ ११ ॥ माझे धेनूचें अपहरण । केलें म्हणे पूर्व ब्राह्मण । दुजा म्हणे मीं घेतलें दान । मध्यें कोण तस्कर हा ॥ १२ ॥ पूर्व ब्राह्मण म्हणे तूं तस्कर । माझे धेनूचा अपहार । करूनि दातृत्व मिरविसी थोर । पापाचार हा राया ॥ १३ ॥ दुजा म्हणे तूं दानशूर । स्वधनें संपन्न जैंवि कुबेर । तुज हा ब्राह्मण म्हणे तस्कर । मूर्ख पामर मतिमंद ॥ १४ ॥ पहिला म्हणे धेनूसाठीं । नृपाची भाटींव करिसी खोटी । ब्रह्मस्वहरणीं बुद्धि खोटी । दुष्ट कपटी हा राजा ॥ ११५ ॥ ऐसे ब्राह्मण भांडती निकरें । ऐकोनि तयांचीं क्रूरोत्तरें । भ्रमें माझें चित्त घाबरें । बुद्धि न थरे स्वस्थानीं ॥ १६ ॥ सुकृताचरणीं विघ्नघाला । स्वधर्म करितां अधर्म घडला । कांहीं बोलों न शकें बोला । शरण विप्रांला मग आलों ॥ १७ ॥ ग्लानिपूर्वक दण्डवतीं । विप्रां केली विनीत विनति । तेही अल्पसी यथामति । कथितों श्रीपति अवधारीं ॥ १८ ॥

अनुनीतावुभौ विप्रौ धर्मकृच्छ्रगतेन वै । गवां लक्षं प्रकृष्टानां दास्याम्येषा प्रदीयताम् ॥ १९ ॥

विनयें दोघांही द्विजांप्रति । प्रार्थना केली बहुतां रीती । परि ते न मनूनि माझी विनती । आग्रहाप्रति वश्य झाले ॥ १९ ॥ मग एकैका पृथक्पृथक । करुणा भाकिली जरी सम्यक । तरी नायकतीच ते विवेक । क्रोधोन्मुख प्रज्वळले ॥ १२० ॥ मग प्रथम विप्राप्रति । लक्ष धेनु निष्क्रयार्थीं । अर्पूनि पूर्व याचिली निगुती । परि तो विनती न मनीच ॥ २१ ॥ मग द्वितीय ब्राह्मणा प्रार्थना केली । लक्ष धेनु घेऊनि पहिली । ज्याची त्यासी देवविली । तो हे बोली न मनीच ॥ २२ ॥ ऐसें जाणोनि अतिसंकट । दुःखें दाटला माझा कंठ । पुढती चरणीं ठेवूनि मुकुट । प्रार्थिले वरिष्ठ द्विजवर्य ॥ २३ ॥

भवंतावनुगृह्णीतां किंकरस्याऽविजानतः । समुद्धरतं मां कृच्छ्रात्पतंतं निरयेऽशुचौ ॥ २० ॥

तुम्ही दोघेही कृपावंत । अनुग्रहें कीजे मज सनाथ । किंकराचा अपराध बहुत । क्षमावंतीं क्षमावा ॥ २४ ॥ नेणतां घडलें हें अनुचित । क्षमा करणें तुम्हांसि उचित । नरकीं पडतों मी अनाथ । येथूनि मातें उद्धरिजे ॥ १२५ ॥ अशुचि नरक अंधतम । तेथ पडतों मी अज्ञान अधम । कृपावंत होवोनि परम । मातें निस्सीम उद्धरावें ॥ २६ ॥ अनवधानतेमाजी ऐसें । संकट प्राप्त झालें असे । तुम्हीं सुकृतें सदयमानसें । मज दासातें तारावें ॥ २७ ॥ ऐसे ब्राह्मण नानापरी । प्रार्थिले असतां मधुरोत्तरीं । जे बोलिले प्रत्युत्तरीं । तें अवधारीं जगदीशा ॥ २८ ॥

नाहं प्रतीच्छे वै राजन्नित्युक्त्वा स्वाम्यपाक्रमत् । नान्यद्गवामप्ययुतमिच्छामीत्यपरो ययौ ॥ २१ ॥

प्रथम प्रतिग्राहक द्विजाग्रणी । तो निश्चयें बोलिला वाणी । लक्ष धेनु अंगीकारूनि । चोर होऊनि मी न वचें ॥ २९ ॥ प्रथम प्रतिगृहीता हे माझी । मजला धेनु न देसी आजी । तरी मी येथ द्विजसमाजीं । तारकर्यदोषा पावेन ॥ १३० ॥ तुजला संकट पडलें जरी । तरी माझी धेनु ठेवीं घरीं । तेणें दूषण दत्तापहारीं । तुझिये शिरीं मज नाहीं ॥ ३१ ॥ ऐसें बोलोनि ब्राह्मणोत्तम । टाकूनि गेला निजाश्रम । यावरी दुसरा द्विजसत्तम । वदला विषम तें ऐका ॥ ३२ ॥ अरे राया दानशूरा । दातयांमाजी परम चतुरा । मम धेनूचिया प्रतिकारा । लक्ष अपरा देतोसी ॥ ३३ ॥ दहा सहस्र त्याहीवरी । धेनु देऊं पाहसी जरी । तरी मी स्वधेनूवीण दुसरी । नाङ्गीकारीं कल्पान्तीं ॥ ३४ ॥ सायुत नियुत सह मम धेनु । घेऊनि तूंचि हो संपन्न । आम्हांसि देता श्रीभगवान । ऐसें बोलोनि तो गेला ॥ १३५ ॥ धेनु त्यागोनि विप्र दोन्ही । गेले निजाश्रमालागूनी । मग मी पडलों चिन्तवणीं । यावन्मरणपर्यंत ॥ ३६ ॥

एतस्मिन्नंतरे याम्यैर्दूतैर्नीतो यमालयम् । यमेन पृष्टस्तत्राहं देवदेव जगत्पते ॥ २२ ॥

ऐशियामध्यें अकस्मात । मरण झालें उपस्थित । घेऊनि गेले यमाचे दूत । यमपुरींत यमानिकटीं ॥ ३७ ॥ जगत्पते भो जगदाधारा । देवदेवा परमेश्वरा । यमें पुसिलें मज विचारा । त्या निर्धारा अवधारीं ॥ ३८ ॥

पूर्वं त्वमशुभं भुंक्षे उताहो नृपते शुभम् । नांतं दानस्य धर्मस्य पश्ये लोकस्य भास्वतः ॥ २३ ॥

यमें संबोधूनियां मातें । पुसिलें निजसभेआंतौतें । आधीं आपुल्या अशुभातें । अथवा शुभातें भोगीं पां ॥ ३९ ॥ तुझिया दानधर्मासी अंत । नाहीं म्हणोनि लोक भास्वत । भोगीं अक्षय तव सुकृत । मी निश्चित पाहतसें ॥ १४० ॥ तेव्हां मीही आपुल्या मनीं । विवरिता झालों निर्धारूनी । अनंतदानादि

धर्मश्रेणी । संपादूनि येथ आलों ॥ ४१ ॥ तथा पुण्यप्रकाशास्तव । अक्षयलोक भोगीन दिव्य । ऐसें विवरूनि पाहिलें सर्व । मग केला निर्वाह तो ऐका ॥ ४२ ॥

पूर्वं देवाशुभं भुंज इति प्राह पतेति सः । तावदद्राक्षमात्मानं कृकलासं पतन्प्रभो ॥ २४ ॥

देव ऐसिया संबोधनें । यमधर्मासि प्रार्थिलें वचनें । पूर्वीं अशुभातें भोगणें । मजकारणें मानतसे ॥ ४३ ॥ ऐसें बोलतां मजलागून । यमधर्म म्हणे अधःपतन । पावें हें वाक्य होतां श्रवण । च्यवलों तेथून तत्काळ ॥ ४४ ॥ पतन पावलों अंधकूपीं । सरठवपु हे पापरूपी । आपणा देखूनि दुष्कर्मकल्पीं । अघसंकल्पीं वेष्टिलों ॥ १४५ ॥ प्रभो समर्था जगदुद्धरणा । तुजलागीं आली माझी करुणा । प्रवर्तलासि मम उद्धरणा । हें अंतःकरणामाजी गमे ॥ ४६ ॥

ब्रह्मण्यस्य वदान्यस्य तव दासस्य केशव । स्मृतिर्नाद्यापि विध्वस्ता भवत्संदर्शनार्थिनः ॥ २५ ॥

भो केशवा ऐकें विनाति । अद्यापि विध्वंस न पवे स्मृति । म्हणसी कारण काय यदर्थीं । तें यथामति निरूपितों ॥ ४७ ॥ ब्रह्मशब्दें बोलिजे वेद । तदुदित कर्म जें जें विशद । वेदाज्ञेसी देऊनि खांद । आचर मंद न होऊनियां ॥ ४८ ॥ वेदाज्ञेचा दृढविश्वास । तदाचरणीं परमोल्लास । फळाशा न स्पर्शे मानस । ब्रह्मण्यपुरुष तो जाण ॥ ४९ ॥ वदान्य म्हणिजे कायवाङ्मनें । याचकेच्छा सर्वस्व देणें । वदान्यतेचीं अळंकरणें । आंगीं लेणें ज्या शोभे ॥ १५० ॥ आणि तूं सर्वग सर्वोत्तम । तव दास्याचा परम नियम । उपासकता अनन्यप्रेम । भजनीं सकाम नान्यत्र ॥ ५१ ॥ सर्वभूतीं लक्षूनि तुज । भेदभावाचें भर्जित बीज । प्रवृत्तिमात्र परमार्थकाज । शोभवीं सांज दिन रजनी ॥ ५२ ॥ दास्य-विषयींच सापेक्ष । फळाशेविषयीं जो निरपेक्ष । अनन्यबोधें जो अपरोक्ष । वर्तोनि दक्ष व्यवहारीं ॥ ५३ ॥ सम्यक म्हणिजे बरव्यापरी । तव दर्शनीं प्रेमा पुरी । ते तूं म्हणसी कवणेपरी । ऐक मुरारि निरूपितों ॥ ५४ ॥ मेघमुखें जळ निवडलें । सकंचुकीं गगनीं चढलें । पवनें जडत्वा वरपडलें । करका जालें जळ असतां ॥ १५५ ॥ अपरोक्षबोधें जलत्वा जाणें । जडत्वें व्यवहारीं वर्तणें । त्या जैं सागरीं समरसपणें । ऐक्य पावणें फावतसे ॥ ५६ ॥ तेंवि वाच्यांश शबलांश । निरासितां जीवेश्वर निःशेष । निर्विकल्प स्वसामरस्य । व्यतिरेक दर्शन त्या नाम ॥ ५७ ॥ निर्विकल्प ब्रह्मात्मबोध । ओतप्रोत ब्रह्मानंद । गूळगोडीचा नोहे भेद । तेंवि अभेद सगुणत्वीं ॥ ५८ ॥ सगुणावयदर्शन ऐसें । ऐसिये दशेचें ज्यातें पिसें । दर्शनार्थी तो म्हणिजेत असे । येरें वायसें भेदज्ञें ॥५९॥ आंगीं कामाचा संचार । अध्यस्त कामिनीशरीर । स्वप्नीं भासूनि तदाकार । रतिव्यवहार संपादी ॥ १६० ॥ नसतां दुसरी तेथ अंगना । सगुण भासे स्मरकल्याणा । ऐसें सकाम करितां ध्याना । सगुणदर्शना अर्थिती ॥ ६१ ॥ न ते सम्यक संदर्शनार्थी । सम्यकपदाची हे व्युत्पत्ति । येर दर्शनमात्र ते भ्रान्ति । विपरीत बोधीं वर्ततसे ॥ ६२ ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन । ये त्रिपुटीचें गोचर ज्ञान । तेंचि मुख्यत्वें भवमान । अधिष्ठान सुखदुःखा

॥ ६३ ॥ संकल्पविकल्पाचें निज । हेंचि जन्ममरणाचें बीज । हेंचि अधोर्ध्वगतीचें काज । विरक्ता लाज हे दशा ॥ ६४ ॥ ऐसिये त्रिपुटीचिया वयुनें । सगुणदर्शन वांछिती मनें । सम्यक् दर्शनार्थी त्यांलागीं म्हणणें । न घडे जाणें केशवा ॥ १६५ ॥ अंधापायीं स्वर्णगोटा । लागतां उपेक्षी करंटा । तेंवि वास्तवज्ञानेंवीण चेष्टा । सगुण निर्गुण अवघ्याचि ॥ ६६ ॥ राया म्हणसी वस्तुसामर्थ्य । तरी तें ऐकें यथातथ्य । योगभ्रष्टावीणं पथ्य । नोहे निश्चित इतरांसी ॥ ६७ ॥ नामस्मरणें चक्रपाणि । प्रह्लादाच्या संकटश्रेणी । निरसी तें नाम आतां कोणी । दृढ होवोनि न स्मरती ॥ ६८ ॥ प्रह्लादाचा दृढ निश्चय । तैसा ज्या आंगीं प्रत्यय । तोचि योगभ्रष्ट निश्चय । सर्व कविवर्य जाणती ॥ ६९ ॥ निश्चयाचे नुघडती डोळे । संकल्पविकल्पें बुद्धि तरळे । सकामसाधनें वरिवरी बरळे । करितां होपळ ते होती ॥ १७० ॥ दृढनिश्चयें स्थिरावला । योगभ्रष्ट म्हणिजे त्याला । संकल्पविकल्पें जो तरळला । म्हणिजे त्याला भवग्रस्त ॥ ७१ ॥ योग करितां झाला भ्रष्ट । ते न म्हणावे वृथा कष्ट । मार्गे जातां चुकला वाट । पुन्हा तो नीट पथ लाहे ॥ ७२ ॥ असो विस्तारें कारण काय । कुरुभूपाळा तो नृगराय । स्मृतीचें कारण कथिता होय । तो अन्वय अवधारीं ॥ ७३ ॥ ब्रह्मण्या वदान्या मज तव दासा । सम्यक्दर्शनाची पिपासा । यास्तव अद्यापि मम स्मृति नाशा । न पवे परेशा निर्धारें ॥ ७४ ॥ ऐसा कथूनि निजाधिकार । पुढतीं अघटित लाभ थोर । मानूनि कृष्णेंसीं उत्तर । आश्चर्यकर बोलतसे ॥ १७५ ॥

स त्वं कथं मम विभोऽक्षिपथः परात्मा योगेश्वरैःश्रुतिदृशाऽमलहृद्विभाव्यः ।।
साक्षादधोक्षज उरुव्यसनांधबुद्धेः स्यान्मेऽनुदृश्य इह यस्य भवाऽपवर्गः ॥ २६ ॥

विभो समर्था भो हृषीकेशी । तो तूं कैसा मम नयनांसी । साक्षात् प्रत्यक्षगोचर होसी । हें आश्चर्य मानसीं मज वाटे ॥ ७६ ॥ तो तूं म्हणिजे कोण कैसा । जो योगेश्वरीं श्रुतिडोळसां । अमळमानसांमाजी ठसा । भावनेचा पाडियला ॥ ७७ ॥ अविद्याबिम्बित चिदाभास । भवप्रवाहीं विषयाध्यास । जीवशब्दें त्या चैतन्यास । ब्रह्मवियोग दृढ झाला ॥ ७८ ॥ स्वस्वरूपविसरेंकरून । भवस्वर्गाचें वळघे रान । षड्विकार जन्म मरण । देह होऊन भोगीतसे ॥ ७९ ॥ संकल्पविकल्पाचें जाळ । तेणें त्रिपुटीं भवभ्रमशीळ । इंद्रियद्वारा देह बहळ । करवी तळमळ सुखदुःखीं ॥ १८० ॥ तापत्रयाची आहाळणी । इच्छी मृगजळाचें पाणी । इहामुत्रीं सुखशिराणी । भावूनि भ्रमणीं जो पडिला ॥ ८१ ॥ तो हा जेंवि चिदाभास । गुर्वर्केलब्ध श्रुतिडोळस । वास्तव आत्मत्वीं हव्यास । योगाभ्यास आदरी ॥ ८२ ॥ शमदमादि साधनकोटी । नित्यानित्यविवेकराहटी । इहामुत्रार्थविरागदृष्टि । जिणोनि त्रिपुटी दृढ होय ॥ ८३ ॥ सांख्यावबोधें व्यतिरेकज्ञान । तेणें अपरोक्षसमाधान । विसरावया भवभ्रमभान । मन उन्मन करी योगें ॥ ८४ ॥ प्राणप्रवृत्तिनिरोध । करणवृत्तींचा करी रोध । आसन

दृढावी सुबद्ध । ब्रह्मानंद लक्षुनी ॥ १८५ ॥ शनैः शनैः अभ्यासबळें । मानस उन्मन होऊनि वळे । प्रत्यगात्मतासाक्षित्व वितुळे । निःशेष मावळे भवभान ॥ ८६ ॥ अनादिअविद्याभ्रमें वियोग । तो जीव पावे ब्रह्मात्मयोग । तया योगाचे अनेक मार्ग । जाणती साङ्ग मुनिवर्य ॥ ८७ ॥ भक्तियोग ज्ञानयोग । अष्टाङ्गषडंग एकान्तयोग । कर्मयोग राजयोग । ऐसे अनेक योगपथ ॥ ८८ ॥ कोणा एका योगेंकरून । जीवब्रह्मांचें वियोगहरण । भवभ्रान्तीचें अस्तमान । योगसाधन इतुकेंचि ॥ ८९ ॥ ऐसे जे कां योगाग्रणी । उपनिषच्छ्रुति चक्षुस्थानीं । करूनि अमळ हृदयभुवनीं । तुजलागूनी भाविती ॥ १९० ॥ तो तूं माझिया अक्षिपथा । प्रत्यक्ष झालासि जी समर्था । म्हणसी भवभ्रमाआंतौता । मजही तत्त्वता न मानिसी कां ॥ ९१ ॥ इये शंकेच्या निरासा । कथितों माझी अधिकारदशा । ते ऐकिल्या प्रत्यय सहसा । बाणेल परेशा वस्तुत्वें ॥ ९२ ॥ उरु म्हणिजे बहळ व्यसन । अंधकूपीं जें सरठपण । तेणें दुःखें अंध नयन । वास्तव वयुन मावळलें ॥ ९३ ॥ दुःखान्धबुद्धि ऐशिया मज । प्रत्यक्ष झालासि तूं अधोक्षज । हेंचि आश्चर्याचें बीज । मानीं चोज यास्तव मी ॥ ९४ ॥ ज्याहूनि अर्वाक ज्ञान अक्षज । तो तूं प्रत्यक्ष अधोक्षज । देखिलासी तेजःपुंज । विचित्र चोज हें गमतें ॥ १९५ ॥ दृश्य भवभान गोचर । तेंवि मी म्हणसी दृश्यतर । अक्षजज्ञानाहूनि पर । कैंवि साचार तुज कळलों ॥ ९६ ॥ तरी तूं ज्यासी दृश्य होसी । तद्भवबंधा मोक्षण करिसी । ऐसी प्रतीति श्रुतिविश्वासीं । अनुभवासी मज आली ॥ ९७ ॥ अंधकूपीं सरठदेही । कित्येक युगें दुःखप्रवाहीं । तो तव दर्शनमात्रें पाहीं । दिव्यविग्रही झालों असें ॥ ९८ ॥ अंधकूपीं दुःखद्भव । अपवर्ग तन्मोक्षाचें नांव । प्रत्यक्ष लाधलों मी स्वयमेव । हा इतरांसि अनुभव काय पुसो ॥ ९९ ॥ योगेश्वरही श्रुतिलोचनीं । साधनसंपन्न अमलात्मभुवनीं । भाविती तो प्रत्यक्ष नयनीं । गोचर म्हणोनि चित्र गमे ॥ २०० ॥ केवळ जळाची शीतळता । जळावेगळी चढली हाता । कीं तेजाची प्रकाशकता । जे तेजावांचूनि आतुडली ॥ १ ॥ किंवा धरणीचें धारण्य । आंगीं बाणलें जडत्वावीण । कीं पवनाचें वहिलेपण । स्पर्शावांचून आंगविलें ॥ २ ॥ कीं व्योमाचें व्यापकत्व । शून्यावीण सर्वगतत्व । उपलब्ध एवढें महत्त्व । तव दर्शनें भोगितसें ॥ ३ ॥ तो तूं दृश्यासमान कैसा । गोचर म्हणों भो जगदीशा । भक्तिप्रेमोत्कर्षासरिसा । बोधी परेशा तें ऐका ॥ ४ ॥

देवदेव जगन्नाथ गोविन्द पुरुषोत्तम । नारायण हृषीकेश पुण्यश्लोकाच्युताव्यय ॥ २७ ॥

सुकृतवैशिष्ट्यें द्युतिमंत । देव ऐसा त्या संकेत । तद्द्युतिद्योतक तूं अनंत । देवदेव चिन्मूर्ति ॥ २०५ ॥ जगनामाचें अक्षरयुग्म । जननगमनशील परम । जायमानचि गमनकाम । जग हें नाम तयासी ॥ ६ ॥ तया जगाचा तूं नाथ । जगाचि माजी सदोदित । नांदसी जननगमनातीत । जग होवोनि जगदीशा ॥ ७ ॥ गोविन्दशब्दें वेदवेत्ता । गोविन्दशब्दें गोत्रधर्ता । गोविन्दशब्दें करण-

देवता । निजात्मसत्ता प्रकाशक तूं ।। ८ ।। क्षराक्षरपुरुषव्यक्ति । माया अविद्या प्रकाशती । तन्निरासीं सन्मात्रज्योति । पुरुषोत्तम तूं परमात्मा ।। ९ ।। चतुर्विंशति तत्त्वचिन्मय । नारा अभिधान त्यातें होय । तयें अयनीं क्रीडसि सन्मय । नारायण या संकेतें ।। २१० ।। हरि हर ब्रह्मा वरुणार्कचंद्र । निर्ऋति प्रजेश इन्द्रोपेन्द्र । या कारणांतें व्यापूनि पर । हृषीकेश तूं गोस्वामी ।। ११ ।। श्लोक शब्दें अमळ कीर्ति । पुण्यरूप निगम गाती । तयेसी आश्रय तूं गोपति । पुण्यश्लोक गोमंता ।। १२ ।। तिर्यङ्मय विकारें च्यवती । पुण्यक्षयीं दिविजां च्युति । अच्युतनामा तूं श्रीपति । क्षयसंसृतिविरहित ।। १३ ।। संचितार्थीं होय व्यय । अगाध अक्षय तूं अव्यय । तुजमाजी जन्मूनि कालत्रय । वर्तोनि लय पावतसे ।। १४ ।। जय अव्यया श्रीअच्युता । देवदेवा जगन्नाथा । पुण्यश्लोक गोगणवेत्ता । पुरुषोत्तमा नारायणा ।। २१५ ।। इत्यादिनामीं संबोधून । हृषीकेश जो श्रीकृष्ण । त्यातें करी अनुज्ञापन । तें सज्जन परिस तूं ।। १६ ।।

अनुजानीहि मां कृष्ण यांतं देवगति विभो । यत्र क्वापि सतश्चेतो भूयान्मे त्वत्पदास्पदम् ।। २८ ।।

विभो समर्था कृष्णा तूंतें । इतुकें प्रार्थन माझें निरुतें । अनुलक्षूनि जाणिजे मातें । देवगतीतें गेलों हें ।। १७ ।। देवलोकावाप्ति झाली । मग जाणवणी किमर्थ केली । ऐसें म्हणसी तरी ऐकिली । पाहिजे विनति हे माझी ।। १८ ।। देवलोकीं अथवा कोठें । नेलिया कर्मफळें निर्दिष्टें । ते ते ठायीं मज वैकुण्ठें । अभीष्टनिष्ठे ओपावें ।। १९ ।। तुझी अभीष्ट निष्ठा काय । ऐसें पुसती यादवराय । तरी मम चित्ता तुमचे पाय । वांचूनि विषय आन नसो ।। २२० ।। तव पदकंजास्पद मम चित्त । सदैव असो भ्रमरभूत । यावीण विषय वमनवत । रुचिर न होत वैरस्यें ।। २१ ।। माझी प्रार्थना इतुकी पाहीं । म्हणसी द्यावया सामर्थ्य नाहीं । तरी तें नमनें तुझ्या ठायीं । प्रतिपादूनियां देतसें ।। २२ ।।

नमस्ते सर्वभावाय ब्रह्मणेऽनंतशक्तये । कृष्णाय वासुदेवाय योगानां पतये नमः ।। २९ ।।

जात होत्साता सुरभुवना । नमिता झाला जनार्दना । नमनात्मकां संबोधनां । माजी प्रार्थना सुचवीतसे ।। २३ ।। सर्वभावा तुजकारणें । नमन माझें अनन्यपणें । सर्व जगाचें जन्मणें । होय जेणें तो नमो ।। २४ ।। जन्म स्थिति लय सर्व जगा । तुझेनि होतसे श्रीरंगा । एव्हडें सामर्थ्य असतां कां गा । नास्तिविभागा आणावी ।। २२५ ।। नमो ब्रह्मणे या प्रणिपातें । सर्व कर्तृत्व तुजआतौतें । होत जातां अविकारतें । कर्तृत्वकलंक न शिवे पैं ।। २६ ।। कर्तृत्व असोनि विकार न शिवे । काय म्हणोनि पुसिजेल देवें । तरी अनंत शक्तये ऐसिया नांवें । नमनभावें प्रतिपादी ।। २७ ।। अनंतशक्ति जिच्या आंगीं । ते मूळमाया शक्ति तन्वंगी । ज्याची त्या तुजकारणें वेगीं । एनसभंगीं मी नमितों ।। २८ ।। वासुदेवाकारणें नमो । त्याचिया नामें सामर्थ्य गमो । सर्वभूताश्रयत्वें रमो । विनति माझी प्रभु-हृदयीं ।। २९ ।। कोंवि म्हणसी भूताश्रय । तरी घटमठादि बहुविध कार्य । तरी त्या मृत्तिकेवीण काय ।

अन्य आहे उपादान ॥ २३० ॥ मृत्तिका जड अचेतन । तूं चैतन्यघन श्रीकृष्ण । यालागीं तुजकारणें नमन । नमो कृष्णाय म्हणोनी ॥ ३१ ॥ कृष हा भूवाचक शब्द । नकार निवृत्तिवाचक सिद्ध । तया दोहींचें ऐक्य विशद । ब्रह्म प्रसिद्ध कृष्ण तो तूं ॥ ३२ ॥ सच्चिदानंदघनाभिव्यक्त । तो हा कृष्णनाम-संकेत । त्या तुजकारणें साष्टाङ्ग नमित । मत्प्रार्थित पूर्ण करीं ॥ ३३ ॥ तुझेनि सत्तायोगबळें । सर्व कर्तृत्वीं माया खेळे । ऐसिया तुझिये योगलीले । माजी नाकळे कैं काय ॥ ३४ ॥ योगानां पतये नमः । याचि मंत्रें सूचिली गरिमा । अभीष्ट देईं पुरुषोत्तमा । तव पादपद्मा चित्त रमो ॥ २३५ ॥ ऐसिया परी द्वारकानाथ । नृगें वंदिला आनंदभरित । पुढें वर्तला जो वृतान्त । तो शुक कथित कुरुवर्या ॥ ३६ ॥

श्रीशुक उवाच – इत्युक्त्वा तं परिक्रम्य पादौ स्पृष्ट्वा स्वमौलिना ।
अनुज्ञातो विमानाग्र्यमारुहत्पश्यतां नृणाम् ॥ ३० ॥

इतुकी करूनिया प्रार्थना । मुकुटें स्पर्शोनि श्रीकृष्णचरणां । सप्रेम घालूनि प्रदक्षिणा । पुसूनि विमाना वळघला ॥ ३७ ॥ पाहत असतां नरमंडळी । आज्ञा देतांचि श्रीवनमाळी । विमानारूढ सुकृत-शाळी । मयूखमाळीसम गेला ॥ ३८ ॥ यदुकुमारादि सकळ जनीं । प्रत्यक्ष देखिलें असतां नयनीं । प्रतीतिपूर्वक त्यांलागुनी । चक्रपाणि बोधितसे ॥ ३९ ॥

कृष्णः परिजनं प्राह भगवान्देवकीसुतः । ब्रह्मण्यदेवो धर्मात्मा राजन्याननुशिक्षयन् ॥ ३१ ॥

कृष्णाज्ञेनें जो जन वर्ते । परिजन ऐसें म्हणिजे त्यातें । भगवान बोलता झाला तेथें । त्या सर्वांतें कळावया ॥ २४० ॥ दैवी संपत्तीमाजी संभव । यालागीं देवकीसुत हें नांव । एऱ्हवीं केवळ ब्रह्मण्य-देव । धर्मस्थापक धर्मात्मा ॥ ४१ ॥ राजन्य म्हणिजे भूपाळगणां । शिकवणेच्या बोले वचना । तें तूं ऐकें कुरुभूषणा । मात्स्यीरमणा परीक्षिति ॥ ४२ ॥

दुर्जरं बत ब्रह्मस्वं भुक्तमग्नेर्मनागपि । तेजीयसोऽपि किमुत राज्ञामीश्वरमानिनाम् ॥ ३२ ॥

बत ऐसिया खेदेंकरून । परमाश्चर्यें चमत्कारून । सामंत राजे प्रजाजन । बोले भगवान शिकवण त्यां ॥ ४३ ॥ स्व ऐसें धनाचें नांव । तें मृच्चर्माम्बरलोहादि सर्व । रस औषधि विषय वैभव । जें कवळी जीव आत्मत्वें ॥ ४४ ॥ मृत्तिका म्हणिजे क्षेत्रवृत्ति । चर्म म्हणिजे हयगोहस्ती । अंबरें म्हणिजे आच्छादनार्थी । वसनजाति उच्चावच ॥ २४५ ॥ अष्टलोह मुद्राभाजनें । गोरस मधु आसव पानें । औषधि म्हणिजे अनेक धान्यें । विषयविभव तें मान्यत्व ॥ ४६ ॥ एवं स्वशब्दें हें आघवें । ब्रह्मस्व ब्राह्मणाचें जाणावें । बलात्कारें कोणा जिरवे । ऐसा नाठवे त्रिकाळीं ॥ ४७ ॥ सर्वभक्ष अग्नीसि नांव । तया न जिरवे ब्रह्मस्व । तेजिष्ठाहूनि विशेष गौरव । तेजिष्ठत्व विप्राचें ॥ ४८ ॥

बृहस्पतीचें चर्मधन । चंद्रें केलें ताराहरण । तो क्षयरोगें झाला रुग्ण । सलांछन अद्यापि ॥ ४९ ॥ विष्णु साक्षात् परशुराम । क्षत्रकुळांचा करूनि होम । पृथ्वीदानें द्विजोत्तम । पूर्णकामें तोषविले ॥२५०॥ पुन्हा पदीं संलग्न माती । दत्तापहरणदोषावाप्ति । ब्रह्मस्वग्रहणीं भावूनि भीति । याचिली क्षिति रत्नाकरा ॥ ५१ ॥ शिवें करितां ब्रह्मस्वहरण । तत्काळ पावला लिंगपतन । भगाङ्कित झाला संक्रंदन । सहस्रनयन द्विजरोषें ॥ ५२ ॥ ऐसी ब्रह्मादिकांची कथा । तेथ क्षत्रियां अभिमानवंतां । ब्रह्मस्व न जिरे ऐसें म्हणतां । काय अपूर्व मानावें ॥ ५३ ॥ आम्ही राजे नरेश्वर । ऐसा वाहती जे अहंकार । ब्रह्मस्वहरणीं नरक घोर । पावती दुस्तर पितरेंसीं ॥ ५४ ॥ जमदग्नीची यज्ञधेनु । नेली कार्तवीर्यें हरून । यास्तव क्षत्रकुळनिर्दळन । पावला मरण जगज्जेता ॥ २५५ ॥ स्वतेजें अग्नि त्रिजग जाळी । तो ब्रह्मस्वा कांपे चळीं । तेजिष्ठाहूनि महाबळी । म्हणे वनमाळी ब्रह्मस्व ॥ ५६ ॥ गरुडें गिळितां निषादगण । त्यामाजी गिळितां एक ब्राह्मण । न गिळवे कंठीं पोळला पूर्ण । मग उगळून टाकिला ॥ ५७ ॥ ऐसें एकैक सांगों किती । ब्रह्मस्व गिळावयाची शक्ति । कोणा आंगीं न दिसे पुरती । म्हणे श्रीपति स्वजनांतें ॥ ५८ ॥

नाहं हालाहलं मन्ये विषं यस्य प्रतिक्रिया । ब्रह्मस्वं हि विषं प्रोक्तं नास्य प्रतिविधिर्भुवि ॥ ३३ ॥

सागरसंभव हाळाहळ । तें मी न मनीं विष प्रबळ । अमृतादि ओषधि उतार बहळ । केलिया तत्काळ तें निरसे ॥ ५९ ॥ हाळाहळहूनि विषतर । तें ब्रह्मस्वचि महाक्रूर । ज्यासी न चलेचि प्रतिकार । निर्जर विधि हर करितांही ॥ २६० ॥ केतुलें विषाचें कठिनपण । तेंही ऐक करितों कथन । ब्रह्मस्व विषाहूनि दारुण । तें लक्षण अवधारा ॥ ६१ ॥

हिनस्ति विषमत्तारं वह्निरद्भिः प्रशाम्यति । कुलं समूलं दहति ब्रह्मस्वारणिपावकः ॥ ३४ ॥

विष मारक विषभक्षका । त्याचेनि न मारवेचि आणिका । अग्नि दाहक सांसर्गिका । न जळे पावका अस्पृष्ट ॥ ६२ ॥ विष सेवणारा मात्र मरे । परंतु पूर्वापर वंश उरे । ब्रह्मस्वारणिजपापाङ्गारें । कुळचि संहरे संपूर्ण ॥ ६३ ॥ दावानळें तृणादि जळती । समूळ न जाळी तो त्यांप्रति । मूळां रक्षण करी क्षिति । पुन्हा उत्पत्ति त्यां होय ॥ ६४ ॥ ब्रह्मस्वारणिजपावक दाही । तेथूनि मूळाचें उरणें नाहीं । समूळ प्रवर्ते कुळक्षयीं । ब्रह्मादिकांही अनावर ॥ २६५ ॥ विष भक्षितां व्यापी तनु । तेणें तनूचें होय पतन । मग तो स्वकृत पाप पुण्य । भोगी जन्मोन यथोचित ॥ ६६ ॥ तैसा नव्हे ब्रह्मस्वहर्ता । नरकीं कुळाचें पतनकर्ता । कृतपुण्याची नुरे वार्ता । दोष पर्वतासम वाटे ॥ ६७ ॥ कुळेंसहित अंधतमीं । पडे घोर नरकीं दुर्गमीं । चंद्रसूर्य भ्रमती व्योमीं । नरकीं कृमि तोंवरी तो ॥ ६८ ॥ जळें पावक प्रशम पावे । ब्रह्मस्वारणिज तैसा नव्हे । हें सर्वांसी असो ठावें । विशेष जाणावें मामकीं ॥६९॥ ऐसें सांगूनि साधारण । यावरी कथी व्यवस्थाकथन । तें सज्जनीं कीजे श्रवण । सावधान होवोनियां ॥२७०॥

ब्रह्मस्वं दुरनुज्ञातं भुक्तं हंति त्रिपूरुषम् । प्रसह्यातिबलाद्भुक्तं दश पूर्वान्दशापरान् ।। ३५ ।।

दुरनुज्ञात जें ब्रह्मस्व । स्त्रीपुरुषांचा पुसी ठाव । दुरनुज्ञात कासया नांव । तोही भाव अवधारा ।। ७१ ।। काळनियम काळान्तरनियम । सत्यप्रतिज्ञापत्रीं नाम । घालूनि ब्रह्मस्व नेदी अधम । दुरनुज्ञात तें म्हणिजे ।। ७२ ।। ऐसिया ब्रह्मस्व बुडविणारा । पुत्रपौत्रेंसीं यातना घोरा । आणि जो करूनि बलात्कारा । ब्रह्मस्वहर्ता दुरात्मा ।। ७३ ।। पितृपितामहादि पूर्वजदशक । पुत्र-पौत्रादि अपर दशक । तयांसहित एकवीस पुरुष । कुंभीपाक भोगिती ।। ७४ ।। बलात्कारें ब्रह्मस्वहरण । तस्करावीण करील कोण । म्हणाल तरी तें करा श्रवण । म्हणे भगवान स्वजनातें ।। २७५ ।।

राजानो राजलक्ष्म्यंधा नात्मपातं प्रचक्षते । निरयं येऽभिमन्यंते ब्रह्मस्वं साधु बालिशाः ।। ३६ ।।

मनुष्यलोकीं मनुष्यदेव । राजमान राजवैभव । यालागीं राजे हें ज्यांचें नांव । प्रजा सर्व जन ज्यांच्या ।। ७६ ।। ऐसे लक्ष्मीमदान्ध राजे । नरकपाताचे न धरूनि लाजे । ब्रह्मस्व वांछिती अभिलाषकाजें । विषयओझें भोगावया ।। ७७ ।। आपणा म्हणविती सज्ञान । बलात्कारें ब्रह्मस्वहरण । करूनि यथेष्ट विषयाचरण । श्रीसंपन्न मानिती ।। ७८ ।। ब्रह्मस्वहरणें भोगिती विषय । विषयरूपी ते केवळ निरय । सम्यक्मूर्ख जे मानिती प्रिय । म्हणविती राय भूलोकीं ।। ७९ ।। आपणां पुढें नरकीं पतन । हें न देखती उघडूनि नयन । ऐसे सम्यक्मूर्ख दुर्जन । ते ब्रह्मस्वहरण बळें करिती ।।२८०।। पूर्वोक्त ब्रह्मस्वहारकांप्रति । कियत्काळ नरकावाप्ति । पुसों इच्छी जों परीक्षिति । हें जाणोनि सुमति शुक सांगे ।। ८१ ।।

गृह्णंति यावतः पांसून्क्रंदतामश्रुबिंदवः । विप्राणां हृतवृत्तीनां वदान्यानां कुटुंबिनाम् ।। ३७ ।।
राजानो राजकुल्याश्च तावतोऽब्दान्निरंकुशाः । कुंभीपाकेषु पच्यंते ब्रह्मदायापहारिणः ।। ३८ ।।

राया कुरुकुळसरोजतरणि । पुसूं इच्छिसी अंतःकरणीं । तेंचि निरूपी चक्रपाणि । स्वजनालागूनि स्वहितार्थ ।। ८२ ।। जितुक्या ब्राह्मणाच्या वृत्ति । भूमिप्रमुखा हिरूनि घेती । त्या भूमीची परमाणुगणति । नरक भोगिती दिव्याब्दें ।। ८३ ।। हृतवृत्ति जे विप्रवर्य । रुदती सकुटुंब तत्समुदाय । जितुके पांसु तदश्रुतोय । भिजवी निरय तोंवरि त्यां ।। ८४ ।। त्या विप्राचे कुटुंबगण । रुदती करितां वृत्तिहरण । तया अश्रुबिंदूंचें पतन । पांसुपरमाणु जे भिजवी ।। २८५ ।। तितुक्या ब्रह्मयाचिया समा । वृत्तिहारका दुष्टा अधमा । नरकावाप्ति अंधतमा । सबाह्य काळिमा वरपडती ।। ८६ ।। विप्रवर्य आणि वदान्य । कुटुंबवत्सल श्रुतिसंपन्न । त्यांचें करिती वृत्तिहरण । मग ते दुखवून आक्रंदती ।। ८७ ।। त्यांचे जितुके श्वासोच्छ्वास । ब्रह्मस्वहारकां काळपाश । होवोनि नेती अंधतमास । सकुळ अशेष पूर्वापर ।। ८८ ।। राजे आणि राजमंडळ । राजवर्गी नियोगी सकळ । वृत्तिहरणदोषें सकुळ । भोगिती केवळ कुंभीपाक ।। ८९ ।। अन्याय करितां न शंकती । निरङ्कुश होवोनि ब्रह्मस्व हरिती । कुंभीपाकीं ते अवघे पचती । ब्रह्मदायापहारी जे ।। २९० ।। म्हणती शासनकर्ता कोण । आम्ही प्रतापी श्रीसंपन्न ।

निर्भय होऊनि न गणिती पतन । ब्रह्मस्वहरणकारक जे ॥ ९१ ॥ पुढती त्यांची विपयव्यवस्था । स्वमुखें श्रीकृष्ण होय वदता । तें तूं ऐकें कौरवनाथा । सज्जनचित्ता द्रावक जे ॥ ९२ ॥

स्वदत्तां परदत्तां वा ब्रह्मवृत्ति हरेच्चयः । षष्टिवर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥ ३९ ॥

स्वयें दिधली ते स्वदत्ता । आणिकें दिधली ते परदत्ता । ऐसिये विप्रवृत्तीचा हर्ता । नरकभोक्ता पैं होय ॥ ९३ ॥ दिव्यशब्दें सहस्र साठी । कृमि होऊनि विष्ठाघटीं । पचतां भोगी दुःखकोटी । दुष्ट कपटी दुर्जन तो ॥ ९४ ॥ एवं झालिया पापक्षय । पुढती मानवयोनि होय । तेथही पापप्रवृत्ति लाहे । नरकनिचय पुन्हा भोगी ॥ २९५ ॥ ब्रह्मस्वहरणाची दुर्जरता । कथिली संक्षेपें व्यवस्था । पश्चात्तापें मन्मथजनिता । म्हणे मज सर्वथा हें न घडो ॥ ९६ ॥

न मे ब्रह्मधनं भूयाद्यद्गृद्ध्वाऽल्पायुषो नराः । पराजिताश्च्युता राज्याद्भवंत्युद्वेजिनोऽहयः ॥ ४० ॥

ब्रह्मस्वहरणाची अभिकांक्षा । मजला न हो भो जगदीशा । पश्चात्ताप द्वारकाधीशा । होतां ऐसा स्वयें बोले ॥ ९७ ॥ ब्रह्मधनाभिकांक्षेसाठीं । अल्पायुषी जननीपोटीं । जन्मोनि मरती उठाउठीं । जन्मकोटिपर्यंत ॥ ९८ ॥ आम्ही प्रतापी राजेश्वर । म्हणऊनि होती ब्रह्मस्वहर । तेणें भोगिती नरक घोर । तोही प्रकार हरि बोले ॥ ९९ ॥ पराभव पावती नीचा समरीं । राज्यापासूनि च्यवती त्वरीं । विमुख होय त्यां ऐश्वर्यश्री । यशवीरश्रीसमवेत ॥ ३०० ॥ पडती नीचांचे बंधनीं । यातना भोगिती निशिदिनीं । घेऊं नेदिती अन्न पाणी । करिती जाचणी रक्षक जे ॥ १ ॥ राज्यवैभव भोगिलें पूर्वीं । तें आठवूनि झुरती जीवीं । नीच दंडिती गतवैभवीं । एवढी पदवी ब्रह्मस्वें ॥ २ ॥ बंधीं पीडतां आयुष्यक्षय । विपत्तिरूप मरण होय । प्रेतसंस्कार कैंचा काय । ओढूनि पाय टाकिती ॥ ३ ॥ अंत्यजादि नीच गण । रज्जुखंडें पद बांधून । कुत्सित स्थानीं विसर्जून । कथिती येऊन प्रभूपाशीं ॥ ४ ॥ ब्रह्मस्वहरणें ऐसीं मरणें । ब्रह्मस्वहर्तयांकारणें । जन्मान्तरीं सर्प होणें । जनांकारणें भयजनक ॥ ३०५ ॥ जन्मोद्वेजी सर्प घोर । विश्वशत्रु महाथोर । ब्रह्मस्वहर्ते नर पामर । भोगिती दुस्तर भवदुःखें ॥ ६ ॥ सर्पशरीरीं तळमळ । सर्वदा जाची उदरशूळ । कंठीं विषाची जळजळ । क्षुधा विकळ तनु करी ॥ ७ ॥ बिळामाजी निरोधन । बाहीर वागूं नेदिती जन । कोणी देखतां थोर लहान । अवघे हनन करा म्हणती ॥ ८ ॥ तयां भेणें पळतां अव्हाटा । आंगा ओरखडे अवचट कांटा । मग त्या कंटकक्षताचे वाटा । देती कष्टा पिपीलिका ॥ ९ ॥ बाहीर निघतां गृध्रादि विहग । झडपूनि गगना नेती सवेग । बिडालनकुळादि शत्रुवर्ग । करिती लाग धरावया ॥ ३१० ॥ ऐसियापरि मृत्यु होय । पुढती सर्पयोनिच लाहे । जेथ अनेक दुःखअपाय । ते ते ठाय अभिष्टी ॥ ११ ॥ ब्रह्मस्वहरणीं कष्ट ऐसे । स्वमुखें वदतां कृष्ण त्रासे । रोमाञ्चित सर्वाङ्ग दिसे । सकंप होतसे अनुतापें ॥ १२ ॥ पुढती म्हणे ये कळिकाळीं । राजे ब्रह्मस्वहरणशाळी । होवोनि पडती क्लेशबहळीं । घोर नरकीं तें असो ॥ १३ ॥

आतां मामकां मदेकशरणां । रक्षावयाची मजला करुणा । म्हणोनि कथितों सदाचरणा । सावध श्रवणा बैसावें ॥ १४ ॥

विप्रं कृतागसमपि नैव द्रुह्यत मामकाः । घ्नंतं बहु शपंतं वा नमस्कुरुत नित्यशः ॥ ४१ ॥

सापराधही विप्र देखोनी । द्रोह न करावा मामकीं जनीं । सम्मानिजे अभिवंदूनी । हे मम वाणी ध्रुव माना ॥ ३१५ ॥ मारिता अथवा शाप देता । पैशून्य दुरुक्ति बहुवस वदता । न्यून पूर्ण उपपादिता । तरी तो तत्वता द्विज वंद्य ॥ १६ ॥ नुच्चारूनि त्याचे दोष । सम्मानूनि देइजे तोष । नित्य नमस्कारिजे त्यास । मामकांस हे ममाज्ञा ॥ १७ ॥ मामकीं चालिजे माझिये चाली । ज्यातें जितुकी आज्ञा केली । ते पाहिजे चालविली । सूचना कथिली जातसे ॥ १८ ॥

यथाऽहं प्रणमे विप्राननुकालं समाहितः । तथा नमत यूयं च योऽन्यथा मे स दंडभाक् ॥ ४२ ॥

मी श्रीकृष्ण ब्राह्मणाप्रति । नमस्कारितों ऐसिये रीती । समाहित करूनि इंद्रियवृत्ति । विनयभक्ति समर्याद ॥ १९ ॥ उषःकाळापासूनि विप्र । पुढती शयनीं लागे नेत्र । तंववरी यथाकाळीं द्विजवर । नमिजे सर्वत्र ममाज्ञा ॥ ३२० ॥ जिये काळीं जिये ठायीं । विप्र भेटले असतां पाहीं । नमस्कारूनि प्रेमप्रवाहीं । भजिजे सर्वांहीं मामकीं ॥ २१ ॥ ऐसी ममाज्ञा वंदूनि शिरीं । जो विप्रांचा सम्मान करी । त्याहूनि प्रियतम मज निर्धारीं । नाहींच वैखरी हे सत्य ॥ २२ ॥ शङ्कर अभिन्न मम हृदयस्थ । त्याहूनि मज तो प्रियतम आप्त । केवळ आत्माचि तो यथार्थ । म्हणतां किमुत परिहार ॥ २३ ॥ देवकीवसुदेवपदांची शपथ । करूनि वदतों इत्थंभूत । ब्राह्मणभजनें जो सिद्धार्थ । मी सनाथ त्याचेनि ॥ २४ ॥ ऐसी माझी आज्ञा न मनी । केवळ विषयी देहाभिमानी । ब्रह्मद्वेष्टा ब्रह्मस्वहरणी । ब्राह्मणभजनीं विमुख जो ॥ ३२५ ॥ ऐसी माझी आज्ञा न मानी । केवळ विषयी देहाभिमानी । ब्रह्मद्वेष्टा ब्रह्मस्वहरणी । ब्राह्मणभजनीं विमुख जो ॥ २६ ॥ तो दण्डार्ह सर्वांपरी । सर्वदा दंडिजे यमकिंकरीं । यक्षपिशाचापस्मारीं । भूतीं खेचरीं दण्डावा ॥ २७ ॥ सृष्टिसृजन ब्रह्मा कर्ता । शेवटीं रुद्र तत्संहर्ता । मी सृष्टीचा प्रतिपाळिता । तो मज तत्त्वता अपाल्य ॥ २८ ॥ पाल्यमान सृष्टींतून । ब्रह्मद्वेष्टा तो दुर्जन । म्यां उपेक्षिला हें जाणून । विघ्नप ग्रहगण दण्डित त्या ॥ २९ ॥ दरिद्र दुर्दशा अवदशा । कलह कर्कशा क्षुधातृषा । चिरकाळ तयाचिया सहवासा । तृष्णा दुराशा सह जाती ॥३३०॥ निंदा तयाचे वदनीं वसे । अपयश तया व्यापूनि असे । त्याच्या दर्शनें सुकृत नासे । समस्त दोषें वरिला तो ॥ ३१ ॥ असो त्या ब्रह्मद्वेष्ट्याची कथा । विशेष ममाज्ञेचा हंता । तद्व्याख्यानीं वाग्देवता । कंपायमान होतसे ॥ ३२ ॥ यालागीं मामकीं सर्व जनीं । मस्तकीं ममाज्ञा अभिवंदूनी । सादर असतां विप्रार्चनीं । विघ्नें देखूनि त्यां पळती ॥ ३३ ॥ ते होत कां भलते याति । त्यांच्या स्मरणें विजयावाप्ति । दर्शनमात्रें जड उद्धरती । ते द्विजभक्ति मजतुल्य ॥ ३४ ॥ हृदयीं दक्षिणदेशीं

जाण। मी मिरवितसें ब्राह्मणचरण। द्विजार्चकाचें पदभूषण। वामभागीं धरूं इच्छीं ॥ ३३५ ॥ असा ऐसी सहस्रवरी। विप्रार्चकांची वदतां थोरी। तृप्ति न मनी मम वैखरी। म्हणे श्रीहरि स्वानंदें ॥३६॥ यावरी नृगकथोपसंहरण। ब्रह्मस्वहरणाचें अनुस्मरण। देऊनि बोले जनार्दन। कीजे श्रवण तें संतीं ॥३७॥

ब्राह्मणार्थो ह्यपहृतो हर्तारं पातयत्यधः। अजानंतमपि ह्येनं नृगं ब्राह्मणगौरिव ॥ ४३ ॥

नेणोनिही ब्राह्मणार्थ। जरी अपहरिला होऊनि भ्रान्त। तरी हर्तयातें अधःपात। देईल निश्चित नृगगोपरी ॥ ३८ ॥ नृगें ब्राह्मणा दिधली धेनु। ते पळाली त्यापासून। कळपीं मिळाली हें नेणून। ते दिधली दान अन्यविप्रा ॥ ३९ ॥ इतुक्या अज्ञात दोषासाठीं। अंधकूपीं दुःखकोटी। सरठदेहाची अवगूनि यष्टि। म्हणे जगजेठी कळलें कीं ॥ ३४० ॥ द्वारकावासियांलागूनी। प्रत्यक्ष प्रत्यय दावूनि नयनीं। ब्रह्मस्वहरणाची काहणी। उपसंहारिली ते ऐका ॥ ४१ ॥

एवं विश्राव्य भगवान्मुकुन्दो द्वारकौकसः। पावनः सर्वलोकानां विवेश निजमंदिरम् ॥ ४४ ॥

एवं म्हणिजे ऐसियापरि। ब्रह्मस्वहरणदोषाची थोरी। नेऊनि घाली नरकीं घोरीं। हें श्रीहरि बोलूनी ॥ ४२ ॥ द्वारकावासियां सर्व जनां। आणि समस्तां यदुनंदनां। भूमंडळींच्या भूपाळगणां। केलें श्रवणा ऐकवणें ॥ ४३ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न। सकळ सुखाचें अधिष्ठान। तो मुकुंद पुण्यपावन। आत्मभुवन प्रवेशला ॥ ४४ ॥ चारुदेष्ण साम्ब प्रद्युम्न। इत्यादि अवघे निज नंदन। वेष्टित समस्त यादवगण। स्वकीय भुवनाप्रति गेला ॥ ३४५ ॥ नृगचरित्रचमत्कार। ठायीं ठायीं नारीनर। कथिती ऐकती आश्चर्यतर। म्हणती अपार हरिगरिमा ॥ ३४६ ॥ ऐसी श्रीमद्भागवतीं। दशमस्कंधीं श्रीशुकोक्ति। परमाश्चर्यें परीक्षिती। ऐकोनि चित्तीं संतुष्ट ॥ ४७ ॥ म्हणे म्यां अपराध केला थोर। ब्राह्मणकंठीं सर्पशरीर। घातलें तद्दोषा परिहार। शापही सत्वर पावलों ॥ ४८ ॥ तेणें होतों अनुतापवंत। जाणोनि तुष्टला श्रीभगवंत। तुमच्या मुखें इत्थंभूत। श्रीभागवत परिसतसें ॥ ४९ ॥ आतां देइजे आशीर्वचन। मम वंशजांहीपासोन। न घडो ब्राह्मणाचें हेळण। विप्रार्चन घडो तयां ॥ ३५० ॥ ऐकोनि तथास्तु म्हणे शुक। तेणें संतुष्ट कुरुनायक। पुढिलिये कथेचा विवेक। ऐका सम्यक् संदर्भ ॥५१॥ पांसष्टाविया अध्यायामाजी। रेवतीरमण जावोनि व्रजीं। नंदप्रमुखां भेटूनि सहजीं। गोपीसमाजीं क्रीडेल ॥ ५२ ॥ तिये कथेचें करितां श्रवण। मात्रागमनादिदोषक्षालन। श्रवणमात्रें कैवल्यसदन। सुकृतसंपन्न लाहती ॥ ५३ ॥ प्रतिष्ठानीं गोदातटीं। एकनाथ साम्राज्यपीठीं। चिदानंदाचिये ताटीं। स्वानंदखोटी अमृताच्या ॥ ५४ ॥ गोविन्दहस्तें ते रसकवळ। सेवूनि दयार्णव लाडिवाळ। श्रोतयांलागीं

रसाळ बहळ । भरवी प्राञ्जळ श्रवणमुखीं ॥ ३५५ ॥ तें हें हरिवरदाख्यान । स्वानंदसुधारसभोजन । श्रवण करितां श्रोतेजन । परीक्षितीसमान तृप्त होती ॥ ३५६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां नृगाख्यानं नाम चतुःषष्टितमोऽध्यायः ॥ ६४ ॥

श्लोक ४४ ॥ ओवी-संख्या ३५६ ॥ एवं संख्या ४०० ॥
( त्रेसष्टावा अध्याय मिळून ओवी-संख्या ३०५१९ )

अध्याय चौसष्टावा समाप्त

कृष्णदयार्णवकृत

# ह रि व र दा

## अध्याय ६५ वा

श्रीगणेशाय नमः ।। श्रीगोविंदा कमलारंगा । नामें अव्याघकलिमलभंगा । प्रणतपालका निःसंगसंगा । हृत्पद्मभृंगा मम विभो ।। १ ।। चौसष्टीं अध्यायीं निरोपिलें । नृगाख्यान समर्थिलें । रामचरित्र उपाइलें । पांसष्टाव्यामाझारीं ।। २ ।। तये व्याख्यानीं सावधान । कृपापाङ्गें विलोकून । श्रोतयांचें हृत्पद्मवन । फुल्लारमान करावें ।। ३ ।। पांसष्टाव्यामाजी कथा । आरूढोनियां दिव्यरथा । राम गोकुळा झाला जाता । तें कुरुनाथा शुक सांगे ।। ४ ।।

श्रीशुक उवाच — बलभद्रः कुरुश्रेष्ठ भगवान्रथमास्थितः । सुहृद्दिदृक्षुरुत्कठ. प्रययौ नदगोकुलम् ।। १ ।।

शुक म्हणे गा कुरुश्रेष्ठा । हरिगुणश्रवणसुखैकनिष्ठा । भागवतांमाजी वरिष्ठा । ऐकें अभीष्टा हरिचरिता ।। ५ ।। भद्र म्हणिजे कल्याणरूप । ज्याचा वरिष्ठ बळप्रताप । बळभद्र ऐसा नामसंकल्प । करी सुतप गर्ग मुनि ।। ६ ।। दुष्टांआंगीं बळ वरिष्ठ । तें सज्जनालागीं दे कष्ट । बळभद्र हा साधुश्रेष्ठ । करी संतुष्ट निजबळें ।। ७ ।। दुष्ट बळिष्ठ संहारून । साधु सज्जन सुखसंपन्न । करी प्रजांचें पालन । म्हणूनि अभिधान बळभद्र ।। ८ ।। ऐसा ऐश्वर्यसंपन्न राम । स्यंदनीं योजूनि तुरंगम । सीर सौनंद चापोत्तम । पूर्ण इषुधि तालध्वज ।। ९ ।। सारथि बैसवूनियां धुरे । उत्कंठित स्नेहभरें । गोकुळा जाता झाला त्वरें । प्रेमादरें स्वजनाच्या ।। १० ।। कंसवधार्थ मथुरे आलों । तेंहूनि प्रासंगिकीं गुंतलों । यशोदानंदें प्रतिपाळिलों । तें विसरलों कृतघ्नवत् ।। ११ ।। ऐसी मानूनियां अवसरी । क्षणक्षणां अभ्यंतरीं । नंदयशोदा व्रजपुरीं । वांछा नेत्रीं पहावया ।। १२ ।। पूर्ववयस्य आपुले सखे । तयां भेटावें

सप्रेम हरिखें । त्यांचीं ऐकावीं सुखें दुःखें । आपुलीं स्वमुखें कथिजे त्यां ॥ १३ ॥ ऐसी अवसरी अंतरीं होती । परंतु कर्मीं उपस्थिती । आजिपर्यंत पडली गुंती । अवकाशप्राप्ति न फावोनी ॥ १४ ॥ आतां द्वारकादुर्गमदुर्गीं । निर्भय वसतां सात्वतवर्गीं । भूपाळ भंगले समरंगीं । वीरश्री आंगीं नागविती ॥ १५ ॥ दैत्य भौमप्रमुख बाण । निर्जरेंसहित संक्रंदन । जिंकिले स्वर्गीं प्रवेशोन । नर सामान्य तेथ किती ॥ १६ ॥ अमर पामर द्वारकापुरीं । सेवा करिती किंकरापरि । असुर मारिले त्यांच्या नारी । कृतकामारी यदुसदनीं ॥ १७ ॥ शत्रु कोणीच नुधवी माथा । त्रैलोक्यवैभव द्वारकानाथा । विधिहरनिर्जरवदनीं कथा । त्रिजगीं त्रिपथा पडिपाडें ॥ १८ ॥ कन्यापुत्रप्रपौत्रवरी । मंगल कृत्यें केलीं घरीं । सुहृद आप्त सहपरिवारीं । आनंदगजरीं दिन क्रमिती ॥ १९ ॥ ऐसियामाजी अवकाश करून । गोकुळाप्रति रेवतीरमण । स्वजनस्नेहें उचंबळून । रथीं बैसोन प्रवेशला ॥ २० ॥

परिष्वक्तश्चिरोत्कंठैर्गोपैर्गोपीभिरेव च । रामोऽभिवाद्य पितरावाशीर्भिरभिनंदितः ॥ २ ॥

रथनेमींच्या गजरेंकरूनी । वसंतोदयीं गोकुळभुवनीं । राम आला हें देखोनी । आले धावूनी व्रजवासी ॥ २१ ॥ चिर उत्कंठा वाहतां पोटीं । अवचित प्रत्यक्ष झाली भेटी । परमानंदें अमृतवृष्टि । समेत घटी त्यां गमली ॥ २२ ॥ उत्कंठित जे गोपगण । रामें त्यांसी देखतां दुरून । सवेग टाकूनियां स्यंदन । क्षेमालिङ्गन परस्परें ॥ २३ ॥ चिरकाळ हृदयीं कवळूनि धरिती । आनंदाश्रु नेत्रीं स्रवती । वयस्यमांदी मिळाली भंवती । सुदिन म्हणती धन्य हा ॥ २४ ॥ एकी कंठींची सोडिती मिठी । अपर घालिती तया पाठीं । एक धावूनि उठाउठी । कथिती गोठी नंदा पैं ॥ २५ ॥ वार्ता कथितियांलागून । यशोदा म्हणे तुमचें वदन । शर्करेनें करीन पूर्ण । रामदर्शन लाधलिया ॥ २६ ॥ स्नेहसंभ्रमें ते गोरटी । रामदर्शना उत्सुक पोटीं । तंव येरीकडे वयस्यथाटी । घालूनि मिठी आलिंगिती ॥ २७ ॥ ऐसा गोपजनांचा मेळा । नावेक रामें आलिंगिला । तंव गोपींचा समूह आला । स्नेह पाहिला अनावर ॥ २८ ॥ पूर्णचंद्रें भरे सागर । त्याहूनि हृदयीं प्रेमा सुभर । कोण कोठें नारी नर । ऐसा विचार नेणती ॥ २९ ॥ चिरकाळ बळरामाच्या कंठीं । गाढालिंगनें घालिती मिठी । स्वकर्णानिकटीं मर्दिती मुष्टि । सवेग दृष्टि उतरूनियां ॥ ३० ॥ एकी कुरवाळिती वदना । हनुवटी स्पर्शूनि चुंबिती आना । एकी परिमार्जिती नयना । मृगलोचना सप्रेमें ॥ ३१ ॥ एकी तृषिता चकोरनेत्रा । लक्षूनि प्राशिती रामगात्रा । एकी होऊनि भाषणपंरा । मधुरोत्तरा अनुवदती ॥ ३२ ॥ ऐसा गोपींचा अमोघ प्रेमा । हृदयीं जाणवला बळरामा । जेणें मोहिलें निष्कामकामा । अवाच्यगरिमा स्वजनाची ॥ ३३ ॥ विसर्जूनियां बल्लवगण । पुढें प्रवेशला नंदसदन । नंदयशोदा कळवळून । आलीं धांवून भेटावया ॥ ३४ ॥ येरें देखोनि मातापितरां । साष्टाङ्ग घालूनि नमस्कारा । येरीं अवघ्राण करूनि शिरा । प्रेमाश्रुधारा प्रोक्षिलें ॥ ३५ ॥ अखिलकल्याणाचें स्थान । त्रैलोक्यविजयी होईं म्हणोन । ऐसें देवोनि आशीर्वचन । हृदयीं कवळून त्या धरिती ॥ ३६ ॥

चिरं नः पाहि दाशार्ह सानुजो जगदीश्वरः । इत्यारोप्यांकमालिंग्य नेत्रैः सिषिचतुर्जलैः ॥ ३ ॥

ऐसें देऊनि आलिंगन । मग सदनशाळा प्रवेशोन । पूर्वरचित जें रम्यासन । बैसली घेऊन त्या तेथें ॥ ३७ ॥ पूर्वीं कवळिती बाळपणीं । तयाचि प्रेमें तये क्षणीं । अंकीं घेऊनि सौनंदपाणि । शिंपिती मूर्ध्नि अश्रुजळीं ॥ ३८ ॥ अनुजेंसहित आम्हां वृद्धां । तुम्हीं रक्षिलें बा सर्वदा । आमुचा विसर नसावा कदा । इत्यादि शब्दां अनुवदती ॥ ३९ ॥ आमुच्या दैवें तुम्ही भूपति । दशार्ह म्हणिजे यादवनृपति । झाले असतां आम्हांप्रति । रक्षणें निश्चिती तुम्हां उचित ॥ ४० ॥ नंदयशोदा ऐसें वदती । तंव व्रजवासियांची मांदी भंवती । मिळाली त्यातें रेवतीपति । कवणे रीति सम्मानी ॥ ४१ ॥

गोपवृद्धांश्च विधिवद्यविष्ठैश्चाभिवदितः । यथावयो यथासख्यं यथा सबधमात्मनः ॥ ४ ॥

गोपांमाजी गोपनायक । सुनंदोपनंदवृषभानुप्रमुख । एवं वडील ते सम्यक । भक्तिपूर्वक राम नमी ॥ ४२ ॥ आपणासमान वयसा ज्यांसी । क्षेमालिङ्गनें दिधलीं त्यांसी । धाकुटे वयस्य रामासी । नमिते झाले सप्रेमें ॥ ४३ ॥ जैसी वयसा ज्या शरीरीं । त्या तैसाचि सम्मान करी । पूर्वीं सख्य ज्यां जे परी । तदनुसारीं त्यांसी भजे ॥ ४४ ॥ ज्यांसीं मेहुणपणाचें नातें । विनयोत्तरीं तोषवी त्यांतें । मामा म्हणोनि मातुळातें । प्रेमभापणें गौरवी ॥ ४५ ॥ पूर्वीं मानिले होते चुलते । काका म्हणोनि आळवी त्यांतें । एवं यथासंबंध समस्तांतें । भजता झाला सुस्निग्ध ॥ ४६ ॥ ऐसे भेटले पशुप सकळ । तदुपरि पूर्ववयस्यमेळ । आला त्यांसी भापणशील । जाला केवळ तें ऐका ॥ ४७ ॥

समुपेत्याथ गोपालान्हास्यहस्तग्रहादिभिः । विश्रांत सुखमासीन पप्रच्छुः पर्युपागताः ॥ ५ ॥

मग त्या संवगडियांप्रति । सम्यक् म्हणिजे बरवे रीति । रामें येऊनि अतिप्रीती । केली विश्रांति संवादें ॥ ४८ ॥ हस्ता मेळवूनियां हस्त । संवादती आनंदभरित । विनोदवचनें हास्ययुक्त । पूर्वाचरितस्मारक जीं ॥ ४९ ॥ हुतुतु हमामा हुमली । पूर्ववयसेची भोजनकेली । विटीदांडू चेंडूफळी । क्रीडा पहिली आवडती ॥ ५० ॥ ऐसिया विनोदीं सुविश्रान्त । सुखासनीं आनंदभरित । जे जे आले गोप तेथ । ते त्या पुसती अनामय ॥ ५१ ॥ म्हणती रामा लावण्यधामा । वयस्यवत्सला पूर्णकामा । यादवेंसहित पुरुषोत्तमा । अनामयगरिमा असे कीं ॥ ५२ ॥ ऐसें पुसोनि रेवतीरमणा । मग आठवूनियां श्रीकृष्णा । बोलती तें तूं कुरुभूषणा । करीं कां श्रवणा म्हणे मुनि ॥ ५३ ॥

पृष्टाश्चानामयं स्वेषु प्रेमगद्गदया गिरा । कृष्णे कमलपत्राक्षे संन्यस्ताखिलराधसः ॥ ६ ॥

उग्रसेनादिकां सर्वां । अनामय पुसती ते यादवां । स्नेहगद्गदवाचा तेव्हां । प्रेमवैकल्य होत्सात्या ॥ ५४ ॥ कृष्णप्राप्ति अभीष्ट मानी । त्यावीण विषय न रुचे कोणी । वृत्ति वेधूनि गेलिया कृष्णीं ।

त्याग करूनि विषयांचा ॥ ५५ ॥ कमलपत्रायताक्ष हरि । सदैव आठवे अभ्यंतरीं । यालागीं विषयाचरणावरी । उद्योग न करी मन बुद्धि ॥५६॥ असो हा आमुचा कळवळा । परस्परें सप्रेमशीळां । जाणों येतसे गोपाळा । भक्तवत्सला भगवंता ॥ ५७ ॥ यावरी साकल्य वर्तमान । पुसते झाले बल्लवगण । तें तूं राया करीं श्रवण । म्हणे नंदन व्यासाचा ॥ ५८ ॥

कच्चिन्नो बांधवा राम सर्वे कुशलमासते । कच्चित्स्मरथ नो राम यूयं दारसुतान्विताः ॥ ७ ॥

बाळपणींच्या सखयांप्रति । आम्हां बान्धवांलागीं श्रीपति । स्त्रीपुत्रेंसीं तुम्ही समस्तीं । केव्हां चित्तीं स्मरिजेतें ॥ ५९ ॥ आमुचे सखे जे यादव । कुशल आहेत कीं ते सर्व । हरलें कंसभयाचें नांव । ऊर्जितदैवप्रसंगें ॥ ६० ॥

दिष्टचा कंसो हतः पापो दिष्टचा मुक्ताः सुहृज्जनाः । निहत्य निर्जित्य रिपून्दिष्टचा दुर्ग समाश्रिताः ॥८॥

ऊर्जित दैवप्रसंग झाला । यास्तव पापी कंस मेला । बंधापासूनि दैवें सुटला । सुहृदमेळा यदुवृष्णि ॥ ६१ ॥ पूतनादि कंसपर्यंत । दैवें मारूनि दुष्ट दैत्य । जरासन्धादि नृप समस्त । जिंकिले दृप्त समरंगीं ॥ ६२ ॥ दुर्गमदुर्ग द्वारकापुर । आक्रमूं न शकती असुरामर । तेथ केउते नर पामर । भूचर खेचर उरगादि ॥ ६३ ॥ रत्नाकराचा भंवता परिधि । ब्रह्माण्डगर्भींच्या सर्व समृद्धि । छप्पन्नकोटि यदुगण युद्धीं । जिणिती त्रिशुद्धी कृतान्ता ॥ ६४ ॥ ऊर्जित दैवाचें हें फळ । तेणें द्वारका दुर्ग प्रबळ । जोडलें तदाश्रयें यदुकुळ । निर्भय केवळ कळिकाळा ॥ ६५ ॥ इत्यादि बहुधा बल्लवगण । पुसती यदुकुळा कल्याण । तंव गोपींहीं संकर्षण । सुखासीन विलोकिला ॥ ६६ ॥ रामदर्शनें गोपनारी । संतुष्ट झाल्या अभ्यंतरीं । बोलती ते वाङ्माधुरी । परिसें निर्धारीं कुरुवर्या ॥ ६७ ॥

गोप्यो हसंत्यः पप्रच्छू रामसंदर्शनादृताः । कच्चिदास्ते सुखं कृष्णः पुरस्त्रीजनवल्लभः ॥ ९ ॥

रामदर्शनें परमाह्लाद । पावला होत्साता बल्लवीवृंद । हास्य करूनि वदती शब्द । पुसती मुकुन्दआचरणा ॥ ६८ ॥ म्हणती भो भो रोहिणीतनया । कृष्णा पुरजनललनाप्रिया । कल्याण असे कीं दाशार्हनिचया । वेष्टितद्वारकापुरगर्भीं ॥ ६९ ॥ कृष्ण पुरस्त्रीजनवल्लभ । सुखी आहे तो पंकजनाभ । इतुकें पुसोनि वधूकदंब । विरहक्षोभें प्रश्न करी ॥ ७० ॥

कच्चित्स्मरति वा बन्धून्पितरं मातरं च सः । अप्यसौ मातरं द्रष्टुं सकृदप्यागमिष्यति ।
अपि वा स्मरतेऽस्माकमनुसेवां महाभुजः ॥ १० ॥

आपुल्या बंधुवर्गाप्रति । कोणे समयीं तरी श्रीपति । स्मरतो नंदयशोदा चित्तीं । करितो खंती कीं त्यांची ॥ ७१ ॥ नंदयशोदा पहावीं नेत्रीं । ऐसी करितो कीं अवसरीं । मातृभेटीस एकदां तरी ।

येईल हरि कीं ना तो ॥ ७२ ॥ महाबाहु जनार्दन । केव्हां तरी आमुचें स्मरण । करितो पूर्वसेवा स्मरून । विलासभुवनीं आपुलिया ॥ ७३ ॥ आतां आमुचें स्मरण त्यासी । किमर्थ होईल सुखविलासीं । पुरजनललनांच्या सहवासीं । मन्मथरसीं रंगलिया ॥ ७४ ॥ आम्ही त्यालागीं दिनशर्वरी । झुरत असों अभ्यंतरीं । तदर्थ संसारा बोहरी । केली अवधारीं तें राया ॥ ७५ ॥

मातरं पितरं भ्रातॄन्पतीन्पुत्रान्स्वसॄरपि । यदर्थे जहिम दाशार्ह दुस्त्यजान्स्वजनान्प्रभो ॥ ११ ॥

जयाचे प्रीतीकारणें आम्हीं । मातापितरें त्यजिलीं स्वामी । बंधुवर्गाच्या स्नेहसंभ्रमीं । गोत्रधर्मीं सांडवलों ॥ ७६ ॥ मातापितरीं जयाचे हातीं । विवाह करूनि गृह्योक्तरीती । अर्पिलें तया तनूचे पति । त्यागूनि श्रीपति आश्रयिला ॥ ७७ ॥ पुन्नाम नरकापासूनि त्राते । त्यागूनि ऐसिया स्वपुत्रांतें । आम्ही अनुसरलों श्रीकृष्णातें । चित्तें वित्तें जीवितेंसी ॥ ७८ ॥ स्वसा म्हणिजे आत्मभगिनी । आता माउशा नणंदा वहिनी । त्यागूं न शकवे दुःखेंकरूनी । त्यांतें त्यागूनि हरि भजलों ॥ ७९ ॥ दुस्त्यज स्वजनांचा समुदाय । आम्हीं त्यागिला वमनप्राय । ज्याकारणें तो यादवराय । आम्हां तृणप्राय त्यजूनि गेला ॥ ८० ॥ आमुचें ऐसें अनन्यपण । ऐकें यावरी तयाचें नैर्घृण्य । अल्पसें कथितों तुजलागून । सावधान तें ऐक ॥ ८१ ॥

ता नः सद्यः परित्यज्य गतः संछिन्नसौहृदः । कथं नु तादृशं स्त्रीभिर्न श्रद्धीयेत भाषितम् ॥ १२ ॥

आम्ही सर्वस्वत्यागपरा । कृष्णपदभजनीं तत्परा । आणि तो स्नेह छेदूनि त्वरा । गेला चोरासमसाम्य ॥ ८२ ॥ चोर जैसा प्रवेशे मळां । पुष्पां पल्लवां फळां मूळां । छेदूनि जातां त्या कळवळा । न वसे कोवळा हृत्पद्मीं ॥ ८३ ॥ आपुल्या कार्यापुरता रिगे । पुढती परतोनि न पाहे मागें । आम्हां तसेंचि या श्रीरंगें । सौहार्दभंगें उपेक्षिलें ॥ ८४ ॥ ऐसें ऐकूनि बळराम म्हणे । तुम्ही प्रतिबंध त्याकारणें । जाते समयीं कवण्या गुणें । न केला हें मज सांगा ॥ ८५ ॥ त्याचिया वचनाच्या विश्वासें । तुम्ही म्हणाल गुंतलों ऐसें । विश्वास कवणेपरीचा असे । चित्तोल्हासें तो वदिजे ॥ ८६ ॥ तरी बहु वाचाळ ज्याची वाणी । वक्तृत्व अमृता उणें आणी । नानाविधा कौशल्यश्रेणी । जो निज वचनीं जग भुलवी ॥ ८७ ॥ तैसिये परीचें मृदु भाषित । ऐकोनि स्त्रिया श्रद्धान्वित । कां पां न होती विश्वासवंत । हें निश्चित जाणावें ॥ ८८ ॥ ऐशा बोलिल्या एक वनिता । तंव अपरा वदती विरहतप्ता । तें तूं ऐकें कौरवनाथा । पुण्यवंता परीक्षिति ॥ ८९ ॥

कथं नु गृह्णंत्यनवस्थितात्मनो वचः कृतघ्नस्य बुधाः पुरस्त्रियः ।
गृह्णंति वै चित्रकथस्य सुंदरस्मितावलोकोच्छ्वसितस्मरातुराः ॥ १३ ॥

अपरा बल्लवी म्हणती बाई । जेथ वसतो तये ठायीं । नागरा ललना तरी काई । विश्वासती तद्वचनीं ॥ ९० ॥ आत्मा म्हणिजे मानस कुटिल । देहचेष्टांचें तैसेंचि शीळ । तद्वाक्य मानूनि सत्य

केवळ । अंगिकारिती केंवि वधू ॥ ९१ ॥ कायावाचामनेंकरून । अनवस्थित जो निर्वाहहीन । सत्य मानूनि त्याचें वचन । पुरस्त्रीजन केंवि भुले ॥ ९२ ॥ आम्ही मुग्धा कुग्रामवंता । स्मरमोहिता चातुर्यरहिता । कृतघ्नाचिया वचनामृता । भुललों निश्चिता अबुधपणें ॥ ९३ ॥ त्या तंव नागरी चातुर्यराशि । केंवि ऐसिया कृतघ्नासी । जाणत्या भुलल्या हें मानसीं । आश्चर्य आम्हांसी बहु वाटे ॥ ९४ ॥ हें ऐकोनि आणिका वदती । त्याचें नवल मानणें किती । कितवाचिया कैतवयुक्ति । भुलवूं शकती ब्रह्मादिकां ॥ ९५ ॥ रुचिर मधुर विचित्र कथा । डोळे मोडूनि हांसे कथितां । युवा लावण्यभरित पुरता । स्मरक्षोभकता या चिह्नीं ॥ ९६ ॥ ऐसिया कृतघ्नाचिया वाणी । रसाळ रुचती ऐकतां श्रवणीं । लावण्यइंगितें पाहतां नयनीं । स्मर क्षोभूनि तनु तावी ॥ ९७ ॥ यास्तव स्मरातुरा नागरा । कृतघ्नाचिया मधुरोत्तरा । गृहिणी सादर मन्मथतंत्रा । हें वधूनिकरा नवल नव्हे ॥ ९८ ॥ आंगीं नवयौवनाचें पिसें । कामज्वराचा पाचवा असे । त्यावरी कितवें मंत्रविशेषें । माधुर्यरसें भुलविल्या ॥ ९९ ॥ कां पां न घेती त्याचें वचन । यदर्थीं मानिजे आश्चर्य कोण । हरिणा गोरीचें गायन । कीं करणा मोहन तन्मात्रीं ॥ १०० ॥ हें ऐकूनि अपरा म्हणती । ऐका गोपी हो समस्ती । काय न सरे तुम्हांप्रति । गोष्टींवाचूनि तयाचिया ॥ १ ॥

किं नस्तत्कथया गोप्यः कथाः कथयताऽपराः । यात्यस्माभिर्विना कालो यदि तस्य तथैव नः ॥ १४ ॥

त्यावांचूनि आमुचा काळ । क्रमत आहे कीं केवळ । आम्हांवांचूनि घटिका पळ । त्याचें अळुमाळ अडलेंसे ॥ २ ॥ त्याचिया कथा कथूनि वृथा । किमर्थ सखेद करितां चित्ता । इत्यर्थ मम मुखें आइका पुरता । हेतुगर्भिता वाक्यांचा ॥ ३ ॥ एवं काळ दोनी ठायीं । क्रमत असे राहत नाहीं । त्यामाजी रहस्य तें चतुरांहीं । इतुकें हृदयीं जाणावें ॥ ४ ॥ पुरवनितांमीं त्याचा काळ । सुखें क्रमतो सदा सफळ । आम्हां दुःखाची तळमळ । सर्वकाळ तद्विरहें ॥ १०५ ॥ ये श्लोकींचा हा ध्वनितार्थ । वाखाणिला इत्थंभूत । यावरी कृष्णाचें इंगित । स्मरोनि रुदत तें ऐका ॥ ६ ॥

इति प्रहसितं शौरेर्जल्पितं चारु वीक्षितम् । गतिं प्रेमपरिष्वंगं स्मरंत्यो रुरुदुः स्त्रियः ॥ १५ ॥

इत्यादिवचनीं चाटु चटुल । श्रीकृष्णाचें कैतवशील । रामा वदोनि बल्लवीमेळ । इंगितें सकळ स्मरताती ॥ ७ ॥ श्रीकृष्णाचें सुन्दर हास्य । जेणें प्रकटे मन्मथावेश । जल्पित म्हणिजे भाषण सुरस । जें सुधारस तुच्छ करी ॥ ८ ॥ व्यंकटकटाक्षनिरीक्षणें । स्मितापाङ्गें तरळ पाहणें । श्रीकृष्णाच्या अवलोकनें । होय पारणें देखणिया ॥ ९ ॥ कुंजर मयूर हंस गति । कृष्ण चालतां शिक्षा घेती । मल्लमर्दना वीरवृत्ति । चाले मृगपतिविक्रमें ॥ ११० ॥ ज्याचे गतीचा पदविन्यास । लक्षूनि शिक्षिती निजमानस । होऊनि भवस्वर्गीं उदास । परमहंस आत्मरत ॥ ११ ॥ श्रीकृष्णाची विन्यासगति । मानससरोवरीं वसती । करूनि हंस अभ्यासिती । मुक्तप्रवृत्ति गिळूनियां ॥ १२ ॥ दुर्लभ श्रीकृष्ण-

चरणीं गति । पावावया गिरिजापति । आनंदवनीं धरूनि वसती । अद्यापि करिती तपश्चर्या ॥ १३ ॥ कृष्णप्रेमाचा परिष्वंग । लक्षूनि अनंग झाला साङ्ग । कमला पदसेवाप्रसंग । आदरीं संग वांछूनियां ॥ १४ ॥ कृष्णहृदय हृदयीं जडे । प्रेमसुखाच्या सुरवाडें । तेव्हां आकल्प हृद्रोग उडे । मागें पुढें आनंद ॥ ११५ ॥ वांछूनि कृष्णाचें आलिङ्गन । निष्काम सत्कर्मफळाशा स्तन । सगुण निर्गुण भावना कठिन । पावती समाधान परिष्वंगें ॥ १६ ॥ कृष्णपरिष्वंगाची गोडी । एक लक्ष्मीच जाणे फुडी । अभेदभावाचिये आवडी । चरण न सोडी अद्यापि ॥ १७ ॥ प्रेमपरिष्वंगाची इच्छा । झालिया न रमे विषयां तुच्छा । इहामुत्रार्थीं करूनि कुत्सा । रमिजे स्वइच्छा हरिहृदयीं ॥ १८ ॥ कृष्णहृदया हृदय मिळे । द्वैतदैन्य तें मावळे । अपरोक्षस्वानंदसुखसोहळे । भोगिजे स्वलीलेमाजिवडे ॥ १९ ॥ वनस्थ शीतोष्णसहनशील । त्वग्मूळ पत्र पुष्प सफळ । अवंचक जे भूतदयाळ । तपस्वी केवळ दृढनेमी ॥ १२० ॥ ऐसे तरुवर वृंदावनीं । लवले पल्लवफळप्रसूनीं । पतिव्रतालतालिङ्गनीं । कृष्णालिङ्गना सकाम जे ॥ २१ ॥ जाणोनि तयांचें तपःसाहस । कृपेनें द्रवोनि हृषीकेश । करूनि वनमाळेचें मिस । हृदयीं तयांसि आलिङ्गी ॥ २२ ॥ हास्य भाषण अवलोकन । गतिविन्यास आलिङ्गन । हृदयीं स्मरोनि गोपीगण । करिती रुदन कुरुवर्या ॥ २३ ॥ विरहविह्वळ वल्लवीगण । कृष्णप्रेमें करितां रुदन । कृपेनें द्रवला संकर्षण । करी सान्त्वन तें ऐका ॥ २४ ॥

संकर्षणस्ताः कृष्णस्य संदेशैर्हृदयंगमैः । सांत्वयामास भगवान्नानाऽनुनयकोविदः ॥१६॥

त्या गोपी विरहतप्ता । कृष्णलीलास्मरणाभिभूता । त्यांतें सान्तवी रेवतीभर्ता । संदेशवार्ता कथूनियां ॥ १२५ ॥ गोपीहृदया आनंदकर । कृष्णसंदेश परम रुचिर । सांगोनि शमवी विरहज्वर । परम चतुर वळराम ॥ २६ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न । यालागीं सर्वज्ञ संकर्षण । त्यांचें अभ्यंतर जाणोन । निववी संपूर्ण व्रजललना ॥ २७ ॥ भुजंगदौत्यप्रकारप्रवीण । अनुनयकोविद त्या अभिधान । साक्षात् ईश्वर संकर्षण । त्रिजगन्मोहन जगदात्मा ॥ २८ ॥ जेणें जीचें मन मोहरे । ऐसीं रसिकें मधुरोत्तरें । कृष्णसंदेशें रहस्य स्मरे । तियें त्यां आदरें बोधियलीं ॥ २९ ॥ कृष्ण तुम्हांसि स्मरतो हृदयीं । तुमचा कृष्णासि विसर नाहीं । कृष्णीं अनुरक्त तुम्ही सर्वही । तुमच्या ठायीं तो तैसा ॥१३०॥ जो जो जैसा भजे मज । त्या तैसाचि भजें मी सहज । ऐसिया निश्चयाचें गुज । घालूनि पैज हरि वदला ॥ ३१ ॥ माता पिता भर्ता स्वजन । त्यागून झालां कृष्णप्रवण । तुम्हांवांचूनि नेणे कृष्ण । नित्य निमग्न प्रेमरसीं ॥३२॥ तुमचें कृष्णा सदैव ध्यान । तुम्हांवांचोनि न कल्पी मन । कृष्णा प्रियतम तुमचे गुण । करी श्रवण प्रेमसुखें ॥ ३३ ॥ कृष्ण तुम्हांसि पाहे नयनीं । कृष्ण तुम्हांसि ऐके श्रवणीं । कृष्ण तुमच्या आलिङ्गनीं । आह्लाद मानी त्वगिंद्रियें ॥ ३४ ॥ तुमच्या कवळालागीं नावेक । नित्यतृप्तासि लागे भूक । तुमच्या सुमनें घ्राणसुख । कृष्ण सर्वाङ्गें भोगीतसे ॥ १३५ ॥ तुमच्या कामें कृष्णासि काम । तुमच्या प्रेमें कृष्ण सप्रेम । तुमच्या नामें कृष्णासि नाम । गोपीविश्राम म्हणवीतसे ॥ ३६ ॥ इत्यादि अनेक अनुनयवचनें । प्रबोधितां संकर्षणें । व्रजललनांचीं विकसित मनें । कृष्णदर्शनें जेंवि होतीं ॥३७॥

रामकृष्णांमाजी कांहीं । म्हणती सहसा भेद नाहीं । संदेश वदला जे ते सर्वही । आमुच्या देहीं अनुभूत ॥ ३८ ॥ कृष्णपक्ष शुक्लपक्ष । तद्वत् दोघांचें अनुलक्ष । दोहींमाजी अंतरिक्ष । अभेद प्रत्यक्ष आत्मत्वें ॥ ३९ ॥ उभयतांची समान क्रीडा । उभयतांची समान व्रीडा । उभयतांचा समान जोडा । मर्दिती होडा सम शत्रु ॥ १४० ॥ इत्यादि हृत्पद्मफुल्लारा । रामवचनें बल्लवदारा । होतां रामही अभ्यंतरा । माजी उल्लास पावला ॥ ४१ ॥

द्वौ मासौ तत्र चाऽवात्सीन्मधुं माधवमेव च । रामः क्षपासु भगवान्गोपीनां रतिमावहन् ॥ १७ ॥

चैत्र वैशाख दोनी मास । गोपीप्रेमें व्रजीं वास । करिता झाला सावकाश । पुराणपुरुष बळराम ॥ ४२ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न । गोपीप्रेमोत्कर्ष देखोन । त्यांचा रतिरम अनुभवून । निशा संपूर्ण क्रीडला ॥ ४३ ॥ म्हणाल कृष्णेंसी व्रजललना । रमल्या ऐसें संकर्षणा । विदित असतां त्यांसीच पुन्हा । मन्मथकदना कैंवि करी ॥ ४४ ॥ तरी ये श्लोकींचें व्याख्यान । श्रीधरस्वामिमुखींचें कथन । श्रोतीं निःसंशय होऊन । कीजे श्रवण सद्भावें ॥ १४५ ॥ कृष्णीं रमल्या ज्या सुन्दरी । उद्धववचनें त्या अंतरीं । ध्यानसुखें सेविती हरि । बाह्यविकारीं सांडवल्या ॥ ४६ ॥ कृष्णध्यानें मनमूर्छिता । कृष्णचि होवोनि कृष्णीं निरता । करूं विसरल्या बाह्य चरिता । झाल्या विरता भवभानीं ॥ ४७ ॥ हरिगुणगायनें रसने रति । हरिगुणश्रवणीं श्रवणां प्रीति । हरिमय नयनीं जग देखती । त्यामाजी विरति तद्बोधें ॥ ४८ ॥ कृष्णात्मकता अपरोक्ष असतां । करणां भवभ्रम भासे नसता । विपरीतबोधामाजी जो वसता । त्यांपें नुसता तो नवसे ॥ ४९ ॥ ऐसिया बोधें कृष्णात्मका । कृष्णीं रमल्या ज्या बायका । त्या नागवती रतिनायका । पुण्यश्लोकरसरंगें ॥ १५० ॥ परंतु नवीना अबळा मुग्धा । त्याचिया गाडिणी ज्या अनुरक्ता । कृष्णरतिरससुखअभुक्ता । रामीं निरता त्या झाल्या ॥ ५१ ॥ कृष्ण संकर्षण अभिन्न । ऐकतां द्रवलें त्यांचें मन । कृष्णरमणी गातां गुण । होतें श्रवण ज्यां पूर्वीं ॥ ५२ ॥ त्यांचिया उत्कटप्रेमादरें । संकर्षणही स्मरसंचारें । झळंबला मग तत्स्नेहसुभरें । स्वेच्छा विचरे रतिलास्यें ॥५३॥ तया रतिलास्याची परी । आणि रामाची ऐश्वर्यथोरी । समासें राया श्रवण करीं । शुकवैखरी वाखाणी ॥ ५४ ॥

पूर्णचंद्रकलामृष्टे कौमुदीगंधवायुना । यमुनोपवने रेमे सेविते स्त्रीगणैर्वृतः ॥ १८ ॥

यमुने समीप जें कानन । तया म्हणिजे यमुनोपवन । त्यामाझारी रेवतीरमण । वेष्टितस्त्रीगण क्रीडतसे ॥१५५॥ तया वनाचें विशेषण । पूर्णचंद्राचे शुभ्र किरण । षोडश कळांचें लावण्य । उज्ज्वळ कानन तिहींकरून ॥ ५६ ॥ चंद्रिका कौमुदी जोत्स्ना । कोश प्रकाशी ऐसिया संज्ञा । कौमुदीयोगें विकासितां नलिनां । कुमुदाभिधानें बोलिजे ॥ ५७ ॥ तयां विकासितां कुमुदांवरून । सुगंध शीतळ यमुनापवन । तत्सेवित जें यमुनावन । त्यामाजी स्त्रीगण बळ रमवी ॥ ५८ ॥ नाना सत्त्वांचीं

अनुकरणें । विविध चौऱ्यांशीं आसनें । बहु वनितांसीं संकर्षणें । बहुधा रमणें नटनाट्यें ॥ ५९ ॥ कथिली स्मरमंगरकुसरी । यावरी ऐकें ऐश्वर्यथोरी । ज्याचे क्रीडेचे अवसरीं । वारुणी प्रेरी वरुण जया ॥ १६० ॥

वरुणप्रेषिता देवी वारुणी वृक्षकोटरात् । पतती तद्वन सर्वं स्वगधेनाऽध्यवासयत् ॥ १९ ॥

जयाचा ऐश्वर्यसत्तायोग । वरुणें जाणोनि क्रीडाप्रसंग । वारुणीदेवी प्रेरिली साङ्ग । जियेचा उपयोग रतिरंगीं ॥ ६१ ॥ वरुणाचिये आज्ञेसरसी । वृक्षकोटरापासूनि आपैसी । धारा लागली भूमीसी । स्वगंधें वनासी मत्त करी ॥ ६२ ॥ अवघें वनाचि स्वगंधेंकरून । जिनें केलें उन्मत्त पूर्ण । भ्रमर तद्गंधें वेधून । झाले लीन प्रसूनीं ॥ ६३ ॥ पक्षी उन्मत्त विराव करिती । मृगादिश्वापदां मन्मथभ्रान्ति । कुञ्जरकारिणी संलग्न होती । उन्मत्त क्रीडती जलाशयीं ॥ ६४ ॥ सर्व वनस्पतींच्या ठायीं गंध । वारुणीसंभवें पैं प्रसिद्ध । तेणें अवघे प्राणी मुग्ध । होवोनि आमोद सेविती तो ॥ १६५ ॥ तेव तो राम सौनन्दपाणि । क्रीडत असतां बल्लवीगणीं । वारुणीगंध सेवितां घ्राणीं । केली करणी ते ऐका ॥ ६६ ॥

त गंधं मधुधाराया वायुनोपहृत बलः । आघ्रायोपगतस्तत्र ललनाभिः पपौ समम् ॥ २० ॥

वारुणीमधुधारांचा गंध । वायुवेगें येतां प्रसिद्ध । त्यातें सेवितां बळ अगाध । झाला सिद्ध तद्ग्रहणीं ॥ ६७ ॥ त्या वायूच्या अवघ्राणपथें । ललनांसहित गेला तेथें । प्राशिता झाला वारुणीतें । वनितांसहित वनजाक्ष ॥ ६८ ॥ वारुणीमदें मदोन्मत्त । सकामबल्लवीप्रेमासक्त । तत्कृतक्रीडा इत्थंभूत । श्रोतीं समस्त परिसावी ॥ ६९ ॥

उपगीयमानचरितो वनिताभिर्हलायुधः । वनेषु व्यचरत्क्षीबो मदविह्वललोचनः ॥ २१ ॥

बल्लवी गाती उद्दाम चरित । तो हलायुध रोहिणीसुत । वारुणी प्राशूनि मदोन्मत्त । वनीं विचरत घूर्णाक्ष ॥ १७० ॥ तिये काळींचें उन्मत्त ध्यान । कथिता झाला व्यासनंदन । वसनाभरणीं विराजमान । सावधान तें ऐका ॥ ७१ ॥

स्रग्व्येककुंडलो मत्तो वैजयंत्या च मालया । बिभ्रत्स्मितमुखांभोजं स्वेदप्रालेयभूषितम् ॥ २२ ॥

पूर्णचंद्रासारिखी कान्ति । आपाद मिरवे वैजयंती । कंठीं वनमाळा शोभती । आयुधें हातीं हल मुसळ ॥ ७२ ॥ कुण्डलमंडित एक श्रवण । कासे कसी नीळ वसन । वारुणीमदिरामदेंकरून । हास्यवदन स्वेदाक्त ॥ ७३ ॥ हिमाचळींचे जेंवि हिमकण । तैसिया प्रस्वेदकणिकापूर्ण । मन्मथसमरश्रमेंकरून । वदनभूषण तें ज्यासी ॥ ७४ ॥ वनीं वनजाक्ष वनितासंगें । रमतां घर्माक्त झालीं आंगें । म्हणोनि यमुना तत्प्रसंगें । जलक्रीडार्थ पाचारी ॥ १७५ ॥

स आजुहाव यमुनां जलक्रीडार्थमीश्वरः । निजं वाक्यमनादृत्य मत्त इत्यापगां बलः ।।
अनागतां हलाग्रेण कुपितो विचकर्षताम् ।। २३ ।।

जो ऐश्वर्यें परमेश्वर । तो बळराम क्रीडापर । जलक्रीडार्थ अतिसत्वर । यमुना सादर पाचारी ।। ७६ ।। तंव ते स्वभावें प्रवाहशीला । निम्नगामिनी अगाधजळा । वीच्यावर्तकल्लोळबहळा । न येतां कोपला बळभद्र ।। ७७ ।। आपुलें वाक्य अनादरून । यमुना उन्मत्त झाली पूर्ण । आतां ईतें आकर्षून । आणीन म्हणोन क्षोभला ।। ७८ ।। समीप न ये मी पाचारितां । म्हणोनि क्षोभला होत्साता । नांगरदंतें आकर्षिता । झाला तत्त्वता तें ऐका ।। ७९ ।।

पापे त्वं मामवज्ञाय यन्नाऽऽयासि मयाहुता । नेष्ये त्वां लाङ्गलाग्रेण शतधा कामचारिणीम् ।। २४ ।।

पापरूपे आपगे दुष्टे । माजी अवज्ञा करूनि हठें । पुढें तूं जासील प्रवाहलोटें । येथून कोठें सांग पां ।। १८० ।। ज्यास्तव माझी अवज्ञा करून । पाचारितां मी न येसी पूर्ण । नांगरदंतें शतधा भिन्न । करितां तुज कोण रक्षील ।। ८१ ।। अगे तूं कामचारिणी कुटिले । उन्मत्त झालीस अगाधजळें । हलाग्रें करीन शतधा बळें । कोण वेळे तुज त्राता ।। ८२ ।। एका प्रवाहें उन्मत्तपण । हलाग्रें शतधा करीन जाण । क्षुद्रदशेतें पाववीन । कुल्येतुल्य गौणत्व ।। ८३ ।। ऐसें बोलूनि तिये क्षणीं । यमुनाकर्षणा सीरपाणि । उदित झाला हें देखोनी । प्रार्थी वचनीं तें ऐका ।। ८४ ।।

एवं निर्भर्त्सिता भीता यमुना यदुनंदनम् । उवाच चकिता वाचं पतिना पादयोर्नृप ।। २५ ।।

कुरुकुळमानसमराळप्रवरा । ऐकें हरिगुण श्रवणचतुरा । इत्यादिवचनीं सरिद्वरा । निर्भर्त्सितां बळरामें ।। १८५ ।। भय पावोनि अभ्यंतरीं । पातली दिव्यरूपें बाहेरी । बळरामाचे चरण धरी । विनति करी मृदुवचनें ।। ८६ ।। यदुनंदन जो लाङ्गलपाणि । त्यातें विनवी विनीत वचनीं । चकित होऊनि अंतःकरणीं । तेंही श्रवणीं अवधारा ।। ८७ ।।

राम राम महाबाहो न जाने तव विक्रमम् । यस्यैकांशेन विधृता जगती जगतः पते ।। २६ ।।

राम राम आम्रेडितीं । म्हणे भो भो जगत्पति । महाबाहो तुझी ख्याति । नेणें निश्चिती मी कांहीं ।। ८८ ।। ज्याचिया एक्या अंशेंकरून । जगेंसहित जगती पूर्ण । धरिली तो तूं संकर्षण । पूर्णचैतन्य परमात्मा ।। ८९ ।। इत्यादि नम्रवचनेंकरून । यमानुजेनें केलें स्तवन । प्रार्थिती झाली निजकल्याण । चरणा शरण होत्साती ।। १९० ।।

परं भावं भगवतो भगवान्मामजानतीम् । मोक्तुमर्हसि विश्वात्मन्प्रपन्नां भक्तवत्सल ॥ २७ ॥

पर म्हणिजे उत्कृष्ट भाव । जें भगवन्ता तव वैभव । मी निम्नगा नेणोंचि सर्व । यास्तव सगर्व तुज गमलें ॥ ९१ ॥ जात्या अधोगतीचें पात्र । जलवाहिनी सरितामात्र । मजवरी प्रतापें उचलणें शस्त्र । नव्हे हें चरित्र प्रभुयोग्य ॥ ९२ ॥ नेणोनि तुझी प्रतापगरिमा । शरण न झालें तव पादपद्मा । भक्तवत्सला भो बळरामा । तूं विश्वात्मा विश्वदृक् ॥ ९३ ॥ आतां तुझिया चरणकमला । शरण पातलें प्रपन्नपाळा । मम मोक्षणीं न लावीं वेळा । मोक्षणकुशळां प्रभुवर्या ॥ ९४ ॥ मम मोक्षणीं तूं समर्थ । ऐसी विनीत शरणागत । विनति ऐकूनि रेवतीकान्त । केली सनाथ तें ऐका ॥ १९५ ॥

ततो व्यमुचद्यमुनां याचितो भगवान्बलः । विजगाह जलं स्त्रीभिः करेणुभिरिवेभराट् ॥ २८ ॥

यानंतरें तो यमुनेप्रति । सोडिता झाला प्रतापमूर्ति । ऐकोनि तियेची विनीत विनति । द्रवला चित्तीं बळ भगवान् ॥ ९६ ॥ तिनें प्रार्थिला बहुतां परि । तेणें द्रवला अभ्यंतरीं । यमुना सोडूनि व्रजसुंदरी । घेऊनि तीरीं प्रवेशला ॥ ९७ ॥ वस्त्ररहित बल्लवललना । यमुनेमाजी संकर्षणा- । सहित क्रीडती क्रीडा नाना । नवयौवना स्मरमूर्ति ॥ ९८ ॥ जैसे कुसुमाकरसंभव । कोमळ चलद्दलद्रुमपल्लव । भक्षितां प्रकटे मनोभव । भुलवी सर्व करिकरिणी ॥ ९९ ॥ मग ते रिघोनि अगाध ह्रदीं । क्रीडती यथेष्टाचरणविधी । तैमाचि बळराम बल्लवी मांदी । रमवी प्रभेदीं स्वैरसुखें ॥ २०० ॥ तेहतिसाव्या अध्यायांत । रासक्रीडा कृष्णनाथ । करिता झाला तैं यमुनेंत । रमला समर्थ गोपींसीं ॥ १ ॥ जलक्रीडा ते व्याख्यानीं । विस्तृत वदला श्रीशुकमुनि । ते येथ पुनरुक्ति जाणोनी । अल्प बोलोनि मुकुलिली ॥ २ ॥ श्रोतीं येथ तयाचि परि । बळरामेंसी व्रजसुन्दरी । रमल्या ऐसें अभ्यंतरीं । जाणोनि पुढारीं परिसावें ॥ ३ ॥

कामं विहृत्य सलिलादुत्तीर्णायासितांबरे । भूषणानि महार्हाणि ददौ कांतिः शुभां स्रजम् ॥ २९ ॥

जंववरी पुरे मनींचें आर्त । तंववरी यमुनासलिला आंत । रमला व्रजवनितां समवेत । रेवती- कान्त कौशल्यें ॥ ४ ॥ जळाबाहिर यमुनातीरीं । जेव्हां पातला प्रलंबारि । तये समयीं पाशधारी । वरुण प्रेरी सपर्या ॥ २०५ ॥ कान्ति ऐसें लक्ष्मीस नांव । तिणें पूजिला तो बळराम । वरुणप्रेरित हेमललाम । वसनें उत्तमें समर्पिलीं ॥ ६ ॥ असित म्हणिजे नीळवर्णें । दिव्यपरिधानें प्रावरणें । महार्हें म्हणिजे दिव्याभरणें । दिव्य लेपनें विलेपिलीं ॥ ७ ॥ श्वेत अम्लान पंकजमयी । कंठीं माळ घातली पाहीं । श्रवणीं एक कुण्डल तेंही । पद्मरागाचें पद्माख्य ॥ ८ ॥ इये श्लोकीं कर्ता कान्ति । ऐसीच विष्णुपुराणसंमति । हरिवंशींही रामाप्रति । इन्दिरोक्ति ते ऐका ॥ ९ ॥

विष्णुपुराणोक्त – वरुणप्रहित चास्मै मालामम्लानपंकजाम् । समुद्राभे तथा वस्त्रे नीले लक्ष्मीरयच्छतेति ।
तथा च हरिवंशे बलं प्रति लक्ष्मीवाक्यम् – जातरूपमयं चैकं कुंडलं व्रजभूषणम् ।
आदिपद्मं च पद्माख्यं दिव्यं श्रवणभूषणम् । देवे मां प्रतिगृह्णीष्व पौराणीं भूषणक्रियाम् ।। इत्यादि ।

**एवमादि श्लोकसंमति । भूषणें वसनें अर्पी कान्ति । निर्दुष्ट व्याख्यान जाणोनि श्रोतीं । शङ्का चित्तीं न धरावी ।। २१० ।।**

वसित्वा वाससी नीले मालामामुच्य कांचनीम् । रेजे स्वलंकृतो लिप्तो माहेंद्र इव वारणः ।।३०।।

**वसनें लक्ष्मीनें अर्पिलीं । तीं जलदाभें परिधान केलीं । हेमाब्जमाळा निवेदिली । कंठीं घातली बळरामें ।।११।। केशर कस्तुरी हरिचंदन । केलें इत्यादि विलेपन । शोभता झाला तेणें करून । महेंद्रवारणपडिपाडें ।।१२।। क्षीरोदमथनोद्भव कुञ्जर । श्वेत चौदंती बळिष्ठ थोर । मदोन्मत्त सालंकार । उपमा सधर मुनि वदला ।। १३ ।। बळरामाचें ऐश्वर्य पूर्ण । यमुना न वदोनि करी कथन । कोणे परी तें व्याख्यान । कीजे श्रवण चतुरांहीं ।। १४ ।।**

अद्यापि दृश्यते राजन्यमुनाकृष्टवर्त्मना । बलस्यानंतवीर्यस्य वीर्यं सूचयतीव हि ।। ३१ ।।

**अद्यापि पाहिजे वृंदावनीं । व्रजवनितांसी सौनंदपाणि । जेथ क्रीडला तये स्थानीं । वक्रवाहिनी यमानुजा ।। २१५ ।। लाङ्गलाग्रें आकर्षिली । तेणें मार्गें जळाची चाली । संकर्षणाची कीर्ति पहिली । प्रकट केली जातसे ।। १६ ।। अद्यापि आकृष्टमार्गें यमुना । प्रकट दिसतसे सर्वां जनां । बळरामाची यशःशंसना । नदी न वदोनी करीतसे ।। १७ ।। अनंतवीर्य जो बळभद्र । ज्याच्या बळाचा नकळे पार । यमुना अद्यापि राहोनि वक्र । सुचवी साचार तद्वीर्य ।। १८ ।। वीर्य सूचिती याचि परि । वक्रप्रवाह अद्यापिवरी । इतुकी बोलूनि मुनिवैखरी । उपसंहरी इतिहास ।। १९ ।।**

एवं सर्वा निशा याता एकेव रमतो व्रजे । रामस्याक्षिप्तचित्तस्य माधुर्यैर्व्रजयोषिताम् ।। ३२ ।।

**एवं म्हणिजे याचि परि । दो मासांच्या सर्व शर्वरी । एके रात्रीचिये परि । रतिरसभरीं क्रमल्या पैं ।। २२० ।। माधुर्य म्हणिजे परमरुचिर । चाटुचटुल मन्मथपर । व्रजवनितांचे विलास प्रचुर । क्षिप्तान्तर बळ तेणें ।। २१ ।। व्रजवधूंच्या विलासयोगें । मोहित होत्साता अनुरागें । स्थळजळक्रीडेच्या प्रसंगें । रमता झाला बहुरजनी ।। २२ ।। संकर्षणाच्या तिया निशा । गमल्या एकेचि रजनीऐशा । हें तुज कथिलें कुरुनरेशा । जेणें दोषा क्षय होय ।। २३ ।। मथुरामाहात्म्यामाझारीं । गोवर्धनाचे यात्रान्तरीं । वर्णिलीं तीं परिसिजे चतुरीं । अघसंहारी श्रवणें जीं ।। २४ ।। गोवर्धनाची प्रदक्षिणा । वर्णितां कथिलीं तीर्थें नाना । तेथ संकर्षणाख्यतीर्थाख्याना । कीजे श्रवणा संक्षेपें ।। २२५ ।। द्वारकेहूनि संकर्षण । नंदयशोदाप्रमुखजन । आला पहावयालागून । स्नेहाळ पूर्ण होत्साता ।। २६ ।। तेथ गोपींच्या**

रतिरसवार्ता । परिसतां वश झाला मन्मथा । स्वैर क्रीडला ते हे कथा । कथिली तत्त्वता मुनिवर्यें ॥२७॥ कृष्णक्रीडा ऐकिली श्रोत्रें । स्वयें तैसींच स्मरचरित्रें । क्रीडतां श्वित्री झालीं गात्रें । एनससूत्रें आकळिला ॥ २८ ॥ शरीर झालें गलितकुष्ठी । रामें देखोनि आपुले दृष्टी । खेद करूनियां होतसे कष्टी । म्हणे ये सृष्टीं न वसें मी ॥ २९ ॥ पश्चात्तापें आपणा दूषी । म्हणे केवळ मी कल्मषराशि । ऐसिये अवस्थेमाजी त्यासी । स्वयें देवर्षि भेटला ॥ २३० ॥ तेणें जाणूनि त्याची स्थिति । प्रबोधिली अघनिवृत्ति । गोवर्धनाचे यात्रापथीं । केला तीर्थीं सुस्नात ॥ ३१ ॥ कथिलें कृष्णाचें वैभव । रामें कला कृष्णस्तव । स्नानमात्रें सर्व अवयव । झाले दिव्य रामाचे ॥ ३२ ॥ तेंचि संकर्षणाख्य तीर्थ । गोवर्धनपथीं विख्यात । स्नानें पानें दोषां अंत । करी समर्थ मुनिवरें ॥ ३३ ॥ मातृगमन सुरापान । सुवर्णस्तेय ब्रह्महनन । यांच्या संसर्गें महाएन । पांचवें जाण बोलिलें ॥ ३४ ॥ एवं पंचमहामुख्यें । या वेगळीं उपपातकें । सांसर्गिकें आर्द्रें शुष्कें । हरती सकळिकें तत्तीर्थीं ॥ २३५ ॥ मथुरामाहात्म्यींचा इतिहास । इतुका कथिला श्रोतयांस । काय कारण या कथनास । तेंही अशेष अवधारा ॥ ३६ ॥ पूर्णब्रह्म रामकृष्ण । म्हणतां रामें यथेष्टाचरण । केलें असतां दोषदर्शन । झालें श्रवण इतिहासीं ॥३७॥ ते हे श्रोतयां सूचना केली । जे संकर्षणा हे अवस्था झाली । तेथ मानवें भांबावलीं । केंवि तरलीं जातील ॥ ३८ ॥ भगवन्ताचें क्रियाचरण । करूं म्हणती जे जे जन । त्यांसी यातना होती कठिण । इतुकें कारण कथनाचें ॥ ३९ ॥ एवं श्रेष्ठीं आज्ञापिलें । तें लक्षूनि वर्तती भलें । वांचूनि त्यांचें अनुष्ठिलें । स्वयें केलें नवजाये ॥ २४० ॥ एवं श्रीमद्भागवता । अठरा सहस्र वाखाणितां । दशमस्कंधामाजी कथा । कौरवनाथा शुक वदला ॥ ४१ ॥ प्रतिष्ठानीं चिद्ब्रह्ममठीं । एकनाथ साम्राज्यपीठीं । चिदानंदें स्वानंदलुटी । गोविन्दगोष्ठीमय केली ॥ ४२ ॥ विरक्त दयार्णव तेथ क्षुधित । तद्रसपानें झाला तृप्त । पुढें श्रोतयां श्रवणपथ । दावी अनार्त व्हावया ॥ ४३ ॥ मातृगमनादि पातकें । श्रवणें निरसिती कौतुकें । अर्थ विवरितां कैवल्यसुखें । लाहती स्वमुखें जे पठती ॥ ४४ ॥ पांसष्टावा संपला येथ । पुढिले कथेचा वृत्तान्त । कारुषें द्वारके धाडिला दूत । नृपातें मात मुनि सांगे ॥ २४५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां बलदेवविजययमुनाकर्षणं नाम पंचषष्टितमोऽध्यायः ॥६५॥

श्लोक ३२ ॥ ओवी-संख्या २४५ ॥ एवं संख्या २७७ ॥

(चौसष्टावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३०७६४)

पांसष्टावा अध्याय समाप्त

*

# श्रीकृष्णदयार्णवांचें एकनाथ-पूजन

श्रीकृष्णदयार्णवांची एकनाथ-भक्ति अनन्यसाधारण आहे. दयार्णवांचा जन्म नाथांच्या समाधीनंतर पाऊणशें वर्षांनीं झाला आणि त्यांचें बालपण समर्थांच्या प्रभाव-भूमींत व्यतीत झालें. परंतु गोविंदगुरूंच्या उपदेशानें त्यांना नाथांचा पारमार्थिक वारसा प्राप्त झाला आणि नाथांच्या चरित्रचिंतनानें व ग्रंथाध्ययनानें त्यांची नाथभक्ति प्रकर्षाला पोंचली. दयार्णवांची एकनाथांविषयीची भक्ति सद्‌गुरु व श्रीकृष्ण यांच्याइतकीच होती. नाथचरित्राचा आणि नाथवाङ्‌मयाचा प्रभाव दयार्णवांच्या वाणीवर विलक्षण आहे. नाथांच्याविषयीचा श्रद्धाभाव व्यक्त करतांना दयार्णव भारावून जातात. त्यांनीं हा हरिवरदारूपी वाग्यज्ञहि नाथांच्या स्वप्नादेशानेंच आरंभिला आणि नाथांच्या पुण्यभूमीतच पार पाडला. नाथांनीं श्रीमद्‌भागवताच्या एकादश-स्कंधावर टीका लिहिली आणि दयार्णवानी दशमावर. परंतु दशमस्कंधांतील रुक्मिणी-स्वयंवराची कथा नाथांनी स्वतंत्र काव्यात गायिली असल्यामुळे दयार्णवांनी त्या भागावर लेखणी चालविली नाही. दयार्णवांजवळ, प्रकांड पांडित्य, प्रभावी प्रतिभा आणि अपार प्रभुप्रीति असतांनाहि, त्यानी — केवळ आपणास परमश्रद्धेय असलेल्या नाथाचा अवमान होऊं नये म्हणून — रुक्मिणी-स्वयंवराच्या कथाभागावर टीका लिहिली नाही आणि टीकेचा ओघ चालू ठेवण्यासाठी नाथांचें 'रुक्मिणी-स्वयंवर' उतरून घेतलें —

> दशमस्कंध वाखाणितां । प्रसगें रुक्मिणी-स्वयंवरकथा ।
> उपायिली ते वर्णूं जातां । धिवसा चित्ता नुपलभे ॥
>
> म्हणाल येथ कोण विचारु । तरी श्रीएकनाथ परमेष्ठिगुरु ।
> भानुकुळी अपरभास्करु । अज्ञानतिमिरपरिहर्ता ॥
>
> सकळ सद्‌गुणी परिपूर्ण । प्रतिष्ठानी अवतरून ।
> कलिमलमग्नां ब्रह्मज्ञान । प्रबोधून उद्धर्ता ॥
>
> आंगी वैराग्य धडधडीत । अवलंबूनि भक्तिपंथ ।
> जनार्दनस्वामी सद्‌गुरुनाथ । सेवूनि परमार्थ साधिला ॥
>
> अभेद गुरुभजनाची मागी । प्रकट आचरोनि दाविली जगी ।
> गुरुदास्याच्या ऐश्वर्ययोगी । समता आंगी शोभविली ॥
>
> अद्वैतबोधे एकात्मता । पूर्णपणें बाणली असता ।
> ते पहावया हरिहरधाता । अवधूतवेषें पातले ॥...
>
> यशोदानंदात्मज आवडी । धर्मालयी उच्छिष्टें काढी ।
> अर्जुनाचीं धुतलीं घोडीं । येथ कावडी जळ वाहे ॥
>
> अन्नगधादि धूपदीप । अर्पणीं सादर नित्य समीप ।
> यावेगळे क्लेश अमूप । करिता अल्प श्रम न मनी ॥...
>
> तया प्रभूने एकनाथा— । वदनीं प्रकटूनि वदविली कथा ।
> यावरी श्लोकार्थ वाखाणितां । होय तो वृथा वाग्जल्प ॥
>
> — हरिवरदा ५२. ३१५–३२०, ३३६–३३७, ३४६.

अशी दयार्णवांची एकनाथभक्ति उचंबळून वाहत आहे. 'ब्रह्मांडमठीं साम्राज्यपीठी' नांदणाऱ्या या स्वानंदसाम्राज्याच्या चक्रवर्तीला प्रत्येक अध्यायाच्या उपसंहारांत दयार्णवांनीं परमश्रद्धेनें वंदन केलें आहे प्रस्तुत सातव्या खंडांतहि

एकोणसाठाव्या अध्यायात श्रीकृष्णाच्या विवाहांचें वर्णन करताना नाथांनी 'रुक्मिणी-स्वयंवरां'त केलेल्या विवाहवर्णनाचें स्मरण दयार्णवाना झालें आहे—

यथावत्पदें वृद्धाचार । जरी वर्णावा सूत्रानुसार ।
तरी प्रभु एकनाथ तो विस्तार । अध्यात्मप्रचुर बोलिले ॥
रुक्मिणीस्वयवरामाझारी । वदली स्वामींची वैखरी ।
तेचि पुढती वदता चतुरी । काय म्हणिजेल ते विवरा ॥...
तेंवि प्रभूचिया व्याख्याना- । सम न कराव्या कविता आना ।
विप्रवेषें द्वारकाराणा । वाहे जीवना ज्या सदनी ॥

—हरिवरदा, ५९.६२७-६२८, ६३२.

अशा प्रकारें दयार्णवांच्या हृदयात नाथांचें स्मरण सदैव जागें असे. त्याच्या सर्व आधिव्याधींचे निरसन नाथकृपेनेंच झाले असल्यामुळें नाथाविषयीच्या त्याच्या भक्तीला अनन्यसाधारण उत्कटता आलेली आहे. नाथाची वाक्पूजा बांधण्यासाठी दयार्णवानी दोन स्वतंत्र स्तोत्रें रचलेली आहेत, ती श्रद्धावताना नित्यस्मरणीय वाटतील अशी आहेत—

## श्रीएकनाथदशक

सप्रेमयुक्त घडली गुरुभक्ति साची । झाली कृपा सफळ साध्य जनार्दनाची ।
ब्रह्मैव बोध समता निज निर्विकारी । श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥१॥
पाहों त्रिदेव यवनाकृति आर्त आले । श्राद्धान्न घालुनि तयांप्रति तृप्त केलें ।
साम्य प्रशंसुनि वरप्रद केशशौरी । श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥२॥
त्वत्कीर्तिपुण्यसरिता कलिदोष नाशी । त्वत्संप्रदाय परमामृत दे जनांसी ।
ज्याच्या वरें जडमुढा भजनेंचि तारी । श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥३॥
संपादिलें ऋण बहु द्विजभोजनासी । तें फेडिलें यदुवरे श्रुत सज्जनासी ।
केला ऋणी निजबळें भवबंधहारी । श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥४॥
श्रीखंडिया म्हणवी कृष्णचि ब्रह्मचारी । सर्वोपचार जलवाहक टाळधारी ।
सेवासुखे विसरला स्वपदां मुरारी । श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥५॥
श्रीकृष्णदास निमतां जडलिंगभागीं । केला उभा यम निशा अंकरा प्रसंगी ।
तें युद्धकांड करवी परिपूर्ण अग्रीं । श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥६॥
रामायणादि दशमांतिल रुक्मिणीचें । केले स्वयंवर फलप्रद वाक्य ज्याचे ।
अध्यात्मतंतु न सुटे कविताप्रकारीं । श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥७॥
वाराणसींत विदुषांप्रति मान्य झाली । एकादशावरि टिका सुगमार्थ केली ।
ब्रह्मीं स्वकर्म विनियोग जनोपकारी । श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥८॥
ब्रह्मप्रतीति भजनीं प्रगटी द्विजांच्या । दुष्टाघरोग हरि पादरजेचि ज्याच्या ।
भूतीं दया भजन सर्वघटीं विचारी । श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥९॥
देहात्मभाव निरसी जड दृश्यरोधें । जीवात्मता विसरवी स्वरुपावबोधें ।
लक्ष्यांत जीवशिव ऐक्यपदीं स्विकारी । श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥१०॥
हा एकनाथदशक स्तवि नित्य भावें । वाग्देवता प्रकटिता सकळार्थ फावे ।
त्या जगद्गुरु दयार्णव साह्यकारी । श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥११॥

— — — — — — —

# श्रीएकनाथस्तवन

मूळावरी उपजतांचि समूळ माया । ग्रासूनियां भव पुढें नुरवी शमाया ।
नाहीं नियामक तया दुसरा अनाथा । साष्टांग वंदिन दयार्णव एकनाथा ।।१।।

मूळीं गिळूनि भवसागर शुष्क ज्याने । केला तयासि मग वाढविलें अज्याने ।
तो भानुदासकुलभूषण भक्तिपंथा । साष्टांग वंदिन दयार्णव एकनाथा ।।२।।

ज्याचे घरी हरि करी उपचारसेवा । विप्रार्चने करुनि मानत वासुदेवा ।
तारी अपार जड ठेवुनि हस्त माथा । साष्टांग वंदिन दयार्णव एकनाथा ।।३।।

भावें जनार्दन जनी नयनी निरीक्षी । बोधूनि हें गुज निजांकित भक्त रक्षी ।
आतां समर्थ करितो निरसूनि वेथा । साष्टांग वंदिन दयार्णव एकनाथा ।।४।।

श्रीआदिनाथ-गुरुदत्त-जनार्दनासी । तें साधिलें करुनि सन्निधि साधनासीं ।
केली तया वरुनि भागवताख्य गाथा । साष्टांग वंदिन दयार्णव एकनाथा ।।५।।

– – – – – – –

# विदग्धता व आर्षता यांचा संगम . . .

पंतकवींच्या मंडलांत कृष्णदयार्णवांनीं विदग्धता व आर्षता यांचा मधुर संगम साधला आहे. प्रकांड पांडित्य, असामान्य भाषाप्रभुत्व, ललित रसिकता व साहित्यिक व्युत्पन्नता या गुणांमुळें त्यांच्या कवितेंत विदग्धतेचा परिपोष झाला आहे, तर काव्यविषयाची सकीर्णता व भव्यता पेलण्याइतकी व्यापक जीवनानुभूति व चिंतनशीलता अंगीं असल्यामुळें ती विदग्धता एका भव्य आर्षतेंत विलीन झाली आहे. त्याच्या प्रतिभेच्या या आगळ्या वैशिष्टयामुळेंच त्यानी कृष्णचरित्राच्या निमित्तानें परमार्थरंजित प्रपंचाचें व्यापक जीवन-दर्शन घडविलें आहे. परमार्थाचें व्याकरण मांडण्यासाठीं ज्ञानेश्वरांनीं व नाथांनीं तात्त्विक ग्रंथरचना केली, तर कृष्णदयार्णवांनीं त्याच हेतूनें कृष्णकथेचा आश्रय घेऊन यश मिळविले. हेतूची एकात्मता असूनहि नाथांचे 'रुक्मिणीस्वयंवर' आणि दयार्णवांची दशम-टीका यात किती भिन्नता आली आहे, हे जाणत्यांच्या लगेच ध्यानीं येईल. परमार्थप्रतिपादनासाठी नाथांनी कथावस्तूचा आत्माच गुदमरवून टाकला आहे, तर दयार्णवांनीं प्रसंगांच्या गाम्भ्यांतून तत्त्वचिंतन लीलया फुलविले आहे.

कृष्णचरित्रांत नवरसांचे प्रवाह खळाळून वाहत आहेत. जीवनांतील सर्व संकीर्णता, विविधता, व्यापकता आणि भव्यता कृष्णचरित्रांत प्रकटली आहे. अर्थात् त्यात अवतार-हेतूचे एक दृढ सूत्र सर्वत्र अनुस्यूत आहे. दयार्णवांनीं हें सूत्र कटाक्षाने सांभाळलें आहे. वर्ण्यविषयाने कितीहि आणि कशीहि वळणें घेतलीं, तरी दयार्णवांची त्या सूत्रावरील दृष्टि अचल असते. ही दृष्टि अभ्यासजन्य नसून प्रतीतिजन्य आहे. त्यांनीं ईश्वराच्या मनोगताशी तादात्म्य साधलें असल्यामुळेंच बेचाळीस हजार ओव्यांच्या या प्रचंड काव्यांत त्यांचें जीवनविषयक चिंतन एकात्म सघनतेनें प्रकटलें आहे.

— रामचंद्र चिंतामण ढेरे

सप्तम खंड : प्रस्तावना

प्रकाशक

दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर

१२५७ सदाशिव, पुणें २